लोकलेखा समिती

(२०१२-२०१३)

(बारावी महाराष्ट्र विधानसभा)

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००६-२००७ च्या
नागरी अहवालामधील नियोजन (रोजगार हमी योजना) विभागाशी संबंधित
(परिच्छेद क्र. ३.१), सामाजिक न्याय
व विशेष सहाय्य/आदिवासी विकास विभागाशी
संबंधित (परिच्छेद क्र.३.३), कृषी, पशुसंवर्धन, दुग्धविकास व
मत्स्यव्यवसाय (कृषी) विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ३.५),
नगरविकास विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र.४.३.९),
पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ४.३.२०),
कृषी, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्सव्यवसाय (दुग्धविकास)
विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ४.४.१),
गृह विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ४.४.२),
महिला व बालविकास विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ५.१) यावरील

नववा अहवाल

(हा अहवाल विधानसभा / विधानपरिषद सभागृहास
दिनांक जुलै, २०१२ रोजी सादर करण्यात आला)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई.
२०१२

लोकलेखा समिती

२०१२-२०१३

(बारावी महाराष्ट्र विधानसभा)

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००६-२००७ च्या नागरी अहवालामधील नियोजन (रोजगार हमी योजना) विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ३.१), सामाजिक न्याय व विशेष सहाय्य/आदिवासी विकास विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र.३.३), कृषी, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय (कृषी) विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ३.५), नगरविकास विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र.४.३.९), पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ४.३.२०), कृषी, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्सव्यवसाय (दुग्धविकास) विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ४.४.१), गृह विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ४.४.२), महिला व बालविकास विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ५.१) यावरील

नववा अहवाल

लोकलेखा समिती
२०१२-२०१३

समिती प्रमुख

१) श्री. गिरीश बापट, वि.स.स.

सदस्य

२) श्री.मधुकर उर्फ अण्णा चव्हाण, वि.स.स.

३) श्री.गोपालदास अग्रवाल, वि.स.स.

४) श्री.सुनिल केदार, वि.स.स.

५) श्री.बसवराज पाटील, वि.स.स.

६) श्री.विनायक निम्हण, वि.स.स.

७) श्री.निलेश देशमुख-पारवेकर, वि.स.स.

८) श्री.विजय वडेट्टीवार, वि.स.स.

९) श्री.संजय सावकारे, वि.स.स.

१०) श्री.दिलीप सोपल, वि.स.स.

११) श्री.ए.टी.पवार, वि.स.स.

१२) श्री.विक्रमसिंह पाटणकर, वि.स.स.

१३) श्री.बदामराव पंडित, वि.स.स.

१४) प्रा.राम शिंदे, वि.स.स.

१५) श्री.गिरीष महाजन, वि.स.स.

१६) श्री.नानाभाऊ पटोले, वि.स.स.

१७) श्री.आर.एम.वाणी, वि.स.स.

१८) श्री.चंद्रकांत मोकाटे, वि.स.स.

१९) श्री.विवेक (भाऊ) पंडित, वि.स.स.

२०) श्री.नितीन सरदेसाई, वि.स.स.

२१) श्री.जयप्रकाश छाजेड, वि.प.स.

२२) प्रा.सुरेश नवले, वि.प.स.

२३) श्री.विनायक मेटे, वि.प.स.

२४) श्री.विजयसिंह मोहिते-पाटील, वि.प.स.

२५) श्री.पांडुरंग फुंडकर, वि.प.स.

निमंत्रित

२६) श्री.दिवाकर रावते, वि.प.स.

२७) श्री. मनिष जैन, वि.प.स.

सदरहू समिती दिनांक ३१ मे, २०१२ रोजी विधानसभा व दिनांक १ जून, २०१२ रोजी विधानपरिषद सदस्यांच्या नामनिर्देशनाद्वारे गठीत करण्यात आली.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,

१) डॉ.अनंत कळसे, प्रधान सचिव.
२) श्री.सु.सा.गायकवाड, वित्तीय सल्लागार.
३) श्री.सु.शा.मयेकर, उप सचिव.
४) श्री.ऋतुराज ज. कुडतरकर, अवर सचिव.
५) श्री.दिलीप येवला, अवर सचिव (समिती).
६) श्री.सोमनाथ न. सानप, कक्ष अधिकारी.

लोकलेखा समिती
२०१०-२०११

समिती प्रमुख

१) श्री. गिरीश बापट, वि.स.स.

सदस्य

२) श्री.कालिदास कोळंबकर - वि.स.स.
३) श्री.निलेश देशमुख-पारवेकर - वि.स.स.
४) डॉ.नामदेव उसेंडी - वि.स.स.
५) श्री.अमित देशमुख - वि.स.स.
६) श्री.रामप्रसाद कदम-बोर्डीकर - वि.स.स.
७) श्री. रवि राणा - वि.स.स.
८) श्रीमती मिनाक्षी पाटील - वि.स.स
९) श्री.ए.टी.पवार - वि.स.स.
१०) श्री.नवाब मलिक - वि.स.स.
११) श्री.विलास लांडे - वि.स.स.
१२) श्री.शिवेंद्रसिंह भोसले - वि.स.स.
१३) श्री.संजय सावकारे - वि.स.स.
* १४) श्री.सुधीर मुनगंटीवार - वि.स.स.
१४ (अ) प्रा. राम शिंदे- वि.स.स.
१५) श्री.गिरीष महाजन - वि.स.स.
१६) श्री.नानाभाऊ पटोले - वि.स.स.
१७) श्री.सुर्यकांत दळवी - वि.स.स.
१८) श्री.आर.एम.वाणी - वि.स.स.
१९) श्री.एकनाथ शिंदे - वि.स.स.
२०) श्री.बाळा नांदगावकर - वि.स.स.
२१) श्री. सुरेशदादा देशमुख - वि.प.स.
२२) श्री.भाई जगताप - वि.प.स.
** २३) श्री. राजेंद्र जैन - वि.प.स.
*** २४) श्री. विनोद तावडे - वि.प.स.
२४ (अ) श्री.पांडुरंग फुंडकर, वि.प.स.
२५) डॉ. दिपक सावंत - वि.प.स.

सदरहू समिती दिनांक २४ फेब्रुवारी, २०१० रोजी विधानसभा व दिनांक २ मार्च, २०१० रोजी विधानपरिषद सदस्यांच्या नामनिर्देशनाद्वारे गठीत करण्यात आली.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव.
२) श्री. भाऊसाहेब कांबळे, सह सचिव.
३) श्री. सु. सा. गायकवाड, वित्तीय सल्लागार.
४) श्री. ऋतुराज ज. कुडतरकर, अवर सचिव.
५) श्री. दिलीप येवला, अवर सचिव (समिती).
६) श्री. सोमनाथ न. सानप, कक्ष अधिकारी.

*** श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स यांनी दिनांक २० ऑक्टोबर, २०१० रोजी समिती सदस्यत्वाचा राजीनामा दिल्यामुळे रिक्त झालेल्या जागेवर प्रा. राम शिंदे, वि.स.स. यांची मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी दिनांक २० ऑक्टोबर, २०१० रोजी समिती सदस्य म्हणून नामनियुक्ती केली.**

**** श्री.राजेंद्र जैन, वि.प.स. यांची दिनांक ५ डिसेंबर, २०१० रोजी विधानपरिषद सदस्यत्वाची मुदत संपली.**

***** श्री.विनोद तावडे, वि.प.स. यांची दिनांक २३ डिसेंबर, २०११ रोजी विरोधी पक्ष नेता, विधानपरिषद पदी निवड झाल्यामुळे रिक्त झालेल्या जागेवर श्री.पांडुरंग फुंडकर, वि.प.स. यांची मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी दिनांक ६ फेब्रुवारी, २०१२ रोजी समिती सदस्य म्हणून नामनियुक्ती केली.**

(पाच)
प्रस्तावना

मी, लोकलेखा समितीचा समिती प्रमुख, समितीने अहवाल सादर करण्याचा अधिकार दिल्यावरुन भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००६-२००७ च्या नागरी अहवालामधील नियोजन (रोजगार हमी योजना) विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ३.१), आदिवासी विकास / सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र.३.३), कृषी, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय (कृषी) विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ३.५), नगरविकास विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र.४.३.९), पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ४.३.२०), कृषी, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्सव्यवसाय (दुग्धविकास) विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ४.४.१), गृह विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ४.४.२), महिला व बालविकास विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ५.१) यावर विचार करुन लोकलेखा समितीचा नववा अहवाल सादर करीत आहे.

समितीने दिनांक ५ ऑक्टोबर, २०१०, दिनांक १२ जानेवारी, २०११, दिनांक ८ फेब्रुवारी, २०११, दिनांक १०, व २५ मे, २०११, दिनांक ५, १२ व १३ जुलै, २०११, दिनांक २० व २१ सप्टेंबर, २०११, दिनांक २९ फेब्रुवारी, २०१२ आणि ८ मे, २०१२ रोजी प्रधान सचिव, गृह, नगरविकास, पाणी पुरवठा व स्वच्छता, कृषी, महिला व बालविकास, आदिवासी विकास, नियोजन (रोजगार हमी योजना) विभाग व सचिव, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्सव्यवसाय (दुग्धविकास), सामाजिक न्याय विभाग यांची साक्ष विधान भवन, मुंबई येथे घेतली.

प्रधान महालेखाकार, लेखापरीक्षा-एक महाराष्ट्र, मुंबई तसेच महालेखाकार, लेखापरीक्षा-२ महाराष्ट्र नागपूर हे समितीच्या निमंत्रणावरुन बैठकींना उपस्थित होते. त्यांनी समितीला केलेल्या बहुमोल मार्गदर्शनाबद्दल समिती त्यांची अत्यंत आभारी आहे.

तसेच सचिव, वित्त विभाग (लेखा व कोषागारे) यांनी समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीला दिलेल्या सहकार्याबद्दल आणि संबंधित विभागाच्या सचिवांनी समितीसमोर साक्ष देऊन समितीला सहकार्य केले त्याबद्दल समिती त्यांची देखील आभारी आहे.

समितीच्या बैठकीच्या कामकाजाचे कार्यवृत्त स्वतंत्ररित्या ठेवण्यात आले असून तो अहवालाचा भाग आहे. बैठकीच्या कामकाजाच्या अनुषंगाने विभागाकडून प्राप्त झालेली आश्वासित माहिती व परिपत्रके परिशिष्ट "अ" मध्ये देण्यात आलेली आहेत. समितीच्या झालेल्या बैठकांचे संक्षिप्त कार्यवृत्त परिशिष्ट "ब" मध्ये देण्यात आलेले आहे.

समितीने दिनांक १८ जुलै, २०१२ रोजी झालेल्या बैठकीत हा अहवाल विचारात घेतला व त्यास काही फेरफारासंह मान्यता दिली.

विधान भवन,
मुंबई.
दिनांक :१८ जुलै, २०१२

गिरीश बापट,
समिती प्रमुख,
लोकलेखा समिती

(सहा)

अनुक्रमणिका

अ.क्र.	विभाग व तपशील	पृष्ठ क्रमांक
(१)	(२)	(३)
	सन २००६-२००७ च्या नागरी अहवालामधील परिच्छेद	
	नियोजन (रोजगार हमी योजना) विभाग	
(१)	महाराष्ट्रातील रोजगार हमी योजना (परिच्छेद क्र.३.१)	
	आदिवासी विकास / सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग	
(२)	अनुसूचित जाती आणि अनूसूचित जमातीसाठी शिक्षणाचा विकास (परिच्छेद क्र.३.३)	
	कृषी, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय (कृषी) विभाग	
(३)	कृषी विभागातील संगणकीकरण (परिच्छेद क्र.३.५)	
	नगरविकास विभाग	
(४)	व्याजाचे नुकसान (परिच्छेद क्र. ४.३.९)	
	पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग	
(५)	खर्चातील वाढ (परिच्छेद क्र. ४.३.२०)	
	कृषी, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्सव्यवसाय (दुग्धविकास) विभाग	
(६)	कामाविना असलेल्या कर्मचारीवर्गास वेतनाची अदायगी (परिच्छेद क्र. ४.४.१)	
	गृह विभाग	
(७)	निधी अडकून पडणे (परिच्छेद क्र. ४.४.२)	
	महिला व बालविकास विभाग	
(८)	महिला आणि बालविकास विभागांतील अंतर्गत नियंत्रण यंत्रणा (परिच्छेद क्र. ५.१)	

नियोजन (रोजगार हमी योजना) विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००६-२००७ या वर्षाच्या नागरी अहवालामधील **परि.क्र.३.१ "महाराष्ट्रातील रोजगार हमी योजना"** या संदर्भात महालेखाकारांनी खालील अभिप्राय व्यक्त केले आहेत.

मनुष्यबळाची अंदाजपत्रके तयार करणे -

१.१ महाराष्ट्र रोजगार हमी कायदा १९७७ च्या कलम ७ (२) (iv) मध्ये करारनिविष्ट करण्यात आले आहे की शारिरीक कामाची मागणी आजमावण्याच्या दृष्टीने संपूर्ण जिल्ह्यातील बेरोजगारीचे एकूण स्वरुप लक्षांत घेऊन जिल्ह्याकरीता मनुष्यबळाचे अंदाजपत्रक तयार करण्यात यावे की ज्यामुळे योजनेअंतर्गत द्यावयाच्या कामाचे नियोजन करणे शक्य होईल. असे लक्षांत आले आहे की चाचणी परीक्षा केलेल्या आठ जिल्ह्यांत मनुष्य बळाची अंदाजपत्रके तयार करण्यात आलेली नव्हती. ही कमतरता जिल्ह्याधिकाऱ्यांनी मान्य केली (जानेवारी ते जुलै, २००७) आणि येणाऱ्या आर्थिक वर्षात ही कमतरता भरुन काढण्याचे मान्य केले. याप्रमाणे निधीची तरतूद रोजगाराच्या मागणीवर आधारीत नव्हती.

ज्ञापन :

१.२ उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला :-

मनुष्यबळाच्या अंदाजपत्रकाच्या कार्यपद्धतीत सुसूत्रता आणण्यात आली असून सदर कार्यपद्धतीचे पुर्णतः प्रमाणीकरण करण्यात आले आहे व त्याबाबतची माहिती नरेगा योजनेच्या संकेत स्थळावर असलेल्या स्टेट एमआयएस रिपोर्टस मध्ये उपलब्ध आहे. प्रत्यक्षात आगामी वित्तीय वर्षासाठी मनुष्यबळ अंदाजपत्रक तयार करुन ते मार्च महिन्यात सादर केल्याखेरीज केंद्र शासनाकडून कोणताही निधी प्राप्त होत नाही. सदर अंदाजपत्रक हे गटनिहाय व महिनानिहाय तयार केले जाते. पुढील वित्तीय वर्षाचे संपुर्ण महाराष्ट्रासाठीचे मनुष्यबळ अंदाजपत्रक (ज्यास लेबर बजेट म्हटले जाते) शासनाने या वर्षी काटेकोरपणे मार्च महिन्यात भारत सरकारला सादर केले होते आणि ते भारत सरकारच्या प्राधिकृत समितीने केलेल्या सुधारणासह दिनांक २४.०३.२०११ रोजी स्वीकृत झालेले आहे.

गावांकरीता कामांची मांडणी तयार करणे -

१.३ महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना/रोजगार हमी योजना यांच्या मार्गदर्शक तरतुदीनुसार, चालू स्थितितील योजनांव्यतिरिक्त, तरतुदीनुसार, तहसिलदारांकडून तयार करण्यांत आलेल्या जिल्हाधिकाऱ्याकडून संमत झालेल्या कामांच्या मांडण्या तयार ठेवावयाच्या असतात जेणेकरुन जो रोजगार उपलब्ध करुन देणे शक्य असते (मनुष्य दिवसाच्या मापनाने मोजलेले) तो येणाऱ्या वर्षात अपेक्षित रोजगाराच्या गरजेच्या १५० टक्के असतो. परंतु असे लक्षांत आले आहे की सहा तहसीलमधील (१६ चाचणी परीक्षा झालेल्या पैकी) २०१ गावांमध्ये २००६-२००७ या वर्षामध्ये कामाच्या मांडण्या तयार करण्यात आल्या नव्हत्या. याप्रमाणे योजना निधी योजनेच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन न करता खर्च करण्यात आले.

ज्ञापन :

१.४ उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला :-

कामाच्या मांडण्या करुन ठेवण्याची पद्धत राज्य रोहयो व नरेगा या दोन्ही योजनांमध्ये अस्तित्वात आहे. यापुर्वी ज्या गटांत कामाची नितांत मागणी आहे त्या गटात सदर पद्धत वापरली जात होती. आता सदर पद्धतीचे नरेगा योजनेच्या आवश्यकतेनुसार पुर्णत: प्रमाणीकरण करण्यात आलेले आहे. याबाबतचा पुरावा म्हणून साप्ताहिक अहवाल सोबत जोडले आहेत. या कार्यपद्धतीत आता सुसूत्रता आणण्यात आली आहे.

जिल्ह्यांकरीता वार्षिक योजना तयार करणे -

१.५ रोजगार हमी योजनेअंतर्गत जिल्ह्याधिकाऱ्यांनी त्यांच्या जिल्ह्यांकरीता त्यांचेकडून तयार करण्यात आलेल्या वार्षिक आखणीच्या आधारे निधींची मागणी करावयाची असते. असे लक्षांत आले की योजना विभागाने गेल्या तीन वर्षांच्या मागण्याच्या सरासरीवर आधारीत असलेले अंदाजपत्रकीय प्रस्ताव अर्थ विभागास पाठविले. यामुळे जिल्हाधिकाऱ्यांकरीता असलेले निधींचे वाटप त्यांनी वार्षिक आखणीमध्ये मागणी केलेल्या निधीपेक्षा खूप कमी होते. तथापि, जिल्हाधिकारी त्यांना वाटप केलेली रक्कम सुद्धा खर्च करु शकले नव्हते. चाचणी परीक्षा झालेल्या आठ जिल्ह्यांमध्ये, ज्या ठिकाणी माहिती उपलब्ध करुन देण्यात आली होती, २००२-२००६ या कालावधीत जिल्हाधिकाऱ्यांकडून मागणी केलेली रक्कम रु.३०७१.२० कोटी इतकी होती. त्यापोटी उपलब्ध करुन देण्यात आलेली एकूण रक्कम रु.६३६.३२ कोटी इतकी होती (२१ टक्के) आणि खर्च करण्यात आलेली रक्कम रु.५९६.६२ कोटी इतकी होती (१९ टक्के).

चाचणी परीक्षा झालेल्या जिल्ह्यांतील अंदाजपत्रकीय वाटप आणि झालेला खर्च यांची वर्षवार स्थिती परिशिष्ट ३.२ मध्ये देण्यात आली आहे. ही स्थिती असे दाखवून देते की जिल्हाधिकाऱ्यांकडून तयार करण्यात आलेले वार्षिक योजना वास्तववादी नव्हत्या.

ज्ञापन :

१.६ उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला :-

वरील परिच्छेद क्र.३.१.६.१ च्या स्पष्टीकरणात नमूद केल्यानुसार वार्षिक योजना (लेबर बजेट) आता शिस्तबद्ध पद्धतीने तयार केली जाते. वार्षिक योजना तयार करण्याचे काम जिल्हा परिषदेकडून माहे ऑक्टोबर मध्ये सुरु केले जाते व माहे डिसेंबर अखेर सदर काम पूर्ण करुन प्रस्ताव तयार केला जातो. त्यानंतर सदर प्रस्ताव जिल्हाधिकारी मंजुर करुन राज्य शासनास सादर करतात. त्याआधारे राज्य शासनाकडून संपुर्ण राज्यासाठीचा एकत्रित प्रस्ताव तयार करुन माहे फेब्रुवारी मध्ये भारत सरकारला सादर केला जातो.

आता सन २००८ पासून जुनी रोजगार हमी योजना राज्यातील सर्व जिल्ह्यात बंद झालेली असून केवळ नरेगा योजनेची कार्यपद्धती अंमलात आहे. एमआयएस पद्धत आणि निधी वितरण कार्यपद्धतीमुळे वार्षिक योजना (लेबरबजेट) काटेकोर व वक्तशीर अशी झालेली आहे.

"क" वर्ग नगरपरीषदांचे व्याप्ति क्षेत्र -

१.७ हा कार्यक्रम "क" वर्ग नगरपरीषदांमध्ये सुद्धा अंमलात आणावयाचा होता असे दिसून आले की चाचणी परीक्षा झालेल्या आठ जिल्ह्यांतील ४२ परीषदांमध्ये रोजगार हमी योजना राबविण्यात आली नव्हती. तसेच, जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांचे जिल्ह्यांतील "क" वर्ग नगर परीषदांमध्ये मजूरांची/कामगारांची नोंदणी दर्शविणारे अभिलेखे ठेवले नव्हते. यावर प्रधान सचिव यांनी असे म्हटले की जिल्हाधिकाऱ्यांना "क" वर्ग नगरपरीषदांमध्येसुद्धा कामांची यादी तयार करण्याबाबत योग्य त्या सूचना देण्यात येतील.

ज्ञापन :

१.८ उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला :-

रोहयो ही मागणी प्रणव योजना आहे आणि तिची सक्तीने अंमलबजावणी करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. परंपरेने रोजगार हमी योजना ही ग्रामीण भागासाठीची योजना आहे. तथापि, प्रत्यक्षात "क" वर्ग नगरपालिका क्षेत्राचे स्वरुप हे बहुतांशी ग्रामीण स्वरुपाचे असल्याने, ज्यावेळी राज्य रोजगार हमी योजना (रोहयो) कायदा अंमलात आणला गेला त्यावेळी त्यातील

ग्रामीण क्षेत्राच्या व्याख्येत "क" वर्ग नगरपालिकांच्या समावेश करण्यात आला होता. आता सन २००८ पासून केंद्र पुरस्कृत नरेगा ही योजना केवळ ग्रामीण क्षेत्रातच राबवली जात आहे.

या संपुर्ण विषयाचे पुनर्विलोकन करण्यात येत असून नागरी क्षेत्रासाठीची योजना व त्यासाठीची स्वतंत्र तरतूद करण्यात येत आहे.

निधी व्यवस्थापन :-

रोजगार हमी निधी -

१.९ रोजगार हमी योजनेनुसार रोजगार हमी योजनेस निधी पुरविण्याकरीता एक रोजगार हमी निधी स्थापन करावयाचा होता. व्यवसाय व्यापार, उद्योग यावरील कर, वाहनांवरील अतिरिक्त कर, पाटबंधाऱ्याखालील शेतजमिनीचे विशेष करनिर्धारण, जमिन महसुलावरील अधिभार आणि अनिवासी शहरी जमिनी आणि इमारती यावरील कर यामधून मिळणाऱ्या निव्वळ उत्पन्नातून रोजगार हमी निधीस पैशाचा पुरवठा होतो. शिवाय राज्य शासनास करापासून मिळणाऱ्या निव्वळ उत्पन्नाइतकीच आपला हिस्सा म्हणून त्या निधीमध्ये भर घालावी लागते.

गेल्या पाच वर्षातील प्रत्येक वर्ष अखेरीस असलेल्या निधीच्या शिल्लक रकमेचा तपशील खालीलप्रमाणे-

(रुपये कोटीमध्ये)

वर्ष	अंदाजपत्रक	सुरुवातीची शिल्लक	मिळकत	खर्च	अंतिम शिल्लक
२००२-०३	११७४.७२	५४२७.९०	१०५०.०४	६७७.५६	५८००.३८
२००३-०४	१०५०.००	५८००.३८	२१२७.०३	१०५८.०७	६८६९.३४
२००४-०५	९३१.१४	६८६९.३४	२३२९.३६	१२५६.९४	७९४१.७६
२००५-०६	९९३.००	७९४१.७६	२४३१.५६	९८०.६७	९३९२.६५
२००६-०७	७६९.१६	९३९२.६५	२८८०.४५	७०४.००	११५६९.१०
कुल	**४९१८.०८**		**१०८१८.४४**	**४६७७.२४**	

वरील कोष्टकातून असे दिसून येते कि अंदाजपत्रकीय तरतूद सातत्याने कमी करण्यात आली असून तिचा त्या कालावधीत जमा झालेल्या वाढीव निधीशी कोणताही मेळ राखण्यात आलेला नाही. मार्च २००७ अखेर रोजगार हमी योजना मधील शिल्लक रु.११५६९.१० कोटी इतकी होती. याप्रमाणे करदात्यांना अपेक्षित हेतूने प्रेरीत अशी सेवा न देता त्यांचेवर अकारण बोझा टाकलेला दिसून येतो.

२००२-०७ या कालावधीत असे लक्षात आले की शासनाने अर्थोपाय म्हणून रिझर्व्ह बँकेकडून आगाऊ ओव्हरड्राफ्टस काढले. हे असे दिर्शविते की शासन रोजगार हमी निधीतील पैसे वेगळ्या कारणासाठी वापरते.

ज्ञापन :

१.१० उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला :-

रोजगार हमी योजना कायद्यातील व्यवसायकर व इतर करांच्या वसुली रकमेत तेवढ्याच रकमेचे अंशदान राज्य शासनाने देऊन तयार केलेल्या (Ring fenced) रोजगार हमी योजना निधीची तरतूद सन २००८ मध्ये सुधारीत करण्यात आलेली आहे. त्यानुसार आता व्यवसायकर व इतर कर वसुलीची रक्कम व राज्य शासनाचे तेवढ्याच रकमेचे अंशदान हे वेगवेगळे राहिले नसून ते राज्याच्या एकत्रित निधीचाच भाग झालेले आहेत.

दुसरे असे की, व्यवसाय कराची वसुली करण्याचे व त्याचा हिशोब ठेवण्याचे काम या विभागाकडून हाताळले जात नसून, वित्त विभागाकडून हाताळले जाते. या विभागकडून केवळ रोहयो योजनेच्या खर्चासाठी निधी मंजुरीची काम हाताळले जाते.

रोजगार हमी निधीमध्ये उशीरा/कमी भरणा -

१.११ महानगरपालिका/नगरपालिका यांनी वसूल केलेल्या रोजगार हमी उपकर किंवा विलंबाने अदायगी केलेल्या उपकरावरील दंडात्मक रकमा यांच्या भरणा शासन लेख्यामध्ये ००४५००६२०३ (Other Taxes and Duties on Commodities and Services) या शिर्षकाखाली रकमा वसूल केलेल्या दिनांकापासून एक आठवडा संपण्याच्या आत भरणे आवश्यक असते.

सहा महानगरपालिका आणि दोन नगरपरिषदांनी (रु.२३.७८ कोटी) रोजगार हमी उपकर रोजगार हमी निधीमध्ये भरणा केला नाही किंवा रोजगार हमी निधीच्या योग्य त्या लेखा शिर्षाखाली जमा केला नाही. रोजगार हमी निधीमध्ये कमी भरणा झालेली उपकराची रक्कम शासनाकडील तेवढ्याच हिश्यासह रु.४७.५६ कोटी होती.

नाशिक महानगरपालिकेने जमा केलेली रोजगार हमी उपकर व त्यावरील दंड अशी एकूण रु.२२.१७ लाखाची रक्कम एक ते तेवीस महिने या प्रमाणात उशिरा भरणा केली.

मार्च २००४ आणि २००७ या वर्षामध्ये शासनास सहा महापालिकांकडून शिक्षण उपकर (रु.४१.७४ कोटी) आणि रोजगार हमी उपकर येणे असलेली रक्कम नगर विकास विभागाने चुकीच्या पद्धतीने महापालिकांना देय असलेल्या रस्ता अनुदानापोटी समायोजित केली.

शासनाच्या तेवढ्या रकमेच्या हिश्यासह रोजगार हमी निधीमध्ये एकूण कमी भरणा झालेली रक्कम रु.८३.४८ कोटी होती.

जिल्हा परिषदांना गेल्या वर्षातील वैयक्तिक लाभधारक योजना/कामे यावरील खर्च न झालेला निधी चालू वर्षात रोजगार हमी निधीमध्ये भरणा करुन समायोजित करावयाचा असतो ते समायोजन केले गेले नाही. २००१-०६ या कालावधीत आठ चाचणी परीक्षा केलेल्या जिल्ह्यांतील १९ कार्यान्वयन विभागांनी एकूण खर्च न झालेल्या रु.१.९२ कोटी इतक्या रकमेचा भरणा रोजगार हमी निधीमध्ये न करता नियमित महसुली (रेव्हेन्यु) शिर्षकाखाली केला तसेच चार जिल्हा परिषदांनी (अमरावती, नंदुरबार, नाशिक आणि सांगली) २००२-०७ या कालावधीत खर्च न झालेल्या रु.९.०३ कोटी रकमेचा रोजगार हमी निधीमध्ये भरणा केला नाही. कार्यकारी अभियंता (सा.बा.वि.) जि.प.सोलापूर आणि कार्यकारी अभियंता सा.बा.वि.(उ) नाशिक यांनी रोजगार हमी योजना करीता खरेदी केलेली वाहने अनुक्रमे रु.१०.०५ लाख व रु.४.०८ लाख इतक्या रकमेस काढून टाकली (मे २००६ आणि सप्टेंबर २००६). आलेल्या रकमा रोजगार हमी निधीमध्ये जमा न करता महसूल (रेव्हेन्यु) शिर्षक/ठेव या शिर्षकाखाली जमा केल्या.

ज्ञापन :

१.१२ उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला :-

जिल्हाधिकारी, सोलापूर व नाशिक यांनी सदर बाबतीत महालेखापाल, मुंबई यांचे लेख्यांशी ताळमेळ घेण्याबाबत संबंधीत कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांना सूचना दिलेल्या आहेत.

रो.ह.यो.च्या अंदाजपत्रकीय तरतूदीपेक्षा जादा खर्च -

१.१३ महाराष्ट्र शासन कोषागार नियमांच्या १५३ (X) अंतर्गत दिलेल्या शक्तीचा वापर करुन तसेच त्याच वर्षात त्या रकमेचे पुरक अनुदान मिळवू अशी हमी देऊन जिल्हाधिकाऱ्यांनी २००४-०५ या वर्षात अंदाजपत्रकीय तरतूदीपेक्षा रु.३२५.९४ कोटी इतकी जादा रक्कम काढली. तथापि तसे झाले नाही आणि जादा झालेल्या खर्चास वैधानिक संमती मिळवून नियमित केले गेले नाही.

ज्ञापन :

१.१४ उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला :-

मंजुर अनुदानापेक्षा जास्त झालेला खर्च नियमित करण्याची कार्यवाही संबंधित जिल्हाधिकारी यांचे स्तरावरुन केली जात असून त्याबाबतचा अनुपालन अहवाल लवकरात लवकर शासनास सादर करणेबाबत त्यांना सुचना देण्यात आलेल्या आहेत.

ओळख पत्रे/रोजंदारी पत्रे यांचे निर्गमन -

१.१५ रोजगार हमी योजनेच्या तरतुदीनुसार नोंदणीकृत कामगारांना/कुटुंबांना ओळखपत्रे द्यावयाची आहेत. तसेच महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत कुटुंबातील प्रत्येक नोंदणी दारास वैयक्तिक फोटो ओळख पत्रे द्यावयाची आहेत.

तीन चाचणी परीक्षा झालेल्या जिल्ह्यांमध्ये जेथे रोजगार हमी योजना चालू होती तेथे एकूण ६.०२ लाख नोंदणीकृत कामगारांपैकी २.८९ लाख कामगारांना ओळखपत्रे देण्यात आली नव्हती. (डिसेंबर २००६) तसेच, पांच चाचणी परीक्षा झालेल्या जिल्ह्यांमध्ये जेथे महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना अंमलात आली होती तेथे देण्यात आलेल्या १२.९८ लाख रोजंदारी पत्रांपैकी एकही ओळखपत्रांवर फोटो लावण्यात आलेला नव्हता. यावर जिल्हाधिकाऱ्यांनी असे म्हटले कि (जानेवारी ते जुलै २००७) ओळखपत्रे देण्याची व त्यावर फोटो लावण्याची कारवाई प्रगतीपथावर आहे.

कामगारांच्या कुटुंबाना ओळखपत्रे न देणे आणि त्यांच्या नोकरी ओळखपत्रांवर फोटो नसणे ह्या बाबीमुळे कामाच्या तपासणीच्या वेळी अनधिकृत कामगारांचा शोध घेणे कठीण गेले असेल.

ज्ञापन :

१.१६ उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला :-

येथे हे मान्य करण्यात येते की, पुर्वीच्या राज्य रोहयो योजनेत मजुरांची नोंदणी करण्याची पद्धती आवश्यक त्या प्रमाणात राबविली जात नव्हती. ज्या ज्या वेळी मजुर कामाची मागणी करत असत त्या त्या वेळी त्यांना काम पुरविले जात असे. शेतीकामाच्या मजुरीचा दर किंचित कमी असल्याने जे मजुर रोजगार हमी योजनेच्या शारिरीक श्रमाच्या कामाची स्वेच्छेने निवड करतील त्यांना काम दिले जात होते. असा तो मजुरांच्या स्वेच्छा मर्जीवर आधारित कार्यक्रम राबविला जात होता.

रोजगार निर्मिती -

१.१७ शासकीय अभिलेख्यानुसार २००२-०६ या कालावधीत राज्यामध्ये निर्माण झालेला रोजगार ७३.०५ कोटी होता.

रोजगार हमी योजने अंतर्गत राज्यामध्ये रोजगार मिळवू पहाणाऱ्यांची नोंदणी झालेली आकडेवारी प्रशासकीय विभागांकडे उपलब्ध नव्हती. जिल्ह्यांतील अधिकाऱ्यांनी रोजगार निर्मितीबद्दल माहिती देणारा तक्ता बनविणे अपेक्षित होते. तथापि, चाचणी परीक्षा केलेल्या कोणत्याही जिल्ह्यातून ती माहिती अद्यावत करण्यात आली नव्हती. असे लक्षात आले की, चाचणी परीक्षा झालेल्या आठ जिल्ह्यांमध्ये एकूण ज्या मनुष्यदिवसांकरीता रोजगार निर्मिती झाली होती त्याच्या तुलनेत एकूण नोंदणी झालेल्या कामगारांची संख्या कमी होती. सात चाचणी परिक्षा झालेल्या जिल्ह्यात एका वर्षात एकूण जास्तीतजास्त निर्माण झालेल्या मनुष्य दिवसांची एकूण अपेक्षित निर्माण व्हावयाच्या मनुष्य दिवसांशी टक्केवारी ५.०५ (अमरावती २००४-०५ मध्ये) आणि २३.४७ टक्के (सोलापूर २००३-०४ मध्ये) यादरम्यान होती.

महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत १७ ग्रामपंचायतीमध्ये मंजूर झालेल्या ३७ कामांपैकी (अमरावती, नंदुरबार आणि यवतमाळ मध्ये) ३५ कामे, गावकऱ्यांनी रोजगारासाठी मागणी न केल्यामुळे सुरु होऊ शकली नाहीत. याप्रमाणे नोंदणी पद्धती जी प्रत्यक्ष मागणीचा आवाका समजण्यासाठी होती तो हेतू नोंदणी झालेल्या गावकऱ्यांनी योजनेअंतर्गत मान्य झालेल्या रोजगारासाठी अर्ज न केल्यामुळे साध्य झाला नव्हता.

ज्ञापन :

१.१८ उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला :-

तथापि, नरेगा योजना सुरु झाल्यानंतर जॉब कार्डाचे कामात सुसूत्रता आणण्यात आली व मस्टर रोलवर जॉबकार्ड क्रमांक नोंदवण्यात येऊ लागले ग्रामपंचायतनिहाय मजुरांची त्यांच्या फोटोग्राफसहीत तपशीलवार माहिती नरेगा योजनेच्या nrega.nic.in या संकेतस्थळावर नोंदण्यात येत आहे.

अपूर्ण कामे -

१.१९ जिल्ह्यांतील सर्वसाधारण शेतकामासाठी कामगारांच्या उपलब्धतेवर फार मोठ्या प्रमाणांत वाईट परिणाम झालेला नाही आणि रोजगार हमी योजना सुरु करण्यापूर्वी शासन

आणि स्थानिक संस्थाकडे रोजगार हमी योजना व्यतिरिक्त योजना व योजनेतर कामे उपलब्ध नाहीत या बाबी तपासावयास हव्या होत्या. चाचणी परीक्षा झालेल्या जिल्ह्यांत असे दिसून आले कि २००२-०६ या कालावधीत कामगारांच्या तुटवड्यामुळे १५ कार्यान्वयन संस्थांकडून चालू स्थितीत असलेली ३५२ कामे पूर्ण होऊ शकली नाहीत. वस्तुतः ही बाब सत्यावर आधारीत नाही कारण त्याच गट विभागात वरील १५ कार्यान्वयन संस्थांपैकी १० संस्थांना पुर्वीची चालू स्थितितील कामे कामगारांच्या तुटवड्यामुळे बंद करावी लागली असतानासुद्धा नवीन ९३ कामे पुढील कालावधीसाठी सुरु केली. त्याचबरोबर, कामे अपूर्ण राहिल्यामुळे योजनेअंतर्गत अपेक्षित केल्यानुसार टिकाऊ मालमत्ता निर्माण झाली नाही. शिवाय अशा १५ कार्यान्वयन संस्थाकडील प्रलंबित कामांमुळे एकूण रु.१३.७४ कोटी इतका निधी अडकून पडला आहे.

योजना विभागाने अशा सूचना प्रसृत केल्या की (ऑगस्ट २००३) रोजगार हमी योजना अंतर्गत एखाद्या कामावर त्या कामाच्या प्रशासकीय मान्यतेच्या ९० टक्के खर्च झाल्यास आणि जर उर्वरीत खर्च १० टक्क्याहून अधिक होण्याची शक्यता असल्यास, जिल्हाधिकाऱ्यांनी १० टक्के रक्कम पतपत्रावर काढण्यास रोख लावावा व कार्यान्वयन संस्थांना सुधारीत प्रशासकीय मंजूरी आणण्यास सांगावे. अहमदनगर, सांगली आणि सोलापूर जिल्ह्यातील ५४ कामांच्या बाबतीत असे दिसून आले की शिल्लक पतपत्राची १० टक्के रक्कम रु.४८ लाख इतकी रक्कम पतपत्राद्वारे सुधारीत प्रशासकीय मंजूरी न घेता काढण्यात आले होते. २३ कार्यन्वयन संस्थांकडे (८० चाचणी परीक्षा झालेल्यांपैकी) असलेल्या अशा ८७ कामांमध्ये गुंतलेली रु.६.०१ कोटी इतकी रक्कम १ ते १० वर्षाकरीता सुधारीत प्रशासकीय मंजूरी आणि आवश्यक तो निधी उपलब्ध न झाल्यामुळे अडकून पडली होती.

रोजगार हमी योजनेच्या मार्गदर्शक सुचनांमध्ये असे करारनिविष्ट करण्यात आले आहे की जेव्हां वन जमिनीवर कामे करावयाची असतात तेव्हा केंद्र शासनाकडून कामे सुरु होण्यापूर्वी पूर्व परवानगी घ्यावयाची असते. सहा चाचणी परीक्षा झालेल्या जिल्ह्यांतील ६३ कामे २०००-०६ या कालावधीत वन खात्यातील निपटाऱ्याअभावी थांबवावी लागली होती की ज्यामुळे त्यावर खर्च झालेला रु.१.९३ कोटी इतका निधी अडकून पडला.

महाराष्ट्र राज्य सार्वजनिक बांधकामे मन्युअलच्या २५१ परिच्छेदामध्ये असे म्हटले आहे की ज्या वेळी खाजगी जमिनीवर काम सुरु करावयाची असतात त्यावेळी मालकांची पूर्व परवानगी कामे सुरु होण्यापूर्वी घेणे आवश्यक असते. सहा चाचणी परीक्षा झालेल्या

जिल्ह्यांमध्ये २००२-०६ या कालावधीत १३७ रस्त्यांच्या आणि पाझर तलावांच्या कामावर १३ कार्यान्वयन संस्थांकडून झालेला रु.३.९१ कोटी इतका खर्च जमिन मालकांकडून पूर्व परवानगी न घेतल्यामुळे व्यर्थ ठरला.

ज्ञापन :

१.२० उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला :-

जुन्या राज्य रोहयो योजनेंतर्गत अपुर्ण असलेल्या कामांच्या १००% तपासणीसाठी सन २०१०-११ मध्ये विशेष मोहीम राबविण्यात आली. उप अभियंता (रोहयो) तहसिलदार व कार्यान्वयीन यंत्रणा यांनी संयुक्तरित्या ६०६२ कामांची तपासणी केली. याच्या परिणामी संपुर्ण राज्यासाठीची एक दिनांकवार यादी तयार झाली व अशी कार्यवाही ही प्रथमतःच करण्यात आली. ही सर्व अपुर्ण कामे दिनांक ३०.६.२०११ पावेतो पुर्ण करण्याचे शासनाने नियोजन केलेले असून त्या दृष्टीने कार्यवाही केली जात आहे.

या तुलनेत नरेगा या योजनेअंतर्गत अपूर्ण कामांच्या यादीत कमी अपुर्ण कामे आहेत.

ग्रामपंचायतीतर्फे कामांचे कार्यान्वयन -

१.२१ महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेनुसार, प्रत्येक जिल्ह्याला वाटप झालेल्या निधीच्या कमीतकमी ५० टक्के किंमतीची कामे ग्रामपंचायतीकडून व्हावयास हवी होती. पाच चाचणी परीक्षा झालेल्या जिल्ह्यांमध्ये महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी अंतर्गत असलेल्या एकूण रु.५०.५८ कोटी अनुदानांपैकी मुक्त झालेले रु.४९.६१ कोटी इतके अनुदान २००६-०७ मध्ये ग्रामपंचायतीकडे तांत्रिक कर्मचाऱ्यांअभावी विनावापर पडून राहिले.

प्रधान सचिवांनी अशी माहिती दिली (ऑगस्ट २००७) कि १२०० तांत्रिक कर्मचाऱ्यांची करार पद्धतीने नेमणूक करण्यात आली होती आणि त्यांना प्रशिक्षणही देण्यात आले होते.

ज्ञापन :

१.२२ उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला :-

आता ग्रामपंचायतींना तांत्रिक कर्मचारी वृंद पुरविण्यात आलेला आहे. त्यांच्या नेमणूका गट पातळीवर करण्यात आल्या आहेत. या व्यतिरिक्त प्रत्येक ग्रामपंचायतीला ग्राम रोजगार सेवक देखील पुरविण्यात आलेले आहेत.

मजूरीची अदायगी -

१.२३ जिल्हाधिकाऱ्यांनी येणाऱ्या तिमाही कालावधीसाठी कामगारांना मजूरी देण्याकरीता १५ दिवस आगोदर त्यांच्या मागण्या शासनास सादर करणे आवश्यक होते. त्याचप्रमाणे कार्यान्वयन करणाऱ्या संस्थांनीसुद्धा त्यांच्या आवश्यक त्या मागण्या जिल्हाधिकाऱ्यांना, येणाऱ्या तिमाही कालावधीच्या २० दिवस आगोदर सादर करणे आवश्यक होते.

सहा चाचणी परीक्षा झालेल्या जिल्ह्यांमध्ये असे लक्षांत आले की जिल्हाधिकाऱ्यांनी पतपत्राच्या मागण्या शासनास सादर करण्यास १५ ते ३० दिवसांचा विलंब लावला होता. याचा उलट परिणाम म्हणून शासनाकडून पतपत्राची विलंबित मुक्तता आणि यामुळे कामगारांना मजूरीची विलंबित अदायगी जी पुढील परिच्छेदांमध्ये चर्चिली आहे.

किमान मजूरीपेक्षा कमी/जास्त अदायगी -

१.२४ रोजगार हमी योजने अंतर्गत काम करणाऱ्या प्रत्येक व्यक्तिस रु.४५ प्रतीदिन इतका किमान रोजगार मिळणे हक्काचे होते. हा रोजगार कृषि कामगारांकरीता शासनाकडून निश्चित केला गेला होता. तसेच जेव्हा हजेरी पत्रकावर सरासरी अदायगी किमान मंजूरीच्या १५० टक्क्याहून जादा कि ७५ टक्क्याहून कमी दिसून आल्यास जिल्हाधिकाऱ्याने गैरव्यवहार टाळण्यासाठी त्याबाबत चौकशी करणे आवश्यक होते.

आठ चाचणी परीक्षा झालेल्या जिल्ह्यांत असे दिसून आले कि २२ कार्यान्वयन संस्थांकडून होत असलेल्या कामांबाबत २७४२६ कामगारांना (३७० हजेरी पत्रकावरील) रु.४५ प्रतीदिन या किमान वेतनाऐवजी प्रतीदिन रु.८.३२ ते रु.१८२ च्या प्रमाणांत दैनिक मजूरी देण्यात आली.

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, मिरज, जिल्हा सांगली यांनी हाती घेतलेल्या रस्त्याच्या कामाच्या बाबतीत घेतलेल्या तांत्रिक मजूरी मध्ये अपेक्षित ४९९१ मनुष्य दिवसांऐवजी प्रत्यक्षांत ६४९७ मनुष्य दिवसाचे काम झाले होते आणि कामगारांत किमान रु.४५ प्रतीदिन या दरा ऐवजी रु.२९ प्रतीदिन या दराने रु.१.८९ लाख मजूरी देण्यात आली होती.

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम, औरंगाबाद यांनी रु.१४.३० लाख तांत्रिक मजूरीसाठी ३०४१६ मनुष्य दिवस अपेक्षित केले होते. परंतु प्रत्यक्षांत रु.०.९७ लाख इतक्या खर्चात ७८१ मनुष्य दिवसांचे काम झाले होते. या कामामध्ये रु.४५ प्रतीदिन या किमान वेतनाऐवजी रु.४७ ते रु.१८२ प्रतीदिन या दराने कामगारांना मजूरी देण्यात आली होती. या

प्रकरणांत जिल्हाधिकाऱ्याने ठरवून दिलेल्या वेतन दरापेक्षा कमी किंवा प्रमाणाबाहेर जादा दराने अदायगी केल्याबद्दल बारीक तपास करण्यासाठी परिणामकारक कारवाई केली नाही.

ज्ञापन :

१.२५ उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला :-

येथे हे मान्य करण्यात येते की, मजुरांना मजुरीचे प्रदान दोन आठवड्यापेक्षा जास्त विलंबाने केले जात होते व आहे. विधानमंडळाच्या रोजगार हमी योजना समितीकडून सुद्धा त्यांच्या जिल्हा भेटीचे दरम्यान या मुद्यावर तपासणी केली जाते व संबंधीत अधिकाऱ्यांकडून विलंबाने मजुरी अदा केल्याची स्पष्टीकरणे मागितली जातात. मजुरांना मजुरीची अदायगी वेळेवर होण्याचे दृष्टीने राज्य शासन मजुरीच्या अदायगीच्या कार्यपद्धतीत सुसूत्रता आणण्याची कार्यवाही करीत असून भारत सरकारकडून देखील या मुद्यावरुन सुधारणा होण्याचे दृष्टीने आधुनिक हस्तचलित उपकरणांचे माध्यमातून बिझीनेस करस्पॉडेंट मॉडेल सारख्या विविध कार्यपद्धती सुधारणा योजना राबविल्या जात आहेत.

लबाडीची मजुरी प्रदाने -

१.२६ हजेरी पटावरुन मजुरांना मजुरी देतांना त्यांच्या अभिस्विकृतीसाठी त्यावर मजुरांची सही अथवा अंगठ्याचा ठसा असणे आवश्यक आहे. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर ने सात रस्त्यांच्या कामावर, ऑगस्ट २००४ मध्ये २९२ मजुराना रु.२.१७ लाख मजुरी प्रदान केलेल्या सात हजेरीपटांची अंगुलिमुद्रा केंद्राच्या (Finger Print Bureau) संचनालयाच्या, CID, मुंबईच्या सहाय्याने तपशीलवार लेखापरीक्षण करण्यांत आले. अंगुलिमुद्रा केंद्राच्या संचनालयाने मत प्रदर्शन केले की ८० मजुरांच्या अंगुलिमुद्राचे ठसे, त्याच हजेरीपटावर एकसारखे (identical) होते आणि त्यांत पुनरुक्ति होती. यावरुन असे निदर्शनास येते की, ८० मजुरांना रु.५४,१४० ची लबाडीची मजुरी प्रदाने करण्यांत आली.

ज्ञापन :

१.२७ उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला :-

संचालक/पोलीस अधिक्षक (फिंगरप्रिन्ट्स), फिंगरप्रिन्ट्स ब्यूरो, सीआयडी, मुंबई यांच्या अहवालाची प्रत अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर यांना प्राप्त झालेली आहे व त्यांनी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.२ यांचेकडून दिनांक २५.२.२०११ च्या अर्धशासकीय पत्रान्वये संबंधीत माहिती व कागदपत्रे मागविली आहेत.

अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर यांच्या कार्यालयाकडून कार्यवाही सुरु करण्यात आलेली आहे.

सर्वेक्षण व्यवस्थेचे कार्य -

१.२८ महाराष्ट्र रोजगार हमी कायद्यानुसार राज्य शासनास राज्य स्तरावर राज्य रोजगार हमी परिषद, प्रत्येक जिल्ह्यांत जिल्हा रोजगार हमी समिती आणि प्रत्येक पंचायतीमध्ये एक पंचायतसमिती रोजगार हमी समिती घटीत करावयाची होती. या समित्यांनी त्यांच्या अखत्यारांतील भागांत योजनेच्या कार्यान्वयनावर देखरेख व त्यांचे सर्वेक्षण करावयाचे होते आणि योजनेच्या कार्यान्वयनाची परिणामकता वाढविण्यासाठी योग्य ते मार्गदर्शन सुचित करावयाचे होते.

राज्य रोजगार हमी परिषद १ जानेवारी, २००५ पासून कार्यरत नव्हती. तसेच सोलापूर जिल्ह्यांत जिल्हा स्तरावरील समित्या २००२-०७ या कालावधीत स्थापित झाल्या नव्हत्या. सांगली जिल्ह्यांत २००६-०७ मध्ये समितीची स्थापना झाली नव्हती. सोलापूर आणि सांगलीतील जिल्हाधिकाऱ्यांनी समित्या न स्थापण्याचे कोणतेही कारण दिले नव्हते. अहमदनगर, अमरावती, नाशिक, सांगली, सोलापूर आणि यवतमाळ जिल्ह्यांतील ७१ तहसिलपैकी २६ तहसिलांमध्ये २००६-०७ या कालावधीत पंचायत स्तरावरील समित्या घटीत करण्यात आल्या नव्हत्या. जिल्हा स्तरावरील तसेच पंचायत स्तरावरील समित्या स्थापन न करण्यामुळे योजनेच्या कार्यान्वयनाची देखरेख तसेच कार्यान्वयनाचे सर्वेक्षण होऊ शकले नाही.

ज्ञापन :

१.२९ उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला :-

राज्य रोहयो परिषद स्थापन करण्यात आली आहे. सदर परिषदेची एक बैठक संपन्न झालेली असून परिषदेच्या कामकाजासंबंधी नियमावली तयार करण्यात येत आहे.

उणिवा निर्मुलन व संनियंत्रणासाठी स्थापन करावयाच्या जिल्हा रोजगार हमी समितीचा संपुर्ण आराखडा सुधारीत करण्यात येत आहे आणि त्याबाबतचे विधानमंडळासमोर सादर करावयाचे प्रारुप देखील शासनाने तयार केलेले आहे.

साक्ष :

१.३० उपरोक्त लेखी माहितीच्या संदर्भात समितीने दिनांक १३ जुलै, २०११ रोजी प्रधान सचिव, नियोजन (रोजगार हमी योजना) विभाग यांची साक्ष घेतली.

१.३१ रोजगार हमी योजनेसारखी चांगली योजना नाही. परंतु दुर्दैवाने या योजनेतील कामाएवढी बोगस कामे कुठेच होत नाहीत. अधिकाऱ्यांची काम न करण्याची मानसिकता आहे. रोजगार हमी योजनेची कामे ठेकेदाराच्या मदतीने, यंत्रसामुग्रीच्या मदतीने केली जातात असे समितीचे म्हणणे आहे. राज्यभर काय स्थिती आहे? खरोखर मजूर येतात का? त्यांना मजुरी मिळते का? याबाबत जी काही वस्तुस्थिती असेल ती विशद करण्याबाबत समितीने सांगितले तसेच राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी (नरेगा) योजना लागू झालेली आहे. त्या योजनेचा निधी ग्रामविकास मंत्रालयामार्फत मिळणार आहे. रोजगार हमी योजना कायदा अंमलात आल्यानंतर व्यवसाय कराच्या माध्यमातून निधी गोळा होतो. दरवर्षी किती निधी गोळा होतो व त्यापैकी किती खर्च केला जातो? जेवढा निधी गोळा व्हायचा तो संपूर्णपणे खर्च व्हायचा नाही. मूळ कायद्यानुसार गोळा होणारा निधी योजनेसाठीच खर्च करायचा होता. २००८ मध्ये शासनाने कायदा बदलला. या संदर्भात प्रा.देसरडा यांनी औरंगाबाद खंडपीठात याचिका दाखल केली होती. त्यांचे म्हणणे असे होते की, हा निधी विशिष्ट कार्यावर दाखविला गेला पाहिजे, शासनाने तो दुसरीकडे वापरु नये. परंतु राज्य सरकारने आपल्याला हवे तसे केले. कायदा बदलला. न्यायालयाने देखील त्यांच्या बाजूने निकाल दिला नाही.

१.३२ इतरांना देखील रोजगार मिळावा, या भावनेतून ज्यांना रोजगार आहे, त्यांच्याकडून कर स्वरुपात रक्कम गोळा केली जाते. या निधीचा योग्य प्रकारे वापर झाला पाहिजे. राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी (नरेगा) योजनेमधून सुरुवातीला १५ वर्षे चांगले काम झाले. मात्र योजनेच्या शेवटच्या काळामध्ये ती अयशस्वी ठरली. त्यामध्ये आता सुधारणा झाली पाहिजे. जर यंत्राच्या सहाय्याने काम होत असेल तर त्याला रोजगार हमी योजना कसे काय म्हणता येईल ? पूर्वीच्या काळात या योजनेच्या माध्यमातून जी अनियमितता झालेली आहे, त्या संदर्भात संबंधितांवर कारवाई होणे गरजेचे आहे. केंद्र शासनाकडून या योजनेकरिता निधी प्राप्त होत आहे. तरी देखील कर स्वरुपात निधी का गोळा केला जात आहे ? याबाबत कोणीही न्यायालयात दावा दाखल करु शकतो.

१.३३ याविषयीची संपूर्ण माहिती देण्यासंदर्भात समितीने विभागिय सचिवांना सांगितले असता, यावर विभागीय सचिवांनी खुलासा केला की, सन २००० पूर्वी रोजगार हमी कायद्यांतर्गत लोकांकडून व्यवसाय कर वसूल केला जात होता. तेवढ्या रकमेचे अनुरुप अंशदान करुन एक निधी तयार केला जातो. या निधीमध्ये ही रक्कम जमा केली जाते. या संदर्भात एक याचिका दाखल करण्यात आली होती. त्याप्रमाणे सन २००८ मध्ये रोजगार हमी कायदा व व्यवसाय कर अधिनियम या दोन्ही कायद्यामध्ये बदल करण्यात आला. त्यामुळे आता स्वतंत्र निधी तयार करण्यात आला असून व्यवसाय कर मधील रक्कम ही महाराष्ट्र राज्याच्या एकत्रित निधीमधील भाग नाही.

१.३४ रोजगार हमी योजनेकरिता कराच्या माध्यमातून गोळा केल्या जाणाऱ्या निधीच्या संदर्भात विधीमंडळ सभागृहामध्ये अनेकदा चर्चा झालेली आहे. हा मुद्दा न्यायालयाने देखील ग्राह्य धरला आहे. त्यामुळे त्याला आता आव्हान करता येणार नाही. राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत (नरेगा) अर्थसंकल्पातील तरतूदी मधून निधी दिला जात आहे. यामुळे शासनाकडे दोन्ही बाजूने निधी प्राप्त होत आहे. ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता विभागीय सचिवानी सांगितले की, यंदाच्या वर्षी ६०० कोटी रुपये वाटप केले आहे. हा निधी वैयक्तिक लाभाच्या योजना, जवाहर विहिरी व पूर्वीची अपूर्ण राहिलेली कामे याकरिता खर्च केला जाणार आहे. मागील वर्षी देखील ५६० कोटी रुपयांचा खर्च करण्यात आला होता. केंद्र शासनाकडून प्राप्त झालेले ३५८ कोटी रुपये खर्च करण्यात आले होते. केंद्र शासनाकडून प्राप्त होणाऱ्या निधीपैकी २५ टक्के राज्य शासनाचा हिस्सा आहे.

१.३५ इतर राज्यांमध्ये रोजगार हमी योजना अंतर्गत साधारणपणे ५ हजार कोटी रुपये वर्षाला खर्च केले जातात. आंध्र प्रदेश, कर्नाटक, गुजरात या राज्यांमध्ये रोजगार हमी योजना (रोहयो) अंतर्गत मोठ्या प्रमाणात रक्कम खर्च केली जाते. विद्यमान वर्षामध्ये राज्यासाठी रोजगार हमी योजना (रोहयो) करिता अधिक निधी प्राप्त होणार आहे. समितीने अशी माहिती दिली असता विभागीय सचिवानी सांगितले की, गेल्या ३ वर्षात इतर राज्यांप्रमाणे निधी खर्च झालेला नाही, हे खरे आहे. सन २०११-१२ मध्ये मोठ्या प्रमाणात बदल होणार आहे. माननीय केंद्रीय मंत्री श्री.विलासराव देशमुख यांनी मार्गदर्शन केले आहे. गेल्या ३ महिन्यात मजुरीवर ४२९ कोटी रुपये खर्च झाले आहेत. अकुशल मजुरीवर ३१ मार्च २०११ पर्यंत ७५५ कोटी रुपये

खर्च करण्यात आले आहेत. पुणे, कोकण, सोलापूर या जिल्ह्यांमध्ये जास्तीत जास्त निधी खर्च करण्यात आला आहे.

१.३६ समितीने अशी विचारणा केली की, सोलापूर जिल्हयामध्ये किती रक्कम खर्च करण्यात आली आहे. यावर विभागीय प्रतिनिधीनी सांगितले की, एप्रिल, २०११ महिन्यामध्ये अशी परिस्थिती होती की, साधारणपणे एका कामावर ११ मजूर होते. आता जुलै २०११ महिन्यामध्ये २५८३ कामे होती व २४ हजार ५८९ मजूर कामावर होते. वैयक्तिक लाभाच्या योजना सुरु केल्यामुळे योजनेला चांगले यश मिळाले आहे. सोलापूर जिल्ह्यामध्ये अनेक दुष्काळी तालुके आहेत. या तालुक्यांमध्ये ८० टक्के विहिरींची कामे सुरु करण्यात आली आहेत. अनुसूचित जाती व जमातीच्या लाभार्थ्यांच्या शेतावर जलसंधारण, मृद संधारण इत्यादी कामे घेतली जातात. तसेच वृक्षरोपण, बांबू मिशन इत्यादी अनेक कामे देखील सध्या हाती घेण्यात आली आहेत. समांतर योजना सुरु करण्याच्या संदर्भात राज्य शासन व केंद्र शासन यांच्याकडून शासन निर्णय काढण्यात आला आहे.

१.३७ मार्च, २०११ चे अंदाजपत्रक मनुष्यबळावर आधारीत करण्यात आले याबाबत समितीने माहिती देण्यास सांगितले असता विभागीय सचिवांनी अशी माहिती दिली की, सन २०११-१२ मध्ये मनुष्यबळाकरिता ४१२ कोटी रुपयांची मान्यता देण्यात आली आहे. ३ महिन्याचा कालावधी वाढविल्यानंतर सुधारित अंदाजपत्रक तयार केले आहे. त्यापैकी ३९६ कोटी रुपये केंद्र शासनाचे आहेत. यामध्ये राज्य शासनाचा वाटा ४ टक्के आहे. या ३ महिन्यामध्ये एकूण अर्थसंकल्पामधून ६० टक्के खर्च अकुशल मजुरीवर करण्यात आला व ४० टक्के खर्च कुशल मजुरीवर केला गेला.

१.३८ सन २००६-२००७ मध्ये कोणकोणत्या सहा तालुक्यांमधील २०१ गावांत कामाच्या मांडण्या तयार करण्यात आल्या नव्हत्या व त्यांच्या सद्यःस्थितीबाबत माहिती देण्यास समितीने सांगितले असता अशी सचिवांनी माहिती दिली की, सन २००६-०७ मध्ये प्रत्येक गावात कामाच्या मांडण्या तयार केल्या होत्या. ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हापरिषद यांच्या अंतर्गत येणाऱ्या कामांना ३१ डिसेंबर पूर्वी मंजुरी देण्यात आली होती. सर्व कामे सुरु झाली आहेत.

१.३९ समितीने अशी विचारणा केली की, सन २००२ ते २००६ मध्ये जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निधीचे वाटप मागणीपेक्षा कमी होते, तथापि ही वाटप केलेली रक्कम सुद्धा ते खर्च

करु शकले नाही याची कारणे काय आहेत, तसेच ही रक्कम खर्च केली जाते काय ? जिल्हाधिकाऱ्यांनी मागितलेले पैसे देण्यात आले. मात्र रोजगार हमी योजने अंतर्गत हा निधी खर्च झाला नाही. रोजगार हमी योजना ही एकमेव अशी योजना आहे की, ज्या योजनेस शासनाकडून चांगल्या प्रकारे निधी उपलब्ध होतो. ही योजना अधिकाधिक लोकाभिमुख व पारदर्शक होण्याची आवश्यकता आहे. या योजनेमधून रक्कम मोठया प्रमाणात खर्च होत नाही. इतर योजनेपेक्षा या योजनेमध्ये पारदर्शकता असल्यामुळे निधी खर्च करण्यामध्ये अडचण येते. योजना राबविणाऱ्या लोकांना पैसे मिळत नाहीत म्हणून निधी खर्च केला जात नाही. यामधून कोणता मार्ग काढता येईल ? याबाबत विभागीय सचिवांनी सांगितले की, सन २००६ मध्ये जुनी रोजगार हमी (रोहयो) योजना सुरु होती. आता नवीन योजनेनुसार अधिकाधिक रक्कम खर्च केली जाते.

१.४० सोलापूर जिल्ह्यामध्ये सन २००५-०६ मध्ये अनेक आर्थिक घोटाळे निदर्शनास आले होते. त्याबाबत चौकशी सुरु आहे. या घटनेमुळे काम करण्यास यंत्रणा पुढे येत नव्हती. राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (नरेगा) सुरु झाल्यानंतर मजुरांचे किमान मजुरीचे दर वाढले. पूर्वी या जिल्ह्यातील अनेक तालुके दुष्काळग्रस्त होते. आता तेथे मोठ्या प्रमाणात ऊसाचे उत्पादन होत आहे. जिल्ह्यामध्ये एकूण १ लाख ५३ हेक्टर क्षेत्रावर ऊसाचे उत्पादन घेतले जाते. ऊसाचे विक्रमी उत्पादन झाल्यामुळे काही ऊसाचे गाळप होऊ शकले नाही. वेळ संपल्यानंतर देखील २ महिने कारखाने चालू ठेवले होते. ऊस कापणीसाठी जिल्ह्यात मजूर मिळत नव्हते. शेतकऱ्यांना या पिकाद्वारे २७०० कोटी रुपये मिळाले आहेत. तसेच डाळींबाचे व द्राक्ष पिकाचे देखील येथे मोठया प्रमाणात उत्पादन घेतले जाते. आता सोलापूर मधील केळी निर्यात केली जाते. जिल्ह्यात बऱ्याच मोठया प्रमाणात रोजगार निर्मिती झालेली असून साडेचार कोटी मनुष्य दिवस इतका रोजगार प्राप्त झाला आहे. ६०० रू. प्रत्येक मजूर जोडीला दिले तरी देखील मजूर मिळत नव्हते. रोजगार हमी योजनेच्या कामाची प्रसिध्दी केल्यानंतर २०० ते २५० रु. या दराने मजूर मिळू लागले. यामुळे योजनेला चांगला प्रतिसाद मिळू लागला. रोहयोच्या कामामुळे मोठ्या प्रमाणात मालमत्ता निर्मिती झाली असून या योजनेमध्ये काही प्रमाणात भ्रष्टाचार झाला असेल, हे विभागीय सचिवांनी मान्य केले.

१.४१ साधारणपणे मजुरांना १२७ रु.रोज मिळतो. ही मजुरी त्यांच्या खात्यामध्ये जमा केली जाते. नंदूरबार जिल्ह्यात सप्टेंबरपासून नियोजन सुरु केले. स्थलांतरित मजूर किती

याची माहिती घेतली असता ७० हजार मजूर गुजरातमध्ये जातात. डिसेंबरमध्ये तालुकानिहाय तलाठी, ग्रामसेवक, सरपंच आणि संस्था यांची कार्यशाळा घेण्यात आली आणि प्रत्येक गावाचे नियोजन केले. त्याचे परिणाम इतके चांगले मिळाले की, ५०१२६ मजूर उपलब्ध झाले. मांडण्यावर ३३२० कामांचे नियोजन होते. सध्या वैयक्तिक आणि विकासाची कामे सुरु असून २९ कोटी रुपये खर्च होत आहेत. मजुरीचा दर १२७ रुपये असला तरी जिल्ह्यात सरासरी १५२ ते १६१ रुपये दररोज मजुरी मिळते. ७० हजार मजूर यावर्षी उपस्थित असून सर्वांना काम उपलब्ध करुन देण्यास सुरुवात केली आहे. ६७ टक्के आदिवासी जिल्हा असूनही चांगला प्रतिसाद मिळाला आहे.

१.४२ समितीने असे मत व्यक्त केले की, इतर राज्यांपेक्षा महाराष्ट्रात ही योजना कमजोर आहे असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. जुन्या रोजगार हमी योजनेमध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाला. अजूनही या योजनेमध्ये खूप त्रुटी आहेत. मजुरांचे बँकेत खाते उघडले जात नाही. राष्ट्रीयकृत बँका सहकार्य करीत नाहीत. मजुरांना ग्राम पातळीवर काम करताना खूप अडचणी येत आहेत. प्रत्येक जिल्ह्यात नियोजनाचा अभाव आहे. इतर राज्यांपेक्षा महाराष्ट्र खूप मागे आहे हे मान्य करावे लागेल. जुन्या रोजगार हमी योजनेमध्ये अनेक ठिकाणी माती काम झाले नाही, खडीचे काम झाले नाही, सीडी वर्क झाले नाही. या अपूर्ण कामांसाठी निधी दिला जात नाही. त्याबाबत नियोजन झाले पाहिजे.

१.४३ राज्यात राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना चांगल्याप्रकारे कशी राबविता येईल तसेच पूर्वीची रोजगार हमी योजना १५ वर्षे चांगली चालल्यानंतर भ्रष्टाचार का सुरु झाला ही बाब विचारात घेता राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी (नरेगा) योजनेमध्ये बरीच सुधारणा झाली, त्याचे स्वागत केले पाहिजे. काळानुसार व परिस्थितीनुसार बदल करावे लागले. महाराष्ट्राची रोजगार हमी योजनेमध्ये पिछेहाट झाली असून त्यात ज्या त्रुटी होत्या त्यात सुधारणा केल्यामुळे पारदर्शकता येत आहे. परंतु राज्यामार्फत कामे केली जात नाही. योजना प्रभावीपणे राबवावयाची असेल तर राज्य शासनाने काम केले पाहिजे. याबाबत विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, नंदूरबार जिल्ह्यात ७० टक्के कामे संस्थे मार्फत आणि ३० टक्के ग्रामपंचायतीमार्फत केली जात आहेत. तसेच नांदेड जिल्ह्यात गेल्या तीन वर्षात म्हणजे २००८-०९ मध्ये ३० कोटी, २००९-१० मध्ये ४१ कोटी आणि गेल्या वर्षी ७२ कोटी खर्च झाले. यावर्षी सुद्धा त्या जिल्ह्यात ७० हजार मजूर उपस्थिती आहे. नवीन कायद्यामध्ये काही कायदेशीर बंधने

आहेत. हा हक्क झाल्यामुळे १५ दिवसात वेतन न केल्यास विलंब भत्ता द्यावा लागतो. कामाची मागणी करुनही काम न दिल्यास बेरोजगारी भत्ता द्यावयाचा आहे. त्याची जबाबदारी संबंधित अधिकाऱ्यांवर निश्चित होऊ शकते. कायद्याने हक्क झाला असल्यामुळे आणि अपेक्षित वित्तीय भार अधिकाऱ्यांवर असल्यामुळे इतर राज्यांनी समांतर यंत्रणा निर्माण केली. ती नांदेडमध्ये विभागाने निर्माण केली. सचिवांच्या मार्गदर्शनाने ती यंत्रणा राज्यात सर्व ठिकाणी उभी राहिली. ठराविक काळात एवढ्या मजुरांना काम द्यावयाचे असले तरी ते प्रत्यक्ष शक्य नव्हते. म्हणून कोणी धजावत नव्हते. ६ टक्के प्रशासकीय खर्चामधून यंत्रणा निर्माण केली. त्यामुळे मनुष्यबळ निर्माण झाल्यामुळे योजनेला गती प्राप्त झाली आहे. ही समांतर यंत्रणा पहिल्या वर्षात सक्षम होईल तितका केंद्र शासनाच्या निधीचा अधिक खर्च आपल्याकडे होईल. सामाजिक लेखापरीक्षणासाठी चांगली यंत्रणा निर्माण झाली की ती सक्षम राहण्यासाठी व त्यात पारदर्शकता आणण्यात येईल अस विभागीय प्रतिनिधीनी समितीस सांगितले.

१.४४ समितीने अशी विचारणा केली की, राज्यातील "क" वर्ग नगरपालिका क्षेत्रासाठी रोजगार हमी योजना राबविणे व त्यासाठी स्वतंत्र तरतूद करणेबाबत काय कार्यवाही करण्यात आली तसेच काही नगरपालिकांची व्याप्ती ग्रूप ग्रामपंचायत आहे. तेथे वॉर्ड व आजूबाजूची खेडी आहेत. त्यासाठी वेगळी तरतूद केली आहे काय ? यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, महाराष्ट्र ॲक्टखाली "क" वर्ग नागरी क्षेत्र ग्रामीण भागात आले आहे. ग्रामीण भागासाठी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी (नरेगा) योजना सुरु केली आहे आणि शहरी भागासाठी केंद्र सरकारने स्वतंत्रपणे सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना लागू केली आहे आणि ती नगरविकास विभागामार्फत राबविली जाते.

१.४५ रोजगार हमी योजनेचा निधी अन्य बाबींवरील खर्चासाठी वापरला जातो तसेच रोजगार हमी निधी स्थापन करण्याबाबत समितीने माहिती विचारली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, योजनेमध्ये जो निधी येतो त्याचे शिर्ष वेगळे असल्यामुळे कोणाला तो निधी परिवर्तीत करण्यास वाव रहात नाही. तो निधी सरळ पोस्टाकडे जातो.

१.४६ यासंदर्भात महालेखाकारांनी विचारणा केली की, You have received so much amount of fund from Central Government for Employment Guarantee Scheme. The department have received Rs. 10818.44 from the Central Government. But they had only

utilised Rs. 4677.24 out of that fund. The funds had not been fully utilised by the department. What is the reason?

१.४७ यावर विभागीय सचिवांनी खुलासा केला की, You are talking about the Central Government fund. I want to clarify that the Employment Guarantee Fund is not kept with our Department. The Finance Department receives that fund from Central Government. We get it as per our requirement from Finance Department. Subsequently, in 2008 the Legislature has passed an Act. It is national fund. Now, the fund is with the Government. We get it as per our requirement from Finance Department.

१.४८ सन २००६ मध्ये कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग सोलापूर आणि नाशिक यांनी रोजगार हमी योजने करिता खरेदी केलेली वाहने विकली परंतु त्याची रक्कम रोजगार हमी योजने मधील निधीत जमा न करता महसूली ठेव शीर्षाखाली जमा केली याविषयी समितीने विचारणा केली असता, विभागीय सचिवांनी खुलासा केला की, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग (रोहयो), नाशिक यांचे वाहन होते, ते विभागाकडून निर्लेखित करुन घेतले व ४.८ लाख रुपयांना विकण्यात आले. रोजगार हमी योजनेमधून खरेदी केलेली वाहने रोजगार हमी योजनांच्या कामासाठी वापरली जात होती. त्यामध्ये टँकर, टिपर्स, डंपर्स आदी वाहने होती. वाहनांचे आयुष्य संपल्यामुळे निर्लेखित करण्यात आली. १०.०५ लाख रुपये वितरीत झाले ते योग्य लेखाशीर्षामध्ये जमा करण्यात आले. त्याचे उपशीर्ष मराठी भाषेत (९) आहे, ते (१) असे वाचण्यात आले, त्यामुळे हा प्रश्न निर्माण झाला. रक्कम भरणा केलेल्या चलनाची प्रत विभागाकडे उपलब्ध आहे.

१.४९ यांसदर्भात महालेखाकारांनी विचारणा केली की, At the time of audit this explanation was not given to us. Now, they are giving this explanation before the Committee. Various times it has been pointed out by our office that the explanation has not been given to us. You are giving this information during the Explanatory Memorandum. याबाबत विभागीय प्रतिनिधींनी माहिती दिली की, We have submitted compliance report to you. I will give you copy of the same.

१.५० सन २००४-०५ मध्ये अंदाजपत्रकीय तरतुदीपेक्षा रु.३२५.९४ कोटी इतकी रक्कम जादा खर्च करुन हा खर्च नियमित न करणारे संबंधित जिल्हाधिकारी कोण आहेत व त्यांचेकडून अनुपालन अहवाल प्राप्त झाले आहेत काय अशी समितीने विचारणा केली असता

विभागीय प्रतिनिधींनी अशी माहिती दिली की, नंदूरबार जिल्हयात असे प्रकरण घडलेले नाही. समितीने परिच्छेद क्रमांक ३.१.७.२ या मुद्याबाबत महालेखाकारांशी विभागाने प्रत्यक्ष चर्चा करुन संबंधित प्रत्येक जिल्हाधिकाऱ्यांचे तपशील सादर करण्याबाबत निदेश दिले व एकूण रु.३२५ कोटी अंदाजपत्रकीय तरतुदीपेक्षा जादा खर्च झालेला आहे. विभागाकडे याची विभागणी नाही. याबाबत विभागाकडून तसेच महालेखाकार यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही. "अभिलेख योग्यप्रकारे ठेवण्यात आला नसल्याबाबत" या लहान मुद्यावंर महालेखाकारांशी प्रथम खात्यांतर्गत चर्चा करुन विभागाने अनुपालन (कम्प्लायन्स) केले पाहिजे. या ठिकाणी समितीमध्ये आम्ही किती मुद्यांवर चर्चा करावयाची ? समितीला देखील वेळेच्या काही मर्यादा आहेत. त्यामुळे सर्वच विषयांवर येथे चर्चा होऊ शकत नाही. विभागाने आधी महालेखाकारांशी चर्चा करुन त्यांना माहिती दिली पाहिजे या मुद्याविषयी समितीने नाराजी व्यक्त केली असता, विभागीय सचिवांनी सांगितले की, We have given detailed reply to the office of A.G. There were some transition issues about the scheme before the department. The whole scheme is new in Maharashtra. It has implemented in 12 district of Maharashtra. Now, the Government of India is also streamlining the process of the scheme. We have given all detailed information in our reply to the office of A.G.

१.५१ समितीने अशी विचारणा केली की, रोजगार हमी योजनेअंतर्गत राज्यात रोजगार मिळवू पहाणाऱ्यांची नोंदणी झालेली आकडेवारी प्रशासकीय विभागांकडे उपलब्ध नव्हती. तसेच कोणत्याही जिल्ह्यातून माहिती अद्ययावत करण्यात आली नव्हती. याबाबत खुलासा करण्याबाबत समितीने सांगितले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, सन २००६-०७ मध्ये केवळ १२ जिल्ह्यामध्ये राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा योजना सुरु केली होती. आता प्रत्येक मजुराचा फोटो संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

१.५२ सन २००२-२००३ मध्ये सांगली व सोलापूर जिल्ह्यात चाचणी खड्डे घेऊन शेततळी बांधण्याचे काम हाती का घेतले गेले नाही. त्यामुळे शासनाचे व शेतकऱ्यांचे किती नुकसान झाले व याबाबीस कोण जबाबदार आहेत ? याविषयी विभागीय सचिवांनी खुलासा केला की, सध्या शेततळ्याच्या संदर्भात कृषी विभागाकडून अंमलबजावणी केली जाते. त्याकरिता यंत्रसामुग्री वापरली जाते. ५ ते ६ आकाराचे खड्डे खणले जातात. लाभार्थी

शेतकऱ्यांना खर्चाची प्रतिपूर्ती दिली जाते. याकरिता शेतकरी जेसीबीचा वापर करु शकतात. हे काम महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत घेता येते.

१.५३ विभागाकडून शेततळ्याच्या संदर्भात समितीला लेखी माहिती सादर करण्याचे आश्वासित करुनही समितीला अद्याप माहिती प्राप्त झाली नाही.

१.५४ सन २००६-२००७ मध्ये ५ जिल्ह्यात महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत ग्रामपंचायतीकडे ४९.६१ लाख रुपयांचे अनुदान तांत्रिक कर्मचाऱ्यांअभावी पडून होते. याविषयीची कारणमिमांसा विचारली असता, विभागीय सचिवांनी सांगितले की, पहिल्या वर्षी ग्रामपंचायतीला निधी वितरित केला होता. मात्र तो निधी खर्च करण्यात आला नाही. ग्रामपंचायतीने घेतलेला अग्रीम त्यांच्याकडून वसूल केलेला आहे.

१.५५ मजुरांच्या मजुरी वाटपाविषयी समितीने विचारले असता विभागीय सचिवांनी खुलासा केला की, मजूरांना पंधरवड्यात मजूरी दिली जाते यासंदर्भात समितीने विभागीय सचिवांच्या निदर्शनास आणून दिले की, मजूरी देण्यासंबंधी एक चांगले सॉफ्टवेअर आहे. काही जिल्ह्यांमध्ये या सॉफ्टवेअरचा वापर केला जात असून ते त्यांना खूप उपयुक्त ठरत आहे. रोजगार हमी योजनांमध्ये लाभार्थ्यांची संख्या जास्त असते. यामुळे त्यांना अशा प्रकारच्या सॉफ्टवेअरची अत्यंत आवश्यकता आहे. यावर विभागीय सचिवांनी माहिती दिली की, सध्या २ ते ३ जिल्ह्यामध्ये हे सॉफ्टवेअर वापरले जात आहे. **त्यावर समितीने मजुरांना आठवड्याला मजुरी मिळाले पाहिजे. पूर्वी ठेकेदार नियुक्त केले जात होते. त्यांच्यामार्फत मजुरांना आठवड्याला वेतन मिळत होते. असे मत व्यक्त केले.** याबाबत विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, आंध्र प्रदेशमध्ये आठवड्याला मजुरी दिली जाते. तेथे नवीन पद्धत वापरली जात आहे. ज्या ठिकाणी काम सुरु आहे, तेथे मोबाईल एटीएम व बँक यांचा वापर केला जातो. राज्यामध्ये देखील १ ते २ वर्षात ही पद्धत वापरता येईल. नंदूरबार जिल्ह्यामध्ये मोबाईल एटीएम व २ गाड्या दिलेल्या आहेत. रोजगार हमी योजनेच्या कामाच्या ठिकाणी जाऊन त्याद्वारे मजुरांना पैसे दिले जातात. अमरावती विभागामध्ये बराचसा भाग नक्षलग्रस्त आहे. धारणी व चिखली या तालुक्यांमध्ये ३२० गावे आहेत. तेथील बँक पोस्ट ऑफीस मार्फत मजुरांना आठवड्याला मजुरी जाते. ज्यावेळी जास्त रकमेची मजुरी केली जाते, त्यावेळी तेथे विशेष दुतामार्फत नेमून पैसे देण्याची व्यवस्था केली जाते.

१.५६ अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम, सोलापूर यांचेकडून लबाडीची मजुरी प्रदान करणाऱ्यांवर काय कारवाई करण्यात आली आहे. समितीने अशी विचारणा केली असता, विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, अंगुलीमुद्रा संचालनालय केंद्र, सी.आय.डी. मुंबई यांच्या सहाय्याने तपशीलवार लेखापरीक्षण करण्यात आले. सदर ठसे बोगस असल्याचे आढळून आले असून अहवालाची प्रत अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर यांना प्राप्त झाली आहे. ही प्रत जिल्हाधिकाऱ्यांना पाठविणे आवश्यक आहे. या प्रकरणाच्यासंदर्भात जबाबदारी निश्चित करण्यात येणार आहे. डिसेंबर २०१० मधील गुन्हे अन्वेषण विभागाच्या अहवालाप्रमाणे जबाबदारी निश्चित करण्याची कार्यवाही सुरु असून १५ दिवसात दोषारोपपत्र दाखल करण्यात येणार आहे. सदर प्रकरणाची चौकशी करुन कारवाई करण्याचे निदेश समितीने दिले.

१.५७ जुन्या रोजगार हमी योजनेतील अपूर्ण कामांविषयी समितीने विचारणा केली असता, विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, तो कायदा अस्तित्वात नाही. अपूर्ण कामे ३०.६.२०१० पर्यंत पूर्ण करावयाची आहेत. प्रलंबित असलेल्या जुन्या कामांची यादी विभागाला प्राप्त झालेली असून. शासनाची मान्यता घेऊन जुन्या पद्धतीने अपूर्ण कामे पूर्ण करण्यास परवानगी दिलेली आहे. निम्मी कामे पूर्ण होत आली आहेत.

१.५८ समितीने अशी विचारणा केली की, एखादे काम जुन्या रोजगार हमी योजनेमध्ये मंजूर करुन घेतले, ते काम पूर्ण होत नसल्यामुळे रद्द करण्याची पद्धती काय आहे? यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, त्या कामावर १० टक्क्यापेक्षा कमी खर्च झाला असेल तर ते काम रद्द करण्याचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना दिलेले आहेत.

अभिप्राय व शिफारशी :

१.५९ समितीसमोर आलेल्या माहितीवरुन असे दिसून येते की, आंध्र प्रदेश, कर्नाटक, गुजरात या राज्यांमध्ये रोजगार हमी योजनेंतर्गत मोठ्या प्रमाणात रक्कम खर्च केली जाते. गत ३ वर्षात इतर राज्यांप्रमाणे निधी खर्च झालेला नाही. विद्यमान वर्षात राज्यामध्ये रोजगार हमी योजनेकरिता अधिक निधी प्राप्त होणार आहे. इतर राज्याच्या तुलनेत महाराष्ट्रात रोजगार हमी योजनेंतर्गत कमी प्रमाणात निधी खर्च करण्यात आला आहे. इतर राज्यांपेक्षा महाराष्ट्रात ही योजना प्रभावीपणे राबविली जात नाही. जुन्या रोजगार हमी योजनांमध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाला. अजूनही या योजनेमध्ये खूप त्रुटी आहेत. मजुरांचे खाते बँकेत उघडले जात

नाही. राष्ट्रीयकृत बँका सहकार्य करीत नाहीत. मजुरांना ग्राम पातळीवर काम करताना खूप अडचणी येत आहेत. प्रत्येक जिल्हयात नियोजनाचा अभाव आहे. इतर राज्यांपेक्षा महाराष्ट्र खूप मागे आहे हे मान्य करावे लागेल. जुन्या रोजगार हमी योजनेमध्ये अनेक ठिकाणी माती काम झाले नाही, खडीचे काम झाले नाही, सीडी वर्क झाले नाही. या अपूर्ण कामांसाठी निधी दिला जात नाही. त्याबाबत नियोजन झाले पाहिजे.

१.६० राज्यात राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना चांगल्याप्रकारे कशी राबविता येईल तसेच पूर्वीची रोजगार हमी योजना १५ वर्षे चांगली चालल्यानंतर भ्रष्टाचार का सुरु झाला ही बाब विचारात घेता राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी (नरेगा) योजनेमध्ये बरीच सुधारणा झाली, त्याचे स्वागत केले पाहिजे. काळानुसार व परिस्थितीनुसार बदल करावे लागले. महाराष्ट्राची रोजगार हमी योजनेमध्ये पिछेहाट झाली असून त्यात ज्या त्रुटी होत्या त्यात सुधारणा केल्यामुळे पारदर्शकता येत आहे. परंतु राज्यामार्फत कामे केली जात नाही. योजना प्रभावीपणे राबवावयाची असेल तर राज्य शासनाने काम केले पाहिजे.

१.६१ महाराष्ट्र राज्यासाठी केंद्र शासनाने सन २००९-२०१० या वर्षी ६३८ कोटी रुपये मंजूर केले होते त्यापैकी शासनाने ३२१ कोटी रुपये खर्च केले असून केवळ ५० टक्के रक्कम खर्च केली आहे. आंधप्रदेश या राज्यासाठी केंद्रा शासनाकडून २९८८ कोटी रुपये ग्रामीण राष्ट्रीय रोजगार हमी योजने अंतर्गत प्राप्तझाले व ८०९२.८ कोटी रुपये त्यांनी खर्च केलेले आहे. आंधप्रदेश राज्याने त्यांना दिलेल्या लक्ष्यापेक्षा ५१०४.८ कोटी रुपये जास्त खर्च केले आहे. यावरुन महाराष्ट्र राज्य इतर राज्यापेक्षा खूप मागे आहे. आता आंध प्रदेश, कर्नाटक व गुजरात या राज्याप्रमाणे महाराष्ट्र राज्यात राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना पारदर्शक व प्रभावीपणे राबविण्याकरीता उपाययोजना करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

१.६२ वैयक्तिक लाभाच्या योजना सुरु केल्यामुळे योजनेला चांगले यश मिळाले आहे. लाभार्थ्यांच्या शेतावर जलसंधारण, मृदा संधारण इत्यादी कामे घेतली जातात. तसेच वृक्षरोपण, बांबू मिशन इत्यादी अनेक कामे देखील सध्या हाती घेण्यात आली आहेत. समांतर योजना सुरु करण्याच्या संदर्भात राज्य शासन व केंद्र शासन यांच्याकडून शासन निर्णय काढण्यात आला आहे.

१.६३ राज्यात "महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना" ही नवीन योजना सुरु करण्यात आली असून ही योजना अधिकाअधिक लोकाभिमुख व पारदर्शक होण्याची आवश्यकता आहे. महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना या नवीन योजनेमधून अधिकाधिक खर्च करण्यात यावा. त्यासाठी वैयक्तिक लाभाची कामे सुरु करण्यात यावी तसेच राज्य शासन व केंद्र शासन यांच्याकडून समांतर योजनांची कामे तातडीने सुरु करुन राज्यातील दुष्काळग्रस्त, आदिवासी व मागासलेल्या भागांचा विकास करण्याच्या दृष्टीने शासनाने आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

१.६४ ग्रामीण भागासाठी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (नरेगा) सुरु केली आहे आणि शहरी भागासाठी केंद्र सरकारने स्वतंत्रपणे सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना लागू केली आहे आणि ती नगरविकास विभागामार्फत राबविली जाते.

१.६५ राज्यात मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळता सर्व जिल्ह्यांमध्ये राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम हा "महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम" या नावाने राबविण्यात येत आहे. ही योजना राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम व पूर्वीची फक्त महाराष्ट्र शासनातर्फेच राबविण्यात येणारी देशातील एकमेव रोजगार हमी योजना (रोहयो) या दोन योजनांची एकत्रीत रोजगार योजना आहे. या योजनेअंतर्गत ज्या कुटुंबातील प्रौढ व्यक्ती अकुशल काम करण्यास इच्छुक आहे अशा कुटुंबाला ३६५ दिवस रोजगार पुरविण्याची हमी देण्यात आली आहे.

१.६६ स्वर्णजयंती शहरी रोजगार योजना ही राज्यात राबविण्यात येणारी केंद्र पुरस्कृत योजना आहे. या योजनेची प्रमुख उद्दिष्टे, शहरी भागातील बेरोजगारांना आणि अल्प रोजगार मिळणाऱ्या गरीबांना पणन किंवा स्वरोजगाराद्वारे रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन त्यांना कौशल्य विकास व प्रशिक्षणासाठी सहाय्य करणे आणि स्वयंसंचलित समाज रचना आणि क्षमता वृद्धी कार्यक्रमांद्वारे शहरी भागातील दारिद्र्याच्या समस्येचे निराकरण करण्यासाठी समाजाला सक्षम करणे ही आहेत. वर्ष २०१०-११ मध्ये स्वयंरोजगार कार्यक्रम अंतर्गत ७,४४९ लाभार्थ्यांवर रुपये १५.२१ कोटी खर्च झाला आहे. तर, वर्ष २०११-१२ मध्ये, डिसेंबर, २०११ पर्यंत सदर कार्यक्रम अंतर्गत १,३११ लाभार्थ्यांवर एकूण रुपये ४.६१ कोटी इतका खर्च झाला आहे.

१.६७ सन २००४-०५ मध्ये अंदाजपत्रकीय तरतुदीपेक्षा रु.३२५.९४ कोटी इतकी रक्कम जादा खर्च करुन हा खर्च नियमित न करणारे संबंधित जिल्हाधिकारी यांचेकडून अनुपालन अहवाल प्राप्त झाले नसून संबंधित प्रत्येक जिल्हाधिकाऱ्यांचे तपशील सादर करण्याबाबत समितीने निदेश देवूनही अद्याप माहिती प्राप्त झाली नाही. **जादा खर्च नियमित न करणाऱ्या संबंधित विभागास जिल्हाधिकाऱ्यांच्या तपशिलाबाबत माहिती सादर करण्याचे समितीने निदेश दिल्यानंतर एक वर्षाचा कालावधी होवून सुद्धा समितीला माहिती सादर केली नसल्याने याप्रकरणी समिती तीव्र नापसंती व्यक्त करते. तसेच याबाबतची माहिती समितीला तातडीने सादर करण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

१.६८ सन २००२-२००३ मध्ये सांगली व सोलापूर जिल्ह्यात चाचणी खड्डे घेऊन शेततळी बांधण्याचे काम हाती घेतले गेले नाही. त्यामुळे शासनाचे व शेतकऱ्यांचे नुकसान झाले. सध्या शेततळ्याच्या संदर्भात कृषी विभागाकडून अंमलबजावणी केली जाते. त्याकरिता यंत्रसामुग्री वापरली जाते. ५ ते ६ आकाराचे खड्डे खणले जातात. लाभार्थी शेतकऱ्यांना खर्चाची प्रतिपूर्ती दिली जाते. याकरिता शेतकरी जेसीबीचा वापर करु शकतात. विभागाकडून **शेततळ्याच्या संदर्भात समितीला लेखी माहिती सादर करण्याचे आश्वासित करुनही समितीला**

अद्याप माहिती प्राप्त झाली नाही. सदर माहिती समितीला तातडीने सादर करण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.

१.६९ सोलापूर जिल्ह्यात रोजगार हमी योजनेअंतर्गत करण्यात आलेल्या कामामध्ये ९.१ कोटी रुपयांचा भ्रष्टाचार उघडकीस आला आहे. केंद्र शासनाने दुष्काळग्रस्त जनतेला दिलेल्या पैशाचा अपव्यय कारणे ही राज्य शासनासाठी निश्चित धोक्याची घंटा आहे. या प्रकरणी जे दोषी आहे त्यांच्यावर जबाबदारी निश्चित तात्काळ कारवाई करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

१.७० अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर यांचेकडून लबाडीची मजुरी प्रदान करण्यात आली आहे याबाबत अंगुलीमुद्रा केंद्राच्या संचालनालयाच्या व सीआयडी मुंबईच्या सहाय्याने तपशीलवार लेखापरीक्षण करण्यात आले. सदर ठसे बोगस असल्याचे आढळून आले असून सदर अहवालाची अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर यांना प्राप्त झालेली प्रत जिल्हाधिकारी यांना पाठविल्यानंतर या प्रकरणाच्या संदर्भात जबाबदारी निश्चित करण्यात येणार आहे. डिसेंबर २०१० मधील गुन्हे अन्वेषण विभागाच्या अहवालाप्रमाणे जबाबदारी निश्चित करण्याच्या सुरु असलेल्या कार्यवाहीबाबत १५ दिवसात दोषारोपपत्र दाखल करण्याचे समितीला आश्वासित करुनही अद्याप कारवाई केल्याची माहिती प्राप्त झाली नसल्याने समिती तीव्र नापसंती व्यक्त करते. तसेच **सदर प्रकरणी संबंधितावर कारवाई करण्याबाबत समितीला आश्वासित केल्यानुसार संबंधित दोषी व्यक्तीवर केलेल्या व करण्यात येणाऱ्या कारवाईची माहिती समितीला तातडीने सादर करण्यात यावी, अशी शिफारस समिती करीत आहे.**

१.७१ केंद्र शासनाने सन २०१२-२०१३ या वर्षासाठी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेकरीता केंद्र शासनाचा पहिला हप्ता रू.४८५,६४,९०,०००/- (चारशे पंच्याशी कोटी चौसष्ट लाख नव्वद हजार रूपये) देण्यात आला असून सदर निधी वितरीत करताना राज्यातील जालना वाशिम, उस्मानाबाद व औरंगाबाद या चार जिल्ह्यांना जो पर्यंत सन २०११-१२ या वर्षाचा निधी खर्च केल्याची पुर्तता त्यांच्याकडून होत नाही तसेच त्यांच्याकडील प्राप्त असलेल्या प्रलंबित तक्रारीनुसार संबंधित दोषी व्यक्तीवर कारवाई करुन सदर कार्यवाहीचा अहवाल सादर केला जात नाही तोपर्यंत निधी वितरीत करण्यात येऊ नये असे स्पष्ट आदेश केंद्र शासनाच्या ग्रामविकास विभागाने दिलेले आहे. तरी याबाबत तातडीने कारवाई करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे व याबाबत कार्यवाही केल्याची माहिती समितीला ३ महिन्यात देण्यात यावी.

१.७२ महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेंवर काम करणाऱ्या मजूरांना त्यांनी केलेल्या कामाची मजूरी वेळेवर व विनाविलंब मिळणे आवश्यक आहे. समितीपुढे आलेल्या माहितीमध्ये **राज्यामध्ये मजूरीचे वाटप देण्यासंदर्भात एक सॉफ्टवेअर राज्यातील २-३ जिल्ह्यामध्ये सध्या वापरत आहे. लाभार्थ्यांची संख्या जास्त असते त्यावेळी या सॉफ्टवेअरचा**

चांगला उपयोग होत आहे असे दिसून आले. त्यामुळे राज्यातील ज्या-ज्या जिल्ह्यांमध्ये लाभार्थ्यांची संख्या जास्त आहे तेथे या सॉफ्टवेअरची अंमलबजावणी कशी करता येईल यादृष्टीने आवश्यक ती कार्यवाही करावी अशी समिती शिफारस करीत आहे. तसेच आंध्रप्रदेशमध्ये प्रत्येक आठवड्याला मजूरी दिली जाते. या पद्धतीमध्ये जेथे काम सुरु आहे तेथे **मोबाईल एटिएम व बँक याचा वापर करण्यात येतो. त्यामुळे ही पद्धत कशाप्रकारे कार्यान्वित आहे व त्याचा आपल्या राज्यात देखील वापर करणे शक्य आहे काय याचा देखील प्राधान्याने विचार करण्यात यावा व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य व आदिवासी विकास विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी सन २००६-२००७ या वर्षाच्या नागरी अहवालामधील **परि.क्र.३.३. "अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीसाठी शिक्षणाचा विकास"** या संदर्भात महालेखाकारांनी खालील अभिप्राय व्यक्त केले आहेत.

नियोजन :-

लक्ष्य केलेल्या लाभधारकांची ओळख -

२.१ केंद्र शासनाच्या नियोजन मंत्रालयाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राज्य योजनेतून अनुसूचित जाती योजनेकरीता तसेच आदिवासी उप-योजनेकरीता असलेले वाटप राज्याच्या लोकसंख्येच्या प्रमाणांत असावयास हवे होते. तथापि अनुसूचित जाती योजना व आदिवासी उप-योजनेकरीता असलेले वाटप लेखा परीक्षणाच्या काळात, २००६-०७ या वर्षा व्यतिरिक्त ठरवून दिलेल्या राज्य योजनेच्या अनुक्रमे १०.२ आणि ८.८५ या टक्केवारीपेक्षा कमी होते.

असे दिसून आले कि विभागांनी लक्ष्य केलेल्या लाभधारकांच्या समूहांची ओळख पटण्यासाठी कोणतेही सर्वेक्षण केले नव्हते किंवा कोणतीही आधारभूत माहिती गोळा करण्यात आली नव्हती. यामुळे योजनेअंतर्गत लक्ष्य केलेल्या एकूण लाभ धारकांच्या संख्येविषयक कोणतीही माहिती/आधार सामुग्री त्यांच्याकडे उपलब्ध नव्हती. योजनांची अंमलबजावणी लक्ष्य केलेल्या लाभधारकांची संख्या लक्षांत न घेता करण्यात आली होती.

ही वस्तुस्थिती सह सचिव सामाजिक न्याय आणि सह आयुक्त आदिवासी विकास विभाग यांनी स्वीकारली आणि लक्ष्य केलेली लोकसंख्या घरोघरी जाऊन सर्वेक्षणाने निश्चित करणे आवश्यक होते हे मान्य केले.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने दिलेले अभिप्राय :-

ज्ञापन :

२.२ यासंदर्भात सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने पाठविलेल्या लेखी स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये असे नमूद करण्यात येते की, सन २००१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्राची एकुण लोकसंख्या ९६,८७,८६,२७ असून त्यापैकी अनुसूचित जातीची लोकसंख्या ९८,८१,६५६ आहे. सदर लोकसंख्या ही एकुण लोकसंख्येच्या १०.२० टक्के आहे.

सन २००६-०७ व २००७-०८ साठी पुढीलप्रमाणे नियतव्यय शासनाच्या वतीने मंजूर करण्यात आलेला आहे.

(रुपये लाखात)

वर्ष	राज्य योजनेचा नियतव्यय	अजाउयो साठी नियतव्यय	टक्केवारी
२००६-०७	१८३०५१५	१५९२००	८.७ टक्के
२००७-०८	२०२००००	२०६०००	१०.२० टक्के

वरील तक्त्यावरुन अनुसूचित जाती उपयोजनांसाठी मंजूर नियतव्ययाचे प्रमाण सन २००७-०८ या वर्षात वाढलेले आहे, असे दिसून येते. सदर नियतव्यय हा अनुसूचित जाती लोकसंख्येच्या प्रमाणात दिला आहे.

अनुसूचित जाती उपयोजनेंतर्गत योजनेचा नियतव्यय हा मा.मंत्री यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत १ ते ७ क्षेत्रामधील विविध विभागाच्या मागण्या विचारात घेऊन ठरविण्यात येतो आणि त्यानुसार सदर नियतव्ययाचे क्षेत्रनिहाय अंतिम वितरण शासन स्तरावरुन करण्यात येते.

योजनांची अंमलबजावणी लक्ष्य केलेल्या लाभधारकांची संख्या लक्षात न घेता करण्यात आलेली होती. यासाठी सर्वेक्षण घेण्याबाबत सूचित केलेले आहे. ही सुचना रास्त आहे. परंतु सर्वेक्षणासाठी स्वतंत्र निधी किंवा सर्वेक्षण विभाग उपलब्ध नाही. त्यामुळे सद्य:स्थितीत सदर सर्वेक्षण विहित मुदतीत या संचालनालयामार्फत करणे प्रात्यक्षिक रित्या सध्या शक्य होणार नाही. सदर सूचनेनुसार सर्वेक्षण हे डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेमार्फत (Barti) घेण्यात यावे असे मत आहे. सन २००८-०९ या वर्षात शासनाने सदर संस्थेस स्वायत्त दर्जा दिला असल्याने भविष्यात असे सर्वेक्षण करण्यात येऊ शकेल. अशी या कार्यालयाची धारणा आहे.

शासनाने मंजूर केलेल्या नियतव्ययानुसार संबंधीत विविध विभागामार्फत त्या योजनांची उद्दिष्टे ठरविण्यात येतात. उदा.शिक्षण विषयक योजना राबविताना मागील वर्षाच्या विद्यार्थ्यांचे

उत्तीर्ण होण्याचे प्रमाण/गळतीचे प्रमाण/जिल्ह्याच्या शाळांची पद नोंदणी हे पायाभूत निकष मानले जातात. तर कृषीविषयक/ग्रामविकासाच्या योजना राबविताना लाभार्थी हा दारिद्र्यरेषेखालील असावाच लागतो. त्यामुळे दारिद्र्यरेषेखालील सर्वेक्षणाच्या माहितीचा आधार घेण्यात येतो.

सेक्टर १ ते ७ क्षेत्रामधील विविध विभागाच्या योजनांपैकी बऱ्याचशा योजना या अल्पभुधारक शेतकरी किंवा दारिद्र्यरेषेखालील (बी.पी.एल.) लाभार्थ्यांसाठीच राबविण्यात येतात.

उदाहरणार्थ-

१. कर्मवीर दादासाहेब गायकवाड स्वावलंबन व सबळीकरण योजना

२. पॉवर टिलर वितरण योजना (१०० टक्के) अनुदान

३. स्वर्ण जयंती ग्रामस्वयंरोजगार योजना

४. संपूर्ण ग्रामिण रोजगार योजना (जवाहर ग्राम समृद्धी योजना) आश्वासित रोजगार योजना.

५. इंदिरा आवास योजना

६. मागासवर्गीय नवबौद्ध शेतकरी कुटूंबांना दारिद्र्यरेषेच्यावर आणण्यासाठी विशेष सहाय्य योजना (कर्मवीर दादासाहेब गायकवाड स्वावलंबन व सबळीकरण योजनांचे लाभार्थी)

७. दुभत्या जनावरांच्या गटाचा पुरवठा.

८. अनुसूचित जाती/नवबौद्धांना मोफत घरगुती विद्युत जोडणी/ग्रामिण विद्युतीकरण

९. अनुसूचित जाती/नवबौद्धांना त्यांच्या मालकीच्या विहिरीचे कृषीपंपाचे विद्युतीकरण इत्यादी.

तळटिप : संबंधित सर्वेक्षणाचा तपशील लेखापरिक्षण विभागास पाठविण्यात यावा.

आदिवासी विकास विभागाने दिलेले अभिप्राय :-

ज्ञापन :

२.३ उपरोक्त अभिप्रायासंदर्भात आदिवासी विकास पाठविलेल्या लेखी स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला :-

महाराष्ट्र राज्याची एकुण लोकसंख्या ९.६८ कोटी असून त्यापैकी आदिवासी लोकसंख्या ०.८६ लक्ष इतकी आहे. सदर आदिवासी लोकसंख्येचे प्रमाण एकुण लोकसंख्येच्या ८.८५ टक्के इतके आहे.

सुकथनकर समितीच्या शिफारशीनुसार सन १९९३-९४ पासून आदिवासी लोकसंख्येच्या प्रमाणात निधी उपलब्ध करुन देण्याचे धोरण स्विकारण्यात आले आहे. त्यानुसार राज्याच्या एकुण अर्थसंकल्पाच्या ९ टक्के निधी टप्प्याटप्प्याने आदिवासी उपयोजनेसाठी उपलब्ध करुन द्यावयाचा आहे. त्यानुसार सन २००५-०६ या आर्थिक वर्षापासून ९ टक्के निधी उपलब्ध होऊ लागला आहे.

सन १९९३-९४ ते २००७-०८ अखेर खाली दिलेल्या विवरणपत्रात नमुद केल्याप्रमाणे निधी शासनाकडून प्राप्त झालेला आहे.

सन १९९६-९७ मध्ये आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेमार्फत बेंचमार्क सर्वेक्षण करण्यात आलेले आहे. योजना राबवितांना त्याचा वेळोवेळी उपयोग होतो. तथापि, सदरचे सर्वेक्षण होऊन दीर्घकाळ झालेला असल्याने आदिवासी उपयोजना क्षेत्र व बाह्य क्षेत्रातील आदिवासींची सद्य:स्थिती जाणून घेण्याचे दृष्टिने बेंचमार्क सर्वेक्षण करणे प्रस्तावित आहे.

वरील वस्तुस्थिती पाहता सदरचा परिच्छेद वगळण्यात यावा, अशी विनंती आहे.

आदिवासी उपयोजनेचा वार्षिक नियतव्यय खालीलप्रमाणे आहे.

वर्ष	राज्य योजना नियतव्यय	%	आ.उ.योजनेचा नियतव्यय	%
१९९३-९४	३८०४.००	८६.३४	२६५.००	८.०७
१९९४-९५	४४००.००	९१.९२	३३०.००	८.२५
१९९५-९६	६०६२.००	८७.०३	४१२.५०	७.८२
१९९६-९७	८२८४.००	९०.७८	५८८.५८	७.८३
१९९७-९८	८३८५.००	७३.८८	५५०.००	८.७५
१९९८-९९	११६००.७३	५५.१७	५६१.००	८.७७
१९९९-००	१२१६१.६६	५४.६१	५८०.५९	९.००
२०००-०१	१२३३०.००	४७.०२	५२५.००	९.००
२००१-०२	११७२०.५६	५७.५९	५६७.००	९.००
२००२-०३	११५६२.००	४९.३३	५८५.००	१०.२६
२००३-०४	१२०५२.५०	६२.८८	५५५.७३	७.३३
२००४-०५	९६६५.२५	१००.००	५३०.०४	५.४८
२००५-०६	११०१४.०३	१००.००	९९०.००	८.९९

२००६-०७	१४८२९.००	१००.००	१३८९.००	९.३७
२००७-०८	२०२००.००	१००.००	१७९८.००	८.९०

अर्थसंकल्प आणि खर्च -

२.५ अगोदरच्या वर्षातील लाभधारकांच्या संख्येमध्ये १० टक्क्याने वाढ करुन आलेल्या लाभधारकांच्या संख्येवर आधारीत अर्थसंकल्पीय अंदाज तयार केला होता. याप्रमाणे, अर्थसंकल्पीय वाटप आणि लक्ष्य केलेल्या समूहांच्या गरजा कि ज्यांचा स्पष्टपणे शोध घेतला नव्हता, त्यामध्ये कोणतेही परस्पर नाते नव्हते.

अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींच्या शिक्षणाच्या विकासाकरीता वेगवेगळ्या योजनांवर सामाजिक न्याय विभाग आणि आदिवासी विकास विभागाकडून करण्यात आलेला खर्च त्याचप्रमाणे तुलनात्मक अर्थसंकल्पीय तरतूदी खालीलप्रमाणे होत्या.

(रुपये कोटीत)

वर्ष	**सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभाग**			**आदिवासी विकास विभाग**		
	अर्थसंकल्पीय तरतूद	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक (-) शिल्लक (-)**	**अर्थसंकल्पीय तरतूद**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक (-) शिल्लक (-)**
२००२-०३	१३७.७५	१४०.०७	+२.३२	३१६.९९	३१९.०८	+२.०९
२००३-०४	२२३.१२	२१५.३३	-७.७९	३६९.५१	३७६.५०	+६.९९
२००४-०५	४०९.८२	३००.६०	-१०९.२२	३८३.०१	३८२.४६	-०.५५
२००५-०६	३२८.३८	३३४.६६	+६.२८	४६५.३०	४६५.३०	००.००
२००६-०७	३८४.६३	३३८.८५	-४५.७८	५४४.००	४९०.२८	-५३.७२
एकूण	**१४८३.७०**	**१३२९.५१**	**-१५४.१९**	**२०७८.८१**	**२०३३.६२**	**-४५.१९**

अधिक/शिल्लक या करीता असलेली कारणे शासनाकडून मागितलेली असताना सुद्धा मिळाली नव्हती. (ऑगस्ट-२००७)

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने दिलेले अभिप्राय :-

ज्ञापन :

२.६ उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला :-

शिष्यवृत्तीच्या प्रत्येक योजनेचा लाभ घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या दरवर्षी निश्चित करणे कठीण असते कारण पालकांचे उत्पन्न, विद्यार्थ्यांनी निवडलेल्या अभ्यासक्रमात वेळोवेळी

केलेला बदल यावर विद्यार्थी संख्या अवलंबून असते. तसेच व्यावसायीक अभ्यासक्रम व व्यावसायीकेतर अभ्यासक्रम यांच्या शिक्षण शुल्कामध्ये मोठी तफावत आहे. तसेच व्यावसायीक अभ्यासक्रमाच्या शुल्कामध्ये दरवर्षी होणारी वाढ होत असते. त्यामुळे खर्चाच्या अंदाजापेक्षा खर्च कमी अधिक होतो. ज्या योजनांमध्ये प्रस्ताव कमी प्राप्त झालेले आहेत. उदा.पुस्तकपेढी योजना अशा योजनांची तरतूद पुनर्विनियोजनाद्वारे इतर योजनांकडे वर्ग करुन खर्च करण्यात येतो.

(रुपये लाखात)

वर्ष	तरतूद	खर्च	लाभार्थी
अनु.जातीच्या विद्यार्थ्यांना शिक्षण फी/परिक्षा फी ची प्रतिपुती			
२००२-०३	१४७७.४३	१५८९.४३	७९४७१
२००३-०४	१९१७.२७	१९२८.३८	८०३४९
२००४-०५	१८५१.६३	२००६.५९	८३३११
२००५-०६	२८४१.८१	३२४७.३५	१०८२४५
२००६-०७	९३३७.९१	५२४५.३४	११६५६३
	१७४२६.०५	१४०१७.०९	४६७९३९
इ.५वी ते ७वी मधील अनु.जातीच्या मुलींना शिष्यवृत्ती			
२००२-०३	७०१.४४	६१८.४८	२०६१६०
२००३-०४	५२९.८८	५१७.९४	१७२६४७
२००४-०५	१३३९.६८	११३२.१५	१८८६९०
२००५-०६	१७८३.९	१६२९.२	१८७३१६
२००६-०७	१६२९.०४	१६०१.५९	२७१५८९
	५९८३.९४	५४९९.३६	१०२६४०२
मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजना			
२००२-०३	६७४८.६७	६८६०.३४	२२८२७७
२००३-०४	९०६२.९२	९०१०.६६	२८८१८२
२००४-०५	२५५३१.२५	१४६३१.७३	३०७०१९
२००५-०६	१२०७७.९२	१२५८१.५८	२३३५०९
२००६-०७	१३७८१.४४	१३८४८.९६	३३३५०९
	६७२०२.२०	५६९३३.२७	१३९०४९६
अनु.जातीच्या विद्यार्थ्यांसाठी पुस्तकपेढी योजना			
२००२-०३	२०९.१४	१७६.७६	७०७०
२००३-०४	१८४.८६	१७६.१६	७०६०

२००४-०५	८८४.०४	३३७.१४	१२२६०
२००५-०६	३११.९६	२६७.९१	९७४२
२००६-०७	४००.४८	३०१.४२	१०९६१
	१९९०.४८	१२५९.३९	४७०९३
अस्वच्छ व्यवसायात काम करित असलेल्या पालकांच्या मुलांना मॅट्रीकपुर्व शिष्यवृत्ती			
२००२-०३	५१८.६	६४१.९९	६२३१७
२००३-०४	६५८.३७	६८२.२	५६८४२
२००४-०५	६६४.४८	८२०.६५	६८३८०
२००५-०६	१२२७.३९	१२०७.६५	१००६३७
२००६-०७	१४०१.७७	१३२७.२३	११०६०२
	४४७०.६१	४६७९.७२	३९८७७८
इ.८वी ते १०वी पर्यंत शिकत असलेल्या अनु.जातीच्या विद्यार्थीनींना शिष्यवृत्ती प्रदाने			
२००२-०३	०	०	
२००३-०४	२७१९.१९	१९७८.७०	१९७८७०
२००४-०५	२२४५.८६	२३१२.३७	२३१२३७
२००५-०६	२४५०.८३	२३९२.०५	२३९२०५
२००६-०७	२९९९.४२	२९३७.१८	२९३७१८
	१०४१५.३	९६२०.३	९६२०३०
परदेश अभ्यासक्रमासाठी अनु.जातीच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती			
२००२-०३	०	०	
२००३-०४	९३.६३	९३.६३	१०
२००४-०५	१७२.०५	१२६.८८	१०
२००५-०६	१५०.८४	१४७.१८	२१
२००६-०७	३८३.९५	२८०.७३	३०
	८००.४७	६४८.४२	७१

परदेश अभ्यासक्रमासाठी मान्य निवड संस्थेच्या अधिन राहून विद्यार्थ्यांना शासन निर्णयानुसार शिष्यवृत्ती मंजूर केली असून उर्वरीत शिल्लक अनुदान शासनास समर्पित केले.

तळटिप : सदर परिच्छेद महालेखाकार कार्यालयाने तपासून परत केलेला आहे.

आदिवासी विकास विभागाने दिलेले अभिप्राय :-

ज्ञापन :

२.७ उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला :-

सुकथनकर समितीच्या शिफारशीनुसार सन १९९३-९४ पासून आदिवासीच्या लोकसंख्येच्या प्रमाणात आदिवासी उपयोजनेसाठी नियतव्यय उपलब्ध करुन देण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार राज्याच्या एकूण नियतव्ययाच्या ८.९ टक्के एवढा नियतव्यय आदिवासी उपयोजनेसाठी उपलब्ध करुन देण्यांत येतो. मागील पाच वर्षातील आदिवासी उपयोजनेसाठी व शिक्षणासाठी उपलब्ध करुन दिलेल्या तरतुदीची आकडेवारी खालीलप्रमाणे आहे.

(रुपये कोटीत)

वर्ष	राज्य योजना नियतव्यय	आदिवासी उपयोजनेचा मंजूर नियतव्यय	आदिवासी उपयोजनेमधून शिक्षणासाठी उपलब्ध करुन दिलेला नियतव्यय
२००७-०८	१७८६८.००	१५९०.००	२०२.०२
२००८-०९	२५०००.००	२२३८.५०	२४०.६८
२००९-१०	२६०००.००	२३१४.००	३४४.८९
२०१०-११	३३९३४.००	३०२०.००	४२६.००
२०११-१२	४१५००.००	३६९३.५०	५६६.००
एकूण	**१४४३०२.००**	**१२८५६.००**	**१७७९.५९**

शिष्यवृत्त्यांची अदायगी -

२.८ ६५ चाचणी परीक्षा झालेल्या महाविद्यालयांत विद्यार्थ्यांना निर्वाह भत्त्यांची अदायगी प्रत्येक महिन्यांत करण्याऐवजी वर्षासाठी एकत्रित करण्यात आली. महाविद्यालयीन प्राधिकारी ह्या कार्यवाहीस राज्य शासनाकडून उशीरा मिळालेल्या तदर्थ अनुदानास जबाबदार धरतात. मदत न घेणाऱ्या महाविद्यालयांच्या बाबबीत शासन, शिष्यवृत्त्यांची अदायगी जवळजवळ विद्यावर्षाच्या अखेरीस करते.

मार्च २००७ अखेर ६५ चाचणी परीक्षा झालेल्या महाविद्यालयांत आणि विद्यापिठांत १९९९ ते २००७ या कालावधीसाठी ३८२७ विद्यार्थ्यांसाठी असलेल्या रु.३.५१ कोटी किंमतीच्या केंद्र शासकीय मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्त्या अदायगी न केल्यामुळे पडून होत्या. कांही महाविद्यालयीन प्राधिकार्यांनी असे म्हटले कि विद्यार्थ्यांनी त्यांच्याकडे शिष्यवृत्तीची मागणी न केल्यामुळे शिष्यवृत्तीच्या रकमा अदायगी विना पडून राहिल्या होत्या. त्या शिष्यवृत्तीच्या रकमा शासकीय खात्यामध्ये भरुन टाकावयास हव्या होत्या.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने दिलेले अभिप्राय :-

ज्ञापन :

२.९ उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला :-

विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी कार्यालयामार्फत जिल्ह्यातील महाविद्यालयांना भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती व शिक्षण फी, परीक्षा शुल्क मंजूर केले जाते. ज्या महाविद्यालयांना यापोटी तदर्थ अनुदान दिले जाते अशा महाविद्यालयांची अंतिम प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर त्याचे मुल्यनिर्धारण करुन महाविद्यालयास देय असणारी रक्कम दिलेल्या तदर्थ अनुदानातून समायोजन करुन उर्वरीत रक्कम देण्याची कार्यवाही केली जाते. यासाठी अनुदान पुस्तिका ठेवणे बंधनकारक आहे. परंतु काही जिल्ह्यांमध्ये कर्मचाऱ्यांच्या अभावी त्याची पुर्तता केली नसल्याचे दिसून येते. परंतु महाविद्यालयांकडे शिल्लक असलेल्या रकमांचा शासनास परतावा करण्याबाबत संबंधित विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांचेकडून सूचना व जून-जुलै मध्ये आयोजित होणाऱ्या प्राचार्यांच्या बैठकीमध्ये मौखिक स्वरुपात आदेश देण्यांत आले आहेत.

संबंधित १० जिल्ह्याचे विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांना क्रमांक ५७९, दिनांक २४.५.२०११ अन्वये ज्ञापन निर्गमीत करण्यात आलेले असून सन २००२-०३ ते २००५-०६ च्या दरम्यान कार्यरत असणाऱ्या संबंधित कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस देऊन त्यांच्याविरुद्ध प्रशासकीय कार्यवाही करण्याबाबत कळविण्यात आलेले आहे. तसेच वरील कालावधीतील अनुदान नियंत्रण नोंदवह्या अद्ययावत करुन तसा अनुपालन अहवाल संचालनालयास सादर करण्याबाबत आणि त्या कालावधीमध्ये कार्यरत असलेल्या विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांची नावे त्यांच्याविरुद्ध प्रशासकीय कार्यवाही प्रस्तावित करण्याकरिता कळविण्याबाबत कळविण्यात आलेले आहे.

तळटिप : अ) लेखापरिक्षण आक्षेप स्विकारण्यात येत आहे.

ब) शिष्यवृत्तीच्या रक्कमा विद्यार्थ्यांना संपूर्णपणे वितरीत करण्यात आलेल्या आहेत. हे सिद्ध करण्यासाठी संबंधित लेखापरिक्षण पुरावे सादर करण्यात यावे.

आदिवासी विकास विभागाने दिलेले अभिप्राय :-

ज्ञापन :

२.१० उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला :-

सदर बाबतीत प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांच्यामार्फत संस्थांकडून माहिती प्राप्त करुन कार्यवाही करण्यात आली आहे. कोणत्याही एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प क्षेत्रात शिष्यवृत्तीची रक्कम प्रलंबित असल्याचे आढळलेले नाही.

परदेशी शिक्षण घेणाऱ्या मागसवर्गीय विद्यार्थ्यांकरीता शिष्यवृत्त्या -

२.११ गरीब अनुसूचित जाती विद्यार्थ्यांना परदेशातील प्रमुख विद्यापिठातून उच्च शिक्षण घेणे शक्य होण्यासाठी निवडक विद्यार्थ्यांना परदेशी विद्यापिठाने निश्चित केलेल्या शैक्षणिक फी आणि निर्वाह भत्ता यांची पूर्ण अदायगी करण्यात आली होती. शिक्षणक्रम अपूर्ण राहिला असल्यास विद्यार्थ्यांनी शासनाकडून झालेल्या खर्चाची परतफेड करणे आवश्यक होते.

२००३-०४ ते २००५-०६ या कालावधीत राज्यामध्ये रु.३.६८ कोटी रकमेच्या शिष्यवृत्त्या ३० विद्यार्थ्यांना मंजूर करण्यांत आल्या होत्या. तथापि असे दिसून आले कि ज्या १० विद्यार्थ्यांना (३० पैकी) शिष्यवृत्ती देण्यात आली होती त्यांनी आवश्यक तो शिक्षण क्रम २००६-०७ मध्ये पूर्ण केलेला होता. या प्रकरणी विभागाने त्या विद्यार्थ्यांकडुन आवश्यक ते शिक्षणक्रम पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र मिळविले नव्हते. ही बाब योजनेचे संनियंत्रण योग्य नसल्याचे दर्शविते.

सहसचिव यांनी भविष्यात शिक्षणक्रम पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र मिळविण्यासाठी योग्य ती कार्यवाही करण्याचे मान्य केले (ऑगस्ट २००७).

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने दिलेले अभिप्राय :-

ज्ञापन :

२.१२ उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला :-

परदेश शिष्यवृत्ती ही अनुसूचित जातीच्या मुला-मुलींना परदेशातील नामांकित शैक्षणिक संस्थेत शिक्षण घेण्याची संधी मिळावी व त्यांच्या गुणवत्तेला वाव मिळावा म्हणून शासनाने ही योजना सन २००३-०४ पासून शासन निर्णय क्र.इबीसी-२००३/प्र.क्र.११५/मावक-२ दिनांक ११.६.२००३ अन्वये सुरु केलेली असून ही योजना मुख्यालयाच्या स्तरावरुन राबविण्यात येते. सदर योजना राज्यस्तर योजना आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

वर्षनिहाय खर्चाचा तपशिल
परदेश शिष्यवृत्ती (२२२५-३८३-२) (रु.लाखात)

वर्ष	निवड संख्या	तरतूद	खर्च	लाभार्थी	अभ्यासक्रम पुर्ण केल्याचे व सादर केलेली माहिती/प्रमाणपत्र

०३-०४	१०	९३.६३	९३.६३	१०	१
०४-०५	१०	१२६.८८	१२६.८८	१०	०
०५-०६	१०	१४७.१०	१४७.१०	२१	४
०६-०७	२५	२८०.७३	२८०.७३	३०	६
०७-०८	२५	५५०.००	३३५.७०	३९	४
०८-०९	२६	५४५.०८	५४५.०८	५३	२
०९-१०	२६	६८६.४०	६८६.४०	७०	०
१०-११	४०	१०००.००	७०१.१०	८५	०
एकूण	**१७२**	**३४२९.८२**	**२९१६.६२**	**३१८**	**१७**

टिप :- १. सन २००७-०८ ते सन २०१०-११ या वर्षासाठी लाभार्थी संख्येस विद्यापीठाने प्रस्तावीत केलेली रक्कम मंजूर केली असून उर्वरीत अनुदान शासनाकडे समर्पित केलेले आहे.

वसतिगृहे बांधणे आणि चालविणे -

२.१३ वसतिगृहे बांधणे हा दुर्गम भागांतील व खेड्यापाड्यातील विद्यार्थ्यांना शहरामध्ये उपलब्ध असलेले उत्तम शिक्षण मिळविणे शक्य होण्यासाठी तसेच त्यांना याबाबतीत प्रोत्साहन देण्याचा एक मार्ग होता. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या दरम्यान (१९६१-६५) राज्य शासनाने मुलींकरीता वसतिगृह योजना सुरु केली होती. सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे वसतिगृहे बांधकाम करुन घ्यावयाचे होते. विभागीय समाज कल्याण अधिकारी/प्रकल्प अधिकारी यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या संपर्कात रहावयाचे होते आणि नियतकालिक प्रगति अहवालाच्या सहाय्याने बांधकाम लवकर पूर्ण होण्यासाठी नियंत्रण ठेवावयाचे होते. ७०६०० अनुसूचित जाती विद्यार्थ्यांना सामावून घेण्यासाठी ७०६ वसतिगृहांची आवश्यकता असताना फक्त २२८२४ विद्यार्थ्यांना सामावून घेता येईल अशी २७१ वसतिगृहे (१५० मुलाकरीता आणि १२१ मुलींकरीता) १९९९-२००० ते मार्च २००७ या दरम्यान मागास विद्यार्थ्यांसाठी सुरु करण्यांत आली होती ही वसतिगृहे भाड्याच्या जागेत होती.

२६२०५ अनुसूचित जमातीतील विद्यार्थ्यांच्या राहण्याच्या सोयीसाठी आदिवासी विकास विभागाने ३३६ शासकीय वसतिगृहे (२०५ मुलांकरीता आणि १३१ मुलींकरता) मार्च २००७ अखेर स्थापित केली होती. यापैकी ५७ शासकीय इमारतीमध्ये होती आणि उरलेली २७९ भाड्याच्या इमारतीत होती. ६६ वसतिगृहे जी भाड्याच्या इमारतीत चालविली जात होती ती बांधण्यांसाठी शासनाने जमिन संपादित केली होती.

१० प्रकल्प अधिकाऱ्यांच्या अभिलेख्यांच्या चाचणीतून असे उघड झाले कि ११ वसतिगृहांचे २००३-०४ मध्ये सुरु झालेले बांधकाम अद्यापही चालू होते. मार्च २००७ अखेर झालेला खर्च ३.८५ कोटी होता. एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी यांनी असे म्हटले कि (जुलै २००७) सदर कामाची जबाबदारी सार्वजनिक बांधकाम विभागास दिल्यापासून विलंबाची कारणे त्यांना समजली नव्हती. ही बाब आवश्यक त्या समन्वयाचा अभाव दर्शविणारी होती ज्यामुळे वसतिगृहाच्या इमारतीचे बांधकाम वेळेत पूर्ण झाले नव्हते.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने दिलेले अभिप्राय :-

ज्ञापन :

२.१४ उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला :-

तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या दरम्यान (१९६१-६५) राज्य शासनाने मुलींकरीता वसतिगृह योजना सुरु केली होती. सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे वसतिगृहे बांधकाम करुन घ्यावयाचे होते. त्यानुसार विभागीय समाज कल्याण अधिकारी यांनी सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत सन २००७ पर्यंत ३१ मुलींची आणि ५१ मुलांची अशी एकूण ८२ मागासवर्गीय मुला-मुलींच्या शासकीय वसतिगृहांसाठी शासकीय इमारती बांधकाम सार्वजनिक बांधकाम विभागाकडून करुन घेऊन त्यात वसतिगृहे कार्यान्वित केली आहेत व अद्यापही १८९ मुलामुलींची शासकीय वसतिगृहे ही भाड्याच्या इमारतीत कार्यान्वित आहेत अशी एकूण २७१ जुनी शासकीय वसतिगृहे कार्यान्वित आहे. त्यात २२८२४ विद्यार्थी लाभ घेत आहेत.

राज्यात मागासवर्गीय मुलांची १५० आणि मागासवर्गीय व आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय मुलींची १२१ अशी एकूण २७१ शासकीय वसतिगृहे कार्यान्वीत आहेत. तसेच राज्यातील ३५३ तालुकापातळीवर प्रत्येकी एक अशी एकूण ३५३ वसतिगृहे चालू करण्यांचा निर्णय सन २००६-०७ मध्ये शासनाने घेतला आहे. त्यापैकी सन २००७-०८ पासून नवीन १०० शासकीय वसतिगृहे (६० मुलांची व ४० मुलींची) चालू करणेसाठी ठिकाणे निश्चित करुन १०० तालुक्यांच्या ठिकाणी बांधकाम चालू करण्यांत आली आहेत. त्यापैकी ६४ शासकीय वसतिगृहांची बांधकामे पुर्ण झालेली आहेत व उर्वरीत बांधकामे लवकरच पुर्ण होणार आहेत. जून २०११ पासून सदर १०० शासकीय वसतिगृहांपैकी ज्या इमारतींचे बांधकाम पुर्ण झालेले आहे अशी वसतिगृहे शासकीय

इमारतीत व उर्वरीत वसतिगृहे भाड्याच्या इमारतीत चालू होणार आहेत. तसेच औरंगाबाद, अमरावती, नाशिक व लातूर येथील विभागीय स्तरावरील १००० विद्यार्थी क्षमतेची शासकीय वसतिगृहे देखील चालू शैक्षणिक वर्षापासून चालू होणार आहेत.

तळटिप : सदर परिच्छेद महालेखाकार कार्यालयाने तपासून परत केलेला आहे.

आदिवासी विकास विभागाने दिलेले अभिप्राय :-

ज्ञापन :

२.१५ उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला :-

सद्य:स्थितीत राज्यात अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांची ४९५ शासकीय वसतीगृहे मंजूर आहेत. त्यापैकी ४६५ शासकीय वसतिगृहे सुरु आहेत. (मुलांची-२७५ व मुलींची १९०) ३८५ वसतीगृहे भाड्याच्या इमारतीत व ८० वसतिगृहे शासकीय इमारतीत कार्यरत आहेत. १९८ वसतीगृहांना जमिन प्राप्त झाली असून २६७ वसतीगृहांना अद्याप जमिन प्राप्त झालेली नाही. आजमितीस एकूण ४६५ शासकीय आदिवासी वसतिगृहात एकूण ३९३४८ आदिवासी विद्यार्थ्यांच्या निवासाची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

१) शासकीय जमीन उपलब्ध करुन देण्याबाबत विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, मनपा आयुक्त यांस अ.शा.पत्रान्वये विनंती करण्यात आली आहे.

२) शासन निर्णय दिनांक ३१ ऑगस्ट, २००९ अन्वये, जेथे शासकीय जमीन उपलब्ध नाहीत तेथे खाजगी जमीन खरेदीबाबत सर्व क्षेत्रीय कार्यालयाना अधिकार प्रदान करण्यात आले आहेत.

तसेच विद्यार्थी संख्या विचारात घेऊन आवश्यक त्या सर्व सोयी-सुविधा युक्त तयार इमारती खरेदी करण्याबाबत क्षेत्रीय कार्यालयांना अधिकार देण्यात आले आहेत.

सदर परिच्छेद निर्लेखित करण्यात यावा अशी विनंती करण्यात येत आहे.

वसतिगृहांचे बांधकाम सुरु करण्यातील विलंब -

२.१६ शासनाने उत्तम शैक्षणिक संधी त्यांना मिळाव्यात म्हणून १००० अनुसूचित जाती विद्यार्थ्यांसाठी विभागीय स्तरावर नवीन वसतिगृहे बांधण्याचे ठरविले (मार्च २००६). अमरावती, औरंगाबाद आणि नाशिक जिल्ह्यांमध्ये प्रत्येकी एक वसतिगृह (अंदाजित खर्च रु.२५.९९ कोटी, रु.२७.४२ कोटी आणि रु.२६.३० कोटी अनुक्रमे) बांधण्याकरीता मंजूरी देण्यात आल्या होत्या (२००५-०६). विभागीय अधिकाऱ्यांनी काढलेले पैसे सार्वजनिक बांधकाम विभागास अंशदान ठेव पद्धतीने काम करण्यास दिले होते. तथापि असे दिसून आले होते कि अमरावती आणि नाशिक जिल्ह्यातील वसतिगृहांचे बांधकाम जून २००७ पर्यंत सुरु करण्यात आले नव्हते. औरंगाबाद येथे सप्टेंबर २००६ मध्ये सुरु झालेल्या कामाची प्रगति अत्यंत धीमी होती आणि एप्रिल २००७ अखेर त्यावर झालेला खर्च फक्त रु.४२ लाख होता. याप्रमाणे सर्व तिनही प्रकरणांत, बांधकामासाठी लागणारी जमीन संपादन करण्यापूर्वीच पैसे काढण्यांत आले होते आणि ते पैसे (रु.७९.७१ कोटी) सार्वजनिक बांधकाम विभागाने स्वत:कडे ठेवून घेतले होते.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने दिलेले अभिप्राय :-

ज्ञापन :

२.१७ उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला :-

अ) नाशिक येथील १००० क्षमतेचे शासकीय वसतिगृह इमारत बांधकामासाठी प्राचार्य, औक्षेगिक प्रशिक्षण संस्था, सातपूर, नाशिक यांचे मालकीची ४०००० चौ.मी. क्षेत्रफळ जमीन देण्याची सहमती होती तसे त्यांनी त्यांचे पत्र क्र.अं/प्र.संस्था/ना/आस्था/अ-२/२७५६/०६, दिनांक १३.६.२००६ अन्वये कळविले आहे. त्यानुसार आवश्यक तांत्रिक बाबी सार्वजनिक बांधकाम विभागाने पुर्ण केल्या. या आधारावर बांधकाम निधी सन २००६ मध्ये आहरीत करण्यांत आला. मात्र व्यवसाय शिक्षण विभागाच्या वरीष्ठ कार्यालयाने सदर जमीन देण्यांत संमती दिली नाही. त्यामुळे तेथे बांधकाम सुरु करता आले नाही. तद्नंतर मा.जिल्हाधिकारी, नाशिक यांनी आदेश क्र.मशा/कक्ष/अ (१०) १५८/०७, दिनांक २६.२.२००७ अन्वये आडगांव, नाशिक येथील सहा एकर जमीन १००० क्षमतेच्या शासकीय वसतिगृहासाठी मंजूर केली. मात्र सदर जागेचा काही भाग कृषीक असल्याने बांधकाम सुरु करता आले नाही. नगर विकास विभाग शासन निर्णय क्र.टीपीबी/१००८/१७०५/प्र.क्र.२५९/०८, दिनांक १.१.२००८ अन्वये सदर उपलब्ध जमीन नगरविकास विभागातून विकास विभागात रुपांतरीत करण्यास मंजूरी प्राप्त झाल्यानंतर इमारत

बांधकाम सुरु करण्यांत आले आहे. जागेतील बदलामुळे इमारत बांधकामासाठी विलंब झाला. आता सर्व निधी खर्च झाला असून बांधकाम पुर्णत्वास येत आहे.

ब) औरंगाबाद येथील १००० क्षमतेचे इमारत बांधकामासाठी जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांचे आदेशानुसार सन २००५ मध्ये जमीन उपलब्ध झाली असल्याने रक्कम मार्च २००६ मध्ये आरहित करण्यात आली. तथापि उपलब्ध झालेली जमीन ही पुरेशी नसल्याने नकाशे आराखड्यात बदल करण्यांत आला. त्यास तांत्रिक व प्रशासकीय मंजूरीस विलंब झाला आहे. आता सदर इमारतीचे बांधकाम पुर्ण झाले असून २०१०-११ पासून तेथे वसतिगृह सुरु करण्यात आले आहे.

क) अमरावती येथील १००० क्षमतेचे शासकीय वसतिगृह इमारत बांधकामासाठी जिल्हाधिकारी, अमरावती यांचे आदेश क्र.कक्ष-२६/राजस्व/कावि-६७७, दिनांक ७.३.२००६ अन्वये जागा उपलब्ध झाली. त्यानुसार निधी मार्च २००६ मध्ये आहरीत करण्यांत आला. सदर जागेवर अतिक्रमण असल्याने ते काढण्यामुळे बांधकाम साहित्य पोहचविण्यासाठी पोचमार्ग नसल्याने काम जलदगतीने होऊ शकले नाही. आता सदर वसतिगृहाचे काम पुर्णत्वास आले आहे. सबब वरील खुलासा मान्य करुन झालेले विलंब क्षमापित करण्यात यावेत.

शाळेचे व्यवस्थापन -

२.१८ ज्यांचे पालक अस्वच्छ व्यवसायांत गुंतलेले आहेत त्यांच्या मुलांना शिक्षण घेण्यासाठी उत्तेजन देण्याकरीता शासनाने पुणे आणि नागपूर येथे दोन निवासी सार्वजनिक शाळा सुरु केल्या (१९८६-८७) ह्या सार्वजनिक शाळेमध्ये भरती झालेल्या विद्यार्थ्यांना शिक्षण, गणवेष आणि राहण्या-जेवण्याची व्यवस्था ह्या सोयी फुकट पुरविल्या जात होत्या. शाळेच्या इमारती ६०० विद्यार्थ्यांना सामावून घेण्यासाठी बांधण्यात (किंमत रु.६.०२ कोटी) आल्या होत्या. ज्याचा अर्थ १ ते १० इयत्तांसाठी प्रत्येकी ६० विद्यार्थी, परंतु ती शाळा ७ व्या इयत्तेपर्यंतच चालविली जात होती. गेल्या पाच विद्यावर्षामध्ये भरती केलेले विद्यार्थी १६० ते २२५ या मर्यादेत होते. शाळेचा समूह बनलेल्या १० इमारतीपैकी फक्त पाच इमारती मुख्य इमारतींच्या कांही भागासह शाळेसाठी वापरल्या जात होत्या. मुख्याध्यापकांचे पद एप्रिल, १९९९ पासून रिकामे होते. विद्यार्थ्यांच्या नियतकालिक आरोग्य तपासणीसाठी मंजूर झालेल्या (१९८५) आरोग्य अधिकाऱ्याचे पद कधीच भरण्यात आले नव्हते. याप्रमाणे, जरी एका विशिष्ट हेतूसाठी शाळेची

स्थापना झाली होती तरी विभागाकडून योजनेच्या यशाविषयी खात्री करुन घेण्याकरीता कोणतेही प्रयत्न झाले नव्हते.

सह-सचिव सामाजिक न्याय विभाग यांनी असे म्हटले कि (ऑगस्ट २००७) रिकाम्या इमारती वेगळ्या कारणासाठी वापरण्यात येतील आणि मुख्याध्यापकाचे खाली पद भरण्यात येईल. त्यांनी पुढे असे म्हटले कि योजनेच्या अपुऱ्या जाहिरातीमुळे विद्यार्थ्यांची भरती कमी होती आणि भविष्यात ती उणीव भरुन काढली जाईल.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने दिलेले अभिप्राय :-

ज्ञापन :

२.१९ उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला :-

पुणे येथील निवासी शाळेतील मुख्याध्यापकाचे १ रिक्त पद अनुसूचित जाती प्रवर्गासाठी राखीव आहे. सदरच पद भरण्यासाठी महाराष्ट्र ज्ञान मंडळ पुणे (MKCL) यांचेमार्फत अर्ज मागवून दिनांक ३ जानेवारी, २०१० रोजी उमेदवारांची लेखी परीक्षा घेण्यात येऊन पात्र उमेदवारांची निवड करण्यात आली आहे. तथापि पात्र उमेदवाराचे जात वैधता प्रमाणपत्राअभावी नियुक्ती देणे बाकी होते. दरम्यान वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक असंक-१०१०/प्र.क्र.१/२०१०/वित्तीय सुधारणा-१, दिनांक ५ जून, २०१० अन्वये गट-क संवर्गातील पदांची भरती करण्यास १ वर्षासाठी निर्बंध घालण्यात आल्याने सदरचे पद अद्याप भरण्यात आलेले नाही.

आरोग्य अधिकारी पदाबाबत :-

२.२० पुणे व नागपूर येथील निवासी शाळेकरीता मानद वैद्यकीय अधिकाऱ्यांची एकुण २ पदे रिक्त असुन सदरील पदे ही मानधन तत्त्वावरील आहेत. मानधनावर काम करण्यास कोणीही वैद्यकीय अधिकारी इच्छुक नसल्याने वरील २ पदे रिक्त आहे.

१. या योजनेच्या यशस्वीतेसाठी प्रयत्न करण्यात आले. चालू वर्षी जास्तीत जास्त पाल्यांना प्रवेश प्रयत्न करण्यात येत आहे.

२. या शाळेमध्ये अधिक सोयीसुविधा व प्रवेश सुधारण्यासाठी सुधारणा प्रस्ताव संचालनालयाचे पत्र क्र.सकसं/शावगू/सराकानिशा/प्र.क्र.३६७/२०१०/२०१०-११/का-५अ/१०३७, दिनांक २८.१०.२०१० अन्वये शासनास सादर करण्यात आले आहे. सदर प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

३. पुणे येथील शाळेचा इमारतीच्या समूहामध्ये एकूण ७ इमारतीचा समावेश आहे. रिकाम्या असलेल्या इमारतीत १ मुलांचे शासकीय वसतिगृह व १ मुलींचे शासकीय वसतिगृह तसेच या विभागांतर्गत कार्यरत असलेली डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे या संस्था आता कार्यरत आहेत.

तळटिप :- अ) पदांच्या भरती प्रक्रियेतील प्रगती नमूद करण्यात यावी.

ब) अस्वच्छ व्यवसाय करणाऱ्या पाल्यांच्या मुलांसाठीच्या शाळांच्या स्थापनेचे उद्दिष्ट साध्य झालेले नाही.

मुलभूत सुविधांची तरतूद -

२.२१ प्रमाणकानुसार, ७५ विद्यार्थ्यांना सामावून घेणाऱ्या वसतिगृहात दोन बहुविध दालन, एक स्वयंपाक गृह आणि एक भांडार, विद्यार्थ्यांसाठी १० खोल्या, आठ स्वच्छता गृहे आणि नऊ न्हाणी गृहे अशा सुविधा असल्या पाहिजेत. दुसऱ्या शब्दांत, आठ विद्यार्थ्यांसाठी अदमासे एक खोली एक स्वच्छता गृह आणि नऊ विद्यार्थ्यांसाठी एक न्हाणीघर असावयास पाहिजेच.

नांदेड, नंदुरबार आणि नाशिक जिल्ह्यांतील शासन आणि स्वयंसेवी संस्थांकडून चालवल्या जाणाऱ्या वसतिगृहांचे अभिलेख्यातून खालील बाबी दिसून आल्या.

- तीन शासकीय वसतिगृहांत १३ ते १५ विद्यार्थ्यांसाठी फक्त एक स्वच्छता गृह आणि एक स्नानगृह पुरविण्यात आले होते.
- स्वयं-सेवी संस्थांकडून चालविल्या जाणाऱ्या वसतिगृहातून फक्त एक स्वच्छता गृह आणि एक न्हाणी घर २४ ते ६० विद्यार्थ्यांसाठी पुरविण्यात आले होते.
- दोन शासकीय वसतिगृहात स्वच्छता गृह आणि न्हाणी घर ह्या व्यवस्था अजिबातच देण्यात आल्या नव्हत्या.
- चार शासकीय आणि चार स्वयंसेवी संस्थाकडून चालवल्या जाणाऱ्या वसतिगृहातून भोजन कक्षांची व्यवस्था देण्यात आली नव्हती.

सह-सचिव सामाजिक न्याय विभाग यांनी असे म्हटले कि (ऑगस्ट, २००७) ज्या स्वयंसेवी संस्था पुरेशा सुखसोयी पुरवत नाहीत त्यांना बे-दखल करण्यासाठी आवश्यक ती कारवाई करण्यात येईल.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने दिलेले अभिप्राय :-

ज्ञापन :

२.२२ उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला :-

याबाबत दक्षता घेण्यात येईल व सदर सुविधा उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करण्यात येईल. सदरच्या शासकीय वसतिगृहाच्या इमारती ह्या भाड्याच्या इमारतीत कार्यान्वित असल्याने तेथील विद्यार्थ्यांना उपलब्धतेनुसार स्वच्छतागृह व स्नानगृह पुरविण्यात आलेले आहे. दोन शासकीय वसतिगृहात स्वच्छता गृह आणि न्हाणी घर ह्या व्यवस्था अजिबातच देण्यात आल्या नव्हत्या. हे खरे नाही. कारण इमारती जरी भाड्याने घेणे आवश्यक असल्यास तरी स्वच्छतागृह व न्हाणीघर ह्या व्यवस्था असल्याशिवाय इमारती शासकीय वसतिगृहासाठी भाड्याने घेतल्या जात नाहीत. कारण या कार्यालयाचे परिपत्रक क्र.५२०६, दिनांक १२/०७/२००५ अन्वये सर्व क्षेत्रिय कार्यालयांना योग्य ते मार्गदर्शकपर सुचना देण्यात आलेल्या आहेत. इमारती जरी भाड्याने घेणे आवश्यक असल्यास तरी भोजनकक्ष यांची व्यवस्था असल्याशिवाय इमारती शासकीय वसतिगृहासाठी भाड्याने घेतल्या जात नाहीत. कारण या कार्यालयाचे परिपत्रक क्र.५२०६, दिनांक १२/७/२००५ अन्वये सर्व क्षेत्रिय कार्यालयांना योग्य त मार्गदर्शकपर सुचना देण्यात आलेल्या आहेत.

आश्रम सदृश शाळा-बांधकाम आणि चालवणे -

२.२३ आश्रम सदृश शाळा स्थापन करण्याकरीता केंद्र पुरस्कृत योजनेने आदिवासी भागात गुरुकूल पद्धतीने शैक्षणिक सोयींना उत्तेजन देणे व त्यांचा प्रसार करणे ह्या बाबी डोळ्यासमोर ठेवल्या होत्या. शाळा इमारती, वसतिगृहे आणि कर्मचारी निवासस्थाने बांधण्याकरीता येणार खर्च केंद्र आणि राज्य शासनाने समप्रमाणांत म्हणजे ५०:५० या प्रमाणे विभागून घ्यावयाचा होता. आश्रम सदृश शाळा चालवण्याचा खर्च राज्य शासनाने सोसावयाचा होता. मोफत शिक्षण, गणवेश, रहाणे, खाणे ह्या सुविधा मुलांना आश्रम सदृश शाळांमधून पुरवावयाच्या होत्या.

राज्य शासनाच्या बृहत् योजनेनुसार जी १९९१ च्या जनगणनेवर आधारीत होती (आदिवासी लोकसंख्या ७३,१८ लाख), १२४० आश्रम सदृश शाळांची राज्यामध्ये आवश्यक

होती. याऐवजी, मार्च २००७ अखेर शासकीय (५४७) आणि मदत घेणाऱ्या (५५४) अशा एकूण ११०१ आश्रम सदृश शाळा होत्या.

आदिवासी विकास विभागाने दिलेले अभिप्राय :-

ज्ञापन :

२.२४ उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला :-

शासकीय आश्रमशाळा, शासकीय वसतीगृह इमारत बांधकामासाठी केंद्र शासनाकडून ५० टक्के अनुदान उपलब्ध होते. उर्वरीत ५० टक्के निधी राज्य योजनेतून खर्च केला जातो. केंद्र शासनाकडून अनुज्ञेय असलेले ५० टक्के अनुदान वेळोवेळी प्राप्त झाले आहे. सदर आश्रमशाळेतील व वसतीगृहातील विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण व अनुज्ञेय सुविधा प्रतिवर्षी मोफत पुरविण्यात येत आहेत.

१९९१ च्या जनगणनेनुसार आदिवासी लोकसंख्या विचारात घेऊन सन २००२-०३ ते २००७-०८ या कालावधीचा बृहत आराखडा मंजूर होता.

सद्य:स्थितीत ५५२ शासकीय व ५५६ अनुदानित अशा एकूण ११०८ आश्रमशाळा सुरु आहेत.

बांधकामातील विलंब -

२.२५ ५४७ आश्रम सदृश शाळांपैकी ४०८ आ.स.शा. बांधण्याकरीता जमीन संपादन करण्यात आली होती. पैकी २३० आ.स.शा.चे बांधकाम पूर्ण करण्यात आले होते तर १७८ आ.स.शा.चे (भाड्याच्या जागेत कार्यरत) बांधकाम ऑगस्ट २००७ अखेर प्रगतिपथावर होते. केंद्र शासनाकडून आ.स.शा.च्या बांधकामाकरीता एकूण अनुदान रु.४९.५२ कोटी इतक्या रकमेचे दिले होते. त्यापैकी फक्त रु.२८.८९ कोटी खर्च केले होते आणि शिल्लक रु.२०.६३ कोटी राज्याच्या सा.बां.कडे २००३-०४ पासून पडून होते.

याप्रमाणे, केंद्र आणि राज्य शासनाकडून आवश्यक तो निधी आणि जमीन उपलब्ध करुन दिली असताना सुद्धा आश्रम सदृश शाळांचे बांधकाम अद्याप पूर्ण व्हावयाचे होते.

आदिवासी विकास विभागाने दिलेले अभिप्राय :-

ज्ञापन :

२.२६ उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला :-

सर्व आश्रमशाळांसाठी जमीनी प्राप्त करणे व प्राप्त जमीनीवर इमारत बांधकाम करण्याची मोहिम सुरु आहे. त्याअनुषंगाने शासन व सर्व क्षेत्रिय कार्यालयांच्या स्तरावरुन पाठपुरावा करण्यात येत आहे. सन २००३-०४ ते २००६-०७ या कालावधीत प्रतिवर्षी चालू व आश्रमशाळा नविन इमारत बांधकामावर खर्च करण्यात आलेला आहे. सदर कालावधीत प्राप्त तरतुद रु.४९५२.०९ लक्ष रकमेपैकी रु.४२९४,६६ लक्ष अंतिम खर्च झालेला असून ६५७.४३ लक्ष रक्कम या कालावधीत समर्पित झालेली आहे.

अ.क्र.	**तपशिल**	**संख्या**	**३१ मार्च, २०११ अखेर प्रशा.मान्यता दिलेल्या कामांची संख्या**
१	एकूण शासकीय आश्रमशाळा	५५२	-
२	पैकी जमीन प्राप्त आश्रमशाळा	४४१	-
३	पैकी इमारत बांधकाम पूर्ण आश्रमशाळा	९५	२९
४	टप्पा १ पूर्ण व टप्पा २ अपूर्ण शाळा संख्या	१८१	३९
५	बांधकाम सुरु शाळा	५८	८
६	अद्याप बांधकाम सुरु नसलेल्या	१०७	५१ (उर्वरित ५६ ची अंदाजपत्रके मागविण्यात आलेली आहे.)
७	जमीन अप्राप्त शाळा	१११	१२
	एकुण	**५५२**	**१३९**

१३९ पैकी १०४ कामांना रु.१२६८०.०० लक्ष निधी धनाकर्षाद्वारे संबंधीत कार्यकारी अभियंता यांना मुख्य अभियंता, नाशिक (समन्वय अधिकारी) मार्फत अदा करण्यात आला आहे.

१११ जमीन अप्राप्त आश्रमशाळांसाठी जमीन मागणी करण्यात आलेली आहे. त्याची सद्य:स्थिती खालीलप्रमाणे आहे.

१)	महसूल विभाग	-	५४
२)	वन विभाग	-	०९
३)	दुग्ध विभाग	-	०१
४)	खाजगी विभाग	-	४७
	एकुण	**-**	**१११**

मागासवर्गीय आदिवासी भागाकरीता विशेष कृती आराखडा -

२.२७ राज्यामध्ये सर्वात जास्त मागासवर्गीय जिल्हा नंदुरबार आणि त्या जिल्ह्यांतील सर्वात जास्त मागासवर्गीय तालुका धाडगाव व अक्कलकुवा असल्याने राज्य शासनाने या

तालुक्यांच्या विकासाकरीता २००३-०४ ते २००७-०८ या पांच वर्षात अंमलबजावणी करता येईल असा एक विशेष कृती आराखडा मंजूर केला होता (ऑगस्ट २००४). या विभागांतील आदिवासीच्या शिक्षणाकरीता असलेले वाटप रु.४०.९१ कोटी इतके होते.

विशेष कृति आराखड्याच्या अंमलबजावणीची छाननी असे दर्शविते की चार वर्षे पूर्ण झाल्यानंतरही कार्यक्रमावर फक्त रु.१२.०९ कोटी (२९.५५ टक्के) इतकीच रक्कम खर्च करण्यात आली होती. यावरुन कार्यक्रमाची अंमलबजावणी निकृष्ट होती असे दिसून येते.

आदिवासी विकास विभागाने दिलेले अभिप्राय :-

ज्ञापन :

२.२८ उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला :-

आदिवासी विकास विभागाच्या दिनांक २४/८/२००४ च्या शासन निर्णयानुसार नंदुरबार जिल्ह्यातील अतिमागासलेल्या अक्कलकुवा व धडगाव तालुक्यांच्या विकासासाठी मान्यता देण्यांत आलेल्या विशेष कृती कार्यक्रमाच्या रु.२२२६८.४५ लक्ष मंजूर निधीपैकी मार्च २००८ अखेर रु.१२४९७.५४ लक्ष इतका निधी प्राप्त झालेला आहे. त्यापैकी रु.९७७४.२८ लक्ष इतका निधी मार्च, २००८ अखेर खर्च करण्यात आलेला आहे. याची टक्केवारी ७८ अशी आहे.

एकूण प्राप्त निधीपैकी मागासवर्गीयांचे कल्याण या शिर्षाखाली रु.२०६५.३२ लक्ष इतका निधी उपलब्ध झालेला असून मार्च, २००८ अखेर रु.१३८६.३८ लक्ष इतका निधी खर्च झाला. शिक्षणाकरीता उपलब्ध झालेल्या रु.८८.६९ लक्ष निधीतून खर्चाची टक्केवारी ८७% इतकी आहे. तेव्हा याबाबतची वस्तुस्थिती विचारांत घेता विशेष कृती कार्यक्रमाची अंमलबजावणी निकृष्ट आहे असे म्हणता येणार नाही.

साक्ष :

२.२९ समितीने दिनांक ५ जुलै, २०११ व दिनांक २० सप्टेंबर, २०११ रोजी वरील परिच्छेदासंदर्भात आदिवासी विकास व सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागाच्या प्रतिनिधींची साक्ष घेतली.

२.३० सन १९९६-९७ नंतर आज पावेतो आदिवासींचे स्थिरचिन्ह सर्व्हेक्षण करण्यात आलेले नाही. त्यादृष्टीने काय उपाययोजना करण्यात आल्या आहेत ? समितीकडे १९९३-९४ ते २००७-०८ पर्यंतची माहिती आहे. १९९९ मध्ये नियतव्यय ९ टक्के होता. सन २००६-०७ या वर्षाव्यतिरिक्त ठरवून दिलेल्या राज्य योजनेच्या अनुक्रमे १०.२ व ८.८५ या टक्केवारीपेक्षा कमी

होता. यासंदर्भात समितीने विचारणा केली असता विभागीय सचिवांनी खुलासा केला की, सुकथनकर समितीच्या शिफारशीनुसार सन १९९३-९४ पासून आदिवासी लोकसंख्येच्या प्रमाणात निधी उपलब्ध करुन देण्याचे धोरण स्वीकारण्यात आले होते. सन २००५-०६ पासून हा दर ९ टक्के आहे.

२.३१ सन २००२-२००३ मध्ये नियतव्ययाची टक्केवारी १०.२६ होती. त्या नंतर सन २००३-२००४ मध्ये नियतव्यय ७.३३ झालेला आहे. याविषयी विभागीय सचिवानी खुलासा केला की, जेवढी मागणी केली जाते, त्याप्रमाणात निधी उपलब्ध होत नाही.

२.३२ योजनेसाठी अर्थसंकल्पीय तरतूद केली जाते. त्याकरिता नियमाप्रमाणे ९ टक्के अर्थसंकल्पीय तरतूद केली जाते. तरी देखील वित्त विभागाने कट लावलेला आहे काय ? सन २००४-२००५ मध्ये नियतव्ययाची टक्केवारी अतिशय कमी म्हणजेच ५.४८ टक्के आहे. योजनेकरिता वित्त विभागाकडून पैसे देण्यात आले नाही काय ? अशी समितीने विचारणा केली असता वित्त विभागाच्या सचिवानी खुलासा केला की, वित्त विभागाने पैसे दिलेले आहेत. याबाबत विभागीय सचिवानी खुलासा केला की, जेवढे वाटप दाखविण्यात आले होते, त्या प्रमाणात निधी उपलब्ध झाला नाही.

२.३३ सदर **वर्षी** नियतव्ययाची टक्केवारी एकूण अर्थसंल्पाच्या ५० टक्के होती काय ? अशी माहिती समितीने विचारले असता ही माहिती काढावी लागेल असे विभागीय सचिवांनी सांगितले. विभागांनी लक्ष्य केलेल्या लाभधारकांच्या समुहांची ओळख पटण्यासाठी सर्वेक्षण का करण्यात आले नाही ? यावर विभागीय सचिवांनी खुलासा केला की, सर्वेक्षण करण्याबाबत विभागाकडून सूचना देण्यात आल्या होत्या. सन १९९६-९७ पासून सर्व्हेक्षण झालेले नाही. मात्र लाभार्थ्यांना लाभ देण्यात आलेला आहे. आदिवासी संशोधन प्रशिक्षण संस्था यांना त्याबाबत सूचना देण्यात आल्या होत्या.

२.३४ आदिवासीकरीता उप योजना सुरु होऊन आता साधारणपणे १५ वर्षे झाली आहेत. मात्र अजूनही ही योजना १५ वर्षापूर्वीच्या आधारावर राबवली जात आहे अशी समितीने विचारणा केली असता नवीन सर्वेक्षण करण्यात येत असल्याची माहिती विभागीय सचिवांनी दिली.

२.३५ आदिवासी विकास विभागाला पुरेसा नियतव्यय उपलब्ध करुन दिलेला आहे. मात्र त्यापैकी किती रक्कम खर्च करण्यात आली आहे, याची माहिती देण्यात आलेली नाही ? असे

समितीने विचारले असता ही माहिती समितीला दोन दिवसात दिली जाईल. असे सचिवांनी आश्वासित केले व त्यानुसार विभागाकडून माहिती प्राप्त झाली आहे **(विवरणपत्र-१)**

२.३६ समितीने अशी विचारणा केली की, आदिवासी संशोधन प्रशिक्षण संस्था, पुणे यांना सर्वेक्षण करण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार त्यांनी काम सुरु केलेले आहे काय ? या संस्थेचे प्रमुख कोण आहेत ? सर्वेक्षण करण्याबाबत आदिवासी विभागाकडून त्यांना कधी सूचना देण्यात आली होती ? यावर विभागीय प्रतिनिधींनी माहिती दिली की, श्री.ए.के.झा हे या संस्थेचे प्रमुख असून जात पडताळणी समितीचे ते अध्यक्ष आहेत. दिनांक ८ जून रोजी आढावा घेतला व त्यानंतर सर्वेक्षण करण्याबाबत सूचना देण्यात आल्या. समितीने अशी विचारणा केली की, सर्वेक्षणाची काय पद्धत आहे ? किती वर्षानंतर सर्वेक्षण करावयाचे असते. त्यावर विभागीय सचिवांनी १० वर्षानंतर सर्वेक्षण केले जाते अशी माहिती दिली.

२.३७ आदिवासी संशोधन केंद्राच्या अधिकाऱ्यांना सूचना कधी दिल्या आणि त्यांनी सर्वेक्षण सुरु केले का, त्यांच्याकडे अर्थसंकल्पीय तरतूद आहे का, त्यांना तरतूद कमी पडत असेल तर शासनाने मदत केली का, याची माहिती त्यांच्याकडून घ्यावी. अशी समितीने विचारणा केली असता **विभागीय सचिवांनी त्यास सहमती दर्शविली तथापि अद्यापही समितीस माहिती प्राप्त नाही.**

२.३८ किती योजनांवर पैसे खर्च झाले आणि ते प्रत्यक्षात आदिवासींपर्यंत पोहोचले का या बाबतीत पाठपुरावा झाला का ? याबाबत विभागीय सचिवानी सांगितले की, ज्या विविध योजना आहेत त्यापैकी ५ योजनांचे मूल्यांकन आदिवासी संशोधन केंद्राकडून करुन घेणार आहोत. उदाहरणार्थ शिष्यवृत्ती योजना, ठक्करबाप्पा योजना अशा योजनांचे मूल्यांकन करण्यात येणार आहे. आदिवासींच्या आर्थिक परिस्थितीमध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी आदिवासी विकास महामंडळामार्फत शबरी योजना राबविण्यात येते.

२.३९ त्यावर समितीने अशी विचारणा केली की, आदिवासींची आर्थिक परिस्थिती उंचावणाऱ्या आणखी कोणत्या योजना राबविल्या आणि ज्या योजना आतापर्यंत राबविल्या त्याचा त्यांना प्रत्यक्षात फायदा झाला काय ? याबाबत सचिवानी सांगितले की, त्याचे सर्वेक्षण करुन घेणार आहोत.

२.४० आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे, यांनी यशदा, पुणे यांचेमार्फत या विभागाच्या १६ योजनांचे मुल्यमापन करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे. योजनेची यादी सोबत जोडली आहे.

आदिवासी उपयोजना "मागासवर्गीयांचे कल्याण" या उपविकास क्षेत्रांतर्गत आदिवासींचा आर्थिक स्तर उंचाविण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या जिल्हास्तरीय / राज्यस्तरीय योजनांची माहिती.

अ.क्र.	योजनेचे नाव
१.	मोटार वाहन चालक प्रशिक्षण केंद्र उघडणे/चालविणे.
२.	पूर्वसैनिक प्रशिक्षण केंद्र
३.	केंद्रवर्ती अर्थसंकल्प
४.	आदिवासी विकास महामंडळाला अर्थसहाय्य
५.	आदिवासी विकास महामंडळाला भागभांडवल पुरविणे
६.	शबरी वित्त व विकास महामंडळास भागभांडवल
७.	शबरी वित्त व विकास महामंडळास अर्थसहाय्य
८.	जनउत्कर्ष कार्यक्रम (बायफ संस्था)
९.	अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांना दुधाळ जनावरांचा (दोन गायी) पुरवठा करणे.
१०.	अनुसूचित जमातीच्या मुलामुलींसाठी विमान सेवेत हवाई सुंदरी प्रशिक्षण देणे.
११.	आदिम जमातीच्या विकासासाठी विविध योजना राबविणे.
१२.	महिला बचत गटाचे सशक्तीकरण करणे.
१३.	आदिवासी विकास विभाग (विशेष केंद्रीय सहाय्य)
१४.	आदिवासी विकास विभाग (अनुच्छेद २७५ (१))
	एकुण राज्यस्तरीय योजना
१५.	तेल इंजिनचा पुरवठा
१६.	अनुसूचित जमातीकरिता विद्युतपंप बसविणे
१७.	आदिवासी शेतकऱ्यांना पी.व्ही.सी./एच.डी.पी.ई.पाईप्सचा पुरवठा करणे.
१८.	आदिवासी महिलांच्या स्वयंसहाय्य गटास आर्थिक अनुदान

१९.	स्वाभिमान योजना
२०.	गावठाणांचा विकास व भूमिहीन व शेतमजुरांसाठी घराच्या जागेकरिता अनुदान
	एकूण जिल्हास्तरीय योजना

२.४१ प्रत्येक आदिवासी प्रकल्प कार्यालयाला प्रकल्प अधिकारी असताना सुद्धा बुलढाणा जिल्ह्यातील आदिवासींना योजना घेण्यासाठी २०० किलोमीटर अंतरावर अकोल्याला जावे लागत आहे बुलढाणा जिल्ह्यामध्ये ३ लाख लोकसंख्या आहे. त्या लोकांना २०० किलोमीटर अंतरावर अकोल्याला योजना घेण्यासाठी जावे लागते. त्यांच्याकडे यंत्रणा नाही. त्यांना योजनेच्या बाबतीत माहिती मिळत नाही. आदिवासींना योजनेचा लाभ मिळत नाही. ते परत येतात. आपण ज्या योजना राबवितो त्या योग्य प्रकारे चालू नाहीत त्यामुळे जाणूनबुजून सर्वेक्षण करीत नाहीत. कारण सर्वेक्षण केले तर प्रकरणे उघडसकीस येईल म्हणून सर्वेक्षण करीत नाहीत. अशी समितीने विचारणा केली असता विभागीय सचिवांनी खुलासा केला की, ज्या ठिकाणी आदिवासींची लोकसंख्या जास्त आहे त्या ठिकाणी आदिवासी प्रकल्प उभे केले आहेत व त्या ठिकाणी प्रकल्प अधिकारी आहेत. योजनांचे सर्वेक्षण करण्याबाबत सूचना केलेल्या आहेत. तथापि, योजनांचे सर्वेक्षण करण्याबाबत सचिवांनी सूचना केलेली असली तरी अंमलबाजवणी होत नाही असे मत समितीने व्यक्त केले. तसेच आदिवासी विकास विभागाची प्रत्येक जिल्ह्याला अंमलबजावणी यंत्रणा नाही. तर तीन-चार जिल्ह्यांना मिळून एक प्रकल्प अधिकारी असतो. यासंदर्भात समितीने विचारणा केली असता विभागीय सचिवांनी असा खुलासा केला की, अकोला जिल्ह्यामध्ये जास्त आदिवासी आहेत. ज्या ठिकाणी जास्त आदिवासींची लोकसंख्या जास्त असेल त्याच ठिकाणी प्रकल्प तयार करतो. भंडारा, दिग्रस, धुळे, कळमनुरी, सोलापूर इत्यादी ठिकाणी नवीन प्रकल्प कार्यालय सुरु करण्याबाबत सातत्याने मागण्या करण्यात येत आहेत. त्यानुसार सद्य:स्थितीत आदिवासी विकास विभागात सध्या कार्यरत असलेल्या २४ एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयांचे भौगौलिक स्थान विचारात घेऊन बहुसंख्य आदिवासी लोकसंख्येच्या सोयीच्या दृष्टीने नवीन प्रकल्प कार्यालय सुरु करण्याबाबतचा सर्वंकष एकत्रित प्रस्ताव नवीन पदनिर्मितीचा प्रस्ताव आर्थिक तपशीलासह सादर करण्याच्या सुचना आयुक्त, आदिवासी विकास यांना दिनांक १७/६/२०११ च्या पत्रान्वये देण्यात आल्या आहेत. सदर प्रस्ताव अद्याप प्राप्त झाला नसल्याने दिनांक १२/९/२०११ रोजी पुन्हा स्मरणपत्र देण्यात आले असून याबाबत पाठपुरावा करण्यात येत आहे.

२.४२ ज्या योजना लोकांपर्यंत पोहोचत नाहीत त्यांच्या पर्यंत योजना पोहोचण्यासाठी विभागाला पुनर्रचना करावी लागेल. भंडारा जिल्ह्यात देवरी येथे प्रकल्प असून तेथे एकही प्रकल्प अधिकारी नाही. त्यामुळे शासनाने यंत्रणेमध्ये सुधारणा करावी. समाजकल्याण विभागाचे कार्यालय प्रत्येक जिल्हा पातळीवर असते पण आदिवासी विकास विभागाचे कार्यालय प्रत्येक जिल्ह्यात नसते. कोल्हापूर जिल्ह्यातील आदिवासींना योजनेचा लाभ मिळत नाही कारण त्या ठिकाणी आदिवासी विकास विभागाचे कार्यालय नसून त्यांचे कार्यालय पुणे जिल्ह्यात आहे. याबाबत सचिवांनी खुलासा केला की, अनुसूचित जातीचे लोक सगळ्या जिल्ह्यांमध्ये आहेत त्यामुळे प्रत्येक जिल्ह्यात समाजकल्याण विभागाचे कार्यालय आहे. आदिवासींची लोकसंख्या काही जिल्ह्यात फार कमी आहे. ज्या ठिकाणी आदिवासींची लोकसंख्या जास्त आहे त्या ठिकाणी प्रकल्प उभे करतो. गडचिरोली जिल्ह्यामध्ये आदिवासींची लोकसंख्या मोठ्या प्रमाणावर असल्यामुळे त्या ठिकाणी ३ प्रकल्प आहेत. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, बुलढाणा जिल्ह्यातील आदिवासी योजनेच्या लाभापासून वंचित आहेत. हिंगोली जिल्ह्यामध्ये सुद्धा अडचण आहे. यामध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता आहे. याबाबत सचिवानी खुलासा केला की, सर्वेक्षण झाल्यानंतर कोठे कोठे आवश्यकता आहे याचा विचार करण्यात येईल.

२.४३ शैक्षणिक संस्थांकडून घ्यावयाच्या उपयोगिता प्रमाणपत्रांवर लक्ष ठेवण्याकरीता काय कार्यपद्धती अवलंबविण्यात येते. कार्यालयात याबाबतचे अभिलेखे अद्ययावत ठेवण्यात आले आहेत काय? अशी समितीने विचारणा केली असता सचिवांनी खुलासा केला की, आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्र.आदिशि-१२०४/प्र.क्र.९/का.१२, दिनांक ९.८.२००४ अन्वये भारत सरकार शिष्यवृत्ती मंजूर करण्याचे अधिकार संबंधीत शिक्षण संस्था/महाविद्यालयांचे प्राचार्य यांना देण्यात आले आहेत. शिक्षण शुल्क परीक्षा शुल्क मंजूर करण्याचे अधिकार प्रकल्प अधिकारी यांना प्रदान केलेले आहेत. त्यानुसार शिक्षण संस्था/महाविद्यालयांना भारत सरकार शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत उपलब्ध करुन दिलेल्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र संबंधीत शैक्षणिक संस्थांकडून प्रकल्प कार्यालयास सादर केले जाते व प्रकल्प कार्यालयाकडून एकत्रित निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र अपर आयुक्त यांचे कार्यालयास सादर केले जाते. अपर आयुक्त यांचेकडील प्राप्त खर्च अहवाल व उपयोगिता प्रमाणपत्राचे आधारे आयुक्तालयाकडून केंद्र शासनाकडील निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनास सादर करण्यात येते.

२.४४ त्यासाठी नवीन व नुतनीकरण शिष्यवृत्ती अर्ज तसेच शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क अर्ज यांची नोंदवही महाविद्यालय स्तरावर ठेवण्यात येते. तसेच महाविद्यालयांना भारत सरकार शिष्यवृत्तीपोटी देण्यात येणारे तदर्थ अनुदान नोंदवही प्रकल्प कार्यालय स्तरावर ठेवण्यात येते.

२.४५ याबाबतचे अभिलेखे प्रकल्प कार्यालय स्तरावर ठेवण्यात आले आहेत व शासनाकडील प्रस्तुत मार्गदर्शक सुचनांप्रमाणे प्रकल्प स्तरावर शिष्यवृत्ती संदर्भात कार्यवाही/अंमलबजावणी करण्यात येत आहे.

अ) आदिवासी विद्यार्थ्यांकरीता असलेल्या वसतीगृहात मुलां/मुलींची स्वतंत्र निवास व्यवस्था करण्यात आली आहे काय? अशी समितीने विचारणा केली असता सचिवानी खुलासा केला की, शासकीय वसतीगृह आदिवासी विकास विभागांतर्गत आदिवासी मुलां/मुलींना उच्च शिक्षणाचा लाभ मिळावा या उद्देशाने गांव, तालुका, जिल्हा व महानगरांमध्ये शासकीय वसतीगृह सुरु करण्याची योजना सन १९८३-८४ मध्ये मंजुर करण्यात आली आहे. या योजनेतंर्गत मुलां करीता आणि मुलींकरीता स्वतंत्र वसतीगृह सुरु करण्यात आली आहे. सध्या राज्यात ४६६ शासकीय वसतीगृह कार्यरत असून त्यापैकी मुलींकरीता १९१ व मुलांकरीता २७५ वसतीगृह कार्यरत आहेत. त्याचा सविस्तर तपशील सोबत जोडला आहे. **(विवरणपत्र-२)**

ब) शासकीय आश्रमशाळा आदिवासी विकास विभागाद्वारे स्थानिक स्तरावरील आदिवासी मुलां/मुलींना प्राथमिक शिक्षण घेता यावे या उद्देशाने सन १९७२-७३ पासुन "आश्रमशाळा संकुल" योजना सुरु करण्यात आली आहे. सद्या राज्यात ५५२ शासकीय आश्रमशाळा कार्यरत असुन त्यापैकी ४४४ शासकीय आश्रमशाळांना इमारत बांधकामाकरीता जमिन उपलब्ध आहे. २८३ शासकीय आश्रमशाळांचे टप्पा-१ चे बांधकाम पुर्ण झालेले असुन ४८ शासकीय आश्रमशाळांचे इमारत बांधकाम सुरु आहे.

२.४६ शासन निर्णय क्र.एएससी-१६९२/३२७७/प्र.क्र.२०६८/दि.१४.१२.१९९४ अन्वये मंजुर केलेल्या शासकीय आश्रमशाळा इमारत बांधकाम आराखड्यामध्ये मुलींकरीता स्वतंत्र वसतीगृह इमारतीची तरतुद अंतर्भुत आहे मुलांकरीता मात्र स्वतंत्र वसतीगृह इमारत बांधकाम अंतर्भुत नसल्याने वर्गखोल्यांमध्येच निवास व्यवस्था करण्यात येत आहे.

२.४७ शासन निर्णय क्र.शाआशा-१००५/प्र.क्र.०२/का-१७/दि.२.१.२००७ अन्वये शासकीय आश्रमशाळा इमारत बांधकामाचा स्वतंत्र आराखडा व ढोबळ अंदाजपत्रक मंजुर करण्यात आले

असुन या आराखड्यामध्ये विद्यार्थ्यांकरीता अद्ययावत सोयी सुविधांसह मुलां/मुलींकरीता स्वतंत्र निवास व्यवस्थेची सोय (वसतीगृह) उपलब्ध करुन दिलेली आहे.

२.४८ नवीन आराखड्यानुसार सन २०१०-११ मध्ये ज्या १०४ शासकीय आश्रमशाळा इमारतीचे बांधकाम सुरु करण्यात येणार आहे. त्यामध्ये मुलां/मुलींकरीता स्वतंत्र वसतीगृह इमारतीचे बांधकाम अंतर्भुत आहे.

२.४९ जुन्या टाईप प्लॅन प्रमाणे बांधकाम झालेल्या आश्रमशाळांमध्ये नव्याने मंजुर करण्यात आलेल्या टाईप प्लॅन मधील अन्य घटक इमारती बांधकामास प्राधान्य देण्यात येत असुन त्यामध्ये मुलांकरीता स्वतंत्र वसतीगृह बांधकाम अंतर्भुत आहे.

२.५० ज्या १९८ वसतीगृहांना जमिन प्राप्त झालेली आहे त्यांच्या बांधकामाची सद्य:स्थिती काय आहे अशी समितीने विचारणा केली असता सचिवांनी खुलासा केला की, राज्यात एकुण ४६६ मुलां/मुलींचे शासकीय वसतीगृहे मंजुर असुन १९८ वसतीगृहांना जमिन प्राप्त आहे पैकी ८४ वसतीगृहांचे बांधकाम पुर्ण झाले असुन ६० वसतीगृहांचे बांधकाम सुरु करण्यात आलेले आहे. उर्वरीत ५४ वसतिगृहांचे इमारत बांधकाम करणे आवश्यक असलेल्या वसतीगृहांपैकी ९ वसतीगृहाचे अंदाजपत्रके प्राप्त झाली असून उर्वरीत ४५ वसतीगृहांचे इमारत, बांधकामाची अंदाजपत्रके तयार करुन सादर करणे बाबत संबंधीत प्रकल्प अधिकारी, कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम यांना कळविले आहे ती प्राप्त होताच प्रशासकीय मान्यतेसाठी शासनास सादर करण्यात येतील.

२.५१ जमिन प्राप्त नसलेल्या २६८ वसतीगृहांना १०० टक्के जमिन प्राप्त करण्याचे उद्दिष्ट आहे. त्यानुसार प्रथम शासकीय जमिन, वनजमिन, प्राप्त करुन घेण्याकरीता जिल्हाधिकारी यांचेकडे पाठपुरावा करण्याचे निर्देश क्षेत्रातील कार्यालयांना दिले आहेत. शासकीय जमिन उपलब्ध नसल्यास शासन निर्णय क्र.जमिन-२००९/प्र.क्र.६५/का.१३/दिनांक ३१.८.२००९ अन्वये शासकीय वसतीगृहांसाठी खाजगी जमिन खरेदी करण्याकरीता प्रकरणपरत्वे आयुक्त, अपर आयुक्त व प्रकल्प अधिकारी यांना अधिकार प्रदान केलेले आहेत. त्यानुसार जमिन खरेदीची कार्यवाही सुरु आहे.

२.५२ शासकीय वसतीगृहांसाठी शासकीय जमिन, वनजमिन तसेच खाजगी जमिन उपलब्ध न झाल्यास तयार इमारत खरेदी करण्याबाबत आयुक्तालयाचे परिपत्रक क्र.इमारत-२००९/प्र.क्र.२/का.८(१) /दिनांक १४.२.२०११ अन्वये अपर आयुक्त, प्रकल्प अधिकारी यांना

निर्देश दिलेले आहेत. एवढे करुनही आश्रमशाळा अथवा वसतिगृह इमारत बांधकामास जमिन न मिळाल्यास आश्रमशाळा व वसतिगृहासाठी जी जमिन आवश्यक आहे अशा जमिनीच्या संपादनाचे प्रस्ताव तयार करुन जिल्हाधिकारी यांना पाठवून मार्च, २०१२ अखेर निवाडा होईल अशा पद्धतीने पाठपुरावा करण्याचे निर्देश दिले आहेत.

२.५३ सन १९९१ च्या जणगणनेच्यानुसार राज्यात किती आश्रमशाळांची आवश्यकता होती व प्रत्यक्षात किती आश्रमशाळा सुरु करण्यात आल्या याबाबत सद्य:स्थिती द्यावी अशी समितीने विचारणा केली असता सचिवानी खुलासा केला की, सन १९९१ च्या जनगणनेनुसार आदिवासी लोकसंख्या विचारात घेऊन सन २००२-०३ ते २००७-०८ या कालावधीतील मंजूर बृहत आराखड्यानुसार राज्यात आदिवासीकरीता एकूण १२४० शासकीय तसेच अनुदानीत आश्रमशाळांची आवश्यकता होती. आजमितीस शासकीय तसेच अनुदानित आश्रमशाळा ५५२ व अनुदानित आश्रमशाळा ५५६ अशा एकूण ११०८ आश्रमशाळा सुरु आहेत.

२.५४ केंद्र/राज्य शासनाकडून आवश्यक तेवढा निधी/जमीन उपलब्ध करुन दिली असतांना आश्रमशाळेचे बांधकाम न होण्याची कारणे काय आहेत. याबाबत सचिवांनी खुलासा केला की, काम पूर्ण न होण्याची कारणे पुढीलप्रमाणे आहेत.

१. आदिवासी विकास विभागाकडे किंवा आयुक्तालयात बांधकामाच्या संनियत्रणासाठी तांत्रिक मनुष्यबळ उपलब्ध नाही.

२. केंद्र/राज्य शासनाकडून प्राप्त इमारत बांधकाम/दुरुस्तीसाठीचा निधी सार्वजनिक बांधकाम विभाग महाराष्ट्र शासन यांच्याकडे वर्ग केला जातो.

३. बांधकामांना प्रशासकीय मान्यता आदिवासी विकास विभागामार्फत दिली जाते तांत्रिक मान्यता व बांधकामाची पुढील कार्यवाही सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत केली जाते. बांधकामाचा निधी वर्ग केल्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागाकडून अपेक्षित गतीने काम होत नाही.

२.५५ जमिन नसणाऱ्या १११ आश्रमशाळांना जमिन उपलब्ध बाबतची सद्य:स्थिती काय आहे. याबाबत सचिवानी खुलासा केला की, जमिन अप्राप्त असलेल्या १११ शासकीय आश्रमशाळांपैकी नाशिक (इंग्रजी), (नाशिक) करंजुल (कळवण), माळोद (यावल) कळंबे, आमगांव, ऐना, ओझर, धानवळ (जव्हार), हिरापूर (देवरी) कोसरी व माळेवाडा (गडचिरोली) या ११ शासकीय आश्रमशाळांना जमिन प्राप्त झालेली आहे. उर्वरीत १०० शासकीय

आश्रमशाळांसाठी महसुल व वन विभागाकडून जमिनीची मागणी करण्यात आली आहे तसेच खाजगी जमिन खरेदीची कार्यवाही करण्यात येत आहे. १०० शासकीय आश्रमशाळांच्या जमिन अप्राप्त याबाबतची माहिती सोबत जोडण्यात आली आहे. **(विवरणपत्र-३)**

२.५६ शिष्यवृत्तीच्या बाबतीत सुधारणा करण्याची कार्यवाही चालू आहे. ई-स्कॉलरशीप पद्धतीने शिष्यवृत्ती देणार आहोत. विद्यार्थ्यांचे बँकेत खाते उघडणार आणि त्या खात्यावर शिष्यवृत्ती जमा होणार. सामाजिक न्याय विभागाने अशी योजना कार्यान्वित केली आहे आणि त्यामुळे त्या विभागाचे २०० ते ३०० कोटी रुपये वाचलेले आहेत. बरेच विद्यार्थी पटावर नसताना पैसे देण्यात येत होते. सामाजिक न्याय विभागाप्रमाणे आम्ही शिष्यवृत्ती योजना राबविणार आहोत.

२.५७ ई-स्कॉलरशीप बाबत समितीने अशी विचारणा केली की, आदिवासी लोक दुर्गम भागात राहतात. त्या ठिकाणी ८०-८० किलोमीटरवर बँक नसते. याबाबत सचिवानी खुलासा केला की, ज्या ठिकाणी जवळपास सुविधा उपलब्ध असेल त्या ठिकाणी ही योजना चालू करता येईल. त्यावर समितीने असे मत व्यक्त केले की, ही आदिवासी विकास विभागाची योजना आहे की समाजकल्याण विभागाची आहे ? समाजकल्याण विभागामार्फत अनुसूचित जाती, इतर मागासवर्ग यांच्यासाठी योजना राबविली जाते. काही ठिकाणी चांगल्या पध्दतीने योजना राबविली जाते. आदिवासी विकास विभागाचा निधी वेगळा आहे. शाळेत चांगली उपस्थिती राहावी म्हणून विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती तसेच प्रोत्साहन भत्ता देण्याची योजना राबविली जाते. या योजना समाजकल्याण विभाग राबविते की आदिवासी विकास विभाग राबविते ? याबाबत सचिवानी खुलासा केला की, शिष्यवृत्तीच्या बाबतीत प्री-मॅट्रिक आणि पोस्ट-मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना आहे. सामाजिक न्याय विभागामार्फत अनुसूचित जाती, इतर मागासवर्ग तसेच विमुक्त जाती व भटक्या जमाती यांच्यासाठी योजना राबविली जाते. त्यासाठी अर्थसंकल्पामध्ये तरतूद केली जाते. आदिवासींसाठी आदिवासी विकास विभागामार्फत योजना राबविली जाते.

२.५८ समितीने अशी विचारणा केली की, शैक्षणिक व्यतिरिक्त आदिवासींच्या सर्वंकष विकासाच्या चार पाच महत्वाच्या योजना कोणत्या आहेत ? याबाबत सचिवांनी खुलासा केला की, शासकीय आश्रमशाळा, वसतिगृहे, घरकुल योजना, ठक्करबाप्पा योजना अशा काही

योजना आहेत. ठक्करबाप्पा योजना ही दलित वस्ती सुधार योजनेसारखी आहे. न्युक्लिअस बजेटमधून त्यासाठी तरतूद केली जाते.

२.५९ आदिवासी विकास विभागाचे आणि सामाजिक न्याय विभागाचे निकष सारखेच आहेत का ? अशी समितीने विचारणा केली असता सचिवांनी खुलासा केला की, याबाबतचे निकष ठरलेले आहेत. जे दारिद्र्य रेषेखालील आहेत, जे प्रिमिटिव ट्राईब्स आहेत, जे गरजू लोक आहेत त्यांना लाभ देतो.

२.६० महाराष्ट्रात पीटीजीमध्ये कोणकोणत्या आदिवासी जमाती आहेत ? याबाबत सचिवांनी खुलासा केला की, महाराष्ट्रामध्ये कातकरी, कोलाम, माडिया जमाती आहेत. आश्रमशाळांच्या बाबतीत मुख्य सचिवांनी आढावा घेऊन सूचना केल्या होत्या. शासकीय आश्रमशाळा ५५२ आहेत. या ५५२ शासकीय आश्रमशाळांपैकी ४४१ ठिकाणी जमीन प्राप्त झालेली आहे.

२.६१ खाजगी संस्थांमार्फत ज्या आश्रमशाळा चालविल्या जातात त्यांचे लेखापरिक्षण तसेच त्या संस्थेला पैसे देण्यापूर्वी आदिवासी विद्यार्थ्यांना ज्या सुविधा उपलब्ध करुन द्यावयाच्या आहेत त्या बाबत पर्यवेक्षण केले जाते का ? असे समितीने विचारले असता सचिवांनी होकारार्थी उत्तर दिले व १०० टक्के सुपरव्हीजन केले जात असून या बाबत मोहिम राबविली होती अशी समितीला माहिती दिली. मध्यंतरी सोयी नसल्यामुळे काही शाळा रद्द केल्या. त्यातील किती शाळा पुनःस्थापित केल्या ? अशी समितीने विचारणा केली असता सचिवांनी खुलासा केला की, जिल्हाधिकाऱ्यांमार्फत जी तपासणी केली त्यामध्ये ५९ आश्रमशाळा निकष पूर्ण करणाऱ्या नव्हत्या. त्यापैकी पुनःस्थापित केलेल्या शाळांची माहिती सचिवांकडे उपलब्ध नव्हती. यासंदर्भात विभागीय सचिवांनी खुलासा केला की, परवानगी रद्द केलेल्या ५९ आश्रमशाळांपैकी बऱ्याच आश्रमशाळा अपिलात गेलेल्या आहेत. काही आश्रमशाळांना त्रुटींची पूर्तता करण्यासाठी वेळ दिला आहे. त्यावर, आश्रमशाळांच्या तपासणीच्या घटनेला ३-४ महिन्यांचा कालावधी होऊन गेला आहे. साक्षीच्या वेळी विभागीय सचिवांनी इत्यंभूत माहिती घेऊन उपस्थित राहणे गरजेचे होते. खात्याकडे असलेल्या तपासणी यंत्रणेमार्फत आश्रमशाळांची तपासणी केली असता, त्यावेळी संबंधितांना त्रुटी आढळून आल्या नाहीत. मात्र जिल्हाधिकारी कार्यालयाने यासंबंधी तपासणी केल्यानंतर त्यांना आश्रमशाळेमध्ये अनेक त्रुटी आढळून आल्या. याबाबत समितीने नाराजी व्यक्त केली.

२.६२ मंत्री पातळीवर स्थगिती देऊन, काही आश्रमशाळा पुन्हा सुरु झाल्या आहेत. ५९ आश्रमशाळांचे अनुदान रद्द केल्यानंतर, त्यांनी अपील केले. **त्यानंतर किती दिवसांच्या कालावधीत त्या आश्रमशाळांना परवानगी देण्यात आली व अजून किती आश्रमशाळा बंद आहेत, यासंबंधीची सविस्तर माहिती सादर करण्याचे विभागीय सचिवांनी आश्वासित करुनही समितीला अद्याप माहिती प्राप्त झाली नाही.**

२.६३ सदर आश्रमशाळांची परवानगी रद्द केल्यानंतर तेथे असलेल्या विद्यार्थ्यांच्या संदर्भात कोणती कार्यवाही केली ? असे समितीने विचारले असता सचिवांनी खुलासा केला की, तेथील विद्यार्थ्यांचे बाजूला असलेल्या आश्रमशाळांमध्ये समायोजन केलेले आहे. त्यावर समितीने पुन्हा विचारणा केली की, एका आश्रमशाळेत साधारणपणे ४०० ते ५०० विद्यार्थी असतात, त्यांचे इतरत्र समायोजन करणे, शक्य नाही समितीचे असे मत आहे की, विभागाने त्यांचे कागदोपत्री समायोजन केलेले असते. मात्र प्रत्यक्षात कोणतीही कार्यवाही झालेली नसते.

२.६४ नाशिक विभागात आश्रमशाळांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. तेथील आश्रमशाळांच्या संदर्भात समितीला खुलासा करण्यात आला आहे की, नाशिक विभागात असलेल्या आश्रमशाळांच्या संदर्भात काही गंभीर व किरकोळ स्वरुपाच्या त्रुटी होत्या. त्यात स्वच्छतागृहाची व्यवस्था नसणे ही मुख्य बाब होती.

२.६५ नाशिक विभागात गेल्या ७-८ महिन्यापूर्वी मॉलमध्ये वसतिगृह सुरु केले असल्यासंबंधी सभागृहात प्रश्न उपस्थित झाला होता. याबाबत समितीने अशी नाराजी व्यक्त केली की, संबंधित अधिकारी समितीला मोघम स्वरुपात उत्तर देत आहेत. ही बाब योग्य नाही. ५९ आश्रमशाळांच्या संदर्भातील आकडेवारी समितीला दिलेली नाही. तसेच ज्या आश्रमशाळांची मान्यता रद्द करण्यात आली, त्या संदर्भात १०० टक्के आश्रमशाळा बोगस असल्याचे न्यायालयात प्रतिज्ञापत्र सादर करण्यात आले होते. परंतु वस्तुस्थिती अशी आहे की, लहानसहान कारणांमुळे सदर आश्रमशाळांच्या मान्यता रद्द करण्यात आल्या. परिणामी मान्यता रद्द केलेल्या आश्रमशाळांची संख्या वाढली. खाजगी आश्रमशाळा नव्हे तर शासकीय आश्रमशाळा निकृष्ट दर्जाच्या आहेत. विशेषकरुन आदिवासी विद्यार्थ्यांच्या शिक्षणासंबंधी ज्या गंभीरतेने विचार करावयास पाहिजे, तसा विचार केला जात नाही. ३५ ते ४० टक्क्यांनी जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना पास करुन निकालाची टक्केवारी वाढविली जाते. अनेक आश्रमशाळांमध्ये शिक्षक नाहीत, इमारती नाहीत. ही वस्तुस्थिती आहे. याबाबत सचिवांनी

खुलासा केला की, काही आश्रमशाळांमधील निकाल ८० टक्क्यांपेक्षा जास्त आहेत. एका आश्रमशाळेत १०० टक्के निकाल लागलेला आहे. त्यात १७ मुलांना ७५ टक्क्यांपेक्षा जास्त व ८ मुलांना ६० टक्क्यांपेक्षा जास्त गुण मिळालेले आहेत. यावर समितीने अशी विचारणा केली की, समितीला परिणामासंबंधी नव्हे तर दर्जासंबंधी माहिती द्यावी. तसेच आदिवासी विकास विभागाला गेल्या वर्षी व यावर्षी किती नियतव्यय मिळाला होता ? याबाबत सचिवानी खुलासा केला की, आदिवासी विकास विभागाला गेल्या वर्षी ३०२० कोटी रुपयांचा नियतव्यय मिळाला होता त्यापैकी २३२२ कोटी रुपये खर्च झालेले आहेत. तसेच यावर्षी ३६९० कोटी रुपयांचा नियतव्यय प्राप्त झाला असून त्यापैकी ५६६ कोटी रुपये आदिवासी विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी आहेत.

२.६६ आदिवासी विकास विभागासाठी अर्थसंकल्पीय तरतूद असते. त्यामुळे आदिवासी विकास विभागाने चांगल्या योजना आखून लाभार्थ्यांना शिक्षणाच्या जास्तीत जास्त सोयीसुविधा उपलब्ध करुन देणे गरजेचे आहे. परंतु खात्यातील गैरकारभारामुळे काही प्रमाणात भ्रष्टाचार वाढला आहे. त्यामुळे खऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांना शिक्षणापासून वंचित राहावे लागत आहे, ही वस्तुस्थिती आहे. राज्यात १९७६ पासून आदिवासी विद्यार्थ्यांसाठी आश्रमशाळा सुरु झाल्या. परंतु त्यासंबंधी नियोजन व्यवस्थितपणे केले जात नाही. अनेक आश्रमशाळांमध्ये पंखे नसतात, तेथे विजेच्या तारा लोंबकळत असतात. अशा प्रकारे १९७६ पासून आदिवासी आश्रमशाळा आहे त्याच अवस्थेत आहेत, त्यांच्यात फार सुधारणा झालेली नाही. असे मत समितीने व्यक्त केले असता सचिवांनी खुलासा केला की, सन २००६-०७ पासून नवीन आकृतिबंध सुरु झाला आहे. त्यानुसार शासकीय आश्रमशाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची आणि त्यांच्या राहण्याची व्यवस्था वेगवेगळ्या ठिकाणी केलेली असते. घोडेगाव येथे २.५० कोटी रुपये खर्च केलेले असून चांगली आश्रमशाळा बांधलेली आहे. तेथे मी स्वतः भेट दिली आहे.

२.६७ काही आश्रमशाळांमध्ये शिक्षणाची व राहण्याची व्यवस्था वेगवेगळी केलेली आहे. त्याच संदर्भात गडचिरोली प्रकल्पासंबंधी समितीला माहिती द्यावी. यावर सचिवांनी असे सांगितले की, प्रकल्पनिहाय माहिती उपलब्ध नाही. एकूण ५५२ शासकीय आश्रमशाळा आहेत. त्यापैकी ४४१ आश्रमशाळांसाठी जमीन प्राप्त झाली आहे. ४४१ पैकी ९५ आश्रमशाळांची कामे पूर्ण झाली आहेत. टप्पा क्र.१ पूर्ण झाला असून टप्पा क्र.२ मध्ये १८१ आश्रमशाळा आहेत.

त्यात ५८ पैकी २० कामे पूर्ण झाली आहेत. या संदर्भात दर महिन्याला आढावा घेतला जातो. तसेच १११ आश्रमशाळांना जमिनी प्राप्त झालेल्या नाहीत.

२.६८ समितीने अशी विचारणा केली की, प्रशासकीय मान्यता मिळालेली असतांनासुद्धा आश्रमशाळांची कामे सुरु झाली नाहीत अशी काही प्रकरणे आहेत का ? याबाबत सचिवांनी असा खुलासा केला की, काही ठिकाणी आश्रमशाळांसाठी जागा उपलब्ध नाहीत, त्यासंबंधी न्यायालयात दावे सुरु आहेत. **यासंदर्भात पाठविण्यात आलेल्या पत्रांची माहिती समितीला सादर करण्यात यावी अशी सूचना करुनही समितीस माहिती प्राप्त झाली नाही.**

२.६९ आदिवासी विद्यार्थ्यांच्या तुलनेत राज्यात असलेल्या आश्रमशाळांची संख्या पुरेशी आहे का ? तसेच आदिवासी विकास विभागामार्फत आदिवासी विद्यार्थ्यांसाठी वेगवेगळ्या ठिकाणी आश्रमशाळा काढल्या जातात. परंतु घोडेगाव, जुन्नर तसेच नारायणगाव येथील आदिवासी आश्रमशाळांमध्ये आवश्यक त्या प्रमाणात आदिवासी विद्यार्थी उपलब्ध होत नाहीत. त्या ठिकाणी त्याच भागातील दुसऱ्या संवर्गातील विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो का ? यावर विभागाने खुलासा केला की, ज्या ठिकाणी आदिवासी विदयार्थी उपलब्ध होत नाहीत त्या ठिकाणी इतर संवर्गातील मुलांना डे-स्कॉलरमध्ये प्रवेश दिला जातो. तसेच सामाजिक न्याय विभागाच्या संदर्भात आदिवासी आश्रमशाळेत प्रवेश देताना ८० टक्के आरक्षण त्याच संवर्गासाठी व उर्वरित २० टक्क्यांमध्ये अनुसूचीत जाती, इतर मागासवर्गीय, विमुक्त जाती व भटक्या जमाती तसेच खुल्या संवर्गातील विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो. आदिवासींची मुले कमी असतात, त्या ठिकाणी इतर संवर्गातील मुले घेतली जातात. परंतु त्यांच्या टक्केवारीचे प्रमाण अतिशय कमी आहे.

२.७० समितीने अशी विचारणा केली की, आदिवासी विद्यार्थ्यांना भारतीय प्रशासकीय सेवा संदर्भात प्रशिक्षण देणे, तसेच आदिवासी विद्यार्थींनीसाठी "हवाई सुंदरी" चे प्रशिक्षण देण्यासंबंधी योजना होत्या, त्यासंबंधी पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली ? यावर सचिवानी खुलासा केला की, "हवाई सुंदरी" च्या संदर्भात काही आदिवासी मुलींना प्रशिक्षण देण्यात आले होते. परंतु त्यासंबंधीची सविस्तर माहिती विभागाकडे उपलब्ध नाही. परंतु सदर योजना यशस्वी होऊ शकली नाही.

२.७१ यावर समितीने असे मत व्यक्त केले की, राज्यात "हवाई सुंदरी"च्या संदर्भात दोन वर्षे योजना सुरु होती. परंतु त्या योजनेतंर्गत एकही आदिवासी मुलगी हवाई सुंदरी होऊ

शकली नाही. हवाई सुंदरीच्या प्रशिक्षणासाठी बारावी उत्तीर्ण असायला पाहिजे अशी अट होती. मात्र प्रत्यक्षात हवाई सुंदरीच्या प्रशिक्षणासाठी उमेदवार पदवीधर असणे अत्यावश्यक आहे. त्यामुळे ज्या मुली या योजनेत सहभागी झाल्या होत्या, त्या हवाई सुंदरी होऊ शकल्या नाहीत, सदर योजनेत आदिवासी विद्यार्थींनी सहभागी झाल्या होत्या. म्हणून त्यांना इयत्ता बारावी नंतर डी.एड. कोर्स करता आला नाही. त्यामुळे त्यांना शिक्षक सुध्दा होता आले नाही. शिवाय जात पडताळणी करीत असताना डीएनए टेस्टचा मुद्या उपस्थित झाला होता. कोणतीही योजना असो, ती प्रॅक्टीकली फिजीबल असणे अत्यावश्यक आहे. परंतु योजना तयार करीत असताना, त्यात विद्यार्थ्यांना नव्हे तर शैक्षणिक संस्थांना फायदा कसा होईल याचा जास्त विचार केला जातो. त्यात आदिवासी विद्यार्थी हा मूळ उद्देश असल्याचे दिसून येत नाही.

२.७२ याप्रकरणी सचिवांनी योजना सुधारित करण्याबाबत समितीला आश्वासित केले. यावर समितीने असे सुचित केले की, आदिवासीसाठींच्या काही योजना बंद पडल्या असतील, त्यात काही त्रुटी असतील तर त्या दूर करुन पुन्हा सुरु कराव्यात.

२.७३ आदिवासींना गॅस सिलेंडर देण्याची योजना सुरु आहे. परंतु त्यांच्या तेथे रिफिलिंगचे केंद्र उपलब्ध नाही. तसेच शासनाने आदिवासींना गाई-म्हशी देण्याची योजना सुरु केली होती ती योजना आत बंद केली आहे. त्याचे कारण असे की, बाजारात गाई विकण्यासाठी आणल्या जातात. त्या गाईला एक इंजेक्शन दिले जाते, त्यानंतर ती गाय त्या दिवशी दहा लिटर दूध देते. दुसऱ्या दिवसापासून मात्र ती दूधच देत नाही. अशाप्रकारे लाभार्थ्यांची फसवणूक केली जाते म्हणून सदरहू योजना बंद झाली आहे. या प्रकरणाची सीबीआय चौकशी सुरु आहे काय? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी या प्रकरणाची सीबीआय चौकशी सुरु असल्याचे सांगितले.

२.७४ आदिवासी विकास विभागाचा अर्थसंकल्प, कर्मचारी वर्ग, आश्रमशाळा, लाभार्थ्यांसाठीच्या योजना, त्यावर किती खर्च करण्यात आला, त्याचा अनुपालन अहवाल, अशी एक सर्वंकष, सविस्तर टिप्पणी येत्या तीन आठवडयात समितीला द्यावी अशी सूचना करण्यात आली. टिप्पणी अशी सविस्तरपणे देण्यात यावी की, ती वाचल्यानंतर खात्यात काय चालले आहे हे समजले पाहिजे. समितीने आतापर्यंत आदिवासी विकास विभागाशी अनेक वेळा पत्रव्यवहार केलेला आहे हे बघितले तर विभागीय सचिवांच्या लक्षात येईल की, ज्यांनी कामात दिरंगाई केलेली आहे, त्यांच्यावर खात्यांतर्गत कारवाई करण्यात यावी. जे माहिती देत नाहीत,

सहकार्य करीत नाहीत, त्यांच्यावर जरुर कारवाई करावी. लेखापरिक्षक परिच्छेदासंदर्भात केलेली कारवाई, समितीने दिलेल्या प्रश्नावलीच्या अनुषंगाने सविस्तर टिप्पणी, खात्यामार्फत एखादे पुस्तक छापले असेल तर ते पुस्तक, अर्थसंकल्पामधील तरतुदीसह टिप्पणी समितीकडे पाठविण्यात यावी. आदिवासी विकास विभागाच्या कामकाजाबाबत समितीने नाराजी व्यक्त केली. महालेखाकार कार्यालयाच्या लेखा परिच्छेदासंदर्भात समितीच्या सन्माननीय सभासदांना चर्चा करावयाची होती. सभागृहात सन्माननीय सदस्यांना सविस्तर चर्चा करता येत नाही म्हणून या बैठकीत चर्चा करावयाची होती. समितीच्या बैठकीस अर्थ विभागाचे अधिकारी येथे उपस्थित आहेत. परंतु आदिवासी विकास विभागाकडून माहिती मिळाली नाही म्हणून समितीला हे सांगण्याची वेळ आज येऊन ठेपली आहे की, आदिवासी विकास विभागाच्या काही बाबींसदर्भात सविस्तर माहिती जाणुन घेण्यासाठी जुन्या अधिकाऱ्यांना बोलावून घेण्यात यावे तसेच जिल्हाधिकारी कार्यालयातील वेगवेगळ्या विभागातील अधिकारी यांचेबरोबर समन्वयासाठी बैठका घ्याव्यात. अशा बाबी समितीला विभागीय सचिवांना सांगाव्या लागतात, हे संयुक्तिक नसल्याचे मत समितीने व्यक्त केले. यासंदर्भातील सविस्तर टिपणी आदिवासी विभागाकडून प्राप्त झाली आहे. **(विवरणपत्र-४)**

२.७५ आदिवासींसाठी भारतीय प्रशासकीय सेवेचे प्रशिक्षण सुरु करता येईल का? अशी विचारणा समितीने केली असता त्यांस सचिवांनी मान्यता दर्शविली. सामाजिक न्याय विभागाच्या अनेक योजना असतात. परंतु त्यांच्याकडे कर्मचारी वर्ग नसल्यामुळे योजनांची अंमलबजावणी योग्य पद्धतीने होत नाही. यासंदर्भात सचिवांनी असा खुलासा केला की, योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी विभागाकडे विद्यमान कर्मचारी वर्ग मोठया प्रमाणात रिक्त आहे ही वस्तुस्थिती आहे. गट "क" मध्ये एकूण २४०९ पदे मंजूर असून त्यापैकी १३६४ पदे भरण्यात आली आहेत व १०४५ पदे रिक्त आहेत. जवळपास ५० टक्के पदे गट "क" मध्ये रिक्त आहेत व गट "ड" मध्ये २४७ पदे रिक्त आहेत. गट "क" मधील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही हाती घेण्यात आली असून त्यासाठी १५०० पदे ठोक वेतनावर भरली जाणार आहेत. ही पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे. त्यासाठी वर्तमानपत्रात जाहिरात देण्यात आली असून आतापर्यंत एकंदर २.५० लक्ष अर्ज प्राप्त झालेले आहेत. पदे भरण्याचे काम एमकेसीएलला देण्यात आले असून एमकेसीएल छाननी करीत आहे. तसेच गट "क" मधील ६८९ पदे

भरण्यासाठी वर्तमानपत्रात जाहिरात देण्यात आली असून यामध्ये ३९६ पदे ठोक वेतनावर अणि २९३ पदे नियमित आहेत.

२.७६ समितीने अशी विचारणा केली की, सामाजिक न्याय विभागाकडे ५० टक्के पदे रिक्त आहेत. नवीन योजना आलेल्या आहेत त्यामुळे त्यासाठी अतिरिक्त कर्मचाऱ्यांची गरज लागणार आहे. किती वर्षापासून ही पदे रिक्त आहेत ?याबाबत सचिवांनी खुलासा केला की, नवीन वसतिगृहे आणि आश्रमशाळेसाठी ३५०० पदांची आवश्यकता आहे. संपूर्ण राज्यात ५७ आश्रमशाळांचे बांधकाम पूर्ण झाले असून त्या सुरु होण्याच्या मार्गावर आहेत. परंतु केवळ ४५ आश्रमशाळांचीच पदे भरण्याची मंजुरी विभागाला मिळाली आहे. १०० वसतिगृहांपैकी ५७ वसतिगृहाचे काम पूर्ण झाले असून ७७ वसतिगृहांचे बांधकाम सुरु आहे. ज्या वसतिगृहांचे बांधकाम पूर्ण होऊन ती सुरु करावयाची आहेत तेथील कार्यभार मूळ कर्मचारी वर्गाकडे सोपवून या वसतिगृहांची कामे सुरु करण्यात आलेली आहेत.

२.७७ समितीने अशी विचारणा केली की, वसतिगृहांला लागणारी पदे भरण्याची मान्यता नियोजन विभागाने दिलेली आहे काय ? वसतिगृहाचे बांधकाम करावयाचे व त्यासाठी खर्च करावयाचा परंतु पदे भरावयाची नाहीत हे योग्य नसल्याचे समितीने मत व्यक्त केले. याबाबत विभागीय सचिवांनी असा खुलासा केला की, ज्या ठिकाणी इमारतीचे बांधकाम पूर्ण झालेले आहे त्या ठिकाणी वसतिगृहे सुरु करण्यात आलेली आहेत.

२.७८ वसतिगृहासाठी जेवढ्या प्रमाणात कर्मचारीवर्गाची आवश्यकता आहे. त्यास मान्यता मिळालेली नाही पदे भरण्याच्या संदर्भात विभागाने कार्यवाही सुरु करावयास हवी होती पणं् नियोजन नसल्यामुळे हे सर्व घडत आहे करोडो रुपये खर्च करुन वसतिगृहे आणि आश्रमशाळा बांधण्यात आल्या आहेत. परंतु, पुरेसा कर्मचारीवृंद नसल्यामुळे त्याचा काहीही उपयोग होत नाही एका वसतिगृहाच्या बांधकामासाठी किती खर्च येतो? याबाबत विभागीय सचिवांनी एका वसतिगृहासाठी साधारणत: 3 ते 3.५० कोटी रु.खर्च येत असल्याचे सांगितले. यासंदर्भात वित्त सचिवांनी मत व्यक्त केले की, पदांची निर्मिती आणि रिक्त पदे भरणे असा हा प्रश्न आहे. आपण जेव्हा नवीन योजना हाती घेतो तेव्हा त्यासाठी नियोजन केले जात असते. त्यासाठी लागणाऱ्या प्रशासनाला उच्चाधिकार समितीची मान्यता घ्यावयाची असते. सामाजिक न्याय विभागाने नवीन पदे मंजूर केली ती सुद्धा उच्चाधिकार समितीकडे जात असतात. सर्व पदे एकदम भरल्यानंतर पदोन्नतीच्या बाबतीत अडचणी निर्माण होतात. म्हणून ही पदे टप्प्या

टप्प्याने भरावीत असा निर्णय झालेला आहे. अशी रिक्त पदे भरण्याच्या संदर्भात सामान्य प्रशासन विभागाच्या प्रधान सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक उच्च स्तरीय समिती स्थापन करण्यात आली आहे.

२.७९ पदे भरण्याचा प्रस्ताव शासन स्थरावर प्रलंबित आहे काय, शासनाची मान्यता न मिळाल्यामुळे पदे भरली गेली नाही काय ? पदे भरण्याच्या संदर्भात विभागाने पाठपुरावा केलेला नाही. यावर सचिवांनी खुलासा केला की, वसतिगृहे आणि आश्रमशाळेसाठी लागणारी पदे भरण्याची मंजुरी उच्चाधिकार समितीकडून मिळालेली आहे, परंतु ही परवानगी केवळ ४५ आश्रमशाळेची पदे भरण्याच्या संदर्भातच मिळालेली आहे. एकूण वसतिगृहे आणि आश्रमशाळांपैकी ५७ वसतिगृहे आणि आश्रमशाळेची बांधकामे पूर्ण झाली असून ७७ आश्रमशाळांची बांधकामे सुरु करण्यात आलेली आहेत. ज्या आश्रमशाळा सुरु झाल्या तेथे आहे त्याच कर्मचाऱ्यांना अतिरिक्त कार्यभार देऊन सुरु करण्यात आलेल्या आहेत.

२.८० आश्रमशाळा आणि वसतिगृहांसाठी पदे भरली जात नसल्यामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होत आहे. खरे म्हणजे पदे भरण्याच्या संदर्भात नियोजन नसल्यामुळेच विद्यार्थ्यांचे नुकसान होत आहे. केवळ आश्रमशाळा आणि वसतिगृहे बांधून त्या खण्डहर करण्याचे काम सुरु आहे. जनतेच्या पैशाची लूट चालली आहे, असे मत समितीने व्यक्त केले असता सचिवांनी खुलासा केला की, पदे भरण्याची भरती प्रक्रिया सुरु करण्यात आलेली आहे. पदे लवकरात लवकर भरण्याचे निर्देश संचालक, समाज कल्याण यांना देण्यात आलेले आहेत. एमकेसीएल ऑक्टोबर महिन्यांपर्यंत परीक्षा घेणार असून परीक्षा झाल्यानंतर डिसेंबरपर्यंत मुलाखत घेऊन भरती प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल.

२.८१ पदे भरण्याच्या संदर्भात विभागाकडून पाठपुरावा कमी पडतो आहे त्यामुळे तात्काळ पाठपुरावा ठेवण्यात यावा. समन्वय साधून ही सर्व कामे करण्यात यावी. यासंदर्भात काही प्रश्न उपस्थित झाले तर मुख्य सचिवांचा सल्ला घ्यावा. केवळ पत्र लिहून कामे होत नाहीत तर बैठक घेऊन प्रश्न मार्गी लावले गेले पाहिजेत. तसेच जे कर्मचारी सेवानिवृत्त होत असतात त्यांची पदे सुद्धा रिक्त होणार आहेत त्यामुळे याकडे सुध्दा लक्ष देण्यात यावे. विभागातील पदोन्नतीची पदोन्नतीची प्रक्रिया आपण पूर्ण केली आहे काय ? अशी समितीने विचारणा केली असता विभागाने खुलासा केला की, पदोन्नतीची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. या महिन्यात बहुतेक पदे मंजूर होतील. यावर समितीने असे सूचित केले की, कालबद्ध कार्यक्रम

आखून कामे झाली पाहिजेत. आपण शासनाला बांधिल आहात. सर्व कामांसाठी आपल्याकडे निधी सुद्धा उपलब्ध आहे. पदे भरण्यासाठी विलंब झाला तर विद्यार्थ्यांचे नुकसान होईल. आपल्यामुळे मुलांचे जीवन उध्वस्त होणार नाही याकडे लक्ष असले पाहिजे. नाही तर वर्तमानपत्रातून आपले वाभाडे निघतच असतात. पदे भरण्याच्या संदर्भात मुख्य सचिवांना पत्र लिहा तसेच समिती सुद्धा यामध्ये लक्ष घालणार आहे. तसेच यासंदर्भात मुख्य सचिवांबरोबर समन्वय ठेवून रिक्त पदे भरण्याच्या संदर्भातील कार्यवाही करावी, अशी शिफारस समितीच्या वतीने देखील करण्यात येईल. पदोन्नतीची पदे भरल्यानंतर काही पदे रिक्त होतील.

२.८२ याबाबत वित्त सचिवानी खुलासा केला की, "क" व "ड" संवर्गातील पदे भरण्यासाठी जरी बंदी असली तरी अत्यावश्यक पदे भरण्याच्या बाबतीत प्रधान सचिव, सामान्य प्रशासन विभाग यांच्या अध्यक्षतेखाली एक उच्चाधिकार समिती नेमण्यात आली आहे. अशी अत्यावश्यक पदे भरण्याबाबतचे प्रस्ताव या समितीसमोर गेल्यानंतर त्यांना मंजुरी देण्यात येते. यावर सामाजिक न्याय सचिवांनी खुलासा केला की, उच्चाधिकार समितीकडून नवीन आश्रमशाळा व वसतिगृहासाठी सर्व आवश्यक पदे मंजूर करुन घेतली आहेत.

२.८३ पदोन्नतीने जी पदे भरली जातात त्यानंतर खालच्या जागा रिक्त होत असतात. सर्वात शेवटी "ड" वर्गाच्या जागा मोकळ्या राहतात. त्या पदांवर भरती बंदी असल्याने शासन त्यासाठी परवानगी देत नाही. पण राज्यातील आश्रमशाळा चालाव्यात, मुलांची गैरसोय होऊ नये म्हणून आपल्या विभागामार्फत सामान्य प्रशासन विभागाकडे प्रस्ताव पाठवून त्याचा पाठपुरावा केला आहे काय ? रिक्त जागा भरण्यासंबंधीचे प्रस्ताव तात्काळ सामान्य प्रशासन विभागाकडे पाठवावेत. तसेच जे संबंधित असतील त्यांना घेऊन मुख्य सचिवांबरोबर तात्काळ बैठक घ्यावी व रिक्त पदे ताबडतोब भरण्याची प्रक्रिया करावी आणि तसा अहवाल समितीला पाठवावा. असे समितीने विभागीय सचिवाना निर्देश दिले तसेच "क" व "ड" संवर्गातील पदे भरण्यासाठी बंदी घालण्याचे कारण काय ? अशी समितीने विचारणा केली असता विभागीय सचिवांना खुलासा केला की, काटकसरीचे धोरण आणि खर्चावर नियंत्रण आणण्यासाठी ही बंदी घालण्यात आली असून त्यातून काही पदे मात्र वगळण्यात आली आहेत. तसेच "क" व "ड" वर्गाची रिक्त पदे भरण्यासंदर्भात सामान्य प्रशासन विभागाकडे पाठविलेल्या प्रस्तावाबाबत पाठपुरावा केला असून तशी बैठक देखील झालेली आहे. त्यावर समितीने पुन्हा अशी विचारणा केली की, स्टाफिंग पॅटर्न मंजूर असताना त्याला कट लावण्याचे कारण काय आहे ? त्यावर

वित्त सचिवानी खुलासा केला की, रिक्त पदे सगळीच एकदम भरु नयेत असे शासनाचे धोरण आहे, त्यामुळे पदोन्नतीला अडचणी येतात. म्हणून या रिक्त पदांसंबंधीचा आढावा घेऊन नंतरच्या दोन तीन वर्षात ती पदे भरावीत असे शासनाचे धोरण आहे.

२.८४ समितीने अशी विचारणा केली की, राज्यात सामाजिक न्याय विभागाच्या अखत्यारित असलेल्या योजनांची अंमलबजावणी कशी झाली याचे उदाहरण म्हणून एखाद्या जिल्ह्यात १०० टक्के खर्च किंवा अंमलबजावणी झाली असेल तर त्याचे नाव व सविस्तर माहिती समितीला द्यावी. याबाबत सचिवानी खुलासा केला की, सन २००६ मध्ये जो निधी सामाजिक न्याय विभागासाठी होता त्यातून एकूण ९८.४३ कोटी इतका निधी खर्च झालेला आहे. यावर समितीने पुन्हा विचारणा केली की, कोणत्या जिल्ह्यात १०० टक्के रक्कम खर्च झाली याची माहिती समितीला **देण्याबाबत सांगितले असता, जिल्हानिहाय संख्या उपलब्ध नसल्याचे सांगून नंतर समितीला माहिती उपलब्ध करण्याचे आश्वासित करुनही अद्याप समितीला माहिती प्राप्त झाली नाही.**

२.८५ समितीने अशी विचारणा केली की, आदिवासी मुलांसाठी बांधण्यात येत असलेल्या वसतिगृहांचे निकष काय आहेत, कारण अनेक गावांतून अशी वसतिगृहे व आश्रमशाळा बांधल्या जातात व त्या ठिकाणी मुले शिक्षण घेण्यासाठी येतच नाहीत. म्हणून तालुक्याच्या ठिकाणी सुध्दा अशा प्रकारची वसतिगृहे किंवा आश्रमशाळा बांधणे आवश्यक आहे. याबाबत सचिवानी खुलासा केला की, तालुक्याच्या ठिकाणी सुद्धा सामाजिक न्याय विभागाची वसतिगृहे बांधलेली आहेत. तसेच काही ठिकाणी तर आता ५०० ते १००० मुलांच्या क्षमतेची वसतिगृहे बांधण्याचा शासन विचार करीत आहे.

२.८६ विभागाने "बार्टी" नावाच्या संस्थेला सर्व्हेक्षणाचे काम दिले आहे, त्या संस्थेच्या संदर्भात समितीला विस्तृत माहिती देण्यासंदर्भात समितीने सांगितले असता सचिवांनी अशी माहिती दिली की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन आणि प्रशिक्षण संस्था असे या "बार्टी" संस्थेचे नाव आहे. ही संस्था दोन वर्षापूर्वी राज्य शासनाच्या अखत्यारित होती पण आता तिला स्वायत्ततेचा दर्जा दिलेला आहे. तसेच यामध्ये संशोधन व प्रशिक्षण सुद्धा दिले जाते. ही संस्थाच हे सर्व्हेक्षणाचे काम करते. पण या संस्थेकडे एक संचालक, दोन प्राध्यापक आणि दोन सहयोगी प्राध्यापक व एक शिपाई असा अपुरा कर्मचारीवर्ग लक्षात घेता बार्टी "It will

create a lumb" च्या माध्यमातून हे सर्व्हेक्षणाचे काम करण्यात येत आहे. पण हे काम फार मोठे असल्याने यशदाच्या मदतीने पूर्ण करुन घेण्यात येत आहे.

२.८७ "बार्टी" या संस्थेला विद्यमान वर्षी २० कोटींची अर्थसंकल्पीय तरतूद केली आहे. याचा अर्थ कर्मचारी वर्ग कमी आणि खर्च मात्र भरपूर दिसतो. जर संस्था बाह्यमार्गाने (Out souring) काम करुन घेते तर त्या मानाने २०-२० कोटीचा खर्च जास्त वाटत नाही काय, या संस्थेची एकूण कार्यपद्धती कशी आहे ? **याबाबत सविस्तर माहिती समितीला देण्याचे विभागीय सचिवांनी आश्वासित करुनही विभागाकडून अद्याप समितीला माहिती प्राप्त झालेली नाही.**

२.८८ जिल्हास्तरीय विविध योजनांची अंमलबजावणी राज्यात किती जिल्ह्यांमध्ये करण्यात आली व त्याची टक्केवारी किती, तसेच या योजना यशस्वी होण्यासाठी काय उपाययोजना करण्यात आली ? याबाबत विभागाने खुलासा केला की, जसजसे प्रकल्प राबविण्याचे ठरले तसतशी जिल्हानिहाय तरतूद केली जाते.

२.८९ शासनाकडून येणारी एकूण रक्कम भागिले जिल्ह्यांची संख्या असा विचार केला तर प्रत्येक जिल्ह्याला लोकसंख्येच्या प्रमाणात जो निधी मिळतो त्याचा विनियोग योग्य प्रकारे केला जातो काय ? अशी समितीने विचारणा केली असता सन २००६ पासून प्रत्येक जिल्ह्यात किती निधी दिला व त्यातून किती खर्च झाला त्यासंबंधीची सविस्तर माहिती समितीला सादर करण्याचे सचिवांनी आश्वासित केले. तथापि, समितीने चालू वर्षासह दोन वर्षांची माहिती सादर करण्याबाबत सुचित केले असता त्यास सचिवानी सहमती दर्शविली. तथापि सदर माहिती विभागाकडून अद्यापही प्राप्त झाली नाही.

२.९० इयत्ता पाचवी ते सातवी मधील मुलींना शिष्यवृत्तीसाठी शाळांचे प्रस्ताव विहित मुदतीत सादर केले न जाण्यामागची कारणे काय आहेत ? **सदरची योजना समाज कल्याण अधिकारी गट-अ, जिल्हा परिषद यांच्यामार्फत राबविली जाते पण सर्व शाळांचे प्रस्ताव विहित मुदतीत सादर केले जात नसल्याने अनेकदा मंजूर तरतुदीपेक्षा कमी खर्च होतो असे स्पष्टीकरण दिलेले आहे. पण हे उत्तर समितीला मात्र संयुक्तीक वाटत नाही. कारण जिल्हा परिषदेच्या शिक्षण समितीचा सभापती किंवा मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे खाजगी शाळांचा कल अनुदान मागण्याचाच असतो. म्हणून या संपूर्ण योजनेची अंमलबजावणी कशी झाली याची माहिती समितीला सादर करावी. समितीला एकदम ९ वर्षांची माहिती न देता फक्त दोन वर्षांची माहिती समितीला द्यावी.**

२.९१ विद्यमान वर्षात २०.६२ कोटीची तरतूद केलेली असल्याचे सचिवांनी सांगितले. परंतु ही तरतूद योग्य ठिकाणी खर्च होते की नाही हे पाहणेच समितीचे आद्य कर्तव्य आहे, म्हणून उपरोक्त संदर्भातील माहिती समितीला द्यावी असे समितीने सांगितले असता त्यास सचिवांनी सहमती दर्शविली. सदरची माहिती समितीस प्राप्त झाली आहे.

२.९२ जिल्हास्तरावरील अधिकारी तरतुदी विहित कालावधीत समर्पित करीत नाहीत त्यामुळे त्याचे पुर्नविनियोजन करणे अशक्य होते. त्यामुळे खर्च कमी होतो. "नियमाने ही रक्कम ठेवता येत नाही तरी सुद्धा ही रक्कम तशीच ठेवण्यात येते त्यामुळे खात्याचा ताळेबंद राखता येत नाही. जे अधिकारी ही रक्कम ठेवून घेतात त्या अधिकाऱ्याविरुद्ध कारवाई करण्याचे अधिकार विभागाला आहेत काय ? अशी समितीने विचारणा केली असता सचिवांनी खुलासा केला की, ही जिल्हा परिषदेची योजना असून जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या नियंत्रणाखाली हे अधिकारी काम करीत आहेत. त्यामुळे त्यांच्याकडूनच ही कारवाई केली जाते.

२.९३ मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांमार्फत संबंधित अधिकाऱ्यांविरुद्ध कारवाई करावयाची असेल तर समिती तशा प्रकारची शिफारस करील. एखाद्या जिल्ह्याने पाच लाख रुपयाचे वाटप करावयास पाहिजे परंतु संबंधित अधिकाऱ्याने ही रक्कम वाटली नाही त्यामुळे ती रक्कम तशीच शिल्लक राहिली. ज्या जिल्ह्याच्या विद्यार्थ्यांनी रकमेची मागणी केलेली आहे आणि ज्या जिल्ह्याला या रकमेची गरज आहे त्या जिल्ह्याला रक्कम कमी पडल्यामुळे सर्वांना ती रक्कम देता येत नाही साहजिकच त्या जिल्ह्यातील विद्यार्थी या योजनेपासून वंचित राहतात याची अधिकाऱ्यांना जाणीव नाही. या बाबीकडे अधिकारी नेहमीच दुर्लक्ष करीत असतात त्यांना कोणीही विचारु शकत नाही **अधिकाऱ्यांनी जर वेळीच ही रक्कम समर्पित केली असती तर विद्यार्थ्यांना ती रक्कम मिळाली असती परंतु तसे झालेले नाही तेव्हा ज्या अधिकाऱ्यांनी रक्कम समर्पित केलेली नाही अशा अधिकाऱ्यांची यादी देणे शक्य होईल काय? अशी विचारणा समितीने केली असता, विभागीय सचिवांनी खुलासा केला की, ज्या अधिकाऱ्यांनी रक्कम समर्पित केलेली नाही. अशा अधिकाऱ्यांच्या नावाची यादी तयार करुन समितीला २ दिवसात देण्यात येईल. तथापि, अशा अधिकाऱ्यांची यादी देण्याचे आश्वासित करुनही समितीला अद्याप विभागाकडून माहिती प्राप्त झालेली नाही.**

२.९४ अस्वच्छ व्यवसायात काम करीत असलेल्या पालकांच्या मुलांना मॅट्रीक पूर्व शिष्यवृत्ती देण्याची एक योजना आहे. परंपरागत अस्वच्छ व्यवसायात उदा. सफाईगार. कातडी सोलणे या सारख्या व्यवसायात काम करणाऱ्या पालकांच्या मुलांना ही शिष्यवृत्ती दिली जाते. परंतु पालक अस्वच्छ व्यवसाय करीत असल्याचे प्रमाणपत्र दिले जात नाही त्यामुळे या पालकांच्या विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळत नाही. याविषयी समितीने विचारणा केली असता सचिवांनी खुलासा केला की, ग्रामीण भागात ग्रामसेवक आणि नागरी भागात नगरसेवक प्रमाणपत्र देण्यास सक्षम आहेत. नागरी भागात ही योजना असून त्याकरिता जातीची अट नाही. **नागरी भागामध्ये नगरसेवकांना अशा प्रकारचे प्रमाणपत्र देता येते असे सचिवांनी मान्य केले व त्यासंबंधीच्या परिपत्रकाची प्रत देण्याचे आश्वासित करुनही अद्याप समितीला माहिती प्राप्त झाली नाही.** ग्रामीण भागात सरपंच किंवा ग्रामपंचायतीचे सदस्य प्रमाणपत्र का देऊ शकत नाही ? ग्रामीण भागात ग्रामसेवक आणि नागरी भागात नगरसेवकांना प्रमाणपत्र देण्याचे अधिकार दिलेले आहेत तेव्हा ग्रामपंचायतीचे सदस्य आणि सरपंच यांना हा अधिकार का दिला नाही ? अशी समितीने विचारणा केली असता **सचिवांनी सरपंचांना हा अधिकार दिलेला असल्याचे सांगून त्या परिपत्रकाची प्रत समितीला देण्याचे आश्वासित केले. तथापि, अद्याप ही समितीला माहिती प्राप्त झालेली नाही.**

२.९५ अस्वच्छ व्यवसायात काम करणाऱ्या पालकांच्या मुलांना शिष्यवृत्ती देण्याची योजना आहे २००८-२००९, २००९-२०१०, २०१०-२०११ या वर्षात कोणकोणत्या जिल्ह्यात किती शिष्यवृत्ती दिलेली आहे त्याची जिल्हावार माहिती देण्याविषयी समितीने सांगितले असता सचिवांनी अस्वच्छ व्यवसायातील पालकांच्या मुलांना मॅट्रीक पूर्व शिष्यवृत्तीची रक्कम जिल्हा निहाय किती देण्यात आली याची माहिती देण्याचे समितीला आश्वासित केले. सदर माहिती प्राप्त झालेली आहे. **(विवरणपत्र ५)**

२.९६ केंद्र शासनाने सन २०१०-२०११ पर्यत त्यांच्या हिश्याची संपूर्ण रक्कम उपलब्ध करुन दिली आहे काय, त्याची अभिलेख्यावर नोंद का करण्यात आली नाही. हे अभिलेखे महालेखाकारांना का उपलब्ध करुन देण्यात आले नाहीत ? अशी समितीने विचारणा केली असता सचिवांनी खुलासा केला की, केंद्र सरकारकडून २००८-२००९ साली १० कोटी रुपये, २००९-२०१० साली १३४ कोटी रुपये मिळालेले आहेत. सन २०१०-११ साली २८१ कोटी ६१ लाख रुपये आणि २०११-१२ साली १४० कोटी ८० लाख रुपये मिळाले. सन २०१०-११

पर्यंतची संपूर्ण देय रक्कम केंद्र सरकारकडून मिळालेली आहे या संदर्भात समितीसमोर साक्ष झाल्यानंतर नोंद घेण्याचे सचिवांनी समितीस आश्वासित केले.

२.९७ महालेखाकार यांना माहिती दिली नसल्यामुळेच लेखापरीक्षण परिच्छेद समितीसमोर आला आहे आणि समितीसमोर साक्ष झाल्यानंतर महालेखाकारांना विभागाचे सचिव माहिती देणार आहेत. अभिलेख्यावर त्या पैशाची नोंद झाली आहे काय ? झाली असेल तर ती नोंद आता समितीसमोर दाखवावी. **लेखापरीक्षण झाल्यानंतरसुद्धा या मुद्याच्या बाबतीत विभाग फारसे गंभीर नाहीत असा त्याचा अर्थ होतो. विभाग या बाबतीत गंभीर नाही असे समितीच्या निदर्शनास आले आहे. त्यामुळे याबाबत समितीने नाराजी व्यक्त केली.** या संदर्भातील काम कोणते अधिकारी पाहतात ? विभागाच्या कोणत्या अधिकाऱ्याचे या कामावर नियंत्रण आहे ? सर्वच बाबी सचिव पाहू शकत नाहीत हे देखील समितीला समजते. **परंतु जो अधिकारी हे काम पहात असेल त्याने यासंबंधी समितीसमोर खुलासा केला पाहिजे. तथापि, अद्यापही याबाबत संबंधित अधिकाऱ्याने समितीला खुलासा सादर केलेला नाही.**

२.९८ राज्याचा हिस्सा किती आहे आणि केंद्र सरकारचा हिस्सा किती आहे याची माहिती समितीला द्यावी. महाराष्ट्र राज्याला केंद्र सरकारकडून दरवर्षी किती रक्कम मिळते ? याबाबत विभागाने खुलासा केला की, २०११-२०१२ सालासाठी विभागाने ३४३ कोटी रुपयांची मागणी सादर केली होती. त्यापैकी १४० कोटी रुपये मिळाले होते. मागच्या वर्षी २८२ कोटी रुपये मिळाले होते.

२.९९ या प्रकरणी महालेखाकारांनी असे मत व्यक्त केले की, केन्द्र सरकार की ग्रांट का जो भाग महाराष्ट्र सरकार के पास आना था, वह नहीं आया है. The funds for these schemes was awarded from Government of India**.** केन्द्र सरकार की ओर से जो पैसा मिलता है उसका यूज हो जाने के बाद यूटीलायझेशन सर्टिफिकेट चेक करना चाहिए. यूटीलायझेशन सर्टिफिकेट को चेक करने के पहले ही अगर ग्रांट को यूज कर लेते हैं तो यह पता नहीं चलता है कि ग्रांट का कितना यूज हुआ है.

२.१०० एका विद्यार्थ्यासाठी किती रुपये दिले जातात ? अशी समितीने विचारणा केली असता विभागाने खुलासा केला की, अगोदर उत्पन्नाची मर्यादा एक लाख रुपये ठरविण्यात आली होती. त्यामध्ये वाढ करण्यात येऊन ही मर्यादा दोन लाख रुपये करण्यात आलेली आहे. सचिवांनी यासंबंधी समितीला सविस्तर माहिती देताना असे सांगितले की, निर्वाह भत्ता हा या

शिष्यवृत्तीतील महत्वाचा भाग आहे. या केंद्र शासन पुरस्कृत योजनांमध्ये आता चार वेगवेगळे गट करण्यात आले आहेत. केंद्र शासनाचा निर्णयानुसार गट १ मध्ये पुढील कोर्सेसचा समावेश केला आहे.

(ii) Degree and Post Graduate level courses including M.Phil., Ph.D. and Post Doctoral research in Medicine, Engineering, Technology, Planning, Architecture, Design, Fashion Technology, Agriculture, Veterinary and Allied Sciences, Management, Business Finance/Administration, Computer Science/Applications.

(iii) Commercial Pilot License course.

(iv) Post Graduate Diploma courses in various branches of management and medicine.

(v) C.A./I.C.W.A./C.S./I.C.F.A. etc.

(vi) M.Phil., Ph.D. and Post Doctoral Programmes (D.Litt., D.Sc. etc.) -

(vii) L.L.M.

गट २ मध्ये पुढील कोर्सेसचा समावेश केलेला आहे.

(i) Graduate/Post Graduate courses leading to Degree, Diploma, Certificate in areas like Pharmacy (B.Pharma), Nursing (B Nursing), LLB, BFS, other para-medical branches like rehabilitation, diagnostics etc., Mass Communication, Hotel Management & Catering, Travel/Tourism/Hospitality Management, Interior Decoration, Nutrition and Dietetics, Commercial Art, Financial Services for which entrance qualitifcation is minimum Sr. Secondary.

(ii) Post Graduate courses not covered under Group I e.g. MA/M.Sc./ M.Com/M.Ed./M.Pharma etc.

ग्रुप ३ मध्ये पुढील कोर्सेसचा समावेश केला आहे.

All other courses leading to a graduate degree not covered under Group I & II e.g. B.A./B.Sc./B.Com. etc.

ग्रुप ४ मध्ये पुढील कोर्सेसचा समावेश केला आहे.

All Post-matriculation level non-degree courses for which entrance qualification is High School (Class X), e.g. senior secondary certificate (class XI and XII); both general and vocational stream, ITI courses, 3 year diploma courses in Polytechnics, etc.

यामध्ये पुढे "Monthly Maintenance Allowance" बाबतची माहिती दिली आहे.

यापुर्वी ग्रुप १ मध्ये डे स्कॉलरला ३३० रुपये आणि हॉस्टेलरला ७४० रुपये मिळत होते. ग्रुप २ मध्ये डे स्कॉलरला ३३० रुपये आणि हॉस्टेलरला ५१० रुपये मिळत होते. ग्रुप ३ मध्ये डे स्कॉलरला १८५ रुपये आणि हॉस्टेलरला ३५५ रुपये मिळत होते. ग्रुप ४ मध्ये डे स्कॉलरला १४० रुपये आणि हॉस्टेलरला २३५ रुपये मिळत होते. आता नवीन स्कीमप्रमाणे ग्रुप १ मध्ये डे स्कॉलरला ५५० रुपये आणि हॉस्टेलरला १२०० रुपये मिळतात. ग्रुप २ मध्ये डे स्कॉलरला ५३० रुपये आणि हॉस्टेलरला ८२० रुपये मिळतात. ग्रुप ३ मध्ये डे स्कॉलरला ३०० रुपये आणि हॉस्टेलरला ५७० रुपये मिळतात. ग्रुप ४ मध्ये डे स्कॉलरला २३० रुपये आणि हॉस्टेलरला ३८० रुपये मिळतात.

यात पुढे "Other Allowance" मध्ये "Study Tour Charges" आता १००० रुपयांवरुन १६०० करण्यात आले आहेत. यानंतर "Thesis Typing/Printing Charges" आता १००० रुपयांवरुन १६०० करण्यात आले आहेत. तसेच "Book Grant for Correspondence Courses" ७५० रुपयांवरुन १२०० रुपये करण्यात आला आहे. यापुढे "Allowance for Students with Disability (i) Monthly Reader Allowance for Blind Students" आता ग्रुप १ आणि २ साठी २४० रुपये, ग्रुप ३ साठी २०० रुपये, ग्रुप ४ साठी १६० रुपये करण्यात आले आहेत.

यानंतर "Monthly Transport Allowance for Disable Students" आता १०० रुपयांवरुन १६० रुपये करण्यात आला आहे. "Monthly Escort Allwance for Severely Handicapped Day Scholars/Students with low extremity disability" आता १०० रुपयांवरुन १६० रुपये करण्यात आला आहे. यानंतर "Monthly Helper Allowance admissible to any employee of the hostel willing to extend help to a severely orthopaedically handicapped student residing in the hostel of an Educational Institution who may need the assistance of a helper" आता १०० रुपयांवरुन १६० करण्यात आला आहे. यानंतर "Monthly Coaching Allowance to Mentally Retarded and Mentally ill Students" आता १५० रुपयांवरुन २४० रुपये करण्यात आलेला आहे. अशा प्रकारे मागच्या वर्षी १३ लाख विद्यार्थ्यांना १५०० कोटी रुपये वाटण्यात आले होते.

समितीने अशी विचारणा केली की, भंडारा जिल्ह्यात आढावा बैठक घेण्यात आली. त्यात अंपग विद्यार्थ्यांना गेल्या दोन, तीन वर्षापासून शिष्यवृत्तीच दिली गेलेली नाही ही बाब

प्रकर्षाने निदर्शनास आली आहे. भंडारा जिल्ह्यातील अंपग विद्यार्थ्यांना गेल्या दोन, तीन वर्षात शिष्यवृत्ती का मिळाली नाही ? तसेच राज्यातील किती अपंग विद्यार्थ्यांना शिष्यवृती दिली गेली यासंबंधी जिल्हानिहाय यादी विभागाकडे उपलब्ध आहे काय ?

याबाबत विभागाने असा खुलासा केला की, अपंगांना शिष्यवृत्ती देण्याचे काम अपंग आयुक्तालयामार्फत होत असते. त्या आयुक्तालयाचे आयुक्त हे म्हसुरीला ट्रेनिंगसाठी गेले असल्यामुळे त्या आयुक्तांचा तात्पुरता पदभार माझ्याकडे सोपविण्यात आलेला आहे. भंडारा जिल्ह्यातील कोणत्या शाळेतील अपंग विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ मिळाला नाही याबाबतची योग्य माहिती दिली तर, त्याबाबतची निश्चितपणे चौकशी करण्यात येईल. **त्याचप्रमाणे अपंग विद्यार्थ्यांना देण्यात आलेली शिष्यवृत्तीची जिल्हानिहाय यादी नंतर समितीला सादर करण्याचे विभागीय सचिवांनी समितीला आश्वासित केले. तथापि अद्याप ही समितीला सदर माहिती प्राप्त झालेली नाही.**

संपूर्ण भंडारा जिल्ह्यातंर्गत असलेल्या शाळांमधील अपंग विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती गेल्या दोन, तीन वर्षापासून मिळालेली नाही. या संबंधीची माहिती मुख्यालयाकडून घेवून ती नंतर समितीला सादर करण्याचे समितीला आश्वासित करुनही विभागाकडून समितीला अद्याप माहिती मिळालेली नाही.

भंडारा जिल्ह्यात अपंग विद्यार्थ्यांसाठी किती शिष्यवृत्ती आली, त्यातील किती विद्यार्थ्यांना वाटप झाले या अनुषंगाने बैठका घेतल्या जात नाहीत काय ? अशी समितीने विचारणा केली असता विभागाने खुलासा केला की, विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याच्या संदर्भात सामाजिक न्याय विभागाकडून संपुर्ण निधी उपलब्ध करुन दिला जातो. अपंग विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याच्या बाबतीत वेगळा निधी दिला जात नाही. शासनाच्या परिपत्रकाप्रमाणे मागासवर्गीय विद्यार्थ्यांना सदरहू शिष्यवृत्तीचे वाटप केले जाते. सामाजिक न्याय विभागातर्फे मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीसाठी जो निधी उपलब्ध होतो, त्यातच अपंग विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीचा निधी अंर्तभूत आहे.

अभिलेख्याच्या माहिती संदर्भातील प्रश्नाचे विभागाकडून उत्तर प्राप्त झालेले नाही. अभिलेख्यांची माहिती महालेखाकार यांच्याकडे का सादर करण्यात आली नाही याचा खुलासा होणे आवश्यक आहे. अभिलेख्यांची संदर्भातील माहिती महालेखाकार यांना सादर करणे हे एक अतिशय महत्वाचे काम आहे. अभिलेख्यांच्या माहिती महालेखाकार यांच्याकडे कोणत्या

अधिकाऱ्याने सादर केली नाही ? या अनियमिततेला कोण अधिकारी जबाबदार आहेत ? याबाबत सचिवांनी सदरहू माहिती समितीला नंतर सादर करण्यात येईल असे आश्वासित केले असता समितीने विचारणा केली की, हा लेखापरीक्षण परिच्छेद महत्वाचा असेल म्हणून महालेखाकार यांनी परिच्छेद निश्चित केलेला आहे. या परिच्छेदाच्याबाबतची माहिती उपलब्ध नाही, त्यामुळे ती माहिती नंतर सादर करतो अशा प्रकारची माहिती समितीला देणे योग्य नाही. समितीसमोर साक्षीसाठी येतांना अधिकाऱ्यांनी संपूर्णपणे अभ्यास करुन तसेच त्याबाबतची पूर्ण माहिती घेऊन यावयास पाहिजे होती. परंतु या लेखापरीक्षण मुद्यासंदर्भात अधिकाऱ्यांनी अभ्यास केलेला दिसून येत नाही याबाबत समितीने नाराजी व्यक्त केली. यावर महालेखाकारांनी असे अभिप्राय दिले की, यह बात देखनी चाहिए कि युटीलायझेशन सर्टिफिकेट आया है कि नहीं और वह प्रोपर है कि नहीं. इसके लिए बेसिक रिकॉर्ड भी मेन्टेन किया जाना चाहिए. त्यावर सचिवांनी खुलासा केला की, सामाजिक न्याय विभागाकडून मागासवर्गीय विद्यार्थ्यांना दिली जाणारी शिष्यवृत्ती ही इसीएसच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या खात्यामध्ये जमा होते आणि फ्री-शिप संबंधीचे पैसे हे महाविद्यालयांच्या खात्यामध्ये जमा होत असतात.

सदर शिष्यवृत्ती योजनेच्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र दिले जाते काय ? असे समितीने विचारले असता सचिवांनी खुलासा केला की, सदरहू निधी संदर्भात उपयोगिता प्रमाणपत्र दिल्याशिवाय केंद्र सरकारकडून पुढील निधी वितरित केला जात नाही.

गरीब लोगों को इस योजना का फायदा ठीक प्रकार से नहीं मिलता है. रिकॉर्ड पर यह आ जाता है कि इतना पैसा इस योजना पर खर्च किया गया है. कितना पैसा अपंग विद्यार्थियोंपर खर्च किया गया है, इसकी डिटेल जानकारी आपके पास नहीं है. **केंद्र शासनाकडून या योजनेसंबंधीचा जो निधी प्राप्त झाला, त्या निधीच्या खर्चासंबंधीचे अभिलेखे महालेखाकार यांना विभागाने सादर केलेले नाहीत. ते का सादर केले नाही, यांची माहिती देखील विभागाच्या अधिकाऱ्यांना नसल्यामुळे या संबंधीची सविस्तर माहिती समितीला सादर करण्याचे विभागीय सचिवांनी समितीला आश्वासित केले परंतु अद्यापही समितीला माहिती प्राप्त झालेले नाही.**

खाजगी महाविद्यालयातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांचा शिष्यवृत्तीचा प्रश्न गंभीर झालेला आहे. महाविद्यालयांमधील अनेक देयके प्रलंबित असतात. कर्मचाऱ्यांचे पगाराचे पैसे, प्रलंबित

विद्यार्थ्यांच्या फ्री शीपचे पैसे प्रलंबित असतात, ही रक्कम सामाजिक न्याय विभागाकडून दोन-दोन, तीन-तीन वर्षे दिली जात नाही. त्यामुळे महाविद्यालयांना आर्थिक संकटांना सामोरे जावे लागते, त्याचप्रमाणे महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना फ्री शीपचे पैसे वेळेवर दिले जात नाहीत, त्या पैशांचा विनियोग पुढील शिक्षण घेण्यासाठी करता येत नाही. या महाविद्यालयाना तसेच मागासवर्गीय विद्यार्थ्यांना फ्री शीपचे पैसे वेळेवर मिळावेत म्हणून काही पद्धत ठरविणे आवश्यक आहे. आता महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठी केंद्रीय पद्धत अंमलात आणली आहे. यामध्ये मागासवर्गीय विद्यार्थ्यांना महाविद्यालयात प्रवेश घेण्यासाठी नंबर लागतो, परंतु खाजगी महाविद्यालयांमध्ये १२०० ते १५०० रुपये प्रवेश शुल्क व शैक्षणिक शुल्क घेतल्याशिवाय प्रवेश दिला जात नाही. काही मागासवर्गीय विद्यार्थ्यांची आर्थिक परिस्थिती अतिशय हलाखीची असते, तो विद्यार्थी १२०० त १५०० रुपये एवढे शैक्षणिक शुल्क भरु शकत नाही. त्यामुळे अशा विद्यार्थ्यांना शिक्षणापासून वंचित रहावे लागते असे मत समितीने व्यक्त केले असता त्याबाबत सचिवांनी खुलासा केला की, अभियांत्रिकी, वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना प्रतिपूर्ती दिली जाते

विना अनुदानीत महाविद्यालयात वाणिज्य, कला, विज्ञान शाखेत शिक्षण घेणारे मागासवर्गीय विद्यार्थी, विना अनुदानीत व्यावसायिक महाविद्यालयामध्ये शिक्षण घेणारे मागासवर्गीय विद्यार्थी यांच्याकडून प्रथम प्रवेश शुल्क व शैक्षणिक शुल्क घेतल्याशिवाय त्या विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जात नाही. अगर किसी बच्चे को प्रवेश मिला है और उसकी फीस सामाजिक न्याय विभाग की ओर से दी जानी है तो वह फीस उसी समय दी जानी चाहिए. या बाबतीत शासनाचे धोरण काय आहे, या बाबतीत शासनाच्या ऑर्डरस् काय आहेत ? यावर सचिवांनी खुलासा केला की, डी.एड, बी.एड. तसेच इतर शाखेत शिकणाऱ्या मागावर्गीय विद्यार्थ्यांना त्यांनी भरलेल्या पैशांची प्रतीपूर्ती दिली जाते.

प्रवेश शुल्क व शैक्षणिक शुल्क भरले तरच प्रवेश दिला जाईल असे खाजगी महाविद्यालयाकडून मागासवर्गीय विद्यार्थ्यांना सांगितले जाते. ही पद्धत शासनाने बदलली पाहिजे. मागासवर्गीय विद्यार्थी असला तरी त्याने शैक्षणिक फी भरली तरच त्याला खाजगी महाविद्यालयात प्रवेश दिला जातो. शैक्षणिक वर्ष वाया जाऊ नये म्हणून तो विद्यार्थी कोठूनही पैसे जमा करतो आणि महाविद्यालयात प्रवेश करतो. मुंबईत एक शासकीय आय.टी.आय.आहे, त्या ठिकाणी हवाई सुंदरीचा कोर्स आहे. प्रथम २५ हजार रुपये भरा तरच तुम्हाला प्रवेश दिला

जाईल असे स्पष्टपणे सदर संस्थेकडून मागासवर्गीय विद्यार्थिनींना सांगितले जाते. शासनाकडून तुमचे फ्री शीपचे पैसे येतील, त्यावेळी तुमचे पैसे परत करण्यात येतील. २५ हजार रुपये असल्याशिवाय मागासवर्गीय विद्यार्थिनी त्या कोर्ससाठी प्रवेश घेऊ शकत नाही. ज्या मागासवर्गीय विद्यार्थीनी सदर कोर्स करण्यासाठी इच्छूक आहेत, त्यांच्याकडून शुल्क न घेता प्रवेश दिला गेला पाहिजे असे समितीचे मत आहे. त्यावर सचिवांनी खुलासा केला की, महाविद्यालयांमध्ये प्रवेश देताना मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून प्रवेश शुल्क शैक्षणिक शुल्क, परीक्षा शुल्क घेऊ नये अशा केंद्र शासनाने सूचना दिलेल्या आहेत. केंद्र शासनाने यासंदर्भात दिलेल्या सूचनांची योग्य प्रकारे अंमलबजावणी करण्यात यावी म्हणून संचालक, सामाजिक न्याय यांच्यामार्फत सर्व महाविद्यालयाच्या प्राचार्यांना सूचना देण्यात याव्यात अशा प्रकारचे आदेश शासन स्तरावर देण्यात येतील.

राज्य शासनाच्या ज्या आय.टी.आय.आहेत, तसेच विना अनुदानीत महाविद्यालये आहेत, त्या ठिकाणी देखील अशीच परिस्थिती आहे. मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून प्रवेश शुल्क घेतल्याशिवाय त्यांना आय.टी.आय.प्रवेश दिला जात नाही, तसेच महाविद्यालयांमध्ये प्रवेश दिला जात नाही, ही गंभीर स्वरुपाची बाब असल्याचे समितीने मत व्यक्त केले.

जी महाविद्यालये अथवा शासकीय आय.टी.आय. अशा पध्दतीने प्रवेश शुल्क व शैक्षणिक शुल्क घेत असतील तर ते चुकीचे आहे. तसेच अशा पध्दतीने विना अनुदानीत महाविद्यालये प्रवेश शुल्क घेत असतील तर अशा महाविद्यालयांविरुद्ध कारवाई करण्यात येईल असे समितीला आश्वासित केले तसेच मुंबई येथील शासकीय आय.टी.आय.आहे, त्या आय.टी.आय.ची लेखी तक्रार समितीकडे प्राप्त झाली होती त्याची दखल घेण्याचे निदेश समितीने सचिवांना दिले.

महाराष्ट्रातील सर्व विना अनुदानीत महाविद्यालयांवर कारवाई करावी लागेल. म्हणून याबाबतीत कायमचे आदेश विभागाला काढावे लागतील. खाजगी महाविद्यालये मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या प्रवेश शुल्क व शैक्षणिक शुल्काच्या बाबतीत राज्य शासनाने तसेच केंद्र शासनाचे आदेश पाळण्याच्या बाबतीत विभागाने जागरुक असले पाहिजे. विभाग जर जागरुक नसेल तर, शासनाच्या धोरणांची अंमलबजावणी योग्य पध्दतीने होत नसेल तर ती एक गंभीर बाब आहे. या ठिकाणी समितीच्या अनेक सदस्यांकडून सांगितले गेले की, विना अनुदानीत महाविद्यालयांमध्ये मागासवर्गीय विद्यार्थ्यांना प्रवेश शुल्क व शैक्षणिक शुल्क भरल्याशिवाय प्रवेश

दिला जात नाही. विना अनुदानीत खाजगी महाविद्यालये प्रवेश शुल्काची रक्कम चेकच्या माध्यमातून न घेता डी.डी.च्या माध्यमातून स्वीकारतात. कोणकोणती खाजगी महाविद्यालये मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून प्रवेश शुल्क वसूल करतात ही बाब तपासून घ्यावी. यास सचिवानी सहमती दर्शवून असे नमूद केले की, खाजगी विना अनुदानीत महाविद्यालयात मागासवर्गीय विद्यार्थ्यांना प्रवेश देताना कोणत्याही प्रकारचे शुल्क वसूल करु नये अशा प्रकारच्या सूचना दिलेल्या आहेत. त्यावर समितीने असे सांगितले की, खाजगी विना अनुदानीत महाविद्यालयांकडून सदरहू सूचनांची अंमलबजावणी होत नाही ही दुर्देवाची गोष्ट आहे. या संदर्भात शासनाचे जे निदेश आहेत त्याची अंमलबजावणी व्यवस्थितपणे होत नाही, ही वस्तुस्थिती आहे. बऱ्याच महाविद्यालयांना मागासवर्गीय विद्यार्थ्यांची शिष्यवृत्तीची रक्कम उशिरा प्राप्त करुन दिली जाते. महाविद्यालयांकडून सदरहू शिष्यवृत्ती मागासवर्गीय विद्यार्थ्यांना ज्यावेळी देण्यात येते, त्यावेळी प्रवेश शुल्क, लायब्ररी शुल्क, बिल्डींग फंड इत्यादी प्रकारची रक्कम कापली जाते व उरलेली रक्कम विद्यार्थ्यांना दिली जाते. या पद्धतीमध्ये काही दुरुस्ती होणे आवश्यक आहे. या महाविद्यालयातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांची शिष्यवृत्तीची रक्कम शासनाकडून महाविद्यालयांकडे जमा होते. परंतु ती रक्कम शासनाकडून वेळेवर दिली जात नाही. शासनाकडून शिष्यवृत्तीची रक्कम उशिरा प्राप्त होते. या महाविद्यालयामधील विद्यार्थ्यांचे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर ते विद्यार्थी दुसरीकडे शिक्षण घेण्यासाठी अथवा नोकरी करण्यासाठी निघून जातात. सदर महाविद्यालयातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांची शिष्यवृत्तीची रक्कम ही महाविद्यालयाकडेच जमा असते काय, त्या रक्कमेचे समायोजन कशा पद्धतीने केले जाते, तसेच ज्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांची ही शिष्यवृत्तीची रक्कम असते, त्या विद्यार्थ्यांचा शोध घेऊन ती रक्कम त्या विद्यार्थ्यांना परत दिली जाते काय ? याबाबत सचिवांनी खुलासा केला की, खाजगी विना अनुदानीत महाविद्यालयातील मागासवर्गीय विद्यार्थ्याना शासनाकडून शिष्यवृत्तीची रक्कम दिली जाते. त्या रक्कमेतून शैक्षणिक शुल्क, परीक्षा शुल्क इत्यादी शुल्क कापले जाते व उरलेली रक्कम त्या विद्यार्थ्यास दिली जाते. सदरहू शिष्यवृत्तीची रक्कम मागासवर्गीय विद्यार्थ्यांना दिली गेली पाहिजे अशा सूचना महाविद्यालयांना दिलेल्या आहेत. तशा प्रकारचे महाविद्यालयांकडून अंडर टेकींग घेण्यात येते. शिष्यवृत्तीची रक्कम जी महाविद्यालये मागासवर्गीय विद्यार्थ्यांना परत देत नसतील तर अशा महाविद्यालयांविरुद्ध गुन्हा दाखल करावा असे निदेश संचालक, सामाजिक न्याय यांना देण्यात आलेले आहेत.

समितीने अशी विचारणा केली की, संचालक, सामाजिक न्याय यांना आदेश देऊन चालणार नाही. आदेशाप्रमाणे अंमलबजावणी होते किंवा नाही याकडे सचिवांनी देखील बघितले पाहिजे. शासनाने दिलेल्या आदेशाचे महाविद्यालयांकडून पालन होते किंवा नाही याची खात्री करुन घ्यावी असे समितीने सुचित केले असता त्यास सचिवांनी सहमती दर्शविली.

सामाजिक न्याय विभागाच्या जिल्हा बैठका होत असतील, त्यात अशा बाबींचा आढावा घेतला जात नाही काय ? असे समितीने विचारले असता विभागाने खुलासा केला की, जिल्हा बैठकीत आढावा घेतला जातो. त्या आढाव्याच्या अनुषंगाने जिल्हा समाजकल्याण अधिकारी व विभागीय समाजकल्याण अधिकारी यांना वारंवार सूचना दिल्या जातात.

समितीने अशी विचारणा केली की, तंत्र शिक्षण विभागांतर्गत ज्या आय.टी.आय.आहेत, त्या अनुषंगाने संचालक, तंत्र शिक्षण यांच्याकडून आढावा घेतला जातो काय ? ज्या शासकीय आय.टी.आय.आहेत, त्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून प्रवेश शुल्क घेत असतील तर ते शुल्क घेऊ नये अशा प्रकारचा शासन निर्णय निर्गमित केला पाहिजे. शासनाच्या आदेशांची तसेच वेगवेगळ्या परिपत्रकांची अंमलबजावणी होते किंवा नाही ही बाब संचालक, सामाजिक न्याय यांनी पाहिली पाहिजे. वेगवेगळ्या तंत्र निकेतन संस्था आहेत, त्यांना सामाजिक न्याय विभागाकडून निधीचे वाटप होत असते. त्यामुळे अशा विषयाच्याबाबतीत संचालक, तंत्र शिक्षण यांच्या समवेत बैठका घेतल्या पाहिजेत. शासनाच्या आदेशाचे पालन होते आहे किंवा नाही याची माहिती त्यांच्याकडून जाणून घेतली पाहिजे. संचालक, तंत्र शिक्षण यांच्यासमवेत अशा विषयांच्याबाबतीत बैठका घेतल्या आहेत काय ? याबाबत विभागीय सचिवांनी खुलासा केला की, संचालक, तंत्र शिक्षण यांच्या समवेत अशा विषयाच्या बैठका झालेल्या नाहीत. तथापि, यापुढच्या काळात निश्चितपणे संचालक, तंत्रशिक्षण यांच्यासमवेत बैठका घेण्यात येतील. त्यावर समितीने अशी माहिती दिली की, मुंबई येथे शासकीय आय.टी.आय.आहे, त्याठिकाणी श्री. संख्ये नावाचे गृहस्थ आहेत. ते मागासवर्गीय विद्यार्थ्यांना प्रथम प्रवेश शुल्क व शैक्षणिक शुल्क भरावयास सांगतात त्याशिवाय त्यांना या संस्थेमध्ये प्रवेश दिला जाणार नाही. शासनाकडून शिष्यवृत्ती आली की प्रवेश शुल्काची रक्कम त्यांना परत दिली जाईल. मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून प्रवेश शुल्क घेऊ नये अशाप्रकारचे आदेश संबंधितांना सत्वर देण्यास विभागीय सचिवांनी सहमती दर्शविली.

परदेशी शिक्षण घेणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांकरिता असलेल्या शिष्यवृत्ती कधी सुरु करण्यात आली. या योजनेसंबंधीची सविस्तर माहिती तसेच आतापर्यंत किती मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी या शिष्यवृत्तीचा लाभ घेऊन परदेशी अभ्यासक्रम पूर्ण केलेला आहे याची सविस्तर माहिती समितीला द्यावी. तथापि, आश्वासित करुनही समितीला सदर माहिती प्राप्त झालेली नाही.

वसतिगृहांच्या बांधकामासाठी किती निधी उपलब्ध झालेला आहे ? नाशिक, अमरावती व लातूर येथील वसतिगृहांच्या बांधकामाबाबतची काय प्रगती आहे ? अशी समितीने विचारणा केली असता सचिवांनी खुलासा केला की, नाशिक येथील वसतिगृहाचे ९० टक्के बांधकाम पूर्ण झालेले आहे. अमरावती येथील वसतिगृहाचे बांधकाम पूर्ण झालेले असून तेथे विद्यार्थी प्रवेशासाठी ५०० अर्जांचे वाटप करण्यात आले आहे. लातूर येथील वसतिगृहाचे काम देखील पूर्ण झाले असून ११०० विद्यार्थ्यांना अर्जांचे वाटप झालेले आहे.

अमरावती तसेच, लातूर येथील वसतिगृह सन २०१२-१३ या वर्षापासून सुरू होणार आहे काय ? असे समितीने विचारले असता त्यास सचिवांनी सहमती दर्शविली.

बऱ्याच ठिकाणी वसतिगृहाच्या इमारतीचे बांधकाम पूर्ण झालेले असूनही तेथे विद्यार्थी नाहीत किंवा इतर कर्मचारी वर्ग नाही याबाबत विभागाने खुलासा करावा असे समितीने सूचविले असता सचिवांनी खुलासा केला की, नवीन १०० वसतिगृहांचे बांधकाम करण्यात येणार होते. त्यापैकी ५३ वसतिगृहांचे बांधकाम पूर्ण झालेले आहे. त्यापैकी १२ वसतिगृहांच्या इमारतींचा ताबा अद्याप मिळालेला नाही तर ४१ वसतिगृहांच्या इमारतींचा ताबा मिळालेला आहे. या १०० वसतिगृहांचे बांधकाम करताना म्हाडाकडून ३६ इमारती घेतलेल्या आहेत.

कर्जत येथे वसतिगृह इमारतीसाठी निधी उपलब्ध होऊन ४ वर्षे झालेली आहेत परंतु, तेथे वसतिगृह बांधण्यासाठी जागा उपलब्ध नाही असे कारण सांगितले जाते. त्यामुळे प्राप्त निधी परत गेला अशी परिस्थिती आहे, एखादी योजना सुरू करण्यासाठी आवश्यक जागा, ती सुरू करण्याबाबतची योजना पाहूनच निधी उपलब्ध होतो. या ठिकाणी जर वसतिगृहासाठी जागाच उपलब्ध नव्हती मग निधी कसा काय उपलब्ध करुन देण्यात आला. याबाबत सचिवांनी खुलासा केला की, जेथे वसतिगृह इमारतीच्या बांधकामासाठी निधी उपलब्ध झालेला आहे. परंतु जेथे वसतिगृह इमारतीच्या बांधकामासाठी जागा उपलब्ध नाही किंवा वसतिगृह इमारत बांधण्यामध्ये इतर अडचणी आहेत, अशा वसतिगृह इमारतीच्या बांधकामासाठी उपलब्ध झालेला

निधी ज्या वसतिगृह इमारतींचे बांधकाम पूर्णत्वास आलेले आहे, परंतु, ज्यासाठी निधी उपलब्ध झालेला नाही, अशा वसतिगृह इमारतींच्या बांधकामासाठी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

एखाद्या ठिकाणी वसतिगृह इमारत बांधण्यासाठी जागा उपलब्ध नाही म्हणून तेथील वसतिगृह इमारत बांधण्याची योजना रद्द करणे बरोबर नाही. त्याऐवजी तेथे वसतिगृह इमारतीच्या बांधकामासाठी जागा उपलब्ध करुन दिली पाहिजे. तसेच जामखेड व कर्जत येथील तसेच एकंदरीतच बांधण्यात आलेली वसतिगृहे सुरू करण्याबाबत समितीने सूचीत केले. सदर वसतिगृहे लवकरात लवकर सुरू करण्याचा प्रयत्न केला जाईल असे सचिवांनी समितीस सांगितले.

समितीने अशी विचारणा केली की, जे लोक भ्रष्टाचार, गैरव्यवहार करतात त्यांच्यावर नियमाप्रमाणे कारवाई होणे गरजेचे आहे. ते लोक न्यायालयाकडे जातील म्हणून त्यांच्यावर विभागाकडून कारवाईच केली जात नाही हे योग्य नाही. याबाबत सचिवांनी खुलासा केला की, १३ शासकीय वसतिगृहांचा शोध घेऊन ज्या अधिकारी/कर्मचारी यांनी लेखन साहित्याच्या वेष्टनावर छापलेल्या किरकोळ किंमतीच्या २ ते ३ पट जादा दर दिले होते त्यांच्याकडून ५.८२ लाख रुपये इतक्या रकमेची वसुली करण्यात आलेली आहे. त्यावर समितीने विचारणा केली की, किती रकमेची वसुली करण्यात आली याची माहिती दिली. परंतु, यासाठी जबाबदार असलेल्यांवर काय कारवाई करण्यात आली त्याची माहिती समितील द्यावी. त्यावर विभागाने खुलासा केला की, ७ लोकांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेली आहे. त्यांच्याकडून सदरहू नोटीसचे उत्तर प्राप्त झाल्यानंतर संबंधितांवर १५ दिवसांत कारवाई केली जाईल. असे समितीला आश्वासित करण्यात आले.

"मुलभूत सुविधांची तरतूद" (परिच्छेद क्र. ३.३.१२.७) या परिच्छेदातंर्गत ८ विद्यार्थ्यांसाठी अदमासे १ खोली, १ स्वच्छतागृह व ९ विद्यार्थ्यांसाठी एक न्हाणी घर अशा सोयी किती वसतिगृहांत आहेत, याबाबतची यादी समितीला सादर करण्यासाठी समितीने विभागीय सचिवांना सांगितले असता विभागीय सचिवांनी पुढीलप्रमाणे माहिती दिली.

अनुदानित वसतीगृहसन २००६-०७ या वर्षाच्या नागरी अहवालासंदर्भात परि.क्र.३.३.१२.७ मूलभूत सुविधांच्या माहितीबाबत स्वच्छतागृह, न्हाणीगृह व भोजनगृह नसलेल्या वसतीगृहांची संचालनालयास प्राप्त माहिती.

अ. क्र.	**जिल्ह्याचे नाव**	**स्वच्छतागृह, न्हाणीगृह व भोजनगृह नसलेले वसतीगृह संख्या**				**शेरा**
		स्वच्छतागृह	**न्हाणीगृह**	**भोजनगृह**	**एकूण**	
(१)	सिंधुदुर्ग	आहे	आहे	आहे	निरंक	स्वच्छतागृह, न्हाणीगृह व भोजनगृह उपलब्ध असल्याचे सकअ

						जिप, सिंधुदुर्ग यांनी पत्र क्र. १८३९, दि.६.८.११ अन्वये कळविलेले आहे.
(२)	अहमदनगर	४		आहे	४	४ वसतीगृहात स्वच्छतागृह व न्हाणीगृह नसल्याचे सकअ जिप, अहमदनगर यांनी पत्र क्र. ३४०, दि.२.९.११ अन्वये कळविलेले आहे.
(३)	पुणे	६		आहे	६	६ वसतीगृहात स्वच्छतागृह व न्हाणीगृह नसल्याचे सकअ जिप, पुणे यांनी पत्र क्र. २६४, दि.१८.९.११ अन्वये कळविलेले आहे.
(४)	कोल्हापूर	२		आहे	२	२ वसतीगृहात स्वच्छतागृह व न्हाणीगृह नसल्याचे सकअ जिप, कोल्हापूर यांनी पत्र क्र. ५०४, दि.३.९.११ अन्वये कळविलेले आहे.
(५)	अमरावती	आहे	आहे	६८	६८	स्वच्छतागृह, न्हाणीगृह नियमानुसार उपलब्ध असल्याचे तसेच अमरावती जिल्ह्यातील ६८ वसतीगृह स्वतंत्र भोजन कक्ष उपलब्ध नसल्याने त्यांच्यावर दंडात्मक कार्यवाही करण्यात येत असल्याचे सकअ जिप, अमरावती यांनी पत्र क्र. १७२०, दि.२६.७.११ अन्वये कळविलेले आहे.
(६)	अकोला	आहे	आहे	आहे	---	स्वच्छतागृह, न्हाणीगृह व भोजनगृह नसलेले वसतीगृह अकोला जिल्ह्यात आढळून न आल्याचे सकअ जिप, यांनी त्यांचे पत्र दिनांक निरंक अन्वये कळविलेले आहे.
(७)	नागपूर	आहे	आहे	आहे	---	नागपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर जिल्ह्यातील वसतीगृहात स्वच्छतागृह, न्हाणीगृह व भोजनगृह उपलब्ध असल्याचे विभागीय समाज कल्याण अधिकारी, नागपूर यांनी पत्र क्र. २४१५, दि.१.८.११ अन्वये सादर केलेल्या माहितीवरुन दिसून येते.
(८)	वर्धा	आहे	आहे	आहे	---	
(९)	भंडारा	आहे	आहे	आहे	---	
(१०)	गोंदिया	आहे	आहे	आहे	---	
(११)	चंद्रपूर	आहे	आहे	आहे	---	
(१२)	गडचिरोली	१०			१०	गडचिरोली जिल्ह्यातील १० वसतीगृहात मुलभूत सुविधा नसल्याचे विसकअ नागपूर यांनी पत्र क्र. २४१५, दि.१.८.११ अन्वये सादर केलेल्या माहितीवरुन दिसून येते.
(१३)	परभणी	आहे	आहे	आहे	---	परभणी जिल्ह्यातील वसतीगृहात विद्यार्थी संख्येनुसार स्वच्छतागृह, न्हाणीगृह व भोजनगृह उपलब्ध असल्याचे सकअ जिप यांनी पत्र क्र. ११६६, दि.२२.७.२०११ अन्वये कळविलेले आहे.

दोन शासकीय वसतिगृहात स्वच्छतागृह आणि न्हाणी घर या व्यवस्था अजिबातच देण्यात आल्या नव्हत्या, त्यांची नावे काय आहेत, त्यांची चौकशी करण्यात आली आहे काय, त्यांच्यावर काय कारवाई करण्यात आली ? याबाबतची माहिती समितीने विचारली असता सचिवांनी खुलासा केला की, स्वच्छतागृह व न्हाणीघर या व्यवस्था असल्याशिवाय शासकीय वसतिगृहासाठी इमारती भाड्याने घेतल्या जात नाहीत. त्यावर महालेखाकारांनी समितीच्या असे निदर्शनास आणले की, अनुदानित वसतिगृहोंमें दी जानेवाली सुविधाओं के बारे में स्पेसीफिकेशन किया गया है. लेकिन ऐसा देखा गया है कि कुछ जगहों पर वसतिगृहों के अंदर उस स्पेसीफिकेशन के हिसाब से सुविधाएं उपलब्ध नहीं हैं. ये वसतिगृह नांदेड, नंदुरबार और नाशिक में हैं.

काही वसतीगृहामध्ये मुलभूत सुविधा नसल्याबाबतची वस्तुस्थिती विभागाने नाकारली असली तरी महालेखाकारांनी असे सांगितले की, The department stated in its reply that, instructions have been issued to the concerned Zilla Parishads to take penal action against the NGO run hostels wherever deficiencies in providing basic amenities are noticed. As far as Government hostels are concerned department stated that as these hostels are situated in the rental premises available facilities are provided to the students.

त्यावर समितीने अशी विचारणा केली की, उन वसतिगृहों के नाम का उल्लेख इस रिपोर्ट में कहीं भी नहीं किया गया है. यहां पर उत्तर में बताया गया है कि शासकीय वसतिगृह किराए की इमारतों में हैं और इन वसतिगृहों के लिए सरकार कोई भी ऐसी इमारत किराए पर नहीं लेती, जहां पर सभी आवश्यक सुविधाएं उपलब्ध न हों. सिर्फ अनुदानित वसतिगृहों में ही आवश्यक सुविधाएं उपलब्ध नहीं हैं या ये आवश्यक सुविधाएं शासकीय वसतिगृहों में भी उपलब्ध नहीं हैं. याबाबत महालेखाकारानी असे सांगितले की, Basically there are two types of hostels, Government run hostels and NGO run hostels. त्यावर समितीने असे सांगितले की, जिन वसतिगृहों में आवश्यक सुविधाएं उपलब्ध नहीं हैं, उन वसतिगृहों के नाम यहां पर बताए जाने चाहिए.

यासंदर्भात महालेखाकारांनी समितीला विदित केले की, The Department have accepted these facts. There are 3 Government run hostels which have only 1 toilet and 1 Bathroom. In 3 NGO run hostels there are no toilets at all. There are 4 Government run and 4 NGO run hostels which do not have dining table. There are 4 NGO run hostels which have only 1 Toilet and 1 Bathroom. The department had already accepted all these facts. We were told that the department will take necessary action on these organisations.

याबाबत सचिवांनी खुलासा केला की, या बाबतीत महालेखापालांनी दोन शासकीय वसतिगृहात स्वच्छतागृह आणि न्हाणी घर या व्यवस्था अजिबातच देण्यात आल्या नव्हत्या असे जे नमूद केले आहे. त्याबाबत समितीस असे स्पष्टीकरण देण्यात आले आहे की, शासकीय वसतिगृहासाठी इमारती जरी भाड्याने घेणे आवश्यक असले तरी, स्वच्छतागृह व न्हाणीघर या व्यवस्था असल्याशिवाय शासकीय वसतिगृहासाठी इमारती भाड्याने घेतल्या जात नाहीत.

सन २००५ ते सन २०१० या वर्षात मान्यता रद्द केलेल्या वसतिगृहांची संख्या एकूण २२ असून ज्या वेळेस लेखापरीक्षण करण्यात आले, त्याच वेळेस वसतीगृहाच्या संबंधातील

स्पष्टीकरण विभागाने का केले नाही ? असे समितीने विचारले असता विभागीय सचिवांनी खुलासा केला की, शासकीय वसतिगृहे व अनुदानित वसतिगृहांमधील सदरहू सुविधांबाबतची माहिती सादर करण्याबाबत सर्व विभागीय समाजकल्याण अधिकारी यांना कळविण्यात आले आहे. तसेच, ज्या अनुदानित वसतिगृहांमध्ये त्रुटी आढळून आलेल्या आहेत, अशा वसतिगृहांची मान्यता रद्द करण्याचे प्रस्ताव सादर करण्याबाबत अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नांदेड, नंदुरबार व नाशिक यांना कळविण्यात आलेले आहे. तसेच, सन २००५ ते सन २०१० या वर्षात मान्यता रद्द केलेल्या वसतिगृहांची संख्या २२ इतकी आहे.

वसतिगृहे प्रमाणपद्धतीनुसार नाहीत (As per norms) असा महालेखापालांचा जो आक्षेप आहे. त्यासंदर्भात आपण कोणती कार्यवाही केलेली आहे त्याची माहिती समितीला एक आठवड्याच्या आत सादर करावी. असे सूचित केले असता त्यास विभागीय सचिवांनी सहमती दर्शविली तथापि, अद्यापही समितीला सदर माहिती प्राप्त झालेली नाही.

समाजकल्याण विभागाकडे विविध योजना असतात. या योजनांसाठी शासनाकडून मोठया प्रमाणात समाजकल्याण विभागाकडे निधी येत असतो. त्यामुळे समाजकल्याणाच्या योजना शेवटच्या विद्यार्थ्यांपर्यत राबविल्या गेल्या पाहिजेत अशी समितीची भावना आहे. त्यामुळे अधिकाधिक चांगल्या पद्धतीने योजना राबविण्याकरिता पुढील काळात योग्य ती कार्यवाही विभागाने करावी अशी समिती अपेक्षा करते. कामे योग्य पद्धतीने व्हावीत यासाठी समन्वय ठेवून कामे करण्यात यावीत. केवळ समाजकल्याण खात्यापुरतेच कामे करावयाची नसून शासकीय अधिकारी म्हणून विभागाला कामे करावी लागणार आहेत. या मुद्याच्या संदर्भात विभागाने उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडून कामे करुन घ्यावी लागणार आहेत. विद्यार्थी हा आपला केंद्रबिंदू आहे असे मानून कामे केली तरच आपण विद्यार्थ्यांना न्याय देऊ शकू. तुम्ही कामे केल्यानंतर त्याचा सद्उपयोग होतो की नाही, विद्यार्थ्यांना न्याय मिळतो की, नाही हे पाहण्याचे काम अंतिमतः विभागाचे आहे. त्यामध्ये सचिवांना अधिकार नसतील त्या बाबी ऑन रेकॉर्ड येऊ द्या, त्याची माहिती समितीला मुख्य सचिवांना तसेच माननीय मंत्रीमहोदयांना माहिती द्यावी परंतु हा विषय तेथेच संपवू नका असे मत समितीने व्यक्त केले.

मुंबईतील विनाअनुदानित शाळांना प्रतिपूर्ती देण्याची योजना का बंद करण्यात आलेली आहे ? असे समितीने विचारले असता सचिवांनी खुलासा केला की, प्रतिपूर्तीच्या संदर्भात योजना बंद करण्यात आली नसून दर कमी असल्यामुळे शाळा फायदा घेत नव्हत्या. यासंदर्भात

विभागाने उच्च न्यायालयात दावा दाखल केला होता. यासंदर्भात एक समिती सुद्धा स्थापन करण्यात आली होती. या समितीने १००, १५० व २०० रुपये टप्प्याप्रमाणे किंमती वाढवून दिल्या होत्या. परीक्षा फी व शिक्षण फीच्या संदर्भात मंत्रीमंडळासमोर सुद्धा हा विषय उपस्थित करण्यात आला होता. परंतु, हा विषय मंत्रीमंडळ समितीने नाकारला होता. त्यामुळे विभागास पुन्हा उच्च न्यायालयात जावे लागले. मंत्रीमंडळाने हा विषय नाकारतांना सांगितले होते की, फ्रि-शिप ऐवजी मागास विद्यार्थ्यांना, आदिवासी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देता येईल का यासाठी शिक्षण मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करण्यात आली होती. या विषयाच्या संदर्भात न्यायालयाने सांगितले आहे की, समितीच्या शिफारसीनुसार प्रतिपूर्ती करा. आता हा विषय मंत्रीमंडळापुढे गेला आहे.

यावर समितीने असे मत व्यक्त केले की, मुलांना उच्च शिक्षणापर्यंत आणले नाही तर ते या योजनांचा लाभ घेऊ शकणार नाहीत. उच्च शिक्षणासाठी आपण विद्यार्थ्यांना पैसे देत असतो. परदेशी शिक्षण घेण्यासाठी, डॉक्टर होण्यासाठी आपण विद्यार्थ्यांना लाभ देणार. परंतु, येथपर्यंत विद्यार्थी येऊ शकतील याकडे सुद्धा आपण लक्ष दिले पाहिजे. येथपर्यंत विद्यार्थी आले नाहीत तर या योजनेचा विद्यार्थ्यांना काहीही फायदा होणार नाही. त्यामुळे आपल्या योजनेमध्ये काही तरी चूक होते असे दिसून येते. या योजनेमुळे सर्वसामान्य अर्थसंकल्पावर काहीही बोजा पडणार नाही ही बाब विभागाने मंत्रीमंडळाच्या निदर्शनास आणून द्यावी. याबाबत सचिवांनी खुलासा केला की, हा विषय मंत्रीमंडळाने पुन्हा नाकारला आहे. अनुसूचित व नवबौध्दांसाठी एक शीर्ष आहे आणि विमुक्त व भटक्या जमातीचा सामान्य योजनेला येत असतो.

समितीने अशी माहिती दिली की, आतापर्यंत अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना पैसे देत आला आहात. मुंबईतील विना-अनुदानितच्या इंग्रजी माध्यमांच्या शाळेतील अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना पैसे दिले गेले आहेत. परंतु नंतर अधिकाऱ्यांनी सांगितले की, ही योजना सुरु नसतांना सुद्धा विद्यार्थ्यांना पैसे उपलब्ध करुन दिलेले आहेत परंतु यापुढे ही योजना सुरु ठेवता येणार नाही. खरे म्हणजे अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठीच ही योजना आहे व त्या योजनेतूनच विभागाला अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी पैसे द्यावयाचे आहेत. यामुळे शासनाच्या तिजोरीवर अतिरिक्त भार पडणार नाही. अतिरिक्त भार शासनाच्या तिजोरीवर पडणार नसल्यामुळे विभागाला त्यांच्या तरतूदीमधून पैसे वितरीत करावे लागणार आहे. असे केले तरच अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांचा प्रश्न मिटू शकेल. त्यामुळे यासंदर्भात

मंत्रीमंडळाच्या समोर हा विषय येण्यासाठी विभागाने पाठपुरावा केला पाहिजे. यावर सचिवांनी खुलासा केला की, सामाजिक न्याय विभागाचे दोन अर्थसंकल्प असतात. यामध्ये अनुसूचित जाती व नवबौध्द विद्यार्थ्यांसाठी ११३ कोटी व विमुक्त जाती व भटक्या जमातींसाठी ११३ कोटी असा एकंदर २६० कोटी रुपयांचा भार येत होता. या अनुषंगाने सर्वोच्च न्यायालयात गेल्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने सांगितले की, माननीय शिक्षण मंत्र्यांच्या अध्यक्षतेखालील समितीमध्ये यासंदर्भात आपल्याला निर्णय घेता येईल. शिक्षण फी व परीक्षा फीच्या संदर्भात मंत्रीमंडळापुढे हा विषय गेलेला आहे. याबाबत समितीने असे मत व्यक्त केले की, त्याचा प्रश्न अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांपुरताच असून तो सामान्य विद्यार्थ्यांचा नाही. अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना फायदा व्हावा अशी मागणी आहे. विद्यार्थ्यांना शिक्षण मिळण्यात मदत होण्याच्या दृष्टीने सर्वतोपरी प्रयत्न विभागाने करावेत. यासाठी विभागाना जे जे करता येईल ते ते करावे.

समितीने अशी विचारणा केली की, जात पडताळणीसाठी सर्व कागदपत्रे उपलब्ध करुन दिल्यानंतर सुद्धा ४-४, ६-६ महिन्यापर्यंत जात पडताळणी प्रमाणपत्र उपलब्ध करुन दिले जात नाही. आतापर्यंत किती जातपडताळणी प्रमाणपत्रे उपलब्ध करुन देण्यात आलेली आहेत. याबाबत सचिवांनी खुलासा केला की, एप्रिल २०११ पर्यंत १.४३ लक्ष जात पडताळणीची प्रकरणे प्रलंबित होती परंतु सप्टेंबर, २०११ पर्यंत ११ हजार प्रकरणे प्रलंबित आहेत. नंदूबारमध्ये जात पडताळणीची १५ हजार प्रकरणे प्रलंबित आहेत. सामाजिक न्याय विभागाकडे धुळे, नाशिक जिल्ह्याचे काम असून नंदूरबारचे काम आदिवासी विकास विभागाकडे आहे. जात पडताळणी प्रमाणपत्रासाठी प्रत्येक जिल्ह्यात एक समिती असून जिल्हाधिकारी त्या समितीचे अध्यक्ष असतात. सामाजिक न्याय विभाग फक्त निवडणुकीच्या संदर्भातील जात पडताळणी प्रमाणपत्राचे काम बघतो. निवडणुकीच्या कामासाठी ३४ समित्या तयार करण्यात आलेल्या आहेत. प्रत्येक जिल्ह्यासाठी एक समिती तयार करण्यात आलेली आहे.

आदिवासी विकास विभागाच्या परिच्छेद क्र.३.३.६.१ "लक्ष्य केलेल्या लाभधारकांची ओळख" या विषयावरील दोन तीन मुद्यांच्या संदर्भात प्रश्न अनुत्तरीत राहिल्यामुळे दिनांक २०-९-२०११ रोजी पुन्हा साक्ष आयोजित करण्यात आली होती. समितीने आदिवासी विभागाला सात वेळा स्मरणपत्रे दिली होती परंतु त्याची दखल घेतली गेली नाही. यासंदर्भात कोणती कारवाई केलेली आहे ? ही बाब विभागाच्या कधी लक्षात आली व संबधितांना किती दिवसाची मुदत दिली होती ? यावर सचिवांनी खुलासा केला की, यासंदर्भात १३ कर्मचाऱ्यांवर कारवाई

प्रस्तावित करण्यात आलेली आहे. विभागाकडे २४ पैकी १५ अधिकारी कार्यरत असून ९ अधिकारी निलंबित आहेत. पदे भरतीसंदर्भात प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.

आदिवासी विभागाला पुरेसा नियतव्यय उपलब्ध करुन दिलेला आहे त्यापैकी किती रक्कम खर्च झालेली आहे ? याबाबत सचिवांनी खुलासा केला की, सन २०१०-११ मध्ये २७९४ कोटी रुपये उपलब्ध करुन देण्यात आले होते. त्यापैकी २३२३ कोटी रुपये खर्च झालेले आहेत. परंतु ४०० कोटी रुपये ३१ मार्चला उपलब्ध झाल्यामुळे ते खर्च होऊ शकले नाहीत. तसेच ३१ मार्चला जे पैसे आलेले होते ते पैसे अखर्चित राहिल्यामुळे समर्पित करण्यात आलेले आहेत. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, आदिवासी विभागाचा निधी कशाही पद्धतीने खर्च केला जात आहे. कर्मचारी कमी असल्यामुळे या निधीवर कोणाचेही नियंत्रण राहिलेले नसल्यामुळे आदिवासींच्या पैशांची उधळपट्टी चालली आहे. बांधकाम व इतर खर्चासाठी दिलेला निधी वर्षभरात कसा खर्च करावयाचा याचे नियोजन विभागाने केले नव्हते काय, तसेच त्याचा पाठपुरावा सुद्धा केला नसल्याचे समितीचे मत आहे.

यासंदर्भात समितीने असे सूचित केले की, एकूण किती निधी मिळाला होता, आर्थिक वर्षाच्या शेवटच्या दिवशी ४०० कोटी रुपये मिळाले ते कोणत्या योजनेसाठी मिळाले होते, त्यासाठी कोणता पाठपुरावा केला होता, **मंत्री महोदयांनी हा निधी मिळावा म्हणून प्रयत्न न करता त्याच्या बदल्यात आपली आणखी चार कामे करुन घ्यावी असा पवित्रा मंत्र्यांनी घेतला होता काय यासंबंधीची माहिती प्राप्त झाली पाहिजे या अनुषंगाने विभागाने समितीला सविस्तर टिप्पणी द्यावी असे निदेश दिले. तथापि अद्याप ही समितीला सदर माहिती प्राप्त झालेली नाही.**

वर्षाच्या शेवटच्या दिवशी ४०० कोटी रुपये मिळाल्यामुळे ज्या योजनेसाठी हा पैसा मिळाला त्या योजनेतून काही कामे झाली असतील पण शेवटी पैसा आल्यामुळे तो खर्च झाला नाही म्हणून बीडीएस मधून हा खर्च दाखविला. पण अद्यापही अनेक आदिवासी जिल्ह्यातील कामांची देयके बाकी आहेत, याला जबाबदार कोण आहेत ? यावर विभागाने खुलासा केला की, बांधकामाची कोणतीही देयके बाकी नसून रस्त्याच्या कामाची बाकी आहेत.

समितीने अशी विचारणा केली की, गडचिरोली जिल्ह्यात २४ कोटी रुपये खर्चाचे कृषी महाविद्यालयाचे बांधकाम सुरु आहे. मागील दोन वर्षात त्या कामासाठी पैसेच मिळाले नाहीत, याचा अर्थ या कामाचे नियोजन योग्य प्रकारे केलेले नाही, हे खरे आहे काय ? तसेच उपरोक्त कामासाठी किमान पुरवणी मागणीच्या माध्यमातून तरी निधीची मागणी करणे

आवश्यक होते, पण तेही केलेले दिसत नाही. याबाबत सचिवांनी खुलासा केला की, पुरवणी मागणी विभागाने पाठविली होती पण ती मंजूर झाली नाही. त्यावर समितीने अशी विचारणा केली की, जो निधी शेवटच्या दिवशी प्राप्त झाल्याने तो प्रत्यार्पित करावा लागला. तो निधी परत मिळावा म्हणून विभागाने कोणते प्रयत्न केले त्यावर सचिवांनी खुलासा केला की, ही रक्कम जरी परत गेली तरी ७५ टक्के रक्कम अगोदरच खर्च झाली आहे.

यासंदर्भात समितीने असे मत व्यक्त केले की, पुरवणी मागणीच्या माध्यमातून निधीची मागणी करण्यात आली पण ती पुरवणी मागणी मंजूर झाली नाही, या प्रकरणाकडे समितीने विशेष गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. ३१ मार्चला ४०० कोटी रुपये मिळाल्यामुळे विभागाला ती रक्कम खर्च करता आली नाही, त्यानंतर सुद्धा पुरवणी मागणीच्या माध्यमातून मागील सहा महिन्यात विभागाला ही मागणी करुन ही प्रलंबितावस्था कमी करता आली असती, ती विभागाने केली नाही याचे कारण काय ? अशी समितीने विचारणा केली असता, विभागीय सचिवांनी खुलासा केला की, यासाठी यावर्षी ३४० कोटीचे बजेट होते. त्यातून आणखी १०० कोटीची प्रलंबितावस्था होती. तथापि, १०० कोटीची पुरवणी मागणी मंजूर झाली नाही. याबाबत समितीने असे मत व्यक्त केले की, आदिवासी भागासाठी देय असलेला जवळपास ७००० कोटी इतका निधी मागील ७ वर्षात शासनाने दिलेलाच नाही. याची अधिकाऱ्यांनासुद्धा चांगलीच जाण आहे पण ते बोलत नाहीत. पण अधिकाऱ्यांनी जर खरी माहिती दिली तर त्यांच्या नोकऱ्या जाणार नाहीत, पण तरी देखील ते माहिती द्यायला घाबरतात त्यामुळे असे प्रकार वारंवार घडत आहेत. ही परिस्थिती अत्यंत निंदाजनक आहे. अधिकारी म्हणून आपण देखील "ठेविले अनंते तैसेचि रहावे" अशी भूमिका बजवावयाची, काहीच बोलावयाचे नाही आणि काहीच करायचे नाही. राज्यातील आदिवासी उपाशी मरायला लागला तरी हरकत नाही. पण असे न करता आपल्यासारख्या अधिकाऱ्यांनी झेप मारुन तरतुदीमधला पैसा आणला पाहिजे. सामाजिक न्याय व आदिवासी विकास विभागावर समितीने नाराजी व्यक्त केली.

याबाबत वित्त विभागाच्या प्रतिनिधींनी असे अभिप्राय दिले की, प्रत्येक विभागाचे अनुदान मान्य होत नाही म्हणून अनेक तक्रारी आल्या होत्या, त्या अनुषंगानेच मुख्य सचिवांच्या निदेशानुसार वित्त (व्यय) विभागाचे सचिव यांच्याकडे दि. १३ ते १५ सप्टेंबर, २०११ या तीन दिवसात संबंधित अधिकाऱ्यांची बैठक घेण्यात आली. त्यानुसार १५ तारखेला आदिवासी विकास

विभागाच्या उप सचिवांशी देखील चर्चा झालेली आहे. त्याआधारे आदिवासी विकास विभागासाठी निधीची मागणी करता येईल.

समितीने असे मत व्यक्त केले की, आदिवासी विकास विभागाला ४०० कोटीची रक्कम जरी शेवटच्या दिवशी मिळाली असली तरी आताच वित्त विभागाने दिलेल्या माहितीनुसार अजुनही संधी आहे. त्यानुसार आपण आपल्या विभागासाठी निधीची मागणी करावी व आदिवासींवर होणारा अन्याय दूर करावा. तसेच आपल्या राज्यात टीएसपी आणि ओटीएसपी अशा दोन्ही भागात आदिवासींची संख्या विभागलेली आहे. पण ज्या जिल्ह्यात आदिवासींची संख्या कमी आहे अशा ओटीएसपी भागात मात्र सतत दुर्लक्ष होत राहते. अशाच प्रकारे आमच्या भागात आदिवासींसाठी राबवित असलेल्या व ५० टक्के सवलत असलेल्या एका योजनेसाठी लोकांनी ५० टक्के रक्कम दोन वर्षापूर्वीच भरुन टाकली. आज दोन वर्षाच्या वर कालावधी निघून गेला पण त्यांना उर्वरित पैसे मिळत नाहीत. वास्तविक मराठवाड्यातील काही भागात एक एका गावात ५०-५०, १००-१०० भिल्ल व पारधी समाजाचे लोक राहतात पण त्यांनाही अशा प्रकारे योजनांचा फायदा शासनाच्या व अधिकाऱ्यांच्या उदासिनतेमुळे मिळत नाही. मराठवाड्याच्या ५३ तालुक्यांसाठी एक प्रकल्प अधिकारी आणि एका किनवट तालुक्यासाठी स्वतंत्र प्रकल्प अधिकारी अशी दोनच प्रकल्प अधिकाऱ्यांची कार्यालये संपूर्ण मराठवाड्यासाठी आहेत, अशा परिस्थितीत आदिवासींचा विकास कसा होईल याचाही विचार शासनाने करणे अत्यावश्यक आहे. विदर्भात देवरी, चिमूर, अहेरी, भामरागड व गडचिरोली अशा संपूर्ण आदिवासी भागासाठी प्रकल्प अधिकाऱ्यांची कार्यालये आवश्यक तेवढी तर नाहीतच पण त्यातील देवरी व भामरागड येथील पदे तर रिक्तच आहेत. नाशिक अपर आयुक्त, आदिवासी विभाग यांच्या अखत्यारितील तीन प्रकल्प अधिकाऱ्यांची पदे रिक्त आहेत.

ज्याप्रमाणे समाज कल्याण अधिकाऱ्याचे प्रत्येक जिल्ह्याला एक कार्यालय आहे त्याच धर्तीवर प्रत्येक जिल्ह्याला एक आदिवासीचे कार्यालय आवश्यक आहे असे समितीने सूचीत केले.

मार्च २००७ अखेर ११७ संगणक प्रकल्प अधिकारी यांनी देखभाल न केल्याने नादुरुस्त अवस्थेत होते. तर ४६२ संगणक स्थापित केले नव्हते. याबाबत विभागाने पुढीलप्रमाणे खुलासा सादर केला :-

शासन आदिवासी विकास विभागांतर्गत कार्यरत असलेल्या शासकीय आश्रमशाळांपैकी २८८ शासकीय आश्रमशाळांना सन २००१-०२ ते २००४-०५ या वर्षात संगणक, प्रिंटर, युपीएस

व इतर संगणक फर्निचरचा पुरवठा करण्यात आलेला आहे. सदर संगणकाच्या हाताळणीबाबत शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना माहिती व ज्ञान उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने संबंधीत पुरवठादाराकडून पुरवठा झाल्यानंतर संगणकाच्या हाताळणीबाबत शासकीय आश्रमशाळेतील व कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांना प्रशिक्षण देण्यात आले होते.

सदर शासकीय आश्रमशाळांमध्ये माहिती व तंत्रज्ञानाचे संगणक प्रशिक्षण देण्यासाठी महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित, पुणे या महाराष्ट्र शासनाने पुरस्कृत केलेल्या संस्थेवर जबाबदारी सोपविण्यात आलेली आहे. संस्थेने पहिल्या फेरीत ११९ माध्यमिक शाळांवर पायाभूत सोयी असलेल्या व संगणक पुरवठा करण्यात आलेल्या माध्यमिक आश्रमशाळांतील संगणक तपासून ते अत्यंत चांगल्या स्थितीत सुरु असल्याचे तांत्रिक तज्ञांकडून तपासणी करुन दिले आहेत आणि सदर शाळांमध्ये महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांनी तयार केलेला इयत्ता ८ ते १२ वी पर्यंतच्या माहिती व तंत्रज्ञानविषयक अभ्यासक्रमानुसार ६ महिने कालावधीचा संगणक प्रशिक्षण कार्यक्रम पुर्ण करण्यात आला आहे. त्यानुसार पहिल्या फेरीत ११९ शाळांमधून १५५०७ विद्यार्थ्यांनी व ४४२ शिक्षकांनी ६ महिन्याचे प्रशिक्षण पूर्णतया प्राप्त केले आहे. तसेच दुसऱ्या टप्प्यातही महाराष्ट्र ज्ञान महामंडळ, पुणे या संस्थेकडून १३८ माध्यमिक आश्रमशाळेतील संगणकाची तपासणी करुन संगणक प्रशिक्षण सुरु करण्यास संगणक अद्ययावत आहेत असा अहवाल दिला आहे. सन २००५-०६ या शैक्षणिक वर्षात, संगणक प्रशिक्षण कार्यक्रमास मुदतवाढ देवून १३२ शासकीय माध्यमिक आश्रमशाळेतील १८०९१ विद्यार्थी व ३०७ शिक्षकांना महाराष्ट्र ज्ञान महामंडळ, पुणे या संस्थेमार्फत प्रशिक्षण दिलेले आहे. तसेच शासन निर्णय शाआशा-२००७/प्र.क्र.८६/का १३, दिनांकित १९/६/२००८ अन्वये शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना खाजगी संस्थांमार्फत संगणक अभ्यासक्रमावर आधारीत प्रशिक्षण देण्यासाठी मान्यता दिलेली आहे. त्यानुसार पुरविण्यात आलेल्या संगणकाचा प्रशिक्षणासाठी वापर करण्यात येत आहे.

पुरवठा केलेले सर्व संगणक संच कार्यान्वित करण्यात आले असून त्यांचा वापर करण्यात येत असल्याचे सर्व प्रकल्प अधिकारी यांनी आयुक्तालयास कळविलेले आहे.

१४७१ दुमजली खाटा आश्रमशाळांना केव्हा पुरविण्यात आल्या? मा.प्रधान सचिव आदिवासी विकास विभाग यांचे अशा. पत्र क्र.एएएस-२००३/सीआर १४९/डि १३/दिनांकित २८/८/२००३ अन्वये शासकीय आश्रमशाळा/वसतीगृहांना आवश्यक असणाऱ्या विविध सोयी

सुविधा पुरविणेबाबत शासनास आयुक्तालयाच्या दिनांक ३०/९/०३ रोजीच्या पत्रान्वये प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यात टु सिटर कॉट, कॉयर मॅट्रेस गाद्या, डायनींग टेबल, खेळ साहित्य, जनरेटर, टि.व्ही. इ. बाबी प्रस्तावित करण्यात आल्या होत्या. सदर प्रस्तावास शासनाने शासन निर्णय क्र.शाआशा-२००३/प्रक्र.१४९/का १३, दिनांक ११/११/०३ अन्वये मान्यता देवून निधी उपलब्ध करुन दिला होता. तसेच राज्यस्तरावर वेळोवेळी होणाऱ्या बैठकीत प्रकल्प अधिकारी यांनी शासकीय आश्रमशाळांसाठी टू सिटर कॉट पुरविण्याबाबत केलेल्या मागणीनुसार शासकीय आश्रमशाळा व वसतीगृहासाठी टू सिटर कॉट कारागृहाकडून खरेदी करण्यात आलेले असून अपर आयुक्त यांचेकडून सर्व प्रकल्पाची शासकीय आश्रमशाळानिहाय प्राप्त मागणीनुसार मार्च २००४ मध्ये खरेदी करण्यात येऊन पुरवठा करण्यात आलेले आहेत. ज्या शाळांमध्ये बहुउद्देशिय हॉलचे बांधकाम पुर्ण होवून त्याठिकाणी वसतीगृहांची व्यवस्था आहे अशा शासकीय आश्रमशाळांना पुरवठा करण्यात आलेल्या कॉटचा वापर करण्याबाबत संबंधित प्रकल्प अधिकारी यांना सूचना देण्यात आलेल्या होत्या. त्यानुसार परिच्छेदात नमुद डबल डेकर कॉटस् सह पुरवठा केलेल्या सर्व डबल डेकर कॉटस् उपयोगात आणले आहेत.

अपर आयुक्त व प्रकल्प अधिकारी यांनी वेळोवेळी शासकीय आश्रमशाळा व वसतीगृहांतील विद्यार्थ्यांसाठी आवश्यक असलेल्या कॉयर मॅट्रेस गाद्यांची मागणी आयुक्तालयाकडे नोंदिविल्यानंतरच गाद्यांचा पुरवठा आयुक्तालयाकडून करण्यात आलेला आहे.

वसतीगृह सुविधा उपलब्ध नसलेल्या शासकीय आश्रमशाळांमध्ये ज्या वर्ग खोल्यांमध्ये विद्यार्थी निवास व्यवस्था केलेली आहे अशा विद्यार्थ्यांना रात्री झोपण्यासाठी कॉयर मॅट्रेस वापरण्याबाबत सर्व मुख्याध्यापकांना प्रकल्पस्तरावरुन सूचना देण्यात येवून त्यानुसार गाद्यांचा वापर करण्यात येत आहे. त्यानुसार परिच्छेदात नमुद ५०० कॉवर मॅट्रेसेसह पुरवठा केलेल्या सर्व कॉयर मॅट्रेसेस उपयोगात आणण्यात आल्या असल्याचे सर्व प्रकल्प अधिकारी यांनी आयुक्तालयास कळविलेले आहे.

शासनाने विनिर्दीष्ट केलेल्या आराखड्याप्रमाणे आश्रम शाळांना सोयीसुविधा पुरविण्यात येतात किंवा नाही याची तपासणी करण्यात येते काय, त्यासाठी काही विशेष यंत्रणा आहे काय? याबाबत सचिवानी खुलासा केला की, शासनाने विनिर्दिष्ट केलेल्या आराखड्याप्रमाणे आश्रमशाळांना सोयी-सुविधा पुरविण्यात येतात किंवा नाही याबाबतची तपासणी करण्यात येते. सदरची तपासणी करण्यासाठी या विभागाची स्वतंत्र यंत्रणा उपलब्ध नाही. सदर शाळांची

तपासणी करण्यासाठी प्रकल्प स्तरावर केंद्रप्रमुख, शिक्षण विस्तार अधिकारी, सहाय्यक प्रकल्प अधिकारी (शिक्षण व प्रशासन) व प्रकल्प अधिकारी वेळोवेळी भेटी देवून पहाणी करुन त्रुटी निदर्शनास आणून देतात व सदर त्रुटींची पूर्तता करणेबाबत संबधितास अवगत केले जाते. तसेच अपर आयुक्त, आदिवासी विकास हे ही भेटी देतात.

तसेच राज्यातील सर्व अनुदानित आश्रमशाळांची दरवर्षी अचानक तपासणी करवून घेतली जाते व प्राप्त तपासणी अहवालानुसार "अ", "ब", "क" व "ड" या प्रमाणे श्रेणी दिली जाते. ज्या आश्रमशाळा सतत तीन वर्षे "ड" श्रेणीत येतात अशा आश्रमशाळांची मान्यता रद्द केली जाते.

सन २०१०-११ या वर्षाच्या तपासणीनुसार एकूण ५५६ आश्रमशाळांपैकी १४५ आश्रमशाळांना "अ" प्रतवारी ३८६ आश्रमशाळांना "ब" प्रतवारी, १२ आश्रमशाळांना "क" प्रतवारी देण्यात आलेली आहे व "ड" प्रतवारी मध्ये कोणतीही शाळा नसून १३ आश्रमशाळांचे अहवाल अप्राप्त आहेत.

पुरेशा प्रमाणात सोयी सुविधा उपलब्ध करुन न देणाऱ्या किती आश्रमशाळांवर कार्यवाही करण्यात आली याची तपशीलवार माहिती देण्याबाबत समितीने सुचित केले असता सचिवांनी खुलासा केला की, ज्या अनुदानित आश्रमशाळांमध्ये विद्यार्थ्यांना शासन निर्णयाप्रमाणे सोयी सुविधा उपलब्ध करुन दिल्या जात नाहीत, अशा अनुदानित आश्रमशाळांना आयुक्तालयाचे स्तरावरुन कारणे दाखवा नोटीस बजावून संस्थेचा खुलासा प्राप्त करुन घेतला जातो. संस्थेने सादर केलेल्या खुलाशावर संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प व संबंधित अपर आयुक्त, आदिवासी विकास यांचेकडून अभिप्राय मागविले जातात. संस्थेने सादर केलेला खुलासा व त्यावर प्रकल्प अधिकारी व अपर आयुक्त यांनी सादर केलेले अभिप्राय तसेच सुनावणीच्या वेळी संस्थेने मांडलेली बाजू व सादर केलेली कागदपत्रे या सर्व गोष्टी विचारात घेऊन शाळेची मान्यता रद्द करण्यात आली आहे.

आयुक्त, आदिवासी विकास यांनी मान्यता रद्द केलेल्या ५९ आश्रमशाळांपैकी ५८ आश्रमशाळांच्या संस्था चालकांनी शासनाकडे अपिल दाखल केले. सदर अपिलावर मा.मंत्री महोदयांकडे सुनावणी होऊन ४९ आश्रमशाळांना मुदतवाढ देण्यात आलेली असून ६ शाळांचे तपासणी अहवाल सादर करण्याबाबत शासनाने आदेश दिलेले आहेत. १ शाळेने शासनाकडे

अपिल सादर केलेले नाही. तसेच २ आश्रमशाळांची मान्यता रद्द केली असुन १ शाळेच्या अपिलावरील सुनावणी झालेली नाही.

शासनाने मुदतवाढ दिलेल्या आश्रमशाळांची विहीत मुदतीनंतर संबंधित प्रकल्प अधिकारी व अपर आयुक्त यांनी तपासणी करुन त्यांचे स्वयंस्पष्ट अभिप्रायासह अहवाल आयुक्तालयामार्फत शासनास सादर करावयाचे निर्देश दिलेले आहेत त्यानुसार आयुक्तालयाचे स्तरावरुन संबंधित प्रकल्प अधिकारी व अपर आयुक्त यांना सदर शाळांची स्वत: तपासणी करुन स्वयंस्पष्ट अहवाल सादर करण्याबाबत कळविण्यात आलेले आहे.

विशेष कृती आराखड्याची कार्यक्रमाची अंमलबजावणी निकृष्ट होती काय, याबाबत सचिवांनी खुलासा केला की, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शासन निर्णय क्रमांक टिएसपी-२००४/प्र.क्र.३८/का.६, दिनांक २४/८/२००४ या शासन निर्णयान्वये नंदुरबार जिल्ह्यांतील अतिमागसलेल्या अक्कलकुवा व धडगांव तालुक्यांचा विशेष कृती कार्यक्रम सन २००३-०४ ते २००७-०८ या वर्षाकरिता मंजुर करण्यांत आला होता. तथापि धडगांव व अक्कलकुवा हे दोन्ही तालुके अतिदुर्गम डोंगराळ असल्यामुळे योजना राबवितांना अनेक अडचणीमुळे काही योजनांची अंमलबजावणी विहित कालावधीत पुर्ण करणे यंत्रणांना शक्य झालेले नाही. त्यामुळे विशेष कृती कार्यक्रमांस आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी त्यांचे शासन क्रमांक विकृका-२००६/प्र.क्र.४५/(भाग-२)/का-६, दिनांकित १७ डिसेंबर, २००९ अन्वये सर्वकष विचार करुन सन २००८-०९ ते २०११-१२ या कालावधीसाठी मुदतवाढ देऊन योजनांची अंमलबजावणी पूर्ण करण्याबाबत निर्देशित केले आहे.

परिच्छेद क्रमांक १ यात नमूद केल्याप्रमाणे विशेष कृती कार्यक्रम राबविणेबाबत एकूण १ ते ११ विविध योजना मंजूर करण्यात आल्या असून, त्यांना खालीलप्रमाणे नियतव्यय मंजूर करण्यांत आला आहे त्याचा तपशिल खालीलप्रमाणे :-

१	कृषि, फलोत्पादन, पशुसंवर्धन व दुग्धविकास	१०१६.०८
२	वने	२५३.८४
३	पाटबंधारे	३१०४.९६
४	विद्युत विकास	४२५०.००
५	आरोग्य सेवा	३२५०.००
६	रस्ते विकास	५२५९.००

७	सामान्य शिक्षण	१४०.४०
८	ग्रामीण पाणीपुरवठा	६८९.७८
९	मागासवर्गीय कल्याण	३६४८.४९
१०	आदिवासी विद्यार्थ्यांना व्यवसाय प्रशिक्षण	३०२.४०
११	पोषण	३५३.५०
	एकूण मंजूर नियतव्यय	**२२२६८.४५**

वरीलप्रमाणे सर्व योजनांकरिता रुपये २२२६८.४५ लक्ष निधी वर्षनिहाय मंजुर केला आहे. भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा सन २००६-०७ च्या नागरी अहवालानुसार घेतलेला आक्षेपातील रक्कम रुपये ४०.९१ कोटी इतका निधी वाटप असल्याचे कळविले आहे. प्रत्यक्षात सामान्य शिक्षणासाठी रुपये १४०.४० लक्ष, मागासवर्गीय कल्याण करिता रुपये ३६४८.४९ लक्ष आणि आदिवासी विद्यार्थ्यांना व्यवसाय प्रशिक्षण या योजनेसाठी रुपये ३०२.४० असे मिळूण एकुण रुपये ४०९१.२९ लक्ष मंजुर नियतव्यय आहे.

प्रत्यक्षात या सर्व योजनांना माहे मार्च २००८ अखेर पावेतो अनुक्रमे ८८.६९ लक्ष, २०३२.३२ लक्ष आणि ०.०० लक्ष याप्रमाणे एकूण प्राप्त निधी रुपये २१२०.९१ लक्ष आहे.

प्राप्त तरतुदीशी एकूण खर्चाची टक्केवारी ७३.२१ टक्के आहे. सन मार्च-२०१० व मार्च-२०११ चा खर्च हा फक्त मागासवर्गीय कल्याण अंतर्गत शिक्षणावर झालेला असून तो अनुक्रमे रुपये ३९.९० लक्ष आणि रुपये २२.६५ लक्ष झाला असून एकूण दोन्ही मिळून रुपये ६२.५५ लक्ष खर्च झाला आहे. हा खर्च रुपये ६२.५५ लक्ष आणि माहे मार्च-२००८ अखेर झालेला एकूण खर्च रुपये १५५२.७० लक्ष मिळून एकूण खर्च रुपये १६१५.२५ इतका शैक्षणिक योजनांवर करण्यांत आला आहे. म्हणजेच प्राप्त तरतुदीशी खर्चाची टक्केवारी ही ७६.१६ अशी आहे. सन २०११-१२ मध्ये सर्व प्रलंबित कामांवर प्राप्त तरतुद व शिल्लक तरतुदीच्या अनुषंगाने खर्च होणे अपेक्षित आहे.

प्रत्यक्षात प्राप्त झालेल्या अनुदानानुसार उक्त नमुद तीन योजनांची खर्चाची टक्केवारी ७६.१६ टक्के अशी आहे. तेव्हा झालेल्या खर्चाच्या अनुषंगाने वस्तुस्थिती विचारात घेता अंमलबजावणीबाबत योग्य ती प्रभावी कार्यवाही करण्यात आली आहे.

अभिप्राय व शिफारशी :

आदिवासी संशोधन प्रशिक्षण संस्था, पुणे या संस्थेचे श्री.ए.के.झा हे प्रमुख असून जात पडताळणी समितीचे ते अध्यक्ष आहेत. दिनांक ८ जून, रोजी आढावा घेतला व त्यानंतर लाभधारकांच्या समुहांची ओळख पटण्यासाठी सर्वेक्षण करण्याबाबत सूचना देण्यात आल्या. सर्वेक्षणाच्या कार्यपद्धतीविषयी आणि सर्वेक्षण किती वर्षानंतर करावयाचे असते यासंदर्भात विभागीय सचिवांनी १० वर्षानंतर सर्वेक्षण केले जाते अशी माहिती दिली. **आदिवासी संशोधन केंद्राच्या अधिकाऱ्यांना सूचना कधी दिल्या आणि त्यांनी सर्वेक्षण सुरु केले का, त्यांच्याकडे अर्थसंकल्पीय तरतूद आहे का, त्यांना तरतूद कमी पडत असेल तर शासनाने मदत केली का, याची माहिती त्यांच्याकडून घ्यावी व सदर माहिती समितीला तात्काळ पाठवावी अशी समितीची शिफारस आहे.**

खाजगी संस्थांमार्फत ज्या आश्रमशाळा चालविल्या जातात त्यांचे लेखापरिक्षण तसेच त्या संस्थेला पैसे देण्यापूर्वी आदिवासी विद्यार्थ्यांना ज्या सुविधा उपलब्ध करुन द्यावयाच्या आहेत त्याबाबत १०० टक्के पर्यवेक्षण (supervision) केले जात असून याबाबत मोहिम राबविली होती अशी माहिती विभागिय सचिवांनी समितीला दिली. मध्यंतरी सोयी नसल्यामुळे काही शाळा रद्द केल्या. यासंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांमार्फत जी तपासणी केली गेली त्यामध्ये ५९ आश्रमशाळा निकष पूर्ण करणाऱ्या नव्हत्या. त्यापैकी पुन:स्थापित केलेल्या शाळांची माहिती साक्षीच्या वेळी विभागिय सचिवांना देता आली नाही. आश्रमशाळांच्या तपासणीच्या घटनेला ३-४ महिन्यांचा कालावधी होऊन गेला आहे. साक्षीच्या वेळी विभागिय सचिवांनी इत्यंभूत माहिती घेऊन उपस्थित राहणे गरजेचे होते. खात्याकडे असलेल्या तपासणी यंत्रणेमार्फत आश्रमशाळांची तपासणी केली असता, त्यावेळी संबंधितांना त्रुटी आढळून आल्या नाहीत. मात्र जिल्हाधिकारी कार्यालयाने यासंबंधी तपासणी केल्यानंतर त्यांना आश्रमशाळेमध्ये अनेक त्रुटी आढळून आल्या. याबाबत समितीने नाराजी व्यक्त केली. **मंत्री पातळीवर स्थगिती देऊन, काही आश्रमशाळा पुन्हा सुरु झाल्या आहेत. ५९ आश्रमशाळांचे अनुदान रद्द केल्यानंतर, त्यांनी अपील केले. त्यानंतर किती दिवसांच्या कालावधीत त्या आश्रमशाळांना परवानगी देण्यात आली व अजून किती आश्रमशाळा बंद आहेत, यासंबंधीची सविस्तर माहिती समितीला तात्काळ पाठविण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

काही आश्रमशाळांमध्ये शिक्षणाची व राहण्याची व्यवस्था वेगवेगळी केलेली आहे. या संदर्भात गडचिरोली प्रकल्पासंबंधी माहिती समितीने विचारली असता विभागिय सचिवांकडे

सदर माहिती उपलब्ध नव्हती. एकूण ५५२ शासकीय आश्रमशाळा आहेत. त्यापैकी ४४१ आश्रमशाळांसाठी जमीन प्राप्त झाली आहे. ४४१ पैकी ९५ आश्रमशाळांची कामे पूर्ण झाली आहेत. टप्पा क्र.१ पूर्ण झाला असून टप्पा क्र.२ मध्ये १८१ आश्रमशाळा आहेत. त्यात ५८ पैकी २० कामे पूर्ण झाली आहेत. या संदर्भात दर महिन्याला आढावा घेतला जातो. तसेच १११ आश्रमशाळांना जमिनी प्राप्त झालेल्या नाहीत. प्रशासकीय मान्यता मिळालेली असतांनासुद्धा आश्रमशाळांची कामे सुरु झाली नाहीत याविषयी विभागिय सचिवांनी "काही ठिकाणी आश्रमशाळांसाठी जागा उपलब्ध नाहीत, त्यासंबंधी न्यायालयात दावे सुरु आहेत" असे सांगितले. **यासंदर्भात पाठविण्यात आलेल्या पत्रांची माहिती समितीला सादर करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

राज्यात "हवाई सुंदरी" च्या संदर्भात दोन वर्षे योजना सुरु होती. परंतु त्या योजनेतंर्गत एकही आदिवासी मुलगी हवाई सुंदरी होऊ शकली नाही. हवाई सुंदरीच्या प्रशिक्षणासाठी बारावी उत्तीर्ण असायला पाहिजे अशी अट होती. मात्र प्रत्यक्षात हवाई सुंदरीच्या प्रशिक्षणासाठी उमेदवार पदवीधर असणे अत्यावश्यक आहे. त्यामुळे ज्या मुली या योजनेत सहभागी झाल्या होत्या, त्या हवाई सुंदरी होऊ शकल्या नाहीत, सदर योजनेत आदिवासी विद्यार्थींनी सहभागी झाल्या होत्या. म्हणून त्यांना इयत्ता बारावी नंतर डी.एड. कोर्स करता आला नाही. त्यामुळे त्यांना शिक्षक सुध्दा होता आले नाही. शिवाय जात पडताळणी करीत असताना डीएनए टेस्टचा मुद्या उपस्थित झाला होता. कोणतीही योजना असो, ती प्रत्यक्षात व्यवहार्य (Practically Feasible) असणे अत्यावश्यक आहे. परंतु योजना तयार करीत असताना, त्यात **विद्यार्थ्यांना नव्हे तर शैक्षणिक संस्थांना फायदा कसा होईल याचा जास्त विचार केला जातो. त्यात आदिवासी विद्यार्थी हा मूळ उद्देश असल्याचे दिसून येत नाही. याप्रकरणी सदर योजना सुधारित करण्यात यावी तसेच आदिवासीसाठींच्या काही योजना बंद पडल्या असतील, त्यात काही त्रुटी असतील तर त्या दूर करुन पुन्हा सुरु कराव्यात अशी समितीची शिफारस आहे.**

आश्रमशाळा आणि वसतिगृहांसाठी पदे भरली जात नसल्यामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होत आहे. खरे म्हणजे पदे भरण्याच्या संदर्भात नियोजन नसल्यामुळेच विद्यार्थ्यांचे नुकसान होत आहे. एकूण वसतिगृहे आणि आश्रमशाळांपैकी ५७ वसतिगृहे आणि आश्रमशाळेची बांधकामे पूर्ण झाली असून ७७ आश्रमशाळांची बांधकामे सुरु करण्यात आली आहेत. ज्या

आश्रमशाळा सुरु झाल्या आहेत तेथे आहे त्याच कर्मचाऱ्यांना अतिरिक्त कार्यभार देऊन सुरु करण्यात आल्या आहेत. आश्रमशाळा आणि वसतिगृहातील पदे भरण्याच्या संदर्भात विभागाकडून पाठपुरावा कमी पडतो आहे तसेच जे कर्मचारी सेवानिवृत्त होत असतात त्यांची पदे सुद्धा रिक्त होणार आहेत त्यामुळे याकडे सुध्दा लक्ष दिले गेले पाहिजे. कालबद्ध कार्यक्रम आखून पदे भरण्याच्या संदर्भात कार्यवाही करणे आवश्यक आहे. **सर्व कामांसाठी विभागाकडे निधी सुद्धा उपलब्ध आहे. पदे भरण्यासाठी विलंब झाला तर विद्यार्थ्यांचे नुकसान होईल. मुलांचे जीवन उध्वस्त होणार नाही याकडे लक्ष असले पाहिजे. तेव्हा यासंदर्भात मुख्य सचिवांबरोबर समन्वय ठेवून रिक्त पदे भरण्याच्या संदर्भातील कार्यवाही करावी, अशी समितीची शिफारस आहे.**

राज्यात सामाजिक न्याय विभागाच्या अखत्यारित असलेल्या योजनांची अंमलबजावणी कशी झाली. सामाजिक न्याय विभागासाठी असलेल्या निधीची रक्कम कोणत्या जिल्ह्यात १०० टक्के खर्च झाली याची जिल्हानिहाय माहिती तीन महिन्याच्या आत समितीला पाठविण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन आणि प्रशिक्षण (बार्टी) दोन वर्षापूर्वी राज्य शासनाच्या अखत्यारित होती पण आता तिला स्वायत्ततेचा दर्जा दिलेला असून यामध्ये संशोधन व प्रशिक्षण सुद्धा दिले जाते. अनेक गावातून आदिवासी मुलांसाठी वसतिगृहे व आश्रमशाळा बांधल्या जातात. परंतु, त्या ठिकाणी शिक्षण घेण्यासाठी विद्यार्थी येतच नाहीत त्यामुळे तालुक्याच्या ठिकाणी अशा प्रकारची वसतिगृहे किंवा आश्रमशाळा बांधणे आवश्यक आहे. "बार्टी" ही संस्थाच हे सर्व्हेक्षणाचे काम करते. पण या संस्थेकडे एक संचालक, दोन प्राध्यापक आणि दोन सहयोगी प्राध्यापक व एक शिपाई असा अपुरा कर्मचारीवर्ग आहे. पण हे काम फार मोठे असल्याने यशदाच्या मदतीने पूर्ण करुन घेण्यात येत आहे. **"बार्टी" या संस्थेला विद्यमान वर्षी २० कोटींची अर्थसंकल्पीय तरतूद केली आहे. याचा अर्थ कर्मचारी वर्ग कमी आणि खर्च मात्र भरपूर दिसतो. जर संस्था बाह्यमार्गाने (Out sourcing) काम करुन घेते तर त्या मानाने २०-२० कोटीचा खर्च जास्त वाटत नाही काय, तेव्हा या संस्थेच्या एकूण कार्यपद्धती विषयीची सविस्तर माहिती समितीला तीन महिन्याच्या आत पाठविण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

राज्यात जिल्हास्तरीय विविध योजनांची अंमलबजावणी किती जिल्ह्यांमध्ये करण्यात आली व त्याची टक्केवारी किती, तसेच या योजना यशस्वी होण्यासाठी काय उपायोजना शासनाकडून येणारी एकूण रक्कम भागिले जिल्ह्यांची संख्या असा विचार केला तर प्रत्येक जिल्ह्याला लोकसंख्येच्या प्रमाणात जो निधी मिळतो त्याचा विनियोग योग्य प्रकारे केला जातो काय ? याबाबत जसजसे प्रकल्प राबविण्याचे ठरले तसतशी जिल्हानिहाय तरतूद केले जाते. **सन २००६ पासून प्रत्येक जिल्ह्यात किती निधी दिला व त्यातून किती खर्च झाला त्यांसबंधीची चालू वर्षासह दोना वर्षांची सविस्तर माहिती समितीला तीन महिन्याच्या आत पाठविण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

इयत्ता पाचवी ते सातवी मधील मुलींच्या शिष्यवृत्तीसाठीची योजना समाज कल्याण अधिकारी गट-अ, जिल्हा परिषद यांच्यामार्फत राबविली जाते पण सर्व शाळांचे प्रस्ताव विहित मुदतीत सादर केले जात नसल्याने अनेकदा मंजूर तरतुदीपेक्षा कमी खर्च होतो. पण हे कारण समितीला मात्र संयुक्तीक वाटत नाही. कारण **जिल्हा परिषदेच्या शिक्षण समितीचा सभापती किंवा मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे खाजगी शाळांचा कल अनुदान मागण्याचाच असतो. म्हणून या संपूर्ण योजनेची अंमलबजावणी कशी झाली याची मागिल २ वर्षाची माहिती समितीला तीन महिन्याच्या आत द्यावी अशी समितीची शिफारस आहे.**

जिल्हा स्तरावरील अधिकारी अथसंकल्पातील तरतुदी विहित कालावधीत समर्पित करीत नाहीत. त्यामुळे त्याचे पुनर्विनियोजन करणे अशक्य होते. त्यामुळे खर्च कमी होतो. "नियमाने ही रक्कम ठेवता येत नाही तरी सुद्धा ही रक्कम तशीच ठेवण्यात येते. ही जिल्हा परिषदेची योजना असून जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या नियंत्रणाखाली हे अधिकारी काम करीत असल्याने खात्याचा ताळेबंद ज्या अधिकाऱ्यांना राखता येत नाही त्या अधिकाऱ्यांवर जिल्हापरिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडूनच कारवाई केली जाते. एखाद्या जिल्ह्याने पाच लाख रुपयाचे वाटप करावयास पाहिजे परंतु संबंधित अधिकाऱ्याने ही रक्कम वाटली नाही त्यामुळे ती रक्कम तशीच शिल्लक राहिली. ज्या जिल्ह्याच्या विद्यार्थ्यानी रकमेची मागणी केलेली आहे आणि ज्या जिल्ह्याला या रकमेची गरज आहे त्या जिल्ह्याला रक्कम कमी पडल्यामुळे सर्वाना ती रक्कम देता येत नाही साहजिकच त्या जिल्ह्यातील विद्यार्थी या योजनेपासून वंचित राहतात याची अधिकाऱ्यांना जाणीव नाही. या बाबीकडे अधिकारी नेहमीच दुर्लक्ष करीत असतात त्यांना कोणीही विचारु शकत नाही **अधिकाऱ्यांनी जर वेळीच ही**

रक्कम समर्पित केली असती तर विद्यार्थ्यांना ती रक्कम मिळाली असती परंतु तसे झालेले नाही अशा अधिकाऱ्यांच्या नावाची यादी समितीला तीन महिन्याच्या आत पाठविण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

अस्वच्छ व्यवसायात काम करीत असलेल्या पालकांच्या मुलांना मॅट्रीक पूर्व शिष्यवृत्ती देण्याची एक योजना आहे. परंपरागत अस्वच्छ व्यवसायात उदा. सफाईगार. कातडी सोलणे या सारख्या व्यवसायात काम करणाऱ्या पालकांच्या मुलांना ही शिष्यवृत्ती दिली जाते. परंतु पालक अस्वच्छ व्यवसाय करीत असल्याचे प्रमाणपत्र दिले जात नाही त्यामुळे या पालकांच्या विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळत नाही. ग्रामीण भागात सरपंच आणि नागरी भागात नगरसेवक प्रमाणपत्र देण्यास सक्षम आहेत. नागरी भागात ही योजना असून त्याकरिता जातीची अट नाही. **नागरी भागामध्ये नगरसेवकांना आणि ग्रामिण भागात सरपंचाना अशा प्रकारचे प्रमाणपत्र देता येत असल्याची माहिती सचिवांनी दिली. त्यासंबंधीच्या परिपत्रकाची प्रत समितीला तीन महिन्याच्या आत पाठविण्यात यावी. अशी समितीची शिफारस आहे.**

भंडारा जिल्ह्यात आढावा बैठक घेण्यात आली. त्यात अपंग विद्यार्थ्यांना गेल्या दोन, तीन वर्षापासून शिष्यवृत्तीच दिली गेलेली नाही ही बाब प्रकर्षाने निदर्शनास आली आहे. अपंगांना शिष्यवृत्ती देण्याचे काम अपंग आयुक्तालयामार्फत होत असते. त्या आयुक्तालयाचे आयुक्त हे म्हसुरीला प्रशिक्षणासाठी गेले असल्यामुळे त्या आयुक्तांचा तात्पुरता पदभार सामाजिक न्याय विभागाच्या सचिवांकडे सोपविण्यात आलेला आहे. **भंडारा जिल्ह्यातील ज्या शाळांतील अपंग विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ मिळाला नाही तर त्या शाळांची चौकशी करण्यात यावी व याप्रकरणी जे जबाबदार आहेत त्यांचेविरुद्ध कडक कारवाई करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्याच्या आत द्यावी अशी समितीची शिफारस आहे. त्याचप्रमाणे अपंग विद्यार्थ्यांना देण्यात आलेली शिष्यवृत्तीची जिल्हानिहाय यादी समितीला सादर करण्यात यावी अशीही समितीची शिफारस आहे.**

सधन नसलेल्या अपंग विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा फायदा योग्य प्रकारे मिळत नाही. तथापि कागदोपत्री या योजनेवर अमुक एक निधी खर्च केला असल्याचे दाखविले जाते. अपंग विद्यार्थ्यांवर किती खर्च करण्यात आला याची सविस्तर माहिती विभागीय सचिवांना साक्षीच्या वेळी देता आली नाही. **केंद्र शासनाकडून या योजनेसंबंधीचा जो निधी प्राप्त झाला, त्या निधीच्या खर्चासंबंधीचे अभिलेखे महालेखाकार यांना विभागाने सादर केलेले नाहीत. ते का**

सादर केले नाही, यांची माहिती देखील विभागाच्या अधिकाऱ्यांकडे उपलब्ध नव्हती सबब या संबंधीची सविस्तर माहिती समितीला सादर करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

परदेशी शिक्षण घेणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांकरिता असलेली शिष्यवृत्ती कधी सुरु करण्यात आली. या योजनेसंबंधीची सविस्तर माहिती तसेच आतापर्यंत किती मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी या शिष्यवृत्तीचा लाभ घेऊन परदेशी अभ्यासक्रम पूर्ण केलेला आहे याची सविस्तर माहिती समितीला सादर करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

सन २००५ ते सन २०१० या वर्षात मान्यता रद्द केलेल्या वसतिगृहांची संख्या एकूण २२ असून ज्या वेळेस लेखापरीक्षण करण्यात आले, त्याचवेळेस वसतीगृहाच्या संबंधातील स्पष्टीकरण विभागाने केले नाही ? याबाबत विभागीय सचिवांनी "शासकीय वसतिगृहे व अनुदानित वसतिगृहांमधील सदरहू सुविधांबाबतची माहिती सादर करण्याबाबत सर्व विभागीय समाजकल्याण अधिकारी यांना कळविण्यात आले आहे. तसेच, ज्या अनुदानित वसतिगृहांमध्ये त्रुटी आढळून आलेल्या आहेत, अशा वसतिगृहांची मान्यता रद्द करण्याचे प्रस्ताव सादर करण्याबाबत अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नांदेड, नंदुरबार व नाशिक यांना कळविण्यात आलेले आहे. तसेच, सन २००५ ते सन २०१० या वर्षात मान्यता रद्द केलेल्या वसतिगृहांची संख्या २२ इतकी आहे." अशी माहिती दिली. **वसतिगृहे प्रमाणपद्धतीनुसार नाहीत (As per norms) असा महालेखापालांचा जो आक्षेप आहे. त्यासंदर्भात विभागाने कोणती कार्यवाही केलेली आहे त्याची माहिती समितीला तात्काळ सादर करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

आदिवासी विभागाला सन २०१०-११ मध्ये २७९४ कोटी रुपये उपलब्ध करुन देण्यात आले होते. त्यापैकी २३२३ कोटी रुपये खर्च झालेले आहेत. परंतु ४०० कोटी रुपये ३१ मार्चला उपलब्ध झाल्यामुळे ते खर्च होऊ शकले नाहीत. तसेच ३१ मार्चला जे पैसे आलेले होते ते पैसे अखर्चित राहिल्यामुळे विभागाने समार्पित केले आहेत. आदिवासी विभागाचा निधी कशाही पद्धतीने खर्च केला जात आहे. कर्मचारी कमी असल्यामुळे या निधीवर कोणाचेही नियंत्रण राहिलेले नसल्यामुळे आदिवासींच्या पैशांची उधळपट्टी चालली आहे. बांधकाम व इतर खर्चासाठी दिलेला निधी वर्षभरात कसा खर्च करावयाचा याचे नियोजन विभागाने केले नव्हते तसेच त्याचा पाठपुरावा सुद्धा केला नसल्याचे समितीचे मत आहे. यासंदर्भात समितीने असे सूचित केले की, एकूण किती निधी मिळाला होता, आर्थिक वर्षाच्या शेवटच्या दिवशी ४००

कोटी रुपये मिळाले ते कोणत्या योजनेसाठी मिळाले होते, त्यासाठी कोणता पाठपुरावा केला होता, **मंत्री महोदयांनी हा निधी मिळावा म्हणून प्रयत्न न करता त्याच्या बदल्यात आपली आणखी चार कामे करुन घ्यावी असा पवित्रा मंत्र्यांनी घेतला होता काय यासंबंधीची माहिती प्राप्त झाली पाहिजे या अनुषंगाने विभागाने समितीला सविस्तर टिप्पणी द्यावी अशी समितीची शिफारस आहे.**

आदिवासी विकास विभागाला ४०० कोटीची रक्कम जरी शेवटच्या दिवशी मिळाली असली तरी वित्त विभागाने दिलेल्या माहितीनुसार अजुनही संधी आहे. त्यानुसार सामाजिक न्याय विभागाने निधीची मागणी करावी व आदिवासींवर होणारा अन्याय दूर करावा. तसेच राज्यात टीएसपी आणि ओटीएसपी अशा दोन्ही भागात आदिवासींची संख्या विभागलेली आहे. पण ज्या जिल्ह्यात आदिवासींची संख्या कमी आहे अशा ओटीएसपी भागात मात्र सतत दुर्लक्ष होत राहते. अशाच प्रकारे मराठवाड्यात आदिवासींसाठी राबवित असलेल्या व ५० टक्के सवलत असलेल्या एका योजनेसाठी लोकांनी ५० टक्के रक्कम दोन वर्षापूर्वीच भरुन टाकली. आज दोन वर्षाच्यावर कालावधी निघून गेला पण त्यांना उर्वरित पैसे मिळत नाहीत. वास्तविक मराठवाड्यातील काही भागात एक एका गावात ५०-५०, १००-१०० भिल्ल व पारधी समाजाचे लोक राहतात पण त्यांनाही अशा प्रकारे योजनांचा फायदा शासनाच्या व अधिकाऱ्यांच्या उदासिनतेमुळे मिळत नाही. मराठवाड्याच्या ५३ तालुक्यांसाठी एक प्रकल्प अधिकारी आणि एका किनवट तालुक्यासाठी स्वतंत्र प्रकल्प अधिकारी अशी दोनच प्रकल्प अधिकाऱ्यांची कार्यालये संपूर्ण मराठवाड्यासाठी आहेत, अशा परिस्थितीत आदिवासींचा विकास कसा होईल याचाही विचार शासनाने करणे अत्यावश्यक आहे. विदर्भात देवरी, चिमूर, अहेरी, भामरागड व गडचिरोली अशा संपूर्ण आदिवासी भागासाठी प्रकल्प अधिकाऱ्यांची कार्यालये आवश्यक तेवढी तर नाहीतच पण त्यातील देवरी व भामरागड येथील पदे तर रिक्तच आहेत. अपर आयुक्त, आदिवासी विभाग, नाशिक यांच्या अखत्यारितील तीन प्रकल्प अधिकाऱ्यांची पदे रिक्त आहेत. **सबब, देवरी, भामरागड येथील रिक्त प्रकल्प अधिकाऱ्यांची पदे तसेच अप्पर आयुक्त, आदिवासी विभाग, नाशिक यांच्या अखत्यारितील तीन प्रकल्प अधिकाऱ्यांची रिक्त असलेली पदे तात्काळ करण्यात यावीत. तसेच ज्याप्रमाणे विशेष समाज कल्याण अधिकाऱ्याचे प्रत्येक जिल्ह्याला एक कार्यालय आहे त्याच धर्तीवर प्रत्येक जिल्ह्यासाठी एक आदिवासी कार्यालयाची निर्मिती करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

कृषी, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय (कृषी) विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००६-२००७ या वर्षाच्या नागरी अहवालामधील परि.क्र.३.५ "कृषी विभागातील संगणकीकरण" या संदर्भात महालेखाकारांनी खालील अभिप्राय व्यक्त केले आहेत.

सॉफ्टवेअरची निर्मिती -

३.१ माहिती तंत्रज्ञान संचालनालयाने निर्गमित केलेल्या निर्देशानुसार प्रकल्पाच्या कार्यान्वयनाचे वेळापत्रक टी.एस.पी.ने द्यावयाचे होते. मोड्युल्स तयार करणे, चाचणी आणि त्यांचे कार्यान्वयन ह्या संबंधीचे वेळापत्रक एन.आय.सी. पुणे यांनी तयार केले नाही अथवा विभागाने त्या गोष्टीवर भरही दिला नाही. व्यवस्थापन माहिती पद्धतीसाठी (एम.आय.एस.) व कार्यावर देखरेखीचे साधन म्हणून सहा मोड्युल्स तयार करण्यासाठी रु.३३.५५ लाख एवढी रक्कम दिली गेली. (ऑक्टोबर, २००१) कृषी आयुक्तांनी हे मान्य केले. (जुलै, २००७) २४ मोड्युल्सपैकी सहा मोड्युल्सचा उपयोग केला गेला नाही आणि सात मोड्युल्स अल्पसे उपयोगात आणले गेले. आठ जिल्हा कृषी अधीक्षक कार्यालये, बारा उपजिल्हा कृषी अधिकारी, ६२ तालुका कृषी अधिकारी कार्यालये आणि पाच मृद् चाचणी प्रयोगशाळा यांची चाचणी तपासणी केल्यानंतर हे उघडकीस आले की, (एप्रिल-मे २००७) २१ कार्यालयात यापैकी प्रशिक्षित कर्मचाऱ्यांच्या अभावी वापरात आणले गेले नाही. त्याची जबाबदारी देखील प्रकल्प उपयोजन वेळापत्रक उपलब्ध नसल्यामुळे निश्चित करता आली नाही. संगणकीकरणाचा उद्देश त्यामुळे सफल झाला नाही.

ज्ञापन :

३.२ उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला. कृषी विभागातील संगणकीकरणाचे नियोजन व तांत्रिक बाबींच्या मार्गदर्शनासाठी सन १९९२ मध्ये राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र, पुणे यांची नोडल एजन्सी म्हणून नेमणूक करण्यात आली होती. युझर रिक्वायर्नमेंट स्पेसीफिकेशन आणि सिस्टीम रिक्वायर्नमेंट स्पेसीफिकेशन सन १९९९ मध्ये तयार करण्यात आले. या काळात राज्य शासनाकडून संगणकीकरण संबंधीचे धोरण व मार्गदर्शक सूचना उपलब्ध नव्हत्या. संगणकीकरणाचे काम प्रगतिपथावर असतांना आवश्यकतेप्रमाणे एसआरएस मध्ये व प्रकल्पामध्ये बदल करण्यात आले त्याप्रमाणे आज्ञावली विकसित करण्यात आल्या. परंतु, कृषी विभागाच्या पुर्नरचनेमध्ये एक खिडकीचा अवलंब करण्यात आला या नव्या पद्धतीस अनुकुल असे बदल आज्ञावलीमध्ये करण्यात आले. आज्ञावलीचा वापर होण्यासाठी अधिकारी व कर्मचाऱ्यांची प्रशिक्षणे घेणेत आली. संगणकासाठी स्वतंत्र मनुष्यबळाअभावी संगणकीकरणाच्या कामामध्ये म्हणावी तशी गती घेता आली नाही.

प्रचलित कार्यपद्धतीचे संगणकी पद्धतीमध्ये रुपांतर करणे मोठे कठीण व वेळ घेणारे काम आहे. नेटवर्क अभावी कामाच्या प्रगतीचा आढावा घेणे कठीण होते. कार्यालयांची संख्या व

विभागाच्या क्षेत्रिय कामाचे व्यापक स्वरुप लक्षात घेता आज्ञावलीचा वापर ठरलेल्या वेळेत न होणे हे देखील एक कारण आहे.

सोर्स कोड, मोड्युल्स आणि डाटा ह्यांचा मालकीचा अभाव -

३.३ डी.आय.टी.ने (डिसेंबर, १९९८ मध्ये) निर्गमित केलेल्या सूचनांमध्ये असे नमूद केले आहे की, संगणकीकरणासाठी तयार केलेले सर्व मोड्युल्स त्यांच्या विस्तृत माहितीपत्रकासोबत असावेत. तसेच टी.एस.पी. ने उपयोग कर्त्यांने मोड्युल्स घेतल्यानंतर तीन आठवड्यांच्या आंत त्यांचे "सोर्स कोड" पुरवावेत. कृषी विभागाचे संगणकीकरण १९९९ मध्ये सुरु झाले. मात्र या गरजांची पूर्ती एन.आय.सी.कडून आली नाही आणि विभागाने सुद्धा त्यांचे पालन करुन घेण्यावर भर दिला नाही.

वापरकर्ते निर्माण करणे आणि त्यांना सोई सुविधा पुरविणे ह्यासारखे, सिस्टीम ॲडमिनिस्ट्रेटर वर्क हाताळण्यासाठी विभागाने आपल्या कर्मचाऱ्यांना प्रशिक्षित केले नाही. तसेच या क्षेत्रातील कौशल्य आणि मोड्युल्स, डाटा आणि डाटावर आधारित कार्य करण्यासाठी वेगळे आय.टी.कॅडर देखील विभागाकडे उपलब्ध नव्हते. वेबवर आधारित संकलित माहितीची मालकी एन.आय.सी.पुणे ह्यांचेकडे होती. आयुक्त, कृषी विभाग, पुणे ह्यांनी ही वस्तुस्थिती मान्य केली आणि असे नमूद केले (मे, २००७) की, एन.आय.सी. ही शासकीय यंत्रणा आहे म्हणून सोर्स कोडची मालकी ही एन.आय.सी.पुणे ह्यांचेकडे होती.

अशा रीतीने योग्य माहितीपत्रक व सोर्स कोड ह्यांच्या अभावी आवश्यक ते नियंत्रण ठेवण्यास विभागाजवळ कोणतेही साधन उपलब्ध नव्हते आणि संगणकीकरणानंतर जवळ जवळ आठ वर्षे होऊनही ह्या विभागाला एन.आय.सी. पुणे ह्यांचेवरच अवलंबून राहावे लागले.

ज्ञापन :

३.४ उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला. राज्य शासनाच्या माहिती तंत्रज्ञान विभागाने डिसेंबर १९८३ नसुन डिसेंबर १९९८ मध्ये शासन आदेशानुसार टि.एस.पी. (टोटल सोल्युशन प्रोव्हायडर) यांनी १० वर्षाकरीता आज्ञावलीची देखभाल करावयाची आहे. कृषी विभागाच्या सर्व आज्ञावल्या एन.आय.सी.पुणे यांनी विकसित

केले आहे. एन.आय.सी.पुणे ही केंद्र शासनाची संस्था आहे. त्यांनी विकसित केलेल्या आज्ञावल्यांमध्ये आवश्यकतेप्रमाणे वेळोवेळी बदल केले आहेत व यापुढेही अशा प्रकारचे आवश्यकतेप्रमाणे बदल करण्याच्या दृष्टीने सोर्स कोड त्यांचेकडेच ठेवण्यात आलेला आहे. तथापि, सर्व आज्ञावल्यांचे सोर्स कोड कृषी विभागाने प्राप्त करुन घेतले आहेत.

मोड्युल्स मधले लॉजिकल ॲक्सेस कंट्रोलचे अपुरेपण -

३.५ "युझरनेम" आणि "पासवर्ड" ह्यांच्याद्वारे मोड्युल्स वर नियंत्रण ठेवता येणार होते. ई.जी.एस. बागायती मोड्युल्स साठी एन.आय.सी.पुणे ह्यांनी ॲक्सेस कंट्रोल उपलब्धच करुन दिला नव्हता. विभागानेही त्यावर भर दिला नाही. शिवाय त्याचा वापर सुरु केल्यापासून चाचणी झालेले (एप्रिल-मे, २००७) युझर्स नेम आणि पासवर्ड ह्यामध्ये बदल केला गेला नाही. ॲक्सेस कंट्रोलच्या अपुरेपणामुळे डाटाबेस कमकुवत राहिला आहे.

ज्ञापन :

३.६ उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला. क्षेत्रिय कार्यालयात एकच संगणक असल्याने अनेक अधिकारी/कर्मचारी त्याचा वापर वेगवेगळ्या सॉफ्टवेअरसाठी करतात. संगणकीय प्रणालीचा वापर सहजतेने व्हावा या आज्ञावलीचा वापर करणाऱ्या कर्मचाऱ्यास सुलभता असावी तसेच त्यांचे संगणकाविषयीचे सुरुवातीचे ज्ञान लक्षात घेता स्ट्रीक्ट ॲक्सेस कंट्रोलची सुविधा स्टँड अलोनच्या आज्ञावलीत करण्यात आलेली नव्हती. वेबवेस्ड ऑन लाईन सॉफ्टवेअरसाठी मात्र ही सुविधा ठेवण्यात आलेली आहे.

सॉफ्टवेअरची समग्रता -

३.७ विभागाच्या गरजा पुरविण्यासाठी एन.आय.सी.ने २४ अप्लिकेशन सॉफ्टवेअर तयार करावयाचे होते. अर्थात सॉफ्टवेअर निर्मितीच्या प्राथमिक अवस्थेतच संबंधित मोड्युल्सच्या समग्रतेच्या शक्यतेचा शोध घ्यावयास हवा होता. कारण विभागाची सर्व कार्ये परस्पर संबंध असलेली होती. ह्या मोड्युल्सचा परस्परांशी संबंध आणला गेला नाही. एम.आय.एस.साठी आवश्यक असणारी आणि धोरण ठरवणाऱ्यांना निर्णय घेण्यास मदत करणारी एकत्रित माहिती प्राथमिक अवस्थेतच एकत्र आणण्याची सोय करण्यावर विचार होणे आवश्यक होते. अशा गरजेचे विभागास आकलनच न झाल्याने संगणकीकरणाचा हेतूच साध्य झाला नाही. विभागाने ही वस्तुस्थिती (जुलै, २००७ मध्ये) मान्य केली व सुरुवातीला मोड्युल्सच्या वापर वेगवेगळ्या रीतीने करण्याचा विचार करुन मोड्युल्स तयार केली गेली असे सांगितले. मात्र काही

काळानंतर हे मोड्युल्स/डाटाबेस परस्परांसोबत वापरण्याची गरज भासू लागली. विभागाच्या विविध प्रकारच्या कार्याचे संगणकीकरण करतांना विभागाने कोणताही तंत्रशुद्ध विचार केला नाही हेच ह्यावरुन स्पष्ट होते.

ज्ञापन :

३.८ उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला. आज्ञावली विकसित करीत असताना जिल्हा, तालुका, पिक यांचेसाठी देणेत आलेला संकेतांक सर्व आज्ञावलीमध्ये सारखा ठेवण्यात आला आहे. प्रत्येक आज्ञावलींचा उद्देश व त्यांची व्याप्ती वेगवेगळी आहे. त्यामुळे सर्व आज्ञावलींचे एकत्रिकरण करणे शक्य नाही व तशी आवश्यकताही नाही. परंतु ज्या आज्ञावलींचा परस्परांशी संबंध येतो अशा आज्ञावलींचे एकत्रिकरण करणेच्यादृष्टीने बिझनेस इंटिलीजन्स (बी.आय.) या पद्धतीचा वापर करण्यात येत आहे.

माहिती अद्ययावत करण्यात आलेले अपयश -

३.९ १९७०-७१ पासून भारत सरकार दर पाच वर्षाच्या कालावधीनंतर कृषी विषयक गणना करीत असते. त्यात संख्या, क्षेत्र, भाडेपट्टी, जमिनीचा वापर, पीक घेण्याची पद्धत, जलसिंचनाच्या उपलब्ध सोयी इत्यादिचा समावेश असतो. असे आढळून आले की, (एप्रिल, २००७), भारत सरकारच्या कृषी गणना मोड्युल्समध्ये उपलब्ध माहिती ही १९९५-९६ या वर्षानंतर अद्ययावत केली गेली नव्हती आणि त्यात विदर्भाच्या अकरा जिल्ह्याविषयी कोणतीच माहिती उपलब्ध नव्हती. मे, २००७ मध्ये असे आढळून आले की, इतर राज्यामध्ये माहिती अद्ययावत राखण्याची जशी सोय होती तशी सोय महाराष्ट्र राज्याच्या मोड्युल्स मध्ये उपलब्ध नव्हती. कृषी आयुक्तांनी मे, २००७ मध्ये असे निवेदन केले की, महसूल विभागाच्या क्षेत्रीय कर्मचारीवर्गाच्या असहकार्यामुळे १९९५-९६ पासून कृषी विषयक कर्जाची माहित संकलित करता आली नाही. पुढे असेही सांगण्यात आले की, २०००-०१ ह्या वर्षाच्या माहिती संकलनाचे काम हाती घेतले गेले असून २००६-०७ ह्या वर्षाचे काम अद्याप हाती घेतले गेलेले नाही.

अशा अद्ययावत माहितीच्या अभावी विभागाच्या सांख्यिकी शाखेला खरीप आणि रब्बी मोसमात कृषी संबंधी कार्याची माहिती गोळा करावी लागते. हीच माहिती महसूल विभागाच्या पटवाऱ्यांकडून देखील गोळा केली जाते. जिल्हा कृषी अधीक्षक कार्यालय, बीड आणि नाशिक ह्यांच्या अभिलेखावरुन असे आढळून आले आहे की, ह्या प्रकारे (एप्रिल-मे २००७) गोळा

केलेल्या कापसाच्या खरीप मोसमातील लागवडीच्या माहितीत खाली दर्शविल्याप्रमाणे १२३ टक्क्यापर्यंत तफावत नोंदवली गेली.

जिल्हा	कृषी आयुक्तांच्या अभिलेख्या नुसार लागवडी खाली असलेले क्षेत्र	महसूल विभागाच्या अभिलेख्यानुसार लागवडी खाली असलेले क्षेत्र	लागवडी खाली असलेल्या क्षेत्राच्या नोंदीतील तफावत	तफावतीची टक्केवारी
बीड	१६७२००	२८६०४८७३	११८८४८७३	७१
नाशिक	२४०५२	५३६५७.१९	२९६०५.१९	१२३
एकूण	१९१२५२	३३९७०५.९२	१४८४५३.९२	.....

२००५ च्या खरीप मोसमात जिल्ह्यातील काही विभागात (लाल्या) एका रोगामुळे कापसाच्या पिकांवर फार वाईट परिणाम झाला. ह्या रोगामुळे कापसाच्या पिकाचे झालेले नुकसान भरुन काढण्यासाठी (फेब्रुवारी, २००६) शासनाने ह्या रोगाचे विपरीत परिणाम झालेल्या २ हेक्टर्स जमिनीपर्यंत मर्यादित पिकाला हेक्टरी १ हजार रुपये ह्या दराने नुकसान भरपाई जाहीर केली. जिल्हा कृषी कार्यालय, बीड आणि नाशिक यांच्या जवळ असणाऱ्या नुकसान भरपाईच्या कागदपत्राची तपासणी केल्यावर असे लक्षात आले (एप्रिल-मे, २००७) की महसूल विभागाने कृषी विभागाच्या मदतीने पीकावरील रोगाचे बाधित क्षेत्र निश्चित केले. परिणामत: शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यासाठी १४.८५ कोटी रुपये अधिकचे दायित्व सहन करावे लागले.

असेही निदर्शनास आले की, विदर्भातील सहा जिल्ह्यातील संकटग्रस्त शेतकऱ्यांना पॅकेज देण्याची अंमलबजावणी करण्यासाठी ज्या वसंतराव नाईक शेतकरी स्वावलंबन मिशन, अमरावती ह्या संस्थेची निर्मिती करण्यात आली. (२००५-०६) तिच्या जवळही कृषी विभागाकडून मिळालेली खात्रीलायक माहिती नव्हती. विदर्भ विभागात (रुपये १२९.४६ कोटी) दिली गेलेली नुकसान भरपाई महसूल विभागाजवळ असणाऱ्या कागदपत्रातील क्षेत्राच्या आधारावर दिली गेली असे दिसून आले. हे क्षेत्र महाराष्ट्र रिमोट सेन्सिंग अप्लिकेशन सेन्टर (एम.आर.एस.ए.सी.) ह्यांनी दिलेल्या क्षेत्रापेक्षा ५४७८८५ इतके हेक्टर्स अधिक होते. तर जिल्हा कृषी अधीक्षक ह्यांनी (डी.एस.ए.ओ.) दाखविलेल्या क्षेत्रापेक्षा १९१३२६ हेक्टर्स इतके अधिक होते.

म्हणजेच कृषी विभागाने शेतीसंबंधी गोळा केलेली माहिती अपूर्ण आणि अतिशय अविश्वासार्ह होती.

ज्ञापन :

३.१० उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला. कृषी गणना ही आज्ञावली केंद्र सरकारने विकसित केली आहे. या आज्ञावलीमध्ये माहिती भरण्याचे अधिकार केंद्र सरकारचे स्तरावर ठेवण्यात आले आहे. सन २०००-२००१ ह्या कालावधीची कृषी गणनेची राज्याची माहिती केंद्र सरकारला पाठविण्यात आली होती. माहिती अपलोड करण्याबाबत केंद्र सरकारला विनंती करण्यात आली होती. ही माहिती वेबसाईटवर अपलोड करण्याची जबाबदारी केंद्र सरकारची आहे.

सदरहू संवेदनाद्वारे पिकाखालील क्षेत्राची माहिती एम.आर.एस.ए.सी, नागपूर यांचे माध्यमातून प्रायोगिक तत्त्वावर सन २००५-०६ मध्ये घेण्यात आली होती. प्राप्त माहिती व प्रत्यक्ष पिकाखालील क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणावर तफावत आढळून आली. तांत्रिकदृष्ट्या सदुर संवेदन हे तंत्रज्ञान कृषी क्षेत्रासाठी पूर्णपणे विकसित झालेले नव्हते. सन २००६-०७ मध्ये कृषी विभागाच्या विनंती वरुन एम.आर.एस.ए.सी, नागपूर यांनी कापूस पिकाचा अंदाज घेण्यासाठी सदुर संवेदन या तंत्राचा वापर केला. यामध्ये त्यांनी दिनांक १६/१/२००७ रोजी घेणेत आलेल्या नोंदीवरुन १८ जिल्ह्यांत २७.१९ लाख एवढे क्षेत्र असल्याचा अंदाज दिला. एम.आर.एस.ए.सी, नागपूर यांनी कळविलेले क्षेत्र व महसूल/कृषी विभागाने निश्चित केलेले क्षेत्र यामध्ये तफावत आढळून आली. त्यामुळे मा.मंत्री (कृषि) महोदय यांचे अध्यक्षतेखाली एम.आर.एस.ए.सी, नागपूरचे शास्त्रज्ञ यांचेबरोबर चर्चा करण्यात आली. त्यामध्ये शास्त्रज्ञांनी सदुर संवेदनाद्वारे काढण्यात आलेल्या अंदाजामध्ये त्रुटी आहे. तसेच क्षेत्र अंदाजामध्ये शेकडा १० टक्क्यांपर्यंत त्रुटी येऊ शकतात हे मान्य केले. सदुर संवेदनामार्फत प्राप्त माहितीचा पुर्नविचार केल्यानंतर ९ जिल्ह्यांसाठी त्यांनी नव्याने कापूस पिकांखालील क्षेत्राचा अंदाज दिला.

त्यामध्ये पूर्वी दिलेल्या अंदाजापेक्षा २१ टक्क्याने वाढ दिसून आली. २१ टक्के वाढ इतर जिल्ह्यांना लागू केल्यास सदरहू संवेदनाद्वारे प्राप्त झालेली आकडेवारी व महसूल विभागाकडून प्राप्त झालेली आकडेवारी यामध्ये फारशी तफावत दिसून येत नाही. कृषी विभागामार्फत पिकाखालील क्षेत्राचा अंदाज दर आठवड्यास घेण्यात येतो. परंतु हे क्षेत्र नजर अंदाजाने घेण्यात येत असून ते अंतरिम असते.

साक्ष :

३.११ विभागाने पुरविलेल्या उपरोक्त लेखी माहितीच्या आधारे अधिक माहितीसाठी समितीने दिनांक २५ मे, २०११ रोजी कृषी विभागाच्या प्रधान सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या

वेळी अधिक माहिती देताना प्रधान सचिवांनी असे सांगितले की, कृषी विभागाकडून दोन सेवा सुरु करण्यात आलेल्या आहेत. यामध्ये शेतकऱ्यांना कृषि विषयक संदेश (एसएमएस) मोठ्या प्रमाणात पाठविण्यात येत आहेत. एकाच वेळी दीड लाख शेतकऱ्यांना मराठी भाषेतून संदेश (एसएमएस) पाठविण्यात येत आहेत. केंद्र सरकारच्या मदतीने नॅशनल सेंटर फॉर इंटिग्रेटेड पेस्ट मॅनेजमेंट या संस्थेची तांत्रिक मदत घेतली आहे. राष्ट्रीय कृषि विषयक योजनेअंतर्गत आर्थिक तरतूद सुरुवातीला प्राप्त झाली होती. हा कार्यक्रम दरवर्षी चालू राहणारा आहे. उपविभाग स्तरावर उपविभागीय कृषि अधिकाऱ्यांना लॅपटॉप देण्यात आलेला आहे. कार्यालयीन कामकाज सुकर करण्यासाठी तालुका कृषि अधिकारी, पाणलोट विकास क्षेत्र, पर्जन्यमान, पिकांची खानेसुमारी, मातीची चाचणी, बियांणाची चाचणी, कर्मचाऱ्यांची माहिती, खर्चाची आकडेवारी व प्रशिक्षण कार्य या सर्व बाबींच्या माहितीचा डेटा गोळा करुन आवश्यक माहिती संगणकावर लोड केली जाते व इंटरनेटवर उपलब्ध केली जाते. माहिती गोळा करण्यासाठी फिल्ड लेव्हलवर स्काऊटची नेमणूक करण्यात आलेली आहे. पर्जन्यमानविषयी ऑनलाईन माहितीमुळे कोणत्या जिल्ह्यात किती पाऊस झाला यांची संपूर्ण माहिती एकाच वेळी विभागाच्या संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

३.१२ समितीने अशी विचारणा केली की, ही माहिती दूरदर्शनवर दाखविण्यात येते काय ? याबाबत सचिवांनी खुलासा केला की, महाराष्ट्रातील ३५३ तालुक्यात वेबसाईटवरुन माहिती घेण्यात येते. ही सर्व माहिती तहसीलदार यांच्याकडून गोळा करण्यात येते. सर्व नकाशे संकेतस्थळावर अद्ययावत करण्यात येतात. यामुळे कोणत्या तालुक्यात किती पाऊस पडला याची माहिती एकाच वेळी उपलब्ध होते.

३.१३ त्याचप्रमाणे या संकेतस्थळावर सर्व पिकांची माहिती देण्यात आलेली आहे. यामध्ये हरभरा, तूर, कपाशी, सोयाबीन या पिकांवर कोणता रोग आला, त्यावर कोणत्या औषधांची फवारणी करावी लागते. त्याबाबत काय उपाययोजना करावी अशी सविस्तर माहिती मोफत उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. ही सर्व माहिती मराठीमध्ये उपलब्ध आहे. त्याचप्रमाणे या संकेतस्थळावर कोणत्या पिकांची पेरणी केव्हा करावी, यासाठी कोणती रासायनिक खते वापरावित अशा सर्व प्रकारची माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे कोणत्या जिल्ह्यात कोणत्या पिकाची पेरणी जास्त झाली, याची नकाशाद्वारे माहिती

उपलब्ध होते. भात पिकाची माहिती आता उपलब्ध होत आहे. किती टक्के पेरणी झाली याची माहिती मिळत असते.

३.१४ त्याचप्रमाणे पणन विभागामार्फत शेतकऱ्यांच्या भ्रमणध्वनीवर संदेश करुन कोणत्या कृषी उत्पन्न बाजार समितीत धान्य मालाचे दर काय होते याची माहीती पाठविण्यात येते. यासाठी तीन-चार खाजगी कंपन्यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. शेतकऱ्यांना दरमहा ६० रुपये भरुन नोकिया व इतर काही कंपन्या ४०० मोफत संदेश देतात. आज तीन पिकांचे बाजार भाव काय आहेत याची माहिती संदेशाद्वारे शेतकऱ्यांना उपलब्ध होऊ शकते. काही कंपन्या शेतकऱ्यांना सवलतीमध्ये संदेश पाठवित आहेत.

३.१५ कृषि खात्याशी संबंधित वेबसाईट अद्ययावत असते काय ? कृषि विभागाकडून ज्या योजना जाहीर करण्यात येतात. त्यामध्ये शेतकऱ्यांना काही अर्थसहाय्य देण्यात येते, काही अनुदान देण्यात येते. अर्थसंकल्पीय तरतूद किती आहे, अनेक वेळा असे सांगण्यात येते की, शेतकऱ्यांना १० कोटी रुपयांची मदत शासनामार्फत जाहीर करण्यात आली आहे. ही माहिती किंवा अशा प्रकारच्या शेतकऱ्यांच्या संबंधित ज्या योजना आहेत या बाबी संकेतस्थळावर नियमित अद्ययावत करण्यात येतात काय ? याविषयी समितीने विचारणा केली असता सचिवांनी खुलासा केला की, कृषि विभागाकडील सर्व योजना संकेत स्थळावर देण्यात येत आहेत. ही संपूर्ण माहिती वेळच्यावेळी अपडेट करण्यात येते. यामध्ये केंद्र सरकारच्या काही नवीन योजना आहेत. केंद्र सरकारच्या मार्गदर्शक तत्वाप्रमाणे कार्यवाही करण्यात येते. अमुक-अमुक योजनेचा लाभ घेण्यासाठी कोणता अर्ज करावा याची माहिती संकेतस्थळावर देण्यात आलेली असते. अधिकृत संकेतस्थळ www.mahaagri.gov.in असे आहे.

३.१६ हवामानविषयक माहितीसाठी जिल्हा युनिट असल्यामुळे प्रत्येक जिल्ह्याची कृषि विषयक माहिती या संकेतस्थळावर अद्ययावत मिळते. याबाबत विभागाला हवामान खात्यामार्फत देखील पुढील ५ दिवसाच्या हवामानाच्या अंदाजाची माहिती उपलब्ध होत असते. आम्ही ती माहिती संकेतस्थळावर अद्ययावत करीत असतो. शेतकऱ्यांच्या गटासाठी कंपन्या कमी रकमेत मोफत संदेश सेवा उपलब्ध करुन देत आहेत. कृषि विभागाकडे सध्या २५ प्रकारचे वेगवेगळ्या आज्ञावली वापरात आहेत. हे संपूर्ण अभिलेखे संगणकावर उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे. एकाच वेळी २.१५ कोटी संदेश शेतकऱ्यांना पाठविण्यात येत आहेत. एक अशी आज्ञावली तयार करण्यात आली आहे की, नालाबंडिंग करताना त्याची लांबी रुंदी व उंची त्यामध्ये फिड केली

की, त्याचे अंदाजपत्रक तयार होते. तसेच पीक आलेख, वेतन पट, पर्जन्यमान, वृद्धीचा दर, मृदा चाचणी, पाणलोट ठिकाण कार्य, केंद्र सरकारच्या माध्यमातून करण्यात येत आहेत. महाराष्ट्र सरकारच्या प्रत्येक कर्मचाऱ्यांची माहिती सेवार्थ आज्ञावली मार्फत उपलब्ध करुन देण्यात येते. त्याशिवाय पीक नमूना पद्धत आहे. रोपवाटिकेसंबंधीची माहिती आहे. त्यामध्ये कोणत्या रोपवाटिकेमध्ये कोणती रोपे आहेत याची माहिती उपलब्ध होते. अशी सर्व माहिती मिळण्यासाठी तालुक्याच्या ठिकाणी संगणक उपलब्ध करुन दिलेले आहेत. १९९२ पासून कृषी विभागात संगणकावर काम करण्यास सुरुवात झाली. तेव्हा महाराष्ट्र राज्यात शासकीय कार्यालयात कोठेही संगणकावर काम करण्यास सुरुवात झालेली नव्हती. समितीने अशी विचारणा केली की, कृषी विभागाने जे उद्दिष्ट ठरविले होते ते १०० टक्के साध्य झाले काय ? विभागास निधीची अडचण आहे काय ? याबाबत सचिवांनी खुलासा केला की, संपूर्ण देशात २७९ कोटी रुपयांचा नॅशनल ई-गव्हर्नन्स योजना मंजूर झाली आहे. यामध्ये एकूण सात राज्यांचा समावेश आहे. त्यामध्ये महाराष्ट्र राज्याचा समावेश करावा अशाप्रकारचा प्रस्ताव दिलेला आहे. विभागात जेवढ्या संगणकाची आवश्यकता आहे त्याच्या ३५ टक्के संगणक उपलब्ध आहेत. या कार्यक्रमांतर्गत विभागाला संगणक मिळू शकतील. संगणकीकरणासाठी केंद्र सरकारकडून मिळणारी मदत हा वेगळा विषय झाला. कृषी विभागाला राज्य शासनाकडून जी मदत मिळते त्यामध्ये वाढ करण्याची आवश्यकता आहे काय ? याबाबत सचिवांनी खुलासा केला की, केंद्र सरकारच्या योजनेमध्ये ७५ टक्के हिस्सा केंद्र सरकारकडून मिळतो तर उर्वरित २५ टक्के हिस्सा राज्य शासनाचा असतो. मायक्रो मॅनेजमेंटला सुरुवात झाली, त्यामध्ये राज्य शासनाने भर घातली होती. अर्थसंकल्पामध्ये दरवर्षी निधी उपलब्ध होतो. नॅशनल ई-गव्हर्नस योजनेमध्ये मायक्रो मॅनेजमेंट इन ॲग्रीकल्चर व इत्यादीसाठी केंद्र सरकारकडून निधी मिळणार आहे. कृषी विद्यापीठांनी स्वतंत्र संगणकीकरण केलेले आहे. राज्याच्या अर्थसंकल्पामधून चार कृषी विद्यापीठांसाठी ४५ कोटी रुपये उपलब्ध करुन दिलेले आहेत. या निधीमध्ये ते त्यांचा कार्यक्रम घेतात. केंद्र सरकारच्या आयसीआर इन्स्टीटयुशन मधून मदत मिळते.

३.१७ समितीने अशी विचारणा केली की, कृषी विद्यापीठे कोणाच्या अखत्यारित येतात ? याबाबत सचिवांनी खुलासा केला की, कृषी विद्यापीठे ही राज्य शासनाची संस्था असली तरी माननीय राज्यपाल विद्यापीठांचे प्रमुख असतात. The Vice Chancellor is not

answerable to the Secretary of the Department. विद्यापीठांना योजना आणि योजनेत्तर निधी राज्य शासनामार्फत दिला जातो.

३.१८ मागील दहा वर्षाच्या कालावधीत लोकलेखा समितीने बाळासाहेब सावंत, दापोली कृषी विद्यापीठ, डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी आणि मराठवाडा कृषी विद्यापीठ या कृषी विद्यापीठांची पाहणी केलेली आहे. या कृषी विद्यापीठांनी चांगल्या प्रकारचे संशोधन केलेले आहे. संत्रा, लिंबू, कापूस इत्यादी पिकांवर चांगले संशोधन केलेले आहे. या विद्यापीठांचे प्रमुख माननीय राज्यपाल असतात. परंतु या कृषी विद्यापीठांचा उपयोग कृषी विभागाला जास्त आहे. कृषी प्रगतीसाठी म्हणावा तसा निधी मिळत नाही याबाबत सचिवांनी खुलासा केला की, कृषी शास्त्रज्ञ व या क्षेत्रातील तज्ज्ञ यांची एक क्षेत्रिय परिमंडळ समिती आहे. २५० कोटी रुपये योजनेत्तर निधी मधून मिळतात. कृषी विद्यापीठांना संशोधनसाठी ५० कोटी रुपये दिले जातात. आयसीआरचा संशोधन प्रकल्प आहे. त्याला मिळणाऱ्या निधीमध्ये राज्य शासनाचा २५ टक्के हिस्सा असतो तर केंद्र शासनाचा ७५ टक्के हिस्सा असतो. त्याशिवाय १५० कोटी रुपये स्वतंत्र मिळतात.

३.१९ समितीने असे सूचित केले की, कृषी विभागाने संगणकीकरणाच्या संदर्भात प्रगती केलेली आहे. इस्त्रायलमध्ये प्रगत तंत्रज्ञानाच्या माध्यमातून २० गुंठे जमिनीवर २०-२५ टन ढोबळी मिरचीचे उत्पादन काढले जाते. परंतु त्यास पणन व्यवस्था नाही. तशीच परिस्थिती राज्यात विशेषत: कोकणात आहे. कोकणात आंबा हे मुख्य पीक आहे. परंतु त्यास चांगले पणन व्यवस्था नाही. गाव पातळीवरील आंबा चांगला असला तरी पणन व्यवस्था नसल्यामुळे त्यास बाजारपेठ उपलब्ध होत नाही. कृषी विभागाच्या आधुनिक तंत्रज्ञानासाठी व शेतीमालाला गावपातळीवर चांगली बाजारपेठ उपलब्ध करुन देण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी तसेच राज्य शासनाने कृषी विभागासाठी भरीव मदत द्यावी अशी समितीची शिफारस आहे. राज्य शासनाने कृषी विभागासाठी चांगली भरीव मदत द्यावी असे समितीला वाटते. विभागाचे संगणकीकरणाचे काम चांगले झालेले आहे. त्याच बरोबर कृषी विद्यापीठांकडे लक्ष देऊन त्यांच्याशी समन्वय वाढवावे. राज्यात औद्योगिकीकरण वाढले तरी शेतीचे उत्पादन कमी होता कामा नये. शेतीचे उत्पादन कमी होत असेल तर नवीन तंत्रज्ञानाच्या आधारे ते जास्त वाढावे असा समितीचा हेतू आहे. शेतीच्या संदर्भात प्रामुख्याने दोन प्रश्न उपस्थित होतात. पहिला प्रश्न म्हणजे खतांचा अपुरा पुरवठा तर दुसरा प्रश्न बियांणाचा होत असलेला

काळाबाजार तेव्हा या प्रश्नांबाबत विभागाने समितीला महिती द्यावी. वेबसाईट नेहमी अद्ययावत झाली पाहिजे तसेच गेल्या वर्षी कोकणातील पिकांवर एक रोग आला होता. दापोली कृषी विद्यापीठाने जे औषध शोधून काढले ते जून महिन्यात आले. त्या औषधाची किंमत १० हजार रुपये होती. दरम्यानच्या काळात आंबा पीक येऊन गेले होते. विभागाने संशोधनाच्या बाबतीत सुद्धा गती वाढविली पाहिजे असे समितीने मत व्यक्त केले. यावर सचिवांनी सांगितले की, कृषी विद्यापीठाची स्वतंत्र वेबसाईट आहे. त्या साईटवर प्रत्येक योजनांची माहिती आहे. तसेच विभागाच्या संकेतस्थळावर क्रॉप डिरेक्टरी आहे. विभागाच्या वेबसाईटचा वापर २८ लाख ७६ हजार ६२६ शेतकऱ्यांनी केला आहे. तालुका पातळीवरील कृषी अधिकाऱ्यांना इंटरनेट सेवा उपलब्ध करुन दिलेली आहे. शेतकऱ्यांना वेगवेगळ्या विषयासंबंधीच्या जवळपास ५० सीडीज दिलेल्या आहेत. त्या सीडींमध्ये प्रत्येक विषयाची माहिती आहे. जवळपास १२ हजार कर्मचारी संगणक विषयातील पदविका धारक आहेत. तसेच डीआयटी व एमएस-सीआयटी कोर्स केलेले कर्मचारी आहेत असे असतानाही संगणकाचा पुरेपुर वापर होत नाही. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, वेबसाईटचा वापर किती जण करतात यावरुन त्याची उपयुक्तता सिद्ध होते. शेती आणि शेतकरी आपला पाया आहे. शेतकरी तालुक्याच्या ठिकाणी जाऊन इंटरनेटवरुन माहिती घेणार नाहीत. तेव्हा प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये संगणक उपलब्ध करुन त्यासोबत एक ऑपरेटर देखील उपलब्ध करुन दिला पाहिजे. आपल्याकडे साधारणतः ३५ हजार ग्रामपंचायती आहेत. तेव्हा ३५ हजार किऑस्क उभे राहिले पाहिजेत. कारण मोठे शेतकरी स्वतःच्या घरी इंटरनेटची सेवा घेऊ शकतात. परंतु छोटे शेतकरी स्वतःच्या घरी इंटरनेट घेऊ शकत नाही. तेव्हा छोट्या शेतकऱ्यांसाठी ग्रामपंचायतीमध्ये इंटरनेटची सेवा उपलब्ध करुन दिली पाहिजे याबाबत सचिवांनी खुलासा केला की, केंद्र सरकारने महाराष्ट्र राज्यासाठी १० हजार सामान्य सेवा केंद्र मंजूर केलेली आहेत. त्या संदर्भात संचालक, माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाने निविदा काढल्या. परंतु त्यास प्रतिसाद मिळाला नाही. पाच वर्षात १० हजार सामान्य सेवा केंद्र उभी करावयाची होती. आतापर्यंत ८६०० केंद्रे उभी झालेली आहेत परंतु या केंद्राचा म्हणावा तसा वापर झालेला नाही. या केंद्रा मधून महसूल देखील मिळाला नाही. गुजरात राज्यामध्ये ई-ग्राम संकल्पना राबविण्यात आली आहे. तेथील प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये सरकारने आपल्या खर्चाने संगणक पुरविले आहेत. दरवर्षी जवळपास ६० कोटी रुपये देखभालीवर खर्च होतो. गुजरात राज्यामध्ये सर्व योजनांची माहिती प्रत्येक ग्रामपंचायतीच्या संगणकावर उपलब्ध आहे.

गुजरात राज्याच्या धर्तीवर आपल्या राज्यात सुद्धा प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये शासनाने संगणक उपलब्ध करुन द्यावेत अशी शिफारस समितीने शासनास करावी. शासनाने संगणकाची सेवा उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु एखाद्या शेतकऱ्याला ७/१२ चा उतारा पाहिजे असेल तर त्याला एका कॉपीचे १०-१५ रुपये द्यावे लागतात आणि त्या मिळालेल्या पैशातून संगणकावरील खर्च भागविण्यात येतो. ही योजना यशस्वी झालेली नाही. तेव्हा १०-२० रुपये देऊन कोणी शेतीसंबंधी माहिती घेणार नाही. कृषीची माहिती मिळावी यासाठी विकायला गेलो तर ती कोणी घेणार नाही. म्हणून विभागाने काही सीडीज तयार केलेल्या आहेत. शेतकऱ्यांसाठी प्रशिक्षण आयोजित केले जाते त्यावेळी त्या सीडीज् दाखविल्या जातात.

३.२० ज्याप्रमाणे शाळांना संगणक देण्यात येतात त्याप्रमाणे ज्या ठिकाणी बागायती क्षेत्र आहे व ज्या ठिकाणी खरेदी-विक्रीचे व्यवहार जास्त होतात अशी ठिकाणे निवडून त्या ठिकाणी लोकप्रतिनिधींच्या विकास निधीतून संगणक उपलब्ध करुन दिले तर त्या ठिकाणी शेतकऱ्यांना अधिक माहिती उपलब्ध होऊ शकेल असे समितीने मत व्यक्त करुन ग्रामपंचायतींना लोकप्रतिनिधींच्या विकास निधीतून संगणक उपलब्ध करुन देण्यासंदर्भात शासनाला शिफारस करण्यात येईल असे विभागीय सचिवांना आश्वासित केले. पिकांवर वेगवेगळ्या प्रकारचे रोग पडल्यानंतर त्याबाबतीत काय उपाययोजना करावयास पाहिजे या बाबतीत वेबसाईटवर काही माहिती दिलेली आहे काय ? अशी समितीने विचारणा केली असता सचिवांनी खुलासा केला की, वेबसाईटवर वेगवेगळया विभागाची वेगवेगळी माहिती देण्यात आली आहे. उदा. महसूल खात्याच्या वेबसाईटवर ७/१२ चे उतारे उपलब्ध करुन देण्यात आले आहेत तसेच पिकांवर पडणाऱ्या रोगांचे निवारण करण्यासाठी एक प्रकल्प राबविण्यात आला आहे. यामध्ये १०० लाख हेक्टर क्षेत्रावरील पिकांची पाहणी करण्यात येते. यामध्ये दर आठवड्याला शेतकऱ्यांच्या शेतातील पिकाची पाहणी करुन पिकांवर पडलेल्या रोगावरील उपाययोजनेच्या संदर्भात संबंधित शेतकऱ्याच्या भ्रमणध्वनीवर संदेश पाठविण्यात येतो. अशा प्रकारे अडीच लाख शेतकऱ्यांना संदेशद्वारे पिकावर पडणाऱ्या रोगाच्या संदर्भात उपाययोजना कळविण्यात आली आहे. त्यावर, शेतकऱ्याचा भ्रमणध्वनीचा नंबर बदलला तर त्यांला संदेशद्वारे माहिती कळविण्याच्या संदर्भात काय व्यवस्था करण्यात आली आहे ? अशी समितीने विचारणा केली असता विभागीय सचिवांनी खुलासा केला की, तालुका स्तरावर शेतकऱ्यांना फॉर्म दिले जातात. ७ लाख शेतकऱ्यांचा क्लोज युजर ग्रुप आहे. ही मोबाईल सेवा मिळविण्यासाठी

शेतकऱ्यांना फक्त ९९ रुपये भरावे लागतात. त्यामध्ये त्यांना ४०० ते ५०० मिनिट फ्री टॉक-टाईम मिळतो तसेच १ जीबी पर्यंत ते फ्री डाऊन लोड करु शकतात अशा प्रकारची ही चांगली योजना आहे. बी.एस.एन.एल. चे म्हणणे असे आहे की, हा जगातील सर्वात मोठा क्लोज युजर ग्रुप आहे. ४ लाख ६४ हजार शेतकऱ्यांचे फॉर्म्स भरुन त्यांना मोबाईल कार्ड देण्यात आलेले आहेत. शेतकऱ्यांचा मोबाईल नंबर बदलला तर पुन्हा त्यांना फॉर्म दिला जातो. मोबाईल कार्डसाठी लागणारा खर्च शासनाने केला असून शेतकऱ्यांना ते मोफत देण्यात येते, त्यासाठी शेतकऱ्यांना फक्त ९९ रुपये भरावे लागतात. प्रत्येक पिकाच्या संदर्भात रोगाची लक्षणे, रोगाची कारणे व प्रतिबंधात्मक उपाय या संबंधीची माहिती वेबसाईटवर लाईव्ह देण्यात येते.

३.२१ समितीने अशी विचारणा केली की, बी.टी. कॉटन ७३ महिको या कापसाच्या बियाणाचा पुरवठा पुरेशा प्रमाणात होऊ शकत नसल्यामुळे त्या अनुषंगाने कापसाची एखादी नवीन जात संशोधित करुन त्याचे मार्केट वाढविण्याची गरज आहे. या संदर्भात राज्य स्तरावर काय उपाययोजना करण्यात येणार आहे? याबाबत सचिवांनी खुलासा केला की, महाराष्ट्राला सन २०११-२०१२ वर्षी ९ टक्के वाढ देण्यात आली आणि इतर राज्यांना त्यापेक्षा जास्त वाढ देण्यात आली अशा प्रकारची तक्रार आहे. महाराष्ट्राला सुद्धा इतर राज्यांप्रमाणे वाढ मिळाली पाहिजे यासंदर्भात कृषी मंत्र्यांनी बियाणे उत्पादकांबरोबर सभा घेतल्या आहेत. सुरुवातीला पंजाब, हरयाणा, मध्यप्रदेश आणि राजस्थानने बियाणांचे भाव वाढविले, त्यावेळी महाराष्ट्र राज्याने भाव वाढवू नये, अशा प्रकारची भूमिका घेतली होती. पण इतर राज्यांनी त्यावेळी भाव वाढविले त्यामुळे त्यांची चळवळ सुरु झाली. त्यानंतर गुजरात राज्याने भाव वाढविले, आंध्र प्रदेशने भाव वाढविले त्यामुळे इतर राज्यामध्ये बियाणे येत आहेत व त्यांची बियांणाची गरज भागविली जात आहे. त्यामुळे महाराष्ट्र शासनाने भाव वाढविले नाही तर शेतकऱ्यांच्या बाबतीत अडचण निर्माण होऊ शकते म्हणून शासनाने भाव वाढविण्याचा निर्णय घेतला आणि त्यानुसार महाराष्ट्र शासनाने १ कोटी ८० लाखाची मागणी केलेली आहे. त्यापैकी ६० लाखाची प्लेसमेंट झालेली आहे.

३.२२ देशामधील खताची परिस्थिती प्रचंड प्रमाणात बिघडलेली आहे. याचे कारण असे की, खताच्या उत्पादनासाठी जे रॉक फॉस्फेट हा कच्चा माल लागतो ते जॉर्डन, ट्यूनिशिया, इजिप्त, मध्य-पूर्व अफ्रीका या भागात सर्वात जास्त आहे. आपल्याकडे डीएपी ६५ टक्के आयात केला जातो आणि केवळ ३५ टक्के डीएपी आपल्याकडे तयार होतो. एमओपी हे खत आपण

६५ टक्के आयात करतो. या खताच्या संविदेच्या संदर्भात केंद्र शासनाने १० दिवसापूर्वी निर्णय घेतलेला आहे. तसेच युरिया १५ टक्के आयात करतो. आपल्याकडे डीएपी खताचा दर प्रती टन ६१२ डॉलर इतका ठरविण्यात आला आहे. दर वर्षी जानेवारी-फेब्रुवारी महिन्यात खताची संविदा ठरविण्यात येतात. पण या वर्षी ते एप्रिल-मे महिन्यात ठरविण्यात आलेले आहेत. त्यानंतर एक-दीड महिन्याचा कालावधी गेल्यानंतर मे महिन्याच्या अखेरीस आणि जूनच्या पहिल्या आठवड्यात डीएपी खताची आवक मोठ्या प्रमाणात होईल. प्रत्येक राज्याला डीएपी खताचा कमी प्रमाणात साठा मिळालेला आहे. यासाठी वेळेवर पाऊल उचलून दोन लाख टनाचा राखीव साठा विभागाने निर्माण केल्यामुळे महाराष्ट्राची परिस्थिती इतर राज्यांच्या तुलनेत बऱ्यापैकी आहे. मागच्या वर्षी एकूण दहा लाख टन इतका खत आले होते. तेवढे खत या वर्षीही उपलब्ध होईल. परंतु यामध्ये डीएपी खताचे प्रमाण कमी राहील. एसएसपी आणि एनपीके खत वापरु शकतो. यामध्ये फॉस्फेटिक फर्टीलायझर आणि पोटॅशियमचे प्रमाण असते. एखाद्या जिल्हयात डीएपी खताची उपलब्धता कमी झाली तरी एनपीके. आणि एसएसपी. हे खत जास्त प्रमाणात उपलब्ध होतील.

३.२३ खाजगी व्यापारी महागड्या दराने खताचे वाटप करतात म्हणून सहकारी सोसायट्यांमार्फत खताचे वितरण करण्याचे ठरविले हाते, यासंदर्भात सचिवांनी खुलासा केला की, सहकारी संस्थामार्फत खताचे वाटप करण्यात यावे अशा प्रकारची चर्चा सभागृहामध्ये झाली होती त्यावेळी विदर्भ को-ऑपरेटीव्ह पणन महामंडळाला त्याप्रमाणे एक लाख टन खताच्या विक्रीला मान्यता दिली आहे व हे खत सहकारी संस्था मार्फत वाटप करण्यात येणार आहे. पणन महामंडळाला पहिल्यांदा २२५ कोटी, १३५ कोटी रुपयाची आणि त्यानंतर ९० कोटी रुपयाची गॅरन्टी वेळोवेळी दिलेली आहे.

३.२४ एकूण खताचे कारखाने किती आहेत या संबंधीची माहिती समितीला देताना सचिवांनी असे सांगितले की, खताचे कारखान्यांचे परवाने केंद्र शासनामार्फत देण्यात येतात. आपण डीएपी २/३ बाहेरुन आयात करतो. आपल्याकडे खतासाठी लागणारे रॉक फॉस्फेट, फॉस्फरिक ॲसिड आणि न्युरेज पोटॅश हा कच्चा माल उपलब्ध नाही. ते बाहेरुन आणावे लागते. युरिया १५ टक्के बाहेरुन आणावा लागतो आणि ८५ टक्के आपल्या देशात उत्पादीत होतो. युरिया सोडून आपल्याकडे इतर कुठलेही साठे नाहीत. या वर्षी परिस्थिती अशी होती की, जागतिक स्तरावर खताच्या संदर्भात चीनला वेगळे दर लावण्यात आले होते आणि

भारताला वेगळे दर लावण्यात आले होते. चीनला $४५० प्रतिटन दर लावण्यात आले होते तर भारताला $७५० प्रतिटन इतके दर लावण्यात आले होते. त्यामुळे जागतिक पातळीवर अशा पद्धतीचा निर्णय होऊ शकत नाही, अशा प्रकारचा निर्णय देशाच्या पातळीवर घेण्यात आला आणि $७५० प्रतिटन दर कमी करुन ६१२ डॉलरवर आणण्यात आपल्या देशाला यश मिळाले. शेतकऱ्यांना खताचे वाटप करताना एका ठराविक भावाने करण्यात येते त्यामुळे वरचा खर्च शासनाला सहन करावा लागतो. दर कमी करण्याचा प्रश्न देशाच्या पातळीवरचा प्रश्न होता. भारताच्या अस्मितेचा प्रश्न म्हणून केंद्र शासनाने हा प्रश्न हाताळला आणि त्यामध्ये केंद्र शासनाला यश मिळाले.

३.२५ जुन्या रोजगार हमी योजनेमध्ये फक्त रस्त्याची किरकोळ कामे घेण्यात येत होती पण आता रोजगार हमी योजनेचा स्वरुप बदलण्यात आले असून कृषी खात्यातील नाला बंडिगची, विहिरी खोदण्याची अशी वेगवेगळ्या प्रकारची कामे घेण्यात येत आहेत. नवीन रोजगार हमी योजनेमध्ये घेण्यात येणाऱ्या वेगवेगळ्या कामाची सविस्तर माहिती समितीला देण्याचे सचिवांनी आश्वासित केले होते त्यानुसार माहिती समितीला पुढील प्रमाणे प्राप्त झाली आहे.

रोजगार हमी योजनेशी निगडीत फळझाड लागवड कार्यक्रम

३.२६ राज्यातील कोरडवाहू शेतीचे प्रमाण जवळपास ८५ टक्के असल्याने या शेतीवर अवलंबून राहणाऱ्या लक्षावधी अल्प आणि अत्यल्प भुधारकांच्या शेती पद्धतीत परिवर्तन घडवून आणून पावसाच्या लहरीपणामुळे या शेतकऱ्यांची आर्थिक दुर्बलता यावर मात करण्याचे दृष्टीने शासनाने सन १९९०-९१ पासून रोजगार हमी योजनेशी निगडित फळझाड लागवड कार्यक्रम सुरु केला. या कार्यक्रमाचा उद्देश "शेतकऱ्यांना त्यांच्या स्वतःचे शेतावर कायमस्वरुपी रोजगार निर्माण करणे, उच्च मुल्यांकित पीक रचना, शेतकऱ्यांचे उत्पादनात वाढ होऊन त्यांचे राहणीमान उंचावणे, जमीनीवर वनस्पतीजन्य आच्छादनाच्या अभावामुळे होणारी जमीनीची धुप कमी करणे, पर्यावरणाचा समतोल राखणे तसेच मोठ्या प्रमाणात असलेली मशागत योग्य पडजमीन ही फळपिकांच्या लागवडीखाली आणणे" हा होता.

३.२७ या योजनेमध्ये एका लाभधारकास कमीत कमी कोकण विभागासाठी ०.१० हेक्टर आणि इतर विभागासाठी ०.२० हेक्टर व जास्तीत जास्त कोकण विभागासाठी १० हेक्टर व

इतर विभागांसाठी ४ हेक्टर पर्यंत क्षेत्र मर्यादा निश्चित करण्यात आली आहे. तसेच सलग क्षेत्रावर, भात खाचराच्या बांधावर फळपिकांची आणि नारळ बागेत मसाला पिकांची आंतरपिक म्हणून लागवड करता येते. सर्व फळपिकांकरीता (बागायती व कोरडवाहू) ज्या लाभार्थ्यांची दुसऱ्या वर्षी ७५ टक्के आणि तिसऱ्या वर्षी ९० टक्के झाडे जिवंत असतील त्या लाभार्थ्यांना दुसऱ्या आणि तिसऱ्या वर्षाचे अनुदान देय आहे. या योजनेमध्ये पहिल्या वर्षी ५० टक्के, दुसऱ्या वर्षी ३० टक्के व तिसऱ्या वर्षी २० टक्के या प्रमाणे अनुदान वितरणाचे निकष असून, लाभ धारकांचे अनुदान त्यांचे बँक खात्यात धनाकर्षाद्वारे जमा करण्यात येते.

३.२८ या योजनेमध्ये विविध कोरडवाहू आणि बागायती फळपिके, मसाला आणि औषधी सुगंधी वनस्पती या पिकांचा समावेश करण्यात आला आहे.

अ) कोरडवाहू पिके :- (१) आंबा, (२) काजू, (३) बोर, (४) सिताफळ, (५) आवळा, (६) चिंच, (७) फणस, (८) कोकम, (९) जांभूळ, (१०) कवठ, (११) जोजोबा (१२) बांबू (१३) जॅट्रोफा

ब) बागायती पिके :- (१४) नारळ, (१५) संत्रा (१६) मोसंबी, (१७) चिकू, (१८) डाळिंब (१९) पेरु (२०) अंजीर, (२१) कागदी लिंबू, (२२) सुपारी (सलग पिक) (२३) तेलताड, (२४) रबर व (२५) पानपिंपरी

क) नारळ बागेत अंतरपिकासाठी लागवड :- (१) मिरी (२) लवंग (३) जायफळ (४) दालचिनी (५) सुपारी

ड) औषधी व सुगंधी वनस्पती :- (१) आइरन (२) अर्जुना (३) असन (४) अशोका (५) बेल (६) गुग्गुल (७) लोध्रा (८) रक्तचंदन (९) शिवण (१०) टेटू (११) बेहडा (१२) बिब्बा (१३) डिकेमाली (१४) हिरडा (१५) रिठा (१६) वावडिंग (१७) करंज.

इ) भात खाचराच्या बांधावर लागवड :- (१) आंबा (२) काजू (३) पेरु (४) नारळ (५) आवळा

३.२९ सन २०१०-११ मध्ये फळपिक लागवडीचा ५०,००० हेक्टर लक्षांक निर्धारीत केला होता. त्यापैकी ४०५८६ हेक्टर क्षेत्रावर लागवड झाली आहे. सन २०१०-२०११ मध्ये रु. १२७.३१ कोटी निधी मंजूर झाला असून रु.११९.५८ कोटी खर्च झाला आहे. सन २०११-१२ करिता फळपिक लागवडीचा ५०,००० हेक्टर लक्षांक प्रस्तावित असून रु. १२४.०० कोटी निधी तरतूद मंजूर आहे.

बागायती रोपमळ्यांचे बळकटीकरण - १०० टक्के राज्य पुरस्कृत योजना

३.३० राज्यात राबविण्यात येत असलेल्या रोजगार हमी योजनेशी निगडीत फळबाग लागवड कार्यक्रमांतर्गत मुख्यत्वे शासकीय फळरोपवाटीकेवरील कलमे/रोपे लाभार्थिंना पुरविण्यात येतात. याव्यतिरिक्त शेतकऱ्यांना उत्कृष्ट वाणांच्या लागवड साहित्याचा पुरवठा करणे, उच्च तंत्रज्ञाचे प्रात्यक्षिक प्रक्षेत्रे विकसित करणे, रोपवाटिकेवरील कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देणे इत्यादी अनेक बाबींकरिता शासकीय रोपवाटिकेचे बळकटिकरण करणे आवश्यक आहे.

शासकीय रोपवाटिकेवरील कलमे/रोपे विक्री व इतर माध्यमातून उत्पन्न मिळते. रोपवाटिकांची अर्थिक स्थिती सुधारण्याकरिता उपाययोजना अंमलात आणल्या जात असून उत्पादनात वाढ होत आहे. राष्ट्रीय फलोत्पादन अभियान कार्यक्रमासाठी फळपिकांची कलमे/रोपे, भाजीपाला व फुलपिकांची रोपे यांसाठी मोठा वाव असल्याने रोपवाटिका बळकट करणे आवश्यक आहे.

<u>योजनेचा उद्देश :</u>

१) रोपवाटिकेवर अस्तित्वात असलेल्या मातृवृक्षामध्ये नविन व संकरित जातीच्या विविध फळझाडांच्या मातृवृक्षाची लागवड करणे व रोपवाटिकेचे क्षेत्र विकसित करणे.

२) गौण बांधकामांतर्गत रोपवाटीकेवरील उपलब्ध सिंचन क्षमतेत वाढ करणे, अस्तित्वात असलेल्या, नादुरुस्त सुविधा दुरुस्त करुन कार्यक्षमता वाढविणे, सूक्ष्म सिंचन सुविधा वाढविणे.

३) गौण बांधकामांतर्गत फळरोपवाटिकांवर उच्च तंत्रज्ञानावर आधारित पॉलीहाऊस, शेडनेट, हार्डनिंगशेड, इ. सुविधा निर्माण करणे, दुरुस्त करणे व त्यांची कार्यक्षमता वाढविणे.

४) फळरोपवाटिकांवरील पॉवर स्प्रेअर, डस्टर, फॉगर्स, ट्रॅक्टर्स इ. तांत्रिक सुविधात वाढ करणे, त्यांची दुरुस्ती करणे व कार्यक्षमता वाढविणे.

५) सामुग्री या घटकाअंतर्गत प्राप्त अनुदानातून कलमा-रोपांच्या उत्पादनात गुणात्मक व संख्यात्मक वाढ करणे.

६) रोपवाटिकेवर औषधी व सुगंधी वनस्पती, मसाला पिके, भाजीपाला पिके, इत्यादीची कलमे/रोपे उत्पादन करणे व बीजोत्पादन करणे.

बागायती रोपमळ्याची स्थापना व बळकटीकरण करणे या राज्य पुरस्कृत योजनेअंतर्गत शासकीय रोपवाटिकेवरील कलमे/रोपे उत्पादनासाठी सामुग्री पुरवठा व गौण बांधकामे यासाठी सन २०१०-२०११ मध्ये शासनाकडून रु.११९७.९५ लाख निधी खर्च झाला असून आणि सन २०११-१२ करीता रु.२२९१.१४ लाख तरतूद उपलब्ध आहे. शासकीय रोपवाटीकेवरील मजूरी या घटकासाठी सन २०१०-११ मध्ये शासनाकडून रु.४०९.०१ लाख निधी खर्च झाला असून आणि सन २०११-१२ करीता रु.३०९.१४ लाख तरतूद उपलब्ध आहे.

फळरोपवाटिका व्यवस्थापन :-

३.३१ राज्यात १३४ शासकीय, ४२ कृषी विद्यापीठांच्या व १९९५ खाजगी पंजीकृत रोपवाटीका कार्यरत आहेत. शासकीय १३४ रोपवाटिकांपैकी १ राज्यस्तरीय, २९ जिल्हास्तरीय, १०४ तालुकास्तरीय, रोपवाटीका आहेत. या सर्व शासकीय रोपवाटिकांखाली एकूण २७४५ हेक्टर क्षेत्र असून त्यापैकी ८१० हेक्टर क्षेत्र मातृवृक्षांखाली आहे.

सन २०१०-११ साठी केलेला कलमे/रोपे पुरवठा :-

३.३२ सन २०१०-११ या वर्षाकरता फळबाग योजनेसाठी ५०, ००० हेक्टर क्षेत्रावर लागवड करण्याचे उद्दिष्ट ठरविण्यात आले होते. त्यासाठी (नांग्या भरण्यासह) एकुण १,५७,५५,००० कलमा/रोपांची आवश्यकता होती. राज्यातील शासकीय, विद्यापीठ व खाजगी पंजीकृत रोपवाटिकांवर एकूण ४,६४,९३,००० इतकी कलमे/रोपे उपलब्ध झाली. लागवडीच्या लक्षांकास अनुसरुन राज्यात पुरेशी कलमे उपलब्ध करुन देण्यात आली असून कलमा-रोपांची कमतरता नाही.

सन २०११-१२ चे पुरवठा नियोजन :-

३.३३ या वर्षासाठी ३०,००० हेक्टर लागवडीचे उद्दिष्ट प्रस्तावित असल्याने त्यासाठी एकूण ९८,३७,९९७ इतक्या कलमांची आवश्यकता असून त्यापैकी शासकीय रोपवाटीकांवर अंदाजे ७८,४०,५३६ कृषि विद्यापीठांचे रोपवाटीकांवर १२,४८,३६१ इतकी उपलब्धता आहे. एकूण लागणारी कलमे-रोपे विचारात घेता फक्त ८ लाख कलमे खाजगी नोंदणीकृत रोपवाटीकांवरुन घ्यावी लागतील.

सन २०११-१२ या वर्षात उत्पादन करावयाच्या कलमा/रोपांचे नियोजन :-

३.३४ शासकीय रोपवाटिकांमध्ये खालीलप्रमाणे फळपिके, मसाला पिकांचे सन २०१०-११ या वर्षातील उत्पादन करावयाची व पुढील वर्षात विक्रियोग्य होणाऱ्या एकूण ८२,००,००० कलमा/रोपांचा उत्पादन लक्षांक निश्चित करण्यात आला आहे.

राज्य पुरस्कृत पिक संरक्षण योजना सन २०११-१२

३.३५ या योजनेंतर्गत संत्रा पिकावरील काळी/पांढरी माशी (कोळशी), फायटोप्थोरा रोग, आंबा पिकावरील तुडतुडे व भुरी, चिकुवरील बी-पोखरणारी अळी, नारळावरील इरिओफाईड माईटस, सुपारीवरील कोळे रोग, काजूवरील टी-मॉस्कुटो, केळीवरील करपा, पानवेलवरील बुरशीजन्य रोग, बटाट्यावरील करपा, मिरचीवरील चुरडामुरडा, कांदा पिकावरील फुलकिडे व करपा या किड/रोगांच्या नियंत्रणासाठी फवारणीचा कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे उपरोक्त पिकाव्यतिरिक्त इतर फळपिके, भाजीपाला, फुलपिके, मसाला पिके, औषधी व सुगंधी वनस्पती या पिकामध्ये अचानक किड रोगांचा प्रादुर्भाव आढळून आल्यास त्यावरही जिल्ह्यांला उपलब्ध करुन दिलेल्या अनुदानाच्या अधिन राहून पिक संरक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे.

३.३६ सन २०१०-११ मध्ये २२६०८ हेक्टर क्षेत्रावर पिक संरक्षण औषधांचे वाटप झालेले असून रु.१२९.८० लाख खर्च झालेला आहे. सन २०११-१२ मध्ये सर्वसाधारण घटकांकरीता ४९४४३ हेक्टर क्षेत्रावर पिक संरक्षण कार्यक्रम प्रस्तावीत करण्यात आला असून त्यासाठी रु.२९४.०६ लाखाची तरतूद जिल्हा नियोजन व विकास मंडळामार्फत मंजूर करण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे आदिवासी उपयोजनेंतर्गत आदिवासी घटकाकरीता ३०२३ हेक्टर क्षेत्रावर पिक संरक्षण कार्यक्रम राबविण्याचे प्रस्तावीत असून त्यासाठी रु.३०.०५ लाखाची तरतूद मंजूर करण्यात आलेली आहे. असा एकूण मिळून ५२४६६ हेक्टर क्षेत्रावर कार्यक्रम राबविण्याचा असून त्यासाठी एकूण रु.३२४.११ लाखाची तरतूद मंजूर करण्यात आलेली आहे.

सेंद्रिय शेती योजना

३.३७ सेंद्रिय शेती योजना ही मुख्यत: सेंद्रिय शेती पद्धतीस प्रोत्साहन देण्याचे उद्देशाने सुरु करण्यात आली आहे. सेंद्रिय शेती पद्धतीमध्ये निसर्ग संवर्धन करणे, पिकोत्पादनाचा खर्च कमी करणे, रासायनिक खते, किटकनाशके, तणनाशके व संप्रेरके यांसारख्या घातक रसायनांना पर्यायी अशा सेंद्रिय व जैविक निविष्ठांचा वापर करणे हा आहे.

१. कृति आराखड्याअंतर्गत सेंद्रिय शेती योजना -

सन २००२-०३ पासून सदरचा कार्यक्रम राबविण्यात येत असून त्यामध्ये खालीलप्रमाणे दोन योजनांचा समावेश आहे.

अ) गांडूळ खत उत्पादन व वापर

ब) सेंद्रिय शेतीस प्रोत्साहन देण्यासाठी अर्थसहाय्य.

या योजने अंतर्गत सन २००२-०३ ते २०१०-११ पावेतो खालीलप्रमाणे भौतिक साध्य झाले असून त्यासाठी जवळपास ५६ कोटी रुपये इतका खर्च झालेला आहे.

१) गांडूळ खत उत्पादन युनिट - १४६६६२

२) बायोडायनामिक कंपोस्ट युनिट - ३१५५३१

३) सेंद्रिय शेती गट संख्या - १७६२४

४) सेंद्रिय शेती प्रमाणिकरण गट संख्या - १६८३

५) सेंद्रिय शेतीशाळा - ८६१

६) प्रवर्तकांचे प्रशिक्षण - ८

७) सेंद्रिय शेतमाल विक्री केंद्रे संख्या - १२५

८) जिल्हास्तरीय प्रसिद्धी व जागृति मोहिम संख्या - १७५

९) प्रशिक्षण व कार्यशाळा संख्या - २१५

१०) जिल्हास्तरीय सेंद्रिय प्रदर्शन संख्या - ८७

११) राज्यस्तरीय जागृति मोहिम व प्रदर्शन संख्या - ११

१२) राष्ट्रीय स्तरावरील प्रदर्शन संख्या - ६

सेंद्रिय शेतीमध्ये आतापर्यंत योजनेंतर्गत व परंपरेने राज्यात जवळजवळ ७.०२ लाख हेक्टर क्षेत्र आले असून जवळपास १.५० लाख हेक्टर क्षेत्र प्रमाणिकरणाखाली (प्रमाणिकरण झालेले १.०५ लाख हेक्टर आणि प्रमाणिकरणाच्या प्रक्रियेत असलेले ०.४५ लाख हेक्टर) आलेले आहे.

सन २०१०-११ चा कार्यक्रम -

३.३८ सन २०१०-११ मध्ये गांडूळ खत उत्पादन व वापर योजनेसाठी रु.२००.०० लाख आणि सेंद्रिय शेतीस प्रोत्साहन देण्यासाठी अर्थसहाय्य या योजनेसाठी रु.३३८.८९ लाख असा एकूण रु.५३८.८९ लाख निधी उपलब्ध करुन देण्यात आला होता. त्यापैकी रु.५१५.८३ लाख खर्च झालेला आहे.

सन २०११-१२ चा कार्यक्रम -

३.३९ कृति आराखडयांतर्गत केंद्र शासनाच्या सूचनेप्रमाणे मागील वर्षी मंजूर असलेल्या तरतूदीच्या ८० टक्के रकमेचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. त्यानूसार सन २०११-१२ करीता गांडूळ खत उत्पादन व वापर योजनेसाठी रु.१६०.०० लाख आणि सेंद्रिय शेतीस प्रोत्साहन योजनेसाठी रु. २७१.११ लाख असा एकूण रु. ४३१.११ लाखाचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

त्यानुसार प्रत्येक प्रकल्पामध्ये गांडूळ खत उत्पादन युनिट, बायोडायनामिक कंपोस्ट डेपो, सीपीपी कल्चर युनिट, निंबोळी पावडर/अर्क तयार करणे, गिरीपुष्पाची लागवड, हिरवळीचे खत बियाणे पुरवठा, शेतकऱ्यांच्या शेतीशाळा, प्रवर्तकांचे प्रशिक्षण, अभ्यासदौरे इ. घटक राबविण्याचे प्रस्तावित आहे.

राष्ट्रीय सूक्ष्म सिंचन अभियान

३.४० राज्य पुरस्कृत ठिबक सिंचन योजना सन १९८६-८७ पासून सुरु करण्यात आली. केंद्र पुरस्कृत सूक्ष्म सिंचन योजना सन १९९०-९१ मध्ये सुरु झाली सन २०१०-११ पासून केंद्र शासनाने राष्ट्रीय सूक्ष्म सिंचन अभियान सुरु केले असून याअंतर्गत अल्प व अत्यल्प भूधारकांना ६० टक्के दराने व बहुभूधारकांना ५० टक्के दराने अनुदान देय आहे. राज्यातील शेतकऱ्यांना सूक्ष्म सिंचनाचे महत्व कळल्यामुळे राज्यात मोठ्या प्रमाणात सुक्ष्म सिंचनाचा वापर होत असून देशामध्ये महाराष्ट्र हे सूक्ष्म सिंचनाचा वापर करणारे अग्रेसर राज्य आहे.

राष्ट्रीय सूक्ष्म सिंचन अभियाना अंतर्गत ठिबक व तुषार सिंचन संच या दोन प्रमुख घटकांचा समावेश आहे. राज्यामध्ये आतापर्यंत ठिबक सिंचनाखाली ६.९५ लाख हेक्टर तर तुषार सिंचनाखाली २.९९ लाख हेक्टर असे एकूण ९.९४ लाख हेक्टर क्षेत्र सूक्ष्म सिंचनाद्वारे व्यापले आहे. त्याचा पीकनिहाय गोषवारा खालीलप्रमाणे.

अ.क्र.	पिके	लागवडी खालील क्षेत्र (लाख हेक्टर)

		एकूण	बागायत	सूक्ष्म सिंचनाखाली आलेले क्षेत्र
१.	फळे	१४.८२	८.०९	२.४३
२.	भाजीपाला	५.२५	५.२५	२.०६
३.	फुले	०.१८	०.१८	०.०३
४.	उस	९.६४	९.६४	२.६६
५.	कापूस	३९.७२	१.७८	१.४३
६.	कडधान्ये	४१.५६	२.९०	०.६९
७.	गळीताची पिके	४०.१०	६.२०	०.६४
एकुण		**१५१.२९**	**३४.०४**	**९.९४**

सन २००५-०६ पासून केंद्र पुरस्कृत सूक्ष्म सिंचन योजना राज्यात राबविण्यात सुरुवात झाल्यापासून झालेले भौतिक व आर्थिक साध्य खालीलप्रमाणे.

अ.क्र.	वर्ष	क्षेत्र (हेक्टर)			आर्थिक (रु.कोटी)		
		ठिबक	तुषार	एकूण	केंद्र	राज्य	एकुण
१.	२००५-०६	२७,८९४	१२,८२४	४०,७१८	४८.०६	१२.००	६०.०६
२.	२००६-०७	४०,८४३	२६,९०१	६७,७४४	८७.९६	२१.९७	१०९.९३
३.	२००७-०८	६३,५५५	३७,७१९	१,०१,२७४	१३८.९७	२८.३०	१६७.२८
४.	२००८-०९	७४,७८२	४१,८५१	१,१६,६३३	१२.००	५१.२२	१७३.२३
५.	२००९-१०	८१,६६१	३७,५५२	१,१९,२१३	१३२.२६	६०.२७	१९२.६३
६.	२०१०-११*	१,२७,६८३	३८,०३०	१,६५,७१३	३२६.३३	८१.५८	४०७.९१
एकुण		**४,१७,५३७**	**१,९३,६५४**	**६,११,१९१**	**८५५.५८**	**२५५.३४**	**१११०.९२**

*सन २०१०-११ मध्ये प्राप्त झालेला निधी सन २००९-१० मधील प्रलंबित प्रकरणांसाठी वापरण्यात आला आहे. सन २०१०-११ मध्ये केंद्र शासनाकडून प्राप्त झालेले रु.२२२.३७ कोटी व राष्ट्रीय कृषी विकास योजनेमधून रु.१०३.९६ कोटी असे एकूण रु.३२६.३३ कोटी केंद्र हिस्सा म्हणून वापरण्यात आला आहे.

सन २०११-१२ चा वार्षिक कृती आराखडा केंद्र शासनास खालीलप्रमाणे सादर करण्यात आलेला आहे.

अ.क्र.	तपशील	भौतिक (हे)	आर्थिक (रु.कोटी)		
			केंद्र हिस्सा	राज्य हिस्सा	एकूण
१.	सन २०१०-११ मधील प्रलंबीत प्रकरणांसाठी	१६६४४६	३४२.२४	८५.५६	४२७.८०
२.	सन २०११-१२ वार्षिक कृती आराखडा	२७१९३५	५५०.५१	१३७.५५	६८८.०६
एकूण		४३८३८१	८९२.७५	२२३.११	१११५.८६

वरीलप्रमाणे केंद्र शासनास प्रस्ताव सादर केला आहे. सन २०११-१२ मध्ये केंद्र शासनाकडून प्रशासकीय मान्यता प्राप्त असलेले रु.२३२.८० कोटी राष्ट्रीय कृषी विकास योजनेमधून मंजूर रु.७०.७१ कोटी, राज्य विघयो योजनेतून अर्थ संकल्पीत रु. ०.२५ कोटी आणि जिल्हा - डीपीडीसी योजनेमधून अपेक्षीत रु.११९.३३ कोटी असा एकूण रु.४२३.०९ कोटी निधी उपलब्ध व खर्च होईल असे अपेक्षित आहे.

सूक्ष्म सिंचन योजनेचे फायदे -

सूक्ष्म सिंचन योजनेचा वापर केल्याने पुढीलप्रमाणे फायदे झाल्याचे दिसून आले आहे.

(१) मागील पाच वर्षात सूक्ष्म सिंचनाखालील क्षेत्रात १० पटीने वाढ झाली.

(२) पाणी वापरामध्ये ३५ ते ४० टक्के बचत होते.

(३) पीक उत्पादनात ३० ते ४० टक्के वाढ होते.

(४) खत वापरामध्ये व मजूरीमध्ये बचत होते.

(५) बहुपीक पद्धतीमध्ये वाढ झाली.

राज्यामध्ये ठिबक सिंचनाचे २० उत्पादक, तुषार सिंचनाचे २४ व ठिबक आणि तुषार उत्पादक ३५ असे एकूण ७९ नोंदणीकृत उत्पादक आहेत.

राष्ट्रीय फलोत्पादन अभियान

३.४१ फलोत्पादन क्षेत्राच्या सर्वकष विकासासाठी केंद्र सरकारने राष्ट्रीय फलोत्पादन अभियान या महत्वाकांक्षी कार्यक्रमाची सुरुवात सन २००५-०६ साली करण्यात आली. सन २००५-०६ साली या अभियानात २३ जिल्ह्यांचा समावेश होता. सन २००६-०७ मध्ये नव्याने ६ जिल्ह्यांचा समावेश करण्यात आला. सन २००७-०८ मध्ये उर्वरीत चार जिल्ह्यांचा समावेश करण्यात येवून सध्या अभियान राज्यातील ३३ जिल्ह्यातून राबविण्यात येत आहे. राष्ट्रीय फलोत्पादन अभियान हे सन २०११-१२ पर्यंत सुरु राहणार आहे. अभियान कालावधीच्या ७ वर्षात देशातील फलोत्पादन क्षेत्राचे उत्पादन दुप्पट करणे हा अभिनयाचा प्रमुख उद्देश आहे. यासाठी गुणवत्तापूर्ण लागवड साहित्य निर्माण करणे, नविन फळबागांची लागवड करणे, जुन्या फळबागांचे पुनरुज्जीवन करणे, सामुहिक शेततळ्याच्या माध्यमातून सिंचन क्षमता वाढविणे, हरितगृह, शेडनेट मध्ये नियंत्रित शेती करणे, एकात्मिक अन्नद्रव्ये व एकात्मिक कीड

व्यवस्थापन, सेंद्रिय शेती, मनुष्यबळ विकास, काढणीत्तोर व्यवस्थापन या बाबींवर अर्थसहाय्य देण्यात येत आहे.

वर्षवार प्राप्त अनुदान व खर्च (एप्रिल २०११ अखेर)

वर्ष	मंजूर आराखडा	प्राप्त निधी			खर्च (रु.कोटी)		
		केंद्र	राज्य	एकूण	केंद्र	राज्य	एकूण
२००५-०६	१६०.७२	८२.६०	०.००	८२.६०	३२.२८	०.००	३२.२८
२००६-०७	२७१.६७	१४४.९३	०.००	१४४.९३	१३१.३५	०.००	१३१.३५
२००७-०८	२६९.२६	१३२.२५	२२.४५	१५४.७०	११०.५९	१२.४४	१२३.०३
२००८-०९	३७१.१७	१३०.२२	२२.९८	१५३.२०	१६८.१६	२७.२५	१९५.४१
२००९-१०	१६३.४९	९१.७३	१६.१८	१०७.९१	१२२.९५	२१.६९	१४४.६४
२०१०-११	१९६.६६	१२६.१४	१५.२५	१४१.३९	८८.८४	१५.६७	१०४.५१
२०११-१२ (एप्रिल ११ अखेर)	१५०.००	-	-	-	०.६४	०.११	०.७५
एकूण	**१३८६.३१**	**७०७.८७**	**७६.८६**	**७८७.७३**	**६५४.८१**	**७७.१६**	**७३१.९७**

*(सन २००५-०६ ते २००८-०९ या वर्षातील व्याजाची रक्कम रु.१३.४७ कोटी ही सन २००९-१० मध्ये अनुदान स्वरुपात वापरण्यात आलेली आहे. त्यामध्ये केंद्र हिस्सा रु.१२.३३ कोटी व राज्य हिस्सा रु.१.१४ कोटी एवढा आहे.)

सुरुवातीपासून केंद्र शासनाने रु.७०७.८७ कोटी व राज्य शासनाने रु.७६.८६ कोटी असे एकूण रु.७८७.७३ कोटी निधी उपलब्ध करुन देण्यात आला असून माहे एप्रिल २०११ अखेर रु.७३१.९७ कोटी खर्च करण्यात आलेला आहे.

मा.पंतप्रधान पॅकेज

मा.पंतप्रधान पॅकेज अंतर्गत विदर्भातील अकोला, अमरावती, यवतमाळ, वाशिम, बुलढाणा व वर्धा या सहा जिल्ह्यांसाठी सन २००६-०७ पासून तीन वर्षाचा रु.२२५.०० कोटीचा राष्ट्रीय फलोत्पादन अभियानाचा आराखडा मान्य करण्यात आलेला असून त्यापैकी सन २००६-०७ या आर्थिक वर्षासाठी रु.६०.०० कोटीचा आरखडा मान्य करण्यात आला असून सन २००६-०७ ते एप्रिल, २०११ प्राप्त अनुदान व खर्च ही माहिती खालील तक्त्यात देण्यात आली आहे.

वर्ष	मंजुर आराखडा	वितरीत अुनदान	खर्च (रु.कोटी) (एप्रिल २०११ अखेर)
२००६-०७	९८.९७	४६.८८	२८.१४
२००७-०८	६९.९८	२९.२३	२८.८३
२००८-०९	९८.५४	४३.००	५७.५०
एकूण	**२६७.४९**	**११९.११**	**११४.४७**

२००९-१०	५०.६३	३०.७८	३४.५८
२०१०-११	३९.७६	१९.६६	२०.७६
एकूण	**३५७.८८**	**१६९.५५**	**१६९.८१**

मा.पंतप्रधान पॅकेज अंतर्गत सन २००६-०७ ते २०११-१२ बाबनिहाय प्रगतीचा तपशील

(एप्रिल २०११ अखेर)

अ.क्र.	बाब	भौतिक	आर्थिक (रु.लक्ष)
१.	लागवड साहित्याची निर्मिती	१३८७६	५६.५१
२.	नविन फळबागांची लागवड	८५५२४	९२७३.६२
३.	जुन्या फळबागांचे पुनरुज्जीवन	१२०८२	१२२८.४९
४.	सामुहिक शेततळे	१६८४	४२४५.७१
५.	नियंत्रीत शेती	४०१	१९५.३२
६.	एकात्मिक कीड/अन्नद्रव्ये व्यवस्थापन	७४८१	१६१.३३
७.	सेंद्रिय शेती	४८२१	११८२.५२
८.	मधुमक्षिका पालन	३५०	२.६५
९.	फलोत्पादन यांत्रिकीकरण	३७	६.५०
१०.	तंत्रज्ञान/आद्यरेषा प्रात्यक्षिके	१	६.००
११.	मनुष्यबळ विकास	४०३२७	२७६.१६
१२.	काढणीत्तोर व्यवस्थापन	९९	१११.७३
१३.	नाविन्यपूर्ण घटक	१०	१३.२४
१४.	अभियान व्यवस्थापन	-	२२१.७०
	एकुण	-	**१६९८१.४८**

फलोत्पादन विभागाकडील योजनांबाबत
सन २०१०-११ च्या खर्चाची व सन २०११-१२ च्या तरतूदींची माहिती (रु.लाख)

अ. क्र.	योजना	निधीस्त्रोत व लेखाशिर्ष	सन २०१०-११ चा खर्च (रु.लाख)	२०११-१२ ची अर्थसंकल्पीय तरतूद (रु.लाख)
१	२	३	४	५
१.	रो.ह.योजना - फळबाग लागवड	राज्य - रोहयो	११९५७.६६	१२४००.००
२.	शासकीय रोपवाटिकेचे बळकटीकरण करणे. योजनांतर्गत योजना **(साधन सामुग्री व गौण बांधकाम)**	राज्य- २४०१-१७४२ (साधन सामुग्री)	३४०.२६	४००.००
		राज्य- २४०१-१७४२ (गौण बांधकाम)		९००.००
		टि.एस.पी. - २४०११४१९	३२.२७	९३.००
		जिल्हा - डीपीडीसी	४१६.४१	५०४.००

	भाजीपाला - फळे, रोपमळे व स्थानिक उद्याने (मजूरी)	राज्य (२४०१-१७२२) योजनेतर योजना	४०९.०१	३९४.१४
	एकूण		**११९७.९५**	**२२९१.१४**
३.	फलोत्पादन पीक संरक्षण योजना (जिल्हास्तर)	जिल्हा- डीपीडीसी	१२९.८०	२९४.०६
		टि.एस.पी. २४०११४१९	०.००	३०.०५
	(राज्यस्तर)	राज्य - २४०१-३२१५	०.००	५०.००
	एकूण		**१२९.८०**	**३७४.११**
४.	गांडूळ खत उत्पादन व वापर	केंद्र - २४०१-४०२४	१४९.५९	६२.५०
		राज्य - २४०१-४५२५	४९.६९	१८७.५०
	सेंद्रिय शेतीस प्रोत्साहन देणे	केंद्र - २४०१-४५३४	२३६.४९	८७.५०
		राज्य - २४०१-४४०९	७६.६५	२६२.५०
	एकूण		**५१२.४२**	**६००.००**
५.	केंद्र पुरस्कृत सूक्ष्म सिंचन योजना	केंद्र - २४०१-२५०४	२२२३७.००	२३२८०.००
		राष्ट्रीय कृषी वि.योजना	१०३९६.३४	७०७१.००
		जिल्हा - डीपीडीसी	८१५८.०	११९३३.४१
		वि.घ.यो.-२४०१	०.००	२५.००
	एकूण		**४०७९१.३४**	**४२३०९.४१**
एकूण फलोत्पादन योजना			**५४५८९.१७**	**५७९७४.६६**

३.४२ समितीच्या बैठकीमध्ये महालेखाकारांनी असे मत व्यक्त केले की, सन २००७ में इस बारे में ऑडिट किया गया था. कॉम्प्रीहेन्सीव्ह ॲग्रीकल्चर के कार्यक्रम में २४ मॉडयुलों को इंटिग्रेटेड किया गया था. इसके बारे में मेरा यह कहना है कि इन मॉडयुलों का डेटा इंटिग्रेटेड होना चाहिए. इसमें विविध प्रकार के कार्यक्रम शामिल थे. जैसे कि सॉईल टेस्टींग, सीडस्, वॉटर शेड, क्रॉप पॅटर्न इत्यादी. इन सब का अलग अलग डेटा होने के बजाय एक ही जगह पर डाटा रहेगा तो विभाग को नियोजन करने में और इन कार्यक्रमों को अमल में लाना आसान होगा व अशी विचारणा केली की, आज की स्थिति में ॲग्रीकल्चर सेन्सस का स्टेटस क्या है ? इस बारे में अपडेट जानकारी उपलब्ध होनी चाहिए. इसके बारे में २००१ तक ही इसकी जानकारी अपडेट थी. उसके बाद सन २००५ और २०१० में भी इसकी जानकारी

अपडेट करनी चाहिए थी. ॲग्रीकल्चर विभाग अगर यह जानकारी अपडेट रखता है तो युजर को डेटा मिल सकता है और नियोजन करने में मदद हो सकती है. इन चीजों का विभाग ने विचार करना चाहिए. त्यावर विभागीय सचिवांनी माहिती देताना सांगितले की, दो तरह के अप्लीकेशन्स विभाग के थे. पहले अप्लीकेशन क्लाएंट सर्वर बेस था. क्योंकि तब वेबसाईट की संकल्पना इतनी पॉप्युलर नहीं थी. विभाग को भी इसके बारे में ज्यादा जानकारी नहीं थी. इस बारे में सन १९९२ से काम शुरु हुआ था. उस समय आयसोलेटेड कॉम्प्यूटरायजेशन के तरीके से काम करने के बारे में हमारा कोई विचार नहीं था. जो सॉईल टेस्टींग लॅबोरेटरीज थी, वह सॅम्पल ॲनॅलाईज करके उसके बारे में रिझल्ट प्रिंट करना, इतना ही काम था.

प्रशासनने वेब बेस अप्लीकेशन करने का काम हाथ में लिया. लेकिन अब केंद्र सरकार ने पूरे देश के लिए इन सभी मॉड्युलों का एक इंटीग्रेटेड सॉफ्टवेअर बनाने का काम हाथ में लिया है. अगर विभाग का अलग ॲप्लीकेशन बनाते, तो जब केंद्र सरकार का ॲप्लीकेशन आएगा विभागके ॲप्लीकेशन को कन्वर्ट करना पड़ता था और वह एक तरह का रिपीटेशन ऑफ वर्क होगा. इसलिए विभागाने प्रोग्राम रोक दिया. अब विभाग केंद्र सरकारके अप्लीकेशन आने की राह देख रहे है.

महालेखाकारने ॲग्रीकल्चर सेन्सससंदर्भात विचारणा केली होती. विभागीय सचिवांनी सांगितले की, ये सेन्सस हर पांच साल बाद रेवेन्यू विभाग करता है. उनका विभाग फिल्ड लेवल पर सर्वे करके डेटा कलेक्ट करते है. सेन्सस का सॉफ्टवेअर केंद्र सरकार के लेवल पर एनआयसी की मदद से करवाया है. ॲग्रीकल्चर सेन्सस ये हर साल नहीं किया जाता. यह पांच साल में एक बार होता है. अभी २०१० का सेन्सस का काम चालू है. रेवेन्यू विभाग की तरफ से उसकी जानकारी मिल सकती है. इसमें काफी सारे अप्लीकेशन्स आते है. उसमें रेन फॉल का डेटा इत्यादी की जानकारी रहती है. सन १९९९-२००० में कनेक्टीवीटी की बहुत बड़ी समस्या थी. तब तालुका लेवल पर टेलीफोन नहीं थे, कम्प्युटर नहीं थे. लेकिन अब विभाग की पोजिशन काफी अच्छी है. आज हमारे पास कम्प्यूटर की १५०० मशीन्स है. इसके बारे में अब विभाग में काफी सुधार हुआ है.

विभागाने जी वेबसाईट तयार केलेली आहे, यावर सर्व माहिती दिलेली आहे. परंतु शेतकऱ्यांकडून जर काही सूचना करावयाच्या असतील तर त्या या वेबसाईटवर करता येतात

काय अशी समितीने विचारणा केली असता विभागीय सचिवांनी तशा प्रकारची सुविधा वेबसाईटवर असल्याचे सांगितले.

समितीने केंद्र शासनाकडून कोणत्या फलोत्पादनासाठी किती अनुदान मिळते. राज्याचा व केंद्राचा यामध्ये किती हिस्सा आहे. यामध्ये दरवर्षी वाढीव रक्कम मिळते काय ? शेततळे, ठिबक सिंचनाची माहिती देण्याविषयी सूचित केले. आता फळबागांसाठी ठिबक सिंचन सुरु करण्यात आले आहे. संत्रा बागेसाठी अनेक ठिकाणी ठिबक सिंचन करण्यात आले आहे. दिवसेंदिवस पाऊस कमी पडतो, धरण, नदी, विहिरी यांचे पाणी मर्यादित असल्यामुळे भविष्यात ठिबक सिंचनाची आवश्यकता मोठ्या प्रमाणात भासणार आहे. महाराष्ट्रात आता किती हेक्टर फळबागा आहेत, यामध्ये किती वाढ व घट झाली. नवीन कोणत्या जाती विकसित करण्यात आल्या आहेत, अशी संपूर्ण माहिती समितीला देण्यासंदर्भात विभागीय सचिवांना सूचित केले असता सचिवांनी खुलासा केला की, खरीप २०११ च्या संदर्भात नुकतीच बैठक झालेली आहे त्या बैठकीसाठी एक पुस्तिका तयार करण्यात आलेली आहे. त्यामध्ये सविस्तर माहिती देण्यात आलेली आहे. ती पुस्तिका समितीला देण्यात आली आहे. सदर पुस्तिकेतील संक्षिप्त व सद्य:स्थितीतीची माहिती **(विवरणपत्र क्र.६)** सोबत जोडली आहे.

अभिप्राय व शिफारशी :

३.४३ समितीसमोर प्राप्त झालेल्या उपरोक्त माहितीवरुन असे दिसून येते की, इस्त्रालयामध्ये प्रगत तंत्रज्ञानाच्या माध्यमातून २० गुंठे जमिनीवर २०-२५ टन ढोबळी मिरचीचे उत्पादन केले जाते. परंतु त्यास पणन व्यवस्था नसल्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होते. राज्यात देखील थोड्या-फार प्रमाणात हीच परिस्थिती आहे. शेतकऱ्यांच्या उत्पादनाला योग्य भाव मिळण्यासाठी, शेतकऱ्यांनी दलांलाकडून होणारी पिळवणूक थांबविण्यासाठी तसेच ग्राहकाला शेतमाल वाजवी दरात उपलब्ध व्हावा यासाठी राज्यातील बाजार समित्यांच्या कामात आवश्यक समन्वय साधने, कृषि उत्पन्न बाजार समितीचा विकास व प्रसार, कृषि निर्यात क्षेत्रांची स्थापना, थेट पणन, शेतकरी-ग्राहक बाजार याबाबत शासनाने विशेष लक्ष देणे आवश्यक आहे. यादृष्टिने **शेतकऱ्याच्या मालास गाव-तालुका पातळीवर बाजारपेठ उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाने आवश्यक ती कार्यवाही करावी तसेच यासंदर्भात पायाभूत सुविधा उभारण्यासाठी**

आवश्यक असणारा निधी कृषि विभागास मोठ्या प्रमाणात मंजूर करण्यात यावा अशी समिती शिफारस करीत आहे.

३.४४ विभागीय सचिवांच्या साक्षीच्या अनुषंगाने तसेच समितीसमोर प्राप्त झालेल्या माहितीवरुन कृषी विभागाचे संगणकीकरण मोठ्या प्रमाणात झाले असल्याचे समितीस निदर्शनास आले. कृषि विभागामार्फत राज्यातील शेतकऱ्यांना कृषि विषयक संदेश (sms) मराठी भाषेतून पाठविण्यात येत असून या संदेशामध्ये शेतकऱ्यांना उपयुक्त अशी माहिती पाठविण्यात येते. उप विभाग स्तरावर कृषी अधिकाऱ्यांना लॅपटॉप देण्यात आले असून सदर अधिकारी पाणलोट विकास क्षेत्र, पर्जन्यमान, पिकांची खानेसुमारी, मातीची चाचणी, बियाणांची चाचणी, प्रशिक्षण कार्य इ.माहिती गोळा करुन ती संगणकांवर लोड करण्यात येते व इंटरनेटच्या माध्यमाद्वारे ती सर्व शेतकऱ्यांना उपलब्ध करुन देण्यात येते. विभागाच्या w.w.w.mahaagri.gov.in या संकेतस्थळावर कृषि विभागाच्या विषयी यामध्ये कृषि विभागाच्या सर्व योजना यांची माहिती वेळोवेळी अद्ययावत करण्यात येते असे समितीस माहिती देताना सांगण्यात आले. **कृषि विभागाचे संगणकीकरण करुन शेतकऱ्यांना अशा प्रकारे अद्ययावत तंत्रज्ञानाद्वारे माहिती उपलब्ध करुन देणे ही प्रशंसनीय बाब आहे परंतु इंटरनेरवर उपलब्ध असलेल्या माहितीचा वापर प्रामुख्याने सधन असलेले शेतकरीच घेवू शकतात. परंतु लहान शेतकऱ्यांपर्यंत ही सर्व माहिती पोहोचवली गेली पाहिजे याकरीता इंटरनेट व दूरदर्शन या सर्वत्र पसरलेल्या माध्यमाचा वापर देखिल मोठ्या प्रमाणात करावा अशी समितीची शिफारस आहे.**

३.४५ तालुका पातळीवरील कृषी अधिकाऱ्यांना इंटरनेट सेवा उपलब्ध करुन दिलेली आहे. शेतकऱ्यांना वेगवेगळ्या विषयासंबंधीच्या जवळपास ५० सीडीज दिलेल्या आहेत. त्या सीडींमध्ये प्रत्येक विषयाची माहिती आहे. परंतु कृषी विभागाअंतर्गत कार्यालयात संगणकाचा वापर कमी प्रमाणात होतो. जवळपास १२ हजार कर्मचारी संगणक विषयातील पदविकाधारक आहेत. तसेच डीआयटी व एमएस-सीआयटी कोर्स केलेले कर्मचारी आहेत असे असतानाही संगणकाचा पुरेपुर वापर होत नाही. शेती आणि शेतकरी आपला गाभा आहे. शेतकरी तालुक्याच्या ठिकाणी जाऊन इंटरनेटवरुन माहिती घेणार नाहीत. तेव्हा प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये संगणक उपलब्ध करुन त्यासोबत एक ऑपरेटर देखील उपलब्ध करुन दिला पाहिजे. साधारणतः ३५ हजार ग्रामपंचायती आहेत. तेव्हा ३५ हजार किऑस्क उभे राहिले पाहिजेत. कारण मोठे शेतकरी स्वतःच्या घरी इंटरनेटची सेवा घेऊ शकतात. परंतु छोटे

शेतकरी स्वत:च्या घरी इंटरनेट घेऊ शकत नाही. तेव्हा छोट्या शेतकऱ्यांसाठी ग्रामपंचायतीमध्ये इंटरनेटची सेवा उपलब्ध करुन दिली पाहिजे.

३.४६ गुजरात राज्यामध्ये ई-ग्राम संकल्पना राबविण्यात आली आहे. तेथील प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये सरकारने आपल्या खर्चाने संगणक पुरविले आहेत. दरवर्षी जवळपास ६० कोटी रुपये देखभालीवर खर्च होतो. गुजरात राज्यामध्ये सर्व योजनांची माहिती प्रत्येक ग्रामपंचायतीच्या संगणकावर उपलब्ध आहे. **गुजरात राज्याच्या धर्तीवर आपल्या राज्यात सुद्धा प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये शासनाने संगणक उपलब्ध करुन द्यावेत. अशी समितीची शिफारस आहे.**

३.४७ कृषीविषयक माहिती मिळावी यासाठी काही सीडीज तयार केलेल्या आहेत. शेतकऱ्यांसाठी प्रशिक्षण आयोजित केले जाते त्यावेळी त्या सीडीज् दाखविल्या जातात. ज्याप्रमाणे शाळांना संगणक देण्यात येतात त्याप्रमाणे ज्या ठिकाणी बागायती क्षेत्र आहे व ज्या ठिकाणी खरेदी-विक्रीचे व्यवहार जास्त होतात अशी ठिकाणे निवडून त्या ठिकाणी आमदार निधीतून संगणक उपलब्ध करुन दिले तर त्या ठिकाणी शेतकऱ्यांना अधिक माहिती उपलब्ध होऊ शकेल. वेबसाईटवर वेगवेगळया विभागाची वेगवेगळी माहिती देण्यात आली आहे. **ही सर्व माहिती ग्रामीण पातळीवर तातडीने उपलब्ध करुन देण्यासाठी ग्रामपंचायतींना आमदार निधीतून संगणक उपलब्ध करुन देण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

३.४८ राज्यातील कोरडवाहू शेतीचे प्रमाण जवळपास ८५ टक्के असल्याने या शेतीवर अवलंबून राहणाऱ्या लक्षावधी अल्प आणि अत्यल्प भूधारकांच्या शेती पद्धतीत परिवर्तन घडवून आणून पावसाच्या लहरीपणमुळे या शेतकऱ्यांची आर्थिक दुर्बलता यावर मात करण्याचे दृष्टीने शासनाने सन १९९०-९१ पासून रोजगार हमी योजनेशी निगडित फळझाड लागवड कार्यक्रम सुरु केला. या कार्यक्रमाचा उद्देश शेतकऱ्यांना त्यांच्या स्वत:चे शेतावर कायमस्वरुपी रोजगार निर्माण करणे, उच्च मुल्यांकित पीक रचना, शेतकऱ्यांचे उत्पादनात वाढ होऊन त्यांचे राहणीमान उंचावणे, जमीनीवर वनस्पतीजन्य आच्छादनाच्या अभावामुळे होणारी जमीनीची धुप कमी करणे, पर्यावरणाचा समतोल राखणे तसेच मोठ्या प्रमाणात असलेली मशागत योग्य पडजमीन ही फळपिकांच्या लागवडीखाली आणणे हा उद्देश होता.

३.४९ राज्यात राबविण्यात येत असलेल्या रोजगार हमी योजनेशी निगडीत फळबाग लागवड कार्यक्रमांतर्गत मुख्यत्वे शासकीय फळरोपवाटीकेवरील कलमे/रोपे लाभार्थिंना पुरविण्यात येतात. याव्यतिरिक्त शेतकऱ्यांना उत्कृष्ट वाणांच्या लागवड साहित्याचा पुरवठा करणे, उच्च तंत्रज्ञाचे प्रात्यक्षिक प्रक्षेत्रे विकसित करणे, रोपवाटिकेवरील कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देणे इत्यादी अनेक बाबींकरिता **शासकीय रोपवाटिकेचे बळकटीकरण करुन शेतकऱ्यांना आवश्यकतेप्रमाणे रोपे/कलमे पुरविण्यात यावे त्यांचे शुल्क शेतकऱ्यांना शासनाकडून मिळणाऱ्या अनुदानातून वजा करण्यात यावे, अशी समितीची शिफारस आहे.**

३.५० या योजनेंतर्गत संत्रा पिकावरील काळी/पांढरी माशी (कोळशी), फायटोप्थोरा रोग, आंबा पिकावरील तुडतुडे व भुरी, चिकुवरील बी-पोखरणारी अळी, नारळावरील इरिओफाईड माईटस, सुपारीवरील कोळे रोग, काजूवरील टी-मॉस्कुटो, केळीवरील करपा, पानवेलवरील बुरशीजन्य रोग, बटाट्यावरील करपा, मिरचीवरील चुरडामुरडा, कांदा पिकावरील फुलकिडे व करपा या किड/रोगांच्या नियंत्रणासाठी फवारणीचा कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे उपरोक्त पिकाव्यतिरिक्त इतर फळपिके, भाजीपाला, फुलपिके, मसाला पिके, औषधी व सुगंधी वनस्पती या पिकामध्ये अचानक किड रोगांचा प्रादुर्भाव आढळून आल्यास त्यावरही जिल्ह्यांला उपलब्ध करुन दिलेल्या अनुदानाच्या अधिन राहून पिक संरक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. पिक संरक्षणाचा मोबदला शेतकऱ्यांना योग्य व विहित मुदतीत मिळत नाही. त्यामुळे **पीक संरक्षणाचा कार्यक्रम राबविताना पीक नुकसान भरपाई शेतकऱ्यांना तातडीने मिळण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्यात यावी तसेच याबाबत ठोस उपाययोजना करण्यात याव्यात, अशी समितीची शिफारस आहे.**

३.५१ सृष्टिचा समतोल राखण्यास मदत करणारी सेंद्रिय शेती ही काळाच्या कसोटीवर उतरलेली शेतीची पद्धत असून त्याचा प्रचार करण्याची गरज आहे. सेंद्रिय शेतीमध्ये निसर्ग संवर्धन करणे, पिकोत्पादनाचा खर्च कमी करणे, रासायनिक खते, किटकनाशके, तननाशके व संप्रेरके यासारख्या घातक रसायनांना पर्यायी अशा सेंद्रिय व जैविक निविष्ठांचा वापर करण्याबाबत शेतकऱ्यांमध्ये जनजागृती करण्यात यावी. राज्यातील जास्तीत जास्त हेक्टर क्षेत्र सेंद्रिय शेतीखाली आणण्याबाबत शासनाने प्रोत्साहन व प्रमाणीकरण करण्यासाठी विविध योजनांचा समावेश करण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.

३.५२ राष्ट्रीय सूक्ष्म सिंचन अभियानांतर्गत ठिबक व तुषार सिंचन संच या दोन प्रमुख घटकांचा समावेश आहे. राज्यामध्ये आतापर्यंत ठिबक सिंचनाखाली ६.९५ लाख हेक्टर तर तुषार सिंचनाखाली २.९९ लाख हेक्टर असे एकूण ९.९४ लाख हेक्टर क्षेत्र सूक्ष्म सिंचनाद्वारे व्यापले आहे असे असले तरी राज्यात असलेले बागायती क्षेत्र विचारात घेता ठिंबक व तुषार सिंचनाखाली असलेले क्षेत्र अत्यल्प असून त्यात मोठ्या प्रमाणात वाढ होणे आवश्यक आहे.

३.५३ तुषार व ठिबक सिंचन पद्धतीचा अवलंब केल्याने सिंचनासाठी वापरल्या जाणाऱ्या पाण्याची बचत होते व त्यामुळे जास्तीत जास्त क्षेत्र सिंचनाखाली आणणे शक्य होते. शिवाय जमिनीची धूप कमी होणे, मशागतीची कामे सुलभ होणे, किडीमुळे होणारे नुकसान घटते, आणि पीक उत्पादनात वाढ होणे या सर्व बाबी शक्य होवू शकतात. त्यामुळे **राज्यातील ठिबक व तुषार सिंचनाखालचे क्षेत्र वाढविण्याच्यादृष्टीने सर्वसामान्य शेतकऱ्यांना जास्तीत जास्त अनुदान देण्यात यावे तसेच यासंदर्भात केंद्र शासनाकडून देखिल मोठ्या प्रमाणात अनुदानाची मागणी करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

३.५४ फलोत्पादन क्षेत्राच्या सर्वकष विकासासाठी केंद्रसरकारने राष्ट्रीय फलोत्पादन अभियान या महत्वाकांक्षी कार्यक्रमाची सुरुवात सन २००५-०६ साली करण्यात आली. सन २००५-०६ साली या अभियानात २३ जिल्ह्यांचा समावेश होता. सन २००६-०७ मध्ये नव्याने ६ जिल्ह्यांचा समावेश करण्यात आला. सन २००७-०८ मध्ये उर्वरीत चार जिल्ह्यांचा समावेश करण्यात येवून सध्या अभियान राज्यातील ३३ जिल्ह्यातून राबविण्यात येत आहे. राष्ट्रीय फलोत्पादन अभियान हे सन २०११-१२ पर्यंत सुरु राहणार आहे. **राष्ट्रीय फलोत्पादन अभियानांतर्गत गुणवत्तापूर्ण लागवड साहित्य निर्माण करणे, नविन फळबागांची लागवड करणे, जुन्या फळबागांचे पुनरुज्जीवन करणे, सामुहिक शेततळ्याच्या माध्यमातून सिंचन क्षमता वाढविणे, हरितगृह, शेडनेट मध्ये नियंत्रित शेती करणे, एकात्मिक अन्नद्रव्ये व एकात्मिक कीड व्यवस्थापन, सेंद्रिय शेती, मनुष्यबळ विकास, काढणीत्तोर व्यवस्थापन या बाबींवर अर्थसहाय्य देण्यात येते. ही योजना शेतकऱ्यांच्या दृष्टीने महत्त्वाची असून सन २०११-१२ नंतर पुढे सुरु राहण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्यात यावा व केंद्र शासनाचा जास्तीत जास्त निधी खर्च करण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

नगरविकास विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी सन २००६-२००७ या वर्षाच्या नागरी अहवालामधील परि.क्र.४.३.९ "व्याजाचे नुकसान" या संदर्भात महालेखाकारांनी खालील अभिप्राय व्यक्त केले आहेत.

व्याजाचे नुकसान -

४.१ पट्टा लेखामध्ये भूपट्टा भाड्याची अदायगी विलंबाने केल्यास व्याज लावण्याचे कलम समाविष्ट न केल्यामुळे मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरणांस जानेवारी २००७ पर्यंत रु.७.२५ कोटीचे नुकसान झाले.

डिसेंबर, १९९७ आणि एप्रिल, २००६ या दरम्यान मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरणाने सात पक्षकारांशी त्यांनी पट्टा अधिमुल्य देण्याचे मान्य केल्यानंतर बांद्रा-कुर्ला समूहात व्यापारी भूखंड पट्टयाने देण्यासाठी करार केले. कराराच्या ७ व्या कलमानुसार पक्षकारांनी पट्टा कराराच्या चौथ्या, २१ व्या आणि ५१ व्या वर्षी अनुक्रमे पट्टा अधिमूल्याच्या १ टक्का, २ टक्का आणि ३ टक्के दराने दरवर्षी १० जानेवारी रोजी अग्रिम भू पट्टाभाडे देण्याचे मान्य केले होते. पट्टा कराराच्या ८ व्या कलमानुसार मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरणास ते ठरवतील त्याप्रमाणे पट्टा लेखामध्ये सुधारणा किंवा भर घालण्याचे अधिकार दिले होते.

निविदा काढताना बोलीच्या कागदपत्रांत भू पट्टा भाड्याच्या विलंबित अदायगीवर व्याज लावण्याच्या तरतुदीचा समावेश नसल्यामुळे मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरणाने भू पट्टा भाड्याच्या विलंबित अदायगीवर चालू बँक दर अधिक तीन टक्के किंवा आयुक्त, मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण हे ठरवतील त्या दराने व्याज लावण्याचे अतिरिक्त कलम समाविष्ट करण्याचे ठरविले (ऑक्टोबर १९९५).

तपासात असे आढळले (ऑक्टोबर २००५) जरी सदर निर्णय जमिनीचा ताबा देण्यापूर्वी आणि पट्टा लेख अंमलात आणण्यापूर्वी घेतला होता तरी मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरणाने व्याज लावण्याचे कलम समाविष्ट केले नव्हते. परिणामत: जरी सात पट्टा धारकांनी २०००-०७ या कालावधीत वार्षिक भू पट्टा भाडे ११३ ते १६०४ दिवसांच्या विलंबाने भरले होते तरी त्यावरील रु.७.२५ कोटी इतकी व्याजापोटी लागू होत असलेली रक्कम वसूल

करणे शक्य झाले नव्हते. यामुळे मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरणास त्या प्रमाणांत नुकसान झाले होते.

मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरणाने असे म्हटले की (नोव्हेंबर २००५ आणि मे २००७) जरी ऑक्टोबर १९९५ ला निर्णय घेतल्यानंतर पट्टा लेखे अंमलांत आणले होते तरी ज्या निविदांच्या प्रतिपूर्तीकरिता बोली मिळाल्या होत्या त्यामध्ये व्याज लावण्याचे सदर कलम समाविष्ट नव्हते. तसेच कायदा सल्लागारांनी असा सल्ला दिला होता कि सदर कलम पट्टा लेख्यांमध्ये समाविष्ट करु नये कारण प्रत्यक्षात बोली ऑक्टोबर १९९५ पूर्वी मागितल्या होत्या आणि स्विकारल्या होत्या.

दिलेले उत्तर समर्थनीय नव्हते कारण जरी बोली ऑक्टोबर १९९५ पूर्वी मिळाल्या होत्या तरी जमिनीचा ताबा हस्तोतर आणि पट्टा करार आणि पट्टा लेखे त्यानंतर करण्यात आले होते. तसेच, पट्टयाच्या करारातील कलम ८ च्या द्वारे मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरणास पट्टा लेख्यांत कोणतीही भर किंवा सुधार करण्याचे अधिकार मिळाले होते. शिवाय, मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरणाकडून, भू पट्टा भाड्याच्या विलंबित अदायगीसाठी व्याज लावण्याचा अधिकार मिळणारे कलम समाविष्ट न करण्याची, मोठी चूक झाली होती.

ही बाब शासनाच्या प्रधान सचिवांस जुलै २००७ मध्ये कळविण्यात आली होती. अद्याप उत्तर आले नव्हते (ऑगस्ट २००७).

ज्ञापन :

४.२ उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला :-

यासंदर्भात नगरविकास विभागाने पाठविलेल्या लेखी स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये असे नमूद करण्यात आले आहे की, प्राधिकरणाच्या (जमिन विल्हेवाट) नियमावली १९७७ मध्ये भुपट्टा भाड्याची अदायगी विलंबाने केल्यास व्याज लावण्याची तरतूद समाविष्ट नव्हती आणि त्यामुळेच पट्टा करार आणि पट्टा लेखे उपरोक्त नियमावलीप्रमाणे करण्यात आले.

लेखा परिक्षकांचे असे मत आहे की, प्राधिकरण पट्टा कराराच्या ८व्या कलमानुसार मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरणास ते ठरवतील त्याप्रमाणे पट्टा लेख्यांमध्ये सुधारणा किंवा भर घालण्याचे अधिकार आहेत आणि त्यामुळेच पट्टा लेख्यामध्ये विलंबाने अदायगी केलेल्या भूपट्टा भाड्यावर व्याज आकारण्याची तरतूद भूखंड वाटप करण्यात आलेल्या ७ बँकांच्या बाबतीत समाविष्ट करता येणे शक्य होते. अनुषंगाने असे सांगण्यात येते की, जर

भूभाडेपट्टा सुधारीत करता आला असता तर वसुल करता येणाऱ्या रक्कमेचा आकडा सोबत जोडलेल्या विवरण पत्राप्रमाणे रु.३.५५ कोटी व लेखा आक्षेपाप्रमाणे इतका होता आणि तो आता लेखा परिच्छेदात रु.७.२५ कोटी इतका दर्शविण्यात आला आहे.

हा मुद्दा प्राधिकरणाच्या कायदे सल्लागारांच्याकडे विचारार्थ पाठविण्यात आला आणि कायदे सल्लागारांचा त्यावरील सल्ल्यांचा उतारा खालील प्रमाणे आहे.

१. वित्तीय सल्लागार आणि लेखा परिक्षक यांच्या मतातील विरोधाभास किंवा भेद हा सुक्ष्म टप्प्यात येतो. पण कायद्यांतर्गत लक्ष वेधणारा प्रश्न ठरतो.

२. याबाबत वस्तुस्थितीतील निर्दशक कायदेशीर साचा अनुक्रमाने सांगणे बोधपर ठरेल.

१) एप्रिल १९७७ पूर्वी, प्राधिकरण मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण (जमीन विल्हेवाट) नियमावली, १९७७ अंतर्गत जमीन भूभाड्यापोटी दोन थरावरील पद्धत अवलंबीत होती.

२) प्रथमतः प्राधिकरण भाडेपट्टा करार करत असे की, ज्यामुळे होणाऱ्या भाडेपट्टेदाराला जमीनीवर जाण्याचा अधिकार मिळून नेमून दिलेल्या कालावधीत जमिनीवरील इमारतीचे बांधकाम पूर्ण करता येत असे.

३) भाडेपट्टा करारामध्ये त्याबाबत २ अटी किंवा शर्ती क्रमांक ७ व ८ आहेत.

४) आणि त्या उपरांत, योजिल्यावर हुकूम इमारतीच्या बांधकामानंतर आणि पायाभूत सुविधा प्राधिकरणाच्या मान्यतेप्रमाणे झाल्यानंतर, प्राधिकरण भाडेपट्टा लेख्यांची अंमलबजावणी करीत असे व तद्नंतर जमीन आणि इमारतीचे हस्तांतरण पूर्ण होत असे आणि अशा तऱ्हेने अंमलबजावणी केलेले भाडेपट्टा लेखे, की जे भाडेपट्टा कराराशी सुसंगत असे ते, उपनिबंधक स्थावर जंगम हस्तांतरण कार्यालयात नोंदणीकृत केले जात असे.

५) तेव्हा अट क्र.७ भाडे पट्टेदाराला नियत दराने भूभाडे दरवर्षी प्राधिकृत करते. मात्र उशीरा बद्दलच्या व्याजासारख्या परिणामाबाबत ती भाष्य करीत नाही. ही संदिग्धता नंतर प्राधिकरणाच्या बैठकीची मान्यता घेऊन कसुरदार भूभाडे पट्टेधारांकडून व्याज वसुलीची तरतूद करुन भरुन काढण्यात आली.

६) हे सुद्धा महत्त्वाचे आहे की, सदरच्या मंजूरीला पूर्वलक्षी प्रयोज्यता नव्हती की, ज्यामुळे ना ती होणाऱ्या भाडेपट्टेदाराला दिलेल्या मसूदा भाडेपट्टा लेख्यात अंर्तभूत होऊ शकली किंवा अंमलबजावणी केलेल्या भाडेपट्टा करारात समावेश होऊ शकली.

३. आणि ह्या दोन परस्परविरोधी समजांचा सारांश आहे. लेखा परिक्षकांनी अट क्र.८ चा अर्थ भाषेचा विस्तार घेऊन घेतला आणि ही परमाज्ञा समजून प्राधिकरणाला बंधमुक्त अधिकार प्राप्त झालेत व त्यामुळे प्राधिकरण नव्या अटी व शर्ती फेरबदल करु शकते किंवा नवीन अटी लादू शकते आणि त्यामुळे न भरलेल्या भाड्यावर प्राधिकरण व्याज वसूलीची अट लादू शकते. तर वित्तीय सल्लागार व भूमी व्यवस्थापक अशा प्रकारची अट भाडे पट्टेदारावर एकतर्फी त्याच्या मान्यतेशिवाय लादण्याच्या असमर्थतेचा दावा करतात आणि त्याचा कायदेशीर अन्वयार्थ लक्षात घेता ही विचाराची बाब ठरते.

४. लेखा परिक्षकांच्या मताला योग्य तो मान देऊन, त्यांच्या म्हणण्याला मान्यता देण्यासाठी स्वत:ला वळवणे, मला अवघड वाटते. पण ही नाकारता न येणारी वस्तुस्थिती आहे की, मसूदा भाडे पट्टा लेखा, भाडेपट्टा कराराला अनुबद्ध असलेला हा भाडेपट्टेदाराने न भरलेल्या भाड्यावर व्याज भरण्याचा जबाबदारीच्या ठळक अटीच्या शिवाय आहे. मसूदा भाडेपट्टा कराराचा अविभाज्य भाग आहे तो फक्त दूतर्फा म्हणजे भाडेपट्टेदार आणि प्राधिकरण यांच्या मान्यतेने सुधारीत करता येत होता. हे कायद्याचे प्रस्थापित तत्व आहे की, जे संविदा अधिनियम, १८७२ च्या कलम ६२ मध्ये मांडले आहे आणि ते म्हणजे संविदेतील अटी किंवा संविदा ह्यामध्ये बदल फक्त संविदेतील सर्व पक्षकाराच्या मुक्त परवानगीनेच होऊ शकतात.

५. जेव्हा अट क्र.८ बाह्यदर्शनी सर्वसाधारण मनुष्यास असे दर्शविते की, प्राधिकरण अटी सुधारु शकते किंवा नवीन लादू शकते पण ही अट, अटीची वैधानिकता कायम राखण्याच्या दृष्टीने अन्वयीत केली गेली पाहिजे आणि आता हे वापरुन जुने झालेले तत्त्व आहे की जर सांविधिक भाषा जर तीच्याच संविधानाशी विसंगत असेल तर तीची भाषा तिच्या संविधानकतेला पूरक ठरेल अशा तऱ्हेने अन्वयावीत व्हावी. तौलनिक दृष्ट्या विचार करता हे तत्त्व संविदेतील अटीच्या भाषेला लागू पडते आणि अट क्र.८ च्या संज्ञेची व्याप्ती अशा तऱ्हेने तपासून पहावी की ज्याने प्राधिकरणाच्या प्रशासकीय शक्तीचे निदर्शन किंवा मर्यादा मसूदा भाडेपट्टा लेख्याच्या पोतातील घड्या किंवा विस्कळीतपणा दूर करण्यासाठी उघड आज्ञार्थक आहेत किंवा कसे.

वरील कायदेशीर बाजू, कायदा सल्लागारांनी विवरण केल्याप्रमाणे लक्षात घेऊन लेखा परिक्षकांना लेखा आक्षेप दूर करण्याची विनंती करण्यात आली होती आणि त्याप्रमाणे या

बाबतचे उत्तर या कार्यालयाच्या पत्र क्र.मुं.म.प्र.वि.प्रा./आयए/एआर-०६-०७/डीपी/८८/०७, दिनांक १४/०९/०७ अन्वये पाठविण्यात आले आहे.

Statement showing interest reloverable on delayed payment of Ground lease rent (GLR)

Sr. No.	Name of Lessee	Dt. of Agreement	Period of Rent	Annual Rent	Due Dt. of Payment	Actual dt. of Payment	Delay in months	interest recoverable
1	2	3	4	5	6	7	8	9
1.	City Bank	20-8-1996	20-8-1999 to 9-8-2000	62,62,000	01-10-99	04-05-02	38	1586373.00
			20-8-2000 to 9-8-2001	62,62,000	01-10-00	04-05-02	26	1085413.00
			20-8-2001 to 19-8-2002	62,62,000	01-10-01	04-05-02	14	584453.00
			20-8-2002 to 19-8-2003	62,62,000	01-10-02	21-10-2002	9	375719.00
			20-8-2003 to 19-8-2004	62,62,000	01-10-03	08-04-03	7	292227.00
			20-8-2004 to 19-8-2005	62,62,000	01-10-04	10-08-04	9	375719.00
2.	Small Industrual Bank of India (SIDBI)	12-03-99	3-12-2002 to 2-12-2003	45,59,322	01-10-02	07-04-03	18	547119.00
			3-12-2003 to 2-12-2004	45,59,322	01-10-03	13-02-2004	13	395141.00
			3-12-2004 to 2-12-2005	45,59,322	01-10-04	15-01-2005	12	364746.00
3.	Dena Bank	28-5-1998	28-05-2001 to 27-05-2002	51,62,108	01-10-01	17-10-2002	21	722695.00
			28-05-2002 to 27-05-2003	51,62,108	01-10-02	17-10-2002	9	309726.00
			28-05-2003 to 27-05-2004	51,62,108	01-10-03	02-07-03	6	206484.00
			28-05-2004 to 27-05-2005	51,62,108	01-10-04	17-01-2005	12	412969.00
4.	Canara Bank	07-09-1998	9-7-2001 to 8-7-2002	1,25,00,000	01-10-01	06-01-03	24	200000.00
			9-7-2002 to 8-7-2003	1,25,00,000	01-10-02	06-01-03	12	1000000.00
			9-7-2003 to 8-7-2004	1,25,00,000	01-10-03	18-7-2003	6	500000.00
			9-7-2004 to 8-7-2005	1,25,00,000	01-10-04	08-08-05	7	583333.00
5.	IDBI	20-11-1998	20-11-2001 to 19-11-2002	1,41,87,552	01-10-01	06-03-05	52	4918351.00
			20-11-2002 to 19-11-2003	1,41,87,552	01-10-02	06-03-05	40	3783347.00
			20-11-2003 to 19-11-2004	1,41,87,552	01-10-03	06-03-05	28	2648343.00
			20-11-2004 to 19-11-2005	1,14,87,552	01-10-04	06-03-05	16	1513339.00
6.	SBI	26-06-1998	26-06-2001 to 25-06-2002	1,42,19,736	01-10-01	01-10-02	12	1137579.00
			26-06-2002 to 25-06-2003	1,42,19,736	01-10-02	01-09-03	12	1137780.00
			26-06-2003 to 25-06-2004	1,42,19,736	01-10-03	26-12-2003	11	1042780.00
			26-06-2004 to 25-06-2005	1,42,19,736	01-10-04	23-09-2004	8	758386.00
7.	Bank of India	24-12-1997	24-12-2000 to 23-12-2001	1,12,33,584	01-10-00	23-08-2002	31	2321607.00
			24-12-2001 to 23-12-2002	1,12,33,584	01-10-01	23-08-2002	19	1422921.00
			24-12-2002 to 23-12-2003	1,12,33,584	01-10-02	03-02-03	13	973577.00
			24-12-2003 to 23-12-2004	1,12,33,584	01-10-03	06-03-04	16	1198249.00

			24-12-2004 to 23-12-2005	1,12,33,584	01-10-04	07-07-05	17	1273140.00
							TOTAL	35471525.00

साक्ष :

४.३ समितीने दिनांक १२ जानेवारी, २०११ रोजी वरील परिच्छेदासंदर्भात नगरविकास विभागाच्या प्रतिनिधींची साक्ष घेतली. त्यावेळी परिच्छेदाच्या अनुषंगाने थोडक्यात माहिती देण्यासंदर्भात समितीने सांगितल असता नगरविकास प्रधान सचिवांनी समितीला पुढीलप्रमाणे माहिती दिली.

४.४ मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरणाने डिसेंबर, १९९७ ते एप्रिल, २००६ दरम्यान ज्या संस्थांना वाणिज्यिक वापरासाठी मालमत्ता भाड्याने वाटप केलेली आहे ती वाटप करीत असताना त्यांच्याकडून अधिमुल्य घ्यावयाचे असते. तसेच निविदेप्रमाणे करारनामा अंतिम करण्यापूर्वी असे अधिमुल्य घ्यावयाचे असते याबद्दल महालेखाकाराकडून आक्षेप नाही. पण करार झाल्यानंतर अशा संस्थांकडून चौथ्या वर्षापासून पुढे भूभाडे घेण्याची तरतूद आहे. ४ वर्षापासून २० वर्षापर्यंत १ टक्का, २१ ते ५० वर्षांसाठी २ टक्के आणि ५१ ते ८० वर्षासाठी ३ टक्के अशी या भूभाड्याची आकारणी करावयाची असते. त्यानुसार दरवर्षी १० जानेवारी रोजी ही भूभाड्याची रक्कम वसूल करावयाची असते. तसेच या भूभाड्याची रक्कम भरताना जो विलंब झाला त्यावर विलंब आकार संबंधितांकडून वसूल करणे आवश्यक असते, परंतु असा विलंब आकार वसूल केलेला नाही असा आक्षेप महालेखाकारांनी घेतला आहे.

४.५ वास्तविक पाहता हा विलंब आकार वसूल करणे आवश्यक होते. महालेखाकार यांच्यानुसार ही रक्कम रु. ७.२५ कोटी एवढी होते. वास्तविक विलंब आकाराचा निर्णय मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरणाच्या दि. ११.१०.१९९५ च्या निर्णयान्वये घेण्यात आलेला आहे. या ७ संस्थांना वाणिज्यिक वापरासाठी ज्या जागा वाटप केल्या आहेत त्यापूर्वी सन १९९४ मध्ये निविदा सूचना प्रसिद्ध करण्यात आल्या तेव्हा त्यात विलंब आकाराची तरतूद नव्हती. तरी देखील आयुक्त, मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण यांना असा विलंब आकाराचा अधिकार असल्याने ते तो विलंब आकार लावू शकतात. त्यांनी कलम ८ प्रमाणे आपले अधिकार वापरुन हा आकार वसुल करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार या ७.२५ कोटी रुपयापैकी ३.२१ कोटी रुपयांची वसुली झाली. या ७ संस्थांच्या व्यतिरिक्त इतरही २७ संस्थांना

आपण अशा जागा वाटप केलेल्या आहेत पण महालेखाकारांच्या अहवालामध्ये फक्त ७ संस्थांचाच उल्लेख करण्यात आला आहे. अशा प्रकारे एकूण ३४ संस्थांना जागा वाटप केल्या आहेत व त्यांच्याकडून विलंब आकार वसुल करावयाचा आहे. ती कारवाई मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरणाने सुरु केली असून एकूण ३४ संस्थांकडून ३.५५ कोटी रुपयांची वसुली आतापर्यंत करण्यात आली आहे. उर्वरित रक्कम त्यांच्या म्हणण्यानुसार डिसेंबर, २०११ पर्यंत वसूल होईल, तसेच शासनाकडूनही त्या वसुलीबाबत पाठपुरावा करण्यात येणार आहे. या ३४ संस्थांची यादी सोबत पुढीलप्रमाणे आहे. सचिवांनी समितीला संस्थांची यादी वाचून दाखविली. (1) "Balaram Premises co.op Society Ltd., (2) United Health Care Ltd. (Madhava Building), (3) United Health Care Ltd. (Keshava Building), (4) Indian Cancer Society (NCL), (5) Reserve Bank of India, (6) Income Tax department, (7) Computer Maintenance Corporation (CMC), (8) MSEB, (9) M.S.C.H.F.S. Ltd., (10) M.M.T.C., (11) Subsidiary Intelligence Bureau, (12) Collector of Central Excise, Mumbai, (13) Accountant General, Mumbai, (14) Metropolitan Co.op. Housing Society (Tata Housing Development Co.), (15) Reliance Energy Ltd. (BSES Ltd.),(16) Wockhardt Ltd-changed to Carol Infor. Services Ltd., (17) Mahanagar Telephone Nigam Ltd., (18) I.L. & F S, (19) ICICI, (20) Nabard, (21) Laxmi Finance & Leasing Companies Comm, Premises, (22) National Stock Exchange, (23) Bank of Baroda, (24) Bank of India, (25) State Bank of India, (26) Industrial Development Bank of India, (27) Canara Bank, (28) Dena Bank, (29) SIDBI, (30) Citi Bank, (31) UTI, (32) American School of Bombay Education Trust, (33) ONGC, (34) Punjab National Bank."

४.६ या सर्व संस्थांना वसुलीची सूचना दिली तर पटकन व विनाविलंब सर्व पैसे वसूल होतील काय असे समितीने विचारले असता सचिवांनी खुलासा केला की, वसुलीची कारवाई दोन महिन्यांपासून सुरु केली असून आतापर्यंत ३.२१ कोटी रुपये एवढी रक्कम वसूल झालेली आहे. त्यामुळे वसुली चांगल्या प्रकारे होत आहे.

४.७ परिगणना केलेली रु. ७.२५ कोटी ही रक्कम पाच वर्षापूर्वीची आहे. परंतु या पाच वर्षातील हिशेब केला तर या रकमेत वाढ होण्याचीच शक्यता आहे. भूभाड्याची रक्कम अदा केल्यानंतर विलंब म्हणून आपण ही आकारणी करतो. अशा प्रकारे विलंबाची रक्कम विचारात घेऊन मागील पाच वर्षाचा हिशेब केला तर चक्रवाढ व्याजाने या रकमेत आणखी वाढ होऊ

शकेल. विलंब आकार १४ टक्क्याप्रमाणे व्याज लावून काढण्यात आलेला आहे. परंतु राज्यातील तसेच मुंबईतील झोपडपट्टीवासीयांच्या बाबतीत मात्र हा न्याय लागत नाही. एका व्यक्तीला ५ हजार रुपयाचे कर्ज देण्यात आले होते. त्याने त्या रकमेचा भरणा केला नाही म्हणून त्याच्याकडून एकूण १.५० लाख एवढी रक्कम वसूल करण्यात आली. असा न्याय या संस्थांना का लावू नये ? असे समितीने विचारले असता सचिवांनी खुलासा केला की, त्यांच्याकडून भूभाड्याची रक्कम मिळेपर्यंत जेवढी रक्कम प्राप्त झाली ती आणि उर्वरित रकमेवर ही वसुली आपण करतो. विलंबाने रक्कम भरली म्हणून त्यावर १४ टक्के सरळ व्याज आकारतो. भूभाड्याची रक्कम विलंबाने दिली तर त्यावर किती व्याज आकारावे यासंबंधीचे संपूर्ण अधिकार मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरणाला आहेत. त्यानुसार मूळ टप्पा दर (प्राईम लेडिंग रेट) अधिक ३ टक्के अशा प्रकारे ही वसुली आपण करीत आहोत. तसेच मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण कमिशनरांना हे दर कमी किंवा जास्त करण्याचेही अधिकार आहेत. झोपडपट्टीवासीयांकडून चक्रवाढ व्याज लावून वसुली करण्यात येते तर अशा संस्थांना आपण सूट का देत आहोत ? अशी समितीने विचारणा केली असता सचिवांनी खुलासा केला की, वसुली चांगल्या प्रकारे चालू आहे डिसेंबर, २०११ पर्यंत ही वसुली पूर्ण होईल.

४.८ विलंब आकाराबाबतचा निर्णय मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरणाने कधी घेतला आहे? अशी समितीने विचारणा केली असता विभागीय सचिवांनी खुलासा केला की, हा निर्णय ११.१०.१९९५ मध्ये घेण्यात आला परंतु विलेख दस्तऐवजामध्ये (Deed document) तसा उल्लेख नाही. तसेच तत्कालीन वित्त सल्लागारांनी सुद्धा असा अभिप्राय दिला होता की, या दस्तऐवजामध्ये उल्लेख नसल्याने अशी वसुली करु शकत नाही. असे असताना सुद्धा मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण आयुक्तांनी त्यांच्या अधिकारात अशी वसुली करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार मूळ टप्पा दर अधिक ३ टक्के अशी वसुली करण्याचा निर्णय घेतला. त्या अनुषंगाने दि. २०.१०.२०१० रोजी निर्णय झाला. त्यामुळे आदेशित केल्याप्रमाणे शासनाचे अभिप्राय त्यांनी असे नमूद करण्यात आले आहे उत्तरादाखल पाठविलेल्या पत्रात दिनांक २९.१०.१९९० रोजी महालेखाकाराकडे पाठविले आहे की, "As per legal opinion obtained by this office, the agreement and the Lease Deed executed after passing of the Resolution by the Authority are under MMRDA (Disposal of Land) Regulations, 1977 and the

Resolution of the Authority is also under the said Regulations. Therefore, the Resolution is binding on all the parties. The completeness and correctness of the reply would, however, be seen by the Public Accounts Committee." त्यांच्या म्हणण्यानुसार ही रक्कम वसूल करावयास पाहिजे व त्या अनुषंगाने ही वसुली सुरु केली व उर्वरित रक्कम वसूल करण्याची कार्यवाही सुरुच असून डिसेंबर, 2011 पर्यंत संपूर्ण रक्कम वसूल होईल.

४.९ समितीने महालेखाकार यांच्याकडे विचारणा केली की, whether the interest they have calculated is correct or not. त्यास महालेखाकारांनी सहमती दर्शवून लेखी स्वरुपात पुढीलप्रमाणे माहिती समितीला सादर केली.

क्र./No.Report III/PAC/248
भारतीय लेखा तथा लेखापरीक्षा विभाग
प्रधान महालेखाकार (लेखापरीक्षा) 1, महाराष्ट्र
INDIAN AUDIT AND ACCOUNTS DEPARTMENT
PRINCIPAL ACCOUNTANT GENERAL (AUDIT) 1, MAHARASHTRA

दिनांक / Date : 8/2/2011

To,
The Principal Secretary,
Maharashtra Legislature Secretariat,
Vidhan Bhavan, Backbay Reclamation,
MUMBAI-400 032.

Subject : Minutes of the Public Accounts Committee meetings held on 12th January, 2011.

Sir,

Please refer to the contents of the minutes of the PAC meeting held on 12, Janary, 2011.

The interest recovered or GLR for delayed payment of premium by the seven lessees based on simple interest method works out to Rs.7.25 crore. As directed by the PAC, the interest was worked out on compound interest rate basis and was worked out to Rs.8.03 crore.

However, it is seen that the interest for delayed payment is worked out on simple interest basis under Income Tax Act, 1961, Customs Act, 1962 and Bombay Sales Tax Act, 1959.

Encl : As above.

Yours faithfully,

Senior Audit Officer/Report.

४.१० विलंब आकाराची ७.२५ कोटी एवढी रक्कम वसूल करण्याच्या सद्य:स्थितीविषयी समितीने विचारणा केली असता विभागीय सचिवांनी खुलासा केला की, ती रक्कम तपशिलवार तयार केल्यानंतरच समजू शकेल. कारण आतापर्यंत जो हिशेब केला तो चक्रवाढ व्याजानुसार केला नाही. तसेच चक्रवाढ व्याजाने आकारणी करावयाची की सरळ व्याज दराने करावयाची हा निर्णय आयुक्त, मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण यांना आहे. यावर समितीने विचारणा केली की, सक्षम प्राधिकरणाने कोणत्या प्रकारचा व्याजदर लावावा असे विनिर्दिष्ट केलेले आहे काय ? महालेखाकार आणि मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण यांनी परिगणना केलेली आहे आणि त्यांनी सुद्धा तीच पद्धत अवलंबिलेली आहे. व्याज मोघम लावले नसून १४ टक्के व्याज दर लावण्यात आलेला आहे.

अभिप्राय व शिफारशी :-

४.११ समितीसमोर आलेल्या माहितीवरुन असे दिसून येते की, मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरणाने डिसेंबर, १९९७ आणि एप्रिल, २००६ या दरम्यान सात पक्षकारांची त्यांनी पट्टा अधिमुल्य देण्याचे मान्य केल्यानंतर बांद्रा-कुर्ला समूहात व्यापारी भूखंड पट्टयाने देण्यासाठी करार केले. कराराच्या ७ व्या कलमानुसार या संस्थांकडून चौथ्या वर्षापासून भूभाडे घेण्याची तरतूद आहे. त्यानुसार ४ थ्या वर्षापासून २० वर्षापर्यंत १ टक्का, २१ ते ५० वर्षापर्यंत २ टक्के व ५१ ते ८० वर्षापर्यंत ३७ टक्के अशी भू भाड्याची आकारणी करुन दरवर्षी १० जानेवारी रोजी भूभाड्याची रक्कम वसूल करणे आवश्यक आहे. पट्टा कराराच्या ८ व्या कलमानुसार मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरणास ते ठरवतील त्याप्रमाणे पट्टा लेखामध्ये सुधारणा किंवा भर घालण्याचे अधिकार देण्यात आले होते. निविदा काढताना भूपट्टा भाड्याच्या विलंबित अदायगीवर व्याज लावण्याच्या तरतूदीचा समावेश नव्हता. परंतु सदर निर्णय मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दिनांक ११.१०.१९९५ रोजीच्या आदेशान्वये घेण्यात आला. त्यानुसार सात संख्याकडून विलंब आकार वसूल न केल्याबद्दल प्राधिकरणांस जानेवारी, २००७ पर्यंत रु.७.२५ कोटीचे नुकसान झाल्याचा महालेखाकारांनी आक्षेप घेतला होता.

४.१२ विभागीय सचिवांनी समितीसमवेत माहिती देताना मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरणाने सात संस्थाव्यतिरिक्त आणखी २७ संस्थांना अशा प्रकारे जागा वाटप केल्याचे निदर्शनास आणून दिले. त्यामुळे भूभाडे पट्टयाच्या विलंबित अदायगीवर आकारावयाच्या व्याजाची रक्कम ही महालेखाकारांनी घेतलेल्या आक्षेपाच्या रकमेपेक्षा नक्कीच जास्त आहे. या ३४ संस्थांची समितीस प्राप्त झालेली यादी पहाता, या सर्व संस्था आर्थिकदृष्ट्या सक्षम असल्याचे दिसते. महानगर प्राधिकरण या संस्थाना रुपये १८ कोटी भूखंड भाडेपट्टेचा पोटी आकारणी करते. या संस्थांकडून विहित मुदतीत भूखंड भाडे पट्टयाची रक्कम प्राधिकरणास अदा करण्यात न आल्यास त्यांना सरळव्याज दराने व्याज आकारत असून वाणिज्यिक प्रथेनुसार वास्तविक प्राधिकरणाने या संस्थाकडून चक्रवाढ दराने व्याज आकारणे आवश्यक आहे असे समितीचे मत झाले. त्यामुळे बांद्रा-कुर्ला समूहाच्या व्यापारी पट्टयातील जागाचे सध्याचे दर पहाता व या जागेचे व्यावसायिकदृष्ट्या असलेले महत्त्व विचारात घेता मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरणाने करारातील ७ व्या कलमात नमूद केल्याप्रमाणे **दरवर्षी १० जानेवारी रोजी भू भाड्याची रक्कम भूखंड भाडेपट्टयाने दिलेल्या संस्थांकडून वसूल केली जाईल याकरीता यापुढील काळात आवश्यक ती उपाययोजना करण्यात यावी व केलेल्या उपाययोजनेची माहिती समितीस ३ महिन्यात द्यावी, अशी समिती शिफारस करीत आहे.**

४.१३ महालेखाकारांनी घेतलेल्या आक्षेपाच्या अनुषंगाने सात संस्था तसेच इतर २७ संस्था ज्यांना भूखंड भाडेपट्टीवर देण्यात आलेले आहेत त्यांच्याकडून **भूभाडे पट्टयाच्या विलंबित अदायगीवर आकारावयाच्या व्याजाची परिगणना सरळव्याज पद्धतीने न करता वाणिज्यिक प्रथेनुसार चक्रवाढ व्याज पद्धतीने करण्याची कार्यपद्धती यापुढील काळात मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरणाने अवलंबावी. यादृष्टीने प्राधिकरणाने ठराव करण्यासंदर्भात आवश्यक ती कार्यवाही करावी व त्याची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी सन २००६-२००७ या वर्षाच्या नागरी अहवालामधील परि.क्र.४.३.२० "खर्चातील वाढ" या संदर्भात महालेखाकारांनी खालील अभिप्राय व्यक्त केले आहेत.

खर्चातील वाढ-

५.१ आवश्यक त्या जमिनीचा ताबा घेण्यापूर्वी पाणी पुरवठ्यासंबंधीचे काम सुरु केल्यामुळे खर्चामध्ये रु.४.४५ कोटीची वाढ.

राहाता-पिंपळस वर्धित (Augmentation) शहर पाणी पुरवठा योजना रु.४.०८ कोटीचे अंदाजित खर्च रु.३.२८ कोटीच्या २४.५० टक्क्याने जास्त काम एका कंत्राटदारास १८ महिन्यामध्ये म्हणजे जानेवारी २००४ पर्यंत पूर्ण करण्याच्या अटीवर दिले होते (जुलै २००२). कंत्राटदाराने एकूण कामाच्या ६० टक्के काम मार्च २००७ पर्यंत पूर्ण केले होते.

महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिकेनुसार जी जमीन रीतसर जबाबदार नागरी अधिकाऱ्याकडून हस्तांतरित केली जात नाही त्या जमिनीवर कोणतेही काम सुरु करता कामा नये तसेच, कोणत्या एका कामाची निविदा स्वीकारली, परंतु त्याकरिता आवश्यक जमिनीचा ताबा अद्याप घ्यावयाचा असेल तर काम सुरु करण्याचे आदेश देण्यापूर्वी संबंधित जिल्हाधिकाऱ्यांकडून जमिनीचा ताबा घेण्यास किती कालावधी लागणार आहे याबाबतची निश्चिती करुन घेणे आवश्यक आहे. मुख्य अभियंत्याने अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण सर्कल अहमदनगर यांना जमिनीचा ताबा घेतल्यानंतरच काम सुरु करावे अशा सूचना दिल्या होत्या (जून २००२).

कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण बांधकामे विभाग, संगमनेर यांचे अभिलेखे तपासले (डिसेंबर २००६) असता आणि पाठोपाठ मिळविलेल्या माहितीवरुन असे लक्षांत आले की (मार्च २००७) ४० एकर जमीन ताब्यात घेण्यासंबंधीचा प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांकडे ऑक्टोबर १९९९ मध्ये सादर केला होता. सदर प्रस्ताव सादर केल्यानंतर

२९ पैकी ११ बाधित शेतकऱ्यांकडून त्यांची संमतिसुद्धा मिळविण्यात आली होती. जमिनीचा ताबा न घेता किंवा जिल्हाधिकाऱ्याकडून जमिनीचा ताबा मिळविण्याकरिता किती कालावधी लागेल याची खात्री करुन न घेता कामाचे आदेश जुलै २००२ देण्यात आले होते. जमिनीचा ताबा घेण्याचा प्रस्ताव प्रत्यक्षात न आल्यामुळे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला प्रस्तावित ४० एकर जमिनीऐवजी ज्याची अंदाजित किंमत रु.३३ लाख होती. ७.७७ हेक्टर (अंदाजे १९-२० एकर) मोजमापाची बदली जमीन रु.१.५० कोटी किंमतीस ऑगस्ट २००६ मध्ये घेणे भाग पडले होते. कंत्राटदारास वेळोवेळी कामाचा कालावधी मार्च २००७ पर्यंत वाढवून द्यावाच लागला.

कामाची किंमत वाढल्यामुळे, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने शासनाच्या मंजूरीसाठी रु.९.८५ कोटीचा सुधारित अंदाज सादर केला (ऑक्टोबर २००६). याप्रमाणे जमिनीचा ताबा न घेता कामाचे आदेश देणे आणि पाठोपाठ बदली जमिनीचा ताबा घेण्यास लागलेला विलंब यामुळे प्रकल्पाच्या खर्चामध्ये रु.४.४५ कोटीने वाढ झाली. यापैकी रु.३.४५ कोटी इतकी खर्चातील वाढ, जमिनीच्या किंमतीतील वाढ, आराखड्यातील बदल, कामाच्या जागेतील बदल, जिल्हा दर सूचितील फरक या कारणांमुळे झाली होती. शिवाय, राहाता-पिंपळस शहरास वाढीव पुरवठा करण्याचे उद्दीष्टसुद्धा गाठता आले नव्हते.

उत्तरादाखल कार्यकारी अभियंत्याने म्हटले की (मार्च २००७) जमिनीचा ताबा घेण्याकरीताचा प्रस्ताव जरी ऑक्टोबर १९९९ मध्ये सादर केला होता तरी आवश्यक त्या जमिनीचा ताबा ऑगस्ट २००६ मध्येच मिळविणे शक्य झाले होते.

दिलेले उत्तर समर्थनीय नव्हते कारण १९९९ मध्येच २९ पैकी १८ शेतकऱ्यांनी जमिनीचा ताबा देण्याकरिता त्यांची संमती दिली नव्हती याबाबतची त्यांना कल्पना होती. त्यामुळे ह्या प्रकरणाची सोडवणूक करावयास हवी होती किंवा बदली जागेचा शोध कामाचा आदेश देण्यापूर्वी (जुलै २००२) घ्यावयास हवा होता.

ही बाब शासनाचे प्रधान सचिव यांना मे २००७ मध्ये कळविण्यात आली होती. अद्याप उत्तर आले नव्हते (ऑगस्ट २००७).

ज्ञापन :

५.२ उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला :-

उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाने पाठविलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात असे नमूद केले की, केंद्र सरकारच्या सार्वजनिक आरोग्य व

अभियांत्रिकी विभागाकडून माहे ८/९८ मध्ये तांत्रिक मंजुरी प्राप्त झाल्यानंतर महाराष्ट्र शासनाच्या पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाने राहाता-पिंपळस पाणी पुरवठा योजनेस दि.२१/१/९९ रोजी प्रशासकीय मान्यता दिली. सदरच्या योजनेच्या साठवण तलावासाठी आवश्यक असलेला भूसंपादनाचा प्रस्ताव जिल्हाधिकारी अहमदनगर यांना संबंधित जमीन मालकांची संमती घेवून १५/३/२००० रोजी सादर करण्यात आला होता. सदरचे संमती पत्र सन १९९४ मध्येच घेण्यात आलेले होते मात्र प्रत्यक्षात साठवण तलावाचे काम सुरु करताना काही जमीन मालकांनी साठवण तलावाचे काम सुरु करण्यास मज्जाव केला. २९ पैकी १८ जमीन मालकांनी वरील कामासाठी जमीन देण्यास (जरी त्यांनी १९९४ मध्ये संमती दर्शविली होती तरी) आक्षेप नोंदविला. सदरचा प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने संबंधित जमीन मालकांची दिनांक २५/७/२००२ रोजी एक बैठक बोलाविली होती परंतु सदरच्या बैठकीत वरील १८ जमीन मालकांनी साठवण तलावाच्या कामासाठी जमीन देण्याचे नाकारले. सबब, पुन्हा उपविभागीय अधिकारी, श्रीरामपुर उपविभाग, श्रीरामपुर यांनी दि.२१/१०/२००२ रोजी संबंधित जमीन मालक व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांची संयुक्त बैठक बोलाविली. परंतु, या बैठकीत सुद्धा जमीन मालकांनी त्यांची जमीन न देण्याची भुमिका कायम ठेवल्याने कोणत्याही प्रकारचा निर्णय झाला नाही. त्यामुळे साठवण तलावाची जागा बदलण्याशिवाय कोणताही पर्याय नव्हता.

सबब, महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाची साकोरी शिवाराची (ता.राहाता) गट क्र.१८ मधील जागा साठवण तलावासाठी निवडण्यात आली. भूसंपादनाचा प्रस्ताव जिल्हाधिकारी अहमदनगर यांचेकडे सादर करण्यात आला व विशेष भूसंपादन अधिकारी यांनी सदरच्या जागेचे मूल्यांकन रुपये ८०८.५३ लाख इतके केले. तसेच सदरच्या रकमेपैकी २/३ रक्कम आगावू भरण्यास सांगितली. परंतु सदरची रक्कम खूपच जास्त (योजनेच्या किंमतीपेक्षाही जास्त) असल्याने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने सदरचा प्रस्ताव न स्विकारता इतर जागा शोधण्याचा मार्ग स्विकारला.

मध्यंतरीच्या काळात अवर सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांच्या दिनांक ८/३/२००४ च्या पत्रानुसार राहाता नगरपालिकेचे एक नगर सेवक श्री.राजेंद्र पिपाडा यांनाही त्यांच्या मालकीची गट नं. २२४, २२७ व २२८ मधील २५ एकर जागा ४ लाख प्रति एकरी

विकण्यास असल्याचे कळविले. मात्र नंतर श्री.पिपाडा यांनी या जागा हस्तांतरणास नकार दिला. सबब, ही जागा उपलब्ध होऊ शकली नाही.

सरतेशेवटी अध्यक्ष राहाता नगरपालिकेने राहाता शिवारातील गट नं.११७ मधील ७.७७ हेक्टर जागा उपलब्ध करुन दिली व त्या अनुषंगाने भूसंपादनाचा प्रस्ताव विशेष भूसंपादन अधिकारी यांना सादर करण्यात आला. सदरच्या जागेचे मूल्यांकन रुपये १७०.९४ लक्ष रुपयास विशेष भूसंपादन अधिकारी यांनी केले. त्यांच्या दि.२८/६/२००५ च्या पत्रानुसार २/३ रक्कम म्हणजेच रुपये १३३.९६ लक्ष भरणे आवश्यक होते. भूसंपादनाच्या कामातील उपरोक्त अटीचा विचार करता साठवण तलावाच्या कामासाठी जमीन उपलब्ध न झाल्यामुळे संपूर्ण योजनेचे काम थांबण्याची भिती होती म्हणून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने महाराष्ट्र शासनाच्या पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाला महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या पत्र क्र.एमजेपी/टीबी/७८४/९५/दिनांक १२/८/२००५ अन्वये सदर जमिनीचे भूसंपादन करण्यासाठी विशेष बाब म्हणून सुधारित अंदाजपत्रकात तरतूद करण्याची विनंती केली. वरील विनंतीचा शासनाने विचार करुन उपरोक्त रक्कम भूसंपादनासाठी प्रदान करण्यास सुधारित अंदाजपत्रक शासनाकडून मंजूर करुन घेण्याच्या अटीवर पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे पत्र क्र.पापु/२८०५/१७६/दिनांक १९/८/२००६ नुसार परवानगी दिली.

मूळ प्रस्तावानुसार सन २००२ मध्ये जरी जमीन अधिग्रहीत केली असती (गट नं.८७, ८८, १०४) तरी शासनाच्या त्या वेळच्या प्रचलित दरानुसार त्याची किंमत रु.४१५.९३ लक्ष एवढीच झाली असती.

मूळ योजनेच्या अंदाजपत्रकीय तरतूदीत जमीन संपादनाच्या कामासाठी रु.३३.०० लक्ष एवढी तरतूद होती. तथापि योजनेची किंमतही जमीन संपादनाच्या कामास विलंब झाल्याने वाढलेली नसून मूळ अंदाजपत्रकात केलेली कमी तरतूद आणि योजनेच्या आराखड्यात झालेल्या बदलामुळे व भाववाढीच्या निविदेतील कलमामुळे योजनेतील किंमतीत वाढ झालेली आहे.

त्याचप्रमाणे असे निदर्शनास येते की, जर उपरोक्त कामाच्या निविदा सन २००५-२००६ मध्ये (साठवण तलावाचे कामासाठी करावयाच्या भूसंपादनानंतर) मागविल्या असत्या तर सन २००५-२००६ च्या दरानुसार योजनेची किंमत रु.५,४०,४०,३९८/- ऐवजी रु.१०,२३,७८,०००/- इतकी झाली असती.

सदर योजनेचा मूळ उद्देश हा नागरिकांना चांगल्या प्रतीचे व पिण्यायोग्य पाणी उपलब्ध करुन देणे असा आहे. तसेच सदरची योजना ही केंद्र सरकारच्या वर्धित वेग पाणी योजना अंतर्गत करावयाची असल्याने योजनेचे काम जुलै २००२ मध्ये ठेकेदारास कामाचे आदेश देऊन सुरु करण्यात आले होते. योजनेतील उंच स्तरावरील टाकीचे काम, जलशुद्धीकरण केंद्राचे काम त्यानुसार करण्यात आले.

उपरोक्त खुलाशाचा विचार करुन आणि योजनेच्या मंजूर किंमतीच्या अधिक होणारा खर्च केवळ भुसंपादनामुळे होणार नसल्याचे स्पष्ट होते. सबब, सदरचा परिच्छेद वगळण्यात यावा ही विनंती.

साक्ष :

५.३ उपरोक्त लेखी माहितीच्या संदर्भात समितीने दिनांक १० मे, २०११ रोजी प्रधान सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग यांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी सचिवांनी अशी माहिती दिली की, सदर मुद्दा हा अहमदनगर जिल्ह्यातील राहाता-पिंपळस पाणी पुरवठा योजनेच्या संदर्भातील आहे. जमिनीचा ताबा न मिळताच या योजनेला कार्यादेश देण्यात आला. यासंदर्भात महालेखाकारांनी आक्षेप घेतलेला आहे. जमीन ताब्यात न घेता या ठिकाणच्या कामाला कार्यादेश देण्यात आला ही बाब विभागाला मान्य आहे. केंद्र शासनाने सुद्धा या योजनेच्या कामाला लवकर सुरुवात करावी अशा प्रकारच्या सूचना दिल्या होत्या व त्याप्रमाणे या ठिकाणच्या कामाला सुरुवात करण्यात आली होती. या ठिकाणी सन २००२ मध्ये जमीन ताब्यात आलेली नव्हती. या योजनेसाठी सन १९९४ व १९९९ मध्ये काही लोक जमीन देण्यास तयार झाले होते. परंतु सन २००२ मध्ये २९ जमीन मालकांपैकी १४-१५ जमीन मालकांनी जमीन देण्यास नकार दिला होता व त्यामुळेच या कामामध्ये समस्या निर्माण झालेली आहे. इएसआर, पंपींग मशिनरी डिस्ट्रीब्यूशन नेटवर्क, बॅलन्सींग वॉटर टँक अशी जवळपास सर्व कामे झालेली आहेत. केवळ साठवण तलावाचेच काम शिल्लक राहिलेले असून हे काम सुद्धा पूर्ण केले जाणार आहे.

५.४ समितीने अशी विचारणा केली की, या प्रकल्पासाठी जमीन ताब्यात नसतांना कामास का सुरुवात करण्यात आली ? या प्रकल्पासाठी शेतकरी जमीन देण्यास तयार होते परंतु त्या शेतकऱ्यांनी या प्रकल्पास जमीन देण्यास का नकार दिला ? शेतकऱ्यांनी जमीन न

देण्यामागे काय कारण होते ? याबाबत विभागीय सचिवांनी खुलासा केला की, या जमिनीच्या संदर्भात दानपत्र घेण्यात आले नव्हते. तसेच जमीन घेण्याच्या संदर्भात काहीही लिखित कागदपत्र झालेले नव्हते. त्यामुळे या सर्वांचा अनुभव लक्षात घेता आता शासनाने व विभागाने असा निर्णय घेतला आहे की, जोपर्यंत जमीन ताब्यात मिळत नाही तोपर्यंत कार्यादेश आणि प्रशासकीय मंजुरी देण्यात येऊ नये या सर्व कामामुळे खर्चात किती वाढ झाली व जमीन ताब्यात नसताना कार्यादेश कसे दिले गेले. अशी समितीने अशी विचारणा केली की असता विभागीय सचिवांनी असे सांगितले की, मूळ काम ५.५ कोटी रुपयांचे असून त्यामध्ये ४.५ कोटी रुपयांनी वाढ झालेली आहे. डीएसआर व जमिनीच्या किमतीमुळे ही वाढ झालेली आहे. या प्रकल्पाच्या संदर्भात केंद्रशासनाने सन २००२ मध्ये प्रगती कमी आहे असे सांगितले होते तसेच त्यावेळी त्यांनी यामध्ये ३ योजनांचाही उल्लेख केला होता. या प्रकल्पामध्ये जमीन ताब्यात न घेता कार्यादेश दिले गेले ही वस्तुस्थिती आहे. कार्यकारी अभियंता श्री. व्ही.बी. देशमुख यांनी या प्रकल्पाला कार्यादेश दिले होते. सदर कार्यकारी अभियंता सन २००६ मध्ये निवृत्त झालेले असून यासंदर्भात त्यांच्याविरुद्ध कारवाई सुरु करता येत नाही.

५.५ यासंदर्भात सुप्रीम कोर्टाने आदेश दिलेले आहेत की, though a person is retired from the service you can take action against him. अशी समितीने माहिती दिली असता, विभागीय सचिवांनी खुलासा केला की, यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयाची शब्दरचना वाचावयास मिळाली नाही. सामान्य प्रशासन विभागाच्या नियमाप्रमाणे ४-५ वर्षामध्ये संबंधिताविरुद्ध कारवाई करता येते. परंतु, त्यानंतर ती करता येत नाही यावर "हा पाणी पुरवठ्याचा प्रश्न आहे. त्याच वेळेस काम झाले असते तर या कामाला पैसेही कमी लागले असते व हा प्रश्नही निर्माण झाला नसता" असे मत समितीने व्यक्त केले.

५.६ या प्रकल्पासाठी जमीन मिळत नसल्यामुळे पर्यायी जमीन घेण्यात आलेली आहे. तसेच त्यावेळच्या कार्यकारी अभियंत्यांनी जमीन ताब्यात नसतानाही कार्यादेश देण्यात आला ही चूक झालेली आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

५.७ यावर समितीने अशी विचारणा केली की, या प्रकल्पासाठी दुसरी जमीन घेण्यात आलेली आहे. त्यामुळे जमीन नसतांना कार्यादेश का देण्यात आला ? आता या प्रकल्पासाठी दुसरी जमीन घेतल्यामुळे प्रकल्पाची जागा बदलण्यात आलेली आहे. विभागाने या प्रकल्पाच्या संदर्भात ज्या पद्धतीने काम करावयास पाहिजे होते त्या पद्धतीने ते केलेले नाही. लेखा

परिच्छेद आल्यानंतर तरी संबंधितांवर कारवाई करावयास पाहिजे होती असे मत समितीने व्यक्त केले.

५.८ यासंदर्भात विभागीय सचिवांनी खुलासा केला की, जमीन ताब्यात आल्याशिवाय प्रशासकीय मान्यता व कार्यादेश देऊ नये तसेच तांत्रिक मंजुरी मिळाल्याशिवाय प्रशासकीय मान्यता दिली जाऊ नये यांसदर्भातील आदेश शासनाने काढलेले आहेत. तसेच जमीन ताब्यात नसतांनाही कार्यादेश काढला गेला अशी जवळ जवळ २० ते २१ कामे आहेत.

५.९ यासंदर्भात महालेखाकारांनी अशी विचारणा केली की, The question before us is that, is the targeted population gets the actual supply of water? The Water Supply Department spends huge amount of money for making drinking water available. Is the drinking water reaches to the targeted population; there is no account of this. Secondly, various government authorities are not informing us about the new projects undertaken by them and how they are actually reaching to the targeted population.

५.१० यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, पाणी पुरवठ्याच्या काही योजना सुरु झाल्या होत्या. परंतु, काही कारणास्तव पाणी पुरवठा होऊ शकत नव्हता. यामध्ये काही प्रादेशिक आणि हंगामी योजना आहेत. बंद पडलेल्या पाणी पुरवठ्याच्या योजनेच्या संदर्भात असे धोरण आहे की, जेथे जेथे स्थानिक स्तरावर पाणी पुरवठ्याच्या योजना आहेत व जेथे पाण्याचा स्त्रोत आहे अशा ठिकाणी पाणी उपलब्ध करुन दिले जाऊ शकते. ज्या गावात अगोदर पाणी पुरवठा योजना आहे व त्या ठिकाणी प्रादेशिक नळपाणी पुरवठा योजनेची गरज नाही अशा ६७३ पाणी पुरवठा योजनामधून २०२ स्वतंत्र योजना परिवर्तित केलेल्या आहेत. जेथे हंगामी योजना सुरु आहे परंतु वीज देयके भरली नसल्यामुळे पाणी पुरवठा बंद आहे तेथे एकत्रित स्वरुपात पुरवठा करण्याचा पर्याय ठेवण्यात आलेला आहे. अशा योजनांची देखभाल व दुरुस्तीचा खर्च ५० टक्के राज्य शासन व ५० टक्के लाभार्थी या प्रमाणे वाटून दिलेला आहे. १२-१३ जिल्ह्यामध्ये यासंदर्भात आढावासुद्धा घेण्यात आलेला आहे. काही जिल्ह्यात चांगल्या प्रकारचे काम झालेले आहे.

५.११ अनेक योजना सुरु झालेल्या आहेत असे विभागीय सचिवांनी सांगितले असता, अशा प्रकारच्या कोणत्याही योजना सुरु होऊ शकल्या नाहीत अशी माहिती समितीने दिली असता विभागीय सचिवांनी खुलासा केला की, जमीनीमध्ये पाण्याचा स्त्रोत किती आहे

यासंदर्भात जीएसडीए प्रमाणपत्र देत असते. परंतु काही वेळा उन्हाळ्यामध्ये हे स्त्रोत आटले जातात किंवा कमी होतात. जीएसडीएने दिलेल्या स्त्रोतांचे प्रमाण ९० टक्के तरी बरोबर असते.

५.१२ पाणी पुरवठ्याच्या योजनेसाठीच विभागाकडून पैसे उपलब्ध करुन दिले जात असतात. प्रकल्प पूर्ण करण्याची जबाबदारी पाटबंधारे विभागाची आहे. जमीन ताब्यात नसतांनाही कार्यादेश देण्यात आलेला आहे याचा अर्थ विभागाने अनावश्यक खर्च केलेला आहे असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी "याला अनावश्यक खर्च म्हणता येणार नाही" असे उत्तर दिले. राहाता-पिंपळस पाणी पुरवठा योजनेस जमीन उपलब्ध झाली नाही यामध्ये विभागाचा काही दोष नाही. त्यामुळे हा खर्च क्षमापित करण्याचा निर्णय समितीने घेतला.

अभिप्राय व शिफारशी :

५.१३ समितीसमोर आलेल्या उपरोक्त माहितीवरुन अहमदनगर जिल्ह्यातील राहाता-पिंपळस या प्रकल्पाचे काम ज्या पद्धतीने करावयास पाहिजे होते त्या पद्धतीने ते झाले नसून या प्रकल्पामध्ये अनेक प्रकारच्या त्रुटी ह्या जाणीवपुर्वक ठेवल्या गेल्या असे समितीच्या निदर्शनास आले आहे. प्रकल्पासाठी जमिनीचा ताबा न घेता कामाचे कार्यादेश देणे, जमिनीच्या संदर्भात दानपत्र घेण्यात न येणे, जमीन मालकांसोबत कोणताही लिखित स्वरुपात करार न करणे, याप्रकरणी भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी आक्षेप काढल्यानंतर त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करुन सहा वर्षानंतरही संबंधितांवर कोणत्याही प्रकारची कारवाई न करणे याबाबत समिती तीव्र नापसंती व्यक्त करते.

५.१४ पाणी पुरवठा विभागांतर्गत जवळजवळ २० ते २१ कामे आहेत की ज्यामध्ये जमीन ताब्यात आल्याशिवाय तसेच प्रशासकीय मान्यता नसताना कार्यादेश दिले गेले आहेत. तांत्रिक मंजूरी मिळाल्याशिवाय प्रशासकीय मान्यता दिली जाऊ नये यासंदर्भात शासनाचे स्पष्ट आदेश असतानाही त्याकडे दुर्लक्ष करण्यात आलेले आहे.

५.१५ वरील प्रकरणी जे संबंधित अधिकारी/कर्मचारी सेवानिवृत्त झाले असले तरी सर्वोच्च न्यायालयाच्या रमेश शर्मा विरुद्ध पंजाब नॅशनल बँक या दाव्यानुसार **सर्व संबंधित अधिकारी/कर्मचारी यांची चौकशी करुन चौकशीत दोषी आढळलेल्या**

अधिकारी/कर्मचाऱ्यांविरुद्ध तातडीने कारवाई करण्यात यावी व याबाबत केलेल्या कारवाईची माहिती समितीला ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

५.१६ पाणी पुरवठ्याच्या काही योजना सुरु झाल्या होत्या. परंतु, काही कारणास्तव पाणी पुरवठा होऊ शकत नव्हता. यामध्ये काही प्रादेशिक आणि हंगामी योजना आहेत. बंद पडलेल्या पाणी पुरवठ्याच्या योजनेच्या संदर्भात असे धोरण आहे की, जेथे जेथे स्थानिक स्तरावर पाणी पुरवठ्याच्या योजना आहेत व जेथे पाण्याचा स्त्रोत आहे अशा ठिकाणी पाणी उपलब्ध करुन दिले जाऊ शकते. ज्या गावात अगोदर पाणी पुरवठा योजना आहे व त्या ठिकाणी प्रादेशिक नळपाणी पुरवठा योजनेची गरज नाही अशा ६७३ पाणी पुरवठा योजनामधून २०२ स्वतंत्र योजना परिवर्तित केलेल्या आहेत. जेथे हंगामी योजना सुरु आहेत परंतु वीज देयके भरली नसल्यामुळे पाणी पुरवठा बंद आहे तेथे एकत्रित स्वरुपात पुरवठा करण्याचा पर्याय ठेवण्यात आलेला आहे. अशा योजनांची देखभाल व दुरुस्तीचा खर्च ५० टक्के राज्य शासन व ५० टक्के लाभार्थी या प्रमाणे वाटून दिलेला आहे. १२-१३ जिल्ह्यामध्ये यासंदर्भात आढावा सुद्धा घेण्यात आलेला आहे. काही जिल्ह्यात चांगल्या प्रकारचे काम झालेले आहे.

५.१७ पिण्याचे पाणी ही प्राथमिक गरज असून राज्यात पाण्याची भीषण टंचाई लक्षात घेवून राज्य शासनाने स्वतंत्र पाणी पुरवठा विभाग सुरु केलेला आहे. पिण्याचे पाणी राज्यातील प्रत्येक गावातील वाडीला मिळावे यासाठी शासनाने पिण्याच्या पाण्याच्या विविध योजना राबवूनही राज्यात उन्हाळ्याच्या दिवसात किंवा दुष्काळ परिस्थितीमध्ये अनेक गावांना टँकरने पाणी पुरवठा शासनामार्फत केला जातो ही दुर्देवाची बाब आहे. **राज्यातील प्रत्येक ग्रामपंचायतीवर पिण्याच्या पाण्याची योजना गावांसाठी राबविणे तसेच तिची देखभाल व दुरुस्ती करणे इत्यादी बाबींची पुर्तता करण्यासाठी प्रत्येक ग्रामपंचायतीने आपले आर्थिक स्त्रोत कशा प्रकारे वाढविता येईल याबाबत उपाययोजना कराव्यात व याप्रकरणी शासनाने लक्ष घालून तातडीने आवश्यक ती कार्यवाही करावी अशी समितीची शिफारस आहे.**

कृषि, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय (दुग्धविकास) विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी सन २००६-२००७ या वर्षाच्या नागरी अहवालामधील **परि.क्र.४.४.१ "कामाविना असलेला कर्मचारी वर्गास वेतनाची अदायगी"** या संदर्भात महालेखाकारांनी खालील अभिप्राय व्यक्त केले आहेत.

कामाविना असलेल्या कर्मचारी वर्गास वेतनाची अदायगी-

६.१ शासकीय दुग्ध योजना, सातारा यांची कामे बंद झाल्यानंतर सुद्धा कामाविना असलेल्या कर्मचारीवर्गावर रु.३.२४ कोटी इतक्या रकमेचा अनुत्पादक खर्च मार्च २००७ पर्यंत केला गेला होता.

शासकीय दुग्ध शाळा योजना, सातारा १९७९ पासून कार्यरत होती, जिची दूध हाताळण्याची क्षमता प्रति दिन १ लाख लिटर होती आणि या योजनेकरीता ९३ कर्मचारी काम करीत होते, असे पाहण्यात आले की (जुलै २००७) २००३-२००४ पासून दूध हाताळण्याच्या कामामध्ये सातत्याने घट येत होती, जसे २००३-२००४ मध्ये वापरात असलेली क्षमता २८.७१ टक्के होती जी २००४-२००५ मध्ये घसरुन ०.२० टक्क्यावर आली होती. शासकीय दुग्ध शाळा योजना, सातारा यांचे दूध मिळविणे व त्याची विक्री करणे हे काम मे २००५ मध्ये संपूर्णपणे बंद झाले होते.

अभिलेख्यांची तपासणी केली असता (मे २००७) असे लक्षांत आले की दुग्ध शाळा विकास आयुक्तांनी शासकीय दुध योजना सातारा यांचेकडून होत असलेल्या दुधाच्या वितरणाचा कार्यक्रम बंद करण्याचे ठरविले (मार्च २००५) आणि दुग्ध शाळा व्यवस्थापकांस सूचना दिल्या की, त्यांनी आवश्यक तो कमीतकमी कर्मचारीवर्ग निश्चित करावा व उरलेला कर्मचारी वर्ग इतर योजनांकडे वर्ग करुन सदर योजना सातारा दूध संघाकडे हस्तांतरीत करण्याबद्दलच्या प्रस्तावास अंतिम रुप देऊन सदर प्रस्ताव दुग्धशाळा विकास आयुक्तांकडे पाठवून द्यावा. परंतु असे दिसून आले की, दुग्धशाळा विकास आयुक्तांकडून कर्मचारी वर्गाची इतर दुग्ध योजनांकडे बदली करण्यात आली नव्हती किंवा प्रादेशिक दुग्ध शाळा विकास अधिकारी, सातारा यांचेकडून सदर योजना संघाकडे हस्तांतरीत करण्याविषयी सादर केलेल्या (ऑगस्ट २००५) प्रस्तावावर शासनाकडून कोणताही निर्णय घेण्यांत आला नव्हता (जुलै २००७).

विभागाने कामाविना असलेला कर्मचारी वर्ग इतर योजनांकडे बदली करण्यासंबंधात कोणताही निर्णय न घेतल्यामुळे त्यांच्या वेतनावर मे २००५ ते मार्च २००७ (२३ महिने) या

कालावधीत रु.३.२४ कोटी इतका अनुत्पादक खर्च झाला होता आणि त्यापुढे तसाच चालू राहिला होता. ही बाब शासनाचे सचिवास ऑगस्ट २००७ मध्ये कळविण्यात आली होती. अद्याप उत्तर आले नव्हते (ऑगस्ट २००७).

ज्ञापन :

६.२ उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला :-

यासंदर्भात विभागाने पाठविलेल्या लेखी स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये असे नमूद केले आहे की, आयुक्त दुग्धव्यवसाय विकास, महाराष्ट्र राज्य यांनी शासकीय दुग्ध योजना, सातारा यांच्याकडून होत असलेल्या दुधाच्या वितरणाचा कार्यक्रम बंद करुन तेथील कर्मचारी व यंत्रसामुग्री इतर योजनांकडे वर्ग करण्याच्या सूचना आयुक्त कार्यालयाचे पत्र क्रमांक आदुवि/१५(१)/३७/२००४/प्र.क्र.४१४/२८/३/२००५ अन्वये दिल्यानंतर महाराष्ट्र शासन दुग्धशाळा तंत्रज्ञ संघटना यांनी शासकीय दूध योजना, सातारा येथील कर्मचारी वर्ग व यंत्रसामुग्री अन्यत्र वर्ग करु नये याबाबत मा.औद्योगिक न्यायालय, सातारा येथे दावा क्र.ULP-३२/२००५ दाखल करण्यात आला.

सदर दाव्याचा अंतरीम निकाल दि.११/०४/२००५ रोजी मा.औद्योगिक न्यायालय, सातारा यांनी दिला असून, तो पुढीलप्रमाणे आहे.

1. "The application Exh, U-2 partly allowed.
2. The respondents are directed not to disturb the services of all 130 employees working at Govt. Milk scheme, Satara pending the final decision in the main complaints without following due procedure prescribed by law."

त्या अनुषंगाने सातारा दूध योजनेतील एकूण १४४ मंजूर पदांपैकी १३० पदे शासकीय दूध योजना, सातारा येथे कायम ठेवून आतापर्यंत १४ पदांचे समायोजन करण्यात आले आहे. सदर दाव्याची मागिल तारीख माहे सप्टेंबर मध्ये होती व आता पुढील तारीख १८/११/२०१० अशी दिली आहे.

सद्यः परिस्थितीत आयुक्त, दुग्धव्यवसाय विकास कार्यालयाचे दिनांक ०४/०२/२०१० रोजीच्या नवीन आढाव्याप्रमाणे ७२ पदे आवश्यक असल्याचे निश्चित केल्यावर ७२ पदे अतिरिक्त ठरत आहेत. पैकी १४ पदांचे समायोजन झालेले असून मा.औद्योगिक न्यायालय, सातारा यांच्या आदेशानुसार उर्वरित ५८ पदांचे समायोजन करता येत नाही. त्यामुळे मूळ

आक्षेपात नमूद करण्यात आलेला वेतन व भत्त्यावरील खर्च हे मा.औद्योगिक न्यायालय, सातारा यांच्या आदेशानुसार कर्मचारी वर्ग अन्यत्र न हलविल्यामुळे झालेला आहे.

तसेच मा.औद्योगिक न्यायालय, सातारा यांचे अंतरीम आदेशानुसार सदर योजना दूध संघाकडे हस्तांतरीत करता आली नाही.

तरी वरीलप्रमाणे अनुपालन मान्य करण्यास विनंती आहे.

साक्ष :

६.३ उपरोक्त परिच्छेदासंदर्भात दिनांक ८ फेब्रुवारी, २०११ रोजी सचिव, कृषि, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय विभाग यांची साक्ष घेतली. उक्त साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, शासकीय दुग्ध शाळा, सातारा यांचे दूध मिळविणे व त्याची विक्री करण्याचे काम मे, २००३ मध्ये संपूर्ण बंद झाले. त्यावेळी ही योजना हस्तांतरीत करण्याबाबतचा निर्णय का घेण्यात आला नाही ? त्याला एवढा विलंब लागण्याची कारणे काय आहेत ? ऑगस्ट, २००५ मध्ये सातारा येथील दुग्ध शाळा संघाकडे हस्तांतरीत करण्याबाबतच्या प्रस्तावावर शासनाकडून कोणताही निर्णय न घेण्याची कारणे काय आहेत ? सदर दूध योजना हस्तांतरण करण्याबाबतची सद्यःस्थिती काय आहे ? या संदर्भात खुलासा करताना विभागीय सचिवांनी सांगितले की, शासकीय दुग्ध शाळा, सातारा येथून सन २००३-२००४ मध्ये प्रती दिवशी सरासरी १०१२ लिटर इतक्या दुधाचे संकलन होत असे. त्यामध्ये घट होऊन त्याचे प्रमाण २०४ लिटर इतके झाले. त्यानंतर आयुक्त दुग्धव्यवसाय विकास, महाराष्ट्र राज्य यांनी आयुक्त स्तरावर आढावा घेऊन शासकीय दूध योजना, सातारा यांच्याकडून होत असलेल्या दुधाच्या वितरणाचा कार्यक्रम बंद करून तेथील कर्मचारी व यंत्रसामुग्री इतर योजनांकडे वर्ग करण्याबाबत दिनांक २८-३-२००५ रोजी पत्र दिले. त्यानंतर महाराष्ट्र शासन दुग्ध शाळा तंत्रज्ञ संघटना यांनी शासकीय दूध योजना, सातारा येथील कर्मचारी वर्ग व यंत्रसामुग्री अन्यत्र वर्ग करू नये याबाबत माननीय औद्योगिक न्यायालय, सातारा येथे दावा दाखल केला. दिनांक ११-४-२००५ रोजी माननीय औद्योगिक न्यायालय, सातारा यांनी सदर दाव्याचा अंतरीम निकाल असा दिला की, "शासकीय दुग्ध शाळा सातारा येथील कार्यरत असणाऱ्या १३० कर्मचाऱ्यांना विस्कळित केले जाऊ नये". माननीय औद्योगिक न्यायालय, सातारा यांच्या उक्त अंतरीम निर्णयाबाबत विभागाने विधी व न्याय विभागाकडे सल्ला मागितला

असता, त्यांनी याबाबतीत वरिष्ठ न्यायालयाकडे जाण्याची आवश्यकता नाही असे मत व्यक्त केलेले आहे.

६.४ माननीय औद्योगिक न्यायालय, सातारा यांनी दिलेल्या निर्णयामुळे वेतनाचे जादा प्रदान झाले आहे का ? तेथील कर्मचाऱ्यांना इतर योजनांकडे वर्ग करून घेण्याबाबत प्रस्ताव का तयार करण्यात आला नाही ? याबाबतीत अपिल का केले गेले नाही ? या संदर्भात माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, माननीय औद्योगिक न्यायालय, सातारा यांनी दिलेल्या अंतरीम निर्णयाबाबत विभागाने विधी व न्याय विभागाकडे सल्ला मागितला असता त्यांनी याबाबतीत वरिष्ठ न्यायालयाकडे जाण्याची आवश्यकता नाही. तसेच, याबाबतीत अंतिम निर्णय होईपर्यंत वाट पहावी असे लेखी मत दिलेले आहे.

६.५ इतक्या मोठ्या प्रमाणावरील कामाशिवाय असलेल्या कर्मचारी वर्गास केवळ बसवून ठेऊन वेतन देणे ही बाब योग्य आहे का ? असे समितीने विचारले असता, विभागीय सचिवांनी खुलासा केला की, महाराष्ट्र शासन दुग्ध शाळा तंत्रज्ञ संघटना यांनी शासकीय दूध योजना, सातारा येथील कर्मचारी वर्ग व यंत्रसामुग्री अन्यत्र वर्ग करू नये याबाबत माननीय औद्योगिक न्यायालय, सातारा येथे दावा दाखल केला होता. त्यावर सदरहू न्यायालयाने या कर्मचाऱ्यांना विस्कळित करू नये असा निर्णय दिला होता. त्यामुळे या ५८ पदांचे समायोजन करता येत नाही. तसेच, न्यायालयाच्या या निर्णयावर विधी व न्याय विभागाकडे सल्ला मागितला असता त्यांनी याबाबतीत अंतिम निर्णय होईपर्यंत वाट पहावी असे लेखी मत दिलेले आहे. आजच म्हणजे दिनांक ८ फेब्रुवारी, २०११ रोजी या प्रकरणाची सुनावणीची तारीख आहे. त्यासंदर्भात न्यायालयात जो काही निर्णय होईल त्यानंतरच विभागाला त्या कर्मचाऱ्यांबाबत काही निर्णय घेता येईल.

६.६ विभागीय सचिवांनी दिलेल्या उपरोक्त माहिती संदर्भात महालेखापालानी विभागीय सचिवांना विचारले की, In the written reply the Department has stated that the latest hearing of the said suit was September, 2010 and the next hearing is scheduled on 18.11.2010.The department has also given the total strength and out of the total strength of 144 employees of Satara, 130 employees were retained and 14 employees have been adjusted in other schemes. Secondly, the review of the staff has also been worked out to 72 employees on 4.2.2010 by the department. Hence, the 72 employees have been considered surplus and out of which 14 employees have been adjusted. The adjustment of

balance of 58 employees is not possible due to Interim Stay Order of the Industrial Court. In this matter, there is confusion. The Committee would like to know that how many employees have been found and how many of them adjusted? The Second point is that no appeal has been filed or preferred against the Interim Stay Order of the Industrial Court. Is there any plan of re-employment of the employees? If so, what is the present status of H.R. Plan? Is there any strategy at all ?

६.७ याबाबत खुलासा करताना विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, याबाबतीत दिनांक ४-२-२०१० रोजी नव्याने आढावा घेण्यात आला. त्यानुसार १४४ पैकी ७२ पदे आवश्यक असल्याचे निश्चित केल्यावर ७२ पदे अतिरिक्त उरत आहेत. त्यापैकी १४ पदांचे यापूर्वीच समायोजन झालेले असून माननीय औद्योगिक न्यायालय, सातारा यांच्या आदेशानुसार उर्वरित ५८ पदांचे समायोजन करता येत नाही. या प्रकरणाचा निकाल विभागाच्या बाजूने होईल अशी विभागाची अपेक्षा आहे. त्यानंतरच या कर्मचाऱ्याबाबतीत निर्णय घेता येईल. परंतु तो निर्णय जर विभागाच्या बाजूने लागला नाही, तर या अतिरिक्त ठरणाऱ्या कर्मचाऱ्यांचे समायोजन करण्याबाबत काही नियोजन केलेले आहे का ? अशी विचारणा समितीने केली असता, विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, याबाबतीत सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक कृती पथक नेमण्यात आला असून त्याद्वारे याबाबत आढावा घेतला जात आहे.

६.८ विभागीय प्रतिनिधींनी पुढे असेही सांगितले की, दुग्ध शाळा विकास आयुक्तांनी शासकीय दुग्ध शाळा, सातारा यांना सदर योजना सातारा दूध संघाकडे हस्तांतरीत करण्याबाबत सांगितले. परंतु, तो संघ बंद झाला असून त्यांनी त्यांचा कारभार एका खाजगी संस्थेस चालविण्यास दिला आहे. त्यांचे स्वतःचे दुधाचे संकलन बंद झालेले आहे. त्यामुळे आयुक्तांनी शासकीय दुग्ध शाळा सातारा, सातारा दूध संघाकडे हस्तांतरीत करण्याच्या दिलेल्या निर्णयाची अंमलबजावणी होऊ शकत नाही.

६.९ शासकीय अहवालानुसार सद्यःस्थितीत संपूर्ण राज्यात ३३ दुग्ध शाळा आहेत. त्यापैकी कार्यरत दुग्ध शाळांची संख्या २८ इतकी असून बंद दुग्ध शाळांची संख्या ५ इतकी आहे. तसेच ६५ दूध शीतकरण केंद्रे असून त्यातील २७ केंद्रे बंद आहेत.

६.१० जिल्हा दूध संघ, तालुका दूध संघ व सहकारी तत्त्वावरील दूध संघाचे संपूर्ण महाराष्ट्रातील चित्र असे आहे की, आज राज्यामध्ये २३ जिल्हा दूध संघ असून त्यापैकी ३ दूध संघ बंद आहेत तर ३ दूध संघ दिवाळखोरीत निघालेले आहेत. यामध्ये सातारा दूध संघाचा

उल्लेख करावा लागेल. तसेच, राज्यात ५७ तालुका दूध संघ आहेत. सातारा दूध संघाने त्यांचा कारभार एका खाजगी संस्थेस चालविण्यास दिला असुन या संस्थेचे नाव व मालक याबाबतची माहिती समितीने विचारली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, "चैतन्य ॲग्रो इंडस्ट्रीज" असे या संस्थेचे नांव असून मालकाचे नाव इनामदार असे आहे.

६.११ २३ जिल्हा दूध संघांवरील संचालक तसेच महानंदाचे संचालक किती आहेत याची माहिती समितीला देताना विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, जिल्हा दूध संघावर प्रत्येक जिल्ह्याचा एक संचालक आणि शासन नामनिर्देशित एक संचालक असतो. महानंदावर ४० संचालक आहेत.

६.१२ समितीने पुढे अशी विचारणा केली की, २३ दूध संघावरील शासन नामनिर्देशित संचालकांची संख्या किती आहे ? याबाबत माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, दूध संघावर प्रत्येक जिल्ह्यातील एक प्रतिनिधी असतो. पोट नियमाप्रमाणे ज्या जिल्ह्यातील जिल्हा दूध संघ चालू नसेल तेथील प्रतिनिधी जिल्हा दूध संघावर असता कामा नये. परंतु, त्यावर स्थगिती आहे.

६.१३ या संदर्भातील पार्श्वभुमी थोडक्यात सांगताना विभागीय सचिवांनी सांगितले की, विदर्भ व मराठवाड्यातील बरेचसे दूध संघ बंद आहेत. तेथील लोकांनाही दूध संघामध्ये प्रतिनिधीत्व मिळावे यासाठी माननीय मंत्री महोदयांनी संबंधित पोटनियमाला स्थगिती दिली आहे.

६.१४ पश्चिम महाराष्ट्रातील एका-एका तालुक्यातून जितके दूध संकलन होते, तितके संपुर्ण विदर्भातूनही होत नसेल. तसेच, खाजगी दूध संघ उत्तम रितीने काम करताना दिसतात. असे असताना शासकीय दुग्ध शाळा, सातारा चांगल्यारितीने काम का करू शकत नाहीत ? मदर डेअरी बोर्डच्या धर्तीवर या दुग्ध शाळा चालविण्याची कल्पना स्वीकारल्यास यातून काही मार्ग निघू शकेल असे मत समितीने व्यक्त केले असता विभागिय सचिवांनी समितीला विदित केले की, राष्ट्रीय दुग्ध विकास मंडळाने गुजरातमध्ये अमुलचा प्रयोग केला. त्याच धर्तीवर त्यांचे मार्गदर्शन घेऊन ज्या ज्या ठिकाणी शासकीय दुग्ध शाळा व दूध संघ आहेत तेथे असा प्रयोग राबवावयाचा आहे. यामध्ये पैसे, मार्गदर्शन, व्यवस्थापन सारे त्यांचेच असेल. फक्त विभागाचा कर्मचारी वर्ग घ्यावयाचा की नाही याबाबतचा निर्णय व्हायचा आहे. त्याबाबतचा निर्णय झाला की, यावर मार्ग निघू शकेल.

६.१५ वरळी येथील दुग्ध शाळेबाबतची माहिती देण्याबाबत विभागीय सचिवांना सांगितले असता, सचिवांनी सांगितले की, तेथील एका भागामध्ये झोपडपट्टीचे अतिक्रमण झाले होते. त्या ठिकाणी शासनाने झोपडपट्टी पुर्नवसनाची योजना मंजूर केलेली आहे. त्याच्याशी वरळी दुग्ध शाळेचा काही संबंध नाही.

६.१६ सध्या जे ३९ ते ५० लाख लिटर दुधाचे संकलन होते. त्यातील खाजगी दूध संस्थांचा वाटा ६५ टक्के इतका आहे तर सहकारी संघाचा वाटा ३०% तर शासकीय दूध संस्थांचा वाटा ५ टक्के इतका आहे. या शासकीय दूध संस्थांतील जवळपास अडीच हजार पदे अतिरिक्त आहेत. या शासकीय दूध संस्थांतील जवळपास अडीच हजार अतिरिक्त पदावरील कर्मचाऱ्यांना त्या त्या जिल्हयांतील इतर योजनांकडे वर्ग करण्याबाबतच्या प्रस्तावावर विचार सुरू असल्याची माहिती विभागीय सचिवांनी समितीला दिली.

अभिप्राय व शिफारशी :

६.१७ राज्यामध्ये २३ जिल्हा दूध संघ असून त्यापैकी ३ दूध संघ बंद आहेत तर ३ दूध संघ दिवाळखोरीत निघालेले आहेत. यामध्ये सातारा दूध संघाचा उल्लेख करावा लागेल. तसेच, राज्यात ५७ तालुका दूध संघ आहेत. सातारा दूध संघाने त्यांचा कारभार या चैतन्य ॲग्रो इंडस्ट्रीज खाजगी संस्थेस चालविण्यास दिला आहे.

६.१८ विदर्भ व मराठवाड्यातील बरेचसे दूध संघ बंद आहेत. तेथील लोकांनाही दूध संघामध्ये प्रतिनिधीत्व मिळावे यासाठी माननीय मंत्री महोदयांनी संबंधित पोटनियमाला स्थगिती दिली आहे.

६.१९ पश्चिम महाराष्ट्रातील एका-एका तालुक्यातून जितके दूध संकलन होते, तितके संपूर्ण विदर्भातूनही होत नसेल. खाजगी दूध संघ उत्तमरितीने काम करीत असताना शासकीय दुग्ध शाळा सातारा चांगल्यारितीने काम का करू शकत नाहीत याबाबत समितीने खेद व्यक्त केला. मदर डेअरी बोर्डच्या धर्तीवर या दुग्ध शाळा चालविण्याची कल्पना स्वीकारल्यास यातून काही मार्ग निघू शकेल असे मत समितीने व्यक्त केले. राष्ट्रीय दुग्ध विकास मंडळाने गुजरातमध्ये अमुलचा प्रयोग केला. त्याच धर्तीवर त्यांचे मार्गदर्शन घेऊन ज्या-ज्या ठिकाणी शासकीय दुग्ध शाळा व दूध संघ आहेत तेथे असा प्रयोग राबविणे आवश्यक असून याबाबत ठोस निर्णय घेणे आवश्यक आहे. त्यासाठी शासनाचे मार्गदर्शन व व्यवस्थापन योग्य होणे

गरजेचे आहे परंतु तसे होत नसल्यामुळे शासकीय दुग्ध शाळा व दूध संघ तोट्यात जात असून ते बंद करण्याच्या मार्गावर आहेत व खाजगी दुग्ध शाळा व दुध संघ नफ्यात चालत आहेत. दुध संकलनाच्या संदर्भात राज्याची आकडेवारी समितीने घेतली असता राज्यात ३९ ते ५० लाख लिटर दुधाचे संकलन होते त्यातील खाजगी दुध संस्थाचा वाटा ६५ टक्के इतका आहे तर सहकारी संघाचा वाटा ३० टक्के तर शासकीय दुध संस्थाचा वाटा ५ टक्के इतका आहे यावरुन असे दिसून येते की, शासन खाजगी दुध संस्थाना प्रोत्साहन देवून त्यांची दुध व्यवसायातील मक्तेदारी वाढवित आहे तर दुसरीकडे शासकीय दुध संस्था बंद करुन तेथील कर्मचाऱ्यांना अतिरिक्त ठरवित आहे. दुग्धव्यवसाय हा कृषिपूरक व्यवसाय असून यामुळे ग्रामीण कुटुंबांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होवून अतिरिक्त उत्पन्नासह त्यांच्या आहाराच्या पोषण मुल्यात वृद्धी होते. दुध उत्पादनामध्ये राज्याचा भारतामध्ये ६ वा क्रमांक आहे. राज्याच्या दुध उत्पादनामध्ये देखील प्रतिवषी वाढ होत आहे. त्यामुळे राज्याच्यादृष्टीने व्यापक विचार करता, **शासकीय दुध संस्था या अधिक कार्यक्षमरित्या चालविल्या गेल्यास ग्रामीण भागात रोजगाराच्या अधिक संधी उपलब्ध होतील. त्यामुळे शासकीय दुध संस्थाचे आधुनिकीकरण करण्याच्यादृष्टीने शासनाने आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यांत देण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

६.२० राज्यात दुधाची व दुग्धजन्य पदार्थांची मागणी मोठ्या प्रमाणात असून इतर राज्यातील दुधाची व दुग्धजन्य पदार्थांची विक्री महाराष्ट्रात होते. ही बाब विचारात घेता राज्यात दुधाला मोठ्या प्रमाणात मागणी असताना शासकीय दुध योजना तोट्यात जाणे म्हणजे शासनाकडे योग्य मार्गदर्शन व व्यवस्थापन इत्यादींचा अभाव आहे. कारण त्याच संस्था खाजगी व्यक्तींना चालविण्यास दिल्यानंतर त्या नफ्यात चालतात. राज्यातील शासकीय दुध संस्थांचे एकूण दुध संकलनापैकी केवळ ५ टक्के दुधाचे संकलन शासकीय दुध संस्थाकडून होते ही खेदाची बाब आहे. **शासकीय दुध संस्थाची दुध संकलनाची टक्केवारी वाढविण्यासाठी शासनाने तातडीची आवश्यक ती उपाययोजना करावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला ३ महिन्यात देण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

गृह विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी सन २००६-२००७ या वर्षाच्या नागरी अहवालामधील **परि.क्र.४.४.२ "निधी अडकून पडणे"** या संदर्भात महालेखाकारांनी खालील अभिप्राय व्यक्त केले आहेत.

निधी अडकून पडणे -

७.१ पूर्वीचा साठा आणि वापराची मानसिकता लक्षात न घेता पोलीस कॉन्स्टेबलच्या फटीग टोप्या शिवण्याकरीता पुरवठा केलेले कापड जादा प्रमाणात होते. याचा परिणाम म्हणून रु.२.२६ कोटीचे किंमतीचे कापड तसेच पडून होते.

शासनाने फटीग टोप्या राज्य पोलीस दलाच्या गणवेशाचा एक भाग म्हणून वापरात आणण्याचे ठरविले (मार्च १९७९) प्रत्येक वर्षी प्रत्येक पोलीस कॉन्स्टेबलना दोन फटीग टोप्या पुरविण्यात आल्या होत्या. क्षेत्रीय युनिटकडून आलेल्या मागणीवरुन आधारीत महासंचालक पोलीस यांनी टोप्या तयार करण्याकरिता लागणाऱ्या कापडाच्या खरेदीचे आदेश महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळास दिले होते. त्या टोप्या पोलीस प्रशिक्षण शाळा/पोलीस युनिटच्या शिवण केंद्राकडून शिवून घेतल्या होत्या.

पोलीस प्रशिक्षण शाळा, खंडाळा यांच्या अभिलेख्यांची तपासणी (नोव्हेंबर ०५) आणि पाठोपाठ १३ इतर युनिट कडून मिळालेली माहिती (मे २००७) यावरुन असे दिसते की पोलीस महासंचालक यांच्याकडून त्यांना वेळोवेळी टोप्या तयार करण्याकरीता पाठविण्यात आलेले २.२६ लाख मीटर कापड मे २००७ अखेर विनावापर पडून होते. गेल्या सहा वर्षातील वर्षवार स्थिती खालीलप्रमाणे.

(लक्ष मीटर)

वर्ष	सुरुवातीची शिल्लक	आवक	वापर	शेवटची शिल्लक
२००१-०२	२.१७	०.०४	०.९०	१.३१
२००२-०३	१.३१	०.१५	०.२६	१.२०
२००३-०४	१.२०	१.०६	०.४४	१.८२
२००४-०५	१.८२	०.२९	०.०७	२.०४
२००५-०६	२.०४	०.२५	०.१४	२.१५
२००६-०७	२.१५	०.२९	०.१८	२.२६

वरील कोष्टकावरुन असे दिसते की, जरी कापडाचा मोठा साठा विनावापर पडून होता तरी पोलीस महासंचालक प्रत्येक वर्षी कापडाचा पुरवठा करीत राहिले जो अत्याधिक ठरला.

पोलीस महासंचालकांच्या कार्यालयातील उप-आयुक्तांनी वस्तुस्थिती स्विकारली आणि म्हटले (मार्च २००७) की क्षेत्रीय युनीटस कडून टोप्यांकरीता मिळालेल्या मागणीवर आधारित पोलीस प्रशिक्षण शाळा आणि पोलीस कल्याण युनीटस यांना कापडाचा पुरवठा केला गेला होता आणि शासनाच्या धोरणानुसार शिल्लक साठा ठेवला होता. तसेच, त्यांनी पुढे असे म्हटले की शिवण्याचा कमीत कमी दर रु.३ प्रती टोपी असा होता आणि कामगार या दराने शिवणकाम करण्यास तयार नव्हते.

वर्ष १९९५ मध्ये सुद्धा कापड मिळविले होते आणि ते शिवणाशिवाय पडून होते आणि पुढील कापडाची खरेदी, शिल्लक साठा जो तसाच पडून होता या गोष्टी विचारात न घेता केली होती.

पूर्वीचा शिल्लक साठा आणि कापडाच्या वापराचा कल विचारात न घेता पोलीस महासंचालकाकडून करण्यात आलेला जादा कापडाचा पुरवठा याचा परिणाम म्हणजे रु.२.२५ कोटी किंमतीचे २.२६ लाख मीटर कापड बिनावापर पडून होते आणि तेवढ्या निधीची अडवणूक झाली होती.

ही बाब शासनाच्या सचिवांस जून २००७ मध्ये कळविण्यात आली होती. उत्तर अद्याप आले नव्हते (ऑगस्ट २००७).

ज्ञापन :

७.२ यासंदर्भात गृह विभागाने पाठविलेल्या लेखी स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये असे नमूद करण्यात आले आहे की, शिवणकला केंद्रामध्ये २,३७,५२३.८८ मीटर इतके फटीग कॅपचे कापड शिल्लक असल्याच्या आक्षेपासंदर्भात घेतलेल्या कार्यक्षेत्रात १,३०,९८७.८५ मीटर कापड शिल्लक आहे असे आढळून आले. सदर कापडामधून फटीग कॅप वेळोवेळी शिवून पोलीस घटकांना वितरण केल्या. परंतु, पोलीस शिपायांच्या भरतीची प्रक्रिया चालू झाल्याने शिवणकला केंद्रामध्ये फटीग कॅप शिवण्याचे काम मंदावले होते. एप्रिल-२०१० अखेर शिल्लक कापडाची पाहणी केली असता शिवणकला केंद्रामध्ये ५७,९५४.९३ मीटर कापड शिल्लक होते. सदर कापडामधून फटीग कॅप शिवून आता शिवणकला केंद्रामध्ये ४४,८९४.५० मीटर कापड शिल्लक असून त्याच्या फटीग कॅप शिवून सदर कापड तातडीने संपविण्याची कार्यवाही चालू आहे.

साक्ष :

७.३ उपरोक्त परिच्छेदासंदर्भात दिनांक ५ ऑक्टोबर, २०१० रोजी गृह विभागाच्या प्रधान सचिवांची समितीने साक्ष घेतली. त्यावेळी सचिवांनी समितीला अशी माहिती दिली की, महाराष्ट्र पोलीस दलामध्ये सुमारे २ लाख पोलीस कर्मचारी कार्यरत आहेत. त्यांना दरवर्षी २ फटीग टोप्या विभागामार्फत देण्यात येतात. एका फटीग टोपीला ४५ सें.मी.एवढा कपडा लागतो. याप्रमाणे प्रत्येक कर्मचाऱ्याला दरवर्षी २ फटीग टोप्या याप्रमाणे ९० सें.मी.कपडा लागतो. सन १९७९ पासून कर्मचाऱ्यांना फटीग टोप्या देण्यात येत आहेत. सन १९९५-९६ मध्ये २४१८७ मीटर कपडा घेण्यात आला होता. शासनाचे सचिव व पोलीस महासंचालकांचा समावेश असलेल्या समितीने सन १९९८ मध्ये पोलीस कर्मचाऱ्यांना फटीग टोप्या ऐवजी पीक टोप्या देण्याचा निर्णय घेतला. या टोप्यां मध्ये पुठ्ठयाचा वापर करण्यात येतो. परंतु, असे आढळून आले की, या टोप्या पोलीस कर्मचाऱ्यांसाठी सुयोग्य नाहीत, त्यामुळे कर्मचाऱ्यांना काही समस्या निर्माण होत होत्या. त्यामुळे शासनाने या धोरणाचा पुनर्विचार केला व सन २००२ पासून पुन्हा फटीग टोप्या पुरविण्याचे आदेश काढण्यात आले. सदर टोप्यांची शिलाई पोलीस कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांकडून त्यांना रोजगार उपलब्ध व्हावा म्हणून करुन घेण्यात येत असते. फटीग टोप्या शिवण्याचा दर तीन रुपये होता. या दरात सुधारणा झाली नसल्यामुळे अनेक महिलांनी फटीग टोप्या शिवण्यामध्ये विशेष रस दाखविला नाही. ही बाब विचारात घेऊन शासनाने सन २००६ मध्ये फटीग टोप्या शिवण्यासाठी दरामध्ये सुधारणा करुन १५ रुपये दर निश्चित केला. दर वाढविल्यामुळे मोठ्या प्रमाणावर महिला टोप्या शिवायला लागल्या. दरम्यान शासनाने सन २००५ मध्ये पोलिसांची ५५ हजार पदे वाढविण्याचा निर्णय घेतला. त्याचप्रमाणे ४४ हजार पदे भरण्यात आली आहेत. पदांच्या हिशोबात आज ३८ हजार ७५१ मीटर कापड शिल्लक आहे. त्यामध्ये जवळपास ८७ हजार ३१६ टोप्या होतील. तेव्हा दिनांक ३१ डिसेंबरपर्यंत कापड शिल्लक राहणार नाही. जेवढ्या टोप्या लागतील त्याच्या ५० टक्के टोप्या राखीव साठा म्हणून ठेवाव्यात असे शासनाचे धोरण आहे. प्रत्येक युनिटमध्ये तेवढ्या प्रमाणात टोप्या ठेवणे गरजेचे आहे. आपण टोप्यांसाठी वुलनचे कापड घेतो. हे कापड एक-दोन वर्षे पडून राहिले तरी खराब होत नाही. मध्यंतरी फटीक टोप्या वापरण्याच्या संदर्भात बदल झाल्यामुळे हा परिणाम झालेला आहे. परंतु ३१ डिसेंबरपर्यंत शिल्लक राहिलेले कापड पूर्णपणे वापरले जाईल.

७.४ जेलमधील कैद्यांकडे टोप्या शिवण्याचे काम का देण्यात येत नाही ? अशी विचारणा समितीने केली असता पोलिसांच्या गृहिणींना काम मिळावे या कारणास्तव त्यांच्याकडून टोप्या शिवून घेतल्या जातात. अशी माहिती विभागीय सचिवानी दिली. परंतु विभागाने जी माहिती दिली ती माहिती विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनाच्या अभिप्रायामध्ये दिलेली नाही. ही सर्व माहिती महालेखाकारांना कळविली आहे काय ? असे समितीने विचारले असता, विभागीय सचिवांनी सांगितले की, बैठकीच्या दिवशी म्हणजे दिनांक ५ ऑक्टोबर, २०१० रोजी सकाळी महालेखाकार कार्यालयास लेखी स्वरुपात पाठविली. बैठकीच्या दिवशी लेखी उत्तर पाठविले आहे.

७.५ विभागाने बैठकीच्या दिवशी सकाळी लेखी उत्तर पाठविले. समितीकडे जो तक्ता आहे त्यानुसार सन २००५-०६, २००६-०७ आणि २००७-०८ या वर्षात गृह विभागाकडून स्पष्टीकरण येण्यासाठी सहावेळा स्मरणपत्रे पाठविण्यात आली. स्पष्टीकरण वेळेवर पाठविणे ही विभागाची जबाबदारी नाही काय, या प्रकरणी कोण जबाबदार (दोषी) आहे ? याबाबत यापूर्वी उत्तर द्यावयास पाहिजे होते परंतु ते देण्यात आले नाही असे मान्य करुन सचिवांनी खुलासा केला की, सन २००५ मध्ये पोलिसांच्या संख्येत वाढ करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. त्यावर समितीने असे मत व्यक्त केले की, विभागामध्ये कोणत्याही प्रकारचा समन्वय नाही. विभागाने लवकर ज्ञापने का दिली नाहीत याची माहिती द्यावी. याबाबत सचिवानी कोणताही खुलासा न करता केवळ समितीस एवढेच सांगितले की, विभागाने यापूर्वी सचिवांच्या साक्षीच्या दिवशीच समितीला माहिती दिलेली आहे.

७.६ समितीने अशी विचारणा केली की, सन १९९५ मधील कापडाचा साठा शिल्लक असताना नव्याने कापड घेण्याचे कारण काय? याबाबत विभागीय सचिवांनी खुलासा केला की, सन २००३-०४ व २००४-०५ मध्ये धोरण बदलले. त्यानुसार नवीन साठा घेतला. सन १९९५ मधील कापड आज शिल्लक आहे असे नाही. आपण कापड घेतो आणि ते वापरतो. ही सततची प्रक्रिया आहे. विभागाने महालेखाकार कार्यालयास सन २००७-०८, २००८-०९, २००९-१० असे प्रत्येक वर्षी उत्तर दिलेले आहे. त्यावर महालेखाकारांनी समितीला असे सांगितले की, In the year 2001-02 there was enough stock of 2.17 lakh meter, but still more cloth was procured. याबाबत विभागीय सचिवांनी खुलासा केला की, The Government decided to change the type of Caps. Till this time Peak Caps were used but it was decided to use

Fatigue Caps. During the next few years the cloth was procured to make fatigue caps. Additional cloth was purchased keeping in view the requirement and also to maintain buffer stock.

७.७ "राखीव साठ्याची माहिती असताना देखील टोप्या शिवण्यासाठी मोठ्या प्रमाणावर कापड खरेदी केले" समितीच्या या भाष्यावर विभागीय सचिवानी खुलासा केला की, विभागाकडे मागणी आल्यानंतर कापड खरेदी करणार, त्यानंतर टोप्या शिवणार यामध्ये कालावधी जातो. शिवाय टोप्या शिवण्यासाठी बराच वेळ जातो. पोलिसांसाठी टोप्या अत्यावश्यक आहेत. त्याशिवाय पोलीस काम करु शकत नाही. टोप्यांची आज मागणी केली तर ती लगेच मिळत नाही. यासाठी राखीव साठा ठेवावा लागतो आणि शासनाचे तसे धोरण आहे.

७.८ पोलीस विभागात जवळपास २ लाख कर्मचारी कार्यरत आहेत. लोकसंख्येच्या तुलनेत जवळपास ९८ टक्के लोकांशी पोलिसांचा संबंध येतो. टोप्यामध्ये बदल करण्यापूर्वी त्याबाबत अभ्यास केला होता काय ? पोलिसांच्या टोप्या बदला असे महासंचालकाच्या मनात आले व त्यानुसार पोलिसांच्या टोप्या बदलण्यात आल्या आणि नंतर दुसऱ्या महासंचालकांनी सांगितले की, पूर्वीच्या टोप्या असू द्या, असे काही घडले आहे काय ? पोलिसांच्या टोप्या बदलण्यापूर्वी त्याबाबत संशोधन वा अभ्यास करण्यात आला होता काय ? याबाबत विभागीय सचिवानी खुलासा केला की, पोलिसांच्या टोप्या संदर्भात सन १९९८ मध्ये एक समिती नेमण्यात आली होती.

७.९ आधुनिकतेकडे जात असताना गृह विभागाने काही चांगले निर्णय घेतले. नवीन शस्त्रास्त्रे घेतली. पोलिसांसाठी चांगल्या प्रकारच्या गाड्या घेतल्या. पथके उभी केली. पुणे शहराबाबत देखील काही चांगले निर्णय घेतले आहेत. काही नवीन बदल करताना त्याबाबत अभ्यासपूर्वक निर्णय घेतले होते काय, यासाठी संशोधन केंद्र स्थापन केलेले आहे काय ? अशी समितीने विचारणा केली असता, विभागीय सचिवानी असे सांगितले की, सन २००० मध्ये पोलीस संशोधन केंद्र स्थापन केलेले आहे. हे केंद्र पुणे येथील पाषाण विभागात आहे. या केंद्रामध्ये निवृत्त महासंचालकाचा समावेश आहे. शिवाय सी.आय.डी.चे अे.डी.जी हे या केद्रांचे प्रमुख आहेत. या केंद्रामध्ये १२ ते १४ जणांचा समावेश आहे. ही पथके वेगवेगळ्या प्रकारचे प्रकल्प हाती घेऊन त्याबाबत संशोधन करुन त्याचा अहवाल शासनाला सादर करते.

७.१० पोलीस विभागात एकूण किती पदे आहेत, त्यापैकी किती पदे रिक्त आहेत या संदर्भातील सविस्तर माहिती पाठवून देण्याबाबत समितीला आश्वासित केल्यानुसार विभागाकडून पुढीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.

७.११ दिनांक ३१/१२/२०१० अखेर सर्व संवर्गातील मंजूर पदे व रिक्त पदे याबाबतची माहिती खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे आहे :-

अ.क्र.	पदनाम	मंजूर पदे	हजर पदे	पदोन्नतीच्या कोट्यातील रिक्त पदे	अभिप्राय
१	पोलीस निरीक्षक (निशस्त्र)	३१४०	३०९७	४३	सदरची रिक्त पदे पात्र उमेदवार यांच्याकडे त्यांच्या जातीचे पडताळणी केलेले (वैधता) प्रमाणपत्र उपलब्ध नसल्याने, किंवा त्यांचा विशेष शाखेचा विहित कालावधी पूर्ण केल्याने भरता येत नाहीत. संबंधीत पात्र सपोनि यांनी वरील अटींची पूर्तता करताच सदरची पदे त्वरीत भरण्याची दक्षता घेतली आहे.
२	पोलीस निरीक्षक (सशस्त्र)	४१३	३७९	३४	
३	सहायक पोलीस निरीक्षक	३९६६	१८७२	२०९४	सपोनि ची पदे पोउपनि मधून पदोन्नतीने भरण्यात येतात. दिनांक १५/११/२००६ च्या सेवाज्येष्ठतेवर आधारीत सन २००७ मध्ये प्रसिद्ध झालेल्या सेवा ज्येष्ठतेच्या आधारावर पोलीस उप निरीक्षकांना सहायक पोलीस निरीक्षक पदावर पदोन्नती देवू नये या संदर्भात मा.उच्च न्यायालयात याचिका क्र.४६५/०९ दाखल झाली असून, त्यामध्ये दिलेल्या न्यायनिर्णयास अनुसरुन ७० पदे भरण्यात आली आहेत. उर्वरित पदे न्यायालयाच्या पुढील आदेशान्वये भरण्यात येतील.
४	पोलीस उपनिरीक्षक	२०६९	२०३८	३१	सदरची पदे पदोन्नतीने भरण्याची कार्यवाही चालू

					आहे.
५	सहायक पोलीस उप निरीक्षक	१४६११	१४०१७	५९४	पोना ते सपोउनि या संवर्गातील रिक्त पदे पदोन्नतीने भरण्याबाबत या कार्यालयाचे क्र.पोमसं/६/१०/रिक्त पदे/४१४/२०१०, दि.२९/११/१० व दि.१५/१/१० चे अर्ध शासकीय पत्रान्वये आदेशित करण्यात आलेले आहेत.
६	पोलीस हवालदार	३६२७०	३४२९२	१९७८	
७	पोलीस नाईक	३७२३०	३६०९४	११३६	

७.१२ राज्य पोलीस सेवेतील पोलीस उपअधिक्षक/सहायक पोलीस आयुक्त व त्यावरील दर्जाच्या वर्ग १ च्या अधिकाऱ्यांच्या आस्थापनाविषयक बाबी गृह विभाग/पो १ (अ) कार्यासनामार्फत हाताळण्यात येतात. सदरहू कार्यासनामार्फत हाताळण्यात येणाऱ्या संवर्गातील सरळसेवा व पदोन्नती कोट्यातील मंजूर पदसंख्या, रिक्त पदे व सदर रिक्त पदे भरण्याबाबत करण्यात येत असलेली/आलेली कार्यवाही, इत्यादी माहिती खालीलप्रमाणे नमूद करण्यात येत आहे :-

अ.क्र.	**पदनाम**	**मंजूर संवर्ग संख्या**	**रिक्त पदे**	**रिक्त पदे भरण्याच्या दृष्टीने करण्यात आलेली वा करण्यात येत असलेली कार्यवाही**
१	अपर पोलीस अधिक्षक/पोलीस उपआयुक्त (असंवर्ग) (१००% पदोन्नतीने)	१७९	३२	सध्या रिक्त असलेली पदे तसेच दि.१/९/२०१० ते ३१/८/२०११ या कालावधीत सेवानिवृत्ती तसेच अन्य कारणामुळे रिक्त होणारी पदे विचारात घेवून एकूण ५१ पदे पदोन्नतीने भरण्यासाठी निवडसूची सन २०१०-११ तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे.
२	समादेशक, राज्य राखीव पोलीस बल (सरळसेवा ५०%)	४	१	सरळसेवेच्या कोट्यातील ४ पदांपैकी ३ पदांवर अधिकाऱ्यांना तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यात आलेली आहे. रिक्त एका पदावर तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यासाठी पोलीस महासंचालक यांच्याकडून प्राप्त मागविण्यात येत आहे.
	समादेशक, राज्य राखीव	४	--	--

	पोलीस बल (पदोन्नती ५०%)			
३	पोलीस अधिक्षक/पोलीस उपआयुक्त, मोटार परिवहन (सरळसेवा ५०%)	१	--	पोलीस अधिक्षक/पोलीस आयुक्त, मोटार परिवहन या संवर्गातील पदे १००% पदोन्नती भरण्याबाबत सेवाप्रवेश नियमात दुरुस्ती प्रस्तावित करण्यात आली असून सामान्य प्रशासन विभागाच्या मान्यतेने प्रस्ताव महाराष्ट्र लोकसेवा आयोगास पाठविण्यात आला आहे. सरळसेवेच्या पदावर तात्पुरत्या स्वरुपात एका अधिकाऱ्यास पदोन्नती देण्यात आली आहे.
४	पोलीस अधिक्षक/पोलीस उपआयुक्त, बिनतारी संदेश (सरळसेवा ५०%)	१	--	सरळसेवेच्या कोट्यातील १ पदासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून १ उमेदवाराची शिफारस नुकतीच प्राप्त झाली असून त्यावर पुढील कार्यवाही करण्यात येत आहे. सद्य:स्थितीत सरळसेवेच्या कोट्यातील १ रिक्त पद भरण्यासाठी तदर्थ पदोन्नती सूची सन २००८-०९ तयार करुन १ अधिकाऱ्यास तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यात आली आहे.
	पोलीस अधिक्षक/पोलीस उपआयुक्त, मोटार परिवहन (पदोन्नती ५०%)	२	--	--
	पोलीस अधिक्षक/पोलीस उपआयुक्त, बिनतारी संदेश (पदोन्नती ५०%)	२	--	पदोन्नतीच्या कोट्यातील २ रिक्त पदे भरण्यासाठी निवडसूची सन २००८-०९ तयार करुन २ अधिकाऱ्यांना नियमित स्वरुपात पदोन्नती देण्यात आली आहे.
५	पोलीस उपअधिक्षक/सहायक पोलीस आयुक्त (नि:शस्त्र) (सरळसेवा ३०%)	२२२	१४३	सन २००४, २००६ व २००७ च्या बॅच मधील ८३ अधिकारी जिल्हा प्रशिक्षण/म.पो.अकादमी, नाशिक येथे प्रशिक्षण घेत आहेत. सन २००९ च्या मागणीपत्रानुसार २४ उमेदवारांची शिफारस लोकसेवा आयोगाकडून प्राप्त झाली असून त्यांची चारित्र्य पडताळणी/वैद्यकीय तपासणी/जात पडताळणी करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. सन २०१० साठी ४ पदाचे व सन

				२०११ साठी ३२ पदांचे मागणीपत्र आयोगास पाठविण्यात आले आहे.
	पोलीस उपअधिक्षक/सहायक पोलीस आयुक्त (नि:शस्त्र) (पदोन्नती ७०%)	५१९	९८	दि.१/९/२००९ ते ३१/८/२०१० या कालावधीत सेवानिवृत्ती व अन्य कारणामुळे रिक्त होणारी पदे पदोन्नतीने भरण्यासाठी निवडसूची सन २००९-१० मध्ये ८८ अधिकाऱ्यांना अंतर्भूत करण्यात आले आहे. त्यापैकी ६६ अधिकाऱ्यांना पदोन्नती देण्यात आली आहे. उर्वरित अधिकाऱ्यांना जात वैधता प्रमाणपत्राअभावी/विभागीय चौकशीमध्ये दिलेल्या शिक्षेचा अंमल चालू असल्याने पदोन्नती देण्यात आलेली नाही.
६	सहायक समादेशक/सशस्त्र पोलीस उपअधिक्षक (सरळसेवा ३०%)	२३	२३	सरळसेवेच्या कोट्यातील १६ पदांचे मागणीपत्र आयोगास पाठविण्यात आले होते. तथापि, सदर मागणीपत्र रद्द करण्याबाबत पोलीस महासंचालक कार्यालयाने पाठविलेल्या प्रस्तावानुसार सदर मागणीपत्र रद्द करण्याचा निर्णय शासन स्तरावर घेण्यात आला आहे. दरम्यान सरळसेवेच्या कोट्यातील २३ रिक्त पदे तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नतीने भरण्यासाठी तदर्थ पदोन्नती सूची सन २००९-१० तयार करण्याचे प्रस्तावित करण्यात आले होते. मात्र महाराष्ट्र लोकसेवा आयोगास मागणीपत्र पाठविल्याशिवाय सामान्य प्रशासन विभाग पदोन्नती सूचीस मान्यता देणार नाही. यास्तव निवड समितीने तूर्त पदोन्नती सूची तयार न करण्याचा निर्णय घेतला.
	सहायक समादेशक/सशस्त्र पोलीस उपअधिक्षक (सरळसेवा ७०%)	५४	३५	रिक्त ३५ पदांसाठी निवडसूची २००९-१० तयार करण्यासाठी निवड समितीची बैठक दिनांक १०-०१-२०१० रोजी घेण्यात आली आहे. निवडसूचीस मान्यता देण्यासाठी प्रस्ताव सा.प्र.विभागास सादर करण्यात आला आहे.
७	सहायक पोलीस	५	५	४ रिक्त पदांचे मागणीपत्र महाराष्ट्र लोकसेवा

	आयुक्त/पोलीस उपअधिक्षक, मोटार परिवहन (सरळसेवा ५०%)			आयोगास पाठविण्यात आले आहे. एका अधिकाऱ्यास तात्पुरती पदोन्नती देण्यात आली असल्याने १ पद रिक्त ठेवण्यात आले आहे. सरळसेवेच्या कोट्यातील (अ.ज.प्रवर्गाचा अधिकारी उपलब्ध होत नसल्याने १ पद वगळता) ३ पदे भरण्यासाठी सन २००९-१० साठी पदोन्नती सूची तयार करण्यात आली आहे. त्यास मान्यता देण्यासाठी प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागास पाठविण्यात आला आहे.
	सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उपअधिक्षक, मोटार परिवहन (पदोन्नती ५०%)	५	२	रिक्त २ पदांसाठी सन २००९-१० ची निवडसूची तयार करण्यात आली असून प्रस्ताव मान्यतेसाठी सामान्य प्रशासन विभागास पाठविण्यात आला आहे.
८	पोलीस उपअधिक्षक, बिनतारी संदेश (अभियांत्रिकी) (सरळसेवा ५०%)	११	७	सरळसेवेच्या कोट्यातील ७ पदांसाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगास मागणीपत्र पाठविण्यासाठी पोलीस महासंचालकांकडून प्रस्ताव मागविण्यात आला आहे. सदर ७ पदे तात्पुरत्या स्वरुपात भरण्यासाठी सन २००९-१० ची पदोन्नती सूची तयार करण्यात आली असून त्यास मान्यता घेण्यासाठी प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागास पाठविण्यात आला आहे.
	पोलीस उपअधिक्षक, बिनतारी संदेश (अभियांत्रिकी) (पदोन्नती ५०%)	१२	७	रिक्त ७ पदांसाठी सन २००९-१० ची निवडसूची तयार करण्यात आली असून प्रस्ताव मान्यतेसाठी सामान्य प्रशासन विभागास पाठविण्यात आला आहे.
९	पोलीस उपअधिक्षक बिनतारी संदेश (वाहतुक) (पदोन्नती १००%)	५	२	एका अधिकाऱ्यास जात वैधता प्रमाणपत्राअभावी पदोन्नती देण्यात आलेली नाही. एका पदासाठी सन २००९-१० ची निवडसूची तयार करण्यात आली असून प्रस्ताव मान्यतेसाठी सामान्य प्रशासन विभागास पाठविण्यात आला आहे.
१०	मुख्य श्वान	१	१	सदर पदाचे सेवाप्रवेश नियम अंतिम नसल्याने, सदर

	अध्यापक/पोलीस उपअधिक्षक (श्वान पथक)			पदावर तात्पुरती पदोन्नती देण्यासाठी सन २००९-१० तयार करण्यात आली असून प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे.
११	वरिष्ठ उपसहायक (गट-अ), पोलीस महासंचालक यांचे कार्यालय	२	१	सदर पद भरण्यासाठी निवडसूची सन २०१०-११ तयार करण्यासाठी पोलीस महासंचालक यांच्याकडून प्रस्ताव दि.२१.१२.२०१० अन्वये पाठविण्यात आला आहे. सदर प्रस्तावावर कार्यवाही करण्यात येत आहे.
१२	उपसहायक (गट-ब), पोलीस महासंचालक यांचे कार्यालय	८	२	सदर २ पदे भरण्यासाठी निवडसूची सन २०१०-११ तयार करण्यासाठी पोलीस महासंचालक यांच्याकडून प्रस्ताव दिनांक २१.१२.२०१० अन्वये पाठविण्यात आला आहे. सदर प्रस्तावावर कार्यवाही करण्यात येत आहे.
१३	वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी (गट-अ), पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांचे कार्यालय	१२	६	रिक्त ६ पदे पदोन्नती देण्याचा प्रस्ताव शासनास प्राप्त झालेला नाही. सदर प्रस्ताव मागविण्याचे प्रस्तावित आहे.

<u>गृह विभाग/पोल-१</u>

दि.२९.१.२०११ रोजी रिक्त असणारी पदे :-

१) महासंचालक दर्जा :

(१) महासंचालक, ॲन्टी करप्शन ब्युरो, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२) अपर पोलीस महासंचालक :

(१) अपर पोलीस महासंचालक, विशेष कृती, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

(२) अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.

(३) अपर पोलीस महासंचालक, कारागृह, महाराष्ट्र राज्य, पुणे.

(४) उपमहासमादेशक, गृहरक्षक दल व उपसंचालक, नागरी संरक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

३) विशेष पोलीस महानिरीक्षक :

(१) विशेष पोलीस महानिरीक्षक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.

४) पोलीस उपमहानिरीक्षक :

(१) अपर पोलीस आयुक्त, मुख्यालय, मुंबई

(२) अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर

(३) अपर पोलीस आयुक्त, ठाणे शहर

(४) अपर पोलीस आयुक्त, पुणे

(५) पोलीस उपमहानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल (मुख्यालय), महाराष्ट्र राज्य, मुंबई.

(६) कारागृह उपमहानिरीक्षक, पश्चिम विभाग, पुणे

(७) कारागृह उपमहानिरीक्षक, मुख्यालय, पुणे

(८) अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, नागपूर शहर

अभिप्राय व शिफारशी :

७.१३ महाराष्ट्र पोलीस दलामध्ये सुमारे २ लाख पोलीस कर्मचारी कार्यरत आहेत. त्यांना दरवर्षी २ फटीग टोप्या विभागामार्फत देण्यात येतात. एका फटीग टोपीला ४५ सें.मी.एवढा कपडा लागतो. याप्रमाणे प्रत्येक कर्मचाऱ्याला दरवर्षी २ फटीग टोप्या याप्रमाणे ९० सें.मी.कपडा लागतो. सन १९७९ पासून कर्मचाऱ्यांना फटीग टोप्या देण्यात येत आहेत. सन १९९५-९६ मध्ये २४१८७ मीटर कपडा घेण्यात आला होता. शासनाचे सचिव व पोलीस महासंचालकांचा समावेश असलेल्या समितीने सन १९९८ मध्ये पोलीस कर्मचाऱ्यांना फटीग टोप्या ऐवजी पीक टोप्या देण्याचा निर्णय घेतला. या टोप्यांमध्ये पुठ्ठयाचा वापर करण्यात असल्याने या टोप्या पोलीस कर्मचाऱ्यांसाठी सुयोग्य नसल्याचे आढळून आल्याने कर्मचाऱ्यांना काही समस्या निर्माण होत होत्या. त्यामुळे शासनाने या धोरणाचा पुनर्विचार केला व सन २००२ पासून पुन्हा फटीग टोप्या पुरविण्याचे आदेश काढण्यात आले.

७.१४ विभागाकडे मागणी आल्यानंतर कापड खरेदी करणार, त्यानंतर टोप्या शिवणार, यामध्ये कालावधी जातो. शिवाय टोप्या शिवण्यासाठी बराच वेळ जातो. पोलिसांसाठी टोप्या अत्यावश्यक आहेत. त्याशिवाय पोलीस काम करु शकत नाही. टोप्याची आज मागणी केली तर ती लगेच मिळत नाही. यासाठी राखीव साठा ठेवावा लागतो आणि शासनाचे तसे धोरण आहे.

७.१५ पोलीस विभागात कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांचा जवळपास ९८ टक्के लोकांशी पोलिसांचा संबंध येतो. टोप्यामध्ये बदल करण्यापूर्वी त्याबाबत अभ्यास करण्यासाठी सन १९९८ मध्ये एक समिती नेमण्यात आली होती. पीक टोप्या देण्याचा निर्णय घेताना शासनाचे सचिव व

पोलीस महासंचालकाचा समावेश असलेल्या समितीने पोलिस कर्मचाऱ्यांच्या प्रतिनिधीकडे विचारणा केलेली नसल्याचे समितीचे मत आहे. त्यामुळे पीक टोप्या पोलिस कर्मचाऱ्यांसाठी सुयोग्य नसल्याचे व काही समस्या निर्माण करणाऱ्या असल्याचे समितीच्या निर्णयानंतर निदर्शनास आले व पुन्हा पीक टोप्याऐवजी फटीग टोप्या पुरविण्याचा निर्णय घेण्यात आला. परंतु हा निर्णय घेताना टोप्या शिवण्यासाठी घेण्यात येणाऱ्या कापडाचा राखीव साठा ठेवण्यात आलेला होता त्याचा वापर करण्यात येवू शकतो का याचा विचार करण्यात आला नाही असे समितीचे मत झाले. **या राखीव साठ्याच्या कापडाचा वापर न झाल्यामुळे शासनाचे नुकसान झाले आहे ही वस्तुस्थिती नाकरता येत नाही. त्यामुळे याप्रकरणी योग्य ती चौकशी करण्यात यावी व संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस ३ महिन्यात देण्यात यावा.**

७.१६ सद्रक्षणाय, खलनिग्रहणाय हे पोलिसांचे ब्रीद वाक्य आहे. समाजामध्ये अजूनही पोलिस म्हणजे तो आपल्या रक्षणासाठी आहे अशी ठाम समजूत असून नागरिकांच्या मनामध्ये पोलिसांविषयी भितीयुक्त आदर आहे. परंतु वाढती लोकसंख्या, वाढते शहरीकरण, याबरोबरच महाराष्ट्रात व विशेषत: मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर, ठाणे यांसारख्या मोठ्या शहरात रोजगार उत्पन्नाच्या निमित्ताने येणारे नागरीक यामुळे बेरोजगारीचे प्रमाणही वाढत आहे. याचा परिणाम राज्यातील कायदा व सुव्यवस्थेवर होत आहे.

७.१७ महाराष्ट्राची सध्याची लोकसंख्या साधारणत: ११ कोटी असून पोलिसांची मजूर पदे संख्या २,३४,०२५ इतकी आहे. मंजूर पदापैकी २२७९२ पदे रिक्त आहे. यामध्ये राज्यातील कारागृहाच्या संरक्षणासाठी ४६८७ पदे मंजूर असून १०२३ पदे रिक्त आहे. लोकसंख्येच्या तुलनेत पोलिसांच्या मंजूर पदांच्या संख्येचे प्रमाण अल्प आहे. त्यामुळे हे प्रमाण सुधारण्यासाठी पोलिसांची संख्या वाढणे अत्यंत आवश्यक झाले आहे. त्यातच अतिरेकी कारवाया व वाढता नक्षलवाद याची भर पडली आहे. त्यामुळे पोलिस दलात तसेच कारागृहासाठी अपुऱ्या संरक्षणा अभावी बॉम्बस्फोटातील आरोपी कारागृह व्यवस्थापनेवर हुकुमत गाजवत आहे. मनुष्यबळ वाढविणे, रिक्त असलेली पदे तात्काळ भरण्याची कार्यवाही करावी अशी समितीची शिफारस आहे व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यांत देण्यात यावी.

७.१८ पोलिस दलाचे अत्याधुनिकीकरण करताना त्यांना अद्ययावत शस्त्रास्त्रे जॅकेट्स, हेल्मेट, वाहने इत्यादी पुरविणे करीता शासनाने रु.५०५ कोटी इतका निधी सन २०११-१२

यावर्षी मंजूर केला असून त्यापैकी ४७० कोटी रुपये पोलिसांसाठी योजना अंतर्गत नियतव्यय वापरण्यात येतात. सदर पोलिस दलाच्या आधुनिकी करणासाठी नियतव्यय पुरेसा नसल्याने योजना अंतर्गत नियतव्यय वाढून देण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.

७.१९ लोकलेखा समिती ही अत्यंत महत्त्वाची अशी विधिमंडळाची संसदीय समिती आहे. परंतु येथे खेदाने नमूद करावेसे वाटते की, गृह विभागास ६-६ वेळा स्मरणपत्रे पाठवून देखिल त्यांनी स्पष्टीकरणात्मक ज्ञापने महालेखापाल यांच्याकडून संमत करुन घेण्यास उशीर केला. **लोकलेखा समिती संबंधित स्पष्टीकरणात्मक ज्ञापनाची उत्तरे विहित कालावधीत समितीस पाठविण्याची दक्षता घेण्याबाबत मुख्य सचिवांनी वेळोवेळी संबंधित सचिवांना सूचना देवूनही त्याची अंमलबजावणी होत नाही याबाबत समिती तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे तसेच यापुढील काळात गृह विभाग तसेच इतर मंत्रालयीन विभाग यांचेकडून स्पष्टीकरणात्मक ज्ञापनांची उत्तरे महालेखाकारांकडून संमत करुन विहित मुदतीत लोकलेखा समितीस प्राप्त होतील याबाबत मंत्रालयीन विभागांनी विशिष्ट दर्जाच्या अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करावी अशी समिती शिफारस करीत आहे.**

महिला व बालविकास विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी सन २००६-२००७ या वर्षाच्या नागरी अहवालामधील परि.क्र.५.१. महिला व बाल विकास विभागातील अंतर्गत नियंत्रण यंत्रणा या संदर्भात महालेखाकारांनी खालील अभिप्राय व्यक्त केले आहेत.

अंदाज पत्रकीय अंदाज तयार करणे -

८.१ अंदाजपत्रकीय अंदाज आहरण आणि संवितरण अधिकारी स्तरावर तयार करायचे असतात आणि दरवर्षी १० सप्टेंबर रोजी आयुक्तांना सादर करायचे असतात. आयुक्तांनी एकत्रीत करुन, दर वर्षी १ ऑक्टोबरला अंदाजपत्रकीय अंदाज शासनाला सादर करायचे असतात. पुण्याच्या महिला व बाल विकास विभागाच्या आयुक्तांना अंदाजपत्रकीय अंदाज सादर करण्यांत १० ते १५ दिवसांचा सिमांतिक विलंब लागला असे निदर्शनास आले. सर्व आहरण आणि संवितरण अधिकाऱ्यांनी अंदाजपत्रकीय अंदाज सादर न केल्याने, चालू वर्षाच्या सुधारीत अंदाजपत्रकीय अंदाजात १० टक्के वाढ करुन आयुक्तांनी अंदाजपत्रकाला अंतिम रुप दिल्याचे आयुक्ताने प्रतिपादन केले. अंदाजपत्रकीय तरतुदींच्या तुलनेने खर्च पुढील प्रमाणे होता.

(रुपये कोटीत)

वर्ष	मूळ अनुदान	पूरक अनुदान	एकूण अनुदान	खर्च	बचत (टक्के)
२००३-०४	६०३.९८	७५.५३	६७९.५१	५५०.३५	१२९.१६ (१९.००)
२००४-०५	५७३.२१	८.५५	५८१.७६	५१९.३८	६२.३८ (१०.७२)
२००५-०६	६२२.७६	२३.९९	६४६.७५	६१९.००	२७.७५ (४.२९)
एकूण	**१७९९.९५**	**१०८.०७**	**१९०८.०२**	**१६८८.७३**	**२१९.२९ (११.४९)**

मूळ तरतुदीपेक्षा दर वर्षी एकूण खर्च कमी होता असे दिसुन येते. अशा प्रकारे २००३-०६ कालावधीतील संपूर्ण पूरक अनुदानाची रक्कम रु.१०८.०७ कोटी अवांच्छनीय होती यावरुन सुधारीत अंदाज विश्वसनिय नव्हते याचे निदर्शक होते.

ज्ञापन :

८.२ उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला.

या विभागाखालील योजनांची अंमलबजावणी आयुक्त, महिला व बाल विकास महाराष्ट्र राज्य यांचे कडून केली जाते. या लेखाशिर्षाखालील तरतुदीच्या अनुषंगाने ते नियंत्रण

अधिकारी आहेत त्यांचे अधिनस्त राज्यातील ६९० आहरण व संवितरण अधिकाऱ्यामार्फत (D.D.O.) हा खर्च केला जातो. यापुढे आहरण व संवितरण अधिकाऱ्यांकडून अंदाज मागवून एकत्रित अंदाज तयार करण्यात येईल.

अर्थसंकल्प विषयक शक्यतो अचूक अंदाज तयार करणे, प्राप्त झालेल्या तरतूदीतून होणाऱ्या खर्चावर मासिक/त्रैमासिक/आठमाही नियंत्रण ठेवणे त्याअनुषंगाने सुधारित अंदाज करणे, खर्चमेळ करणे त्या आधारे बचतीच्या रकमाचे वेळीच अंदाज घेणे व ते प्रत्यार्पित करण्याची कार्यवाही करणे, मागील वर्षाचा प्रत्यक्ष खर्च, बचत याचा कल (Trend) विचार करुन त्या आधारे पुढील वर्षाचे अंदाज करणे अशा प्रकारचे प्रशिक्षण या विभागातील बालविकास प्रकल्प अधिकारी/जिल्हा महिला बाल विकास अधिकारी/आहरण व संवितरण अधिकारी व इतर अधिकारी यांना देण्याची व्यवस्था करण्यात यावी अशी वित्त विभागास विनंती करण्यात येईल.

संबंधित तीन वर्षाचे प्रचलीत अर्थसंकल्पीय कार्यपद्धतीप्रमाणे आठ महिन्याचा प्रत्यक्ष खर्च व आवश्यकतेच्या आधारे वित्त विभागाच्या मान्यतेने खालीलप्रमाणे सुधारीत अंदाज निश्चित करण्यात आले होते. सदर रकमा अर्थसंकल्पीय पुस्तक (White Book) मध्ये नमूद आहे. सुधारीत अंदाज व प्रत्यक्ष खर्च खालीलप्रमाणे आहे.

(रु.कोटीत)

वर्ष	**सुधारीत अंदाज**	**प्रत्यक्ष खर्च**	**बचत**	
२००३-०४	५८६.४१	५५०.३५	३६.०६	६.१४%
२००४-०५	५४८.१०	५१९.३८	२८.७२	५.२३%
२००५-०६	६४६.७३	६१९.००	२७.७३	४.२८%
एकुण	१७८१.२४	१६८८.७३	९२.५१	५.१९%

महिला व बाल विकास विभागाअंतर्गत राज्यात ६९० आहरण व संवितरण अधिकाऱ्यांमार्फत (D.D.O.) अनुदान खर्च करण्यात येते. त्यामुळे १००% अचुक खर्चाच्या किंवा बचतीच्या रकमांची माहिती वर्षाच्या शेवटच्या दिवशी म्हणजे ३१ मार्च ला मिळण्याची शक्यता कमी असते. सुधारीत अंदाज व प्रत्यक्ष खर्च याची ३ वर्षाची बचतीची सरासरी टक्केवारी ५.१९% येते. म्हणजे ९५% खर्च झालेला आहे.

१) अंदाजपत्रक तयार करतांना आहारासाठी नोंदवलेल्या १००% मंजूर लाभार्थीची संख्या लक्षात घेवून अंदाजपत्रक तयार करण्यात येते. परंतु प्रत्यक्षात आहाराचा लाभ घेणाऱ्या लाभार्थ्यांच्या संख्येनुसार खर्च होतो. परिणामी रक्कम अखर्चित राहिली.

२) एकात्मिक बाल विकास सेवा योजना व महिला व बाल विकास विभागाकडील बरीच पदे रिक्त होती. सदर पदे भरण्यात येतील असे गृहीत धरुन आर्थिक तरतूद करण्यात आली होती. परंतु सदरील पदे न भरल्यामुळे तरतूद शिल्लक राहिली. तसेच रिक्त पदाच्या ५० टक्के, तरतुद करतांना गृहित धरावयाची असल्याने त्याप्रमाणे तरतूद करण्यात आली होती. अंगणवाडी सेविकेची ७००० व मदतनिसाची ११२७० पदे रिक्त होती. तसेच वर्ग-१, २, ३ ची पदे रिक्त असल्याने तरतूद खर्च होऊ शकली नाही.

३) महिला व बाल विकास अंतर्गत जिजामाता महिला विमा आधार योजना, बालसमृद्धी योजना याशिवाय वैयक्तिक लाभाच्या व सामुहिक लाभाच्या योजनांना लाभार्थ्यांचा प्रतिसाद न मिळाल्यामुळे बचत झाली आहे.

रु.१०८.०७ कोटी पुरक मागणीच्या अनुषंगाने स्पष्ट करण्यात येते की, नियमित स्वरुपाची नसलेली तातडीची खर्चाची बाब उद्‌भवली तर त्यासाठी आकस्मिकता निधीतुन अग्रीम घेतला जातो व त्याच्या भरपाईसाठी पुरवणी मागणी सादर केली जाते. तसेच अकल्पीत/अतिरीक्त खर्चासाठी पुरवणी मागणीद्वारे निधी प्राप्त करुन घेतला जातो. अशा खर्चाचे प्रस्ताव उपशिर्षनिहाय केले जातात. एकूण अनुदानातील बचत आठमाही सुधारित अंदाज करतांना व वर्षाच्या शेवटी लक्षात येते त्यावेळी त्या प्रत्यार्पित करण्यात येतात. आवश्यकता विचारात घेऊनच पुरवणी मागणीचे प्रस्ताव सादर करण्याची काळजी घेण्यात येईल.

आयुक्तालयाचे परिपत्रक क्रमांक मबाविआ/नियो/का-२/२०११/२६८४, दिनांक १५/६/२०११ अन्वये अधिनस्त कार्यालयांना सुधारित अंदाजपत्रके व रक्कमा प्रत्यावर्तीत करणे याबाबत योग्य ती दक्षता घेण्याबाबत व चुकीची माहिती दिल्यामुळे कमी जास्त खर्च वर्ष अखेरीस झाल्यास संबंधितास जबाबदार धरण्यात येऊन प्रशासकीय कार्यवाही करण्यात येईल असे कळविण्यात आले आहे.

वर्षाच्या शेवटच्या दिवशी निधीचे प्रत्यार्पण -

८.३ शासनाच्या अंदाजपत्रक नियमावलीच्या परिच्छेद १७३ प्रमाणे, अंदाजपत्रकीय तरतूदीप्रमाणे खर्च असावा आणि जर बचत प्रकरणी, तो वेळेवर प्रत्यार्पित करावा. अंतिम सुधारीत अनुदाने (FMG) तयार करण्यापूर्वी, २००३-०६ कालावधीत आयुक्तांनी तरीही, एकूण रक्कम रु.२४८.६७ कोटी ३१ मार्च रोजी प्रत्यार्पित केले. अंतिम सुधारीत अनुदाने तयार करुन सुद्धा, आणखी रु.२३.८८ कोटी प्रत्यार्पित केलेच नाहीत. त्यामुळे, रकमांचा विनियोग इतर योजनांवर करता आला नाही. अधिनस्थ कार्यालयानी बचतीच्या प्रत्यार्पणाला विलंब केल्याने, आयुक्तांना, (म.आ.बा.वि.) बचत वेळेवर (१५ मार्च) प्रत्यार्पित करता आली नव्हती. प्रधान सचिवाने म्हटले (ऑगस्ट २००७) की मासिक खर्चाचे संनियंत्रण करुन आणि अखर्चित अनुदानाला जास्त प्रभावी करुन विभागांतील संनियंत्रण (Monitoring) यंत्रणा गतिमान (Gear up) करण्यांत येईल.

ज्ञापन :

८.४ उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला.

आयुक्तालयाचे अधिपत्याखालील ६९० आहरण व संवितरण अधिकारी व त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालये कार्यरत असून त्यांच्या मागणीप्रमाणे आर्थिक तरतूद करण्यात येते. बऱ्याचदा अधिनस्त कार्यालयाकडून तरतूद खर्च झाली नाही तर ३१ मार्च अखेरीस तरतूद समर्पित करण्यात येते. शासनाकडूनही तरतूद उशिरा प्राप्त झाल्याने खर्च वेळेत होत नाही. त्याचप्रमाणे कोषागार कार्यालये उशिरा देयके स्विकारत नाही त्यामुळेही खर्च होत नाही.

शासनाच्या अंदाजपत्रक नियमावलीच्या परिच्छेद १७३ प्रमाणे, अंदाजपत्रकीय तरतुदीप्रमाणे खर्च असावा अणि जर बचत प्रकरणी, तो वेळेवर प्रत्यार्पित करावा. अंतिम सुधारीत अनुदाने (FMG) तयार करण्यापूर्वी, २००३-०६ कालावधीत आयुक्तांनी तरीही, एकूण रक्कम रु.२४८.६७ कोटी ३१ मार्च रोजी प्रत्यार्पित केले. यासंदर्भात विभागातील संबंधित वर्षाच्या नस्तीवरील उपलब्ध कागदपत्रांची तपासणी केली असता २००३-०४, २००४-०५, २००५-०६ या तीन वर्षात रु.२५८.४१ कोटी प्रत्यार्पित केल्याचे आदेश काढले आहेत. मंजूर तरतूद व रु.२१३.४८ कोटी बचत आयसीडीएस अंतर्गत आहार खर्चात आहे. कारण सुरुवातीला तरतूद करतांना १००% लाभार्थी विचारात घेऊन केली जाते. परंतु उपस्थिती कमी झाल्यामुळे खर्चात बचत होते. तसेच कधी कधी बाजारांतील आहार वस्तूचे दर वाढल्यामुळे पुरवठादार अचानक

पुरवठा बंद करतात. त्यावर निर्णय व्हायला वेळ लागतो. त्यामुळे सुद्धा आहार खर्चात बचत होते. आर्थिक वर्षात ३१ मार्चपर्यंत खर्च न झाल्यास सदर तरतुदी आपोआप व्यपगत होतात. तसेच प्रत्यार्पित करण्यात आलेल्या तरतुदीसुद्धा ३१ मार्च नंतर खर्चासाठी उपलब्ध/प्राधिकृत नसतात.

२००२-०६ या तीन वर्षातील एकूण अनुदान रु.१९०८.०२ कोटी असून त्याचेशी वर नमूद केलेल्या कारणामुळे प्रत्यार्पीत न करता आलेल्या रु.२३.८८ कोटीची टक्केवारी काढल्यास ती १.२५% इतकी येते. आयुक्तालयाचे परिपत्रक क्रमांक मबाविआ/नियो/का-२/२०११/२६८४ दि.१५/६/२०११ अन्वये अधिनस्त कार्यालयांना सुधारीत अंदाजपत्रके व रक्कमा प्रत्यावर्तीत करणे याबाबत योग्य ती दक्षता घेण्याबाबत व चुकीची माहिती दिल्यामुळे कमी जास्त खर्च वर्ष अखेरीस झाल्यास संबंधितास जबाबदार धरण्यात येऊन प्रशासकीय कार्यवाही करण्यात येईल असे कळविण्यात आले आहे. भविष्यात याबाबत दक्षता घेण्यात येईल.

आकस्मिक निधितून रकमांचे आहरण -

८.५ अंदाजपत्रक नियमावलीच्या परिच्छेद १९० प्रमाणे, फक्त अकल्पित (unforeseen) खर्चासाठी आकस्मिक निधितुन अग्रिम देण्यात यावा. अंगणवाडी कर्मचाऱ्यांना दिवाळीची "भाऊबीज भेट" प्रदाने करण्यासाठी अनुक्रमे २००३-०४, २००४-०५ आणि २००५-०६ वर्षात रु.४.४९ कोटी, रु.४.६३ कोटी आणि रु.६.२० कोटीचे प्रशासकीय विभागांनी आकस्मिक निधितून आहरण केले. हा नियमित बाबींचा खर्च होता तर विभागांनी अंदाजपत्रकांत निधिची तरतूद करावयास हवी होती.

विभागाने म्हटले (जून २००७) की वित्त विभागाने अंगणवाडी कर्मचाऱ्यांना भाऊबीज भेट या योजनेला नियमित खर्चाची बाब म्हणून मंजूरी दिली नाही म्हणून अंदाजपत्रकांत तरतूद करण्यांत आली नव्हती. उत्तर समर्थनीय नव्हते, कारण या योजनेवर १९९५-९६ पासून दरवर्षी खर्च करण्यांत येत होता आणि म्हणून ही अकल्पित खर्चाची बाब नव्हती.

पौगंडावस्थेतील मुलीसाठी पोषण कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी आणखीन, आकस्मिक निधितून रु.१.७४ कोटीची मंजूरी (फेब्रुवारी २००६) देण्यांत आली. आयुक्ताने फक्त रु.१६.७४ लाख खर्च केले आणि ३१ मार्च २००६ मध्ये रु.१.५७ कोटी प्रत्यार्पित केले. अशा प्रकारे, प्रत्यक्ष आवश्यकते शिवाय आणि अंदाज पत्रक नियमावलीच्या तरतूदींचा एकूणच अनादर करीत आकस्मिक निधितुन आहरण केले गेले.

ज्ञापन :

८.६ उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला.

अंगणवाडी कर्मचाऱ्यांना सन १९९५-९६ पासून भाऊबीज भेट विशेष बाब म्हणून देण्यात येत होती. अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना देण्यात भाऊबीज भेट ही खर्चाची नियमित बाब नसल्याने अर्थसंकल्पात तरतूद करण्यात येत नव्हती. तथापि, याबाबत वित्त विभागाच्या सूचनेनुसार सदर निधी अर्थसंकल्पित करुन घेण्यासाठी विभागाने अंगणवाडी कर्मचाऱ्यांना दरवर्षी नियमितपणे भाऊबीज भेट देण्याबाबतच्या प्रस्तावास मान्यता देण्याकरीता मंत्रिमंडळ प्रस्ताव दिनांक १० मे, २००५ रोजी शासनास सादर केला होता. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने विविध विभागांचे अभिप्राय घेऊन मंत्रिमंडळाच्या दिनांक १६ मे, २००७ च्या बैठकीनुसार अंगणवाडी केंद्रातील मानधनी कर्मचाऱ्यांना दिवाळीपूर्वी देण्यात येणारी भाऊबीज भेट यापुढे देण्यात येऊ नये, असा निर्णय घेण्यात आलेला होता.

तथापि, सन १९९५-९६ पासून भाऊबीज भेट दिली जात असल्याने यासाठी अर्थसंकल्पात तरतूद नसल्याने व ही खर्चाची नवीन बाब असल्याने आकस्मिक निधीतून अग्रीम घेऊन खर्च करण्यात येत होता. प्रत्येक वर्षी संघटनेकडून मोर्चा/उपोषण इत्यादी मार्गाने मागणी केली जात असे व ऐनवेळेस वरिष्ठ स्तरावरुन मान्यता दिली जात असल्याने याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी प्रस्ताव पुन्हा मंत्रिमंडळासमोर सादर केला असता दिनांक २५ ऑक्टोबर, २००७ च्या बैठकीतील निर्णयानुसार प्रत्येक वर्षी भाऊबीज भेट देण्याचा धोरणात्मक निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार सन २००७-०८ या आर्थिक वर्षापासून यासाठी अर्थसंकल्पात तरतूद करण्यात येत आहे.

पौगंडावस्थेतील मुलीसाठी पोषण कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी आकस्मिक निधीतून रु.१.७४ कोटीची मंजूरी (फेब्रुवारी २००६) देण्यात आली. आयुक्ताने फक्त रु.१६.७४ लाख खर्च केले आणि ३१ मार्च २००६ मध्ये रु.१.५७ कोटी प्रत्यार्पित केले. अशा प्रकारे, प्रत्यक्ष आवश्यकते शिवाय आणि अंदाज पत्रक नियमावलींच्या तरतूदींचा एकूणच अनादर करीत आकस्मिक निधितून आहरण केले गेले असे महालेखापालांनी नमूद केले आहे.

याबाबत केंद्र शासनाची किशोरवयीन मुलींसाठी पोषण आहार कार्यक्रम ही योजना २००५-०६ मध्ये नव्याने राज्याच्या अर्थसंकल्पात समाविष्ट करावयाची होती. ही योजना केंद्र शासनाने ठरविलेल्या नांदेड व नागपूर जिल्ह्यातील ११ ते १९ वयोगटातील ३५ किलो पेक्षा

कमी वजन असलेल्या मुलींसाठी प्रायोगिक तत्त्वावर सुरु करावयाची होती. त्यामुळे तातडीने रु.१.७४ कोटी आकस्मिकता निधीतून अग्रीम दिनांक १६.२.२००६ च्या आदेशान्वये मंजूर करण्यात आला होता. अंगणवाडी सेविकेने लाभार्थींची निवड करुन त्यास ग्रामसभेची मान्यता घ्यावयाची होती. वेळेअभावी व लाभार्थी निवड प्रक्रिया यामुळे पूर्ण खर्च होऊ शकला नाही. जरी रु.१.७४ कोटी आकस्मिकता निधी अग्रीम मंजूर केला तरी फक्त रु.१६.७४ लक्ष खर्च झाले. ही नवीन योजना असल्याने मार्च २००६ च्या विधानमंडळाच्या अधिवेशनात लाक्षणिक पूरक मागणीद्वारे विधानमंडळास सादर करण्यात आली होती. ही योजना नवीन असल्याने प्रचाराला वेळ पुरेसा नव्हता. लाभार्थी विशिष्ट प्रवर्गातील (वय ११ ते १९ वजन ३५ किलो पेक्षा कमी) असल्याने प्रत्यक्ष लाभार्थी कमी वेळात शोधणे शक्य झाले नाही. तसेच या योजनेचा शासन निर्णय १६ फेब्रुवारीला निर्गमित झाला त्या काळात मुलींच्या परिक्षा असल्याने देखील वजन करुन प्रत्यक्ष लाभार्थी शोधणे अडचणीचे झाले तसेच मुलीसुद्धा वजन करण्यास पुढे येत नव्हत्या त्यामुळे फक्त वजन करण्यासाठी वजनकाटे खरेदी करण्यात आले.

खर्चाचा ताळमेळ -

८.७ अंदाजपत्रक नियमावलीच्या परिच्छेद १५७ प्रमाणे २००५-०६ वर्षातील रु.५५२.२५ कोटी खर्चाचे ताळमेळ महालेखापाल (ले.व.ह.) कार्यालयांच्या अभिलेख्यांशी मे २००७ अखेर पर्यंत, आयुक्त एकात्मिक बाल विकास प्रकल्प यांनी केला नाही. त्यामुळे विभागाने केलेल्या खर्चाच्या अचूकपणाची सुनिश्चिती करता आली नाही. आयुक्त एकात्मिक बाल विकास प्रकल्प यांनी म्हटले (ऑगस्ट २००७) की त्या वर्षांतील अतिवृष्टीच्या पाण्याने पूर आला आणि कार्यालयाचे अभिलेख नष्ट झाले म्हणून ताळमेळ करता आला नाही. तरी त्यांनी म्हटले की नजीकच्या काळांत ताळमेळ करण्यात येईल.

ज्ञापन :

८.८ उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला.

२२३५ प्रधानशिर्षाचे फेब्रुवारी २०११ अखेर पर्यंत व प्रधानशिर्ष २२३६ चे १२/२०१० अखेरपर्यंत खर्चमेळाचे काम पूर्ण केले आहे. सोबत २२३५ च्या ४/१० ते २/११ पर्यंतच्या T.E.पत्र क्र.१२४६ व १२४७ दिनांक ९.६.२०११ अन्वये महालेखाकार नागपूर व मुंबई यांना पाठविण्यात आल्या आहेत.

राज्य कोषागार नियमावलीचे अनुपालन :-

रोकड वहीचे सुस्थितीत ठेवणे -

८.९ लबाडी आणि रोखीचे दुर्विनियोग टाळण्यासाठी विहित केलेल्या नियमावली आणि पद्धतीचे अनुसरण आहरण आणि संवितरण अधिकाऱ्यांनी मोठ्या प्रमाणात दुर्लक्षित केले असे लेखा परीक्षणाच्या छाननीत उघडकीस आले यावरुन असे निर्देशित होते की विभागाचे रोकड व्यवस्थापन खाली चर्चिल्याप्रमाणे कमकुवत होते.

- म.को.नियमावलीच्या नियम ९८ (२) (iv) अन्वये, प्रत्येक महिन्याच्या शेवटी तपशीलवार शिल्लक सुनिश्चित करण्यासाठी आणि कोणत्या कालावधीपासून शिल्लक पडून आहे यासाठी रोख शिलकेचा तपशीलवार गोषवारा तयार करावयाचा असतो. ४६ पैकी ३० वहीत तपशीलवार अंतिम शिलकेचा गोषवारा तयार केला नव्हता. अशामुळे असंवितरीत रकमा बऱ्याच कालावधी पासून पडून आहे याची सुनिश्चिती करण्यासाठी तेथे कोणतीही यंत्रणा नव्हती.
- म.को.नि.च्या नियम ९८ (२) (iii) प्रमाणे, अंतिम शिल्लक प्रत्यक्ष रोख शिलकेशी जुळते या कारणास्तव, प्रत्यक्ष रोकड वह्यांची तपासणी दरमहा करायची असते. ४६ पैकी २५ कार्यालयांनी रोकड वहीच्या शिलकेची प्रत्यक्ष तपासणी केली नाही. २५ कार्यालयांपैकी, आणखी असे निदर्शनास आले की आयुक्तालय, एकात्मिक बाल विकास प्रकल्प नवी मुंबई, जिल्हा महिला आणि बाल विकास अधिकारी, पुणे आणि जिल्हा महिला आणि बाल विकास अधिकारी, अमरावती यांनी ३१ मार्च २००६ अखेर रु.७.३७ कोटीची प्रचंड शिल्लक ठेऊन घेतली होती. २००३-०६ कालावधीत ४६ पैकी ३१ कार्यालय प्रमुखानी रोकड शिलकेची अनपेक्षीत तपासणी केली नव्हती असे निदर्शनास आले.
- म.को.नि.च्या नियम ९८ प्रमाणे, रोकड वहीतील सर्व नोंदी दुरुस्ती नोंदीसहीत सर्व व्यवहारांचे व्यवस्थित लेखांकन केले आहे आणि कोणतीही अनधिकृत सुधारणा/दुरुस्ती केली नाही हे सुनिश्चित करण्यासाठी आ.आणि सं.अ/कार्यालय प्रमुखाने साक्षांकित करायच्या असतात. ४६ पैकी २१ आ.आणि सं.वि.अ/कार्यालय प्रमुखांनी रोकड वहीतील नोंदी/केलेल्या दुरुस्त्या साक्षांकित केल्या नव्हत्या. असे निदर्शनास आले.

- बॉम्बे वित्तीय नियमावलीच्या नियम ५१ नुसार रोखपालाकडून प्रतिभूति बंधपत्र घ्यायचे होते. चांचणी तपासणी केलेल्या ४६ पैकी २९ कार्यालयांनी प्रतिभूति बंधपत्र घेतले नसल्याचे निदर्शनास आले.

ज्ञापन :

८.१० उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला.

पुणे व अमरावती जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांनी ३१ मार्च, २००६ अखेर प्रचंड शिल्लक ठेवून घेतली असा नागरी अहवालात आक्षेप आहे. प्रत्यक्षात ही रोख रक्कम नव्हती. तेवढ्या रकमेचे कोषागाराने दिनांक ३१.३.२००६ ला दिलेले धनादेश होते. ते धनादेश बँकेत सादर करुन संबंधितांना अदा करण्यासाठी धनाकर्ष (Draft) रु.६.६९ कोटी अदा करण्यात आले. तसेच पुणे जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांच्या अधीनस्त स्वयंसेवी संस्था लाभार्थी रु.०.३२ कोटी अदा केले. तसेच अमरावती जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांचे अधिनस्थ स्वयंसेवी संस्थांना सामुहिक विवाह योजना व इतर योजनासाठी रु.०.३६ कोटी धनाकर्षाद्वारे अदा केले.

आयुक्त, महिला व बाल विकास विभाग यांचेकडून सर्व आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना याबाबत सुचना देण्यात आलेल्या आहेत. त्यांचे सर्व अधिकाऱ्यांकडून पालन करुन घेण्यात येईल.

तपशीलवार आकस्मिक देयके सादर करणे -

८.११ म.को.नि.च्या नियम ३०३ प्रमाणे, संक्षिप्त आकस्मिक देयकांवर आहरण केलेल्या देयकांचे तपशीलवार देयके, आहरण केलेल्या एक महिन्याचा आत, सादर करायची असतात. चाचणी तपासणी केलेल्या २७ कार्यालयांपैकी, तीन कार्यालयांनी जानेवारी १९९८ ते नोव्हेंबर २००६ कालावधीत १७ संक्षिप्त देयकांवर आहरण केलेल्या रु.१.९७ कोटीची तपशीलवार देयके सादर केली नव्हती. म्हणून, रकमांचे प्रत्यक्ष वापर सुनिश्चित करता आला नाही. आयुक्त एकात्मिक बाल विकास सेवाने म्हटले (मार्च २००७) की एका संक्षिप्त बिलावर/देयकांवर/आहार आकारांसाठी आहरण केलेल्याचे (मार्च २००३) तपशीलवार बीले सापडत नव्हती. अशा प्रकरणांत शासकीय रकमांचे दुर्विनियोगाचे धोक्यांची शक्यता नाकारता येऊ शकत नाही

(Ruled out). प्रधान सचिवाने म्हटले (ऑगस्ट २००७) की या बाबींची बारीक तपासणी (अन्वेषण) करण्यांत येईल.

पाच कार्यालयात, १२ संक्षिप्त देयकांवर जून २००१ ते सप्टेंबर २००६ कालावधीत आहरण केलेल्या रु.२४.५७ कोटीची तपशीलवार देयके तीन ते ४१ महिने विलंबाने सादर करण्यात आली. आणखीन, प्रधान मंत्री ग्रामोदय योजना अंतर्गत अतिरिक्त पोषण (nutritious). अन्न पुरवण्यासाठी, ३० मार्च, २००२ रोजी संक्षिप्त देयकांवर रु.१९.७९ कोटी आहरण केल्यापैकी अखर्चित रक्कम रु.२.९३ कोटी १४ ते २६ महिन्यांच्या विलंबाने शासनाला भरणा केला.

ज्ञापन :

८.१२ उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला.

एकात्मिक बाल विकास सेवा योजनेची रु.१.९० कोटीचे डी.सी.बीलाचा निपटारा केल्याचे महालेखाकार यांनी त्यांचे पत्र क्र.डी.सी.४/आ.बी.ए.मद/मु.शी./महिला व बालविकास आयुक्तालयाच्या अधिनस्त प्रलंबित १३ संक्षिप्त देयकापैकी १ याचे पत्र क्रमांक-८३८ दिनांक १५/०६/२०११ रोजी महालेखाकार यांना सादर असल्यास त्या कार्यालयाची संक्षिप्त देयके पारित केली जात नसल्याने प्रलंबित डी.सी.बिलाबाबत नियंत्रण ठेवले जाते.

सदर संक्षिप्त देयकावर काढलेल्या रकमा पैकी अखर्चित रकमा विलंबाने शासनाकडे भरणा करणाऱ्या अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करुन कारवाई करण्यात येईल.

विलंबासाठी जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर कार्यवाही करण्यासाठी शासनाकडून आयुक्त, महिला व बाल विकास यांना प्रधान सचिव, महिला व बाल विकास विभाग यांचे स्तरावरुन कळविण्यात आले आहे.

देयकांचे संवितरण-

८.१३ म.को.नि.च्या नियम ९८(i) च्या तरतुदीनुसार, सर्व रकमांचे व्यवहार झाल्यावर लगेच रोकड वहीत नोंदविले गेले पाहिजेत आणि तीन महिन्यांच्या आंत त्याचे संवितरण करावयास हवे जर तसे झाले नाही तर त्या रकमा कोषागारांत जमा कराव्या लागतात. संवितरण करण्याआधी मार्च २००५ ते एप्रिल २००७ पर्यंत एकूण रु.९८.७३ लाखाच्या दर्शनी हुंड्या आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा ने राखून ठेवल्या. तसेच, जिल्हा महिला आणि बालविकास विभाग औरंगाबाद ने मुलींसाठी विद्यावेतन (stipend) आणि स्वयंरोजगार योजनेतील

महिलाना सहाय्य देण्यासाठी मे २००४ आणि जून २००६ दरम्यान आहरण केलेल्या ७८ दर्शनी हुंड्या (रु.०.४१ लाख) मे २००७ अखेर पर्यंत संवितरीत केल्या नाहीत.

जिल्हा महिला आणि बालविकास अधिकारी औरंगाबादने म्हटले (मे २००७) की दर्शनी हुंड्या प्राप्त करण्यासाठी लाभार्थी आले नाहीत. उत्तर समर्थनीय नाही कारण, जिल्हा महिला आणि बालविकास अधिकाऱ्याने हे सुनिश्चित करायचे आहे की रकमा लाभार्थींना संवितरीत कराव्यात. शिवाय, रकमा या कालावधीत बँकात पडून राहील्या. आयुक्त महिला आणि बालविकास ने मान्य केले (ऑगस्ट २००७) की जिल्हा महिला आणि बालविकास अधिकाऱ्याने संबंधीत संस्थाना लाभार्थीच्या वाटपासाठी पाठवायला हव्या होत्या.

ज्ञापन :

८.१४ उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला.

मार्च २००६ मध्ये ७८ हुंड्या (Draft) काढण्यासाठी रु.०.४१ लक्षचा कोषागाराचा धनादेश वेळीच हुंड्या धनाकर्षासाठी बँकेत सादर केला नाही. त्यामुळे धनादेश व्यपगत झाला. त्यानंतर महालेखापालाच्या मान्यतेने पुन्हा देयक सादर केले व कोषागारातून मिळालेला धनादेश बँकेत सादर करुन वेगवेगळ्या लाभार्थीच्या नांवे रु.०.४१ लक्ष चे धनाकर्ष दि.२३.११.२००७ पर्यंत अदा केले. एकात्मिक बाल विकास सेवा योजनेकडून एकूण रु.९८.७३ लाखाच्या दर्शनी हुंड्या रोखून ठेवण्यात आलेल्या होत्या. प्रकल्पांना पुरवठा करणारे स्टील भांडीसेट व प्री स्कुल किट यांचे पुरवठादार हे शासनाचे एजन्सी घेतलेले म.को.क.फे.लि. व जेल डिपार्टमेंट औरंगाबाद यांचेकडून काही तांत्रिक कारणामुळे पुरवठा करण्यास विलंब झाल्यामुळे खालील हुंड्यांचे वितरण न करता त्या आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना यांच्याकडून रोखून ठेवण्यात आलेल्या असल्या तरी वितरकदाराने पुरवठा केल्यानंतर अधिक्षक, मध्यवर्ती कारागृह औरंगाबाद यांना एप्रिल २००७ मध्ये वितरीत करण्यात आलेल्या आहेत.

डी.डी.नं.३२५५५६	रु.४३.५४ लाख
डी.डी.नं.३२९५५३	रु.५१.२३ लाख
डी.डी.नं.५०९०२२	रु.३.९६ लाख
	रु.९८.७३ लाख

प्रापण आणि गुणवत्ता नियंत्रण पद्धत :-

साहित्याच्या प्रापणासाठी दरांना अंतिमरुप देणे -

८.१५ आयुक्त, महिला आणि बालविकास विभाग, पुणे ने शासकीय संस्थासाठी किराणा वस्तु, भाजीपाला आणि स्वच्छताविषयक वस्तु खरेदी केल्या. त्याचवेळी आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा, नवी मुंबई ने औषधी व्यवसाय पेटी (medical Kit) शाळापूर्व कीटस्, स्टीलची भांडी, वजनाचे मशीन, पाणी शुद्ध करण्याची साधने, खेळाचे किटस्, पांढरे फळे (Board) इ.अंगणवाड्यांच्या वापरासाठी खरेदी केल्या.

आयुक्त, महिला व बालविकास विभाग, पुणे च्या अधिपत्याखालील जिल्हा महिला आणि बालविकास अधिकाऱ्याच्या स्तरावर निविदा पद्धतीचा अवलंब करुन २००३-०५ कालावधीत विविध संस्थासाठी वस्तु खरेदी केल्या. आहार विषयक (dietary) आणि स्वच्छता विषयक वस्तू शासकिय संस्थाना पुरवठा करण्यासाठी इतर विभागांकडून/संस्थाकडून मागविलेल्या दरांच्या जिल्ह्यांकरीता दर सूची निश्चित करावी, अशा सूचना आयुक्त, महिला व बालविकास विभाग यांना तिमाही आधारावर घेण्यात यावा आणि जिल्हा महिला आणि बालविकास अधिकाऱ्यांनी आपल्या जिल्ह्यापुरती दर सूची सुधारीत करावी. या वस्तुंचा शासकीय संस्थाना पुरवठा करण्यासाठी, घाऊक किंमती तपासून पुढील तिमाहीसाठी मुदतवाढ द्यावी. चांचण केलेल्या नऊ पैकी आठ जिल्हा महिला आणि बाल विकास विभागांनी तरीही, महासंघाला दरांची मुदतवाढ देतांना वरील पद्धतीचे अनूसरण केले नाही असे निदर्शनास आले.

आयुक्त महिला आणि बालविकास ने म्हटले (मे २००७) की अधिनस्थ कार्यालयांना विहित खरेदी पद्धतीचे अनुसरण करावे अशा आवश्यक सूचना जारी करण्यांत येतील.

ज्ञापन :

८.१६ उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला.

आयुक्तालय स्तरावरुन निर्गमित करण्यात आलेल्या ३ महिन्या करताच्या दर निश्चितीच्या दिनांक १३ जुलै, २००५ चे आदेशामध्ये जिल्हा कार्यालयांना स्पष्ट सूचना देण्यात आलेल्या होत्या की, महाराष्ट्र स्टेट कन्झ्यू.फेडरेशन लि. यांच्या सोबत करारनामा करतांना आयुक्तालयामार्फत निश्चित करण्यात आलेले दर घाऊक बाजारातील दरांशी सुसंगत आहेत याची खात्री करावी त्याचप्रमाणे यापुढील दर ३ महिन्यांनी दर निश्चिती करतांना जिल्हा

महिला व बाल विकास अधिकारी, यांनी शासन निर्णयातील तरतूदीनुसार दर निश्चितीची कार्यवाही करावी.

एक वर्षाच्या कालावधीनंतर पुढील मुदतवाढीकरीता फेडरेशनच्या पुरवठ्याबाबत व दर निश्चितीतील अडचणी, दर निश्चिती ही एक वर्षा करीता असावी, याबाबतचे अभिप्राय जिल्हा कार्यालयाकडून प्राप्त करुन घेऊन, शासनास सादर करण्यात आलेले आहेत. सन २००९-१० करीता महाराष्ट्र स्टेट कन्झ्यू.फेडरेशन लि.मुंबई या संस्थेस शासकीय संस्थांना अन्नधान्य व इतर जीवनावश्यक साहित्य पुरवठा करण्याबाबतची मुदतवाढ शासन निर्णय दि.२०.८.२००९ नुसार देतांना जिल्हा कार्यालयांना, दिनांक ८.२.२००५ चे शासन निर्णयात नमूद पुरवठा करण्याबाबतच्या अटी व शर्ती त्याच राहातील याबाबत सुचना पत्र क्र.७४८४, दि.१.९.२००९ अन्वये देण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार जिल्हा कार्यालयांकडून कार्यवाही करण्यात येते. त्याचप्रमाणे या विभागांतर्गत असणाऱ्या शासकीय संस्थांना अन्नधान्य व साहित्य पुरवठा करण्याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्याच्या दृष्टीने शासन पत्र क्र.१५.९.२००९ च्या अनुसार जिल्हा कार्यालयांकडून पुरवठ्याबाबतचे अभिप्राय, अनुसरावयाची कार्यपद्धती याबाबत आयुक्तालयाचे पत्र दि.५.१०.२००९ अन्वये अभिप्राय मागविण्यात आले होते. त्यानुसार जिल्हा कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या अभिप्रायानुसार, शासनास पुढील पुरवठ्याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्याच्या दृष्टीने आयुक्तालयाकडून पत्र क्र.९७४३/दि.५.१२.२००९ अन्वये अभिप्राय सादर करण्यात आलेले आहेत. यात साहित्याचा दर्जा सुधारण्याच्या दृष्टीने, पुरवठा वेळेवर होण्याच्या दृष्टीने व दर निश्चिती करण्याच्या कार्यपद्धतीत सुधारणा याबाबत आयुक्तालय स्तरावरुन काही सुधारणा प्रस्तावित करण्यात आलेल्या आहेत, त्या खालीलप्रमाणे आहेत:-

फेडरेशन संस्थेकडून यापुढील कालावधीत पुरवठा झाल्यास, पुरवठा करण्याच्या कार्यपद्धतीत खालील अटींचा समावेश करण्यात यावा.

१. खरेदी करावयाच्या अन्नधान्ये खाद्योपयोगी व नित्योपयोगी वस्तुंचा दर्जा व गुणवत्ता सातत्याने चांगले राहील याची दक्षता घ्यावी.
२. पुरवठा केलेल्या मालाची किंमत बाजारभावापेक्षा जास्त असू नये.
३. संस्थांना लागणारे दूध शासकीय डेअरीमधुन घेण्यात यावे मात्र संस्थेमध्येच दुध पोच करण्याची सोय त्या जिल्ह्यातील प्रतिनिधी मार्फत करण्यात यावी.

४. ब्रँडेड वस्तु उदा.निरमा, साबण पावडर, टुथपेस्ट, टुथपावडर, चहा पावडर इ.वस्तूंच्या पुरवठ्याकरीता संबंधित कंपनीच्या अधिकृत विक्रेत्याकडून संपर्क साधून सर्व जिल्ह्याकरीता एकच दर करण्यात यावेत.

५. शासन निर्णयात नमूद केलेल्या ५ यंत्रणा किंवा त्यापैकी किमान ३ यंत्रणांकडून घाऊक बाजारपेठेतील दर प्राप्त करुन व प्राप्त दराने दर निश्चिती करावी.

६. प्रत्येक जिल्हा स्तरावर त्यांचे स्थानिक प्रतिनिधी नेमून त्यांचे मार्फत पुरवठा करण्यात यावा, जेणेकरुन अन्नधान्य पुरवठा व आवश्यक वस्तुंचा पुरवठा नियमित वेळेवर होऊ शकेल.

७. सदरची दर निश्चिती एक वर्षा करीता असावी.

वरील प्रमाणे कार्यपद्धती अंवलंबल्यास शासकीय संस्थांना दर निश्चिती करण्यास व दर निश्चितीस अंतिम रुप देणे, सोयीस्कर होणार आहे याबाबत धोरणात्मक निर्णय शासन स्तरावरुन कार्यवाही सुरु आहे.

अन्नाची गुणवत्ता नियंत्रणे-

८.१७ एकात्मिक बाल विकास सेवा नियमावलीत विहित केलेल्या प्रमाणकाप्रमाणे लाभार्थीना देण्यात येणाऱ्या पोषण अन्नात ८-१० ग्राम प्रथिने असावीत आणि ३०० उष्मांक असले पाहिजेत. प्रथिने आणि उष्मांकाची सुनिश्चिती करण्यासाठी महिन्यांतून कमीत कमी दोनदा अन्नाचे नमुने शासकीय प्रयोग शाळेतून चाचणी करुन घ्यावेत.

चांचणी तपासणी केलेल्या १८ पैकी दोन बालविकास प्रकल्प सेवा कार्यालयातील (घाटकोपर आणि ठाणे) २००३-०६ कालावधीतील अन्न नमुन्यांच्या चांचणी तपासणीच्या निष्कर्षात निदर्शनास आले की, मुलांना पुरवठा केलेल्या अन्नाचा दर्जा निकृष्ट (Substandard) होता. या दोन बालविकास प्रकल्प सेवा कार्यालयांत २००३-०६ कालावधीत रु.६५.७३ लाखाचा खर्च करण्यांत आला. ऑक्टोबर २००५ पासून, शिजविलेल्या अन्नाचे नमुने चाचणी तपासणी करण्यासाठी स्वीकारणे शासकीय प्रयोगशाळेने बंद केले कारण प्रयोग शाळेला नमूने पोहोचेपर्यंत ह्या नमून्यांचा दर्जा खालावत होता म्हणून ही पद्धत चुकीची होती असे निष्पन्न झाले होते. भारत सरकारने आयुक्त एकात्मिक बालविकास सेवांना सुचविले की अन्न नमुन्यांच्या चांचण्याचे विकेंद्रिकरण करण्यांत यावे. जेथे पुरवठादार अन्न शिजवितो त्या

जागेवर अन्नाची गुणवत्ता सुनिश्चित करण्यासाठी विभागिय अधिकाऱ्यांनी अनपेक्षीत (Surprise) भेटी द्याव्यात.

सर्व जिल्हापरिषदांचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी (Dy CEOs) आणि नागरी बाल विकास प्रकल्प अधिकाऱ्यांना, पुरवठा केलेल्या अन्नाची गुणवत्ता आणि प्रमाणाचे संनियंत्रण (monitoring) करण्यासाठी आणि पुरवठ्याच्या वेळा निश्चित करण्यासाठी अंगणवाड्यांत माता समित्या स्थापन करण्यास आयुक्त एकात्मिक बालविकास सेवांनी सूचना दिल्या (सप्टेंबर २००६). तरीही असे निदर्शनास आले की ७६,२९१ पैकी २६,४१५ (३५ टक्के) अंगणवाड्यात ऑगस्ट २००७ पर्यंत माता समित्या स्थापन करण्यांत आल्या नाहीत. अशा प्रकारे, अंगणवाड्यांना पुरवठा केलेल्या अन्नाची गुणवत्ता सुनिश्चित करण्याची यंत्रणा पर्याप्त नव्हती.

ज्ञापन :

८.१८ उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला.

एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत असलेल्या प्रकल्पात पुरवठा होणाऱ्या आहाराची सध्या वर्षातून दोनदा प्रयोग शाळेतून तपासणी केली जात आहे. तसेच सर्व अंगणवाडी केंद्रामध्ये माता समित्यांची स्थापना करण्यात आली आहे.

शासन निर्णय क्र.एबावि २००८/प्र.क्र.५९/का-५, दि.२४.०८.२००९ नुसार आहाराची नमुना तपासणी ३ महिन्यातून एकदा करावी असे आहे. त्यानुसार पालन करण्यात येते.

कार्याची नियंत्रणे आणि मनुष्यबळ व्यवस्थापन -

८.१९ उद्दिष्टे आणि कार्यक्रम पूर्ण करण्यासाठीची (fulfill) नियुक्त कार्ये (task) करण्यांत येत आहेत याची कार्याची नियंत्रणे शाश्वती देण्याची तरतूद करतात. निदर्शनास आलेल्या कार्याच्या नियंत्रणांतील उणिवांची चर्चा पुढील परिच्छेदांत करण्यांत आलेली आहे.

विभागीय नियमावली -

८.२० कर्मचाऱ्यांना दैनंदिन कार्ये पार पाडण्यासाठी विभागाकडे नियमावली नसल्याचे निदर्शनास आले. उपायुक्त, महिला व बाल विकासने म्हटले (मार्च २००७) की ही बाब शासनाला सादर करण्यांत येईल. एकात्मिक बाल विकास सेवांसाठी केंद्र शासनाने तयार केलेली नियमावली आणि एकात्मिक बाल विकास सेवा आयुक्तालयांत वापरत असलेली, १९८४ नंतर अद्यावत करण्यांत आली नाही. एक्झीट कॉनफरन्समध्ये आयुक्त, एकात्मिक

बालविकासेवाने स्पष्ट केले की, नियमावलीची उपलब्ध असलेली अद्यावत प्रत प्राप्त करुन घेऊन योजनेच्या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यांत येईल.

ज्ञापन :

८.२१ उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला.

एकात्मिक बाल विकास सेवा योजना बाबत नियमावली केंद्र शासनाकडून करण्यात आलेली आहे व त्यांनी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सुचनाप्रमाणे एकात्मिक बाल विकास सेवा योजनेचे कामकाज चालते. महिला व बाल विकास कर्मचाऱ्यांसाठी विभागीय नियम पुस्तिका तयार करण्याचे काम चालू असून इंग्रजीमधील नियमावली तयार झाली असून मराठीत तयार करण्याचे काम चालू असून सदरचे काम जुलै, २०११ अखेर पूर्ण होईल. एकात्मिक बाल विकास सेवा योजना बाबत नियमावली केंद्र शासनाकडून करण्यात आलेली आहे व त्यांनी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सुचनाप्रमाणे एकात्मिक बाल विकास सेवा योजनेचे कामकाज चालते.

एकात्मिक बालविकास सेवा अंतर्गत सेवांचे प्रदान -

८.२२ केंद्र शासनाने प्रमाणके (norms) निश्चित केल्याप्रमाणे, मुलांची आरोग्य तपासणी प्रत्येक तीन महिन्यानी करायची असते. कुपोषित मुलांची तपासणी करायची असते आणि त्यांचे वजन दरमहा नोंदायचे असते. आरोग्य तपासणी, मुलांचे वजन, अन्न पुरवठा, गर्भवती स्त्रीयांसाठी फॉलिक ॲसिडच्या गोळ्या इ.ची अंगणवाड्याकडून प्राप्त झालेल्या माहितीचे संकलन (consolidation) करुन मासीक प्रगती अहवाल (MPR) शासनाला सादर करावयाचा असतो.

२००३-०६ कालावधीत, १३ एकात्मिक बालविकास सेवा कार्यालयांत, मुलाच्या आरोग्य तपासणीत १५ ते ९७ टक्क्यापर्यंत तूट असल्याचे निदर्शनास आले. खुलताबाद (९७ टक्के), अंधेरी (७७ टक्के) लालबत्ती, वरळी (७४ टक्के) आणि घाटकोपर (६५ टक्के) या एकात्मिक बालविकास सेवा कार्यालयांत तूट निदर्शनास आली. चांचणी केलेल्या १४ एकात्मिक बालविकास कार्यालयांतील अंगणवाड्यांच्या एकात्मिक बालविकास सेवा कार्यालयांत तूट निदर्शनास आली. चांचणी केलेल्या १४ एकात्मिक बालविकास कार्यालयांतील अंगणवाड्यांत मुलांचे वजन नोंदले नव्हते.

निकृष्ट दर्जाचा अन्न पुरवठा, फॉलिक ॲसिड गोळ्यांचा तुटवडा, अनियमित आरोग्य तपासणी इ.ची माहिती अंगणवाड्यांकडून आणि एकात्मिक बालविकास सेवा कार्यालयाकडून माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी आयुक्तालयाने सुनिश्चित केले नव्हते. त्यांनी म्हटले (ऑगस्ट २००७) की बृहन्मुंबईच्या डॉक्टरांच्या मदतीने परिस्थितीत सुधारणा करण्यासाठी योग्य पावले उचलली जातील.

ज्ञापन :

८.२३ उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला.

आरोग्य तपासणी मुलांचे वजन, पुरक पोषण आहार पुरवठा, गरोदर मातांची आरोग्य तपासणी इत्यादींची माहितीचे संकलन मासिक प्रगती अहवाल (MPR) आयुक्तालय स्तरावर केले जात आहे. मासिक प्रगती अहवालामध्ये वेळोवेळी सुधारणा करण्यात येत असून लाभार्थ्यांची अधिक माहिती घेवून प्रभावी उपाययोजना करण्यात येत आहे. प्रकल्प स्तरावर वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे नसल्यामुळे स्थानिक आरोग्य केंद्रांशी समन्वय साधून तसेच सेवाभावी संस्थाच्या वैद्यकीय अधिकाऱ्यामार्फत आरोग्य तपासणी केली जात आहे.

महत्वाच्या नोंदवह्या/अभिलेखांचे/सुस्थितित ठेवणे -

८.२४ लाभार्थींना दिलेल्या अनुदानांच्या वापर योग्य रीतीने केला किंवा कसे यावर लक्ष ठेवण्यासाठी, बॉम्बे वित्तीय नियमावलीच्या परिशिष्ट XXII आणि नियम १४९ अन्वये विहित नमुन्यांत नोंदवही ठेवायची असते. तपासणी केलेल्या सर्व नऊ जिल्हा महिला व बाल विकास कार्यालये आणि जिल्हापरिषदेचे सात उप मुख्य कार्यकारी अधिकारी कार्यालयांत, प्रस्ताव प्राप्त झालेले, त्याचा निपटारा आणि लाभार्थींद्वारा त्याचा वापर यावर लक्ष ठेवण्यासाठी सहाय्यक अनुदान नोंद वह्या ठेवण्यांत आल्या नव्हत्या.

ज्ञापन :

८.२५ उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला.

आयुक्तालयाचे पत्र क्र.मबाविआ/पुणे/खर्चमेळ/का-९/२००९/१०२२२, दि.२४.१२.२००९ अन्वये सुचना दिल्या आहेत.

जड वस्तू संग्रह नोंदवह्या ठेवणे -

८.२६ महाराष्ट्र आकस्मिक खर्च नियमावली १९६५ प्रमाणे जड वस्तु संग्रहाची वस्तुसूची (inventory) ठेवणे आवश्यक होते. निरुपयोगी आणि कालबाह्य वस्तुंची विल्हेवाट लावणे आणि

मालमत्तांची प्रत्यक्षपडताळणी दरवर्षी जून महिन्यात करावयास हवी. तरीही असे निदर्शनास आले की, चाचणी केलेल्या ३६ पैकी २४ अंगणवाड्यात वस्तु निहाय वस्तुसूची ठेवण्यात आली नव्हती. २००३-०६ कालावधीतील, चाचणी केलेल्या ४६ पैकी २७ कार्यालयात मालमत्ता आणि भांडाराची (stores) प्रत्यक्ष पडताळणी करण्यात आली नव्हती. त्यामुळे, नोंदवहीत दर्शविलेल्या मालमत्ता आणि भांडार प्रत्यक्ष उपलब्ध असल्याची खात्री करुन घेता आली नाही.

ज्ञापन :

८.२७ उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला.

आयुक्तालयाचे पत्र क्र.मबाविआ/पुणे/खर्चमेळ/का-९/२००९/१०२२२, दि.२४.१२.२००९ अन्वये सूचना दिल्या आहेत.

महिला आणि बाल विकास विभागाच्या आयुक्तालयात रिक्त पदे -

८.२८ आयुक्त, महिला व बाल विकास विभागाच्या अधिपत्याखालील मार्च २००७ अखेर मनुष्यबळाची स्थिती खालील प्रमाणे होती.

पदनाम	मंजूर पदे	व्यक्तिची स्थिति	रिकाम्या जागा	रिकाम्या जागाची टक्केवारी
सहाय्यक आयुक्त (जि.म.बा.वि.अ.	३४	२६	८	२४
परिविक्षा अधिकारी	२६०	२०४	५६	२२
वरिष्ठ लिपिक/सांख्यिकि लिपिक	७८	६७	११	१४
परिचारीका	५५	४५	१०	१८

कर्मचाऱ्यांच्या तुटवड्यामुळे, महत्त्वाच्या क्षेत्रीय कर्मचाऱ्यांना अतिरिक्त कारभार देण्यांत आला जसे जिल्हा महिला आणि बाल विकास अधिकारी, परिविक्षा अधिकारी, बालविकास प्रकल्प अधिकारी, पर्यवेक्षक आणि सहाय्यक परिचारिका आणि प्रसविका (ANMs). त्यामुळे त्यांच्या नियंत्रणाची कालमर्यादा वाढण्यांत आणि योजनांच्या अंमलबजावणीच्या अपर्याप्त पर्यवेक्षणांत झाला.

सहाय्यक आयुक्त आणि जिल्हा महिला आणि बालविकास अधिकाऱ्यांच्या रिक्त जागा भरण्याचा प्रस्ताव शासनाला मे २००५ मध्ये सादर केल्याचे आयुक्तालयांतील मुख्य लेखापरीक्षक आणि लेखा अधिकारी मे म्हटले (जून २००७). परिविक्षा अधिकाऱ्यांच्या कंत्राटी पद्धतीने नेमणूका करण्यास शासनाने मंजूरी दिली आणि भरतीची प्रक्रिया प्रगतीपथावर आहे.

ज्ञापन :

८.२९ उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला.

जिल्हा महिला बाल विकास अधिकारी सहायक आयुक्त/परिविक्षा अधिकारी या गट अ संवर्गामध्ये ३४ मंजूर पदे असुन त्यापैकी सद्य:स्थितीत २२ पदे भरलेली आहेत.

जिल्हा महिला बाल विकास अधिकारी, बालविकास प्रकल्प अधिकारी (नागरी), परिविक्षा अधिकारी व तत्सम संवर्गातील ३९ पदे सरळसेवेने भरण्याच्या अनुषंगाने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे मागणीपत्र पाठविण्यात आले होते. त्या अनुषंगाने ३० उमेदवार प्राप्त झाले आहेत. सदर उमेदवारांमधून जिल्हा महिला बाल विकास अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच सदर पदे पदोन्नतीने भरण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्यात येत आहे.

जिल्हा महिला बाल विकास अधिकाऱ्यांच्या रिक्त पदाचा अतिरिक्त कार्यभार कार्यरत जिल्हा महिला बाल विकास अधिकारी/बाल विकास प्रकल्प अधिकारी यांच्याकडे देण्यात आलेले आहेत.

३८ परिविक्षा अधिकाऱ्यांची कंत्राटी पद्धतीने केलेल्या नियुक्त्या पुढे एक वर्ष चालू ठेवण्यास दि.२८.३.२०११ अन्वये मान्यता दिली आहे. या संवर्गातील सरळ सेवेच्या कोट्यातील रिक्त पदे भरण्यास दि.२९.११.२०१० च्या वित्त विभागाच्या निर्णयानुसार प्रस्ताव समितीपुढे सादर करण्यात येत आहे.

वरिष्ठ लिपिक/सांख्यिकी सहायक या संवर्गातील ७० रिक्त पदे व इतर क व ड संवर्गातील १०२ पदे अशी १७२ पदे भरण्यास शासन मान्यता दिली आहे.

एकात्मिक बालविकास सेवा आयुक्तालयांत रिकाम्या जागा-

८.३० आयुक्त, एकात्मिक बालविकास सेवेच्या अधिपत्याखालील मार्च २००७ अखेर मनुष्यबळाची स्थिति खालील प्रमाणे होती.

पदनाम	मंजूर पदे	व्यक्तिची स्थिति	रिकाम्या जागा	रिकाम्या जागांची टक्केवारी
बाल विकास प्रकल्प अधिकारी	४१६	३१७	९९	२४
सहाय्यक बा.वि.प्र.अ.	२४३	१८३	६०	२५

पर्यवेक्षक	३०४९	२६१०	४३९	१४
अंगणवाडी कार्यकर्त्या	७६२९१	७२३९५	३८९६	५
सहाय्यक	७६२९१	७१०९७	५१९४	७

बालविकास प्रकल्प अधिकारी आणि सहाय्यक बालविकास प्रकल्प अधिकारी च्या महत्त्वाच्या पदात रिक्त जागांची टक्केवारी २४ ते २५ टक्के इतकी मोठी होती असे दिसून येते आणि त्यामुळे एकात्मिक बालविकास सेवा सेवांच्या प्रदानावर प्रतिकूल परिणाम झाला असेल.

घाटकोपर आणि पिंपरीच्या नागरी बालविकास प्रकल्प अधिकारी कार्यालयासाठी जरी वैद्यकिय अधिकाऱ्यांच्या पदाना मंजूरी देण्यात आली होती तरीही अनुक्रमे जुलै १९९८ आणि फेब्रुवारी २००४ पासून ही पदे भरण्यांत आली नव्हती. पिंपरी बालविकास प्रकल्प अधिकारी यातील सर्व चार प्रसविकांची आणि घाटकोपर बालविकास प्रकल्प अधिकारी यातील दोन प्रसविकांची पदे अनुक्रमे ऑक्टोबर २००३ आणि ऑगस्ट २००४ नंतर रिक्त होती. म्हणून, या बालविकास प्रकल्प कार्यालयाच्या अंतर्गत मुलांकडे आणि मातांकडे आवश्यक स्तराऐवढे लक्ष दिले गेले नाही.

उप आयुक्त, एकात्मिक बालविकास सेवा ने म्हटले (मे २००७) की बालविकास प्रकल्प अधिकारी आणि सहाय्यक बालविकास प्रकल्प अधिकाऱ्याची नेमणूक शासनाने करावयाची असते. त्यांनी असेही प्रतिपादन केले की जिल्ह्यांच्या आमदाराच्या अध्यक्षतेखालील जिल्हापरिषदाच्या समिती मार्फत ग्रामीण भागातील आणि आदिवासी प्रकल्पांतील अंगणवाड्यांतील कर्मचाऱ्यांच्या (AWW) आणि अंगणवाडी सहाय्यकांच्या (AWH) नेमणूका करण्यात येतात. नागरी प्रकल्पांतील बाबतीत आमदाराच्या अध्यक्षते खालील शासनाच्या समिती मार्फत एकात्मिक बालविकास सेवा प्रकल्प स्तरावर नेमणूका करण्यांत येतात. आयुक्त स्तरावर पर्यवेक्षकांच्या नेमणूका करण्यांत येतात.

उप आयुक्त, एकात्मिक बालविकास सेवा यांचे म्हणणे असे होते की मानधनाचा दर अत्यंत कमी असल्याने अंगणवाडी सहाय्यक राजीनामे देऊन गेल्याने पदे रिक्त राहीली, प्रामुख्याने, जामदारांची उपलब्धता नसणे आणि निवडणुकीतील आधार संहितेमुळे नेमणुका करण्यास विलंब झाला.

मुख्य पदावरील रिक्त पदांमुळे कार्यक्रमांच्या अंमलबजावणीच्या गुणवत्तेत प्रतिकूल परिणाम झाला असेल. जरी भारत सरकारने आमदार नेमणूका समित्यांच्या घटक असू नये अशा सूचना दिल्या (मे २००७) तरी ते समित्यांचे घटक असल्याचे दिसून आले.

ज्ञापन :

८.३१ उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला.

एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत मनुष्यबळाची स्थिती सोबत जोडल्याप्रमाणे आहे. बाल विकास प्रकल्प अधिकारी नागरी मधील कार्यरत बाल विकास प्रकल्प अधिकारी व इतर मंजूर पदांबाबत आस्थापनाविषयक कामे या विभागात करण्यात येतात. बाल विकास प्रकल्प अधिकारी (ग्रामीण व आदिवासी) क्षेत्रातील आस्थापना ही ग्राम विकास विभागाकडे आहे.

बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी) जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांची ७४ पदे रिक्त असून सदर पदे सरळसेवेने भरण्याच्या अनुषंगाने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे ३९ पदांचे मागणीपत्र पाठविण्यात आले होते. त्याअनुषंगाने ३० उमेदवार प्राप्त झाले आहेत. त्यानुसार बाल विकास प्रकल्प अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच सदर पदे पदोन्नतीने भरण्याच्या दृष्टिकोनातून कार्यवाही करण्यात येत आहे.

बाल विकास प्रकल्प अधिकाऱ्यांच्या रिक्त पदाचा अतिरिक्त कार्यभार कार्यरत बाल विकास प्रकल्प अधिकाऱ्यांकडे देवून प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यात आलेली आहे.

घाटकोपर व पिंपरी नागरी बाल विकास प्रकल्प हे महानगर क्षेत्रात कार्यरत असल्याने वैद्यकीय अधिकारी ही पदे संबंधित महानगरपालिकेने प्रतिनियुक्तीने भरावयाची होती. महानगरपालिकेने ते भरली नाही. सन २००९-१० पासून केंद्र शासनाने निश्चित केलेल्या आकृतीबंधानुसार कोणत्याही प्रकल्पावर वैद्यकीय अधिकाऱ्याची पदे नाहीत.

एकात्मिक बालविकास सेवा कार्य करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण -

८.३२ एकात्मिक बालविकास सेवा नियमावली प्रमाणे एकात्मिक बालविकास सेवा कार्य करणाऱ्या सर्व अशिक्षित कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण द्यावयास हवे. त्याप्रमाणे सर्व कार्य करणाऱ्यांना प्रशिक्षण देण्याची व्यवस्था आयुक्तांने करायची असते की ज्यामुळे कार्यक्षमतेने आणि परीणामकारक रित्या ते कार्ये पार पाडू शकतील. अशासकीय संघटना चालवित असलेल्या ३९

प्रशिक्षण केंद्रातुन अंगणवाडी कर्मचारी, सहाय्यक आणि पर्यवेक्षकांना प्रशिक्षण दिले जात होते. सार्वजनिक सहकार आणि बाल विकास राष्ट्रिय संस्थे (NIPCCD), नवी दिल्ली मार्फत निवडक प्रशिक्षण संस्थातून बालविकास प्रकल्प अधिकारी आणि सहाय्यक बालविकास प्रकल्प अधिकाऱ्यांना (ACDPO'S) प्रशिक्षण देण्यांत येते.

प्रशिक्षण केंद्राच्या क्षमतेनुसार प्रशिक्षण देण्यांत येत होते पण प्रशिक्षणाचे वार्षिक लक्ष्यांक निश्चित करण्यांत आले नव्हते. ३१७ बालविकास प्रकल्प अधिकाऱ्यांपैकी ६८, १८३ सहाय्यक बालविकास प्रकल्प अधिकाऱ्यांपैकी ६,२६१० पर्यवेक्षकांपैकी १५९, ७२,३९५ अंगणवाडी कर्मचाऱ्यांपैकी ८९५० आणि ७२,३९५ आले नव्हते. तसेच, १४९ बालविकास प्रकल्प अधिकारी, ७७ सहाय्यक बालविकास प्रकल्प अधिकारी, ३८६ पर्यवेक्षकांना, १५,०३८ अंगणवाडी कर्मचारी आणि १९,४४७ अंगणवाडी सहाय्यकांना उजळणी पाठ्यक्रम (Refesher course) प्रशिक्षण मार्च २००७ अखेरपर्यंत देण्यांत आले नव्हते.

उप आयुक्त, एकात्मिक बालविकास सेवा यांनी म्हटले (जून २००७) की प्रशिक्षण देण्यासाठी अपर्याप्त क्षमता असल्यामुळे, प्रशिक्षणांत अनुशेष होता. २८ जिल्ह्यांना समाविष्ट करणाऱ्या ३९ अंगणवाडी प्रशिक्षण केंद्रांत प्रशिक्षण देण्यांत येत आहे. उत्तर समर्थनीय नाही कारण अप्रशिक्षीत कर्मचाऱ्यांना अंगणवाडीत पदस्थापित करण्याने महिलांना अणि मुलांच्या सेवा प्रदानाच्या गुणवत्तेवर प्रतिकुल परिणाम झाला असेल. राज्य शासनांत उपलब्ध असलेल्या इतर विकल्पाचे समन्वेषण विभागाने करावे. ग्रामीण भागांतील बालविकास प्रकल्प अधिकाऱ्यांची उलाढाल फार मोठी असल्याने, त्यांना दिलेल्या प्रशिक्षणांचा अपव्यय होतो असे आयुक्त, एकात्मिक बालविकास सेवा यांनी प्रतिपादन केले. त्यांनी असेही निदर्शनास आणून दिले की ग्रामीण भागांतील एकात्मिक बालविकास सेवा संवर्ग (cadre) ग्रामीण विकास विभागाच्या अधिपत्याखाली येतात आणि त्या महिला आणि बाल विकास विभागाच्या अखत्यारीत येत नाहीत.

ज्ञापन :

८.३३ उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला.

महाराष्ट्र राज्यात सध्या ४ मध्यमस्तर प्रशिक्षण केंद्र व ३५ अंगणवाडी कार्यकर्ती प्रशिक्षण केंद्र कार्यरत असून एकूण प्रशिक्षणाचा अनुशेष व प्रशिक्षण केंद्राची क्षमता यानुसार प्रशिक्षणाचा वार्षिक कृती आराखडा तयार करुन तो केंद्र शासनाकडून मंजूर करुन घेण्यात

येतो व त्यानुसार पर्यवेक्षिका अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना प्रशिक्षण देण्यात येते. त्यानुसार जास्तीत जास्त प्रशिक्षणाचा अनुशेष कमी करण्यात येत असून सन २००७ च्या तुलनेने सद्य:स्थिती खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	पदनाम	कार्यरत कर्मचारी	प्रशिक्षित कर्मचारी	अप्रशिक्षित कर्मचारी
१	२	३	४	५
१	बाल विकास प्रकल्प अधिकारी	३८७	२५१	१३६
२	सहा.बाल विकास प्रकल्प अधिकारी	१२५	१२५	निरंक
३	सुपरवायझर	३२७१	२८०२	४६९
४	अंगणवाडी सेविका	८५४८९	७३७८५	११७०४
५	अंगणवाडी मदतनीस	७९०१५	७३७८५	१९६५९

जिल्हा परिषदाना आणि अशासकीय संघटनाना दिलेल्या अनुदानाचे निर्धारण-

आयुक्त, महिला व बाल विकास ने प्रदान केलेली अनुदाने-

८.३४ आयुक्त, महिला आणि बालविकासातर्फे दर वर्षी जारी केलेल्या आदेशान्वये, सहाय्यक अनुदाने दिलेल्या अनुदानग्राही संस्थाच्या अनुदानाचा योग्य उपयोग केला किंवा कसे यासाठी निर्धारणा दर वर्षी करायची असते. आयुक्त, महिला व बालविकासाने जिल्हा परिषदाना प्रदान केलेल्या अनुदानांची निर्धारणा २००३-०४ नंतरपासुन प्रलंबित होती. ४८२ अशा संघटनांना २००२-०३ आणि २००४-०५ वर्षात दिलेल्या अनुदानाचे निर्धारणेला अंतिम रुप देण्यांत आले नव्हते कारण आयुक्ताने विचारलेल्या (Queries) आणि त्रुटींचे अनुपालन जिल्हा महिला आणि बालविकास अधिकाऱ्यांकडून प्रलंबित होते. २००५-०६ सालांत अ.शा.संघटनाना दिलेल्या अनुदानाच्या जिल्हा महिला आणि बालविकास अधिकाऱ्यांनी पाठवायचे निर्धारणेचे अहवाल मे २००७ अखेर प्रलंबित होते.

कुटुंब आणि बाल कल्याण प्रकल्प आणि कल्याण वाढ प्रकल्पासाठी महाराष्ट्र राज्य समाज कल्याण सल्लागार मंडळाला दिलेल्या अनुदानाचे निर्धारण १९८१-८२ पासून करण्यांत आले नव्हते. जरी, उपयोजन प्रमाणपत्र प्रमाणीत करुन १९९२-९३ नंतर प्राप्त झाले नसले तरी, सहाय्यक अनुदाने दरवर्षी मंडळाला प्रदान करण्यांत येत होती. २००३ ते २००६ कालावधीत रु.९.३० कोटीची सहाय्यक अनुदाने प्रदान करण्यांत आली होती.

अशा प्रकारे दिलेली अनुदाने उद्देशीत कारणासाठी वापरलीत कां याची विभागाने सुनिश्चिती केली नाही. कर्मचाऱ्यांच्या तुटवड्यामुळे निर्धारणा प्रलंबित राहिल्या आणि प्रतिनियुक्तीची पदे भरण्यासाठी वित्त विभागाला विनंती करण्यांत येईल असे आयुक्ताने प्रतिपादन केले.

ज्ञापन :

८.३५ उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला.

बाल विकास शाखेमार्फत प्राप्त झालेले अनुदान संस्थांना वितरीत करतांना जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी हे निर्धारण करुनच अनुदान वितरणाची कार्यवाही करतात. निर्धारण अंतिमिकरणाची प्रक्रिया आयुक्तालय स्तरावरुन करण्यात येते. समाज कल्याण बोर्डास वेतन, सेवानिवृत्ती वेतन, अध्यक्ष मानधन व इतर वेतनेत्तर आहे. व पुढिल कालावधीचे निर्धारण करण्याबाबत कार्यवाही सुरु आहे. सदर काम वेळेत पुर्ण करणेसाठी जिल्हा महिला आणि बालविकास अधिकारी स्तरावर १ सहाय्यक लेखाधिकारी पदास मंजुरी देऊन त्याच्या जोडीला परिविक्षा अधिकारी व वरीष्ठ लिपीक यांचे एक पथक निर्माण करुन त्यांचेकडून अधिनस्त संस्थांची जिल्हा परिषदेसह अनुदान निर्धारण वेळेत करुन करणे आवश्यक आहे. त्याबाबतचा प्रस्ताव विचाराधीन आहे. आयुक्तालय स्तरावरील अनुदान निर्धारण अंतिमीकरणाच्या कामासाठी १ लेखाधिकारी व १ सहा. लेखाधिकारी सहा. लेखाधिकारी (पैकी १ पद सध्या कार्यरत आहेत.) २ परिविक्षा अधिकारी व २ लिपीक अशा कर्मचाऱ्यातून २ पथके तयार करण्याचे विचाराधीन आहे. तोपर्यंत उपलब्ध कर्मचाऱ्यांकडून निर्धारणाचे काम चालू आहे.

आयुक्त, एकात्मिक बालविकास सेवाने प्रदान केलेली अनुदाने -

८.३६ आयुक्त, एकात्मिक बालविकास सेवाने जि.प.ना.दिलेल्या अनुदानाचे १९९२-९३ नंतरपासून निर्धारण प्रलंबित होते असे निदर्शनास आले. त्यामुळे जि.प.दिलेल्या अनुदानाचा विनियोग उद्देशीत विविध योजनांच्या अंमलबजावणीसाठी केला किंवा कसे वा अनुदानाचा गैरवापर केला या बद्दल आयुक्त सुनिश्चित करु शकले नाहीत. आयुक्तांनी आश्वासन दिले की कालमर्यादेनुसार निर्धारणा पूर्ण करण्यांत येतील.

एकात्मिक बालविकास सेवा कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी, २००५-०६ वर्षांत रु.६.३७ कोटी अशासकीय संघटनाना प्रदान केले होते त्या ३७ अ.शा.संघटनांनी उपयोजन प्रमाण पत्रे सादर केली नसल्याचे निदर्शनास आले. असे असूनदेखील, २००६-०७ वर्षांत या ३७ अ.शा.संघटनाना रु.३.५० कोटीची सहाय्यक अनुदाने प्रदान करण्यांत आली.

२०००-०५ कालावधीत प्रधान मंत्री ग्रामोदय योजना योजनेअंतर्गत पोषण क्षेत्रासाठी, आयुक्त, एकात्मिक बालविकास सेवा यांनी प्रदान केलेल्या रु.६९.८० कोटीची उपयोज पत्रे (UCs), राज्यातील सर्व ३३ जिल्हा परिषदानी सादर केली नव्हती (जून २००७) तसेच, अंगणवाड्यांना हातपंप पुरवठा करण्याच्या योजनेसाठी २००१-०४ कालावधीत दिलेल्या अनुदानाचे रु.१.४१ कोटीची उपयोजन पत्रे (UCs) २७ जि.प.कडून जानेवारी २००७ अखेर प्रलंबित होती.

ज्ञापन :

८.३७ उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला.

उपयोगिता प्रमाणपत्रे महालेखापालांना दि.१४.८.२००७ व दि.१६.८.२००७ रोजी पाठविण्यात आली आहे.

याबाबत आयुक्त, महिला व बाल विकास कार्यालयाकडून जिल्हापरिषदांकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

पर्यवेक्षणीय नियंत्रणे आणि दक्षता सहीत संनियंत्रण -

एकात्मिक बालविकास सेवा अंतर्गत निरीक्षणे-

८.३८ कामकाजाचे संनियंत्रण आणि योजनेतील योग्य सेवा प्रदानासाठी एकात्मिक बालविकास सेवा कर्मचाऱ्यासाठी निरिक्षणाचे लक्ष्यांक विहीत करण्यांत आले होते.

२००३-०४ सालांत ३६ ते ९२ टक्के, २००४-०५ वर्षांत ३० ते ८६ टक्के आणि २००५-०६ वर्षांत ३६ ते ८२ टक्के दरम्यान ११ बालविकास प्रकल्प कार्यालयांतील, बालविकास प्रकल्प अधिकाऱ्यांनी करावयाच्या अंगणवाड्यांच्या निरीक्षणांत तूट होती. पर्यवेक्षकांच्या निरीक्षणाबाबत २००२-०३ ते २००५-०६ कालावधीतील निरीक्षणांतील तूट ३० ते ७९ टक्के दरम्यान होती.

जि.प.चे उप कार्यकारी अधिकाऱ्यांनी (बाल कल्याण) त्यांच्या अखत्यारीतील कर्मचाऱ्यांसह त्यांच्या अधिनस्थ क्षेत्रांतील सर्व एकात्मिक बालविकास सेवा प्रकल्पांची वार्षिक निरक्षणे करायची असतात. उप कार्यकारी अधिकारी निरीक्षण अहवाल, संबंधीत एकात्मिक

बालविकास प्रकल्प अधिकाऱ्यांना पाठवितात. त्यांचा पाठपुरावा करुन अनुपालन मागवितात आणि त्याच्या सत्यतेची पडताळणी पुढच्या भेटीच्या वेळी करतात. चांचणी केलेल्या जिल्ह्यांच्या निरीक्षणांची स्थिती खालील प्रमाणे होती.

- औरंगाबाद, अहमदनगर, अमरावती आणि नाशिक जिल्ह्यांत २००३-०४ ते २००५-०६ कालावधीत उप का.अ.नी कोणतेही निरीक्षण केले नाही.
- २००५-०६ वर्षांत, जि.प., नागपूर चे उप.का.अ.नी. १३ पैकी फक्त दोन एकात्मिक बालविकास प्रकल्पांचे निरीक्षण केले आणि त्यांनी २००३-०४ आणि २००४-०५ कालावधींतील निरीक्षणे केली नाहीत.
- २००५-०६ वर्षांत, जि.प., पुणे चे उप का.अधिकाऱ्यांनी १३ पैकी फक्त सात एकात्मिक बालविकास प्रकल्पाचे निरीक्षण केले.
- जि.प.च्या उप का.अ.ठाणे नी २००३-०४ मध्ये १३ पैकी एकाचे निरीक्षण केले. २००४-०५ सालांत १३ पैकी दोनचे निरीक्षण केले आणि २००५-०६ मध्ये १३ पैकी पांच ते निरीक्षण केले. लेखा परीक्षणांत निदर्शनास आले की सेवा पुस्तकांची ठेवण, कर्मचाऱ्यांची उपस्थिती, जड संग्रह वस्तु नोंदवही/भांडार नोंदवही इ. भाष्याचा समावेश निरीक्षण अहवालांत समावेश होता परंतु शासनाने वेळोवेळी जारी केलेल्या आदेशांच्या अनुपालनासंबंधी भाष्ये नव्हती.

उप कार्यकारी अधिकाऱ्यांनी कर्मचाऱ्यांच्या तुटवड्याचा कमतरतेच्या कारणाने तूट होती असे निर्देशित (attributed) केले. निरीक्षणांतील तुटीमुळे योजने अंतर्गत योग्य सेवा प्रदानांच्या संनियत्रणांतील अपर्याप्तेत झाला.

ज्ञापन :

८.३९ उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला.

ICDS निरीक्षण आयुक्तालयाअंतर्गत बाल विकास प्रकल्प अधिकारी यांच्या एकुण मंजुर ५३३ पदांपैकी १५४ पदे व मुख्यसेविका एकुण मंजुर ३८९८ पदांपैकी ६०८ पदे रिक्त असून त्यामुळे त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालयांची त्यांच्या उद्दिष्टाप्रमाणे मार्गदर्शक सुचना भारत सरकार पत्र क्र.F.No.१६-३/२००४-ME(Pt) दि.२२/१०/२०१० नुसार निर्गमित करण्यात आलेले

आहेत. त्याप्रमाणे उपलब्ध कर्मचाऱ्याकडून सदर काम करण्यात येत आहे. आयुक्तालय स्तरावर कामकाज सुरु आहे.

ICDS निरीक्षणे आयुक्तालयाअंतर्गत बाल विकास प्रकल्प अधिकारी १५४ पदे व मुख्यसेविका ६०८ पदे रिक्त असून त्यामुळे त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालयांची त्यांच्या उद्दिष्टाप्रमाणे तपासणी करणे शक्य झाले नाही.

महिला आणि बाल कल्याणाच्या इतर योजनेचे निरीक्षण-

८.४० अशासकीय संस्थांनी आणि शासकीय संस्थांनी अंमलबजावणी केलेल्या योजनांच्या अधिकाऱ्यांनी निरीक्षणांसाठी चार प्रकारची निरीक्षणे, जसे अनपेक्षीत निरीक्षणे, तपशीलवार निरीक्षणे या वर्षांच्या लाभार्थींची पाठपुरावा निरीक्षणे, मागील वर्षांच्या लाभार्थींची पाठपुरावा निरीक्षणे, आयुक्त, महिला आणि बाल विभागाने विहीत केली होती.

चांचणी तपासणी केलेल्या नऊ पैकी पांच जिल्हा महिला आणि बालविकास अधिकाऱ्यांच्या २००३-०६ कालावधीतील निरीक्षणांत तूट होती. जिल्हा महिला आणि बालविकास अधिकाऱ्यांच्या, जिल्हापरिविक्षा अधिकाऱ्यांच्या आणि परिविक्षा अधिकाऱ्यांसहीत अनपेक्षीत निरीक्षणांत १३ ते ३३ टक्क्या दरम्यान तूट होती आणि तपशीलवार निरीक्षणांत आठ ते ५४ टक्के दरम्यान तूट होती. या लाभार्थींच्या पाठपुरावा निरीक्षणांत लाभार्थींच्या ३१ ते ८५ टक्क्या दरम्यान, मागील वर्षांतल्या लाभार्थींच्या पाठपुरावा निरीक्षणांत सात ते ९० टक्के दरम्यान तूट होती.

महिला आणि बाल विकास विभागाच्या आयुक्ताने म्हटले (ऑगस्ट २००७) की परिस्थितीत सुधारणा करण्यासाठी शासकीय आाणि अशासकीय संस्थातील सदस्यांचा समावेश असलेल्या महिला दक्षता समित्या गठीत करण्यांत येत आहेत.

ज्ञापन :

८.४१ उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला.

जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, परिविक्षा अधिकारी व जिल्हा परिविक्षा अधिकारी यांना निरिक्षणे घेण्याबाबत आयुक्तांनी वेळोवेळी बैठकीत सुचना दिलेल्या आहेत.

जिल्हा सल्लागार मंडळाची स्थापना -

८.४२ शासकीय संस्थांच्या आणि अशासकीय संस्थाच्या कार्याचा आढावा घेण्यासाठी, योजनांच्या अंमलबजावणीत सुधारणा करण्यास शासनाला मार्गदर्शन करण्यासाठी मार्च २००३

च्या शासन निर्णयानुसार अध्यक्ष प्रमुखपदी असलेली जिल्हा सल्लागार मंडळे (DABs) स्थापीत करायची होती.

जून २००७ अखेर जिल्हा सल्लागार मंडळे स्थापीत केली नसल्याचे निदर्शनास आले. ३५ जिल्हा सल्लागार मंडळासाठी अध्यक्षांची नांवे शासनाला मे २००४ आणि जून २००५ मध्ये सादर केल्याचे आयुक्त महिला आणि बालविकास विभागानी प्रतिपादन केले (जून २००७) शासनाची मंजूरी प्रलंबित होती.

जि.स.मंडळांच्या अभावामुळे, कल्याण आणि महिलांच्या आणि मुलांच्या सुरक्षेविषयक योजनाची जिल्हा सल्लागार मंडळाच्या मार्गदर्शनाशिवाय अंमलबजावणी करण्यांत आल्या.

ज्ञापन :

८.४३ उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला.

शासन निर्णय दि.२७.३.२००३ नुसार जिल्हा सल्लागार मंडळ गठीत करण्यात आले आहे. सदर जिल्हा सल्लागार मंडळाचे अध्यक्ष व सदस्य बाल विकास क्षेत्रातील नामांकित सामाजिक कार्यकर्ता असतात. जिल्हा सल्लागार मंडळे सद्य:स्थितीत कार्यरत नाही. सबब जिल्हा सल्लागार मंडळे गठीत करण्याकरिता अध्यक्ष व सदस्य नियुक्ती करिता आयुक्त, महिला व बाल विकास यांचेकडून दि.२४.६.२०११ चे सल्लागार मंडळे नियुक्तीची कार्यवाही शासन स्तरावर सुरु आहे. विधी व न्याय विभागाच्या मान्यतेनंतर शासनाची मान्यता घेऊन नियुक्त्या अधिसूचित करण्यात येईल.

भरारी पथकाची (दक्षता पथक) स्थापना -

८.४४ शासन निर्णय सप्टेंबर २००२ नुसार, महिला आणि बाल विकास विभागाच्या, एकात्मिक बालविकास योजनांच्या अतिरिक्त सचिवांच्या अध्यक्षतेखाली राज्य स्तरावर दक्षता पथक स्थापन करावयाचे होते. एकात्मिक बाल विकास योजना प्रकल्पांचे आणि अंगणवाडी केंद्राच्या लाभार्थींना सेवा प्रदानांचे निरीक्षण जसे पूरक पोषण (nutrition) आणि आरोग्य तपासण्या आणि एकात्मिक बालविकास योजनेच्या कार्य करणाऱ्यांचे त्यांनी अनपेक्षीत तपासण्या करावयाच्या होत्या. जिल्हा परिषदांचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बाल कल्याण) कार्यालयांचे ही त्यांनी निरीक्षण करावयाचे होते.

दक्षता पथक स्थापन करण्यांत आले नव्हते आणि ज्या कारणास्तव शासन निर्णय जारी करण्यांत आला होता त्याचा हेतु विफल करण्यांत आल्याचे निदर्शनास आले. प्रधान सचिवाने प्रतिपादन केले (ऑगस्ट २००७) की या बाबतीत त्वरीत कार्यवाही करण्यांत येईल.

ज्ञापन :

८.४५ उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला.

कार्यालयाच्या आस्थापनेवरील अपुऱ्या कर्मचारी वर्गामुळे दक्षता पथक जारी करणे प्रलंबित असले तरी पुरक पोषण आहाराची गुणवत्तेवर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रत्येक अंगणवाडी केंद्रात माता समित्या करण्यात आल्या आहेत.

अंतर्गत लेखापरीक्षण -

८.४६ विभागीय नियम आणि कार्यपद्धतीच्या अनुपालनाच्या स्तराचे परीक्षण करणे आणि मूल्यांकन करणे की ज्यामुळे विभागाच्या अंतर्गत नियंत्रण पद्धतीच्या पर्याप्ततेबद्दल वाजवी शाश्वतीची तरतूद करण्यासाठी अंतर्गत लेखा परीक्षण करण्यात येते शासकीय विभागातील कमकुवत अंतर्गत नियंत्रणे आणि अंतर्गत लेखापरीक्षणाचा अभाव यावर लोक लेखा समिती आणि भारताच्या नियंत्रक आणि महालेखापरीक्षकांच्या अभिक्षणाच्या (observations) अनुषंगाने त्यांच्या अंतर्गत नियंत्रण यंत्रणेचा आढावा घेण्यासाठी आणि नियमित अंतर्गत लेखापरीक्षण करुन घेण्यास प्रेरीत (urging) करण्यासाठी विभाग नसेल तेथे विभागाने स्वतंत्र अंतर्गत लेखापरीक्षण विभागाची स्थापना करावी आणि त्यासाठी कर्मचाऱ्यांच्या नेमणूकीसाठी प्रस्ताव वित्त विभागाला पाठविण्यात द्यावयाचा होता.

एकात्मिक बाल विकास योजनेचे आयुक्तालय -

८.४७ एकात्मिक बालविकास योजनेच्या आयुक्तालयांत अंतर्गत लेखापरीक्षण विभाग नसल्याचे निदर्शनास आले. तसेच, अंतर्गत लेखापरीक्षण विभाग स्थापण्यासाठी कर्मचारी नेमणूकीचा प्रस्ताव शासनास कधीही पाठविला नाही.

ज्ञापन :

८.४८ उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला.

आयुक्तालय एकात्मिक बाल विकास सेवा योजना व आयुक्तालय महिला व बाल विकास या दोन कार्यालयांचे सध्या एकत्रिकरण झाल्यामुळे लेखाविभागातील कर्मचाऱ्यांमध्ये वाढ झालेली आहे. त्यामुळे उपलब्ध पदांमधून पथक निर्माण करण्यात आले आहे.

महिला आणि बाल विकास विभागाचे आयुक्तालय -

८.४९ आयुक्तालयांत अंतर्गत लेखापरीक्षण विभाग होता. जुलै २००७ अखेर, सहा मंजूर पदांपैकी, दोन वरीष्ट लिपिकांची पदे भरण्यांत आली होती. २००३-०६ कालावधीत, नियत (due) १२० घटकांपैकी १३ लेखापरीक्षण करण्यांत आले. २००४-०५ वर्षांत लेखा परीक्षणं करण्यांत आले नसल्याचे निदर्शनास आले.

त्यामुळे अंतर्गत नियंत्रणाचे आणि नियमाचे आणि कार्यपद्धतीचा अनुपालनांतील उल्लंघन तपासाविनया (undetected) राहीले. २००३-०६ कालावधीत अंतर्गत लेखापरीक्षण विभागाने लेखापरीक्षण केलेल्या घटकांना १६० परिच्छेद जारी केले होते. त्यापैकी ४५ परिच्छेदांचे अनुपालन घटकांकडून प्राप्त झाले नव्हते.

अंतर्गत लेखापरीक्षणांत निदर्शनास आणून दिलेल्या चुका आणि कमतरता दुरुस्त करण्यासाठी, विभागाने पर्याप्त पावले उचलली नसल्याचे निदर्शक होते.

ज्ञापन :

८.५० उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला.

महिला व बाल विकास आयुक्तालयाकडे लेखा परिक्षणासाठी स्वतंत्र लेखाधिकारी पद नव्हते. नियंत्रण मंडळाकडील लेखाधिकारी यांच्याकडे ३/११/२००९ पासून आहरण व संवितरण अधिकाऱ्याचे काम सोपविल्यामुळे तेथील पूर्वीच्या लेखाधिकाऱ्याकडे लेखा परिक्षण व खर्चमेळाचे काम सोपविण्यात आलेले आहे. त्यांना लेखा परिक्षणाचे पथकास पुरेसा कर्मचारी उपलब्ध नसल्यामुळे लेखा परिक्षणाच्या कामात भरीव प्रगती करता आलेली नसती तरी त्यांनी उपलब्ध कर्मचाऱ्यांकडून खालील कार्यालयांचे लेखा परिरक्षण केले आहे.

अ.क्र.लेखा परिक्षण केलेल्या कार्यालयाचे नांव

१. शांतीसदन महिला वस्तीगृह उल्हासनगर
२. जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी सोलापूर
३. जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी पुणे
४. जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी सांगली
५. शासकीय मुलींचे निरीक्षणगृह मुंढवा, पुणे
६. जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी नागपूर
७. जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी अहमदनगर

८. जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कोल्हापूर

९. जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी मुंबई उपनगर

१०. जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी धुळे

११. जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी वर्धा

१२. प्रिय दर्शनी महिला वस्तीगृह, नागपूर

सदर शाखेकडूनच खर्चमेळाचे कामही केले जात असल्यामुळे २००९-१० चे खर्चमेळबाबत संबंधित जिल्ह्यांकडून करुन घेण्याचे कामही करावे लागल्याने लेखा परिक्षणासाठी वेळ मिळू शकला नाही. सन २०११-१२ चा लेखा परिक्षण कार्यक्रम प्रस्तावित करण्यात येत असून त्यानुसार जुलै २०११ पासून लेखापरिक्षणाचे काम सुरु करण्यात येईल.

३५ जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, ८१ शासकीय संस्था, १०४ नागरी बाल विकास प्रकल्प अधिकारी इतकी कार्यालयांचे नियमित लेखा परिक्षण करण्यासाठी दोन पथके निर्माण करण्याची कार्यवाही करण्यात येत असून सदर पथकासाठी एक सहाय्यक लेखाधिकारी व दोन लिपीक टंकलेखक असे ३ पदे नवीन मंजूर करणे आवश्यक आहे. एकूण १७ नवीन पदाबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

प्रधान महालेखाकारांच्या निरीक्षण अहवालाना प्रतिसाद -

८.५१ मार्च २००७ अखेर, प्रधान महालेखाकार (लेखा परीक्षा)-I, ने जारी केलेल्या निरीक्षण अहवालांचे २७५ परिच्छेद विभागाकडे प्रलंबित होते. प्रलंबित निरीक्षण अहवालांची/परिच्छेदांची कालनिहाय स्थिती खालीलप्रमाणे होती.

लेखापरीक्षणाचे वर्ष	निरीक्षण अहवाल	परिच्छेद
२००३-०४ पूर्वी	३९	५६
२००३-०४	१३	२९
२००४-०५	२४	४८
२००५-०६	३९	१०७
२००६-०७	२२	३५
एकूण	**१३७**	**२७५**

वरील पैकी, १३ परिच्छेद वसुली (रु.४०.६४ लाख) संदर्भात होते. १४ परिच्छेद अनियमित प्रदाने (रु.२.७६ कोटी), २४ परिच्छेद न्यूगेटरी/निर्थक खर्च (रु.२.९४ कोटी), २१

परिच्छेद टाळता येण्याजोगा खर्च (रु.२७.३१ लाख), तीन परिच्छेद वायफळ गुंतवणूक/निधीचे अडवणूक (रु.७ लाख) राहिलेले परिच्छेद अनियमित कार्यपद्धतीवरील होते.

विभागाच्या विविध घटकांचा लेखापरीक्षणास योग्य प्रतिसादाचा अभाव प्रलंबितावस्था दर्शविते. प्रधान सचिवाने म्हटले (ऑगस्ट २००७) की प्रधान महालेखापालांच्या परिच्छेदांना आणि अंतर्गत लेखापरीक्षणांच्या परिच्छेदांचे अनुपालनासाठी जोमदारपणे (vigorously) पाठपुरावा करण्यांत येईल.

ज्ञापन :

८.५२ उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला.

सध्या आयुक्तालयाअंतर्गत एकुण १९२ परिच्छेद (महिला व बाल विकास -११३ व एकात्मिक बाल विकास सेवा योजना-७९) प्रलंबित आहेत. त्यांचा निपटारा करणे बाबत आढावा बैठकी घेण्यात येत असून त्यानुसार २५ ते ३० एप्रिल, २०११ या कालावधीत विभागवार आढावा बैठका घेण्यात आल्या व त्यात सर्व प्रलंबित परिच्छेदांचे अंतिम अनुपालन महालेखापाल यांना पाठवून परिच्छेद वगळणेबाबत पत्र प्राप्त करुन घेण्याबाबत सुचना देण्यात आलेल्या आहेत व त्याचा आढावा पुढील बैठकीत घेण्यात येईल.

साक्ष :

८.५३ विभागाने पुरविलेल्या उपरोक्त लेखी माहितीच्या आधारे अधिक माहितीसाठी समितीने १२ जुलै, २०११, २१ सप्टेंबर, २०११, २९ फेब्रुवारी, २०१२ व ८ मे, २०१२ रोजी प्रधान सचिव, महिला व बालविकास यांची साक्ष घेतली याबाबत अधिक माहिती घेताना समितीने अशी विचारणा केली की, विभागाने सुधारित अंदाजपत्रक करुन घेतलेले आहे. म्हणजे अंदाजपत्रक कमी करुन घेतले होते. सन २००३-०४ मध्ये ६७९ कोटी रुपयांचे अंदाज दाखविले होते ते ५८६ कोटी रुपयांपर्यंत कमी करुन घेतले आहे. त्यामुळे अखर्चित रक्कम कमी झाली आहे. सुधारित अंदाज ५८६ कोटी रुपयांपर्यंत कमी केले होते. तेवढी रक्कम खर्च झाली आहे काय ? अशी समितीने विचारणा केली असता सचिवानी खुलासा केला की, तेवढी रक्कम खर्च झाली नाही. परंतु बचत कमी झाली. मंजूर रक्कमेपैकी ३६ कोटी रुपये खर्च होऊ शकले नाहीत हे त्यांनी मान्य केले. या रकमेचे प्रमाण ६.१४ टक्के इतके आहे. पूर्वी १२९ कोटी रुपयांची बचत दाखविली होती. ही बचत ३६ कोटी रुपये इतकी आहे. सन २००४-०५

मध्ये २८.७२ कोटी रुपये, सन २००५-०६ मध्ये २७.७३ कोटी रुपये अशी एकूण ९२.५१ बचत झाली असून त्याचे प्रमाण ५.१९ टक्के इतके आहे. हे प्रमाण यापूर्वी २१९.२९ टक्के इतके दाखविण्यात आलेले आहे. तथापि, या ३ वर्षात ९२.५१ कोटी रुपये इतकी रक्कम खर्च होऊ शकली नाही. ही रक्कम खर्च न होण्यासाठी काही मूलभूत कारणे आहेत. यापूर्वी अंदाजपत्रक नीट होत नव्हते. त्यामुळे सर्व अंदाज चुकत होते. तसेच अन्य काही कारणे आहेत त्याचाही अभ्यास केला जात आहे. तसेच या विभागात जे बाल विकास प्रकल्प अधिकारी आहेत ते आहरण व संवितरण अधिकारी म्हणून काम करतात. हे अधिकारी बालविकास प्रकल्प अधिकारी ग्रामविकास विभाग, कृषी विभागामार्फत बदलीने या पदावर आलेले असतात. त्यांना यापूर्वी या कामाचा काहीच अनुभव नसतो. त्यांचे प्रशिक्षण झालेले नसते. मुळात अंदाजपत्रक कसे तयार करावे याची त्यांना कल्पनाच नसते. म्हणून जिल्हा परिषदेच्या वित्त विभागाने कॅश कशी हाताळली पाहिजे, अंदाजपत्रक कसे तयार केले पाहिजे यासाठी एक प्रशिक्षण वर्ग आयोजित करण्यात यावे. यासाठी सूचना देण्यात आलेल्या आहेत. या कामासाठी सांख्यिकी सहाय्यक असतात. काही ठिकाणी लेखाधिकारी नाहीत. या सर्व बाबी आहरण व संवितरण अधिकारी यांना समजल्या नाही तर लेखा शाखेतील अधिकाऱ्यांनी पाहिल्या पाहिजेत. त्यांनी तक्ता तयार केला पाहिजे. परंतु त्यांचे सुद्धा प्रशिक्षण झालेले नाही. म्हणून लेखा शाखेतील अधिकारी, आहरण व संवितरण अधिकारी या दोघांना प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. या वर्षी अंदाजपत्रक तयार करण्याचे प्रशिक्षण सुरु करीत आहोत.

८.५४ या विभागातील अधिकाऱ्यांना यशदा या संस्थेत प्रशिक्षणासाठी पाठविले जाते नव्हते. परंतु आता यशदा सारख्या संस्थेमध्ये प्रशिक्षणासाठी पाठविण्याचा प्रयत्न केला जाईल. तेथे त्यांना प्रशिक्षण दिले जाईल. केंद्र सरकारकडून व सर्वोच्च न्यायालयाकडून या योजनेचा आढावा घेण्याच्या सूचना सातत्याने येत होत्या. त्या सूचनांमध्ये त्यांनी असे म्हटलेले आहे की, "All State Government shall allocate funds for ICDS on the basis of P-1... means 100 beneficiaries per Anganwadi, 300 days of feeding in a year...." राज्य सरकारांनी या विभागासाठी कमी अर्थसंकल्पामध्ये तरतूद ठेवू नये अशी केंद्र सरकारची अपेक्षा आहे. परंतु १०० टक्के लाभार्थी अंगणवाडीत येत नाहीत, काही ठिकाणी सर्व दिवस अंगणवाड्या चालू नसतात. काही कारणांमुळे अंगणवाड्या बंद असतात. सन २००४ मध्ये राज्यात अंगणवाड्यांची संख्या कमी होती. मागील ३-४ वर्षात अंगणवाड्यांच्या संख्येत वाढ झालेली आहे. त्यात सुद्धा

सर्व लाभार्थी येत नाहीत. त्यांच्या वस्त्या लांबच्या ठिकाणी असतात. या कारणांमुळे १०० टक्के लाभार्थी समाविष्ट करता येत नाहीत. परंतु अर्थसंकल्प तयार करीत असताना जास्तीत जास्त तयार केले जात होते. अर्थसंकल्प तयार करीत असताना अचूक अंदाजपत्रक कसे करावे याचे कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन झालेले नाही. मागील वर्षी बालविकास प्रकल्प अधिकारी ना अंदाजपत्रक तयार करण्याच्या प्रक्रियेची माहिती विचारली असता ते काही सांगू शकले नाहीत. खालच्या स्तरावरुन जी माहिती येते त्याच्या आधारावर अंदाजे अर्थसंकल्प तयार केला जात होता. मागील वर्षाच्या अंदाजपत्रकामध्ये १० टक्के वाढ करुन व प्रत्येक अंगणवाडीत १०० टक्के विद्यार्थी आहेत असे गृहित धरुन अंदाजपत्रक तयार केले जात होते. म्हणून विभागाने आता अचूक अंदाजपत्रक तयार करण्याचे प्रशिक्षण देण्याचे ठरविले आहे. या वर्षापासून अर्थसंकल्पाच्या संदर्भात काळजी घेण्याच्या सूचना दिलेल्या आहेत.

८.५५ ही योजना केंद्र सरकारने नव्यानेच सुरु केली होती. ३५ किलोपेक्षा कमी वजन असलेल्या किशोरवयीन मुलींसाठी केंद्र सरकारने पोषण आहार कार्यक्रम सुरु केला होता. त्या योजनेसंबंधी सुद्धा जास्त अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते. ही योजना फेब्रुवारी-मार्च, २००६ साली सुरु करण्यात आली होती. त्यावेळी केंद्र सरकारकडून सुध्दा राज्य सरकारवर ही योजना तात्काळ सुरु करण्यासाठी दबाव होता. त्यामुळे शासनाने तातडीने शासन निर्णय निर्गमित केला होता. या योजनेसाठी यंत्रणांकडून ११ कोटी पेक्षा अधिक रकमेची मागणी आली होती. त्यातून १ कोटी ७० लाख रुपये कमी करुन मागणी करण्यात आली होती. परंतु तेवढी रक्कम सुद्धा खर्च होऊ शकली नाही. यावरुन अधिकारी सर्वसाधारणपणे जादा रकमेचे अंदाजपत्रक तयार करीत होते असे दिसून आले आहे. सचिवानी समितीला जी माहिती दिली आहे, त्यावरुन विभागाने कोणत्या अधिकाऱ्याविरुद्ध ठोस कारवाई केल्याचे दिसून येत नाही. दिनांक १२ जुलै, २०११ रोजी समितीसमोर विभागाची साक्ष झाली होती. समितीने विभागाला ७ वेळा स्मरणपत्रे पाठवूनही या पत्रांची विभागाकडून दखल घेतली गेली नाही हे स्पष्ट झालेले आहे. प्रधान सचिवांनी जी माहिती दिलेली आहे ती दिशाभूल करणारी आहे. लोकलेखा समितीने सात स्मरणपत्रे पाठविली असतांना त्याची दखल घेतली गेलेली नाही. लोकलेखा समितीने पाठविलेली सात स्मरणपत्रे वरिष्ठांच्या नजरेत आणून दिलेली नाहीत असे दोषी असणाऱ्या संबंधितांची केवळ बदली करण्यात आलेली आहे. अधिकाऱ्यांची नियमानुसार २-३ वर्षांनंतर बदली होतच असते. परंतु या ठिकाणी संबंधितांची जी बदली करण्यात आलेली आहे

ती शिक्षा होऊ शकत नाही. खरे म्हणजे संबंधिताला निलंबित करावयास पाहिजे होते असे समितीचे मत आहे. त्या संबंधितांवर कोणती कारवाई केलेली आहे. अशी समितीने विचारणा केली असता काही अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात आले असून उपसचिवांना कारणे दाखवा नोटीस निर्गमित करण्यात आलेल्या आहेत अशी सचिवानी माहिती दिली.

८.५६ एवढा गंभीर विषय असतांना केवळ उपसचिवांची बदली केलेली आहे. खरे म्हणजे या प्रकरणात संबंधितांवर फौजदारी गुन्हा दाखल करुन त्यांना तुरुंगामध्ये पाठवावयास पाहिजे होते. सचिव सुद्धा या विषयाच्या संदर्भात गंभीर नाही असे समितीला वाटते. विभागाकडे जबाबदारी वाढलेली असतांना सुद्धा कर्मचारी वर्ग अपुरा आहे. त्यामुळे कर्मचारी वर्ग वाढवून देण्याबाबत सचिवानी समितीला विनंती केली. त्यावर समितीने असे सांगितले की, कर्मचारी वर्ग कमी आहे असे सांगून आपली जबाबदारी झटकण्याचा प्रयत्न करणे बरोबर नाही. जे अधिकारी लायक नाहीत त्यांना घरी पाठवून त्यांच्या जागी लायक अधिकाऱ्यांना काम करण्याची संधी देणे आवश्यक आहे. तीन महिने होऊन गेले तरी संबंधितांविरुद्ध कारवाई केली नाही हा महत्वाचा मुद्दा आहे. संबंधितांवर कारवाई करण्यासाठी सचिवांना ३-३ महिन्याचा कालावधी लागतो हे निश्चितच गंभीर असून याबाबत समिती तीव्र नाराजी व्यक्त करते.

८.५७ संबंधितांना कारणे दाखवा नोटीस केव्हा दिलेली आहे, संबंधिताविरुद्ध कोणती कारवाई केली. संबंधितांकडून किती दिवसात उत्तर यावयास पाहिजे होते यांसदर्भातील तपशीलवार माहिती समितीला देण्याबाबत सांगितले असता सचिवानी असे सांगितले की, सदरहू माहिती सादर करावयास पाहिजे होती ती बाब संबंधितांच्या लक्षात आलेली नाही. परंतु संबंधित उपसचिवांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आलेली आहे. सचिवानी विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांविरुद्ध कोणतीही कारवाई केलेली नसल्याने समितीने नाराजी व्यक्त केली. लेखा परिक्षणाच्या परिच्छेदासंदर्भात आयुक्त कार्यालयाकडून माहिती मागवली गेली आहे, परंतु त्यासंदर्भात संक्षिप्त उत्तर दिलेले आहे. महालेखाकारांच्या आक्षेपाच्या संदर्भात ते उत्तर असमाधानकारक होते. आयुक्तांनी यांसदर्भात समितीला माहिती देताना असे सांगितले की, संबंधित कोंगळे नावाच्या अधिकाऱ्याला त्याच्या मुळ विभागामध्ये पाठविले गेले आहे. संबंधितांना कारणे दाखवा नोटीस देऊन त्यांचे म्हणणे ऐकून घेण्याची सूचना विभागीय सचिवांनी दिली होती त्या प्रमाणे आयुक्त कार्यालयाकडून काम करण्यात आलेले आहे. या

विषयाच्या संदर्भात तातडीने आदेश होणे गरजेचे होते ही बाब सत्य आहे. आयुक्तालयामध्ये जो प्रस्ताव यावयास पाहिजे होता तो दिला गेला नाही. त्यामुळे संबंधितावर कारवाई होणे अपेक्षित आहे ही बाब रास्त आहे.

८.५८ श्री. कोंगाळे वर्ग एक चे अधिकारी असून त्यांनी आपली जबाबदारी योग्य रितीने पार पाडली नाही त्यामुळे त्यांची विभागीय चौकशी सुद्धा होणार आहे. या कोंगळेच्या संदर्भातील विभागीय चौकशीचा प्रस्ताव महिला व बालकल्याण विभागाकडून गेलेला आहे. श्री. कोंगळे यांच्याकडून खुलासा प्राप्त झालेला आहे.

८.५९ सन १९९०-९१ ते सन २००६-०७ पर्यंत माहिती प्रलंबित होती. या सर्व प्रलंबित प्रकरणाची उत्तरे डिसेंबर २००९ मध्ये मंत्रालयाला पाठविली होती. त्यासंदर्भातील कार्यवाहीची माहिती मंत्रालयाकडून ११ जून, २०११ रोजी प्राप्त झाली. मंत्रालयातून माहिती उशिरा पाठविण्यामध्ये जे कोणी दोषी असतील त्याबाबत सखोल चौकशी करावी अशी समितीची सूचना आहे. यासंदर्भात सचिवांनी असे सांगितले की, आयुक्त कार्यालयाकडून अतिशय त्रोटक माहिती प्राप्त झाली होती. कंत्राटदाराकडून निकृष्ठ प्रतीचा माल मिळतो असा मुद्दा होता. त्रोटक उत्तर असल्यामुळे माहिती अपूर्ण होती. तसेच एक दक्षता पथक स्थापन केल्याचे आयुक्त कार्यालयाने कळविले असून त्यांचा मुद्दा असा होता की, कार्यालयीन आस्थापनेवरील अपुऱ्या कर्मचारी वर्गामुळे दक्षता पथक आतापर्यंत स्थापन करता आले नाही. त्याचबरोबर अशा प्रकारांवर नियंत्रण ठेवण्यासाठी एक समिती सुद्धा स्थापन करण्यात आली आहे. परिपूर्ण माहिती नसल्यामुळे महालेखाकार यांच्याकडे परिच्छेद तपासणीसाठी पाठविण्यात आले नाही. वास्तविक ज्यांनी काम केले नाही त्या अधिकाऱ्याला शासन हे झालेच पाहिजे असे समितीने मत व्यक्त केले.

८.६० डिसेंबर, २००९ मध्ये आयुक्त कार्यालयाने महालेखाकारांच्या परिच्छेदांचे मंत्रालयीन विभागास दिलेले उत्तर समाधान कारक नव्हते हे आयुक्तांना जून २०११ मध्ये कळविण्यात आले. त्यावर समितीने मंत्रालयाकडून इतक्या उशीरा का कळविण्यात आले ? अशी विचारणा केली असता सचिवानी सांगितले की, विभागाच्या अधिकाऱ्यांनी श्री. कोंगळे यांना वेळोवेळी मंत्रालयात बोलावून घेतले. तसेच श्री. कोंगळे हे मुळात वित्त विभागाचे अधिकारी असल्याने तरीही त्यांनी दुर्लक्ष केले. त्यांनी असे सांगितले होते की, आयुक्त कार्यालयाकडून उत्तर दिलेले आहे, आमचे काम झाले आहे. त्यांनी सांगितले की, निकृष्ट

दर्जाचा अन्न पुरवठा होत आहे, त्याबाबत दोन्ही वेळेस प्रयोग शाळेतून तपासणी केली असे सांगून दोन ओळीचे उत्तर त्यांनी दिले व संपूर्ण जबाबदारी विभागावर ढकलण्याचा प्रयत्न केला. पण अशा प्रकारचे असमाधानकारक उत्तर विभाग महालेखापाल यांना पाठवू शकत नव्हते म्हणून यासंबंधीचे सविस्तर स्पष्टीकरण विभागाला करता आले नाही. तसेच काही जिल्ह्यांमध्ये अशा प्रकारचे निकृष्ट अन्न तपासण्यासाठी प्रयोगशाळाच नाहीत मग अशा ठिकाणी कोणती व्यवस्था केली, त्यावर त्यांनी स्पष्टीकरण दिलेच नाही. त्यामुळे याप्रकरणी विभागास कार्यवाही करता आली नाही.

८.६१ लेखापरिच्छेदांबाबत वेळोवेळी विभागाकडून बैठका घेतल्या जातात. त्या बैठकीमध्ये संबंधित अधिकाऱ्यांना बोलाविण्यात येते. परंतु, शासनाकडे अहवाल पाठविण्यात आला आहे, एवढीच उत्तरे त्यांच्याकडून मिळतात व ते निघून जातात. आयुक्तांकडे अन्य अनेक कामे असतात. त्यामुळे लेखापरिच्छेदाबाबत संबंधित सहायक संचालक, वित्त व लेखा यांच्या कडून कार्यवाही अपेक्षित आहे. आयुक्त कार्यालयात लेखे लेखापरिच्छेद, लेखापरीक्षण यासाठी विशेष करुन या अधिकाऱ्यांची नियुक्ती केलेली असते. त्यामुळे त्यांनी लेखापरिच्छेदाबाबत तपशिलवार माहिती देणे गरजेचे आहे.

८.६२ श्री.कोंगळे हे वित्त विभागाच्या अधिनस्त असलेले अधिकारी आहेत. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यावर कोणकोणते दोषारोप आहेत, याबाबतची माहिती वित्त विभागाकडून मागविण्यात आली होती. त्यानुसार महिला व बालकल्याण विभागाने दोषारोपपत्र वगैरे कागदपत्रे दिनांक ३० ऑगस्ट, २०११ रोजी वित्त विभागास सादर केलेली आहेत. आता एका आठवड्याच्या आत वित्त विभागामार्फत संबंधित अधिकाऱ्याविरुद्ध विभागीय चौकशी सुरु करण्याची कार्यवाही सुरु करण्यात येईल असे वित्त सचिवानी सांगितले.

८.६३ समितीने अशी विचारणा केली की, अर्थसंकल्प विषयक कामाचे प्रशिक्षण महिला व बालविकास विभागाची अधिकारी कर्मचारी यांना देण्याची व्यवस्था करणेबाबत वित्त विभागाला कळविण्यात आले आहे काय? यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, अंदाजपत्रकीय अंदाज अचूक न करण्यात आल्यामुळे काही रक्कम अखर्चित राहिली व बचत झाली. त्यामुळे सदरहू निधी प्रत्यार्पित करावा लागला. त्या बाबतची सविस्तर आकडेवारी समितीला सादर केलेली आहे. अंदाजपत्रकीय अंदाज तयार करण्याच्या संदर्भात अचूक कामे होण्यासंबंधी अधिकारी-कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्याची गरज असल्यामुळे त्या संबंधी विभागाने अनेक बैठका घेतल्या

होत्या. महत्वाची बाब अशी आहे की, अंदाजपत्रकीय अंदाज अचूक करण्यासाठी उपलब्ध असलेला कर्मचारीवृंद अतिशय कमी आहे. अनेक ठिकाणी लेखापाल व लेखाधिकाऱ्यांची पदे नाहीत. त्यामुळे सहाय्यक व लिपिक पातळीवर सर्व कामे करावी लागतात. आता काही अधिकार/कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण दिलेले आहे. अजून काही अधिकारी/कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण द्यावयाचे बाकी आहे.

८.६४ अधिकारी/कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यासंबंधीची व्यवस्था करण्याबाबत वित्त विभागाला कळविण्यात आले आहे. दिनांक ३१ मार्च रोजीची वाट न बघता त्यापूर्वीच वित्त विभागाला माहिती कळविली जाते. विभागात कार्यरत असलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना अर्थसंकल्पीय कामकाज कशाप्रकारे करावयाचे याची माहिती नव्हती का अशी समितीने विचारणा केली असता सचिवांनी खुलासा केला की, अंदाजपत्रक तयार करताना आहारासाठी नोंदविलेल्या १०० टक्के मंजूर लाभार्थ्यांची संख्या व ते ३०० दिवस उपस्थित राहतील हे गृहित धरुन त्यानुसार परिगणना केली जात होती. त्यामुळे अत्याधिक अंदाज होत होते. परंतु प्रत्यक्षात लाभ घेणाऱ्या लाभार्थ्यांच्या संख्येनुसारच खर्च झाल्यामुळे रक्कम अखर्चित राहिली.

८.६५ अशा प्रकारे अंदाजपत्रक करण्याची पद्धत वर्षानुवर्षे सुरु होती. त्यामुळे बचत होत होती व ती रक्कम प्रत्यार्पित करावी लागत होती. परंतु या पद्धतीमध्ये आता दुरुस्ती केली आहे. विभाग अचूक अंदाजपत्रक करण्याची काळजी घेत आहे. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, बचत होत असताना सुद्धा निधीची मागणी करण्यात आली. तो निधी दुसऱ्या विभागाला खर्च करण्यासाठी उपयोगी पडला असता याबाबत विभागीय सचिवांनी सांगितले की, बालविकास प्रकल्प अधिकारी पातळीवर कामे केली जातात. परंतु तेथे लेखापाल व लेखाधिकारी नाहीत. तसेच सध्याच्या अर्थसंकल्पामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. या संदर्भात वित्त सचिवांनी अशी माहिती दिली की, महिला व बालविकास विभागाकडून प्रस्ताव प्राप्त झाला होता. त्यात २५३ पदांची गरज आहे. या बाबत प्रशासकीय कार्यवाही सुद्धा झाली आहे. आता नव्याने पदे भरण्यात आली आहेत नियुक्त झालेल्या उमेदवारांचे मे महिन्याखेर प्रशिक्षण पूर्ण होऊन त्यात १८० पदे भरता येतील. तद्नंतर त्यांची नियुक्ती करता येऊ शकेल. तसेच वित्त सचिवांनी अशी विचारणा केली की, सध्या किती पदे मंजूर आहेत, त्यापैकी किती पदे भरलेली आहेत व किती पदे रिक्त आहेत या बाबतची आकडेवारी उपलब्ध आहे का? यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, जिल्हा पातळीवर बालविकास प्रकल्प अधिकारी

कार्यरत असतात. गेल्या ५-१० वर्षांपासून अर्थसंकल्पामध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ झाली आहे. त्यामुळे जास्तीत जास्त लेखा अधिकाऱ्यांची गरज भासत आहे. परंतु तेथे लेखा अधिकारी नाहीत. सदरहू पदे भरण्यासंबंधी विभागाने मागणी केलेली आहे.

८.६६ या संदर्भात आढावा घेतलेला आहे. प्रत्येक जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयात एक सहाय्यक लेखाधिकारी याप्रमाणे ३५ पदे निर्माण करण्याबाबत शासनाकडे प्रस्ताव पाठविला होता. ही पदे भरण्यासंबंधी गेल्या काही वर्षांपासून मागणी केली जात आहे. परंतु त्यावेळी ही मागणी मान्य झाली नव्हती. तरी सुद्धा कामे सुरु आहेत. ती थांबलेली नाहीत. सर्व कामे आर्थिक बाबींशी संबंधित आहेत. महिला व बाल विकास विभागाचे २४०० कोटी रुपयांचा अर्थसंकल्प आहे त्यानुसार प्रत्येक जिल्ह्यासाठी जवळपास ६९ कोटी रुपये मिळू शकतील. इतके मोठे प्रमाणावर अर्थसंकल्प सांभाळणे प्रशिक्षित अधिकारी/कर्मचाऱ्यांशिवाय शक्य होणार नाही. १९९२-९३ पासून आयसीडीएस निर्धारणाचे काम अद्याप झालेले नाही. ते अनेक वर्षे सुरु राहणार आहे. अप्रशिक्षित कर्मचाऱ्यांकडून ही कामे व्यवस्थितपणे होऊ शकत नाहीत, त्यांच्याकडून चुका होऊ शकतील. नवीन भरती झाल्यास फक्त ०.५ टक्के कर्मचाऱ्यांवर खर्च वाढणार आहे. लोकलेखा समितीने सदर पदे भरण्यासंबंधी शासनाकडे शिफारस करावी. विभागात कामाची व्याप्ती फार मोठी आहे. परंतु सदर पदे भरली जात नसल्यामुळे, ती कामे पूर्ण होऊ शकत नाहीत. परंतु कामे करण्यासाठी पदे देता येणार नाहीत असे शासनाकडून सांगण्यात आले होते. जर पदेच मंजूर नसल्यास ती कशी भरता येतील या संदर्भात समितीला सविस्तर माहिती सादर करण्याचे आश्वासित केले होते त्यानुसार समितीस माहिती पुढील तक्त्यामध्ये दर्शविण्यात आली आहे.

विवरणपत्र-1

मंत्रालयीन विभागाचे नाव- महिला व बाल विकास विभाग दि.31.12.2011 अखेरच्या माहितीचे विवरणपत्र

दि.31.12.2011 रोजी सर्व संवर्गातील भरण्यात आलेली पदे व रिक्त पदे यांची एकत्रित माहिती.

गट	दि.1.4.2010 रोजीची मंजूर पदसंख्या			दि.31.12.2011 रोजी रिक्त असलेली पदे			दि.1.1.2012 ते 29.2.2012 या कालावधीत भरलेली पद			एकूण रिक्त पदे (रकाना 3-रकाना 4)			पद भरतीवर निर्बंध नसलेली/निर्बंध शिथील करुन समितीने भरण्यास मान्यता दिलेली पदे			रकाना 6 पैकी 29.2.2012 पर्यंत प्रत्यक्षात भरलेली पदे		
1	2			3			4			5			6			7		
	सरळसेवा	पदोन्नती	एकूण	सरळसेवा	पदोन्नती	एकूण	सरळसेवा	पदोन्नती	एकूण	सरळसेवा	पदोन्नती	एकूण	सरळसेवा	पदोन्नती	एकूण	सरळसेवा	पदोन्नती	एकूण
अ	69	85	154	13	26	39	-	-	-	13	26*	39	-	-	-	-	-	_
ब	37	54	91	35	22	57	10	8	18	25*	14**	39	-	-	-	-	-	_
क	1312	321	1633	269	32	301	-	-	-	269	32	301	109	32	141	-	-	_
ड	686	111	797	23	23	46	-	-	-	23	23	46	8	23	31	-	-	_
एकूण	**2104**	**571**	**2675**	**340**	**103**	**443**	**10**	**8**	**18**	**330**	**95**	**425**	**117**	**55**	**172**	**-**	**-**	_

टिप :-1) गट अ व ब संवर्गातील अनुक्रमे 11-11 अशी 22 पदे भरण्याच्या अनुषंगाने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने दि.3.3.2012 रोजी जाहिरात दिली आहे.

2) गट अ मधील संवर्गात पदोन्नतीसाठी निकटतम संवर्गातून आवश्यक अर्हता प्राप्त अधिकारी वर्ग उपलब्ध होत नाहीत. गट ब संवर्गात पदोन्नतीचा प्रस्ताव विचाराधीन आहे.

3) गट क संवर्गात निर्बंध शिथिल केलेल्या 77 पदांची सरळसेवेने भरतीसंबंधीची जाहिरात देण्यात आलेली आहे.

* शासन निर्णय दि.17.2.2007 अन्वये पदोन्नतीची अर्हता शिथिल करण्याचा प्रस्ताव अ.मु.स. (गृह) यांच्याकडे पाठविला आहे.

** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून आलेल्या शिफारशींपैकी 14 उमेदवारांना नियुक्ती देण्याची कार्यवाही चालू आहे.

गट क मधील परिविक्षा अधिकाऱ्यांची 12 पदे पदोन्नतीने भरण्यात येत आहेत.

महिला व बाल विकास विभाग/का.४

वित्त विभागाकडे पदांचे प्रस्ताव

१	सहायक लेखाधिकारी (महा लेखा व वित्त संवर्ग-३) या वित्त विभागाच्या संवर्गातील पदे. प्रत्येक जिल्ह्याला एक याप्रमाणे एकूण ३५ पदे- खर्चाचा ताळमेळ (Reconcilation) व निर्धारण (Assement) च्या कामासाठी अत्यंत आवश्यक आहे.	वित्त विभागास दि.२६.०९.२०११, दि.१७.११.२०११, दि.२८.०४.२०१२ सद्य:स्थिती दि.२७.०४.२०१२ ला वित्त विभागास प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.
२	अंतर्गत लेखा परीक्षणासाठी १७ पदे राज्यात या विभागाच्या अधिन कार्यालयातील अंतर्गत लेखा परीक्षणासाठी ही पदे आवश्यक आहेत.	वित्त विभागास दि.२.१२.२०११, दि.५.१.२०१२, दि.७.२.२०१२, दि.२६.४.२०१२ ला सादर केला आहे. वित्त विभागाने सदर प्रस्ताव संयुक्त सचिव समितीपुढे चर्चेस ठेवण्यासाठी सुचविले आहे. त्याप्रमाणे वित्त विभागास दि.८.५.२०१२ रोजी प्रस्ताव सादर केला आहे.
३	मंत्रालयात लोकलेखा समिती खर्चाचा ताळमेळ लेखा परीक्षा समिती निर्धारण पाठपुरावा इ.च्या कामासाठी स्वतंत्र कक्ष ४ पदे मंत्रालयात वरील कामासाठी स्वतंत्र कक्ष असणे आवश्यक आहे. परंतु या विभागात स्वतंत्र कक्ष नाही. त्यामुळे ही कामे वेळीच होऊ शकत नाही. त्यामुळे ही पदे अत्यंत आवश्यक आहेत.	वित्त विभागाला दि.२५.११.२०११ व सामान्य प्रशासन विभागास दि.१३.१२.२०११ ला मा.मुख्य सचिव यांना दि.२८.२.२०१२ ला प्रस्ताव सादर केला. दि.१९.३.३०१२ सामान्य प्रशासन विभागाने सहमती दर्शविली. सद्य:स्थिती वित्त विभागाने उच्च स्तरीय सचिव समितीसमोर प्रस्ताव ठेवण्यास सुचविले आहे. त्याप्रमाणे प्रस्ताव कार्यवाहीत आहे.

८.६७ समितीने अशी विचारणा केली की, राज्यात एकूण किती अंगणवाड्या आहेत व लाभार्थ्यांची संख्या किती आहे ? यावर विभागीय सचिवांनी खुलासा केला की, मासिक प्रगती अहवालामध्ये एकूण अंगणवाड्या व लाभार्थ्यांची संख्या दिलेली आहे त्याबाबतची माहिती समितीकडे सादर केली आहे. **(विवरणपत्र-७)**

८.६८ लेखी स्पष्टीकरणात्मक अंदाजपत्रक तयार करताना आहारासाठी नोंदविलेल्या १०० टक्के मंजूर लाभार्थ्यांची संख्या गठीत धरुन अंदाजपत्रक तयार केले जाते असल्याचे नमूद केले आहे. १०० टक्के लाभार्थ्यांची संख्या कशाच्या आधारावर गठीत धरली याबाबत सचिवांनी समितीला अशी माहिती

दिली की, त्यांनी आयुक्त कार्यालयाकडे सुद्धा हाच प्रश्न विचारला होता त्यावेळी असे सांगण्यात आले की, अंगणवाडीमध्ये १०० मुलांची नोंद असल्यास ते ३०० दिवस अंगणवाडीमध्ये येणार असे गृहित धरुन अंदाज तयार केले जात होते. परंतु प्रत्यक्षात आहाराचा लाभ घेणाऱ्या लाभार्थ्यांच्या संख्येनुसार खर्च झाल्यामुळे रक्कम अखर्चित राहिली. परंतु यापुढे अशी पद्धत वापरली जाणार नाही. यापुढे भविष्यात अचूक अंदाज करण्यात येतील असे विभागाने समितीला आश्वासन दिले. समितीने अशी विचारणा केली की, अंगणवाडी सेविकांची नेमणूक कशी केली जाते. त्यांच्यावर कोणामार्फत देखरेख केली जाते. तसेच अंगणवाडी सेविका स्थानिक ठिकाणच्या असतात का? याबाबत विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, अंगणवाडी सेविकांवर पर्यवेक्षिकांकडून देखरेख केले जाते. अंगणवाडी सेविका त्याच गावातील असावी असा नियम आहे. तसेच एखाद्या वेळी त्या गावात अंगणवाडीसाठी सेविका उपलब्ध न झाल्यास ती शेजारच्या गावातून नियुक्त केली जाते. शहरी भागात अंगणवाडी सेविकेची नेमणूक करीत असताना ती त्याच प्रभागामध्ये राहणारी असली पाहिजे. तसेच ग्रामीण भागात अंगणवाडी सेविकेची नेमणूक करीत असताना ती त्याच गावात वास्तव्यास असली पाहिजे. सदरहू शासन निर्णयाची प्रत विभागाने समितीला सादर केली. **(विवरणपत्र-८)**

८.६९ अंगणवाडी पर्यवेक्षिकांचे काम करणाऱ्यांवर कोणत्याही प्रकारचे नियंत्रण नाही. त्यांच्यावर नियंत्रण ठेवणे अत्यावश्यक आहे असे मत समितीने व्यक्त केले. याबाबत विभागीय सचिवांनी सांगितले की, ही अडचण शहरी क्षेत्रातील अंगणवाड्यांच्या संदर्भात येत असेल. ग्रामीण क्षेत्रामध्ये जिल्हापरिषद यंत्रणे मार्फत ही योजना राबविली जात असल्याने जिल्हा परिषदेचे त्यांच्यावर नियंत्रण असते. शहरी क्षेत्रामध्ये तर आयुक्त कार्यालय पुणे येथे असून तेथून मुंबई, नागपूर या सारख्या शहरी भागातील अंगणवाड्यांवर नियंत्रण ठेवले जाते.

८.७० या अंगणवाड्यांवरील कर्मचाऱ्यांवर नियंत्रण ठेवण्याबाबतच्या नियमांत सुधारणा करणे गरजेचे आहे. शिक्षण समित्यांच्या धर्तीवर या अंगणवाड्यांवर स्थानिकांच्या सहाय्याने नियंत्रण ठेवण्यासाठी एखादी समिती स्थापन केली पाहिजे. सध्या या अंगणवाड्यांवर स्थानिकांची देखरेख नाही व विभागाकडून देखील त्यांचे नियंत्रण नाही असे सांगितले जाते. त्यामुळे त्यांचा कारभार त्यांच्या पद्धतीने चाललेला दिसतो. या सर्व गोष्टी टाळण्यासाठी या अंगणवाड्यांवर वचक ठेवण्यासाठी एखादी समिती नेमली जाणार आहे काय? अशी समितीने विचारणा केली असता विभागीय सचिवानी माहिती दिली की, सध्या ग्रामीण पातळीवर एक माता समिती आहे. पोषण आहार समिती, "ग्रामीण आरोग्य आणि स्वच्छता" समिती पूर्वीच आहे. अशा समित्यांना अधिकार देण्यास सुद्धा विभागाची हरकत नाही. स्वच्छता समिती ही शालेय पोषण आहाराबाबत काम करते. प्रत्यक्षात तसे काहीही होत नाही असे

समितीने मत व्यक्त केले असता, विभागाची "एनआरएचएम" खाली एक समिती आहे. असे सचिवांनी सांगितले त्यावर समितीने असे सुचविले की, ती एनआरएचएम खाली असलेली समिती आहे, ती अंगणवाडीसाठी विशेष समिती नाही.

८.७१ स्थानिकांचा सहभाग यामध्ये असला पाहिजे. त्या अभावी निकृष्ट दर्जाचे खाद्य पदार्थ पुरविणे या सारख्या समस्या उद्‌भवतात. अंगणवाडी कर्मचारी तेथे इतरांना, "तुम्हाला अधिकार नाही" असे सांगून हस्तक्षेप करु देत नाहीत. त्यामुळे दोन-तीन लोकांना हाताशी करुन मनाला हवे तसे करण्याची प्रवृत्ती काही ठिकाणी दिसून येते. यामध्ये सुधारणा करण्यासाठी शिक्षण समित्यांप्रमाणे स्थानिकांच्या समित्या ग्रामीण भागात नेमण्याबाबत विभागाची काय भूमिका आहे? अशी विचारणा केली असता याबाबत विभागीय सचिवांनी सहमती दर्शवून अंगणवाड्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी स्थानिक पातळीवर समिती असली पाहिजे असे सांगितले यावर समितीने असे सूचित केले की, या समितीच्या कार्यक्षेत्रामध्ये पोषण आहारापासून ते उपस्थिती पर्यंत सर्वच गोष्टी आल्या पाहिजेत. त्या दृष्टीने या समितीचे कार्यक्षेत्र निश्चित केले पाहिजे. या अंगणवाड्यांवरील निरीक्षकांना त्यांच्या कामाबाबत एक दैनंदिनी सांगण्यात आले पाहिजे. त्यांनी जर अमुक दिवशी अमुक ठिकाणी भेट करावयाचे असे ठरवले असेल तर, त्यांनी ती केली की नाही यावर नियंत्रण ठेवणारे कुणीच नाही. त्यामुळे हे लोकच त्रास देतात. त्यांच्या पुढच्या ३० दिवसांच्या कार्यक्रम गट शिक्षण अधिकाऱ्यांकडे गेला पाहिजे. किंवा कामाचा अहवाल सादर करण्याकरिता अधिकारी त्यांनी नेमून दिली पाहिजे. यावर सचिवांनी असे सांगितले की, समितीच्या निदेशाप्रमाणे बाल विकास प्रकल्प अधिकाऱ्यांना सूचना देण्यात येतील.

८.७२ बालविकास प्रकल्प अधिकारी व अंगणवाडी सेवक यांचे संगनमत असते, त्यांच्यावर कुणाचे नियंत्रण नसते त्यामुळे ते त्यांच्या पद्धतीने काम करतात. हे सगळे टाळावयाचे असेल तर, यामध्ये पारदर्शकता आणण्याच्या दृष्टीने लोकप्रतिनिधींचा सहभाग असला पाहिजे. आपले राज्य अतिशय पुरोगामी विचारांचे म्हणून ओळखले जाते. अशा या राज्यांमध्ये सर्व क्षेत्रात पारदर्शकता असली पाहिजे.

८.७३ अंगणवाड्या मग त्या मुंबई शहरातील असोत किंवा ग्रामीण भागातील परंतु हा प्रश्न लहान मुले, त्यांचा आहार व आरोग्याशी थेट निगडित असलेला महत्त्वाचा विषय आहे. या अंगणवाड्यांवर देखरेख करण्यासाठी जो प्राधिकारी नेमला जाईल त्याने दर २-३ महिन्यांनी तेथील लोकप्रतिनिधींशी संपर्क ठेवून त्यांना कामाबाबतचा अहवाल सादर केला पाहिजे. असे समितीने सूचित केले असता त्यांना बैठका लावण्याचा अधिकार असला पाहिजे. त्यांचा धाक वाटेल अशा प्रकारचे काम त्यांनी केले पाहिजे. यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, समितीने सूचना केल्याप्रमाणे अंगणवाड्यांवरील

नियंत्रणाबाबत लोकप्रतिनिधींना, खालच्या स्तरावरील लोकांना सहभागी करुन घेण्याचा विषय नेहमी उपस्थित केला जातो. भारत सरकारची याबाबत एक संनियंत्रण समिती आहे.

८.७४ महाराष्ट्रामध्ये बालविकास प्रकल्प अधिकाऱ्यांच्या किती जागा रिक्त आहेत? याबाबत विभागीय सचिवांनी सांगितले की, हा फार मोठा गंभीर प्रश्न आहे. महिला व बाल विकास विभागाकडे बालविकास प्रकल्प अधिकारी या संवर्गाचे नियंत्रण दिलेले नाही. बालविकास प्रकल्प अधिकारी यांची रिक्त पदे भरणे, त्यांच्या दैनंदिन कामावर नियंत्रण ठेवणे, बदली, नियुक्ती हे काम विभागाकडे नाही. त्या बाबतचे नियंत्रक प्राधिकारी ग्रामविकास विभागाकडे आहे. महिला व बाल विकास विभाग ५ वर्षांपासून हे संवर्ग आपल्याकडे द्यावे यासाठी पाठपुरावा करीत आहे. जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी हे आयसीडीएसचे प्रमुख निरीक्षक म्हणून काम करतात. त्यांचा संवर्ग सुद्धा ग्रामविकास विभागाकडेच आहे. कृषी, उद्योग असा कोणताही विभाग पाहिला तर त्यांच्या अंतर्गत येणाऱ्या कर्मचाऱ्यांवर त्यांचे नियंत्रण असते. परंतु, महिला व बाल विकास विभागाचे या संवर्गावर तसे नियंत्रण नाही. बालविकास प्रकल्प अधिकारी यांचा संवर्ग महिला व बाल विकास विभागाकडे येण्यासाठी विभागाने काय प्रयत्न केले ? असे समितीने विभागास विचारले असता सचिवांनी माहिती दिली की, या बाबत विभागाने ५ वर्षे पाठपुरावा करुन देखील ग्राम विकास विभागाने त्यास मान्यता दिलेली नाही. ग्राम विकास विभागाचे असे मत होते की, हा संवर्ग महिला व बाल विकास विभागाकडे दिला तर त्यांच्या अखत्यारित असलेल्या कर्मचाऱ्यांना पदोन्नती मिळते कमी होईल. त्यांच्या अखत्यारीतील कर्मचाऱ्यांची पदोन्नतीने बालविकास प्रकल्प अधिकारी म्हणून नियुक्ती केली जाते. त्यांचे संवर्ग जर महिला व बालविकास विभागाकडे दिला तर, त्यांच्या अखत्यारित असलेल्या कर्मचाऱ्यांना त्यांना पदोन्नती मिळते कमी होईल. त्यांच्या अखत्यारीतील कर्मचाऱ्यांची पदोन्नतीने बालविकास प्रकल्प अधिकारी म्हणून नियुक्ती केली जाते. त्यांचे संवर्ग जर महिला व बालविकास विभागाने ग्राम विकास विभागाला त्यांच्या कर्मचाऱ्यांना पदोन्नती मिळणार नाही असा त्यांचा मुद्दा होता. यावर महिला व बालविकास विभागाने ग्राम विकास विभागाला त्यांच्या कर्मचाऱ्यांना पदोन्नती दिल्यानंतर बालविकास प्रकल्प अधिकारी म्हणून घ्यायची तयारी दर्शविली व नंतर त्यांना प्रशिक्षण देऊ असे देखील कबूल केले तरी देखील अद्यापपर्यंत या बाबत निर्णय झालेला नाही. अशी समस्या असेल तर बालविकास प्रकल्प अधिकारी यांचा स्वतंत्र संवर्ग केला पाहिजे. समितीने शासनास तशा प्रकारची शिफारस केली पाहिजे असे मत व्यक्त केले. वित्त सचिवांना बालविकास प्रकल्प अधिकारी यांच्याबाबत आपले अभिप्राय देण्याबाबत समितीने सांगितले असता हा विषय वित्त विभागाशी संबंधित नाही. बालविकास प्रकल्प अधिकारी संवर्गाचे नियंत्रण महिला व बाल विकास विभागाकडे देण्याबाबत ग्रामविकास विभाग व सामान्य प्रशासन विभाग हे अभिप्राय देऊ

शकतील. यावर विभागीय सचिवांनी या संदर्भात विभागाने मुख्य सचिवांकडे देखील शिफारस केलेली आहे, अशी माहिती दिली.

८.७५ अखर्चित निधी इतर कामांकडे वळविला जातो का, असे समितीने विचारले असता सचिवांनी सांगितले की, अखर्चित निधी काही वेळेस मोठी रक्कम प्रत्यार्पित होऊ नये याकरिता ती इतर कामांसाठी वळविला जातो मोठी रक्कम प्रत्यार्पित होऊ नये याकरिता योग्य प्रकारे नियोजन करणे गरजेचे असते. समितीने अशी विचारणा केली की, राज्यातील सर्व लहान मुलांचे चांगले संगोपन व्हावे, त्यांना आहार व आरोग्यविषयक इतर सुविधा मिळून त्यांचे कुपोषणापासून संरक्षण व्हावे या उद्देशाने या अंगणवाड्यांची योजना आणली गेली. परंतु, चांगल्या आहारा बरोबरच चांगले वातावरण हा देखील त्याचा एक भाग आहे. राज्यात अनेक ठिकाणी अंगणवाड्यांच्या इमारतींची दुरावस्था असलेली दिसते. अंगणवाड्यांच्या इमारतीच्या बांधकामाबाबत विभागाने काय पावले उचलली आहेत? यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, ही अंगणवाडी योजना सुरु होऊन आज ३५ वर्षांचा कालावधी झालेला आहे. त्या काळामध्ये या योजनेमध्ये अंगणवाडी इमारत बांधण्याच्या कार्यक्रमासाठी निधीची तरतूद करण्यात आलेली नव्हती. केंद्र शासनाची अशी अपेक्षा होती की, ग्रामपंचायतींनी या बाबतची व्यवस्था केली पाहिजे. त्यामुळे सुरुवातीच्या काळात ग्राम पंचायतींमार्फत अंगणवाड्यांच्या इमारतीचे बांधकाम करण्यात आले. त्या काळात बांधण्यात आलेल्या २० ते ३० वर्षांपूर्वीच्या अंगणवाड्यांच्या इमारतीची आज दूरावस्था झालेली दिसते.

८.७६ गेल्या दोन वर्षांपासून अंगणवाडी इमारतीच्या बांधकाबाबत स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली असून त्या अंतर्गत प्रति अंगणवाडी रुपये साडेचार लाख रुपये इतक्या निधीची तरतूद करण्यात आली आहे. अशा प्रकारे अंगणवाडी इमारतीच्या बांधकामाचे काम सुरु असून त्या कामाकरिता जिल्हानियोजन विकास समितीमार्फत निधी दिला जातो. ग्राम पंचायती मार्फत बहुतेक ठिकाणी अंगणवाडी इमारतीच्या बांधकामाचे काम हाती घेण्यात आलेले आहे.

८.७७ राज्यामध्ये किती अंगणवाड्यांच्या इमारतीचे बांधकाम सुरु आहे, किती अनुशेष आहे. किती इमारती बांधण्यात आल्या आहेत या बाबतच्या सद्यःस्थितीची माहिती विचारली असता त्यावर विभागीय सचिवांनी माहिती दिली की, काही अंगणवाड्या या भाड्याच्या इमारतीमध्ये भरतात, काही समाज मंदिरांमध्ये तर काही आश्रमशाळांमध्ये भरतात. यावर समितीने प्रश्न भाड्याच्या किंवा मालकीच्या इमारतीचा नाही तर किती इमारती बांधण्याची आवश्यकता आहे याबाबत समितीस अवगत करण्यास सांगितले असता राज्यामध्ये सुमारे ४७ हजार इतका अंगणवाडी इमारतींचा अनुशेष आहे. त्यांच्या बांधकामासाठी फार मोठ्या निधीची आवश्यकता आहे कारण, एका अंगणवाडी इमारतीच्या बांधकामासाठी

अंदाजे साडेचार लाख रुपये इतका खर्च अपेक्षित असतो. टप्प्याटप्प्याने हे काम सुरु आहे. त्यावर समितीने असे मत व्यक्त केले की, महाराष्ट्रात ४४ हजार इतकी गावे आहेत व विभागाने सांगितले की, ४७ हजार अंगणवाडी इमारतीचा अनुशेष आहे मग संपूर्ण महाराष्ट्रातील गावांमध्ये एकही अंगणवाडीची इमारती नाही. या ४७ हजार अंगणवाडी इमारतींच्या अनुशेषापैकी शहरी भागात १५ हजार अंगणवाडी इमारतींची आवश्यकता आहे तर उर्वरित इमारती या इतर भागांतील आहेत. अशी माहिती मिळाली. विभागाने जरी वर्षाला ५ किंवा १० हजार इतक्या अंगणवाडी इमारती बांधावयाचे ठरवले तरी, राज्यातील ४४ हजार गावांमध्ये अंगणवाडी इमारती बांधण्यासाठी किमान ४ ते ५ वर्षे तरी लागतील. या कामाकरिता जिल्हा नियोजन विकास समिती आदिवासी विकास विभाग, १३ वा वित्त आयोग अशा प्रकारे ४ ते ५ स्त्रोतांमार्फत निधी उपलब्ध होत असून त्या अंतर्गत इमारतींच्या बांधकामाचे काम वेगाने सुरु झालेले आहे.

८.७८ विभागाच्या संगणकीकरण बाबत विचारले असता विभागाच्या स्तरावर संगणकीकरण झाले आहे. परंतु, खालच्या स्तरावरुन माहिती घेण्यासाठी तेथे प्रत्यक्ष जाऊन किंवा दूरध्वनीद्वारे ती घ्यावी लागते. अशी माहिती समितीस प्राप्त झाली. ही योजना सुरु होऊन ३५ वर्षाचा कालावधी झालेला आहे. इतक्या मोठ्या कालावधी नंतर देखील अतिशय चांगली अशी ही योजना खऱ्या अर्थाने चांगल्या पद्धतीने राबविता आली नाही या बाबत समितीने नापसंती व्यक्त केली. या योजनेला विकासाच्या प्रमुख प्रवाहात आणण्यासाठी प्राधान्याने प्रयत्न केले पाहिजेत अशी देखील समितीने शिफारस केली पाहिजे आदिवासी विकास विभाग व इतरही स्त्रोतापासून तपासून पुरेसा निधी मिळत असताना देखील या योजनेची अवस्था अतिशय वाईट आहे. यावरुन विभागाचे काम फक्त पोषण आहार व अंगणवाडी कर्मचाऱ्यांचे पगार एवढ्या पुरतेच मर्यादित आहे असे समितीचे मत होते. राज्य स्थापनेचा सुवर्ण महोत्सव आपण एका बाजूला साजरा करीत आहोत आणि अंगणवाडी इमारतींचा अनुशेष दूर होण्यासाठी ५ वर्षे लागतील ही अतिशय खेदाची गोष्ट आहे. समितीने या बद्दल तीव्र नापसंती व्यक्त केली. महिला व बाल विकास अंतर्गत जिजामाता महिला विमा आधार योजना, बाल समृद्धी योजना या शिवाय वैयक्तिक लाभाच्या व सामुहिक लाभाच्या योजनांना लाभार्थ्यांचा प्रतिसाद न मिळाल्यामुळे बचत झाली आहे." याचा अर्थ विभाग कामच करीत नाही का? प्रतिसाद मिळणार नाही असे होणार नाही यामध्ये नेमके काय झाले? लोक तर योजनांबाबत कायम विचारणा करत असतात. अशी विचारणा समितीस केली असता, सचिवानी खुलासा केला की, विभागाच्या सगळ्याच योजनाना प्रतिसाद मिळत नाही असे नाही. जननी सुरक्षा योजना, महिला बचत गट, वर्किंग वुमन हॉस्टेल, अंगणवाडी अशा अनेक योजनांना चांगला प्रतिसाद आहे.

८.७९ "महिला व बाल विकास अंतर्गत जिजामाता महिला विमा आधार योजना, बाल समृद्धी योजना या शिवाय वैयक्तिक लाभाच्या व सामुहिक लाभाच्या योजनांना लाभार्थ्यांचा प्रतिसाद न मिळाल्यामुळे बचत झाली आहे" असे विभागाने आपल्या खुलाशात स्पष्ट नमूद करण्यात आले आहे. यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, विभागाच्या ज्या योजनेला कमी प्रतिसाद मिळाला त्या योजनेमध्ये दिले जाणारे अनुदान हे ५०० रुपये इतके आहे. यातून महिलांनी स्वयंरोजगार सुरु करावा अशी अपेक्षा असते. सध्याच्या काळात ५०० रुपये अनुदानाला कोणी महत्त्व देत नाही. कारण या योजनेंतर्गत दिले जाणारे अनुदान हे महिन्याला नाही तर आयुष्यभरात एकदाच ५००/- रुपये असे आहे. असे असेल तर ही रक्कम वाढविली पाहिजे असे समितीने मत व्यक्त केले. या योजनेला कमी प्रतिसाद मिळत असेल तर ती योजना रद्द करुन दुसरी एखादी चांगली योजना आखली पाहिजे असे समितीने सुचविले असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, विभाग या बाबत विचार करुन भरीव अनुदान असणारी योजना आणण्याबाबत प्रयत्नशील आहे.

८.८० बालसमृद्धी विकास योजनेबाबत समितीने विचारणा केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, ही केंद्र शासनाची योजना होती. एखादे मुल जन्माला आल्यानंतर सदरहू योजनेतंर्गत पहिल्या टप्प्यात त्याच्या नावावर काही रक्कम जमा करणे, त्यानंतर ते बालक सहा वर्षाचे झाल्यानंतर, इयत्ता पहिली मध्ये गेल्यास दुसऱ्या टप्प्यात काही रक्कम जमा करणे, तद्नंतर चौथीमध्ये व दहावीमध्ये गेल्यास त्याच्या नावावर अजून काही रक्कम जमा करणे. तसेच ज्या मुलाचे वय १८ वर्षे पूर्ण झाल्यानंतर त्याच्या नावाने जमा झालेली सर्व रक्कम काढून त्यास अदा करणे, अशा प्रकारची ही योजना होती. त्या काळात फक्त ६ वर्षे कालावधीची राष्ट्रीय बचत प्रमाणपत्राची योजना होती. परंतु १८ वर्षे कालावधीसाठी कोणत्याही बँकेची नियत ठेव व अशा प्रकारची दुसरी कोणतीही योजना नव्हती. त्यामुळे या योजनेच्या संदर्भात बँका पुढे आल्या नाहीत. त्यामुळे दुसऱ्या टप्प्याची अदायगी होऊ शकली नाही. सदरहू योजनेतंर्गत पहिल्या टप्प्याची रक्कम अदा करण्यात आली होती. मात्र मूल हयात आहे किंवा कसे, त्याने इयत्ता पहिलीत प्रवेश घेतला आहे किंवा कसे? त्यासंबंधी कोणी आढावा घ्यावयाचा, त्यासंबंधी कोणी तपासणी करावयाची, अशा प्रकारच्या अनेक बाबी निर्माण झाल्या. त्यामुळे या योजनेच यशस्वीरित्या अंमलबजावणी होऊ शकली नाही. या योजनेतंर्गत लाभार्थ्यांना फक्त पहिल्या टप्पा देण्यात आला होता.

८.८१ प्रत्येक वर्षी २८ टक्के ३६ टक्के बचत होत असताना पुरवणी मागणीद्वारे अनुदानाची मागणी का करण्यात आली? यावर सचिवांनी असा खुलासा केला की, ज्या बाबींवर खरोखरच खर्च करणे अत्यावश्यक होते त्याच बाबीवर खर्च केलेला आहे. सुधारित अंदाजपत्रके व रकमा प्रत्यावर्तीत

करणे या बाबत योग्य ती दक्षता घेण्याबाबत व चुकीची माहिती दिल्यामुळे वर्षाखेर कमी जास्त खर्च झाल्यास संबंधितांना जबाबदार धरण्यात येऊन प्रशासकीय कार्यवाही करण्यात येईल असे कळविण्यात आले आहे. त्यानुसार या संदर्भात कोणती कारवाई करण्यात आली? असे समितीने विचारले असता विभागीय सचिवांनी अशी माहिती दिली की, या संदर्भात आयुक्त कार्यालयाच्या स्तरावर कार्यवाही केली आहे. संबंधितांना फक्त सूचना दिलेल्या आहेत. मात्र कोणाविरुद्ध कारवाई केलेली नाही. सुधारित अंदाजपत्रके व रकमा प्रत्यावर्तीत करणे याबाबत योग्य ती दक्षता घेण्याबाबत व चुकीची माहिती दिल्यामुळे वर्षाखेर कमी जास्त खर्च झाल्यास संबंधितांना जबाबदार धरण्यात येऊन प्रशासकीय कार्यवाही करण्यात येईल काय असे समितीने विचारले असता सचिवांनी खुलासा केला की, अत्याधिक अंदाजपत्रक होऊ नये, अचूक अंदाजपत्रकीय अंदाज व्हावे यासाठी आम्ही अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देत आहोत. तसेच या संदर्भात संबंधितांना कडक सूचना दिलेल्या आहेत. विभागाखालील योजनांची अंमलबजावणी आयुक्त, महिला व बाल विकास महाराष्ट्र राज्य यांच्याकडून केली जाते. या लेखाशीर्षाखालील तरतुदींच्या अनुषंगाने त्यांच्या अधिपत्याखाली असलेल्या राज्यात ६०० पेक्षा जास्त आहरणे व संवितरण अधिकाऱ्यांकडून हा खर्च केला जातो. अनेक ठिकाणी लेखा अधिकारी, लेखाधिकार नसल्यामुळे तेथे अत्याधिक अंदाजपत्रक होत होते. परंतु भविष्यात अशा प्रकारची चूक होणार नाही. महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे यांनी या विभागामध्ये जास्त लक्ष घालून, ज्यांनी चुकीच्या पद्धतीने कामे केलेली आहेत त्यांच्याविरुद्ध कारवाई करणे आवश्यक असताना आयुक्तालयाने कारवाई केली नसल्याने समितीने नाराजी व्यक्त केली. खात्याकडून अचूक अर्थसंकल्प करण्यात आले नाही, त्यामुळे काही रक्कम अखर्चित राहिल्यामुळे, ती समर्पित करावी लागली. या संदर्भात समितीने सूचना केल्यानंतर अतिशय दक्षता घेतली जात आहे. तसेच अधिकारी/कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण सुरु आहे. यासंबंधी संबंधितांना सूचना दिलेल्या आहेत. त्यानंतरही ज्यांनी कामात अनियमितता केली आहे, त्यांची विभागीय चौकशी प्रस्तावित करुन त्यांना नोटीसेस निर्गमित केलेल्या आहेत.

८.८२ अर्थसंकल्प विषयक कामाचे प्रशिक्षण महिला व बालविकास विभागातील अधिकारी कर्मचारी यांना देण्याची व्यवस्था करण्याबाबत सचिवांनी खुलासा केला की, दिनांक २२ ते २४ फेब्रुवारी, २०१२ या कालावधीत जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, बालविकास प्रकल्प अधिकारी या संवर्गातील २६ वर्ग-१ अधिकाऱ्यांना वित्तीय व प्रशासकीय बाबींचे प्रशिक्षण देण्यात आले आहे.

८.८३ माहे एप्रिल, २०१२ मध्ये यशदा पुणे येथे जिल्हा महिला व बालविकास अधिकारी/बालविकास प्रकल्प अधिकारी या संवर्गातील ३० वर्ग १ महिन्याचे प्रशिक्षण आयोजित केले आहे. समितीने यापूर्वी सुचविल्याप्रमाणे विभागाने कार्यवाही केलेली आहे. तसेच, दिनांक २७ एप्रिल,

२०१२ रोजी विभागाने वित्त विभागाकडे पद निर्मितीचा प्रस्ताव पाठविला असून तो अमान्य झालेला आहे. यापूर्वी विभागाने वित्त विभागाकडे अशा प्रकारचा प्रस्ताव चार वेळा पाठविला होता. महिला व बालविकास विभागाला राज्याअंतर्गत असलेल्या योजना व केंद्र सरकारच्या योजना उदाहरणार्थ आयसीडीएस योजना राबविण्याकरिता मनुष्यबळाची कमतरता भासते. अशी अधिक माहिती समितीस देण्यात आली. विभागाच्या पदभरतीच्या सद्य:स्थितीबाबत विभागाने प्रत्येक जिल्हा तसेच तालुकानिहाय एक लेखा अधिकारी याप्रमाणे ३५ लेखा अधिकाऱ्यांच्या पदनिर्मितीचा प्रस्ताव वित्त विभागाकडे सादर केला असता त्यांनी अमान्य करुन परत पाठविलेला आहे अशी माहिती देण्यात आली.

८.८४ आयसीडीएस आणि राज्याचा अर्थसंकल्प असे मिळून मोठ्या प्रमाणात या विभागाकडे निधी येतो. या विभागाच्या अर्थसंकल्पात कोठेही कपात करत नसून जास्तीत जास्त निधीचा न्यायनिवाडा करण्याचे काम कोण सांभाळते ? अंदाजपत्रकीय तरतूदी तालुका पातळीवर वितरण करण्याची व नोंद ठेवण्याची जबाबदारी कोणावर आहे? त्यावर सचिवानी खुलासा केला की, तालुका पातळीवर सांख्यिकी सहायक देयके बनविणे, सर्व प्रकारच्या नोंदी ठेवण्याचे काम करीत असतो. हा लेखा संवर्गातील अधिकारी नाही.

८.८५ राज्याच्या व केंद्र सरकारच्या बजेटची व त्याच्या खर्चाच्या नोंदीची जबाबदारी ही लेखा विषयक ज्ञान नसलेल्या व्यक्तीवर ठेवणे कितपत संयुक्तिक आहे ? याकरिता सनदी लेखापाल यांना कंत्राटी पद्धतीने अंदाजपत्रक नियमनाचे व नोंदणीचे काम का दिले जात नाही? अशी समितीने विचारणा केली असता सचिवानी खुलासा केला की, या संदर्भात कोणतीही तरतूद नाही. अंदाजपत्रकीय तरतूद व त्याच्या वितरणाचे काम सांख्यिकी सहाय्यक पाहतो. राज्याच्या व केंद्र सरकारची अंदाजपत्रकीय तरतूद या विभागाकरिता असतांनाही एवढा मोठा खर्च व त्याची नोंद ठेवण्याकरिता तालुका पातळीवर एकही लेखा अधिकारी नाही. ही परिस्थिती भयानक असल्याचे समितीने मत व्यक्त केले असता सचिवानी खुलासा केला की, तालुका पातळीवरील प्रत्येक बालविकास प्रकल्प अधिकाऱ्याच्या ठिकाणी एक लेखाधिकारी याप्रमाणे एकूण ४४९ लेखा अधिकाऱ्यांची विभागाची मागणी आहे. तसेच, प्रती वर्षी केंद्र सरकारच्या व राज्य सरकारच्या अंदाजपत्रकीय तरतूदीचा खर्च व नियोजन याचे विश्लेषण करण्याकरिता एकूण सतरा व्यक्तींच्या पथकाची विभागाची मागणी आहे. त्याकरिता विभागाने वित्त विभागाकडे प्रस्ताव पाठविलेला आहे.

८.८६ वित्त विभागाने महिला व बालविकास विभागाच्या या पदभरतीच्या, पथकाच्या भरतीच्या प्रस्तावाचा साकल्याने व सकारात्मक विचार करणे अत्यंत आवश्यक आहे. असे समितीने सुचविले असता वित्त सचिवांनी सांगितले की, विभागाकडून जे जे प्रस्ताव वित्त विभागाकडे येतात. ते सर्व प्रस्ताव

सर्वप्रथम उच्चाधिकार समितीसमोर मांडले जातात. त्या समितीमध्ये या प्रस्तावांवर विचार विनिमय केला जातो. तसेच, या विभागासमोर चर्चेला आलेले प्रस्ताव मंत्रीमंडळा समोरही चर्चेला पाठविले जातात. बालकल्याण आयोगासंदर्भात माहिती विचारली असता आयोगाने खुलासा केला की, बालकल्याण आयोगाची स्थापना सन २००७ मध्ये झाली. आयोगाची स्थापना झाल्यापासून तीन वर्ष कायमस्वरुपी सदस्य सचिव नव्हते. त्यामुळे या आयोगाचे कामकाज थोडेसे मंदावले होते. आता मात्र या आयोगामध्ये सदस्य सचिव कायमस्वरुपी नेमल्यामुळे तक्रारींची चौकशी करुन राज्य शासनाकडे निवेदन पाठविणे. निवेदनाचा पाठपुरावा करुनही राज्य शासनाने कार्यवाही न केल्यास त्यासंदर्भात उच्च न्यायालयाकडे अपील करण्याचा हक्कही आयोगाला आहे. त्याप्रमाणे आयोगाने आतापर्यंत एकूण १०२१ प्रकरणांपैकी ३४८ प्रकरणांमध्ये आयोगाने चौकशी करुन आवश्यकतेप्रमाणे उच्च न्यायालयाकडे अपील केलेले आहे. काही प्रकरणासंदर्भातील चौकशी आयोगाने पूर्ण केल्यानंतर शासनाकडे पाठविलेल्या निवेदनाचा वारंवार पाठपुरावा करुन देखील जर योग्य ती कार्यवाही होत नसेल तर या संदर्भात आयोगाने स्वत: उच्च न्यायालयासमोर अपील दाखल केल्याचीही उदाहरणे आहेत.

८.७८ महिला व बालकल्याण विभागाने व आयसीडीएस योजनेच्या अनुषंगाने प्रत्येक विभागामधील गरोदर स्त्रियांची नोंद, त्यांचे आरोग्य, त्यांचे औषधोपचार व प्राथमिक चाचण्या याकडे लक्ष देऊन त्याकरिता गरोदर स्त्रियांना डॉक्टरांकडे घेऊन जाण्याची जबाबदारी घेणे आवश्यक आहे. नियमाप्रमाणे हा सर्व त्यांचा कार्यभाग आहे. याबाबत सचिवानी खुलासा केला की, रक्तचाचणीसंदर्भातील पाठपुरावा हा आरोग्य विभागाचा कार्यभाग आहे. केंद्र शासनाच्या माध्यमातून एकात्मिक बालविकास योजना प्रत्येक राज्यामध्ये राबविली जात आहे. त्या अनुषंगाने गरोदर स्त्रियांची नोंद घेऊन त्यांच्या आहाराकडे लक्ष देणे ही योजनेअंतर्गत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची जबाबदारी आहे. तसेच, या स्त्रिया नियमितपणे डॉक्टरांकडे जाऊन प्रिनेटल तपासणी करतात का, याकडे लक्ष देणे ही आहे. रक्तचाचणी व त्याचे अहवाल ही जबाबदारी आरोग्य खात्याची आहे.

८.८८ महिला व बालकल्याण विभागाच्या अंदाजपत्रकाला कोठेही कट लागत नाही. तरीही या विभागाचे राज्य शासनाचे अंदाजपत्रक व केंद्र शासनाकडून मिळणारा पैसा यांचा नीट व प्रभावी वापर न झाल्यामुळे राज्यातील कुपोषण वाढत आहे. हा पैसा खर्च करण्याकरिता प्रभावी व कुशल यंत्रणा असणे अत्यंत आवश्यक आहे. उच्च न्यायालयाने या विभागाच्या खर्चावर व योजनांच्या अंमलबजावणीच्या संदर्भात अनेक ताशेरे ओढलेले आहेत.

८.८९ राज्य शासनाच्या व केंद्र शासनाच्या योजनेनुसार सर्व स्तरावर प्रत्येक छोट्या छोट्या योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी होऊन त्याचे विश्लेषण काटेकोरपणे झाले तरच राज्यातील कुपोषण

संपुष्टात येईल. महिला व बालविकास विभागाच्या सर्व योजनांवर उच्चपदस्थांनी जातीने लक्ष घालून वस्तुस्थितीदर्शक अहवाल नियमितपणे मागवून अनियमितता आढळून आल्यास विनाविलंब कारवाई केल्यानंतरच हे सर्व प्रश्न संपुष्टात येतील. तसेच यासंदर्भात आयोगाचे कोणत्या प्रकारचे नियंत्रण आहे. यावर आयोगाने ही खुलासा केला की, महिला व लहान मुलांच्या शिक्षणासंदर्भातील "शिक्षण हक्क कायदा" अपिलियेट पॉवर आयोगाकडे आहे. तसेच, तक्रार दाखल झाल्यानंतर चौकशीदरम्यान निवेदने पाठविल्यास त्यासंदर्भात राज्य शासनाकडून योग्य ती कारवाई न झाल्यास उच्च न्यायालयामध्ये जाण्याचा अधिकार आयोगाला आहे. ३०४८ तक्रारीसंदर्भात आयोगाने चौकशी केली असल्यास त्यापैकी १०२१ प्रकरणांची चौकशी पूर्ण झालेली असून यापैकी काही प्रकरणासंदर्भात आयोगाने उच्च न्यायालयामध्ये खटले दाखल केलेले असून त्यासंदर्भात सुनावणी चालू आहे.

८.९० पनवेल येथील घटनेनंतर बाल सुधारगृहामध्ये होणाऱ्या घटनांवर नियंत्रण व अनियमिततेविरुद्ध तातडीने योग्य कारवाई करण्याची मोहीम आयोगाने राबविण्यास सुरुवात केलेली आहे. पनवेल येथील बाल सुधारगृहाची परिस्थिती आता बरीच सुधारलेली आहे. तसेच आज संपूर्ण राज्यात ई-मेल साईट सुद्धा निर्माण करण्यात आलेली आहे. अशी समितीस माहिती देण्यात आली.

८.९१ कागदोपत्री सर्व प्रक्रिया पूर्ण करुन भत्ते घेतले जात आहेत, अशा अनेक तक्रारी प्राप्त असून देयकाची तपासणी करुन संबंधितांना अदायगी करण्यासाठी महिला व बाल विकास विभागाकडे आवश्यक तो कर्मचारी वर्ग नसल्याचे समितीने सांगितले असता सचिवानी खुलासा केला की, मुंबई शहरात अशा प्रकारची गंभीर समस्या आहे. ग्रामीण भागात एनआरएचएम योजना राबविली जाते. मुंबई महानगरपालिकेतील आरोग्य विभागाबरोबर महिला व बाल विकास विभागाला काम करावे लागते. ही वस्तुस्थिती आहे. गरोदर मातांची नोंदणी करण्याचे काम अंगणवाडी सेविकांकडून केले जाते. गरोदर मातांना कोणती औषधे दिली पाहिजेत याकरिता ते त्यांना वेळोवेळी माहिती देत असतात. तसेच ज्या प्रकरणांमध्ये रुग्णांना डॉक्टरांकडे घेऊन जायचे असेल, अशा रुग्णांना अंगणवाडी सेविका डॉक्टरांकडे घेऊन जातात. यामध्ये महिलांचे वजन न वाढणे, हिमोग्लोबिन कमी आहे वगैरे कामे केली जातात. यामध्ये समन्वयाचे काम अंगणवाडी सेविकेच्या मार्फत केले जाते.

८.९२ समितीने अशी विचारणा केली की, राज्यात महिला व बाल विकास विभागाने पूरक पोषण आहारावर किती खर्च केलेला आहे? याबाबत सचिवांनी सांगितले की, ५ रुपये प्रती दिन याप्रमाणे वर्षाला पूरक पोषण आहारावर ११०० कोटी रुपयांचा खर्च केला जातो. राज्यात पूरक पोषण आहारावर ११०० कोटी रुपये खर्च करुन देखील कुपोषित बालकांच्या मृत्यूच्या प्रमाणात वाढ होत आहे, ही वस्तुस्थिती आहे.

८.९३ महिला व बाल विकास विभागाकडे आवश्यक तो कर्मचारी वर्ग नसल्यामुळे भ्रष्टाचाराला वाव आहे असे म्हणता येणार नाही. यामध्ये खर्च केला जाणार पैसा योग्य ठिकाणी केला जात नाही, ही समितीची तळमळ आहे. सदर खात्यात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार होत आहे. अहवालात दोषी अधिकाऱ्यांच्या विरोधात कडक कारवाई करण्याबाबत शिफारस करणार आहे. सदर खात्यावर अनेक कंत्राटदार आणि पुढारी लोकांचा सहभाग असतो असे समितीने सांगितले असता सचिवांनी खुलासा केला की, मुंबई सारख्या शहरात हा विषय अतिशय गंभीर आहे. मुंबई शहरात ५ हजारांपेक्षा अधिक अंगणवाड्या आहेत. यावर महानगरपालिकेतील आरोग्य खात्याचे कोणत्याही प्रकारे नियंत्रण नसते. परंतु, जिल्हा परिषदेत मात्र मुख्य कार्यकारी अधिकारी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी आणि गट विकास अधिकारी कामाच्या ठिकाणी प्रत्यक्षात भेट देऊन नियंत्रण ठेवण्याचे काम करीत असतात. परंतु महानगरपालिकेतील आरोग्य विभाग मात्र अशा प्रकारची कार्यवाही करीत नाही. रेशनिंगच्या संदर्भात समित्या आहेत. त्यामध्ये इतर सदस्यांचा देखील समावेश असतो. त्याप्रमाणे अंगणवाड्यांच्या संदर्भात मतदारसंघनिहाय समित्या असल्या पाहिजे. ग्रामीण भागात देखरेख केली जाते. पण मुंबई शहरात केली जात नाही. असे समितीने सुचविले असता सचिवानी खुलासा केला की, जिल्हा परिषदेत मुख्य कार्यकारी अधिकारी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी आणि गट विकास अधिकारी हे प्रत्यक्षात कामाच्या ठिकाणी भेट देऊन नियंत्रण ठेवण्याचे काम करीत असतात. तसेच संबंधितांना पगार, मानधन आणि आहाराची देयके देण्याची कामे देखील संबंधित अधिकाऱ्यांकडून केले जाते. महिला बचत गट कामे करीत नसतील तर ग्रामपंचायतीला महिला बचत गट बदलण्याचे अधिकारी आहेत. ही सर्व कामे जिल्हा परिषदेच्या माध्यमातून केली जातात. परंतु महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये आपल्याला अशा प्रकारची कार्यवाही करता येत नाहीत. याकरिता स्थानिक पातळीवर संबंधितांना अधिकार देण्याची गरज आहे. मिनी अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांचे काम सारखेच असते. त्यांची पेन्शनची मागणी देखील प्रलंबित असून यासंदर्भात विभागाने केंद्र शासनाकडे शिफारस केलेली आहे.

८.९४ समितीने अशी विचारणा केली की, अर्थसंकल्प विषयक कामाचे प्रशिक्षण महिला व बालविकास विभागातील अधिकारी/कर्मचारी यांना देण्याची व्यवस्था करणेबाबत वित्त विभागास कळविण्यात आले आहे काय? यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, अर्थसंकल्प विषयक कामाचे प्रशिक्षण महिला व बाल विकास विभागातील अधिकारी/कर्मचारी यांना देण्याची व्यवस्था करणेबाबत वित्त विभागास कळविण्यात आले आहे. आयुक्तालय स्तरावरुन जानेवारी व फेब्रुवारी, २०१२ मध्ये १०९ कर्मचाऱ्यांना लेखाविषयक प्रशिक्षण दिलेले आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	संवर्ग	कालावधी	प्रशिक्षणार्थी संख्या
१	क.लि./व.लि./सां.साहाय्यक	१०.१.२०१२ ते १२.१.२०१२	१९
२	क.लि./व.लि./सां.साहाय्यक	१६.१.२०१२ ते १८.१.२०१२	१८
३	क.लि./व.लि./सां.साहाय्यक	१९.१.२०१२ ते २१.१.२०१२	२४
४	क.लि./व.लि./सां.साहाय्यक	२३.१.२०१२ ते २५.१.२०१२	२९
५	क.लि./व.लि./सां.साहाय्यक	३१.१.२०१२ ते १.२.२०१२	१९
		एकुण	१०९

८.९५ दिनांक २२ ते २४ फेब्रुवारी, २०१२ या कालावधीत जिल्हा महिला व बालविकास अधिकारी/बालविकास प्रकल्प अधिकारी या संवर्गातील २५ वर्ग-१ अधिकाऱ्यांना वित्तीय व प्रशासकीय बाबींचे प्रशिक्षण देण्यात आले आहे. माहे एप्रिल, २०१२ मध्ये यशदा येथे जिल्हा महिला व बालविकास अधिकारी/बालविकास प्रकल्प अधिकारी या संवर्गातील ३० वर्ग १ महिन्याचे प्रशिक्षण आयोजित केले आहे. यामध्ये अंदाजपत्रक तयार करणे, आकस्मिक निधीतून रकमेचे आहरण कसे करायचे वगैरे प्रशिक्षण संबंधित अधिकाऱ्यांना दिले जात आहे. राज्यात बालमृत्यूचे प्रमाण वाढत चालले आहे. यासंदर्भात महिला व बाल विकास विभागाने समितीला माहिती द्यावी. असे सूचविले असता सचिवानी कमी वजनाची मुले, मध्यम आणि तीव्र वजनाची मुले यासंदर्भातील समितीला माहिती देण्याचे आश्वासित केले. आहार कोणत्या दर्जाचा असावा आणि त्यामध्ये कोणती जीवनसत्वे असावीत यासंदर्भात काही निकष ठरलेले आहेत काय? नमुना तपासणी करण्याकरिता प्रयोगशाळेत पाठविली जातात. याकरिता शासन निर्णय आहे. कुपोषित बालकांचे शहरात, ग्रामीण भागात आणि त्यामध्ये कोणती जीवनसत्वे असावीत यासंदर्भात काही निकष ठरलेले आहेत काय? असे समितीने विचारले असता, कुपोषित बालकांचे शहरात, ग्रामीण भागात आणि वस्त्यांमधील प्रमाण वेगवेगळे असते. यामध्ये खिचडी, गोड खिचडी, लाडू, शिरा, उपमा, ऊसळ वगैरे खाद्य पदार्थ दिली जातात. याची व्यवस्थितरित्या अंमलबजावणी केली जात नसल्याचे समितीने सांगितले असता विभागाला आयुक्त कार्यालयाकडून न्याहारी व दुपारचे जेवण देण्याच्या संदर्भातील अहवाल दिला जात आहे. परंतु हे सर्व कागदोपत्री दाखविले जाते. पण अंमलबजावणी मात्र केली जात नाही. त्यामुळे यासंदर्भात क्रॉस चेकिंग करणारी यंत्रणा निर्माण करण्याची गरज आहे. असे समितीने मत व्यक्त केले असता सचिवानी खुलासा केला की, याकरिता प्रत्येक गावात माता समित्या कार्यरत आहेत. त्यांच्या स्वाक्षरी शिवाय बचत गटांना अदायगी केली जात नाही. ही वस्तुस्थिती आहे. खाद्य पदार्थांचा दर्जा तपासण्याचे काम माता समित्यांच्या मार्फत केले जाते. पूरक पोषण आहाराच्या संदर्भात बचत गट, ठेकेदार ही सर्व यंत्रणा वश केलेली असते.

असे समितीने सांगितले असता सचिवानी खुलासा केला की, जिल्हास्तरावर जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली समिती असते. पोषण आहाराच्या निविदा मागविल्या जातात. महिला गट पुढे येतात त्यांची समिती मार्फत निवड केली जाते. बचत गटा मार्फत दिल्या जाणाऱ्या आहाराचा दर्जा चांगला नसेल तर बचत गट बदलला येतो. चांगल्या धान्याचा पुरवठा ठेकेदाराकडून केला जातो की नाही हेही पाहिले पाहिजे. असे समितीने सुचविले असता सचिवानी खुलासा केला की, जिल्हास्तरावर जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आलेली आहे. त्या समितीला बचत गट असो अथवा ठेकेदार असो त्यांना बदलण्याचे अधिकार आहेत. दरवर्षी नव्याने निविदा मागविल्या जातात. मुंबईमध्ये दरवर्षी नवीन निविदा काढून बचत गटांची निवड केली जाते. त्यावर समितीने अशी विचारणा केली की, दरवर्षी नव्याने निविदा काढण्यात येत असल्या तरी बचत गट तेच असतात. बचत गट आणि ठेकेदार यांच्यावर नियंत्रण ठेवणारी यंत्रणा आहे काय? याबाबत सचिवानी खुलासा केला की, या बाबतीत निवड समितीने काळजी घेतली पाहिजे. ज्यांची निवड केली जाते त्यांनी अटी व शर्ती पूर्ण केलेल्या आहेत की नाहीत हे पाहिजे.

८.९६ समितीने अशी विचारणा केली की, जिजामाता आधार योजना असेल किंवा बाल समृद्धी योजना असेल, राज्य किंवा केंद्र शासनाने ज्या योजना कार्यान्वित केलेल्या आहेत त्यांचा प्रचार आणि प्रसार कशा प्रकारे केला जातो. ज्यांच्यासाठी या योजना कार्यान्वित केलेल्या आहेत त्यांना या योजनांची माहिती आहे काय ? याबाबत विभागीय सचिवांनी माहिती दिली की, सध्या बुकलेटस्, पँपलेटस, रेडिओ जिंगल्स याद्वारे योजनांचा प्रचार आणि प्रसार केला जातो. तसेच जिल्हा परिषदांना महिला मेळावे, माता मेळावे घेऊन त्याद्वारे योजनांची माहिती करुन देण्यास सांगितले जाते. या वर्षी प्रत्येक जिल्ह्याला यासंदर्भात योजना करावयास सांगितलेले आहे. त्यासाठी त्यांना निधी देण्यात येणार आहे. पूर्वी यासाठी तरतूद नव्हती. मागील वर्षी योजनांच्या प्रचार आणि प्रसारासाठी ५ कोटीची तरतूद करण्यात आलेली आहे. बाल विकास अधिकारी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, यांनी योजनांचा प्रचार आणि प्रसार करावयाचा आहे. महिला मेळावे, माता मेळावे, रेडिओ, दूरदर्शन इत्यादी द्वारे योजनांचा जसा प्रचार आणि प्रसार केला जाईल त्याप्रमाणे त्यासाठी निधी दिला जाणार आहे. समितीने असे मत व्यक्त केले की, नवीन गोष्टी करीत असताना मागील चुका दुरुस्त केल्या गेल्या पाहिजेत. या योजना लोकाभिमुख होण्यासाठी, त्या ग्रामस्तरावर पोहोचण्यासाठी आणि त्यांचे योग्य नियंत्रण करण्यासाठी कोणती यंत्रणा निर्माण केलेली आहे? काही बचत गटांकडून मुलांना योग्य प्रकारचा आहार पुरविला जात नाही काही ठिकाणी तर अतिशय भयानक अशी परिस्थिती निदर्शनास आली आहे. यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, महिला बचत गटांनी चांगल्या दर्जाचा आहार देणे अपेक्षित आहे. तसा तो दिला

नाही तर तो बचत गट बदलता येतो. बचत गटा मार्फत चांगल्या दर्जाचा आहार दिला जातो किंवा नाही याचे नमुना पाहणी करण्यासाठी कोणती यंत्रणा आहे? अशी समितीने विचारणा केली असता सचिवानी खुलासा केला की, भरारी पथक निर्माण केलेले आहे. आता विभागीय स्तरावर अधिकारी नेमलेले आहेत. यापूर्वी विभागीय स्तरावर अशी यंत्रणा नव्हती. विभागीय अधिकाऱ्यांनी तपासणी केलेली आहे. गाव पातळीवर माता समित्या नेमलेल्या आहेत.

८.९७ माता समितीच्या रचनेची माहिती देताना अंगणवाडीमध्ये ४० मुले असतील तर त्या मुलांना चांगल्या प्रकारचा आहार मिळतो काय, ज्या ठिकाणी जेवण शिजविले जाते ती जागा स्वच्छ आहे काय, ४० मुलांचे देयक दिले असेल तर प्रत्यक्षात ४० मुले होती काय इत्यादी बाबीची माता समिती पाहणी करु शकते. माता समितीमध्ये मुलांच्या माता असतात. मुलांना चांगला आहार मिळाला पाहिजे हाच आपणा सर्वांचा प्रयत्न आहे असे विभागीय प्रतिनिधीनी सांगितले ग्रामपंचायत ही पंचायती राज व्यवस्थेचा आत्मा आहे. या योजना राबविण्याच्या प्रक्रियेमध्ये ग्रामपंचायतीच्या सरपंचाना सामावून घेता येईल का हे पाहिले पाहिजे. दुसरे असे की, या योजनांवर देखरेख करणारे जे कोणी अधिकारी असतील त्यांच्या नावांची यादी त्या ठिकाणी लागली पाहिजे. म्हणजे ते अधिकारी त्यांचे काम व्यवस्थित करतात की नाही याची पडताळणी करता येईल. असे समितीने सूचीत केले. यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, यामध्ये ग्रामपंचायतींचा सहभाग वाढविणे आवश्यक आहे. या योजना राबविण्यामध्ये जिल्हा परिषदांचा सहभाग आहे. अंगणवाड्यांसाठी बाल विकास प्रकल्प अधिकारी पर्यवेक्षक आहेत. परंतु त्यांच्यावर ग्रामपंचायतीचे पर्यवेक्षण नसते. ही योजना प्रायोगिक तत्त्वावर ग्रामपंचायती मार्फत राबविली जावी. अंगणवाडी ही ग्रामपंचायतीची जबाबदारी होईल. ग्रामपंचायती ऐवजी ग्रामसभेकडे अधिकार द्यावयास पाहिजेत. या प्रक्रियेमध्ये ग्रामपंचायतीला सहभागी करुन घ्यावे जेणेकरुन योजना राबविताना पारदर्शकता येईल आणि दक्षता देखील राहील. अंगणवाडी सेविकांच्या निवड प्रक्रियेतून आमदारांना वगळण्यात आलेले असले तरी योजना राबविण्याच्या कार्यपद्धतीमध्ये आमदारांचा समावेश असला पाहिजे असे मत समितीने व्यक्त केले.

८.९८ पौंगडावस्थेतील मुलींसाठी पोषण कार्यक्रमांतर्गत आकस्मिक निधीतून रु.१.७४ कोटी मंजुरी मिळूनही रु.१६.७४ लाख खर्च करण्यात आले व ३१ मार्च २००६ मध्ये रु.१.५७ कोटी प्रत्यार्पित केले. याबाबत खुलासा करण्याबाबत विभागाला सांगितले असता विभागीय सचिवांनी अशी माहिती दिली. किशोरवयीन मुलींसाठी पोषण कार्यक्रम (NPAG) ही केंद्र पुरस्कृत योजना आहे. ही योजना सुरुवातीला एप्रिल महिन्यामध्ये यावयास पाहिजे होती. परंतु एप्रिल महिन्यामध्ये प्रकरण सादर झाले. यावर नियोजन विभागाकडून, मंत्रीमंडळापुढे जाऊन निर्णय होईपर्यंत वर्ष गेले. सुरुवातीला वर्षभरामध्ये ११ कोटी खर्च

करावयाचे होते. परंतु जसजसा वेळ गेला त्यामुळे खर्च कमी झाला. डिसेंबरपर्यंत ३ कोटी खर्च अपेक्षित होता. त्यासाठी फेब्रुवारी महिन्यामध्ये मान्यता देण्यात आली. त्यावेळी फक्त १ कोटी खर्च अपेक्षित होता. हा खर्च न होण्याची अनेक कारणे आहेत. ही योजना प्रथमच आली. मुलींची गणना करणे, त्यांचे वजन करणे ही कामे वेळेत झाली नाहीत. मुलींच्या परीक्षा सुरु होत्या त्यामुळे मुली पुढे आल्या नाहीत. अशा कारणामुळे मार्चपर्यंत योजना सुरु होऊ शकली नाही. या योजनेवर खर्च करण्यासाठी केंद्र सरकारकडून दबाव येत होता. आता ही योजना व्यवस्थितपणे सुरु झाली आहे.

८.९९ यावर समितीने अशी विचारणा केली की, ३५ किलो पेक्षा कमी वजनाच्या मुलींसाठी ही योजना होती. या योजनेअंतर्गत १६.७४ लाख रुपये फक्त वजन काटे खरेदी करण्यासाठी खर्च करण्यात आलेले आहेत. तसेच महिला सबळीकरण योजना ही काही जिल्ह्यामध्येच सुरु आहे. याबाबत विभागीय सचिवांनी सांगितले की, ही केंद्र शासनाची योजना आहे. ही योजना राबविण्यासाठी केंद्राने ११ जिल्ह्यांची निवड केली होती. ही योजना संपूर्ण राज्यामध्ये राबविण्याबाबतची शिफारस विभागाने केंद्र सरकारला केलेली आहे.

८.१०० समितीने अशी विचारणा केली की, साहित्याचा दर्जा सुधारणे, पुरवठा वेळेवर होणे यादृष्टीने दर-निश्चिती करण्याच्या कार्यपद्धतीत सुधारणा करण्याच्या दृष्टीने शासनाने काही धोरणात्मक निर्णय घेतला आहे काय, असल्यास, त्याचे स्वरुप काय आहे ? याबाबत विभागीय सचिवांनी सांगितले की, शासकीय निवासी संस्थांतील लाभार्थींना चपला आणि इतर जीवनावश्यक वस्तू देण्यात येतात. महिला व बाल विकास विभागाअंतर्गत ४६ शासकीय निवासी संस्थामधील लाभार्थींना नियमितपणे आहार व इतर सुविधा पुरविण्यात येतात. या वस्तू चांगल्या दर्जाच्या असतात. गहू, तांदूळ, डाळी यांची खरेदी करताना चांगल्या दर्जाच्या मालाचेच वर मागविले जातात. समितीने अशी विचारणा केली की, शासकीय संस्थामधील मुले जीवनामध्ये यशस्वी झालेली आहेत काय ? याबाबत विभागीय सचिवांनी सांगितले की, १८ वर्षानंतर या मुलांचे काय होते याची माहिती पूर्वी विभागाकडे नव्हती परंतु आता ही ठेवण्याची पद्धत आता विभागाने सुरु केली आहे. त्यामुळे ही मुले पुढे काय करतात हे समजू शकेल. जोपर्यंत मुले संस्थेमध्ये असतात तोपर्यंतच त्यांच नोंद संस्थेकडे असते. आता त्यांचे पुढील आयुष्याचा मागोवा ठेवण्याची पद्धत सुरु केली आहे. त्यावरुन असे दिसून आले आहे की, काही मुले आयटीआय पर्यंत शिक्षण घेतात तर काही मुले कॉलेजला देखील जातात.

८.१०१ रेल्वे स्टेशनवर मुले चोरी करतात आणि त्यांना न्यायालयात नेल्यानंतर न्यायालयामार्फत त्यांना बाल सुधार गृहात पाठविले जाते. राज्यात असे किती बाल सुधार गृहे आहेत? अनाथालये विभागीय सचिवांनी माहिती दिली की, बाल सुधार गृह अधिनियम वेगवेगळे आहेत. बाल सुधार गृह,

निरीक्षण गृह आणि अनुरक्षण गृह ही तिन्ही वेगवेगळे गृहे आहेत. काही मुले ही वयाच्या १८ वर्षापर्यंत बाल सुधार गृहात राहतात. अनाथालयाऐवजी आता नव्याने बाल सुधार गृह अधिनियम वेगवेगळे आहेत. बाल सुधार गृह, निरीक्षण गृह आणि अनुरक्षण गृह ही तिन्ही वेगवेगळे गृहे आहेत. काही मुले ही वयाच्या १८ वर्षापर्यंत बाल सुधार गृहात राहतात. अनाथालया ऐवजी आता नव्याने बाल सुधार गृह हा शब्द आपण वापरतो.

८.१०२ बाल सुधार गृहातून मुले बाहेर पडल्यावर जातात कोठे, समाज विघातक कामे करतात का, याची माहिती आपल्या विभागामार्फत जाणून घेण्यात येते का? त्यावर सचिवांनी सांगितले की, विभागाने दोन प्रकारची व्यवस्था केलेली आहे. त्यांना रस्त्यावर रहावे लागू नये म्हणून अनुरक्षण गृह सुरु केले आहे. पूर्वी अनुरक्षण गृहे तीन होती. आता पाच वाढवून ती आठ झाली आहेत. या बाल गुन्हेगार मुलांना व्यावसायिक प्रशिक्षण दिले जाते. या मुलांना व्यावसायिक प्रशिक्षण देण्याची योजना राबविण्यासाठी खात्याला लक्ष ठरवून दिलेले आहे.

८.१०३ शासनातर्फे व्यवसाय प्रशिक्षण देण्याची योजना जरी आखली जात असली तरी सर्वांना प्रशिक्षण मिळेलच असेही नाही. अशी मुले रेल्वेच्या ट्रॅकच्या बाजूला राहतात आणि दुर्दैवाने गुन्हेगारी प्रवृत्तीकडे वळतात. ही मुले मुलींवर बलात्कार करतात, वेगवेगळ्या स्वरुपाचे गुन्हे ही मुले बऱ्याच वेळेला करतात, एवढेच नव्हे तर हातात कायदा देखील घेतात. त्यामुळे विभागास ट्रॅकिंग सिस्टीमवर फोकस करावा लागेल.

८.१०४ केंद्र शासनाची एक नवीन एकात्मिक बालविकास योजना आलेली आहे जेणेकरुन मुले रस्त्यावर राहू नये म्हणून ओपन रोल्टर ही केंद्र शासनाची संकल्पना आहे. महिला व बाल विकास खात्यामार्फत कोण कोणत्या योजना राबविल्या जातात? त्या खात्यांना मिळणारे अनुदान, अर्थसंकल्प याबाबतची सविस्तर माहिती समितीला देण्याबाबत आश्वासित करुनही माहिती प्राप्त झाली नाही.

८.१०५ समितीने अशी विचारणा केली, अंगणवाड्यातील मुलांना पोषण आहार देण्यासाठी जेथे अन्न शिजविले जाते तेथे अचानक तपासणी करण्याच्या दृष्टीने शासनाकडून काय कार्यवाही करण्यात येते. मोठ्या शहरात वेगवेगळ्या ठिकाणी अन्न शिजविले जाते. मुंबई, नागपूर, पुणे अशा मोठ्या जिल्ह्यात मध्यवर्ती स्वयंपाकघर आहे. अशा ठिकाणी भेटी देण्यात आल्याचा अहवाल तयार करण्यात आला आहे का? याबाबत विभागीय सचिवांनी माहिती दिली की, अशा प्रकरणांची आयुक्तांनी चौकशी केलेली आहे. मध्यवर्ती स्वयंपाकघर ही संकल्पना मोठ्या शहरात यशस्वी होऊ शकते परंतु तालुका स्तरावर, गावोगावी यशस्वी होणार नाहीत. कारण गावोगावी अंगणवाड्या विखुरलेल्या असतात. शहरी भागात जागेची अडचण येईल परंतु ग्रामीण भागात मात्र जागेची अडचण येणार नाही त्यामुळे मध्यवर्ती

स्वयंपाकघराची ही योजना यशस्वी होऊ शकेल. परंतु यामुळे वाहतुकीचा खर्च देखील वाढेल. परंतु ग्रामीण भागात एका ठिकाणी अन्न शिजवून त्याची वाहतुक करुन ही योजना यशस्वी होऊ शकते. वाहतुकीच्या खर्चाकडे दुर्लक्ष करावे अन्यथा मध्यवर्ती स्वयंपाकघराची योजना ग्रामीण भागात सुरु करण्याची बाब प्रलंबित राहील. त्यावर सचिवानी खुलासा केला की, सर्वोच्च न्यायालयाचा निकाल आहे की, पोषण आहाराचे काम हे महिला बचत गटांना द्यावे. गाव पातळीवर एकत्रित मध्यवर्ती स्वयंपाकघर केले तर महिला बचत गटांना किंवा अन्य महिला संस्थांना हे काम देता येईल.

८.१०६ समितीने अशी विचारणा केली की, एकात्मिक महिला बालविकास विभागामार्फत मुलींची तपासणी केली जाते. परंतु मुलांची मात्र केली जात नाही. मुलींच्या वजनाचा उल्लेख आहे, परंतु मुलांची मात्र तपासणी केली जात नाही. असे महालेखाकारांचे अभिप्राय आहेत. याबाबत विभागीय सचिवांनी माहिती दिली की, अंगणवाडी केंद्रात दर ६ महिन्यातनू एकदा मुलांची आरोग्य तपासणी करण्यात येते. तसेच दर महिन्याला मुलांचे वजन घेण्यात येते. आरोग्य तपासणी करण्यासाठी या विभागाकडे स्वतंत्र अशी यंत्रणा नाही. परंतु ग्रामीण भागात प्राथमिक आरोग्य केंद्राच्या मदतीने व नागरी भागात नगरपालिका/महानगरपालिका येथिल आरोग्य विभागाचे मदतीने मुलांची आरोग्य तपासणी करण्यात येते. मुलांचे नियमित वजन घेण्यात येते. सध्या एकात्मिक बालविकास सेवायोजनेअंतर्गत क्षेत्रातील लाभार्थ्यांची वजन घेण्याची टक्केवारी ८५ ते ९०% आहे. प्राथमिक आरोग्य केंद्राचे दोन डॉक्टर्स असतात. त्यातील एक डॉक्टर्स अंगणवाड्यातील मुलींची तपासणी करतात. अंगणवाडी तपासणीसाठी अतिरिक्त डॉक्टर्स एनआरएचएम योजनेअंतर्गत नियुक्त केले जातात.

८.१०७ समितीने अशी विचारणा केली की, नऊ जिल्हा महिला व बाल विकास कार्यालये आणि जिल्हा परिषदेचे सात उप मुख्य कार्यकारी अधिकारी कार्यालयात प्राप्त झालेल्या प्रस्तावांचा निपटारा आणि लाभार्थींद्वारा त्याचा वापर, यावर लक्ष ठेवण्यासाठी सहाय्यक अनुदान नोंदवह्या ठेवण्यात आल्या नव्हत्या, याचा खुलासा करतांनी सचिवांनी असे सांगितले की, जिल्हा परिषदे अंतर्गत महिला बाल कल्याण समिती आहे. त्यांचेच प्रशासकीय नियंत्रण असते. महिला व बालविकास विभागामार्फत अनेक योजना राबविल्या जातात. महिला व बालविकास विभागामार्फत योजनेची शिफारस केली जाते. परंतु अंतिम निर्णय जिल्हा परिषदेमार्फत घेतला जातो. त्यांच्यावर प्रतिदिन नियंत्रण कसे ठेवावयाचे याचे हा ग्रामविकासाअंतर्गत विषय आहे.

८.१०८ समितीने अशी विचारणा केली की, मशिन वाटप, सायकल वाटपासाठी दारिद्र्य रेषेखालील असल्याची अट आहे काय, तसेच निवड प्रक्रियेसाठी पारदर्शक पद्धत आहे काय? महिला व बाल विकास विभागाच्या अधिपत्याखालील ३४ सहाय्यक आयुक्त मंजूर पदांपैकी ३२ पदे भरलेली आहेत.

परीविक्षा अधिकाऱ्यांची २६३ पदे मंजूर असून त्यापैकी १८५ पदे भरलेली आहेत आणि ७८ पदे रिक्त आहेत. वरिष्ठ लिपिकांची १८४ पदे मंजूर असून त्यापैकी १७१ पदे भरलेली आहेत आणि ७८ पदे रिक्त आहेत. वरिष्ठ लिपिकांची १८४ पदे मंजूर असून त्यापैकी १७१ पदे भरलेली आहेत आणि रिक्त पदे १३ आहेत. परिचारिकांची ५५ पदे मंजूर असून त्यापैकी ४५ पदे भरलेली आहेत आणि १० पदे रिक्त आहेत. सन २००६-२००७ चा हा अहवाल व त्यास आता ६ वर्षे झाली आहेत. एवढ्या वर्षानंतरही आपल्या खात्याला मनुष्यबळ प्राप्त का झाले नाही ? याबाबत विभागीय सचिवांनी माहिती दिली की, महिला व बालविकास विभागामध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून उमेदवारांची भरती केली जाते. तसेच काही प्रमाणात मनुष्यबळ मिळाले आहे, परंतु अजूनही काही पदे रिक्त आहेत. परीविक्षा अधिकाऱ्यांची २६३ पदे मंजूर असून १८५ पदे भरलेली आहेत आणि ७८ पदे रिक्त आहेत. ही पदे भरण्यासाठी जाहीरात दिलेली असून निवड प्रक्रिया सुरु आहे.

८.१०९ समितीने अशी विचारणा केली की, एकात्मिक बालविकास सेवा कार्य करणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांना प्रशिक्षण देण्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे? समिती राज्य स्तरावर तसेच तालुका स्तरावर जाऊन अभ्यास करते, परंतु या विभागामार्फत काम करणारे अधिकारी प्रशिक्षित नसतात. याबाबत विभागीय सचिवांनी केंद्र शासनाकडून प्रशिक्षणासाठी अनुदान मिळते असे सांगितले.

८.११० मॅमसॅमची नवीन पुस्तिका आलेली आहे. अंगणवाडी सेविकांना अजूनही ही पुस्तके व्यवस्थित लिहिता येत नाहीत. लहान मुलांचे वजन, उंची, वय किती आहे त्यावरुन तक्ता तयार करण्यात येतो त्यामुळे मॅम आणि सॅम संदर्भात अंगणवाडी सेविकांना प्रशिक्षण देणे आवश्यक आहे अशी विचारणा समितीने केली असता, विभागीय सचिवांनी सांगितले की, वजन घेतल्यानंतर त्यांना उंची मोजावी लागते. सॅम मॅम ची नव्याने वर्गीकरण करणार आहोत. वजन, उंची मोजण्यासाठी अंगणवाडी सेविकांना प्रशिक्षण देण्यात येते. आता त्यांना उंची मोजण्यासाठी टेप देखील देण्यात येते. मुले ही झोळीमध्ये टाकलेली असतात तेव्हा ते थोडेसे जरी हलले तरी त्यांचे मोजमाप व्यवस्थित घेता येत नाही म्हणून त्यांना इलेक्ट्रॉनिक काटे द्यायला हवीत. असे समितीने सांगितले असता सचिवानी वजन काटे देण्यासाठी प्रयत्न करण्यात येत असून त्यासंदर्भात अंतिम निर्णय विभाग घेण्यात येईल अशी समितीस माहिती दिली.

८.१११ समितीने अशी विचारणा केली की, सन २००३-२००४ नंतरच्या कालावधीच्या अनुदानाच्या निर्धारणाची सद्य:स्थिती काय आहे ? याबाबत सचिवांनी सांगितले की, जिल्हा परिषदांना दिलेल्या अनुदानाचे निर्धारण करण्यात आले असून मुल्य निर्धारणाची सद्य:स्थिती पुढीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	कोणत्या वर्षापासून निर्धारण पूर्ण झाले आहे	अनुदानाचे निर्धारण पूर्ण झालेल्या जिल्हापरिषदांची संख्या
१.	२००५-०६	ठाणे, नांदेड, वाशिम, - ३ जिल्हे
२.	२००६-०७	सिंधुदुर्ग, पुणे, कोल्हापूर, नाशिक, नंदूरबार, जळगाव, गडचिरोली, वर्धा व लातूर - ९ जिल्हे.
३.	२००७-०८	रायगड, रत्नागिरी, धुळे, अहमदनगर, अमरावती, नागपूर, भंडारा, चंद्रपूर, औरंगाबाद, बीड व उस्मानाबाद, - ११ जिल्हे
४.	२००८-०९	सातरा, बुलढाणा, गोंदिया - ३ जिल्हे
५.	२००९-१०	सांगली, अकोला, यवतमाळ - ३ जिल्हे
६.	२०१०-११	सोलापूर - १ जिल्हा
७.	मुल्यनिर्धारण न झालेले जिल्हे	हिंगोली या जिल्ह्याची निर्मिती सन २००३ मध्ये झाली असून तेव्हापासून अनुदानाचे निर्धारण झालेले नाही.

८.११२ खर्च व्यवस्थितपणे केला किंवा नाही हे बघितले जाते आणि न्यायालयात मूल्य निर्धारण करावे लागते. अतिरिक्त कर्मचारी वर्ग देण्यासाठी सरकारला विनंती केलेली असून सदरहू कर्मचारी वर्ग मिळाला तर अनुशेष, मुल्यनिर्धारण या बाबी दुर करता येतील.

८.११३ ३५ सहाय्यक लेखाधिकारी ही वित्त विभागांनी पदे निर्माण करण्याच्या प्रस्तावाची सद्य:स्थिती काय आहे? २००९ मध्ये शासनास प्रस्ताव सादर केला होता. जानेवारी, २०१२ मध्ये तो प्रस्ताव शासनाने अमान्य केला आहे. याबाबत वित्त सचिवानी असे सांगितले की, प्रस्ताव अमान्य का झाला हे त्या प्रस्तावाची नस्ती पाहून सांगावे लागेल. यावर समितीने असे मत नोंदविले की, आवश्यकता लक्षात घेऊन प्रत्येक वेळी महिला व बालविकास विभागाकडून प्रस्ताव सादर केला जाईल आणि वित्त विभागाकडून तो फेटाळला जाईल. या विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन समितीला या प्रश्नामध्ये लक्ष घालावे लागणार आहे. शासनाने नवीन पदे भरती करण्यावर बंदी घातली असली तरी महिला व बालविकास विभागाचा पदे निर्माण करण्याचा प्रस्ताव अमान्य केल्यामुळे ११०० कोटी रुपये खर्च केले जातात त्या खर्चाचे निर्धारण वेळेत पूर्ण होऊ शकत नाही. हा नवीन पदे निर्माण करण्याचा विषय असला तरी ही योजना ग्रामीण भागात व शहरात देखील सुरु आहे. त्या काळात या योजनेत १० लाख मुले अंतर्भूत होणार असतील तर आता ती संख्या ३० ते ४० लाखापर्यंत वाढली असणार. म्हणजे संख्या वाढलेला आहे. या योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी नवीन पदे मागितल्यानंतर ती मंजूर केली जात नाहीत, रिक्त पदे भरण्यास मान्यता दिली जात नाही हे योग्य नाही असे समितीने मत व्यक्त केले.

त्यावर वित्त सचिवानी कोणतीही नवीन पदे निर्माण करण्याचा प्रस्ताव वित्त विभागाकडे सादर केला होता त्याची माहिती समितीला सादर करण्याचे आश्वासित करुनही अद्याप समितीला माहिती प्राप्त नाही.

८.११४ पनवेल मधील मतिमंद मुलींच्या वसतीगृहामध्ये जे प्रकरण उघडकीस आले होते, त्या संदर्भात विभागाने तेथील अधिकाऱ्यांवर कारवाई केली. मात्र ज्यांनी परवानगी दिली होती, त्यांच्यावर कोणतीही कारवाई करण्यात आली नाही. अशी समितीने विचारणा केली.

८.११५ विभागीय सचिवांनी सांगितले की, संबंधितांना निलंबित केले आहे. ज्यावेळी सदर संस्थांना मान्यता दिली होती त्यावेळी श्री.व्ही.डी.देसावळे हे उप आयुक्त म्हणुन कार्यरत होते. श्री.एस.के.शिंदे हे जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी म्हणुन कार्यरत होते. जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांच्या अहवालाच्या आधारावर यास मान्यता देण्यात आली. सध्याचे उप आयुक्त (बालकल्याण) श्री.राठोड यांची अंतर्गत बदली करण्याची सूचना आयुक्तांना देण्यात आली असून त्यांचे ऐवजी श्री.रवी पाटील यांना उप आयुक्त (बालकल्याण) या पदाचा कार्यभार सोपविण्यात आला आहे. यासंदर्भात तत्कालिन व सध्याचे उपायुक्त यांना कारणे दाखवा नोटीस दिली होती व त्याबाबत स्पष्टीकरण प्राप्त झाले असून त्या अधारे कार्यवाही करण्यात येत आहे. सदर संस्थेस परवानगी देण्यास जबाबदार असलेल्या अधिकाऱ्याकडून मागविण्यात आलेला खुलासा प्राप्त झाला असून त्याआधारे पुढील कार्यवाही करण्यात येत आहे. आयुक्त, बाल हक्क संरक्षण आयोग यांच्याकडून या प्रकरणाबाबत चौकशी सुरु करण्यात आलेली आहे. अशा बाबी कोठे घडत असतील तर त्या उघडकीस आणण्यासाठी विभाग प्रयत्नशील आहे. याठिकाणी कोणालाही संरक्षण देण्याचा प्रश्न नाही. आश्रमशाळांमध्ये वाईट प्रकार घडत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर त्या बंद करीत आहोत. आश्रमशाळांतील मुलींना चांगल्या ठिकाणी स्थलांतरीत करीत आहोत. हे प्रथमच घडलेले आहे. विभाग माहिती लपविण्याचा प्रयत्न करीत नाही. एनजीओनी असे प्रकार कोठे घडत असतील तर ते शासनाच्या निदर्शनास आणून द्यावेत असे त्यांना सांगितलेले आहे. कोठे काही चुकीचे घडत असेल तर ते उद्यडकीस आणले पाहिजे. Now, we are encouraging open door policy in our department.

८.११६ समितीने असे मत व्यक्त केले की, इतक्या वर्षानंतर ही बाब उघडकीस आलेली आहे याचा अर्थ असे प्रकार वर्षानुवर्षे चालू होते असा त्याचा दुसरा अर्थ निघू शकतो. अशाप्रकारचे कृत्य करणाऱ्यांना कायद्याचे भय वाटले पाहिजे अशी शिक्षा झाली पाहिजे. याबाबतीत संबंधितांवर अतिशय कडक कारवाई करावी जेणेकरुन कोणीही यापुढे अशा गोष्टी करण्यास धजावणार नाही. यावर विभागीय सचिवांनी या प्रकरणाची चौकशी झाली असून त्याचा अहवाल आलेला आहे. त्या आधारे दोषारोप निश्चित करण्याचे काम सुरु केलेले आहे. या प्रकरणी साक्षीदारांची ओळख करावी लागते. त्या

संस्थेचे अनुदान बंद केलेले आहे आणि तेथील मुलींना दुसऱ्या ठिकाणी स्थलांतरीत केलेले आहे. संस्थाचालकांवर प्रथम खबरी अहवाल दाखल करीत आहोत. ज्याठिकाणी असे गैरप्रकार वा वाईट गोष्टी घडत आहेत त्यांचे अनुदान लगेच बंद करीत आहोत. या प्रकरणी ज्या अधिकाऱ्यांनी संरक्षण दिले असेल त्यांना निलंबित करुन त्यांची विभागीय चौकशी करीत आहोत.

८.११७ ज्यांच्याकडे या पदाचा अतिरिक्त कार्यभार होता त्या कालावधीत त्यांनी निरीक्षण करावयास पाहिजे होते. अहवाल आल्यानंतर त्याची दखल घ्यावयास पाहिजे होते ती घेतली नाही. या बाबी विचारात घेऊन त्यांना निलंबित केलेले आहे. त्यांची विभागीय चौकशी करीत आहोत. बाल विकास अधिकारी सेवा निवृत्त झालेले असल्यामुळे त्यांच्यावर कारवाई करता येत नाही. परंतु आता सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार सेवानिवृत्त झालेल्या अधिकाऱ्यांवरदेखील कारवाई होऊ शकते. त्यामुळे याबाबत सचिवांनी सर्वांवर कारवाई करावी असे समितीने निदेश दिले. अधिकाऱ्यांनी अशा गोष्टी कधीही वरिष्ठांच्या निदर्शनास आणल्या नाहीत, अन्यथा आधीच कारवाई केली असती. अधिकाऱ्यांना तेथे काही आढळले नाही असे समितीला सांगण्यात आले.

८.११८ महालेखाकारांनी आपल्या आक्षेपामध्ये असे नमूद केले आहे की, "The Department had no manual for guidance of their staff" आपण कर्मचाऱ्यांना ४०-५० रुपये मानधन देणार असाल तर कोण काम करेल. उदाहरणार्थ रायगड जिल्हा घेतला तर तो पोलादपूर पर्यंत आहे. कमी मानधन मिळत असेल तर ते एवढ्या लांब जाणार नाही. आपण आपला कर्मचारी वर्गाचा सुधारित आकृतीबंध तयार केला पाहिजे. आपल्या समितीचे बळकटीकरण केले पाहिजे. चांगले कुशल येतील हे पाहिले पाहिजे. एनजीओला जी मदत पाहिजे ती विभाग देत नाही. गेल्या पाच-दहा वर्षात कोणत्याही भारतीय प्रशासकीय सेवेतील (आय.ए.एस.) अधिकाऱ्यांनी वरील बाबींसाठी प्रयत्न केलेले दिसत नाही. अशी समितीने विचारणा केली असता विभागीय सचिवांनी माहिती दिली की, हा विषय संवेदनशील आहे. आता मोठ्या संख्येने बालगृहे सुरु झालेली आहेत. त्या संदर्भातील निकष कडक केलेले आहेत. विभागाने या संदर्भात प्रस्ताव तयार केला असून तो मंत्रिमंडळापुढे सादर केलेला आहे. आपण विभागाच्या बळकटीकरणाचा जो मुद्दा उपस्थित केला तो योग्य आहे.

८.११९ पनवेल या संस्थेस मान्यता मिळण्याचा प्रस्ताव श्री.बुरुड,तत्कालीन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, रायगड यांच्याकडे पाठविण्यात आला होता. त्यांनी शिफारस करुन प्रस्ताव पुढे पाठविला होता. शिफारस करीत असताना टिप्पणीमध्ये सदर संस्थेत गैरप्रकार आढळलेला नाही असे लिहून नस्ती मान्य केली होती. त्यावेळी श्री.देसावळे हे उपायुक्त होते. त्यांच्याकडे प्रस्ताव आल्यानंतर त्यांनी तत्कालीन आयुक्त श्री.बाजीराव जाधव यांच्याकडे प्रस्ताव पाठविला होता. वास्तविक श्री.देसावळे

यांनी प्रस्ताव पाठविण्यापूर्वी मूळ संस्था पुण्याची असताना या संस्थेला मान्यता देण्याचा प्रस्ताव का पाठविला असे श्री.बुरुड यांना विचारणे आवश्यक होते. परंतु त्यांनी या मुद्याकडे दुर्लक्ष केल्यामुळे त्यांच्याविरुद्ध विभागामार्फत कारवाई करणार आहे. या अधिकाऱ्यांना नोटिसेस दिलेल्या आहेत. त्यांच्याकडून विभागाला उत्तर प्राप्त झालेली आहेत. त्याचा अभ्यास सुरु आहे. अशी माहिती समितीस देण्यात आली असता या अधिकाऱ्यांविरुद्ध आवश्यक ती कारवाई तातडीने करण्यात यावी व याप्रकरणी केलेल्या कारवाईची माहिती समितीला देण्याबाबत सांगण्यात आले.

८.१२० विभागाने उच्च न्यायालयात कारवाईची योजना सादर केलेली आहे. जे संस्था चालक मतिमंद मुलींचे बालगृह चालवितात त्यात गैरप्रकार घडू नये या दृष्टीकोनातून हा कृती आराखडा तयार केलेला आहे. त्यात असे नमूद केले आहे की, दुर्गम भागामध्ये किंवा क्षेत्रामध्ये अशा संस्था असू नयेत, कमीत कमी ज्या ठिकाणी वैद्यकीय सुविधा उपलब्ध आहेत अशा ठिकाणी असाव्यात. काही संस्थांना बाल संगोपनाचा अनुभव असतो, त्यांच्याकडे संस्था नसतात अशा संस्थांकडे हे काम द्यावे. केंद्र शासनाच्या आयसीडीएस योजनेतून अर्थसहाय्य देऊन या संस्थांचे बळकटीकरण करुन त्यांना कर्मचारी वर्ग उपलब्ध करुन द्यावा, त्याचप्रमाणे वर्तमानपत्रात जाहिरात देऊन मतिमंद मुलांच्या पालकांना आवाहन केलेले आहे. मतिमंद मुलांपैकी काही पालकांनी आपल्या पाल्याचा प्रवेश घेताना ती संस्था नोंदणीकृत आहे की नाही याची खात्री केल्याशिवाय प्रवेश घेऊ नये. या मुलींनी ज्या संस्थेत प्रवेश घेतला होता ती संस्था नोंदणीकृत नव्हती. दुर्गम क्षेत्रात संस्था चालविताना कोणाचेही लक्ष रहात नाही. ज्या संस्थेमध्ये असा गैर प्रकार घडलेला आहे, त्याचा शोध घेऊन अशा संस्थांविरुद्ध कारवाई करावी अशा पोलीस विभागाला दिलेल्या आहेत. प्रत्येक पोलीस स्टेशनमध्ये बाल संरक्षण अधिकारी नेमलेले आहेत. या अधिकाऱ्यांनी ज्या बोगस संस्था आहेत, ज्या संस्था अनियमितपणे चालतात, अशा संस्था बंद करुन त्यांच्याविरुध्द गुन्हा दाखल केला पाहिजे. जेणे करुन मतिमंद मुलींचे शोषण होणार नाही. त्याचप्रमाणे तेथील कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्याची कार्यवाही सुरु केली पाहिजे. कर्मचारी वर्गाला मान्यता देण्यापूर्वी त्यांनी कोणती दक्षता घेतली पाहिजे, याबाबत समुपदेशक केले जाणार आहे. हे कर्मचारी वैद्यकीय दृष्ट्या प्रशिक्षित नसतात त्यामुळे या कर्मचाऱ्यांचे समुपदेशन करणे व त्यांना प्रशिक्षण देणे याबाबतचा प्रस्ताव केंद्र सरकारकडे विभाग पाठवित आहे अशी माहिती देण्यात आली.

८.१२१ खोटी कागदपत्रे सादर करुन त्याच्या आधारे या मतिमंद मुलींच्या वसतिगृहाला मान्यता दिली हे तपासात पोलिसांनी दाखवून दिले असताना संबंधित अधिकाऱ्याच्या विरुद्ध फौजदारी गुन्हा दाखल करायला पाहिजे होता, असे पोलिसांनी सुद्धा सुचविलेले आहे. तसेच श्रीमती रश्मी करंदीकर यांनी न्यायालयात सादर केलेल्या अहवालात सुद्धा असेच सुचविलेले आहे. विभागाने मात्र संबंधित

अधिकाऱ्यावर फौजदारी गुन्हा दाखल न करता केवळ विभागीय चौकशी करण्यासंबंधीची कारवाई करणे हे संयुक्तिक नाही. तसेच श्रीमती रश्मी करंदीकर यांनी सादर केलेला अहवाल प्रधान सचिव, महिला व बाल विकास यांनी वाचलेला नाही याचा अर्थ या प्रकरणाकडे शासनाचे उच्च अधिकारी गांभीर्याने पाहत नाही असे समितीचे मत झाले.

८.१२२ ज्यांनी खोट्या कागदपत्रांच्या आधाराने संस्थेला मान्यता दिली त्या अधिकाऱ्याविरुद्ध फौजदारी खटले का दाखल केली नाही ? खोट्या कागदपत्रांच्या आधारे वसतिगृहाला मान्यता मिळवून देणे किंवा तशी शिफारस करणे हा एक प्रकारचा गुन्हा आहे, अधिकाऱ्याविरुद्ध विभागीय चौकशी अपेक्षित नाही तर फौजदारी प्रकरण असल्याचे पोलिसांनी सिद्ध करुन दाखविल्याने तशीच केस दाखल होणे आवश्यक आहे. ज्या सेवकाने अशा प्रकारे शासनाला फसविले त्यांच्याविरुद्ध केवळ विभागीय चौकशी नव्हे तर फौजदारी गुन्हा दाखल करणार काय ? अशी समितीने विचारणा केली असता श्री. पी.एम.बुरुड यांच्याविरुद्ध फौजदारी गुन्हा दाखल करण्याच्या सूचना आयुक्तांना तात्काळ देण्यात येतील असे समितीस सांगण्यात आले.

८.१२३ ज्या खोट्या कागदपत्रांच्या आधारे मतिमंद मुलींच्या वसतिगृहाला मान्यता मिळविली ती कागदपत्रे तरी सचिवांनी पाहिली आहेत काय ? असे समितीने विचारले असता, ती कागदपत्रे अद्याप पाहिली नसल्याचे सचिवांनी सांगितले या संवेदनशील प्रकरणात ज्या अधिकाऱ्याची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती केली होती त्या अधिकाऱ्याची भेट घेऊन हे प्रकरण काय आहे हे समजून घेण्याचा तरी प्रयत्न सचिवांनी केला आहे काय ? असे समितीने विचारले असता, सचिवांनी खुलासा केला की, यामध्ये कारवाईचे प्रामुख्याने दोन भाग असतात. एक म्हणजे फौजदारी गुन्ह्याची नोंद पोलिसांमार्फत करण्यात येते व शासनाकडून शासकीय कारवाई केली जाते. त्यानुसार शासनाने विभागीय चौकशीची प्रक्रिया पूर्ण केलेली आहे. समितीच्या सुचनेनुसार संबंधित अधिकाऱ्यावर तात्काळ फौजदारी गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही करण्यात येईल आश्वासन समितीस देण्यात आले.

८.१२४ पनवेल येथील मतिमंद मुलींच्या वसतिगृहात एवढा भयानक प्रकार घडला तरी देखील या प्रकरणात आपण अद्याप विभागीय चौकशी सुद्धा केली नाही. ज्यांनी खोट्या कागदपत्रांच्या आधारे वसतिगृहाला मान्यता देण्याची शिफारस केली त्या अधिकाऱ्याविरुध्द फौजदारी गुन्हा नोंद करणे आवश्यक असताना कोणतीच कारवाई केलेली नाही, केवळ नस्त्याच इकडून तिकडे फिरविण्याचे काम गेल्या काही वर्षांपासून सुरु आहे, याला कोण जबाबदार आहे ? अशी तीव्र शब्दात समितीने नापसंती व्यक्त केली असता, विभागाने "ज्यावेळी सदर संस्थांना मान्यता दिली होती त्यावेळी श्री. व्ही.डी.देसावळे हे उपायुक्त म्हणून कार्यरत होते. तसेच श्री. एस.बी.शिंदे हे जिल्हा महिला व बालविकास अधिकारी

म्हणून कार्यरत होते. त्यांनी दिलेल्या अहवालाच्या आधारावर या वसतिगृहाला मान्यता देण्यात आली. सध्याचे उपायुक्त बालकल्याण श्री. राठोड यांची अंतर्गत बदली करण्याची सूचना देण्यात आली. श्री. देसावले यांच्याविरुध्द कारवाई सुरु करणार आहे अशीही माहिती समितीला देण्यात आली.

८.१२५ या प्रकरणाचा तपास ज्या श्रीमती रश्मी करंदीकर नावाच्या अधिकाऱ्यांनी केला व न्यायालयात अहवाल सादर केला त्या अधिकाऱ्याला न्यायमूर्ती श्री. सी.जे.चंद्रचुड यांनी बोलावून घेतले व प्रशंसा केली तसेच नेरळमध्ये जे नवीन प्रकरण घडले त्या प्रकरणाची चौकशी सुध्दा त्याच अधिकाऱ्याकडे न्यायालयाने सोपविली. विभाग मात्र काही तरी कारवाई करावी म्हणून श्री. राठोड यांची अंतर्गत बदली केली. पण राठोड हे प्रकरण घडल्यानंतर तेथे आले. यावरुन सचिव समितीची दिशाभूल करित आहे असे समितीने निदर्शनास आणले असता सचिवांनी समितीस सांगितले की, आयुक्तांकडून फौजदारी गुन्ह्याची नोंद करण्यासंबंधीचे प्रकरण आमच्याकडे आले असता तर आम्ही फौजदारी गुन्हा दाखल केला असता. हे प्रकरण उघडकीस आल्यानंतर तरी विभागीय चौकशी करणे उचित राहील की फौजदारी गुन्हा दाखल करणे संयुक्तीक राहील यासंबंधीचा अभ्यास करणे अपेक्षित होते. पण क्षेत्रीय पातळीवरील अधिकाऱ्याला अशा प्रकारची फौजदारी कारवाई करावयाची असते याची माहितीच नाही. अशी समितीने टिप्पणी केली असता विभागीय अधिकाऱ्यांनी चौकशीतून काय निष्पन्न होते त्याच्या आधारे पुढील कारवाई करण्यात येते असे नमूद केले. त्यामुळे क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी जरी प्रकरणाचा योग्य अभ्यास केला नसला तरी विभागाचे प्रमुख म्हणून प्रधान सचिव हे सुध्दा तितकेच जबाबदार असतात. तसेच क्षेत्रीय पातळीवर कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांना त्या त्या पातळीवरच अधिकार दिलेले असतात, प्रधान सचिवांपर्यंत अशी प्रकरणे येतच नाहीत. त्यात काही अडचणी आल्याच तर ती प्रकरणे वर मार्गदर्शनासाठी येत असतात. या प्रकरणात तशी कारवाई झालेली नसल्याने समिती तीव्र नाराजी व्यक्त केली.

८.१२६ महिला व बालकल्याण विभाग हा अतिशय महत्वाचा विभाग आहे. या विभागाच्या चुकीच्या कारभारामुळे राज्याची बदनामी होऊ शकते व एक चुकीचा संदेश देशभर जाऊ शकतो. या विभागामुळे या राज्याची प्रतिमा मलीन झाली आहे यादृष्टीकोनातून काही महत्वाचे निर्णय होणे गरजेचे आहे. असे समितीने मत व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी असे सांगितले की, पनवेलच्या प्रकरणामध्ये खोटी कागदपत्रे तयार करुन संस्थेला मान्यता मिळविण्यात आली, हे उघड झाल्यानंतर जिल्हा महिला व बालविकास अधिकारी श्री.बुरुड यांच्या संदर्भातील कारवाई विभागाने सुरु केली आहे. श्री.बुरुड हे सेवानिवृत्त झाले असले तरी त्यांच्याविरुध्द विभागीय चौकशी सुरु करण्यात आली आहे.

श्री.देसावळे यांनी कागदपत्रातील त्रुटींकडे दुर्लक्ष केले, त्या त्रुटी वरिष्ठांच्या निदर्शनास आणून दिल्या नाहीत, यासाठी त्यांच्याविरुध्द देखील फौजदारी कार्यवाही सुरु करण्यात येत आहे.

८.१२७ पनवेल आणि एन.जी.ओ.च्या संदर्भातील स्थिती काय आहे ? त्यामध्ये शहापूरच्या प्रकरणाचा देखील समावेश आहे काय ? अशी समितीने विचारणा केली असता, सर्वांच्या विरुद्ध कारवाई केली असून श्रीमती ज्योती कडू, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, ठाणे; श्रीमती रेणुका चौधरी, जिल्हा परिविक्षा अधिकारी, ठाणे, श्री.शिंदे, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, रायगड; श्री.गव्हाणे, जिल्हा परिविक्षा अधिकारी, रायगड या सगळ्या अधिकाऱ्यांविरुद्ध विभागीय चौकशी सुरु केली आहे आणि त्यांना निलंबित करण्यात आले आहे. सहापैकी दोन अधिकारी निवृत्त झाले आहेत. श्री.गव्हाणे हे दिनांक १८.३.२०११ रोजी निवृत्त झाले आहेत. ते जिल्हा परिविक्षा अधिकारी, रायगड म्हणून कार्यरत होते. आम्ही या सर्व अधिकाऱ्यांविरुद्ध विभागीय चौकशी करीत आहोत. जे अधिकारी निवृत्त झाले आहेत त्यांच्याविरुद्ध विभागीय चौकशी पूर्ण होईपर्यंत त्यांचे निवृत्तीनंतरच्या प्रॉव्हिडंड फंड, पेन्शन आदी आर्थिक लाभातील काही रक्कम रोखून ठेवण्याबाबत चौकशी केव्हा पूर्ण झाल्यानंतर कार्यवाही करता येईल. चौकशी अधिकारी हे सामान्य प्रशासन विभागाकडून नियुक्त केले जातात. चौकशी अधिकाऱ्यांवर लवकर चौकशी पूर्ण करण्याची विनंती करण्यात येत आहे. अशी माहिती देण्यात आली यावर विभागीय प्रकरणाची सद्य:स्थिती काय आहे याची समितीला माहिती द्यावी. समितीकडून सामान्य प्रशासन विभागाच्या प्रतिनिधींना साक्षीसाठी बोलावण्यात येईल. याबाबत वित्त सचिवांनी समितीला माहिती दिली की, सामान्य प्रशासन विभागाने विभागीय चौकशीसाठी चौकशी अधिकाऱ्यांचे पॅनेल तयार केलेले आहे. विभागीय चौकशी करणारे सामान्य प्रशासन विभागाचे अधिकारी नसतात. चौकशी अधिकाऱ्यांनी लवकर चौकशी पूर्ण करावी ही त्यांची सुद्धा जबाबदारी आहे. त्यांच्याकडून सुनावणी घेतली जाते. संबंधितांना नोटीस दिली जाते. त्यांचे म्हणणे ऐकून घेतले जाते. शासनाच्या वतीने सादरकर्ता अधिकारी असतात, ते शासनाची बाजू मांडण्याचे काम करीत असतात. चौकशी अधिकारी दोघांची बाजू ऐकून घेऊन अहवाल सादर करतात. विभागीय चौकशीबाबत प्रगती काय झाली याची माहिती समितीला कळविण्याचे विभागीय सचिवांनी आश्वासित केले त्यानुसार माहिती प्राप्त झाली नाही.

८.१२८ पनवेल प्रकरणी न्यायालयीन सद्य:स्थितीबाबत माहिती देताना सचिवांनी खुलासा केला की, न्यायालयाने एक समिती गठीत केली आहे. मतिमंद मुलांच्या संस्थांच्या कार्यपद्धती बाबत सुधारणा कशी व्हावी, निकष काय असावेत, संस्थांमध्ये कोणकोणत्या सुविधा दिल्या पाहिजेत यासाठी ही समिती नेमली आहे. त्यांचे म्हणणे आहे की, तुम्ही अतिरिक्त मनुष्यबळ दिले पाहिजे, समुपदेशक नेमले

पाहिजेत, फिजिओथेरपीस्ट नेमले पाहिजेत, मुल्यांकन झाले पाहिजे अशा वेगवेगळ्या अटी व शर्ती तयार केलेल्या आहेत. त्या समितीमध्ये तज्ञ लोकांचा समावेश केलेला आहे. समितीमार्फत प्रत्यक्ष संस्थांना भेटी देऊन तपासणी अहवाल दिले जातात.

८.१२९ अधिक माहिती देताना सांगितले की, ज्या संस्थांमध्ये गैरप्रकार झाले त्या पाच संस्था बंद केलेल्या आहेत आणि संस्था चालकांवर फौजदारी गुन्हे दाखल झालेले आहेत. शासनाच्या १९ संस्था सुरु आहेत. त्या १९ संस्थांची यादी, व ज्या ५ संस्था बंद झाल्या त्यांची यादी पत्त्यांसह समितीला आठ दिवसात सादर करण्याचे आश्वासित माहिती प्राप्त झाली आहे. **(विवरणपत्र ९)** ज्या संस्था बंद झाल्या तेथील मुलांची पर्यायी व्यवस्था दुसऱ्या ठिकाणी करण्यात येत आहे. शासनाकडे अशा मुलांसाठी संस्था आणि क्षमता कमी आहे. नव्याने संस्थेला परवानगी देताना उच्च न्यायालयाने नेमलेल्या समितीने निश्चित केलेले निकष म्हणजे त्यांच्याकडे फिजिओथेरेपीस्ट पाहिजे, प्रशिक्षित कर्मचारी पाहिजे. या अटीमुळेच आता संस्था पुढे यायला तयार होत नाही.

८.१३० ज्यांना सरकारी अनुदान मिळते त्यांची संस्था बंद करण्याची मन:स्थिती झाली आहे. असे का होत आहे याची कारणे शोधून काढली पाहिजेत. अधिकाऱ्यांकडून काही चूकीचे काम केले जात असेल तर आम्ही त्यांच्याविरुद्ध कडक कारवाई करु अशा संस्थांनी समोर येऊन माहिती द्यावी. बाल संरक्षण आयोगाच्या संदर्भात समितीला माहिती द्यावी असे सांगितले असता, आयोगाने समितीला माहिती दिली की, बाल संरक्षण आयोगाच्या संदर्भात केंद्र सरकारने २००५ साली अधिनियम तयार केला. बाल हक्काचे संरक्षण करण्यासाठी मानवी हक्क आयोगाच्या धर्तीवर या आयोगाची स्थापना केली आहे. ० ते १८ वर्षापर्यंतची बालके आहेत त्यांच्या अधिकाराच्या संरक्षणाबद्दल हा आयोग आहे. या आयोगाचे काम दोन प्रकारचे आहे. एक म्हणजे विधि विषयक काम जे न्यायालयासारखे चालते, स्वत:कडून प्रकरण दाखल करुन घेऊन त्याची चौकशी करणे. एखादी तक्रार दाखल झाली, त्या तक्रारीमध्ये बालकाची कोणतीही समस्या असो, भ्रूणहत्येपासून कुपोषणापर्यंतचा कोणताही विषय असो त्या संदर्भात एनजीओ किंवा पालकांनी तक्रार केली आणि आयोगापुढे असे प्रकरण आल्यानंतर ते न्यायालयीन प्रकरण होते. न्यायालयाप्रमाणे आयोगापुढे सुनावणी होते. आयोगाने तीन ठिकाणी खंडपीठ स्थापन केली आहेत. औरंगाबाद, नागपूर येथे खंडपीठ आणि मुख्यालय मुंबईमध्ये आहे. मानवी हक्क आयोगाकडून ज्याप्रमाणे सुनावणी घेतली जाते, त्याच पद्धतीने आयोगाकडून सुनावणीचे काम केले जाते. सुनावणीचे काम पूर्ण झाल्यानंतर आयोगाकडून शिफारस केली जाते. आयोगाला चौकशी करताना दिवाणी न्यायालयाचे अधिकार दिलेले आहेत. आयोगाकडून राज्य शासनाला शिफारस केली जाते. पनवेल येथील घटना, कुपोषण किंवा टी.एच.आर. चा मुद्याबाबत आयोगाकडून सविस्तर चौकशी केली जाते. मापदर्शक

निश्चित केले जातात. शासन आणि पक्षकार यांना त्या शिफारशी सादर केल्या जातात. त्या शिफारशी शासनाने मान्य केल्या नाहीत तर आयोगाला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार आयोग स्वतः फौजदारी खटला दाखल करु शकतो.

८.१३१ समितीने अशी विचारणा केली की, महाराष्ट्र राज्यात आयोगाकडून एखादी खटला दाखल केली गेली आहे का ? त्यावर आयोगाने स्वतः खटला दाखल केलेली नाही असे समितीला सांगितले. परंतु शासनाला लेखी लिहिले आहे. शासनाने पनवेल प्रकरणात खटला दाखल केली आहे. आयोगाने टी.एच.आर., महिला बचत गटाबाबत शासनाला शिफारस केलेली आहे. कुपोषणाच्या समस्येबाबत आयोगाने अभ्यास केला आहे. अंगीकृत कौशल्यांचा विकास करण्याबाबत विशेष अहवाल तयार केला आहे. कुपोषण थांबविण्यासाठी शासन पातळीवर, एन.जी.ओ. पातळीवर काय केले पाहिजे याचे मापदर्शक निश्चित केले आहेत. शासनाने किंवा एन.जी.ओ.नी मान्य केले नाही तर आयोगाला स्वतःहून उच्च न्यायालयात प्रकरण दाखल करुन शासनाला किंवा संबंधित अधिकाऱ्याला मापदर्शकाची अंमलबजावणी करण्याचे आदेश द्यावेत अशी विनंती करता येईल. हे आयोगाचे अधिकृत काम आहे. संशोधन करणे हे दुसरे काम आहे. आयोगाला शासन पैसा देत नाही. केंद्र शासनाच्या सर्व शिक्षा अभियानातून पैसे उपलब्ध होतात. युनिसेफकडून निधी मिळावा यासाठी प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. ते निधी द्यावयास तयार आहेत.

८.१३२ आयोगामध्ये रस्त्यावरील मुलांसंदर्भातील काम करण्यासाठी पथक मान्य झाले आहे. आयोगाच्या स्तरावर निधीची कोणतीही अडचण नाही. उलट निधी खर्च करण्यामध्ये अडचण येत आहे. प्रामाणिक लोक पुढे आले पाहिजेत. या वर्षी शासनाच्या महिला व बालविकास विभागाकडून आयोगाने निधी घेतलेला नाही. इतर ठिकाणाहून निधी उपलब्ध झाला आहे, परंतु तो खर्च करण्यास अडचणी आहेत. आयोगाला काम करण्यास प्रामाणिक एन.जी.ओ.मिळाल्या नाहीत म्हणून निधी परत करावा लागला. काही लोकांच्या मुलाखती घेतल्या आहेत, वृत्तपत्रात जाहिराती दिल्या आहेत.

८.१३३ आयोगाचे कार्यालय जीटीएस इमारत, वरळी येथे आहे. आयोगाने यावर्षी मागील तीन वर्षाच्या कालावधीचा अहवाल पहिल्यांदाच तयार केला आहे. तो राज्य शासनाला सादर करावयाचा आहे. सध्या आयोगाकडे ३४८ प्रकरणे आहेत. आयोगाने बऱ्याच मुद्यांवर शासनाला आणि पार्टीला अहवाल दिला आहे. पब्लिक हिअरिंग घेतले आहे. आयोग अहवालामध्ये आपल्या शिफारशी करतो, त्याची अंमलबजावणी करणे हे शासनाचे काम आहे. आयोगापुढे दोन पर्याय आहेत. अंमलबजावणी करण्यासाठी राज्य शासनाला संधी द्यावी लागेल, अन्यथा आयोग न्यायालयामध्ये जाऊ शकतो. आयुक्त कार्यालयासाठी अगोदर कार्यालय तसेच मनुष्यबळ नव्हते परंतु आता सर्व उपलब्ध होत आहे. आता

आयोगाला ३३ तज्ञ मिळाले असून चांगले एनजीओ सुद्धा मिळालेले आहेत. ज्या मुलांना आश्रय नाही अशा मुलांसाठी काही खाजगी संस्था चांगली कामे करीत आहेत. लोणावळ्यामध्ये एक खाजगी संस्था असून या संस्थेचे काम अतिशय चांगले आहे. या संस्थेतील विद्यार्थी व विद्यार्थिनी बहीण-भावांसारखे राहतात. या संस्थांमध्ये शिकणाऱ्या काही मुलांना नोकरी लागलेली असून ते त्यांच्या पगारातील काही हिस्सा संस्थेच्या कामासाठी देत असतात. लोणावळ्यातील संस्था जशी चांगली काम करते तशा प्रकारच्या चांगल्या काम करणाऱ्या अनेक संस्था आहेत.

अभिप्राय व शिफारशी :

८.१३४ विभागाचे वार्षिक अंदाजपत्रक तयार करताना सदर अंदाज शक्यतोवर अचूक करणे, सुधारित अंदाजपत्रकाचा विचार करुन तसेच मागिल तीन वर्षाचे प्रत्यक्ष खर्च व बचत यांचा कल विचारात घेऊन पुढील वर्षाचे अंदाजपत्रक तयार करणे अपेक्षित असते. परंतु महिला व बालविभागामध्ये सुधारित अंदाजपत्रकीय अंदाजात १० टक्के वाढ गृहीत धरुन अंदाजपत्रकास अंतिम रुप देण्यात आल्याचे स्पष्ट झाले. मूळ तरतूदीपेक्षाही खर्च कमी होत असल्याने सुधारीत अंदाजदेखिल विश्वसनीय नव्हते. समितीने घेतलेल्या साक्षीमध्ये विभागाचे अधिकारी सर्वसाधारणपणे अंदाजपत्रक तयार करीत असल्याचे स्पष्ट झाले. त्यामुळे मूळ तरतूदीपेक्षाही कमी खर्च होऊनही सन २००३ ते २००६ या कालावधीत पूरक मागण्या मंजूर केल्या होत्या. सुधारित अंदाजपत्रके व रक्कमा प्रत्यावर्तीत करणे याबाबत योग्य ती दक्षता न घेतल्यामुळे व चुकीची माहिती दिल्यामुळे संबंधितांस जबाबदार धरण्यात येवून प्रशासकीय कारवाई करणे अपेक्षित होते. तसेच स्पष्टीकरणात्मक ज्ञापने देखिल विभागाने महालेखापालांकडून विहित मुदतीत संमत करुन घेतली नव्हती. त्यामुळे विभागास लोकलेखा समितीने ७ वेळा स्मरणपत्रे पाठविली होती. परंतु लोकलेखा समितीच्या स्मरणपत्रांची विभागाने दखल घेतली नाही. तसेच संबंधितांनी ती वरिष्ठांच्या नजरेत आणून दिलेली नाहीत. दोषी असतांना संबंधितांची केवळ बदली करण्यात आलेली आहे. बदली शिक्षा होऊ शकत नाही. संबंधितांची विभागीय चौकशी लावून त्यांना निलंबित करावयास पाहिजे होते असे समितीचे मत आहे. काही अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात आले असून उपसचिवांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेली आहे. परंतु या विषयाच्या संदर्भात सचिव गंभीर नाही असे समितीला वाटते.

८.१३५ तीन महिने होऊन गेले तरी संबंधितांविरुद्ध कारवाई केली नाही. या विषयाच्या संदर्भात तातडीने आदेश होणे गरजेचे होते ते न झाल्यामुळे सचिवांना गंभिरता नसल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे. समितीपुढे आलेल्या माहितीवरुन आयुक्त कार्यालयाकडून महालेखाकारांचा आक्षेपावरुन विभागास प्राप्त झालेले उत्तर अतिशय असमाधानकारक होते असे स्पष्ट झाले. त्यामुळे याप्रकरणी श्री. कोंगळे वर्ग एक चे अधिकारी जबाबदार असून त्यांनी आपली जबाबदारी योग्य रितीने पार पाडली

नाही. **महालेखाकारांच्या अहवालातील परिच्छेदासंबंधी कार्यवाही करण्यास ज्या अधिकारी कर्मचाऱ्यांनी विलंब केला आहे त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करुन त्यांच्या विरुद्ध शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी व याप्रकरणी झालेल्या कारवाईची माहिती समितीला ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

८.१३६ अंदाजपत्रकीय अंदाज तयार करण्याच्या संदर्भात अचूक कामे होण्यासंबंधी अधिकारी-कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्याची गरज असल्यामुळे त्या संबंधी विभागाने अनेक बैठका घेतल्या होत्या. अंदाजपत्रकीय अंदाज अचूक करण्यासाठी उपलब्ध असलेला कर्मचारीवृंद अतिशय कमी आहे. अनेक ठिकाणी लेखापाल व लेखाधिकाऱ्यांची पदे नाहीत. त्यामुळे सहाय्यक व लिपिक पातळीवर सर्व कामे करावी लागतात. विभागात कार्यरत असलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना अर्थसंकल्पीय कामकाज कशाप्रकारे करावयाचे याची माहिती नव्हती अंदाजपत्रक तयार करताना आहारासाठी नोंदविलेल्या १०० टक्के मंजूर लाभार्थ्यांची संख्या व ते ३०० दिवस उपस्थित राहतील हे गृहित धरुन त्यानुसार परिगणना केली जात होती. त्यामुळे अत्याधिक अंदाजपत्रक होत होते. प्रत्यक्षात लाभ घेणाऱ्या लाभार्थ्यांच्या संख्येनुसारच खर्च झाल्यामुळे रक्कम अखर्चित राहिली. ही पद्धत वर्षानुवर्षे सुरु होती. त्यामुळे बचत होत होती व ती रक्कम प्रत्यार्पित करावी लागत होती. या पद्धतीमध्ये विभागाने आता दुरुस्ती करण्याचे चालू केले आहे. बचत होत असताना सुद्धा निधीची मागणी करण्यात आली. तो निधी दुसऱ्या विभागाला खर्च करण्यासाठी उपयोगी पडला असता विभागामध्ये बालविकास प्रकल्प अधिकारी यांच्या पातळीवर अंदाजपत्रक तयार करण्याचे काम केले जाते. हेच अधिकारी तेथे आहरण व संवितरण अधिकारी म्हणून काम पाहतात वास्तविक त्यांना कोणतेही लेखा प्रशिक्षण दिलेले नसते. या विभागात लेखापाल व लेखाधिकारी नाहीत. विभागाच्या अंदाजपत्रकामध्ये देखिल मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे.

८.१३७ प्रत्येक जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयात एक सहाय्यक लेखाधिकारी याप्रमाणे ३५ पदे निर्माण करण्याबाबत शासनाकडे प्रस्ताव पाठविला होता. ही पदे भरण्यासंबंधी गेल्या काही वर्षांपासून मागणी केली जात आहे. परंतु त्यावेळी ही मागणी मान्य झाली नव्हती. तरी सुद्धा कामे सुरु आहेत. ती थांबलेली नाहीत. सर्व कामे आर्थिक बाबींशी संबंधित आहेत. महिला व बाल विकास विभागाचा २४०० कोटी रुपयांचा अर्थसंकल्प आहे. त्यानुसार प्रत्येक जिल्ह्यासाठी जवळपास ६९ कोटी रुपये येतात. एवढ्या प्रमाणावर अर्थसंकल्प सांभाळणे प्रशिक्षित अधिकारी/कर्मचाऱ्यांशिवाय शक्य होणार नाही. अप्रशिक्षित कर्मचाऱ्यांकडून ही कामे व्यवस्थितपणे होऊ शकत नाहीत, त्यांच्याकडून चुका होऊ शकतील. **नवीन भरती झाल्यास फक्त ०.५ टक्के कर्मचाऱ्यांवर खर्च वाढणार आहे. ही बाब लक्षात घेता महिला व बालविकास विभागातील लेख्यांशी व अंदाजपत्रकाशी संबंधित काम करणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण बंधनकारक करुन त्यांची सर्व रिक्त पदे तातडीने भरण्यात यावी व**

याप्रकरणी केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

८.१३८ अंगणवाडी सेविका त्याच गावातील असावी असा नियम आहे. तसेच एखाद्या वेळी त्या गावात अंगणवाडीसाठी सेविका उपलब्ध न झाल्यास ती शेजारच्या गावातून नियुक्त केली जाते. शहरी भागात अंगणवाडी सेविकेची नेमणूक करीत असताना ती त्याच प्रभागांमध्ये राहणारी असली पाहिजे. अंगणवाडी पर्यवेक्षिकांचे काम करणाऱ्यांवर कोणत्याही प्रकारचे नियंत्रण नाही. त्यांच्यावर नियंत्रण ठेवणे अत्यावश्यक आहे असे मत समितीने व्यक्त केले. शहरी क्षेत्रातील अंगणवाड्यांच्या संदर्भात नियंत्रण ठेवण्यास अडचण येते. ग्रामीण क्षेत्रामध्ये जिल्हापरिषद यंत्रणे मार्फत ही योजना राबविली जात असल्याने जिल्हा परिषदेचे त्यांच्यावर नियंत्रण असते. शहरी क्षेत्रामध्ये आयुक्त कार्यालय पुणे येथून मुंबई, नागपूर या सारख्या शहरी भागातील अंगणवाड्यांवर नियंत्रण ठेवले जाते.

८.१३९ या अंगणवाड्यांवरील कर्मचाऱ्यांवर नियंत्रण ठेवण्याबाबतच्या नियमांत सुधारणा करणे गरजेचे आहे. यात जास्तीत जास्त स्थानिकांचा सहभाग असला पाहिजे. अंगणवाडी कर्मचारी तेथे इतरांना, "तुम्हाला अधिकार नाही" असे सांगून हस्तक्षेप करु देत नाहीत. या कर्मचाऱ्यांमध्ये मनाला हवे तसे करण्याची प्रवृत्ती काही ठिकाणी दिसून येते. त्यामुळे अंगणवाड्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी स्थानिक पातळीवर समिती स्थापन करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. या समितीच्या कार्यक्षेत्रामध्ये पोषण आहारापासून ते उपस्थिती पर्यंत सर्वच गोष्टी घेवून समितीचे कार्यक्षेत्र निश्चित केले पाहिजे. या अंगणवाड्यांवरील निरीक्षकांना त्यांच्या कामाबाबत दैनंदिनी ठेवण्याचे बंधनकारक करुन व पुढील ३० दिवसांचा कार्यक्रम गट शिक्षण अधिकाऱ्यांकडे सादर केला गेला पाहिजे किंवा कामाचा अहवाल सादर करण्याकरिता अधिकारी त्यांनी नेमून दिला पाहिजे.

८.१४० बालविकास प्रकल्प अधिकारी व अंगणवाडी सेवक यांच्यावर कुणाचे नियंत्रण नसल्यामुळे यामध्ये पारदर्शकता आणण्याच्या दृष्टीने यात लोकप्रतिनिधींचा सहभाग असला पाहिजे. अंगणवाड्या मग त्या मुंबई शहरातील असोत किंवा ग्रामीण भागातील परंतु हा प्रश्न लहान मुलांशी, त्यांच्या आहार व आरोग्याशी थेट निगडित असलेला महत्त्वाचा विषय आहे. या **अंगणवाड्यांवर देखरेख करण्यासाठी जो प्राधिकारी नेमला जाईल त्याने दर २-३ महिन्यांनी तेथील लोकप्रतिनिधींशी संपर्क ठेवून त्यांना कामाबाबतचा अहवाल सादर केला पाहिजे. अंगणवाड्यांवरील नियंत्रणाबाबत लोकप्रतिनिधींना, तसेच राज्यातील जनतेला सहभागी करुन घेण्यात यावे अशी समितीची शिफारस आहे.**

८.१४१ महिला व बाल विकास विभागाकडे बाल विकास प्रकल्प अधिकारी या संवर्गाचे नियंत्रण दिलेले नाही. बालविकास प्रकल्प अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरणे, त्यांच्या दैनंदिन कामावर नियंत्रण ठेवणे, बदली, नियुक्ती हे काम विभागाकडे नाही. त्या बाबतची नियंत्रक प्राधिकारी ग्राम विकास विभाग आहे. महिला व बाल विकास विभाग ५ वर्षांपासून हा संवर्ग आपल्याकडे द्यावे या मागणीसाठी पाठपुरावा

करीत आहे. जिल्हा परिषदेचे डेप्युटी सीओ हे आयसीडीएसचे प्रमुख निरीक्षक म्हणून काम करतात. त्यांचा संवर्ग सुद्धा ग्रामविकास विभागाकडेच आहे. हा **संवर्ग महिला व बाल विकास विभागाकडे दिला तर त्यांना पदोन्नती मिळणार नाही असा त्यांचा मुद्दा ग्रामविकास विभागाने उपस्थित केला होता. परंतु याबाबत उपाययोजना करण्याचे महिला व बालविकास विभागाने मान्य करुनही अद्याप ग्रामविकास विभागाने कार्यवाही केली नसल्याने बालविकास प्रकल्प अधिकाऱ्यांचा स्वतंत्र संवर्ग तयार करुन त्याचे नियंत्रण महिला व बालविकास विभागाकडे देण्यात यावे अशी समितीची शिफारस आहे.**

८.१४२ राज्यातील सर्व लहान मुलांचे चांगले संगोपन व्हावे, त्यांना आहार व आरोग्यविषयक इतर सुविधा मिळून त्यांचे कुपोषणापासून संरक्षण व्हावे या उद्देशाने या अंगणवाड्यांची योजना आणली गेली. परंतु, चांगल्या आहारा बरोबरच चांगले वातावरण हा देखील त्याचा एक भाग आहे. राज्यात अनेक ठिकाणी अंगणवाड्यांच्या इमारतींची दुरावस्था असलेली दिसते. अंगणवाडी योजना सुरु होऊन आज ३५ वर्षांचा कालावधी झालेला आहे. त्या काळामध्ये या योजनेमध्ये अंगणवाडी इमारत बांधण्याच्या कार्यक्रमासाठी निधीची तरतूद करण्यात आलेली नव्हती. केंद्र शासनाची अशी अपेक्षा होती की, ग्रामपंचायतींनी या बाबतची व्यवस्था केली पाहिजे. त्यामुळे सुरुवातीच्या काळात ग्राम पंचायतींमार्फत अंगणवाड्यांच्या इमारतीचे बांधकाम करण्यात आले. त्या काळात बांधण्यात आलेल्या २० ते ३० वर्षांपूर्वीच्या अंगणवाड्यांच्या इमारतीची आज दूरावस्था झालेली दिसते.

८.१४३ राज्यामध्ये सुमारे ४७ हजार इतका अंगणवाडी इमारतींचा अनुशेष आहे. त्यांच्या बांधकामासाठी फार मोठ्या निधीची आवश्यकता आहे. अंगणवाडी इमारतीच्या बांधकामासाठी अंदाजे साडेचार लाख रुपये इतका खर्च अपेक्षित असतो. टप्प्याटप्प्याने हे काम जरी सुरु असले तरी महाराष्ट्रात ४४ हजार इतकी गावे आहेत. या **४७ हजार अंगणवाडी इमारतींच्यापैकी शहरी भागात १५ हजार अंगणवाडी इमारतींची आवश्यकता आहे तर उर्वरित इमारती या इतर भागांतील आहेत. या कामाकरिता जिल्हा नियोजन विकास परिषद आदिवासी विकास विभाग, १३ वा वित्त आयोग अशा प्रकारे ४ ते ५ स्त्रोतांमार्फत निधी तातडीत उपलब्ध करुन राज्यातील अंगणवाडी इमारतीच्या बांधकामाचा अनुशेष लवकरात लवकर पूर्ण करण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.**

८.१४४ मंत्रालयीन विभागाच्या स्तरावर संगणकीकरण झाले आहे. परंतु, **जिल्हा ग्रामपंचायती स्तरावरुन माहिती घेण्यासाठी तेथे प्रत्यक्ष जाऊन किंवा दूरध्वनीद्वारे ती घ्यावी लागते. अंगणवाडी योजना सुरु होऊन ३५ वर्षाचा कालावधी झालेला आहे. इतक्या मोठ्या कालावधी नंतर देखील अतिशय चांगली अशी ही योजना खऱ्या अर्थाने चांगल्या पद्धतीने राबविता आली नाही या बाबत समितीने नापसंती व्यक्त केली. या योजनेला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्राधान्याने प्रयत्न करण्यात यावे अशी समितीची शिफारस आहे.**

८.१४५ राज्य शासन महिलांच्या कल्याणासाठी अनेक महत्वाच्या योजनांची अंमलबजावणी करते. यामध्ये आर्थिकदृष्ट्या मागास कुटुंबातील मुलींना शासनमान्य संस्थांमध्ये व्यावसायिक प्रशिक्षण घेण्यासाठी दरमहा रु.१००/- विद्यावेतन दिले जाते. तसेच दारिद्र्य रेषेखालील विधवा स्त्रियांना त्यांच्या मुलींच्या विवाहासाठी रु.२०००/- इतके अर्थसहाय्य दिले जाते. या व्यतिरिक्त गरीब, परितक्त्या, अविवाहित माता, पिडीत स्त्रिया यांना स्वतःचा छोटा व्यवसाय सुरु करण्यासाठी लाभार्थ्याला एकरक्कमी रु.५००/- एवढे अर्थसहाय्य दिले जाते. या उदाहरणादाखल दर्शविलेल्या योजना असून आणखीही बऱ्याच योजना आहेत. **जेथे शासनामार्फत लाभार्थी महिलांना अर्थसहाय्य देण्यात येते. परंतु या योजनांमार्फत दिले जाणारे अर्थसहाय्य अतिशय अल्प आहे. त्यामुळे विभागाने महिला व बाल विकासाच्या योजनांमध्ये दिल्या जाणाऱ्या अनुदानात भरीव वाढ करण्यात यावी अशी समितीची शासनास शिफारस आहे.**

८.१४६ महिला व बालकल्याण विभागाच्या अर्थसंकल्पीय तरतूदीमध्ये कपात केली जात नाही. तरीही या विभागास राज्य शासनाचे अनुदान व केंद्र शासनाकडून मिळणारे अनुदान यांचा नीट व प्रभावी वापर न झाल्यामुळे राज्यातील कुपोषण वाढत आहे. हा पैसा खर्च करण्याकरिता प्रभावी व कुशल यंत्रणा असणे अत्यंत आवश्यक आहे. राज्य शासनाच्या व केंद्र शासनाच्या योजनेनुसार सर्व स्तरावर प्रत्येक छोट्या छोट्या योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी होऊन त्याचे मुल्यनिर्धारण काटेकोरपणे झाले तरच राज्यातील कुपोषण संपुष्टात येईल. **महिला व बालविकास विभागाच्या सर्व योजनांवर उच्चपदस्थांनी जातीने लक्ष घालून वस्तुस्थितीदर्शक अहवाल नियमितपणे मागवून अनियमितता आढळून आल्यास विनाविलंब कारवाई करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

८.१४७ खात्यामधील अनेक कामांच्या निविदा ह्या कंत्राटदार आणि राजकीय लोकांना दिल्या जातात. राज्यात विशेषतः मुंबई सारख्या शहरात हा विषय अतिशय गंभीर आहे. मुंबई शहरात ५ हजारांपेक्षा अधिक अंगणवाड्या आहेत. यावर महानगरपालिकेतील आरोग्य खात्याचे कोणत्याही प्रकारे नियंत्रण नसते. **जिल्हा परिषदेत मात्र मुख्य कार्यकारी अधिकारी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी आणि बीडीओ कामाच्या ठिकाणी प्रत्यक्षात भेट देऊन नियंत्रण ठेवण्याचे काम करीत असले तरी राज्यात अनेक ठिकाणी गैरप्रकार झाल्याचे उघडकीस आले आहे. ही बाब विचारात घेता प्रभावी उपाययोजना करण्यात यावी त्याकरिता राज्यात रेशनिंगच्या संदर्भात असलेल्या समित्यांच्या इतर सदस्यांचा समावेश असतो त्याचप्रमाणे अंगणवाड्यांच्या संदर्भात मतदारसंघनिहाय समित्या स्थापन करण्यात याव्यात अशी समितीची शिफारस आहे.**

८.१४७ बालके, गर्भवती स्त्रिया व स्तनदा माता यांच्या पोषण विषयक किमान गरजा भागविण्यासाठी व त्यांना आरोग्य सुविधा पुरविण्यासाठी पूरक पोषण आहार हा कार्यक्रम एकात्मिक बाल विकास योजनेंतर्गत राबविण्यात येतो. जागतिक आरोग्य संघटनेच्या मानकानुसार, वर्ष २०१०-२०११

पासून बालकांचे सर्वसाधारण, साधारण कमी वजनाची व अति कमी वजनाची बालके असे वर्गीकरण करण्यात येते. **पोषण श्रेणीनिहाय बालकांची ग्रामीण, आदिवासी व नागरी अशी विभागणी करण्यात येऊन त्यांना आवश्यक तो पोषण आहार मिळण्याबाबत त्याप्रमाणे खाद्यपदार्थ देण्यात येतात. परंतु या योजनेची अंमलबजावणी योग्य रित्या न झाल्यामुळे व यावर होणारा खर्च फक्त कागदोपत्री दर्शवून अनुदान घेण्यात येते. त्यामुळे या योजनांवर शासन मोठ्या प्रमाणात खर्च करुनही त्यास यश अद्याप प्राप्त झालेले नाही. पूरक पोषण आहाराची योजना कार्यक्षमरित्या राबविण्यात येते किंवा कसे यावर निरिक्षण ठेवण्याकरीता तपासणी यंत्रणा निर्माण करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

८.१४८ ग्रामपंचायत ही पंचायती राज व्यवस्थेचा आत्मा आहे. या महिला व बाल विकास विभागाच्या योजना राबविण्याच्या प्रक्रियेमध्ये ग्रामपंचायतीच्या सरपंचाना सामावून घेण्यात यावे. योजनांवर देखरेख करणारे जे कोणी अधिकारी असतील त्यांच्या नावांची यादी ग्रामीण ग्रामपंचायतमध्ये व शहरी भागात अंगणवाडी व अन्य शासकीय कार्यालयात व रुग्णालयात लावण्यात यावी. अधिकारी त्यांचे काम व्यवस्थित करतात की नाही याची पडताळणी करण्यात यावी त्या अनुषंगाने तक्रार प्राप्त झाल्यास त्याची दखल घेण्यात यावी. अंगणवाड्यांसाठी बालविकास प्रकल्प अधिकारी, पर्यवेक्षक आहेत. परंतु त्यांच्यावर ग्रामपंचायतीचे नियंत्रण नसते. ही योजना प्रायोगिक तत्त्वावर ग्रामपंचायती मार्फत राबविली जावी. त्यामुळे अंगणवाडीची जबाबदारी ग्रामपंचायतीकडे राहील. योजना राबविताना पारदर्शकता येईल आणि नजर देखील राहील. तसेच **महिला बालविकास विभागाच्या योजना राबविण्याच्या कार्यपद्धतीमध्ये लोकप्रतिनिधीचा समावेश केल्यास सदर योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करता येईल. योजनांची अंमलबजावणी ग्रामपंचायती मार्फत करण्यात यावी व त्यामध्ये व लोकप्रतिनिधींचा समावेश करण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.**

८.१४९ बाल सुधार गृहातून मुले बाहेर पडल्यावर कोठे जातात, समाज विघातक कामे करतात का, याची माहिती यापूर्वी विभागामार्फत घेतली जात नव्हती. विभागाने आता दोन प्रकारची व्यवस्था केलेली आहे. मुलांना रस्त्यावर रहावे लागू नये म्हणून अनुरक्षण गृह सुरु केले आहे. पूर्वी अनुरक्षण गृहे तीन होती. आता पाच वाढवून ती आठ झाली आहेत. या बाल गुन्हेगार मुलांना व्यावसायिक प्रशिक्षण दिले जाते.

८.१५० शासनातर्फे व्यवसाय प्रशिक्षण देण्याची योजना जरी आखली जात असली तरी सर्वांना प्रशिक्षण मिळेलच असेही नाही. त्यामुळे अशी मुले दुर्देवाने गुन्हेगारी प्रवृत्तीकडे वळतात. कायदा देखील हातात घेतात. त्यामुळे विभागाने बाल सुधारगृहातून बाहेर पडण्याऱ्या मुलांसाठी त्यांच्या पुढील आयुष्याचा मागोवा घेण्याची पद्धत (Tracking system) सुरु करुन त्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.

८.१५१ केंद्र शासनाच्या महिला व बाल विकास मंत्रालयाने मुलांना सुखरुप व सुरक्षित वातावरणात राहता यावे तसेच त्यांची योग्य ती काळजी व संरक्षण घेण्याच्या दृष्टिने एकात्मिकृत बाल संरक्षण योजना (Integreted child protetion schem) ही योजना सुरु केली आहे. या समितीचा प्रमुख उद्देश व संकल्पना काय, कशी राबविण्यात येत आहे. यामध्ये कोणाचा समावेश करण्यात आला आहे. याबाबत सविस्तर माहिती समितीस आश्वासित करुनही प्राप्त झालेली नाही. सदर योजनेची अद्ययावत माहिती समितीस तातडीने उपलब्ध करुन देण्यात यावी अशी समितीस शिफारस आहे.

८.१५२ समितीच्या साक्षीचे वेळी खांदा कॉलनी, पनवेल येथील कल्याणी महिला व बाल सेवा संस्था आश्रम तसेच शहापूर येथील सत्कर्म मतिमंद मुला-मुलींचे बालगृह येथील मतिमंद मुलींवर अत्याचार झाल्याबाबतचे प्रकरण समितीच्या निदर्शनास आले. या अनुषंगाने पनवेल व शहापूर येथील संस्थाना मान्यता कशी मिळाली. या अत्याचाराबाबत चौकशी करण्यात आली काय, त्याचे निष्कर्ष काय, दोषींवर कोणती कार्यवाही करण्यात आली, या संस्थामध्ये मुलींची संख्या किती होती व त्यांची सद्य:स्थिती काय, दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आले काय, इ.स्वरुपाची माहिती विभागीय सचिवांना विचारण्यात आली होती.

८.१५३ मतिमंद मुलांच्या बालगृहांना मान्यता देण्याबाबतचे निकषाबाबत विभागाकडून खालील प्रकारे माहिती प्राप्त झाली होती.

१. शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभागाच्या क्र.बीसीए-१०७४/५७११६/एन, दि.२४.२.१९७५ नुसार विहित केलेल्या नियमाच्या आधारे संचालक, महिला व बाल विकास, पुणे यांच्यामार्फत प्रस्तवांना मान्यता देण्यात येत असे.

२. त्यानंतर शासन परिपत्रक क्र.पीएसवाय-१०९८/प्र.क्र.१२६/का-३, दि.२६.७.१९९८ नुसार उपलब्ध असलेल्या अनुदानाचा विचार करुन, संस्थांची यादी संचालक, महिला व बाल विकास, पुणे यांनी योग्य त्या शिफारशीसह शासनाच्या मान्यतेसाठी सादर करावी, अशी तरतूद करण्यात आली.

३. संस्था आपले प्रस्ताव संबंधित जिल्ह्याच्या जिल्हा महिला व बाल विकास अधिकाऱ्याकडे सादर करतात. प्रस्तावावर तपासणी करुन, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी आपल्या शिफारशीसह आयुक्तांकडे पाठवितात. आयुक्त आपल्या शिफारशीसह शासनाकडे मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करतात.

४. आयुक्तांच्या शिफारशींच्या आधारे शासन स्तरावर संस्थांच्या प्रस्तावांना तत्त्वत: मान्यता देण्यात येते. तत्त्वत: मान्यता दिलेली संस्था आवश्यक ती सर्व अटी, शर्ती व इतर आवश्यक बाबींची पूर्तता करीत असल्याची खात्री करुन घेतल्यानंतर अंतिमत: मान्यता देण्याची कार्यवाही आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे यांच्याकडून केली जाते. आयुक्तांनी अंतिम मान्यता व नोंदणी प्रमाणपत्र दिल्यानंतर संस्था कार्यान्वित होते.

८.१५४ पनवेल येथील संस्थांना मान्यता देताना श्री.व्ही.डी.देसावळे हे उप आयुक्त म्हणून कार्यरत होते. पनवेल येथील संस्थेस मान्यता देण्याचा प्रस्ताव श्री.पी.एम.बुरुड, तत्कालिन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, रायगड यांनी कल्याणी महिला व बालक सेवा संस्था या संस्थेची नोंदणी प्रमाणपत्रासाठी प्रस्ताव सादर केला होता व त्यांनी या संस्थेची शिफारस करताना या संस्थेत कोणताही गैरव्यवहार आढळलेला नाही असा अभिप्राय देखिल दिला होता. तत्कालिन उप आयुक्त श्री.देसावळे यांची आयुक्त श्री.बाजीराव जाधव यांचेकडे प्रस्ताव पुढे सादर करण्यापूर्वी कल्याणी महिला व बालक सेवा संस्था ही मूळ संस्था पुण्याची असताना या संस्थेस मान्यता देण्याचा प्रस्ताव कोणत्या आधारे पाठविला या संस्थेचा पूर्वोतिहास काय आहे याबाबत सखोल चौकशी करणे आवश्यक होते. परंतु त्यांनी देखिल त्यांच्या कामामध्ये कुचराई केल्याचे आढळून आले. श्री.बुरुड यांनी संस्थेतील पदाधिकारी एकाच कुटुंबातील नसल्याचे प्रमाणपत्र, पदाधिकारी शासकीय सेवेत नसल्याचे प्रमाणपत्र याची शहानिशा करुनच प्रस्ताव आयुक्तालयास सादर करणे अपेक्षित होते. परंतु त्यांनी तसे केलेले नाही. खोट्या कागदपत्रांच्या आधारे या मतिमंद मुलांच्या वसतीगृहाला मान्यता दिल्याचे पोलिस तपासात देखिल स्पष्ट झाले असताना विभागाने संबंधित अधिकाऱ्यांवर कोणताही फौजदारी गुन्हा दाखल न करता फक्त त्यांना निलंबित करुन त्यांची विभागीय चौकशी सुरु करणे हे अत्यंत गैर व चुकीचे आहे. यामध्ये विभाग या प्रकरणाकडे गांभीर्याने लक्ष देत नाही या निष्कर्षप्रत समिती आली. तसेच तपास अधिकारी श्रीमती रश्मी करंदीकर यांनी सादर केलेला अहवाल देखिल विभागीय सचिवांनी व पाहिलेला नाही याबाबत समितीने आश्चर्य व तीव्र नापसंती देखिल व्यक्त केली.

८.१५५ इतक्या वर्षानंतर ही बाब उघडकीस आलेली आहे याचा अर्थ असे प्रकार वर्षानुवर्षे चालू आहेत असे दिसून येते. अशी लाजीरवाणी गैरकृत्ये करणाऱ्यांना व त्यांना साथ देणाऱ्या शासकीय अधिकाऱ्यांना कायद्याचे भय वाढेल व यापुढे अशी कृत्ये कोणी करण्यास धजावणार नाही यासाठी दोषींना अत्यंत कठोर अशी कारवाई झाली पाहिजे. अशा व्यक्तींना कडक शिक्षा झाल्याशिवाय गैरकृत्य करणाऱ्यांच्या मनात दहशत निर्माण होणार नाही. त्यामुळे याप्रकरणी जे अधिकारी दोषी आहेत त्यांच्यावर फौजदारी स्वरुपाचे गुन्हे त्वरीत दाखल करण्यात यावेत अशी समितीची शिफारस आहे व केलेल्या कारवाईची माहिती समितीस तातडीने देण्यात यावी.

८.१५६ शहापूर येथील प्रकरणासंदर्भात कारवाई केली असून श्रीमती ज्योती गतफळे (कडू), तत्कालिन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, ठाणे व श्रीमती रेणुका चौधरी, तत्कालिन जिल्हा परिविक्षा अधिकारी, ठाणे, श्री.एस.के.शिंदे, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, ठाणे व श्री.डि.एम.गव्हाणे, जिल्हा परिविक्षा अधिकारी रायगड यांना निलंबित करण्यात आले असून त्यांच्या विरुद्ध विभागीय चौकशी सुरु आहे अशी माहिती समितीस देण्यात आली. वरील **सर्व अधिकाऱ्यांविरुद्ध बालगृहांना अंतिम मान्यता देण्याची शिफारस करताना नमूद केलेल्या सोयी-सुविधा/वस्तुस्थिती याची पडताळणी काटेकोरपणे न केल्यामुळे, खोटी कागदपत्रे सादर करण्यास सहाय्य करणे या संदर्भात**

फौजदारी गुन्हा दाखल करण्याचे कळविण्यात आल्याची माहिती समितीस प्राप्त झाली त्यानुसार, या अधिकाऱ्यांवर केलेल्या कारवाईची माहिती समितीस त्वरित देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

८.१५७ विभागाने उच्च न्यायालयात कृती आराखडा सादर केलेला आहे. जे संस्था चालक मतिमंद मुलींचे बालगृह चालवितात त्यात गैरप्रकार घडू नये या दृष्टीकोनातून हा कृती आराखडा तयार केलेला आहे. त्यात असे नमूद केले आहे की, दुर्गम भागामध्ये किंवा क्षेत्रामध्ये अशा संस्था असू नयेत, ज्या ठिकाणी वैद्यकीय सुविधा उपलब्ध आहेत अशा ठिकाणी या संस्था असाव्यात. बाल संगोपनाचा अनुभव असलेल्या संस्थांकडे हे काम द्यावे. केंद्र शासनाच्या आयसीडीएस योजनेतून अर्थसहाय्य देऊन या संस्थांचे बळकटीकरण करुन त्यांना कर्मचारी वर्ग उपलब्ध करुन द्यावा, त्याचप्रमाणे वर्तमानपत्रात जाहिरात देऊन मतिमंद मुलांच्या पालकांना आवाहन करण्यात यावे. मतिमंद मुलांपैकी काही पालकांनी आपल्या पाल्याचा प्रवेश घेताना ती संस्था नोंदणीकृत आहे की नाही याची खात्री केल्याशिवाय प्रवेश घेऊ नये. दुर्गम क्षेत्रात संस्था चालविताना कोणाचेही लक्ष रहात नाही. ज्या संस्थेमध्ये गैर प्रकार घडलेला आहे, त्याचा शोध घेऊन अशा संस्थांविरुद्ध कारवाई करावी व अशा संस्थाची यादी पोलीस स्टेशनला व स्थानिक वर्तमान पत्रात प्रसिद्ध करण्याच्या सूचना पोलिस विभागाला दिलेल्या आहेत. प्रत्येक पोलीस स्टेशनमध्ये बाल संरक्षण अधिकारी नेमलेले आहेत. या अधिकाऱ्यांनी ज्या बोगस संस्था आहेत, ज्या संस्था अनियमितपणे चालतात, अशा संस्था बंद करुन त्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला पाहिजे. जेणे करुन मतिमंद मुलींचे शोषण होणार नाही. त्याचप्रमाणे तेथील कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्याची कार्यवाही सुरु करावी. मान्यता देण्यापूर्वी कोणती दक्षता घेतली पाहिजे, याबाबत समुपदेशन करण्यात यावे. हे **कर्मचारी वैद्यकीय दृष्ट्या प्रशिक्षित नसल्याचे त्यांचे समुपदेशन करणे व त्यांना प्रशिक्षण देणे याबाबतचा प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठवून त्यांची मान्यता घ्यावी. अशाप्रकारे मतीमंद मुलांसाठी नवीन संस्था सुरु करण्यासाठी शासनाने नवीन नियमावली तयार करुन त्याची कार्यवाही तसेच विभागाचे बळकटीकरण करण्यात यावे अशी समितीची शिफारस आहे.**

८.१५८ ज्या संस्थांमध्ये गैरप्रकार झाले त्या पाच संस्था बंद केलेल्या आहेत आणि संस्था चालकांवर फौजदारी गुन्हे दाखल झालेले आहेत. **शासनाच्या १९ संस्था सुरु आहेत. त्या १९ संस्थांची यादी व ज्या ५ संस्था बंद झाल्या त्यांची यादी पत्त्यांसह समितीला आठ दिवसात सादर करण्याचे आश्वासित करुनही अद्याप माहिती प्राप्त झाली नाही. सदर माहिती समितीला तातडीने उपलब्ध करुन द्यावी अशी समितीचा शिफारस आहे.**

परिशिष्ट - अ

परिशिष्ट - ब

मंगळवार, दिनांक ५ ऑक्टोबर, २०१०
लोकलेखा समिती

समितीची बैठक मंगळवार, दिनांक ५ ऑक्टोबर, २०१० रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२.०० वाजता सुरु होऊन दुपारी १.४४ वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख

(१) श्री.गिरीश बापट, वि.स.स.

सदस्य

(२) श्री.निलेश देशमुख-पारवेकर, वि.स.स.
(३) श्रीमती मिनाक्षी पाटील, वि.स.स.
(४) श्री.विलास लांडे, वि.स.स.
(५) श्री.संजय सावकारे, वि.स.स.
(६) श्री.सुर्यकांत दळवी, वि.स.स.
(७) श्री.आर.एम. वाणी, वि.स.स.
(८) डॉ. दिपक सावंत - वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,

(१) श्री.भाऊसाहेब कांबळे, सह सचिव.
(२) श्री.ऋतुराज ज. कुडतरकर, अवर सचिव.
(३) श्री.रा.रा. काठे, अवर सचिव (समिती)

निमंत्रित :

महालेखाकार यांचे कार्यालय :

१) श्री.जी.ए. निर्मलकुमार, उप महालेखाकार, नागपूर.
२) श्री.के.सी. कुरुविल्ला, उप महालेखाकार, मुंबई.

वित्त विभाग :

१) श्री.विद्याधर कानडे, प्रधान सचिव, (वित्त).
२) श्री.राजेश अग्रवाल, सचिव (लेखा व कोषागारे).

साक्षीदार :

गृह विभाग :

१) श्री.मेधा गाडगीळ, प्रधान सचिव (गृह).
२) श्री.प्रवीण दिक्षीत, प्रधान सचिव (गृह/विशेष).
३) श्री.राजेंद्र अे. सोनावणे, अतिरिक्त पोलीस महासंचालक (तुरुंग), पुणे

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००६-२००७ या वर्षाच्या नागरी अहवालातील परिच्छेद क्र.४.४.२ संदर्भात प्रधान सचिव, गृह विभाग यांची साक्ष घेतली व पुर्ण झाली.

बुधवार, दिनांक १२ जानेवारी, २०११
लोकलेखा समिती

समितीची बैठक बुधवार, दिनांक १२ जानेवारी, २०११ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी ११.३० वाजता सुरु होऊन दुपारी १२.५५ वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख

१) श्री.गिरीश बापट, वि.स.स.

सदस्य

२) श्री.निलेश देशमुख-पारवेकर - वि.स.स.
३) श्री.ए.टी.पवार - वि.स.स.
४) श्री.नवाब मालिक- वि.स.स.
५) श्री.संजय सावकारे - वि.स.स.
६) श्री.गिरीष महाजन - वि.स.स.
७) श्री.नानाभाऊ पटोले - वि.स.स.
८) श्री.सुर्यकांत दळवी - वि.स.स.
९) श्री.आर.एम.वाणी - वि.स.स.
१०) श्री.सुरेशदादा देशमुख- वि.प.स.
११) डॉ.दीपक सावंत- वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,

१) डॉ. अ. ना. कळसे, प्रधान सचिव
२) श्री. भाऊसाहेब कांबळे, सह सचिव
३) श्री. ऋतुराज ज. कुडतरकर, अवर सचिव
४) श्री. आर.आर.काठे, अवर सचिव (समिती)

निमंत्रित :

महालेखाकार यांचे कार्यालय :

१) श्रीमती अनिता पट्टनायक, प्रधान महालेखापाल.
२) श्री. आर. के. सोलंकी, उप महालेखापाल.

वित्त विभाग :

१) श्री. राजेश अग्रवाल, सचिव (वित्त)

साक्षीदार :

नगरविकास विभाग :

२) श्री. टी.सी.बेंजामीन, प्रधान सचिव

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००६-२००७ या वर्षाच्या नागरी अहवालातील परिच्छेद क्र. ४.३.९ संदर्भात प्रधान सचिव, नगरविकास विभाग यांची साक्ष घेतली व पूर्ण झाली.

मंगळवार, दिनांक ८ फेब्रुवारी, २०११

लोकलेखा समिती

समितीची बैठक मंगळवार, दिनांक ८ फेब्रुवारी, २०११ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२.०० वाजता सुरु होऊन दुपारी १.३० वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख

१) श्री. नाना पटोले, वि.स.स. तथा कार्यकारी समिती प्रमुख

सदस्य

२) श्री.निलेश देशमुख-पारवेकर - वि.स.स.
३) डॉ.नामदेव उसेंडी - वि.स.स.
४) श्रीमती मिनाक्षी पाटील - वि.स.स.
५) श्री.ए.टी.पवार - वि.स.स.
६) श्री.नवाब मालिक - वि.स.स.
७) श्री.संजय सावकारे - वि.स.स.
८) प्रा.राम शिंदे- वि.स.स.
९) श्री.बाळा नांदगावकर - वि.स.स.
१०) श्री.विनोद तावडे - वि.प.स.
११) डॉ. दिपक सावंत - वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,

१) श्री.सु.सा.गायकवाड, वित्तीय सल्लागार
२) श्री.ऋतुराज ज. कुडतरकर, अवर सचिव
३) श्री.रामनाथ रा. काठे, अवर सचिव (समिती)

निमंत्रित :

महालेखाकार यांचे कार्यालय :

१) श्रीमती अनिता पट्टनायक, प्रधान महालेखाकार (ऑडिट)
२) श्रीमती सयंतनी जाफा, महालेखाकार (वाणिज्य)

वित्त विभाग :

श्री.राजेश अग्रवाल, सचिव (लेखा व कोषागारे)

साक्षीदार :

कृषी, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्य व्यवसाय (दुग्धविकास) विभाग :

श्री. अनिल डिग्गीकर, सचिव कृषि व पदुम विभाग (पदुम)

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००६-२००७ या वर्षाच्या नागरी अहवालातील परिच्छेद क्र.४.४.१ संदर्भात सचिव, कृषी व पदुम (पदुम) विभाग यांची साक्ष घेतली व पूर्ण झाली.

मंगळवार, दिनांक १० मे, २०११
लोकलेखा समिती

समितीची बैठक मंगळवार, दिनांक १० मे, २०११ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी ११.३० वाजता सुरु होऊन दुपारी १.०५ वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख

१) श्री.गिरीश बापट, वि.स.स.

सदस्य

२) श्रीमती मिनाक्षी पाटील, वि.स.स.
३) श्री.ए.टी.पवार, वि.स.स.
४) श्री.नानाभाऊ पटोले, वि.स.स.
५) श्री.सुरेशदादा देशमुख, वि.स.स.
६) डॉ. दिपक सावंत - वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,

१) श्री.भाऊसाहेब कांबळे, सह सचिव
२) श्री.ऋतुराज कुडतरकर, अवर सचिव

निमंत्रित :

महालेखाकार यांचे कार्यालय :

१) श्रीमती अनिता पट्टनायक, प्रधान महालेखाकार
२) श्री.आर.जी.सोलंकी, महालेखाकार

वित्त विभाग :

श्री.श्रीकांत देशपांडे, सचिव (लेखा व कोषागारे)

साक्षीदार :

पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग :-

श्रीमती मालिनी शंकर, प्रधान सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००६-२००७ या वर्षाच्या नागरी अहवालातील परिच्छेद क्र.४.३.२० संदर्भात प्रधान सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग यांची साक्ष घेतली व पूर्ण झाली.

बुधवार, दिनांक २५ मे, २०११

लोकलेखा समिती

समितीची बैठक बुधवार, दिनांक २५ मे, २०११ रोजी विधान भवन, मुंबई येथे सकाळी २.०० वाजता सुरु होऊन दुपारी ३.२० वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख

(१) श्री.गिरीश बापट, वि.स.स.

सदस्य

(२) डॉ. नामदेव उसेंडी, वि.स.स.
(३) श्री. नवाब मलिक, वि.स.स.
(४) श्री. संजय सावकारे, वि.स.स.
(५) प्रा. राम शिंदे, वि.स.स.
(६) श्री. नानाभाऊ पटोले, वि.स.स.
(७) श्री.सुर्यकांत दळवी - वि.स.स.
(८) श्री.बाळा नांदगावकर - वि.स.स.
(९) श्री. विनोद तावडे, वि.प.स.
(१०) डॉ.दीपक सावंत - वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,

१) श्री.ऋतुराज ज. कुडतरकर, अवर सचिव.
२) श्री.रामनाथ रा. काठे, अवर सचिव (समिती).

निमंत्रित :

महालेखाकार यांचे कार्यालय :
श्री.यशवंत कुमार, ए.जी. (नागपूर)

वित्त विभाग :
श्री.श्रीकांत देशपांडे, सचिव (ले. व को.)

साक्षीदार :

कृषि विभाग :

(१) डॉ.सुधीरकुमार गोयल, प्रधान सचिव, कृषि विभाग, मंत्रालय, मुंबई.
(२) श्री.सावंत, संचालक, समाज कल्याण विभाग, पुणे.

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००६-२००७ या वर्षाच्या नागरी अहवालातील परिच्छेद क्र.३.५ संदर्भात प्रधान सचिव, कृषि विभाग यांची साक्ष घेतली व पूर्ण झाली.

मंगळवार, दिनांक ५ जुलै, २०११

लोकलेखा समिती

समितीची बैठक मंगळवार, दिनांक ५ जुलै, २०११ रोजी विधान भवन, मुंबई येथे सकाळी १२.०० वाजता सुरु होऊन दुपारी १.५० वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख

(१) श्री.गिरीश बापट, वि.स.स.

सदस्य

(२) डॉ. नामदेव उसेंडी, वि.स.स.
(३) श्री.रामप्रसाद कदम-बोर्डीकर, वि.स.स.
(४) श्री. विलास लांडे, वि.स.स.
(५) प्रा. राम शिंदे, वि.स.स.
(६) श्री.सुरेशदादा देशमुख, वि.प.स.
(७) डॉ.दीपक सावंत, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,

(१) श्री. भाऊसाहेब कांबळे, सह सचिव
(२) श्री.सु.सा. गायकवाड, वित्तीय सल्लागार.
(३) श्री.ऋतुराज ज. कुडतरकर, अवर सचिव.

निमंत्रित :

महालेखाकार यांचे कार्यालय :
श्रीमती माला सिन्हा, प्रधान महालेखाकार

वित्त विभाग :
श्री.श्रीकांत देशपांडे, सचिव (लेखा व कोषागारे)

साक्षीदार :

(१) अदिवासी विकास विभाग :
डॉ.रमेशचंद्र सागर, प्रधान सचिव

(२) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग :
श्री.दिनेश वाघमारे, सचिव

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००६-२००७ या वर्षाच्या नागरी अहवालातील परिच्छेद क्र.३.३ संदर्भात प्रधान सचिव, आदिवासी विकास व सचिव सामाजिक न्याय विभाग यांची साक्ष घेतली व अपूर्ण राहिली.

मंगळवार, दिनांक १२ जुलै, २०११

लोकलेखा समिती

समितीची बैठक मंगळवार, दिनांक १२ जुलै, २०११ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२.०० वाजता सुरु होऊन दुपारी ४.१५ वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख

(१) श्री.गिरीश बापट, वि.स.स.

सदस्य

(२) श्री. निलेश देशमुख-पारवेकर, वि.स.स.
(३) श्री.रामप्रसाद कदम-बोर्डीकर, वि.स.स.
(४) श्री.रवि राणा, वि.स.स.
(५) श्री.नवाब मलिक, वि.स.स.
(६) श्री.संजय सावकारे, वि.स.स.
(७) प्रा. राम शिंदे, वि.स.स.
(८) श्री.सुर्यकांत दळवी, वि.स.स.
(९) श्री. भाई जगताप, वि.प.स.
(१०) श्री. विनोद तावडे, वि.प.स.
(११) डॉ.दिपक सावंत, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,

(१) श्री.सु.सा. गायकवाड, वित्तीय सल्लागार.
(२) श्री.रामनाथ रा. काठे, अवर सचिव (समिती).

निमंत्रित :

महालेखाकार यांचे कार्यालय, मुंबई

श्रीमती माला सिन्हा, प्रधान महालेखाकार

महालेखाकार यांचे कार्यालय, नागपूर

१) श्री.जे.एस.करपे, महालेखकार
२) श्री.टी.एस.आर.गुप्ता, उप महालेखाकार

वित्त विभाग :

श्री. श्रीकांत देशपांडे, सचिव (लेखा व कोषागारे)

साक्षीदार :

महिला व बालविकास विभाग :

श्रीमती वंदना कृष्णा, प्रधान सचिव

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००६-२००७ या वर्षाच्या नागरी अहवालातील परिच्छेद क्र.५.१ संदर्भात प्रधान सचिव, महिला व बालविकास विभाग यांची साक्ष घेतली व अपूर्ण राहिली.

बुधवार, दिनांक १३ जुलै, २०११

लोकलेखा समिती

समितीची बैठक बुधवार, दिनांक १३ जुलै, २०११ रोजी विधान भवन, मुंबई येथे सकाळी ११.३० वाजता सुरु होऊन दुपारी २.२५ वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख

(१) श्री.गिरीश बापट, वि.स.स.

सदस्य

(२) श्री. निलेश देशमुख-पारवेकर, वि.स.स.
(३) श्रीमती मिनाक्षी पाटील, वि.स.स.
(४) श्री.नवाब मलिक, वि.स.स.
(५) श्री.विलास लांडे, वि.स.स.
(६) श्री.संजय सावकारे, वि.स.स.
(७) प्रा. राम शिंदे, वि.स.स.
(८) श्री.गिरीष महाजन, वि.स.स.
(९) श्री.नानाभाऊ पटोले, वि.स.स.
(१०) श्री.भाई जगताप, वि.प.स.
(११) श्री.विनोद तावडे, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
श्री.रामनाथ रा. काठे, अवर सचिव (समिती).

निमंत्रित :

महालेखाकार यांचे कार्यालय, मुंबई
श्री.पी.के.सोलंकी, उप महालेखाकार

महालेखाकार कार्यालय, नागपूर
१) श्री. जे.एस.करपे, महालेखाकार
२) श्री.टी.एस.आर.गुप्ता, उप महालेखाकार

वित्त विभाग :
श्री. श्रीकांत देशपांडे, सचिव (ले.व.को.)

साक्षीदार :

नियोजन (रोजगार हमी योजना) विभाग :
श्री.व्ही.गिरीराज, प्रधान सचिव

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००६-२००७ या वर्षाच्या नागरी अहवालातील परिच्छेद क्र.३.१ संदर्भात प्रधान सचिव नियोजन (रोहयो) विभाग यांची साक्ष घेतली व पूर्ण झाली.

मंगळवार, दिनांक २० सप्टेंबर, २०११

लोकलेखा समिती

समितीची बैठक मंगळवार, दिनांक २० सप्टेंबर, २०११ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२.०० वाजता सुरु होऊन दुपारी २.३० वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख

१) श्री.गिरीश बापट, वि.स.स.

सदस्य

२) डॉ. नामदेव उसेंडी, वि.स.स.
३) श्री.नवाब मलिक, वि.स.स.
४) श्री.संजय सावकारे, वि.स.स.
५) प्रा. राम शिंदे, वि.स.स.
६) श्री.नानाभाऊ पटोले, वि.स.स.
७) श्री.बाळा नांदगावकर, वि.स.स.
८) डॉ. दीपक सावंत, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,

१) श्री. सु.सा.गायकवाड, वित्तीय सल्लागार
२) श्री. ऋतुराज ज. कुडतरकर, अवर सचिव
३) श्री. रा.रा.काठे, अवर सचिव (समिती)

निमंत्रित :

महालेखाकार यांचे कार्यालय :

श्रीमती माला सिन्हा, प्रधान महालेखाकार, मुंबई

वित्त विभाग :

श्री.श्रीकांत देशपांडे, सचिव, वित्त विभाग (ले.व.को)

साक्षीदार :

आदिवासी विभाग :

डॉ.रमेशचंद्र सागर, प्रधान सचिव

सामाजिक न्याय विभाग :

श्री.दिनेशकुमार वाघमारे, सचिव

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००६-२००७ या वर्षाच्या नागरी अहवालातील परिच्छेद क्र.३.३ संदर्भात प्रधान सचिव, आदिवासी विकास व सचिव, सामाजिक न्याय विभाग यांची साक्ष घेतली व पूर्ण झाली.

बुधवार, दिनांक २१ सप्टेंबर, २०११

लोकलेखा समिती

समितीची बैठक बुधवार, दिनांक २१ सप्टेंबर, २०११ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी ११.३० वाजता सुरु होऊन दुपारी १२.५५ वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख

१) श्री. गिरीश बापट, वि.स.स.

सदस्य

२) श्री. निलेश देशमुख-पारवेकर, वि.स.स.
३) डॉ.नामदेव उसेंडी, वि.स.स.
४) श्री. नवाब मलिक, वि.स.स.
५) श्री. संजय सावकारे, वि.स.स.
६) प्रा. राम शिंदे, वि.स.स.
७) श्री.नानाभाऊ पटोले, वि.स.स.
८) श्री.सुर्यकांत दळवी, वि.स.स.
९) श्री.आर.एम.वाणी, वि.स.स.
१०) श्री.बाळा नांदगांवकर, वि.स.स.
११) श्री.भाई जगताप, वि.प.स.
१२) श्री.विनोद तावडे, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,

१) श्री. सु.सा.गायकवाड, वित्तीय सल्लागार
२) श्री. ऋतुराज ज. कुडतरकर, अवर सचिव

निमंत्रित :

महालेखाकार यांचे कार्यालय :

श्रीमती माला सिन्हा, प्रधान महालेखाकार, मुंबई

वित्त विभाग :

श्री.श्रीकांत देशपांडे, सचिव, वित्त विभाग (ले.व.को)

साक्षीदार :

महिला व बालविकास विभाग :

श्रीमती वंदना कृष्णा, प्रधान सचिव

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००६-२००७ या वर्षाच्या नागरी अहवालातील परिच्छेद क्र.५.१ संदर्भात प्रधान सचिव, महिला व बालविकास विभाग यांची साक्ष घेतली व अपूर्ण राहिली.

मंगळवार, दिनांक २९ फेब्रुवारी, २०१२

लोकलेखा समिती

समितीची बैठक मंगळवार, दिनांक २९ फेब्रुवारी, २०११ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी २.०० वाजता सुरु होऊन दुपारी ३.१० वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख

१) डॉ.दीपक सावंत, वि.प.स. तथा कार्यकारी समिती प्रमुख

सदस्य

२) श्रीमती मिनाक्षी पाटील, वि.स.स.
३) श्री.ए.टी.पवार, वि.स.स.
४) श्री.संजय सावकारे, वि.स.स.
५) प्रा.राम शिंदे, वि.स.स.
६) श्री.नानाभाऊ पटोले, वि.स.स.
७) श्री.सुर्यकांत दळवी, वि.स.स.
८) श्री.बाळा नांदगांवकर, वि.स.स.
९) श्री.सुरेशदादा देशमुख, वि.प.स.
१०) श्री. पांडुरंग फुंडकर, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,

१) श्री. सु.सा.गायकवाड, वित्तीय सल्लागार
२) श्री. ऋतुराज ज. कुडतरकर, अवर सचिव
३) श्री. दिलीप येवला, अवर सचिव (समिती)

निमंत्रित :

महालेखाकार यांचे कार्यालय :

श्रीमती हिमबिंदु एम., वरिष्ठ उप महालेखाकार

वित्त विभाग :

श्री.श्रीकांत देशपांडे, सचिव, वित्त विभाग (ले.व.को)

साक्षीदार :

महिला व बालविकास विभाग :

श्रीमती वंदना कृष्णा, प्रधान सचिव

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००६-२००७ या वर्षाच्या नागरी अहवालातील परि क्र.५.१ संदर्भात प्रधान सचिव, महिला व बालविकास विभाग यांची साक्ष घेतली व अपूर्ण राहिली.

मंगळवार, दिनांक ८ मे, २०१२

लोकलेखा समिती

समितीची बैठक मंगळवार, दिनांक ८ मे, २०१२ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२.०० वाजता सुरु होऊन दुपारी १.५० वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख

१) श्री. गिरीश बापट, वि.स.स.

सदस्य

२) श्री. निलेश देशमुख-पारवेकर, वि.स.स.
३) श्रीमती मिनाक्षी पाटील, वि.स.स.
४) श्री. नवाब मलिक, वि.स.स.
५) प्रा. राम शिंदे, वि.स.स.
६) श्री.भाई जगताप, वि.स.स.
७) डॉ.दीपक सावंत, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
श्री. ऋतुराज ज. कुडतरकर, अवर सचिव
श्री.दिलीप येवला, अवर सचिव (समिती)

निमंत्रित :

महालेखाकार यांचे कार्यालय, मुंबई
श्रीमती माला सिन्हा, प्रधान महालेखाकार

वित्त विभाग :
श्री.श्रीकांत देशपांडे, सचिव, वित्त विभाग (ले.व.को)

साक्षीदार :

महिला व बालविकास विभाग :
श्रीमती वंदना कृष्णा, प्रधान सचिव

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००६-२००७ या वर्षाच्या नागरी अहवालातील परि क्र.५.१ संदर्भात महिला व बालविकास विभाग यांची साक्ष घेतली व पूर्ण झाली.

बुधवार, दिनांक १८ जुलै, २०१२

लोकलेखा समिती

समितीची बैठक बुधवार, दिनांक १८ जुलै, २०१२ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी ३.०० वाजता सुरु होऊन दुपारी ३.३० वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख

१) श्री. गिरीश बापट, वि.स.स.

सदस्य

२) श्री. मधुकर उर्फ अण्णा चव्हाण, वि.स.स.
३) श्री.सुनिल केदार, वि.स.स.
४) श्री. बसवराज पाटील, वि.स.स.
५) श्री.नानाभाऊ पटोले, वि.स.स.
६) श्री.आर.एम.वाणी, वि.स.स.
७) श्री.चंद्रकांत मोकटे, वि.प.स.
८) श्री.जयप्रकाश छाजेड, वि.प.स.
९) प्रा.सुरेश नवले, वि.प.स.
१०) श्री.पांडुरंग फुंडकर, वि.प.स.

निमंत्रित :

११) श्री.दिवाकर रावते, वि.प.स.
१२) श्री.मनिष जैन, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,

१) श्री.सु.सा.गायकवाड, वित्तीय सल्लागार
२) श्री. ऋतुराज ज. कुडतरकर, अवर सचिव
३) श्री.दिलीप येवला, अवर सचिव (समिती)
४) श्री.सोमनाथ न.सानप, कक्ष अधिकारी

समितीने नववा प्रारुप अहवाल विचारात घेतला व काही सुधारणांसह तो संमत केला.